पुणे विद्यापीठाच्या पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध

मराठेशाहितील युद्धशास्त्राची उत्क्रान्ति
(१६८० – १७२०)

EVOLUTION OF WARFARE UNDER THE MARATHAS
(1680 – 1720)

अभ्यासक

कुमार बी. कदम
एम. ए. (संरक्षणशास्त्र)

– मार्गदर्शक –

लेप्टनंट कर्नल म. ग. अभ्यंकर

डायरेक्टर

कुंझरू सेंटर ऑफ डिफेन्स स्टडीज अँन्ड रिसर्च

सप्टेम्बर १९८५

२० सप्टेंबर १९८५

प्रमाणपत्र

या पत्राव्दारे मी प्रमाणित करून लिहितो की, श्री. कुमार श्री. कदम यांनी "मराठेशाहितील युध्दशास्त्राची उत्क्रान्ति" (१६८०-१७२०) हा प्रबंध पुणे विद्यापीठाच्या पीअेच.डी. पदवीसाठी माझ्या मार्गदर्शनाखाली पुरा केला आहे. आजपावेतो या क्षेत्रात अशा त-हेचा प्रबंध लिहिला गेलेला नाही त्यामुळे या प्रबंधाने संरक्षणशास्त्रावरील उपलब्ध साहित्यात महत्वाची भर पडणार आहे.

म. प. अभ्यंकर
म.प.अभ्यंकर
३०-९-१९८५

मराठे शाहीतील युध्दशास्त्राची उत्क्रान्ति

१६८० ते १७२०

प्रबंधाची अनुक्रमणिका

भाग पहिला

युध्दशास्त्र - उगम आणि विकास
(Warfare-Origin and Development)

प्रबंधाची रुपरेषा १- ९

प्रकरण

१ मानवी संघर्ष आणि प्राचीन युध्दशास्त्र १०- ३०
२ युध्दशास्त्राची मध्ययुगीन प्रगति ३१-४८
३ आधुनिक युध्दशास्त्राचा प्रारंभ ४९-७६
४ विसाव्या शतकातील जागतिक संघर्ष ७७-१०१
५ अत्याधुनिक युध्दशास्त्र : तत्त्व आणि पध्दति १०२-१०६

भाग दुसरा

मराठयांचे युध्दशास्त्र
(Maratha Warfare)

६ भारतीय युध्दनैतिक परिस्थिती (१६८०-१७२०) १०७-१२०
७ मराठयांचे युध्दशास्त्र : तत्त्व आणि पध्दति १२१-१३४
८ गुरिला युध्द पध्दत १३५-१४४

भाग तिसरा

मराठ्यांची युध्दविषयक कार्यवाही

(१६८०-१७२०)

(Maratha Military Operations
1680-1720)

प्रकरण

९ संभाजी कालीन मोहिमा - पश्चिम किनारा १४५-१७८
१० संभाजी कालीन मोहिमा - मध्य महाराष्ट्र १७९-२१७
११ संभाजी कालीन मोहिमा - दक्षिण भारत २१८-२४२
१२ राजाराम कालीन मोहिमा - मध्य महाराष्ट्र २४३-२६६
१३ राजाराम कालीन मोहिमा - दक्षिण भारत २६७-२८७
१४ गुरिला युध्दपध्दतीचा अुत्कर्ष काळ २८८-२९९
१५ मराठ्यांचा तापी-नर्मदा खो-यात संचार ३००-३०९
१६ मराठ्यांची अुत्तरेकडे घोडदौड (दिल्लीकडे) ३१०-३२५

भाग चवथा

अुत्क्रांति आणि निष्कर्ष

(Evolution and Assessment)

१७ मराठ्यांच्या युध्दशास्त्राची अुत्क्रान्ति (युध्दनिती) ३२६-३३५
१८ मराठ्यांच्या युध्दशास्त्राची अुत्क्रान्ति (युध्द-व्यवहार आणि पुरवठा यंत्रणा) ३३६-३४६

प्रबंधातील नकाशा सूची

प्रकरण नंबर १

नकाशा नंबर १ मराठी राज्याचा विस्तार
नकाशा नंबर २ कोकण किनारा (सिद्दी)
नकाशा नंबर ३ पश्चिम किनारा (पोर्तुगीज)
नकाशा नंबर ४ जंजि-याचा किल्ला
नकाशा नंबर ५ पोर्तुगीज वसाहती

प्रकरण नंबर १०

नकाशा नंबर ६ उत्तर महाराष्ट्रातील संघर्ष
नकाशा नंबर ७ उत्तर कोकणातील संघर्ष
नकाशा नंबर ८ दक्षिण महाराष्ट्रातील संघर्ष

प्रकरण नंबर ११

नकाशा नंबर ९ आदिलशाहीचा प्रदेश
नकाशा नंबर १० दक्षिण भारतातील लष्करी कार्यवाही
नकाशा नंबर ११ मोगल सेनेची चढाई

प्रकरण नंबर १२

नकाशा नंबर १२ रायगड ते जिंजी

प्रकरण नंबर १३

नकाशा नंबर १३ संताजी आणि धनाजी यांच्या आक्रमक हालचाली

प्रकरण नंबर १४

नकाशा नंबर १४ मोगल विरोधी लष्करी कार्यवाही

प्रकरण नंबर १५

नकाशा नंबर १५ तापी नर्मदा खो-यातील मोहिमा

प्रकरण नंबर १६

नकाशा नंबर १६ मराठ्यांची दिल्लीकडे घोडदौड

प्रकरण नंबर १७

नकाशा नंबर १७ मराठी आरमाराच्या लष्करी हालचाली

मराठेशाहीतील युध्द शास्त्राची उत्क्रान्ति

(१६८० ते १७२०)

प्रबंधाची रूपरेषा

(Outline of the thesis)

प्रबंधाचे वैशिष्ट्य :

१. गेल्या ७५ ते १०० वर्षांच्या काळात मराठ्यांच्या इतिहासासंबंधी संदर्भ साधनांच्या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय प्रगती झालेली आहे. यापैकी बहुतांशी साधन संदर्भ हे समकालीन घटना आणि राजवटी यांच्या बद्दल भारतीयांनी आणि भारतात प्रवासास आलेल्या विदेशी व्यक्तींनी लिहिलेल्या वैयक्तीक अशा [illegible] असलेल्या दिसतात. आपल्या देशातील थोर इतिहास संशोधकांनी अत्यंत परिश्रम करून निरनिराळ्या इतिहास प्रसिध्द घराण्यांचे कागदपत्र, विदेशी प्रवाशांच्या त्यांच्या भाषेतील रोजनिशा आणि इतर उपलब्ध असलेले अधिकृत आणि अनधिकृत असे सर्व उपलब्ध कागदपत्र शोधून काढून आणि तपासून मराठ्यांच्या इतिहासातील अनेक घटनांवर नवा प्रकाश टाकण्याचे काम बजावले आहे. महाराष्ट्रातील तत्कालीन मराठी लेखकांनी त्या काळातील राजवटींसंबंधी लिहिलेल्या बखरी या मोडीत किंवा मराठीत असल्यामुळे साधन संदर्भ या दृष्टीने त्या बहुशः उपलब्ध असून त्यांचे महत्त्व अव्वल दर्जाचे आहे. परंतु इतर भाषात म्हणजे विशेषतः फारसी, इंग्रजी, पोर्तुगीज, फ्रेंच आणि डच या विविध भाषांत असलेले साधन संदर्भ हे त्या भाषातून इंग्रजी मध्ये किंवा मराठीमध्ये भाषांतर करण्याचे कामही इतिहास संशोधकांनी करून ठेवले आहे. या सातत्याने केलेल्या अविरत परिश्रमांमुळे आज आपणास मराठ्यांच्या इतिहासासंबंधी सुसूत्र आणि क्रमवार असा एक कालपटच उपलब्ध झाला आहे. इतिहास संशोधकांचे हे काम चालू असतानाच जी साधन संपती आजतागायत उपलब्ध आहे तिचा मराठे कालीन जीवनाच्या

राजकीय, लष्करी, आर्थिक आणि सामाजिक दृष्टीकोनातून तपशीलवार अभ्यास करून त्या त्या क्षेत्रात मराठेशाहीतील जीवन काय प्रकारचे होते याची चिकित्सा करणे आणि अैतिहासिक सिध्दांतावर आधारीत त्याचे विवेचन करणे आजच्या संशोधकांपुढे अेक मोठे आव्हान आहे. या प्रबंधाचा मुख्य हेतु असा की शिवाजी महाराजांच्या निधनानंतर म्हणजे १६८० पासून ते पुढील ४० वर्षांत म्हणजे १७२० मध्ये थोरल्या बाजीरावांनी पेशवाअीची सूत्रे हाती घेतली तोपर्यंत घडलेल्या लष्करी घटनांवर लक्ष केंद्रित करून त्यांची आधुनिक युध्द शास्त्राच्या तत्त्वांप्रमाणे चिकित्सा करून या ४० वर्षांच्या कालखंडात मराठ्यांनी युध्द शास्त्रामध्ये आपली जी वैशिष्ट्य पूर्ण भर घातली ती वाचकांपुढे ठेवणे हा आहे.

२. सुमारे २०० वर्षे टिकलेली मराठी सत्ता ही प्रामुख्याने शस्त्र सामर्थ्याच्या बळावरच टिकून राहिली असाच अेक सामान्य निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. या शस्त्र सामर्थ्याची मुख्य बैठक अर्थातच मराठ्यांच्या प्रभावी लष्करी वर्चस्वावर होती. अखंड चालू ठेवलेल्या ३५ वर्षांच्या लष्करी मोहिमगिरीमुळे पुण्याच्या आसपास असलेल्या अेक छोट्या जहागिरीत प्रारंभ करून शिवछत्रपतिंनी आपल्या लष्करी वर्चस्वामुळे अेक स्वतंत्र असे मराठी राज्य स्थापन केले. पुढे १७२० ते १७४० या २० वर्षांच्या अखंड मोहिमगिरीने थोरल्या बाजीराव पेशव्यांनी मराठी राज्याचे साम्राज्यात रूपांतर केले आणि त्याचा परिणाम म्हणून भारतीय भूखंडात मराठी सत्तेला अेक अत्यंत प्रबळ शक्ती असे स्थान प्राप्त झाले. १८व्या शतकाच्या अुत्तरार्धात विशेषतः १७६१ च्या पानिपतच्या पराभवानंतर मराठी लष्करी सत्ता दुर्बल झाली आणि शस्त्र सामर्थ्य दुर्बल होताच राजकीय सत्तेचा केंद्रबिंदू कमकुवत होअून अिंग्रजांसारख्या आधुनिक युध्द शास्त्रांत तरबेज असलेल्या परकीय सत्तेपुढे मराठी सत्ता निष्प्रभ ठरली. या घटनांवरून हे स्पष्ट होअील की मराठ्यांच्या अितिहासातील अत्यंत महत्त्वाचा कोणता भाग असेल तर तो मराठ्यांच्या लष्करी शक्तीचा अुगम, विकास आणि ऱ्हास हाच होय आणि म्हणूनच या विषयाचा

अत्यंत सविस्तर आणि चिकित्सापूर्वक अभ्यास करणे अैतिहासिक दृष्टया अत्यंत आवश्यक आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की मराठी सत्तेच्या अुदयापासून तो आज पर्यंतच्या गेल्या १०० वर्षांत हा अत्यंत महत्त्वाचा विषय संशोधकांकडून आणि अभ्यासकांकडून सर्वस्वी दुर्लक्षित आणि अुपेक्षित राहिलेला आढळतो. न्यायमूर्ती रानड्यांपासून तो प्रा. ख-यांपर्यंत अनेक नामवंत अितिहास संशोधकांना त्यांच्या प्रचंड अुद्योगाबरोबरच लष्करी पार्श्वभूमी न लाभल्यामुळे मराठ्यांचा लष्करी अितिहास हे आज पर्यंत अेक बंद दालनच राहिले आहे. या प्रबंधाचे खास वैशिष्ट्य असे आहे की प्रबंधाच्या काळात म्हणजे १६८० ते १७२० - मराठ्यांनी ज्या ज्या ठिकाणी लष्करी कार्यवाही केली, त्याची सखोल आणि तपशीलवार चिकित्सा करणे, त्या कार्यवाही मागील युध्दनिती (Strategy) आणि युध्द व्यवहार (Tactics) यांचे धागेदोरे अुकलून काढणे, मराठ्यांच्या युध्दनिती आणि युध्द व्यवहाराची तत्कालीन युरोपातील युध्दनिती आणि युध्दव्यवहाराशी तुलना करणे आणि अशा त-हेच्या तौलनिक अभ्यासातून मराठ्यांनी युध्दशास्त्राला दिलेल्या विशिष्ट देणगीचे विवेचन करणे असे आहे. युध्द ही कला आहे परंतु त्यामागे युध्दशास्त्राची बैठक आहे. युध्दे लढली जातात ती युध्दशास्त्राच्या सिध्दांतावर. हे सिध्दांत प्रतिस्पर्ध्यापेक्षा जास्त प्रभावीपणे आणि यशस्वीरित्या प्रत्यक्षात आणणारा सेनापती हा अेक महान कलाकारच मानावा लागेल. आणि म्हणूनच युध्द ही मानवी अितिहासातली अेक अत्यंत जुनी अशी कला आहे. मराठ्यांच्या अितिहासाकडे पाहतांना युध्द हे शास्त्र म्हणून आणि युध्द ही कला म्हणून मराठ्यांनी त्यात जी भर घातली त्याचा शोध आणि बोध हेच या प्रबंधाचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

कालखंडाचे प्रमुख टप्पे:

१. प्रबंधाच्या कालखंडाचा प्रारंभ १६८० मध्ये छत्रपती संभाजी महाराजांनी

मराठी राज्याची सुत्रे हाती घेतल्यापासून होतो आणि १७२० मध्ये थोरल्या बाजीरावांना शाहू छत्रपतींनी पेशवाईची वस्त्रे दिली त्यावेळी समाप्त होतो. या ४० वर्षांच्या कालखंडाचे प्रमुख टप्पे खालील प्रमाणे होत.

(अ) १६८० - १६८९ संभाजी महाराजांचा काळ
(ब) १६८९ - १७०० छत्रपती राजारामाचा काळ
(क) १७०० - १७२० मराठा मंडळातील सरदार व सेनापती यांची सामुहिक लष्करी कामगिरी आणि बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची मुत्सद्दीपणाची कार्यवाही.

४. छत्रपती संभाजी महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांनी मागे ठेवलेल्या संघटीत आणि सुसज्ज अशा मराठी लष्कराचे आणि मराठी नौसेनेचे वारसदार होते. या अमुल्य वारसाचा संभाजी राजांनी १६८० ते ८९ या काळात एकाच वेळी पश्चिम किनाऱ्यावरील सिद्दी आणि पोर्तुगिज आणि मध्य महाराष्ट्रात चोफेर धुमाकूळ घालणाऱ्या मोगल सेना यांच्या विरुध्द प्राणपणाने प्रतिकार करण्यात पुरेपूर उपयोग करून घेतला. मोगल सम्राट औरंगजेब हा मराठी सत्ता नष्ट करावी या एकमेव उद्देशाने दिल्लीहून बऱ्हाणपूर, बऱ्हाणपूरहून औरंगाबाद आणि औरंगाबादहून अहमदनगर येथे जातीने स्थानापन्न होऊन मराठाविरोधी मोहिमेचे प्रत्यक्ष सुत्रसंचलन करीत होता. मराठ्यांनी नामोहरम करण्याच्या इराद्याने मराठी सत्तेच्या मित्रत्वात असलेली आदिलशाही आणि कुतुबशाही ही इस्लामी राज्ये देखील त्याने नष्ट केली आणि आपली सर्व शक्ती पणाला लावून १६८७ ते ८९ त्याने आपले सर्व लक्ष मराठेशाही नष्ट करण्यावर केंद्रित केले. कांही वैयक्तीक अवगुणांमुळे गाफील असलेले संभाजी राजे मोगलांच्या ताब्यात गेले आणि त्यात त्यांचा वध झाला.

५.   १६८९ ते १७०० या अकरा वर्षांच्या काळात औरंगजेबच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील मोगली सेना मराठी सत्तेला नष्ट करण्यासाठी सर्व शक्तींनी शर्थ करीत होत्या. छत्रपती राजारामाने कुशल युध्दनिती वापरून मोगली सेना रायगडापासून जिंजी पर्यंत १२०० कि.मि. टापूत गुंतवून ठेवल्या. संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव या दोन मराठा सेनापतींनी प्रगत युध्दपध्दतीचा सर्वाधिक वापर करून मोगल सेनेला संत्रस्त करून सोडले. औरंगजेब बादशहाने आटोकाट प्रयत्न करूनही मराठी सत्ता त्याला नष्ट करता आली नाही.

६.   ख्रि.स. १७०० मध्ये झालेल्या राजारामाच्या मृत्यूनंतर ते १७१२ मध्ये संभाजीचे पुत्र शाहू यांची सातारा येथे छत्रपती म्हणून स्थापना होअीपर्यंतचा काळ हा मराठ्यांच्या अितिहासातील अत्यंत कठीण आणि जीवघेणा काळ होता. पुणे-सातारा किंवा कोल्हापूर या कोणत्याच ठिकाणी केंद्रिय अशी राजकीय सत्ता अस्तित्वात नसल्यामुळे निर्नायक (Leaderless) अशा अवस्थेत मराठी सेनापतींनी आपापले सैन्य विभाग घेऊन परकीय दबावाचा अटीतटीने प्रतिकार केला. अर्थात हा गोष्ट खरी की, १७०७ मध्ये झालेल्या औरंगजेबच्या निधनानंतर मोगली सेनांची आणि मोगलांची हस्तक निजाम याच्या सेनेची आक्रमक क्षमता पुष्कळच कमी झाली. त्यातच वैयक्तीक स्वार्थासाठी मराठी सरदारांचे आपापसांत संघर्षही सुरू होते. तरीपण परकीय शक्तींचा दबाव आणि अंतर्गत संघर्ष या दोघांच्या कात्रीमध्ये सापडलेली मराठी सत्ता कशीबशी टिकून राहिली. याचे मुख्य कारण प्रगत युध्दपध्दतीचा वापर हेच होय. १७१२ नंतर छत्रपती शाहूंनी बाळाजी विश्वनाथ यांना पेशवे हा हुद्दा आणि सेनेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सेनाकर्ते हे पद देऊन लष्करी आणि मुलकी कारभारावर अेकसूत्रता आणली. बाळाजी विश्वनाथाने १७१२ ते १७२० या सात वर्षांच्या काळात मराठ्यांच्या राजकीय आणि लष्करी कारभाराचा सुसंघटीत असा मजबूत पाया पुन्हा अेकदा अुभा केला. या त्याच्या कामगिरीमुळेच १७२० मध्ये थोरल्या बाजीरावानी पेशवाअीची सुत्रे हाती

येताच अंतर्गत शत्रूचा अुठाव समूळ मोडून काढून शिंदे, होळकर, भोसले आणि गायकवाड या आपल्या मातब्बर सेनापतींच्या साह्याने महाराष्ट्राबाहेर अुत्तर हिंदुस्थानात मराठी सत्ता स्थिर करून ठेवली.

प्रबंध लेखनाची पध्दत :

७. वर निर्देश केलेल्या ४० वर्षाच्या कालखंडातील लष्करी अितिहासाचा आणि सर्वांगीण चिकित्सा करण्याच्या अुद्देशाने प्रबंध लेखनासाठी खालील पध्दत अुपयोगात आणली आहे.

(अ) साधन संदर्भावर आधारित लढायांचे पुनरुज्जीवन -

(Battle Reconstruction from Source Material)

सध्या अुपलब्ध असलेल्या साधन ग्रंथात कोणत्याही मोहिमेचे किंवा लढाअीचे लष्करी दृष्टया असे वेगळे विवेचन केलेले नाही अेकंदर घडामोडींचा भाग म्हणूनच बखरकारांनी किंवा तवारीख लिहीणा-या मुसलमान लेखकांनी लढायांचा अुल्लेख केलेला आढळतो त्यामुळे आजच्या सर्वमान्य अितिहासाचे सिध्दांत डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक मोहिम किंवा लढाअी ही पुनरुज्जीवित करणे (Reconstruct) हे या कामाचे मूलभूत अंग होय. याकरिता अुपलब्ध असलेल्या साधन ग्रंथाचा आपल्या संदर्भापुरता सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते. हा अभ्यास झाल्यावर प्रत्येक मोहिमेची किंवा लढाअीची लष्करी दृष्टया रुपरेषा तयार केली जाते. यामध्ये लढाअीची लष्करी पार्श्वभूमी आणि त्या पार्श्वभूमीतून लढाअीला पोषक अशा घटनांचा परामर्श, मोहिम किंवा लढाअी ज्या क्षेत्रात झाली त्या भूक्षेत्राची भौगोलिक आणि लष्करी दृष्टया चिकित्सा, दोन्ही पक्षांच्या सेनादलांची संख्या आणि अुपस्थिती, दोन्ही पक्षाच्या नेत्यांचे गुण आणि अवगुण, दोन्ही सेनादलांचे शस्त्र सामर्थ्य, सामुग्री आणि पुरवठा, लष्करी नेत्याने वापरलेली युध्दनिती आणि युध्द-

व्यवहार, या महत्त्वाच्या घटकांचा समावेश होतो. ही रुपरेषा समजावून घेतल्यानंतर मगच लढाईचे पुनरज्जीवन पूर्ण होते आणि गतकाळात २००।३०० वर्षांपूर्वी लढल्या गेलेल्या लढाईचे यथार्थ चित्र डोळ्यासमोर उभे राहते. हे चित्र स्पष्ट झाल्यावर मोहिमेची किंवा लढाईची हकीगत सुसंबध्दरितीने लिहिणे शक्य असते.

(ब) पुनरज्जीवन आणि नकाशे यांचा समन्वय -

(Corelation of Battle Reconstruction and Maps)

कोणतीहि मोहिम किंवा लढाई ज्या क्षेत्रात लढली गेली ते क्षेत्र, आधुनिक नकाशांवर आकृतिबध्द केल्याशिवाय त्या मोहिमेला किंवा लढाईला जिवंतपणा येवू शकत नाही. या कामासाठी सर्वे ऑफ इंडियाने प्रसिध्द केलेल्या १ इंच = १ मैल या प्रमाणाच्या लष्करी नकाशांचा वापर उपयुक्त ठरतो. संदर्भ साधनांवर पुनरज्जीवित केलेली मोहिम किंवा लढाई अधिकृत लष्करी नकाशांवर आकृती बध्द होते. त्या वेळीच त्या मोहिमेची किंवा लढाईची वास्तव अशी रुपरेषा वाचकासमोर उभी राहते. अशा त-हेच्या समन्वयामुळेच युध्दनितीचे डावपेच, युध्द व्यवहाराच्या हालचाली आणि मोहिमेची किंवा लढाईची पुरवठा यंत्रणा यांचे चित्र साकार होते.

(क) युध्दक्षेत्राची पाहाणी -

(Field Reconnaissance of Battle Areas)

संदर्भ ग्रंथावरुन केलेले कोणत्याही लढाईचे पुनरज्जीवन आणि त्याचा नकाशांशी समन्वय केल्यानेच लष्करी मिमांसा पूर्ण होवू शकत नाही. ती पूर्ण करण्यासाठी आणखी एका गोष्टीची आवश्यकता असते आणि ती म्हणजे ज्या क्षेत्रात लढाई लढली गेली त्या क्षेत्रात प्रत्यक्ष जावून जमीनीची आणि आसपासच्या

परिसराची प्रत्यक्ष पाहाणी करणे अपरिहार्य असते. जमीनीच्या निरीक्षणावरच युध्दाच्या योजना परिपूर्ण आणि अंतिम होत असल्यामुळे प्रत्यक्ष पाहाणी अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे पुनरज्जीवनाला वास्तवता आणि सजीवपणा प्राप्त होतो. वास्तववादी पुनरज्जीवन झाल्याशिवाय लढाईचे संतुलीत मुल्यमापन शक्य होणार नाही.

समकालीन युरोपातील लष्करी इतिहास :
(Contemporary European Warfare)

६. १६४० ते १७१० हा कालखंड युरोपच्या लष्करी इतिहासातील एक वैशिष्ठ्यपूर्ण असा कालखंड मानावा लागेल. या कालखंडात फ्रान्स, ऑस्ट्रिया, आणि स्पेन या राष्ट्रातील साम्राज्यवादी कॅथॉलिक पंथाच्या राजसत्तांनी इंग्लंड, हॉलन्ड आणि प्रशिया या साम्राज्यवादी परंतु प्रोटेस्टंट पंथाच्या राष्ट्राबरोबर राजकीय वर्चस्वासाठी अखंड असा संघर्ष चालू केला होता. याच काळात प्रशिया मध्ये फ्रेडरिक दि ग्रेट आणि इंग्लंड मध्ये जनरल जॉन चर्चिल उर्फ ड्यूक ऑफ मार्लबरो हे लष्करी नेते उदयाला आले. याच काळात फ्रेंचांनी तोफखान्याच्या शस्त्रास्त्रांमध्ये फार मोठी प्रगती केली. याचप्रमाणे इंग्लंड आणि पोर्तुगाल या दोन राष्ट्रांनी सर्व सागरांवर आपल्या नौसेनेचे वर्चस्व प्रस्थापित करून महासागरांचे अन्वेषण, सागर प्रवासासाठी लागणारी माहिती आणि ज्ञान शोधणी या सागरांशी निगडित असणाऱ्या क्षेत्रात उपक्रम प्रस्थापित केले. युरोपात झालेल्या वरील तऱ्हेच्या युध्दशास्त्रातील प्रगतीशी समकालीन भारतातील युध्दशास्त्राची तुलना करणे आणि त्यातील मराठ्यांचा सहभाग स्पष्ट करणे ऐतिहासिक दृष्ट्या उद्बोधक ठरेल.

अंतिम मुल्यमापन :

१. या प्रबंधात वापरात आणलेल्या आणि वरील परिच्छेदांमध्ये (Paragraphs) स्पष्ट केलेल्या पद्धती प्रमाणे मराठ्यांच्या लष्करी अितिहासाचे मुल्यमापन पूर्ण झाल्यावर त्यातून खाली निर्देश केलेली अुपांगे सिद्ध होण्यास पुष्कळच मदत होअील:

(अ) मराठ्यांच्या युद्धशास्त्राचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये.

(ब) मराठ्यांनी युद्धनीतीची तत्त्वे, युद्ध व्यवहाराचे नियम आणि पुरवठ्याच्या पद्धति यांचा कसा अुपयोग केला.

(क) मराठ्यांच्या लष्करी नेतृत्वाचा दर्जा आणि त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या सेनादलांची सैनिकी गुणवत्ता.

(ड) मराठ्यांच्या नौसेनेचे किनारपट्टीचे संरक्षण करण्यात आणि निरनिराळ्या मोहिमात किंवा लढायात मदत देण्यात कोणते कार्य बजावले.

(अि) मराठ्यांच्या युद्धशास्त्राची समकालीन युरोपिय युद्धशास्त्राशी तुलना.

(ऑ) या कालखंडात मराठ्यांच्या लष्करी कारवायांनी युद्ध या कला आणि शास्त्राच्या विकासात कोणती भर घातली.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होण्यास हरकत नाही की हा प्रबंध मराठ्यांच्या अितिहासावर झालेल्या आतापर्यंतच्या सर्व प्रबंधात अेक वेगळेपणा निर्माण करणारा आहे आणि मराठ्यांच्या अितिहासाचा परिणामकारक पारख होण्यास हा प्रबंध हे प्रमुख साधन ठरणार आहे.

मराठेशाहीतील युद्धशास्त्राची उत्क्रान्ति

भाग पहिला

युद्धशास्त्र - उगम आणि विकास

(Warfare - Origin and Development)

प्रकरण

१ मानवी संघर्ष आणि प्राचीन युद्धशास्त्र

२ युद्धशास्त्राची मध्ययुगीन प्रगति

३ आधुनिक युद्धशास्त्राचा प्रारंभ

४ विसाव्या शतकातील जागतिक संघर्ष

५ अत्याधुनिक युद्धशास्त्र : तत्व आणि वापर

प्रकरण पहिले

मानवी संघर्ष आणि प्राचीन युद्धशास्त्र

(Human Conflicts and Ancient Warfare)

मानवी संघर्षाचा प्रारंभ

(Beginnings of Human Conflicts)

अुपलब्ध असलेल्या प्रारंभापासूनच्या मानवी अितिहासाकडे दृष्टी टाकल्यास असे आढळून येअील की मानवी आयुष्याच्या सुरुवातीपासून ते आजतागायत पर्यंत कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आणि कोणत्या ना कोणत्या कारणामुळे संघर्ष हा अटळ ठरलेला आहे. अगदी सुरुवातीस छोट्या छोट्या टोळ्या करून राहणा-या जमाती अेकमेकांशी संघर्ष करण्यात अुद्युक्त होत असत. अशा संघर्षाची कारणे सामान्यतः जीवनास अत्यावश्यक असलेल्या अन्न, वस्त्र आणि निवारा ही भरपूर प्रमाणात मिळावी म्हणूनच संघर्ष निर्माण होत असे. ज्या टोळ्यांकडे अन्नाची वाण पडे त्या टोळ्या अन्नाचे साठे असलेल्या टोळ्यांवर हल्ले करून ते जिंकून घेण्याचा प्रयत्न करीत आणि त्यामुळे सहाजिकच संघर्ष निर्माण होअी. या परिस्थितीवरून असे म्हणता येअील की आर्थिक गरज हे मानवी संघर्षाचे मूळ होते. कालांतराने समान दृष्टीकोन, समान भाषा आणि समान जीवनमान राखण्याची गरज यामुळे समाजातील अशा टोळ्या अेकत्र येअू लागल्या आणि त्यामुळे अेखाद्या विवक्षित प्रदेशात राहणा-या संघटित टोळ्यांचे छोटे छोटे समाज निर्माण झाले अशा त-हेच्या समाज निर्मितीनंतर सहाजिकच ज्या ठिकाणी अन्नधान्य आणि पाणी ही मुबलक प्रमाणात अुपलब्ध असतील अशा प्रदेशात म्हणजे पर्यायाने मोठमोठ्या नद्यांच्या तीरावर आणि या नद्यांनी निर्माण

केलेल्या खोऱ्यांमध्ये संघटीत झालेले समाज कायम स्वरुपाचे वास्तव्य करावे या अुद्देशाने वस्तीस्थाने बनवू लागले. यामुळेच अिराक मधील युफ्राटीस आणि टिग्रीस आणि अखंड भारतातील सिंधू आणि गंगा अशा नद्यांच्या काठावर आणि खोऱ्यांमध्ये निरनिराळे समाज स्थायीक झाले. या स्थायीक झालेल्या समाजामधूनच त्यांची स्वतःची अशी विशिष्ट संस्कृती निर्माण झाली. सिंधू खोऱ्यातील संस्कृती (Indus Valley Civilisation) ही अशाच प्रकारची अेक संस्कृती होय अशा तऱ्हेच्या प्राचीन संस्कृतीसंबंधी अुत्खननामुळे अुपलब्ध झालेले जे अनेक अवशेष आज सापडतात त्यावरुन हे सिध्द होते की या संस्कृती प्रगल्भ अशा अवस्थेस पोहचलेल्या होत्या. संस्कृती निर्माण झाल्यानंतर त्याच्या अनुषंगाने येणाऱ्या गोष्टी म्हणजे सामाजिक बांधिलकी, (Social Commitments) सत्ता (Power) आणि आपला वेगळा दर्जा (Prestige) यांची जाणीव स्थायीक समाजामध्ये होवू लागली आपल्यापाशी जे आहे ते सुरक्षित राहावे म्हणून आणि ते घेण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्याचा प्रतिकार करावा म्हणून अशा जमातींमध्ये बचाव (Defence) आणि आक्रमण (Attack) या प्रवृत्ती सहाजिकच वाढू लागल्या. अनेक वेळा असे आढळून येते की ज्या प्रदेशात स्थायीक झालेल्या आणि सांस्कृतिकदृष्ट्या वाढ झालेल्या जमातींची लोकसंख्या अमर्याद झाली त्यावेळी वाढत्या लोकसंख्येला अन्न, पाणी आणि निवारा ज्या ठिकाणी मिळू शकेल अशा अितर प्रदेशावरही आक्रमण करुन तो आपल्या ताब्यात ठेवणे ही काळाची गरज ठरली. अशा रितीने अनादि कालापासून समाजाची निर्मिती आणि वाढ होत असतानाच संघर्ष वाढत राहिला आणि या संघर्षालाच युध्द असे नाव प्राप्त झाले.

युध्दाची कारण परंपरा (Causes of Warfare)

आर्थिक (Economic)

युध्द का होते? याबद्दल अनेक लष्करी अितिहासकारांनी अनेक कारणे

सांगितली आहेत. आर्थिक गरज आणि वाढती लोकसंख्या ही प्राचीन काळातील युध्दांची मूलभूत कारणे असली तरी जगाच्या अितिहासात बहुसंख्य युध्दे अितर अनेक कारणांनी झालेली आढळतात. मानवा मानवांमधील सहकार्य आणि समजूतदारपणा या दोन भावना जितक्या नैसर्गिक आहेत त्याच प्रमाणात शेजारच्या जमातीबद्दल वाटणारी भिती आणि अेकमेकांवर वरचष्मा ठेवण्याची प्रवृत्ती यादेखील तितक्याच नैसर्गिक भावना आहेत. त्यामुळे अेखादा जमातीने विशिष्ट अशा तत्व प्रणालीचा अंगीकार केला तर त्या तत्व प्रणालीशी सहमत न होणा-या अितर जमातींवर आपला दरारा आणि वरचष्मा कायम राहावा म्हणून संघर्ष किंवा युध्द करण्यास अेक जमात दुस-या जमाती विरुध्द अुभी राहू लागली. अशा त-हेच्या तत्व प्रणालींना त्या प्रणालीच्या प्रवर्तकांनी धर्म असे नाव दिले. वास्तविक पाहता "धारयति असो धर्मः" म्हणजे समाजाला टिकवून धरणारी अेक तत्व प्रणाली म्हणजे धर्म असा या शब्दाचा अर्थ आहे. परंतु कांही धर्मांनी मानवी जीवनावर नियंत्रण करणा-या अज्ञात अशा अीश्वर शक्तिला धार्मिक तत्व प्रणाली मध्ये गुंतवून टाकल्यामुळे ते तत्व न मानणा-या जमातींशी सहाजिकच अेक संघर्ष निर्माण झाला आणि त्यामुळेच जवळ जवळ दीड हजार वर्षांचा काळ हा धार्मिक युध्दांमुळे भरलेला आढळतो.

भारतामध्ये ख्रिस्त शताब्दी पूर्वी आणि अलेक्झांडरच्या स्वारीपर्यंत जी दोन युध्दे झाली त्याची कारणे धार्मिक कारणापेक्षा वेगळी होती. रामायणाच्या युध्दाचे मुख्य कारण रावणाने केलेल्या सीतेच्या अपहरणामुळे झाले. ही गोष्ट खरी असली तरी रामायणाचे युध्द हा अेक दोन प्रवृत्ती मधला संघर्ष होता. आपल्या नसलेल्या अशा दुस-याच्या स्त्रीची अभिलाषा धरून तिचे अपहरण करण्याच्या दुष्ट प्रवृत्तीस कायमचा आळा घालावा आणि अशा त-हेच्या वाईट प्रवृत्ती मानवी जीवनातून समूळ नष्ट कराव्या या अुच्च हेतूनेच प्रभू रामचंद्रास लंकेवर स्वारी करून त्याच्या सारखीच राक्षसी मनोवृत्ती असणा-या लोकांना पायबंद घालावा लागला.

याउलट महाभारताचे युध्द हे कौरवांच्या सत्ता आणि लालसा यांच्या आहारी पडलेल्या बंधुजनांनी आपल्याच घराण्यातील पांडवांविरुध्द वरचष्मा ठेवण्याच्या प्रवृत्तीमुळे अुत्पन्न झाला. म्हणजे रामायणाचे युध्द किंवा महाभारताचे युध्द हे कोणत्याही धार्मिक अथवा अितर तत्व प्रणालींच्या विसंगतीमुळे झालेले नव्हते. त्यानंतर मात्र अलेक्झांडरने केलेल्या भारतावरील स्वारीमागे अेक सुपीक आणि समृध्द देश आपल्या अंकित राहावा अशी प्रादेशिक वर्चस्व (Territorial Supremecy) ठेवण्याची भावनाच अधिक प्रबळ होती. त्या पुढील ६००।७०० वर्षे म्हणजे मौर्य घराण्यापासून ते गुप्त घराण्याच्या शेवटापर्यंत भारतात कोणतेही असे मोठे युध्द झाले नाही. मौर्य आणि गुप्त या दोन साम्राज्यांच्या सम्राटांनी केवळ प्रादेशिक वर्चस्व वाढावे आणि आपले साम्राज्य अधिक विस्तीर्ण आणि भरभराटीचे व्हावे म्हणूनच आपल्यापेक्षा कमजोर अशा सत्ताधा-यांविरुध्द संघर्ष करुन आणि त्यांना जिंकून घेऊन आपली साम्राज्ये वाढविण्याचा प्रयत्न केला.

धार्मिक (Religious)

ख्रिस्त शताब्दीच्या सुरुवातीपासून जवळजवळ ७०० वर्षे ख्रिश्चन धर्माचा जगात मोठ्या प्रमाणावर प्रसार झाल्याने आणि त्या धर्माचा प्रसार करणारी अितर देश ख्रिश्चन धर्मानुयायी राष्ट्रांना युध्द आव्हान देऊ शकली नाहीत. अि. स. ६२२ मध्ये अिस्लामी धर्म संस्थापक महंमद पैगंबर यांचा अुदय झाला आणि महंमदाने सुरु केलेल्या अिस्लामी धर्माचा प्रसार जगाच्या अनेक राष्ट्रात होऊ लागल्यामुळे अिस्लामी संस्कृती आणि ख्रिश्चन संस्कृती यांच्या मधील संघर्ष अटळ ठरला. याच युध्दाला धर्मयुध्दे (Crusades) असे नाव आहे. धार्मिक संघर्षाचा हा वणवा शतकानुशतके चालत आला असून आजच्या २०व्या शतकातही लेबेनॉन या देशात ख्रिश्चन धर्मानुयायी आणि अिस्लाम धर्मानुयायी यांच्यात गेली कित्येक वर्षे युध्दाचा आगडोंब चालू आहे. भारतामध्ये अि.स. ७१२ मध्ये

महंमदबीन कासीम या अरब युध्द नेत्याने भारतावर पहिली स्वारी केली. आणि तेव्हापासून तो पुढे अेक हजार वर्षे म्हणजे १७२९ च्या नादिरशहा या अिराणी राज्यकर्त्याच्या स्वारीपर्यंत भारतावर अिस्लामी आक्रमणे होत राहिली. या अिस्लामी आक्रमणांचा मुख्य अुद्देश भारताची समृध्द भूमी जिंकून तेथे अिस्लामी सत्ता स्थापन करणे आणि सत्ता स्थापनेबरोबरच धर्माचा प्रसार करणे असे दोन हेतू होते. १५२६ मध्ये पानिपतच्या पहिल्या लढाअीत बाबर या तुर्की आणि मोगल वंशाच्या युध्द नेत्याने स्थानिक सत्ताधा-यांविरुध्द विजय मिळवून मोगल साम्राज्याचा पाया रोवला याच मोगल राज घराण्याने १८ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत भारताची अधिसत्ता म्हणून राज्य केले. मोगल राजसत्तेस आणि अितर अिस्लामी राजसत्तांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी प्रबळ आव्हान दिले आणि जवळजवळ २०० वर्षे या सत्तेशी संघर्ष करून मराठी सत्ता प्रस्थापित केली. धार्मिक कारणामुळे होणा-या युध्दात गेल्या पांच वर्षात अेक नवीन स्थित्यंतर पाहावयास मिळाले आहे. धर्म अेक असला तरी त्याच धर्मातील पुराणमतवादी (Fundamentalists) आणि सुधारणावादी (Reformists) यांच्यात जो संघर्ष अुत्पन्न होअू शकतो त्या संबंधीचे प्रखर स्वरुप म्हणजे गेली पांच वर्षे अिराण व अिराक यांच्यामध्ये चाललेला शस्त्र संघर्ष हे होय.

वसाहतवाद आणि आर्थिक तत्वप्रणाली
(Colonialism and Economic Ideologies)

युध्दाच्या अितर कारणांमध्ये व्यापार आणि वसाहतवाद आणि त्याचप्रमाणे भिन्न राजकीय आणि आर्थिक तत्वप्रणाली यामुळे निर्माण होणारे संघर्ष, अशी दोन कारणे प्रामुख्याने सांगता येतील. १७।१८।१९व्या शतकात आणि २०व्या शतकाच्या पूर्वार्धात अिंग्लंड या साम्राज्यवादी राष्ट्राने व्यापार वृध्दीसाठी भारतात प्रवेश केला आणि व्यापाराचीही वाढ करता करताच स्थानिक सत्ताधा-यांशी

सतत संघर्ष करून प्रादेशिक वर्चस्व प्रस्थापित केले. त्यातूनच पुढे भारतामध्ये ब्रिटीश साम्राज्याची स्थापना झाली. व्यापार आणि वसाहतवाद ही दोन अुद्दिष्टे पुढे ठेवून अिंग्लंड बरोबरच फ्रांस, जर्मनी आणि हॉलंड या साम्राज्यवादी राष्ट्रांनी आफ्रिकेत आणि अतिपूर्वेत शस्त्र बळाच्या जोरावर आपली साम्राज्ये स्थापन केली. चालू शतकात व्यापार आणि वसाहतवाद हे हेतू संपूर्ण नाहीसे झाले नसले तरी त्यांच्या पार्श्वभूमीवर राजकीय आणि आर्थिक तत्वप्रणालीमुळे जगातील राष्ट्रात दोन तट पडले आहेत पुंजीवादाच्या (Capitalism) आर्थिक चौकटीत राहणा-या राष्ट्रांचा अमेरिका या बलाढ्य राष्ट्राच्या नेतृत्वाखाली अेक गट असून साम्यवादाच्या (Communism) आर्थिक चौकटीत रशियाच्या नेतृत्वाखाली राहणारी अितर राष्ट्रे यांचा, अेक असे दोन गट जगाच्या राजकीय मंचावर आधिष्ठित झालेले आढळतात. गेल्या ४० वर्षात या दोन्ही गटात कोणतेही महायुद्ध झालेले नसले तरी अविकसित राष्ट्रांमध्ये वेळोवेळी निर्माण झालेले संघर्ष हे रशिया आणि अमेरिका या दोन महा शक्तींच्या पाठींब्यानेच झालेले दिसतात. म्हणूनच या काळास शीतयुद्ध (Cold war) असे म्हटले जाते.

प्राचीन युद्धशास्त्राचा प्रारंभ आणि विकास
(Origine and Progress of Ancient Warfare)

युद्ध : शास्त्र कि कला
(War-Science or Art)

युद्ध हे शास्त्र आहे कि कला असा प्रश्न विचारला जाण्याची शक्यता आहे. या प्रश्नाचे अुत्तर युद्ध ही अेक कला असून या कलेचा अविष्कार शतकानुशतके लढल्या गेलेल्या लढायांमधून प्रस्थापित झालेल्या अशा कांही सिद्धांतावरच होत असतो असे वाटे लागेल. हे सिद्धांत किंवा त्यामधून निर्माण झालेली संहिता

म्हणजेच युध्दशास्त्र होय. आपल्यापाशी असणा-या गोष्टींचा बचाव आणि तो हिरावून घेण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्याचा प्रतिकार आणि आक्रमक कार्यवाही या दोन घटना आनादिकालच्या प्रारंभापासून सुरु असलेल्या संघर्षात पाहावयास मिळतात. प्रतिस्पर्ध्याचे आक्रमण थोपवावे ही जाणीव फार प्राचीन काळापासून मानवाला परिचित होता. फिल्डमार्शल मॉन्टगोमेरी यांनी असे म्हटले आहे की ख्रिस्त शताब्दि पूर्वी ७००० वर्षे अिस्त्राअील मध्ये असलेल्या जेरीको नावाच्या ठिकाणी तेथील सत्ताधा-यांने दहा अेकरवर पसरलेला आपला किल्ला, सात मिटर उंचीच्या अशा चोहोबाजूंनी भिंती बांधून बंदीस्त केला होता आणि त्याच्या भोवती पाच मिटर रुंदीचा आणि तीन मिटर खोली असलेला पाण्याने सतत भरलेला खंदक तयार केला होता. या किल्ल्यात जास्तीत जास्त २५०० नागरिक असावेत आणि त्यापैकी ५०० ते ६०० युध्द करण्यास योग्य अशा वयोगटातील व्यक्ती असाव्यात असा पुरावा उपलब्ध आहे. धनुष्य आणि बाण ही त्यांची मुख्य शस्त्रास्त्रे असून बचाव भिंतींची रचना आणि त्याकरिता लागणारे तांत्रिक ज्ञान त्यांच्यापाशी होते. असे जेरिको येथील किल्ल्याच्या रचनेवरुन आढळते. याचा अर्थ असा की ख्रिस्त शताब्दि पूर्वी सात हजार वर्षे युध्द कलेचे ज्ञान प्रगल्भ अवस्थेत होते असे दिसते. या नंतरच्या काळात मेसापोटेमियातील म्हणजे सध्याच्या अिराकमधील राज्यकर्त्यांचा अितिहास हा युध्दशास्त्राच्या दृष्टीने अुद्बोधक ठरतो. या देशातील लोक युध्दासाठी रथाचा अुपयोग फार मोठ्या प्रमाणावर करीत असे दिसते. युध्दशास्त्राचा अशाच त-हेचा विकास अिजिप्त या देशातही झालेला आढळतो. या दोन्ही देशात तलवारी, गदा, आणि भाले ही युध्दाची शस्त्रास्त्रे म्हणून याच काळात वापरात आली. सैन्याच्या संघटनामध्ये प्रत्येक ओळीत चालणारे ११ सैनिक आणि अशा ११ सैनिकांच्या सहा ओळी अशा त-हेने ६० ते ६६ अशा सैनिकांचा अेक गट प्रत्यक्ष लढाअीत संचार करीत असे याच रचनेला फलँक्स (Phalanx) असे नाव आहे. ख्रिस्त शताब्दि पुर्वी २००० वर्षे

इजिप्त मधील सैन्याच्या पटात रथांच्या मागोमागच पायदळ सैनिक जात असल्याची चित्रे उपलब्ध आहेत. या सैनिकांच्या डाव्या हातात आयताकृती (Rectangular) ढाली असून लांब पल्लेदार टोकांचे भाले (Javelins) असलेले दिसतात.

प्राचीन भारतीय युध्दशास्त्र

(Ancient Indian Warfare)

युध्द कलेची ही प्रगति इजिप्त आणि मेसापोटेमिया प्रमाणेच भारतीय उपखंडातहि झालेली दिसते. रामायण आणि महाभारत यांचा काळ या संबंधी विवेचन करतांना पुरातत्व संशोधक प्रा. अेच.डी. सांकलिया यांनी असे म्हटले आहे की रामायणाचा काळ हा ख्रिस्त शताब्दि पूर्वी १६०० वर्षे हा असून त्या नंतर ६०० वर्षांनी म्हणजे ख्रिस्त शताब्दि पूर्वी १००० वर्षे महाभारताचे युध्द झाले. रामायणाच्या युध्दात मुख्यत: धनुष्य आणि बाण ही प्रमुख शस्त्रास्त्रे होती असे रामायण कालीन साहित्यावरुन दिसते. त्यानंतरच्या ६०० वर्षात भारतीय युध्दशास्त्राने पुष्कळच प्रगति केली. त्यामुळे महाभारत युध्दात रथांचा मोठया प्रमाणावर वापर, धनुष्यबाणाचा वापर आणि शत्रूवर प्रत्यक्ष आघात करण्यासाठी गदेचा वापर ही प्रमुख शस्त्रास्त्रे असल्याचे आढळते. कदाचित असेही म्हणता येईल की लंकेवरील हल्ल्यामध्ये रावणाने बंदीस्त केलेल्या त्याच्या किल्ल्यावर हल्ला करणे आणि किल्ल्यामध्ये घुसून रावणाच्या राक्षस सेनेचा पराभव करणे ही दोन उद्दिष्टे रामचंद्रापुढे असल्यामुळे हनुमानाने वापरात आणलेल्या गदे सारख्या शस्त्रांनी तटबंदी आणि दरवाजे तोडून लंकापुरीत प्रवेश मिळविणे आणि तटबंदीवर असलेल्या रावण सैनिकांवर बाणांचा मारा करुन त्यांना नष्ट करणे या दोनच गोष्टी रामाच्या वानर सेनेस उपलब्ध होत्या. याउलट महाभारताची लढाई ही कुरुक्षेत्रा सारख्या सपाट आणि मैदानी प्रदेशात झाल्यामुळे त्या ठिकाणी कौरव सेने विरुध्द

पांडव सेनेला रथांचा अुपयोग करता आला. यावरुन अेक गोष्ट स्पष्ट होते की ही की युध्दकलेच्या स्वरुपावर आणि रचनेवरच त्याला योग्य अशी शस्त्रास्त्रे वापरली पाहिजेत ही जाणीवही प्राचीन युध्द नेत्यांना होती असे खात्रीपूर्वक म्हणता येईल.

रामायण आणि महाभारताचा काळ भारतात चालू असतांना मेसापोपोटेमिया मधील टिग्रीस नदीच्या अुत्तरेकडे असणा-या असिरीया या प्रदेशातील लोकांनीही युध्दशास्त्रात बरीच प्रगति केल्याचे आढळते. ख्रिस्त शताब्दि पूर्वी १००० वर्षे असिरियातील लोकांनीच प्रथमतः घोडदळाचा अुपयोग केलेला आढळतो. त्यांच्या सैन्यात घोड्यावर स्वार झालेले सैनिक लांब पल्ल्याचे भाले वापरीत. या घोडदळाने लढाईला तोंड फोडल्यावर त्यांच्या मागून भाले घेणारे सैनिक (Spear Men) आणि गोफणीतून दगड फेकणारे सैनिक (Sling Men) हे शत्रूवर चाल करुन जात असत. ख्रिस्त शताब्दि पूर्वी ६०० वर्षे असिरियातील लोकांची सत्ता संपुष्टात आली आणि त्याच सुमारास ग्रीक आणि रोमन सत्तेचा अुदय झाला.

ग्रीक युध्दशास्त्र
(Greek War fare)

ग्रीक युध्दशास्त्राचा प्रारंभ ख्रिस्त शताब्दि पूर्वी १४०० वर्षे म्हणजेच आपल्याकडील रामायणाच्या काळात झाला असे आढळते तेव्हा पासून पुढील ८०० वर्षे ग्रीक युध्दशास्त्रात फारशी प्रगति झाली नाही. याच काळात होमर या प्रख्यात कवीने वर्णन केलेला ट्रॉयचा वेढा ग्रीक लोकांनी घातला असे म्हणतात. परंतु त्या घटने नंतर ख्रिस्त शताब्दि पूर्वी ६२० पर्यंत ग्रीक युध्दशास्त्र प्राथमिक अवस्थेतच राहिले. ६२० ते ६०० या दरम्यान ग्रीस मधील छोटया राज्यांपैकी स्पार्टाचा राजा लिकरगस याने आपल्या राज्याचे लष्करीकरण सुरु केले आणि

आणि सात वर्षांपासून २० वर्षांपर्यंतच्या सर्व पुरुष व्यक्तींना लष्करी शिक्षण सक्तीचे केले. त्याचप्रमाणे ग्रीक राज्य मजबूत करण्यासाठी आपल्या राज्याकरीता अेक राजकीय आणि सामाजिक घटना तयार केली. युद्धासाठी त्याने फलँक्स (Phalanx) ही संकल्पनाची पद्धत सुरु केली. प्रत्येक ओळीत दहा सैनिक आणि त्यांचा नायक असा आठ ओळींचा अेक फलँक्स होत असे. स्पार्टाच्या सैन्यात अत्यंत कडक शिस्त होती. या सुधारणांमुळे स्पार्टा ही अेक प्रबळ शक्ति बनली आणि स्पार्टाच्या नेतृत्वाखाली ग्रीस मधील अितर सर्व छोटी राज्ये संघटीत झाली याच सुमारास ख्रिस्त शकाब्द पूर्वी ५५२ मध्ये अिराणी साम्राज्याचा संस्थापक सायरस याने आपली सत्ता प्रस्थापित केली. अिराणमध्ये घोड्यांची पैदास अुत्तम असल्यामुळे घोडदळाचे रिसाले सायरसने सुरु केले. त्याच्या घोडदळात स्वार आयताकृती (Rectangular) ढाल आणि लांब पल्ल्याचे भाले वापरीत आणि त्यांच्या मागून धनुष्यबाण वापरणारे सैनिक (Archer) असत. स्पार्टा आणि अितर ग्रीक राज्ये यांची वाढती शक्ती लक्षात घेअुन अिराणी सम्राट सायरस याने ४९० मध्ये स्पार्टावर हल्ला केला. परंतु स्पार्टाच्या फलँक्सने त्यांना हॉपलाअीट असेही म्हणतात) अिराणी सेनेचा मॅरेथॉनच्या लढाअीत प्रखर प्रतिकार करुन अिराणी सैन्याला मागे परतविले त्यानंतर पुन्हा दहा वर्षांनी ४८० मध्ये सायरसने केलेल्या चढाअीचा सलामीसच्या लढाअीत स्पार्टाच्या सैन्याने जोरदार प्रतिकार करुन त्यांचा निर्णायक पराभव केला. ४९० ते ३९० या १०० वर्षांच्या काळात सम्राट सायरस याने स्थल सेनेबरोबरच आपल्या नाविक दलाचाही विकास केला. या नव्या घटनेमुळे ग्रीकराज्यांनाही आपले नाविकदल तयार करावे लागले आणि अथेन्स जवळ असलेल्या पिरासूस (Piraeus) येथे स्पार्टाचा नाविक तळ तयार केला. नौदलासाठी ट्रायरीम या छोट्या बोटी बांधून तयार झाल्या. यापैकी अेका बोटीत १७० माणसे असून ते सैनिकांचे आणि बोटी वल्हविण्याचे कामही करीत असत. ४८६ च्या वर्षात [illegible] सायरसचा मुलगा झेरॅक्स याने दौड

लाख सेना आणि १२०० बोटी घेउन ग्रीसवर अुत्तरेकडून हल्ला केला. स्पार्टाच्या नौसेनेने हा नाविक हल्ला कांही काळ थोपवून धरला. परंतु त्यांच्या नौदलात फक्त ३२४ ट्रायरीम्स असल्यामुळे अिराणच्या १२०० लढाऊ जहाजांपुढे ते कमजोर ठरले आणि त्यांनी ग्रीसचा अुत्तर किनारा पाहून थर्मापिलीच्या खिंडीतून अुत्तरेकडून खाली दक्षिणेकडे अथेन्सच्या दिशेने आगेकूच करण्यास सुरुवात केली. थर्मापिलीच्या खिंडीत स्पार्टन राजा लिओनिडास आणि त्याचे ७००० सैनिक या सर्वांनी अिराणी सैनिकांचा तीन दिवस प्राणपणाने प्रतिकार केला. परंतु अिराणी सैनिकांची संख्या फार मोठी असल्यामुळे सर्वच्या सर्व स्पार्टन सैनिक रणक्षेत्रावर ठार झाले. लष्करी अितिहासात गाजलेली हीच ती थर्मापिलीची लढाओ होय. शत्रू कितीही बलवान असला तरी शेवटपर्यंत त्याच्याशी प्राणपणाने झुंज दिली पाहिजे या तत्वाचे अेक जिवंत स्मारक थर्मापिलीच्या लढाओत स्पार्टाच्या सैन्याने घालून दिले. ४८० पासून ते ख्रिस्त शताब्द पर्यंतच्या १०० वर्षांच्या काळात स्पार्टा हे अेक अत्यंत प्रबळ असे राज्य बनले आणि त्यांनी पर्शियन सैन्याचा पुन्हा पराभव केला. परंतु याच काळात स्पार्टा अथेन्स आणि थिबीज या ग्रीक राज्यांमध्ये संघर्ष सुरु झाला आणि ग्रीक सत्ता कोणाकडे रहावी या बद्दल स्पर्धा सुरु झाली. याच काळात थिबीजचा अेक सेनापती अेपामिनांडास याने युध्द शास्त्राच्या दृष्टीने अेक नवीन तत्व प्रस्थापित केले. शत्रू सैन्यावर हल्ला करतांना सबंध आघाडीवर हल्ला न करता शत्रू ज्या ठिकाणी अत्यंत प्रबळ असेल त्या ठिकाणी त्याला थोपवून धरून ज्या ठिकाणी शत्रू कमजोर असेल तेथे जोरदार हल्ला करावा हेच ते तत्व होय. पायदळाबरोबर घोडदळाचा अुपयोग शत्रूच्या कमजोर भागावर करण्याचा पद्धत अेपामिनांडास यानेच सुरु केली. युध्दशास्त्राच्या या नव्या तत्वांमुळे थिबीजच्या सैन्याने ३७१ मध्ये झालेल्या लूट्रॉच्या लढाओत स्पार्टन सैन्याचा निर्णायक पराभव केला. ३६४ मध्ये अेपामिनांडासचे निधन झाले आणि नंतर ३५९ मध्ये मॅसिडोनियाचा राजा फिलीप याने आपली सत्ता प्रस्थापित करून सर्व

ग्रीक राज्यांवर आपला अंमल सुरु केला. ३३८ मध्ये राजा फिलीपने थिबोज आणि अथेन्स यांच्या संयुक्त सेनेचा शारोनियाच्या लढाअीत दारुण पराभव केला. या लढाअीचे अेक वैशिष्ट्य असे की तेथे शत्रु सैन्याची कमजोर आघाडी नेमकी ओळखून फिलीपचा १८ वर्षांचा पुत्र अलेक्झांडर याने आपली घोडदळ तुकडी घेअून शत्रु सैन्यावर जोरदार हल्ला केला आणि त्यांना पराभव पत्करण्यास भाग पाडले. राजा फिलीपने आपल्या २१ वर्षांच्या कारकिर्दीत अत्यंत सुसंघटीत, प्रशिक्षित आणि सर्व शस्त्रास्त्रांनी युक्त अशी भारी सेना निर्माण केली. ३३६ मध्ये फिलीपचा खून झाल्यानंतर मॅसेडोनियाची सत्ता राजपुत्र अलेक्झांडर याचेकडे आली. हाच तो महान अलेक्झांडर (Alexander the Great) हा होय.

अलेक्झांडरने तयार केलेली ग्रीक सेना ही जगाच्या लष्करी अितिहासातील पहिली सुसंघटीत सेना होय असे म्हणता येअील. या सेनेमध्ये घोडदळ आणि पायदळ असे दोन स्वतंत्र विभाग असून त्यांना दुवा म्हणून काम करणारी हिपास्पीस्ट ही अेक भिन्न संघटना तयार झाली. पायदळास टेरिटोरीयल आर्मी असे नाव देअून १५०० सैनिकांचा अेक गट असे अनेक गट तयार झाले. या गटातील छोट्या तुकड्या फलँक या पध्दतीच्या असून त्यांच्याकडे छोटी ढाल आणि तीन मिटर लांबीचा भाला असे. घोडदळाला रॉयल आर्मी असे नाव असून त्याचे दोन भाग असत पहिला भाग कॉम्पॅनियन कॅव्हलरी या नावाने ओळखला जाअी त्यांच्याकडे अुंचपुरे मोठे घोडे, ढाली आणि लांब पल्ल्याचे भाले असत. १००० स्वारांचा अेक रिसाला अशा घोडदळाच्या अनेक पलटणी त्याने तयार केल्या. दुसऱ्या भागात हिपॅस्पीस्ट या नावाचे सैनिक असून त्यांच्याकडे छोट्या ढाली आणि छोटे भाले असत. या संघटनेत मुख्यतः पायदळ सैनिक असून काही सैनिक छोट्या घोड्यांवर स्वार होत अशा सैनिकांचा २०० ते ३०० चा अेक गट होत असे. घोडदळ आणि पायदळ बेरीज शत्रूच्या स्थानकांना वेढा घालण्यासाठी मोठमोठे फिरते मनोरे, शत्रूच्या किल्ल्यांचे दरवाजे तोडण्यासाठी मोठमोठे ओंडके आणि अितर साहित्य यांच्याही तुकड्या

अलेक्झांडरने तयार केल्या. सर्वोच्च सेनापतीला मदत करण्यासाठी त्याचा वैयक्तिक स्टाफ आणि युध्द योजना आखण्यासाठी ८-१० जणांचे अेक कौन्सील अशी संघटना लष्करी अितिहासात अलेक्झांडरने प्रथमच सुरु केली. शत्रूवर मारा करण्यासाठी तोफांचा अुपयोग करणारा अलेक्झांडर हा पहिला सेनापती होय. अलेक्झांडरच्या प्रत्येक स्वारी बरोबर प्राणी आणि जमीन यांचा शोध घेणारे अनेक तज्ञ, स्थापत्य शास्त्रातील नाविक मुद्रातील तज्ञ, लेखक, चित्रकार अशा सर्व त-हेच्या लोकांचा अेक ताफाच असे. लढाओमध्ये सेनेचे नेतृत्व सर्व तुकड्यांच्या अग्रभागी घोडेस्वार होअून अलेक्झांडर जातीने करीत असे.

अलेक्झांडरने घालून दिलेल्या युध्दशास्त्राच्या अनेक तत्वांपैकी प्रमुख तत्व असे की "शत्रूकडे अलग अलग पटाने कूच करा आणि नंतर अेकत्रित होअून निर्णायक हल्ला करावा" (March Divided and Fight United) ३३१ मध्ये झालेल्या गवागामेलच्या प्रख्यात लढाअीत वरील तत्व वापरून अलेक्झांडरच्या सेनेने अिराणी सम्राट डॅरियस याचा घनघोर पराभव केला. गवागामेलाची लढाअी आणि तेथे झालेला अिराणचा पराभव ही लष्करी अितिहासातली अेक निर्णायक घटना होय. केवळ युध्दशास्त्राच्या दृष्टीनेच नव्हे तर राजकीय दृष्ट्याही जगाच्या अितिहासाला कलाटणी देणारी ही घटना ठरली. त्या पुढील काही वर्षांतच अलेक्झांडरने मध्य आशियातील सर्व प्रदेश जिंकून घेतले आणि म्हणूनच त्याला अितिहासाने महान अलेक्झांडर (Alexander the Great) अशी पदवी दिली. मध्य आशियाचा पश्चिम भाग आपल्या अमलाखाली आणून ३२७ मध्ये अलेक्झांडरने हिंदकुश पर्वत ओलांडला आणि ३२६ मध्ये सध्याच्या अफगाणिस्तान मधून खैबरखिंडीच्या मार्गाने तो भारतात अुतरला. लवकरच त्याने हिडॅस्पिस अर्थात झेलम या नदीच्या किना-यावर भारतीय सम्राट पुरूवा याचा निर्णायक पराभव केला. झेलमच्या अुत्तर किना-यावर अलेक्झांडरची सेना आणि दक्षिण किना-यांवर पुरूच्याची भारतीय सेना आमने सामने असताना अचानक अेके रात्री नदीच्या वरच्या भागात अुथळ

जागी नदी पार करून अलेक्झांडरने भारतीय सेनेवर मागून हल्ला चढविला आणि त्यातच पुरूच्या सेनेचा पराभव झाला. पुढे पंजाबात अुतरून तेथे त्याने अेका गव्हर्नरची नेमणूक केली. त्यापुढे बियास नदी पार करून दक्षिण भारत जिंकण्याचा त्याचा विचार होता. परंतु त्याच्या सैनिकांनी बंड केल्यामुळे अलेक्झांडरला आपला बेत रद्द करावा लागला आणि सिंधू नदीच्या मार्गाने ग्रीसकडे त्याने प्रयाण केले.

रोमन युध्दशास्त्र
(Roman Warfare)

रोमन सत्तेचा अुदय ख्रिस्त शताब्द पूर्वी १०० वर्षे झालेला आढळतो. या काळात रोमच्या सत्तेचा आफ्रिकेतील कार्थेज येथे असणा-या (सध्याचे ट्युनिशिया) सत्तेशी संघर्ष सुरू झाला रोम येथील सत्ता वाढत आहे हे लक्षात येताच कार्थेजचा सत्ताधिश हनीबाल याने २१८ मध्ये आपली सेना घेऊन भूमध्य समुद्र ओलांडला आणि पिरीनिज व आल्प्स हे बर्फाच्छादित पर्वत पार करून रोमच्या अुत्तरेस म्हणजे अिटलीच्या अुत्तरेस स्वारी केली. यावेळी त्याच्या सेनेत ३७ हत्ती आणि ४०,००० घोडदळ आणि पायदळ सैनिक होते. त्याचे सैनिक लोखंडी चिलखते आणि शिरस्त्राणे यांचा वापर करीत आणि लढाअीसाठी त्यांच्याकडे छोट्या तलवारी, ढाली आणि पल्लेदार भाले असत. अुत्तर अिटालीत प्रवेश करताच धडाडीने चढाअी करून २१६ मध्ये झालेल्या कानच्या (Canne) लढाअीत त्याने ७०,००० रोमन सैन्याची धूळधाण केली. या नंतर हनिबाल अिटली मध्येच रेंगाळत राहिला या परकीय आक्रमणाला कसे तोंड द्यावे आणि त्याला देशाबाहेर कसे घालवावे याचा विचार रोमन सत्ताधिश करीत होते. या वेळेत दक्षिण अिटलीत घुसलेल्या हनिबालशी पुन्हा जोरदार युध्द सुरू करावे असा निर्णय रोमच्या प्रतिनिधी सभेने (Senate) घेतला. परंतु हा निर्णय चुकीचा असून हनिबालचा पराभव करण्यास नव्या युध्दनीती-

चा वापर केला पाहिजे असे रोमन सेनापती स्किपीओ याने सांगितले. आपल्याच मायभूमीत घुसलेल्या अत्यंत प्रबळ अशा हनिबालच्या सेनेशी तेथेच संघर्ष करण्यापेक्षा रोमच्या नाविक दलाच्या सहाय्याने भू-मध्यसमुद्र पार करून रोमन सेनेच्या निवडक तुकडयांनी प्रत्यक्ष कार्थेजवर हल्ला करावा असे स्किपीओचे मत होते. या योजनेत ब-याच अडचणी असल्या तरी अंतिम याच युद्धनीतीचा विजय होईल अशी स्किपीओची खात्री होती. सिनेटने त्याच्या योजनेस मान्यता दिली आणि त्याप्रमाणे रोमनसेना कार्थेजकडे रवाना झाली. ही आश्चर्यकारक वार्ता ऐकून हनिबालने तातडीने इटली मधून माघार घेतली आणि आलेल्याच मार्गाने म्हणजे आल्प्स आणि पिरीनिज पार करून हनिबालची सेना स्पेन मध्ये उतरली आणि भू-मध्यसमुद्र पुन्हा पार करून आपल्या राजधानीच्या रक्षणाकरिता हनिबाल आपली सेना घेऊन कार्थेज मध्ये दाखल झाला. २०२ मध्ये झालेल्या झामाच्या लढाईत दोन्ही पक्षाकडे ४०,००० सैनिक उपस्थित होते. रोमन सैन्याची तयारी पाहून हनिबालने रोमन सेनापती स्किपीओ यास वाटाघाटीचे आमंत्रण दिले. त्याप्रमाणे रणक्षेत्रातच दोन्ही सेनापतींची भेट झाली. हनिबालने पुढे केलेला शस्त्रसंधीचा प्रस्ताव स्किपीओने फेटाळला आणि तो आपल्या छावणीकडे परत गेला. त्यानंतर दुस-या दिवशीच लढाईला तोंड लागले. रोमन सैन्याची शक्ती जाणून हनिबालने आपल्या आघाडीवर ८० हत्ती, त्यांच्यामागे आपले पायदळ आणि आपल्या उजव्या डाव्या बगलेवर आपल्या घोडदळाची नियुक्ती केली. रोमन सैन्याकडे हत्ती नव्हते म्हणून स्किपीओने आपल्या आघाडीच्या मध्यावर आपले पायदळ ठेवून दोन्ही बगलेवर घोडदळास राहण्याचा हुकूम दिला यावेळी स्किपीओने अत्यंत नाविन्यपूर्ण युक्ती योजली. आघाडीच्या मध्यभागी असलेल्या प्रत्येक पायदळ सैनिकास त्याच्या शस्त्रास्त्रांशिवाय त्याच्याकडे तुता-या आणि रणशिंगे देण्यात आली होती. आणि त्यांना असा हुकूम होता की हनिबालच्या हत्तींनी चढाई सुरू केल्याबरोबर रोमन पायदळाने रणशिंगे आणि तुता-या वाजवून जोराने घोष करावा. लढाई सुरू झाली

आणि हनिबालचे हत्ती चाल करून येताच रोमन पायदळ सैनिकांनी रणशिंगे आणि तुताऱ्या यांचा अेकच भयानक घोष करून रणांगण दुमदुमून टाकले. अचानक झालेल्या या आवाजामुळे सर्व हत्ती बिथरून गेले आणि तोंड फिरवून पाठीमागे असलेल्या आपल्याच पायदळ सैनिकांना तुडविण्याचा अुपक्रम त्यांनी सुरू केला. हनिबालच्या सैन्यात पुरेसा गोंधळ झाला आहे अशी खात्री पटताच रोमन सैन्याच्या बगलेवर असलेल्या घोडदळ तुकड्यांनी हनिबालच्या सैन्यावर निकराचा हल्ला केला. आणि त्यांना रणांगणातून पळवून लावले. झामाच्या लढाईत झालेल्या या दारुण पराभवामुळे हनिबालची सर्वशक्ती नष्ट झाली आणि त्यातच त्याचा अंत झाला. या लढाईसाठी रोमन सेनापती स्किपीओ याने घेतलेला प्रत्यक्ष अिटलीत युद्ध न करता कार्थेजवर हल्ला करण्याचा धाडसी निर्णय हा युद्धशास्त्राच्या विकासातील अेक फार मोठी घटना होय. याच युद्धनीतीस लिडेलहार्ट या युद्धशास्त्रज्ञाने अप्रत्यक्ष युद्धनीती (Strategy of Indirect Approach) असे नाव दिले आहे. ख्रिस्त शकाब्दाच्या शंभर वर्षे आधी मॅरियस या रोमन सेनापतीने रोमन सैन्याची नवी रचना केली. १२० सैनिकांचा अेक गट अशा पाच गटांची अेक तुकडी हा त्याच्या सेनेचा मूलभूत घटक होता. अशा तऱ्हेच्या १० तुकड्यांच्या विभागाला त्याने लिजन (Legion) असे नाव दिले आणि प्रत्येक लिजनला गरुडाचे चिन्ह असलेले ध्वज देण्यात आले. सैनिकांकडे पल्लेदार भाले आणि आयताकृती ढाला असत. मॅरियसने केलेली दुसरी अत्यंत महत्त्वाची सुधारणा म्हणजे रोमन सैनिकांची आणि अधिकाऱ्यांची भरती केवळ वरच्या वर्गातून न करता ता देशातील सर्व थरातील लोकांपासून झाली पाहिजे ही होय. लिजनच्या सुधारणा खेरीज मॅरियसने २७० लढाऊ जहाजांचे अेक मोठे आरमारही अुभे केले. मॅरियसच्या निधनानंतर ख्रिस्त शकाब्दापूर्वी ५५ मध्ये त्याच्या पुतण्या ज्युलियस सिझर याने रोमन सेनेचे आधिपत्य आपल्याकडे घेतले. तो अेक अत्यंत प्रभावी वक्ता असून लष्करी नेत्यास लागणारे कांही गुण त्याच्यातच अुपजतच होते. सिझर हा व्यवसायाने

राजकारणी असून शिवाय जन्मजात सेनापतीही होता. रोमन राजकारणात अग्रभागी राहावयाचे असेल तर सेनेचा पाठींबा हा हवाच, याची पूर्ण जाणिव असल्यामुळे सत्ता हाती येताच सेनेच्या संख्येत वाढ करून त्याने २०,००० लिजियनचे पायदळ आणि २००० घोडदळ असे खडे सैन्य तयार केले. ५८५१ ते ५२ या पाच-सहा वर्षाच्या काळात सध्याचा जर्मनी आणि फ्रान्स असलेला प्रदेश त्याने जिंकून घेतला आणि नंतर इंग्लंडवर स्वारी केली. त्यानंतर ख्रिस्तशताब्द ५० या पूर्वी आपला प्रतिस्पर्धी पॉंपेजी याचा निर्णायक पराभव करून सिझरने स्पेन आणि पोर्तुगाल यांचाही ताबा घेतला. या स्वाऱ्या करीत असतानाच सिझरच्या नेतृत्वाखालील रोमन सेना इजिप्त मध्ये घुसली. तेथे त्याने ऐका पाठोपाठ ऐक असे तिनके विजय मिळविले की त्या विजयाचे वर्णन खुद्द सिझरने "तो आला, त्याने पाहिले आणि त्याने जिंकले" (VENI - VIDI - VICI) अशा अर्थाचा निरोप रोमला पाठवून केले आहे. याच ठिकाणी इजिप्तची राणी क्लिओपात्रा हिच्याशी प्रेम संबंध जमल्यामुळे सिझर इजिप्त मध्येच राहिला. परंतु त्याने त्या अवधित उत्तर आफ्रिकेचा सर्व प्रदेश जिंकून घेऊन पुन्हा स्पेन मार्गाने ४५ मध्ये तो रोम मध्ये परत आला. पुढच्याच वर्षी म्हणजे ४४ मध्ये त्याच्या सहकाऱ्यानीच त्याचा खून केला. युद्धनेता या दृष्टीने ज्युलियस सिझरने विशेष अशा सुधारणा केल्या नाहीत. असे असले तरी जवळजवळ सर्व युरोप आणि उत्तर आफ्रिका येथील लढायात त्याला मिळालेल्या विजयाचे मुख्य सूत्र म्हणजे गतिमानता (Rapidity of Movements) हे होय. युद्धातील प्रत्येक हालचाली अत्यंत वेगाने झाल्या पाहिजेत हे त्याचे मुख्य सूत्र असल्यामुळे अनेक ठिकाणी संख्येने तिप्पट किंवा चौपट असलेल्या सेनेला त्याने सहजा सहजी पराभूत केले. सिझर हा आपल्या सैनिकांमध्ये अत्यंत लोकप्रिय असून सामान्य जनता ही त्याच्या पाठीमागे सतत उभी असे. या त्याच्या गुणामुळे तो ऐक अव्वल दर्जाचा सेनानी ठरला. त्याच्या मृत्यु नंतर ख्रिस्त शताब्द २१ या वर्षी रोमन राजसत्ता सिझरचा नातू ऑक्टेव्हियम याने

हाती घेतली आणि तो रोमन साम्राज्याचा सम्राट झाला.

प्राचीन युध्दशास्त्राचे पुर्नुत्थान

(Renaissance of Ancient Indian Warfare)

रामायणाचे युध्द आणि महाभारताचे युध्द या दोन प्राचीन महायुध्दानंतर ख्रिस्त शताब्दि पूर्वी सम्राट चंद्रगुप्त मौर्याने लष्कराच्या जोरावर प्रस्थापित केलेली राजसत्ता म्हणजे जवळजवळ एक हजार वर्षांच्या कालखंडानंतर झालेले प्राचीन भारतीय युध्दशास्त्राचे पुर्नुत्थान असेच म्हणावे लागेल. झेलमच्या लढाई नंतर म्हणजे ख्रिस्त शताब्दि पूर्वी ३२५ नंतर थोड्याच वर्षांनी चंद्रगुप्त मौर्याचा उदय झाला असे इतिहास सांगतो. कदाचित चंद्रगुप्ताचा उदय आणि त्याने निर्माण केलेली भारतीय लष्करी सत्ता हा अलेक्झांडरच्या परकीय आक्रमणाचा एक थेट परिणाम म्हणावयास हरकत नाही. भारतात एकसंध राज्य प्रस्थापित करावयाचे असेल तर ते लष्करी सत्तेच्या पाठींब्याशिवाय करता येणार नाही. याची जाणीव झाल्यामुळे चंद्रगुप्ताने सेनेची सुधारणा सुरु केली. त्याच्या सेनेचे चार मुख्य विभाग असून ते हत्तीदल, रथदल, अश्वदल आणि पायदल हे होत. यामुळेच या सेनेला चतुरंग सेना असे नाव मिळाले. लष्करी सत्तेच्या जोरावरच आपणास विरोध करणा-या भारतातील स्थानिक राजांचा पराभव करुन चंद्रगुप्ताने संपूर्ण देशभर एकसूत्री साम्राज्य प्रस्थापित केले आणि तो ख-या अर्थाने पहिला भारतीय सम्राट ठरला. आर्य चाणक्य किंवा कौटिल्य या विचारवंत विव्दानाचे अनेक सल्ला मसलतीत चंद्रगुप्तास वेळोवेळी सहाय्य झाले.

युध्दशास्त्राचा अभ्यास

(Study of Warfare)

आतापर्यंत आपण प्राचीन भारताच्या प्रारंभापासून ख्रिस्त शताब्दि च्या

सुरुवातीपर्यंत जगाच्या निरनिराळ्या भागात युद्धशास्त्राचा विकास कसा होत गेला याचा आढावा घेतला. या हजारो वर्षांच्या काळामध्ये भारतात राम-लक्ष्मण आणि भीम-अर्जुन आणि त्यानंतर चंद्रगुप्त मौर्य असे अनेक भारतीय वीर निर्माण झाले. त्याचप्रमाणे युरोपात अलेक्झांडर, हनिबाल, स्किपीओ आणि ज्युलियस सिझर या युद्धनेत्यांनी युद्धशास्त्राच्या इतिहासात आपले नाव अजरामर करून ठेवले. आश्चर्याची गोष्ट अशी की युरोपात जितके युद्ध झाले होऊनही युद्धाचा शास्त्र या दृष्टीने अभ्यास करून त्याची तत्वे आणि नियम पद्धतशीर-रित्या मांडून देणारा एकही ग्रंथ कोणाकडूनही लिहिला गेला नाही. या उलट अतिपूर्वेकडील चीन सारख्या देशात यादवी युद्धे होत असताना तरी युद्ध-शास्त्रातील एक आद्य ग्रंथ निर्माण झाला तो म्हणजे सुंझु या युद्धशास्त्राने ख्रिस्त शताब्द पूर्वी ५०० वर्षे लिहिलेला "ऑन वॉर" हा प्रख्यात ग्रंथ होय. सुंझु हा युद्धनेता होता की केवळ एक युद्धशास्त्राचा अभ्यासक होता याबद्दल विशेष माहिती उपलब्ध नाही. परंतु युद्धशास्त्राच्या सर्वअंगासंबंधी सुंझुने केलेले विवेचन आणि त्याने घालून दिलेली मार्गदर्शक तत्वे ही जितकी प्रगत विचारांची आहेत का प्रसिद्ध चिनी नेते माओत्सेतुंग यांनी आपल्या अनेक लिखाणातून सुंझुच्या तत्वांचा आधार घेतलेला आहे.

सुंझुच्या ग्रंथानंतर ख्रिस्त शताब्द पूर्वी ३५० वर्षे भारतामध्ये चंद्रगुप्त मौर्याचा गुरु मानलेल्या आर्य चाणक्य उर्फ कौटिल्य याने "कौटिलीय अर्थशास्त्र" या नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये कौटिल्याने मुख्यतः सम्राटाने आपले राज्य कोणत्या राज्यशास्त्रीय आणि अर्थशास्त्रीय तत्वांवर चालवावे याचेच विवेचन केलेले आहे. युद्धशास्त्राच्या प्रत्येक शाखेसंबंधी सुंझुने ज्या पद्धतीने तत्व विवेचन केले आहे तसे तत्व विवेचन कौटिलीय अर्थशास्त्रात आढळत नाही. एखाद्या राज्यावर परकीय आक्रमण झाले तर त्या राजाने शत्रू बरोबर कोणत्या नितीचा अवलंब करावा या संबंधी चे काही विचार कौटिल्याने मांडले आहेत त्यांना युद्धनिती असे म्हणता

येणार नाही. कौटिल्याने मांडलेल्या या तत्वांचा भारतीय मुद्राशास्त्रावर काय परिणाम झाला याची चर्चा या प्रबंधाच्या पुढील प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण पहिले

संदर्भसूची

१ Strategy : The Indirect Approach
B.H.Liddell Hart Ch. I

२ A History of Warfare - Field Marshal
Montgomery Part 1 Ch-3-4-5-6.

३ The Guinness History of Land Warfare
Kenneth Macksey, Ch.1 to 3

४ Ancient Indian Warfare, with special
Reference to the Vedic Period Sarva Daman Singh

५ The Art of War Sun Tzu
Translation III

६ Kautilaya's Arthashastra R. Sham Shastry

७ प्राचीन युध्दविद्या, कृष्णाजी विनायक वझे (१९२४)

प्रकरण दुसरे

युध्दशास्त्राची मध्ययुगीन प्रगति
(Evolution of Warfare in the Middle Ages)

उत्क्रान्तिचे सामान्य स्वरुप
(General Nature of Evolution)

मध्ययुगीन काळ हा अंदाजे १४०० वर्षांचा समजला जातो. या प्रदीर्घ काळात युरोपात आणि मध्य आशियात आणि त्याचप्रमाणे भारतात लष्करी उलाढाली फार मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे युध्दशास्त्राची उत्क्रांति झपाट्याने होत गेली. या उत्क्रान्तिचा विस्तारीत अभ्यास करण्यासाठी १४०० वर्षे या काळाचे तीन प्रमुख खंड पडतात. पहिल्या खंडात म्हणजे ख्रिस्त शताब्दिच्या प्रारंभापासून तो खि.स. १००० पर्यंत हा पहिला कालखंड होय. या कालखंडामध्ये युध्दशास्त्राच्या दोन महत्त्वाच्या घटना आढळतात. पहिली घटना म्हणजे सामर्थ्यशाली अशा रोमन साम्राज्याचा उदय - विकास आणि नाश. दुसरी घटना म्हणजे इस्लामी धर्माचा उदय आणि त्यांनी ख्रिश्चन अनुयायांना दिलेले प्रखर आव्हान. दुसरा कालखंड हा खि.स. १००० वर्षापासून ते खि.स. १२०० पर्यंत असा २०० वर्षांचा काळ. या काळात इंग्लंड, फ्रान्स आणि सध्याचे जर्मनी या तीन देशात झालेल्या संघर्षाचा इतिहास हा युध्दशास्त्राच्या उत्क्रान्तिच्या दृष्टीने महत्वपूर्ण मानावा लागेल. तिसरा कालखंड हा साधारणपणे खि.स. १२०० पासून १४७५ पर्यंत असा २७५ वर्षांचा काळ समजला जातो. या काळातच पहिल्या कालखंडातील मध्ययुगीन सरदार, त्यांनी बाळगलेल्या सेना, विशेषतः त्यांचे घोडदळ आणि त्यांनी बांधलेले किल्ले

या गोष्टी नष्ट होऊन पायदळाचा विकास, दारूगोळा आणि बंदुकी आणि व्यावसायीक सेना (Professional Army) हे तीन घटक अस्तित्वात आल्यामुळे युध्दशास्त्राच्या दृष्टीने फार मोठी क्रांती झाली असे म्हणण्यास हरकत नाही.

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की मध्ययुगीन युध्दशास्त्राच्या पहिल्या दोन कालखंडात म्हणजे ख्रि.स. १००० ते १२०० पर्यंत घोडदळाचे स्थान हे प्रत्येक देशाच्या सेनेचे अत्यंत प्रमुख अंग म्हणून टिकून राहिले. अशा त-हेच्या घोडदळामध्ये दोन प्रमुख वर्ग होते. पहिल्या वर्गात भारी घोडदळ (Heavy Cavalry) हा मुख्य गट असून या गटातील घोडे बुंबुरे आणि अस्सल पैदासीचे असत. घोडेस्वार लोखंडी बनावटीचे शिरस्त्राण आणि चिलखते वापरीत. त्याचप्रमाणे घोड्यावरती लोखंडाचा खोगीर आणि रिकीब असत. प्रत्येक स्वारा जवळ लांब पल्ल्याचे भाले, तीक्ष्ण अशा तलवारी आणि कु-हाडी असत. घोडदळाच्या दुस-या वर्गात हलक्या घोडदळाचा (Light Cavalry) या घटकाचा समावेश असे. हलक्या घोडदळातील घोडे हे अंगाने छोटे परंतु दूरवरचे अंतर झपाट्याने कापण्यास अत्यंत तल्लख असे असत. स्वारांकडे शिरस्त्राण आणि चिलखते नसून त्यांचा गणवेश साधा असे. या दलातील स्वार छोटे भाले (Lances) आणि ढाली बरोबरच छोट्या तलवारी आणि छोट्या कु-हाडी जवळ बाळगत असत. या संदर्भात भारतावर स्वा-या करणारे इस्लामी आक्रमक आणि त्यांचे घोडदळ यांची मराठे शाहीतील घोडदळाशी तुलना करणे योग्य ठरेल. महंमदबीन कासीम या अरब नेत्याने ख्रि.स.७१२ मध्ये केलेल्या भारतावरील पहिल्या स्वारीतून त्याच्या नंतर आलेल्या गझनीचा महंमद, अल्लाउद्दिन खिलजी, मोगल राज्य संस्थापक बाबर, आणि शेवटचे आक्रमक नादिरशहा (१७३९) आणि अहमदशहा अब्दाली (१७६१) हे सर्व इस्लामी नेते अरबस्थान, तुर्कस्थान आणि इराण या देशातील होते. हे तीन्ही देश अत्यंत शुष्क

प्रतिच्या अुंच्यापुऱ्या घोड्यांच्या पैदाशीसाठी प्रसिद्ध असून आजच्या काळातही रेसेसमध्ये धावणारे घोडे याच जातीचे असतात. अशा तऱ्हेचे घोडदळ ही अिस्लामी आक्रमकांची फार जबरदस्त ताकद होती. याच्या अुलट महाराष्ट्रातील घोडे हे अंगाने लहान असून त्यांचा आहारही मिळेल त्या गवतावर टिकून राहणारा असा होता. याच घोड्यांना भीमथडी तट्टू असे कांही प्रसंगी म्हणण्यात येते. अिस्लामी आक्रमकांविरुद्ध भारतीय नेत्यांची जी निर्णायक युद्धे झाली त्यामध्ये अुत्तर हिंदुस्थानातील राजा महाराजांकडे हत्तीदलावर जास्त भिस्त असल्यामुळे आणि त्यांचे घोडदळ आक्रमकांच्या घोडदळापेक्षा खालच्या दर्जाचे असल्यामुळे अिस्लामी सेनेने बऱ्याच ठिकाणी नेत्रदिपक यश संपादन केले. महाराष्ट्रामध्ये मात्र शिवाजी महाराजांपासून थोरल्या बाजीरावांपर्यंत महाराष्ट्रातील लहानसर घोड्यांचा कौशल्याने अुपयोग करून त्यांच्या हालचाली अत्यंत शीघ्रतेने करण्याची पद्धत सुरू केल्यामुळे जवळजवळ १५० वर्षे मराठ्यांचे घोडदळ हा शत्रू सेनेमध्ये थरकाप अुडवून देणारी अेक अचाट शक्ति ठरली. मध्ययुगीन युद्धशास्त्राच्या दुसऱ्या कालखंडात स्थलसेना आणि त्यांची शस्त्रास्त्रे यांच्या विकासाबरोबरच नाविक सत्ता आणि त्यामुळे प्राप्त होणारे सागरावरील प्रभुत्व ही निर्णायक घटना ठरली. या काळात नार्वे, स्वीडन आणि डेन्मार्क या तीन देशातील लोकांनी प्रबळ अशी नौसेना पदरी बाळगून पश्चिम युरोपचा बराचसा भाग आपल्या ताब्यात आणला.

मध्ययुगीन युद्धशास्त्राचा तिसरा कालखंड म्हणजे अि.स. १२०० पासून १४७५ हा होय. या कालखंडात घोडदळाचे स्थान प्रमुख राहिले तरी संघटीत अशा पायदळाची सुरुवात याच काळात झाली. या पायदळाकडे तीन मिटर लांबीचे भाले (Spears) आणि सहा मिटर लांबीच्या बर्च्या (Pikes) अशी दोन शस्त्रे दिली गेल्यामुळे अनेक लढायांमध्ये या पायदळापुढे घोडदळाचा टिकाव लागणे कठीण झाले. अि.स. १३३७ पासून अिंग्लंड आणि फ्रान्स या दोन राष्ट्रात

जवळजवळ १०० वर्षे युध्द चालू होते. (Hundred Years War) या युध्दाच्या निमित्ताने युध्दशास्त्रात पडलेली महत्वाची भर म्हणजे संघटीत अशा तोफखान्याची सुरुवात ही होय असे म्हणावे लागेल. फिल्ड मार्शल मॉन्टगोमरी यांच्या म्हणण्याप्रमाणे दारुगोळा कसा तयार करावा याचे पहिले सूत्र (Formula) हे १२६० मध्ये रॉजर बेकन या अेका अिंग्लीश धर्मगुरुने प्रसिध्द केले. परंतु अितर धर्मगुरु हरकत घेतील या भितीने हे सूत्र पुढील ५० वर्षे अज्ञातच राहिली. फ्रान्स मधील लोकांनी मात्र या सूत्राचा अुपयोग करुन अि.स. १२२४ मध्ये मेट्झ या ठिकाणी पहिली तोफ अुडविली आणि युध्दशास्त्राच्या अुत्क्रान्तिला वेगळी कलाटणी दिली.

रोमन युध्दशास्त्र (Roman Warfare) अि.स. १ ते १०००

अिटालीची राजधानी असलेल्या रोममध्ये ज्युलियस सिझरचा नातू ऑक्टेव्हियन याने सम्राट ऑगस्टस हे नाव धारण करुन ख्रिस्त शताब्दि पूर्वी २७ वर्षे रोमन साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली. हे रोमन साम्राज्य पुढील बारशे वर्षे संपूर्ण पश्चिम युरोप खंडावर सत्ता गाजवित होते. सिझरने प्रस्थापित केलेल्या लिजन् या लष्करी संघटनेची वाढ होअून त्यांची अेकंदर संख्या १६०००० अितकी होती. लिजन् या लढाअू पैदळा शिवाय रोमन सैन्याचा ऑक्झीलियरी हा दुसरा अेक भाग होता. या ऑक्झीलियरी मध्ये ५०० ते १००० सैनिकांचा अेक गट आणि ५०० ते १००० घोडेस्वारांचा अेक गट असे दोन गट असत. पायदळाच्या गटाला कोहार्ट (CoHorats) असे नाव असून घोडदळाच्या गटाला स्क्वॉड्रन (Squadran) असे म्हणत. या शिवाय रोम शहराच्या रक्षणाकरीता अत्यंत निवडक अशा ५००० सैनिकांचा अेक गट ऑगस्टसने अुभा केला. त्यांना प्रेटोरियन अिंपिरिअल गार्डस् असे संबोधण्यात येअी. या गार्डस्ना विशिष्ट असे गणवेश आणि अधिक वेतन असून

त्यांच्या राहण्याची व्यवस्था सम्राटाच्या राजवाड्याच्या सभोवती खास बराकींमध्ये करण्यात येअी. युद्धनिती आणि युद्धव्यवहार या दोन्ही बाबतीत रोमन साम्राज्याच्या ४०० वर्षांच्या काळात स्किपीओ, मॅरियस आणि सिझर यांनी घालून दिलेलीच तत्वे वापरात आणली जात. प्रत्यक्ष लढाअीत लिजनच्या घोडदळाने आघाडी सांभाळावी त्याच्यामागे लिजनचे पायदळ आणि त्यानंतर लिजनचे अधिकारी अशा क्रमाने हालचाली होत असत. ख्रि.स. ४५ मध्ये रोमन सैन्याने अिंग्लंडवर कब्जा केला अन तो केवळ चार लिजन्स म्हणजे सरासरी २५०० सैनिकांकडून यशस्वी रितीने पार पडला. रोमन साम्राज्याच्या सरहद्दीवर छोट्या किल्ल्यांमधून लिजनचे छोटे गट सरहद्दीच्या रक्षणासाठी म्हणून ठेवले जात. ख्रि.स. २७८ मध्ये दक्षिण रशियात वस्ती करणाऱ्या गॉथस् या जमातीने रोमन सैन्याला लढाअीचे आव्हान दिले. त्यांच्याकडे घोडदळ फार अुत्तम प्रकारचे होते आणि ते अनेक दृष्टीनी रोमन घोडदळापेक्षा वरचढ होते. त्या वर्षी अॅड्रियानोपल या ठिकाणी रोमन सेना आणि गॉथिक सेना यांची गांठ पडली. रोमन सेनेच्या अुपस्थितीमध्ये (Deployments) मध्यभागी लिजनचे पायदळ असून डाव्या अुजव्या बगलेवर आॅक्झिलिअरीचे घोडदळ होते. त्यांच्या समोर असलेल्या गॉथिक सेनेने आम्ने साम्ने लढाअी न करता आपली सर्व ताकद अेकवटून फक्त रोमन सैन्याच्या डाव्या बगलेवर कडाडून हल्ला चढविला या अेकत्रित आणि त्वेषाने केलेल्या हल्ल्यात रोमन आॅक्झिलिअरी घोडदळाचा फन्ना अुडाला आणि त्यांनी रणक्षेत्रातून माघार घेतली त्याबरोबर गॉथिक घोडदळाने लिजनच्या मध्यभागी असलेल्या पायदळाला संपूर्ण नष्ट करून अॅड्रियानोपलची लढाअी निर्विवादपणे जिंकली. या पराभवापासूनच रोमन साम्राज्याच्या विनाशाला सुरुवात झाली.

ख्रि.स.च्या पाचव्या शतकात सध्याच्या जर्मनीत त्यावेळी फ्रॅन्क्स आणि गॉल या नावाचे लोक राहत असत या शतकापासून रोमन साम्राज्याचा

नाश झाल्यामुळे सध्याच्या रशियामध्ये त्यावेळी असलेले हूण आणि गॉथ यांचा पश्चिमेकडे असलेल्या फ्रॅन्कस आणि गॉल या लोकांशी प्रखर संघर्ष सुरू झाला. या संघर्षामध्ये मंगोल वंशाच्या हूण सेनेला अटिला या खानाचे धडाडीचे नेतृत्व लाभले. हूण सेना ही संपूर्णपणे घोडदळाची सेना होती. हूण सैनिक बाजीराव कालीन मराठा सैनिकाप्रमाणे रात्रंदिवस घोड्यावरच राहात. रणांगणाच्या आसपास मिळणारे खाद्य खाऊन ते अनेक वेळा घोड्यावरच झोपत असत. ख्रि.स. ४५१ मध्ये फ्रॅन्क्स आणि गॉथस यांनी एकजूट करून मिस्डरच्या लढाईत हूण लोकांचा पराभव केला. या पराभवामुळे डळमळीत झालेल्या रोमन साम्राज्याला थोडे जीवदान मिळाले. आणि रोम येथे साम्राज्य टिकून धरणे अशक्य आहे याची जाणीव होऊन कॉन्स्टॅन्टिन या रोमन नेत्याने पूर्वेकडे तुर्कस्थान मधील इस्तंबूल (Constantinople) येथे नवीन रोमन साम्राज्याची सुरुवात केली. यालाच इतिहासात बिझांटीन एम्पायर म्हणतात या साम्राज्याच्या बिझांटीन सेनेला सहाव्या शतकात एक अत्यंत कर्तबगार असा युद्धनेता मिळाला, तो म्हणजे बेलिसॅरियस हा होय. बेलिसॅरियसने ८०,००० ची खडी फौज उभारून सर्व युरोपभर आपल्या लष्करी वर्चस्वाचा दबदबा निर्माण केला. त्याच्या लष्करात भारी घोडदळाचा मुख्य भरणा असून त्यांच्याकडे भाले आणि धनुष्यबाण ही हत्यारे असत. त्याने जिंकलेल्या अनेक लढायात बेलिसॅरियस हा अप्रत्यक्ष युद्धनीतीचा (Strategy of Indirect Approach) वापर करीत असे. आपण एका बाजूस हल्ला करणार आहोत असे शत्रूला भासवून त्या ठिकाणी तो अतिशय थोडी सेना धाडत असे आणि शत्रूने त्या दिशेने आगेकूच केल्याबरोबर आपली सर्व भारी सेना घेऊन विरुध्द दिशेने तो शत्रूवर जोरदार हल्ला करी. सहाव्या शतकाच्या अखेरीस बेलिसॅरियसचे निधन झाल्यानंतर पूर्वेकडील रोमन साम्राज्याला इस्लामी सेनेला सर्व ठिकाणी तोंड द्यावे लागले.

इस्लाम आक्रमकांचा उदय

(Rise of Islamic Conquerers)

(ख्रि.स. ६०० ते १०००)

ख्रि.स. ६२२ मध्ये इस्लाम धर्म संस्थापक महंमद पैगंबर यांनी आपल्या अनुयायांचे घट करून मक्केहून मदिनेस प्रयाण केले आणि तेथे आपली सत्ता प्रस्थापित करून सिरीया, इजिप्त आणि पर्शिया या तीन्ही देशात इस्लामी धर्माचा आणि इस्लामी सत्तेचा झपाट्याने प्रसार केला. १०० वर्षांच्या काळात इस्लाम धर्म अनुयायांची सेना कित्येक हजारांच्या संख्येत गेली. घोडदळ आणि त्याला पुरक असे उंटाचेदल ही इस्लामी सैन्याची प्रमुख अंगे होती. इस्लामी सेनेत संघटना आणि शस्त्रास्त्रे कमजोर असली तरी धर्माच्या झेंड्याखाली एकत्र येऊन धार्मिक भावनेच्या त्वेषाने शत्रूवर तुटून पडणे हे इस्लामी सैनिकांचे फार मोठे वैशिष्ठ होते. ख्रि.स. ७०० नंतर इस्लामी धर्माचा प्रसार एवढा झाला की युरोपातील ख्रिश्चन धर्मीय राष्ट्रांविरुध्द एक प्रदिर्घ असा लढा त्यांनी सुरु केला. यालाच युरोपीयन्स राष्ट्रे क्रूसेडस (Crusade) आणि इस्लामी अनुयायी जिहाद असे म्हणतात. स्थलसेनेच्या विकासाबरोबरच इस्लाम धर्मीय अरब लोकांनी सागरामध्येही जोरदार संचार सुरु केला आणि त्यामुळेच अरब लोकांच्या बोटी गॅलिज (Galleys) आणि डावू (Dhow) भूमध्य समुद्र, अरबी समुद्र आणि हिंदी महासागर या सागरांनी वेष्टीत असलेल्या आफ्रिका आणि आशिया दोन खंडातील बहुतेक सर्व देशांशी दळणवळण करु लागल्या. अरब लोकांच्या नाविक दलात टेहळणी करणा-या छोट्या बोटी आणि त्यांच्या मागून सागरावर शत्रू आढळल्यास त्याचा प्रतिकार करण्यासाठी ५० मिटर लांबीची मोठी जहाजे असत. अशा मोठ्या जहाजातून जहाज वल्हविण्याकरिता २०० ते २५० नावाडी असत. या नावाड्यांखेरीज अशा जहाजांमधून १०० ते ४०० सशस्त्र सैनिक असत. तलवारी आणि

ढाली ही त्यांची प्रमुख आयुधे होती. [illegible] अिस्लामी सेनेने निर्माण केलेल्या या लाटेमध्ये धडाडीच्या अरब नेत्यांनी आशियातील अनेक देशांवर स्वाऱ्या करुन अिस्लामी धर्माची स्थापना केली. भारतावर पहिली स्वारी करणारा अरब नेता महंमद बीन कासीम हा केवळ १९ वर्षांचा असताना ६००० घोडदळाची अेक तुकडी घेवून अरबस्थानातून दक्षिण अिराण मधून तो सिंध प्रांतात अुतरला आणि त्याने सध्याच्या पाकिस्तान मधील हैद्राबाद, सिंध पासून दक्षिणेकडे आगेकूच सुरु केली. कच्छच्या रणातून घोडदौड करुन महंमदबीन कासीमची सेना मुज येथील हिंदू राज्याच्या सिमेवरती येवून धडकली. मुजचा राजा आनंदपाल याचेकडे जवळ जवळ ५०,००० ची सेना असून देखील तो महंमदच्या ६००० सैन्याला अडवू शकला नाही आणि त्याला शरणागती पत्करावी लागली. प्रत्यक्ष लढाअीत अिस्लामी सेनेचे अेक वैशिष्ट्य असे, लढाअीस तोंड लागल्यावर १००।१५० स्वारांचे अेक पथक अशी अनेक पथके शत्रूवर चोहोबाजूंनी हल्ला करीत असत आणि अशा तऱ्हेच्या (चा) चौफेर हल्ला बराच वेळ चालू ठेवून कांही वेळाने सर्व पथके अेकत्र येत आणि मग अेकदम शत्रूच्या आघाडी वरील कोणत्या तरी अेका ठिकाणी प्रखर असा हल्ला चढवित. प्राणाची पर्वा न करता मारु अथवा मरु या निर्धारानेच अिस्लामी सैनिक लढत असत आणि त्यामुळेच आत्मविश्वास नसलेल्या आणि धुरवाहीन झालेल्या सेना त्यांच्यापुढे पराभूत होत.

९व्या शतकाच्या प्रारंभी शहाणा लीओ (Leo the Wise) या पूर्वेकडील रोमन किंवा बिझांटाअीन सम्राटाने वाढत्या अिस्लामी आक्रमणाला निर्धार पूर्वक खिळ घातली. या वेळपर्यंत अिस्लामी सत्ता अब्बासी या घराण्यामध्ये केंद्रीत झाली होती. आणि या घराण्यानेच सध्याची अिराकची राजधानी असलेल्या बगदाद या शहरामध्ये अिस्लामची सर्वोच्च सत्ता स्थापन केली. ११व्या

शतकात तुर्कस्थान मधील अिस्लामी अनुयायांनी आपली वेगळी राजवट सुरु करुन कॉन्स्टंटीनोपल येथील बिझंटाअीन सत्तेला आणि बगदाद मधील अरबी सत्तेला फार मोठे आव्हान दिले. अशा रितीने सातव्या शतकापासून तर ११व्या शतकापर्यंत जवळजवळ ४०० वर्षांच्या काळात मध्य आशियातील सर्व देशांमध्ये अिस्लामी धर्म आणि सत्ता मजबूत पायावर अुभी राहिली. याच काळामध्ये अिस्लामी सेना मध्य आणि पश्चिम युरोपातही घुसल्या होत्या. अि.स. ७४१ मध्ये ऱ्हाअीन आणि ऱ्होन या नद्या पार करुन पोर्तुगाल आणि स्पेन पर्यंत देखील या सेनेने धडक मारली. अिस्लामी सेनेची ही घोडदौड चालू असतांना फ्रान्समध्ये चार्लस मार्टेल या लष्करी नेत्याचा अुदय झाला. मार्टेलने आपल्या फ्रेंच सेनेच्या मदतीने अिस्लामी सेनेला फ्रान्स मध्ये जोरदार प्रतिकार करुन त्यांना माघार घेण्यास भाग पाडले. मार्टेल चा नातू म्हणजे अितिहास प्रसिध्द युध्दनेता शार्ल-मान (Charlmagne) हा होय. आठव्या शतकाच्या शेवटी शार्ल-मानने भारी घोडदळावर आधारीत अेक समर्थ सेना अुभी केली आणि या सेनेच्या जोरावर पश्चिम आणि मध्य युरोपातून अिस्लामी सेनेला हाकून लावले. कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी मोठीमोठी सेना तात्काळ अुभी व्हावी या हेतूने शार्लमानने सरंजामी पध्दत सुरु केली. सरंजामी पध्दतीचा तो जनक होता असे म्हटल्यास चूक होणार नाही. या पध्दतीमध्ये घडाडीच्या अशा नेत्यांना प्रमुख सत्ताधा-यांकडून किंवा सम्राटाकडून अेखादा प्रदेश तैनात करुन दिला जाअी आणि त्या प्रदेशाच्या अुत्पन्नाचा पुष्कळसा भाग त्याने आपल्याकडे ठेवून काही भाग केंद्रीय शासनाकडे भरावा अशी व्यवस्था होती. मात्र ही व्यवस्था या अटीवर केली जात असे की सम्राटाकडून मागणी आल्यास ताबडतोब सरंजामदाराने ठरवून दिलेले पायदळ किंवा घोडदळ सम्राटाच्या हुकमाप्रमाणे मध्यवर्ती सत्तेस पुरवावयाचे होते. याच पध्दतीला फ्यूडल सिस्टीम (Feudal System) असे म्हटले जाते. ही सरंजामदारांची पध्दत शार्लमान पासून अिस्लामी राष्ट्रांनीही

Th. 7042

रुजली आणि आपण जिंकून घेतलेल्या प्रदेशात त्यानी असे सरंजामदार निर्माण केले. भारतामध्ये शरणागत स्थानिक राजा महाराजांना मुस्लीम आक्रमकांनी असे सरंजाम बहाल केले आणि त्यांना आपल्या अंकित करुन ठेवले. मोगल साम्राज्यात आणि दक्षिणेतील बहामनी राज्यातूनही सरंजामदाराच्या पध्दतीवर मनसबदारी पध्दत सुरु झाली. शिवाजी महाराजांच्या आधी आणि नंतरही अनेक मराठा सरदार आदिलशाही, निजामशाही आणि कुतुबशाही या तीन इस्लामी राज्यांचे मनसबदार होते. या मनसबदारांना जितकी सेना ठरविण्याची मर्यादा घालून दिली जात असे त्या मर्यादेप्रमाणे त्यांना दस हजारी, पंचहजारी, किंवा दोन हजारी असा किताब दिला जात असे. शिवाजी महाराजांनी अशा तऱ्हेची मुलुख तोडून देण्याची किंवा सरंजामी तोडून देण्याची पध्दत संपूर्णपणे बंद केली. परंतु छत्रपती राजारामाने ती पुन्हा सुरु करुन जास्तीतजास्त प्रदेश मराठयांच्या सत्तेखाली राहावा म्हणून अनेक सरंजामदार आणि तैनातदार निर्माण केले. त्यानंतर प्रदेश तोडून देण्याची पध्दत पेशवाईत पक्की रुढ झाली. आणि म्हणूनच उत्तर भारतात महाराष्ट्रापासून दूर असलेल्या ग्वाल्हेर आणि इंदोर सारख्या ठिकाणी शिंदे आणि होळकर यांनी दुय्यम सत्ता प्रस्थापित केल्या.

१० व्या शतकामध्ये नार्वेतील व्हायकिंग या जमातीने नौसेनेची जोरदार वाढ करुन आपल्या नाविक दलाच्या साहयाने इंग्लंड आणि पश्चिम फ्रान्सवर आपली सत्ता प्रस्थापित केली. यालाच इतिहासात नॉर्मनकॉन्क्वेस्ट असे म्हणतात. नौदलाच्या तुलनेने नॉर्मन सेनेमध्ये पायदळाचा जास्त भरणा होता. नौसेनेच्या जोरावर एखाद्या देशावर आक्रमण करुन तेथे आपले पायदळ उतरवावे आणि तेथून पुढे जमिनीचा कब्जा घ्यावयाचा ही त्यांची सामान्य प्रथा होती. या त्यांच्या पध्दतीला इंग्लंडचा त्यावेळचा राजा अल्फ्रेड याने आपल्या भारी पायदळाने (Heavy Infantry) चोख उत्तर दिले आणि जेरडाकून आणि

Th. 7042

अेशडाऊन आणि अेडिंग्टन येथे झालेल्या लढायात नॉर्मन सेनेचा सपशेल पराभव केला.

खि.स. १००० ते १२०० या २०० वर्षांच्या दुस-या कालखंडात युध्दशास्त्राच्या दृष्टीने झालेली सगळ्यात महत्वाची घटना म्हणजे युरोप खंडातील ख्रिश्चन धर्मीय राष्ट्रे आणि मध्य पूर्वेतील अिस्लाम धर्मीय राष्ट्रे यांच्यामध्ये झालेली धर्म युध्दे ही होय. युरोपीयन राष्ट्रांच्या सेना बहुसंख्येने भारी घोडदळ आणि हलके घोडदळ यांच्या पलटणींनी युक्त होत्या. ख्रिश्चन धर्मीय राष्ट्रांचे नेतृत्व प्रामुख्याने अिटली, फ्रान्स, अिंग्लंड आणि नॉर्वे, स्विडन, डेन्मार्क या राष्ट्रांकडे होते. त्याविरुध्द अिस्लामी राष्ट्रांच्या सेना सलाहुद्दीन या अेकमेव पुढा-याच्या नेतृत्वाखाली लढत होत्या. अिस्लामी सेनेतही मुख्यतः घोडदळाचा भरणा असून घोडेस्वार लोखंडी शिरस्त्राणे आणि चिलखते वापरत असत. दोन्ही सेनेत फरक अेवढाच होता की अिस्लामी सेनेचे घोडदळ हलक्या घोडदळाच्या पध्दतीचे असल्यामुळे त्यांच्या रणांगणावरील हालचाली फार वेगाने होत असत. त्यांच्या घोडदळ सैनिकांकडे ढाल आणि तलवार यांशिवाय छोटे भाले आणि गदा अशी शस्त्रास्त्रे असत. ख्रिश्चन सेनेचे सैनिक तलवारी आणि भाले या शिवाय धनुष्यबाणाचाही अुपयोग करीत. पुढे ११८७ मध्ये ख्रिश्चन आणि अिस्लामी धर्माच्या सेनांमध्ये गॅलीलीच्या समुद्राजवळील टेकड्यांवर हतीन या ठिकाणी लढाअी झाली आणि त्यामध्ये अिस्लामी सैन्याचा दारुण पराभव झाला. या पराभवा नंतर धर्मयुध्दाची धार हळूहळू कमी होत गेली. दुस-या कालखंडाच्या या दुस-या वर्षात सेनांची संघटना आणि सैनिकांची शस्त्रास्त्रे यांच्यात लक्षणीय अशी प्रगती झाली नाही. प्रत्यक्ष लढायात आक्रमक पवित्र्यापेक्षा (Offensive Posture) दोन्ही सेनांचा भर बचावात्मक पवित्रा (Defensive Posture) कडे होता.

या सर्वसाधारण सूत्रामुळे या कालखंडात युरोपात आणि पश्चिम आशियात मोठमोठ्या जागी किल्ले बांधण्याची प्रथा सर्वत्र रूढ झाली. शक्य तो असे किल्ले टेकड्यांवरती बांधले जात आणि किल्ल्याची तटबंदी संपूर्ण दगडाची केलेली असे. तटबंदीच्या भोवती ६ ते ७ मिटर रुंदीचा आणि ४ ते ५ मिटर खोल असा खंदक बनविण्यात येई. किल्ले बांधण्याची प्रथा युरोप नंतर २०० वर्षांनी म्हणजे १४व्या आणि १५ व्या शतकात भारतात आली. रणथंभोर, मांडू, जोधपूर आणि देवगिरी येथील दगडी किल्ले १४व्या आणि १५व्या शतकातच बांधले गेले. किल्ले बांधण्याच्या या नव्या प्रथेमुळे किल्ल्याला वेढा घालून तो काबीज करण्यासाठी लागणा-या सामुग्रीचीही झपाट्याने वाढ झाली. किल्ल्यामध्ये गोळाफेक करण्यासाठी उंच असे मनोरे, किल्ल्यांतील सैनिकांना जखमी करण्यासाठी दगड फेकणारी यंत्रे, तटबंदीवर चढून जाण्यासाठी मोठमोठ्या शिड्या व त्याचप्रमाणे किल्ल्यांचे दरवाजे फोडण्यासाठी मोठ मोठे ओंडके (Battering Rams) यांचेहि अुत्पादन वाढले.

मध्ययुगीन कालाचा तिसरा कालखंड म्हणजे ख्रि.श. १२०० ते १४७५ हा काळ होय. या कालखंडात सरदार लोक (Knights and Feudal Lords) यांचा -हास होअुन त्यांची जागा व्यवसायीक (Professional) पायदळाने घेतली. या पायदळातील सैनिक अनेक देशाचे नागरिक असत आणि केवळ वेतनासाठी ते कोणत्याही सैन्यात काम करण्यासाठी तयार होत, अशाच पायदळाला मर्सिनरी (Mercenary) किंवा भाडोत्री सैनिक असे म्हणत. त्याचप्रमाणे किल्ल्यांच्या ऐवजी रणक्षेत्रातील आघाताचा मुख्य भर तोफखान्याकडे आला आणि अनेक राष्ट्रातील सरंजामशाही नष्ट होअुन त्या ठिकाणी व्यवसायिक सेना अस्तीत्वात आली. सेनेच्या रचनेत घोडदळ कायम राहिले तरी पायदळ त्यांच्या

बरोबरीने काम करु लागले. घोडदळाच्या पलटणी विशेषतः फ्रान्समध्ये आणि त्याच्या खालोखाल सध्याचा जर्मनी आणि इंग्लंड मध्येही होत्या. जर्मन घोडदळ हे हलक्या घोड्यांचे असून त्यावेळी त्यांना पॅन्झेरॅटी (Panzerati) असे म्हणत. याच परंपरेवरुन दुस-या महायुध्दाच्या काळात जर्मन सैन्याकडे पॅन्झर आर्मी म्हणजे रणगाडा विभाग हा एक फार महत्वाचा घटक बनला. घोडदळाच्या लढाईचा सराव होण्यासाठी टूर्नामेन्ट (Tournament) किंवा स्पर्धा याच काळात प्रथम सुरु झाल्या. परंतु या काळातील टूर्नामेन्टस् मध्ये फक्त हुषार आणि अनुभवी घोडेस्वारच भाग होत. या कालखंडातील दुसरी आणि महत्वाची घटना म्हणजे १२४५ ते १४४५ पर्यंत चाललेले इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यातील १०० वर्षांचे युध्द हे होय. या प्रदिर्घ युध्दामध्ये इंग्लीश पायदळ आणि फ्रेंच घोडदळ (Men at Arms) यांच्यामध्ये अनेक लढाया झाल्या. परंतु या पैकी क्रेसीची लढाई (१२४६) ही अत्यंत महत्वाची ठरली. ही लढाई सोम नदीच्या तीरावर असलेल्या क्रेसी या गावानजीक झाली. या लढाईमध्ये इंग्लीश पायदळाने पल्लेदार धनुष्य बाणांचा (Long Bow) परिणामकारक रितीने वापर केला. त्यांचे प्रशिक्षण उत्तम प्रकारचे असून इंग्लीश सेनेचा सर्वोच्च सेनापती खुद्द राजा एडवर्ड तिसरा हा होता. याउलट फ्रान्सचे घोडदळ हे अनेक ठिकाणच्या तुकड्यातून आयत्यावेळी जमविलेले, प्रशिक्षण न मिळालेले आणि लढाईचा सराव नसलेले होते. याशिवाय फ्रेंच सेनापती राजा फिलीफ याचे आपल्या सेनेवर कमावर असे नियंत्रण नव्हते, आणि लढाईच्या वेळी प्रसंग ओळखून तेथल्या तेथे निर्णय घेणे त्याला जास्त जमत नसे. त्यामुळे क्रेसीच्या लढाईत इंग्लीश पायदळी सेनेने त्यांच्या दुप्पट संख्येने असलेल्या फ्रेंच घोडदळ सेनेचा निर्णायक पराभव केला. इंग्लीश आणि फ्रेंच सेना यांच्यातील हा फरक पंधराव्या शतकातील मध्यापर्यंत कायम राहिला आणि त्यामुळे १४१५ साली झालेल्या

ॲगीनकोर्टच्या लढाईत फ्रेंच सेनेला इंग्लीश सेनेविरुध्द पराभव पुन्हा पत्करावा लागला.

या कालखंडातील तिसरी आणि शेवटची महत्वाची घटना म्हणजे तोफखान्याची (Artillery) लक्षणीय वाढ ही होय. इ.स. १२६० मध्ये रॉजर बेकन या इंग्लीश धर्मगुरुने मीठ, कोळसा आणि गंधक (Sulphur) यांच्या मिश्रणाने दारुगोळा कसा तयार करावा याचा आकृतीबंध (Formula) तयार केला. असे असूनही पुढील ६० ते ७० वर्षे प्रत्यक्ष इंग्लंड मध्ये या शोधाची कोणीच दखल घेतली नाही. पुढे हे सूत्र फ्रान्सच्या हाती पडून एका फ्रेंच कारागिराने या प्रकारचा दारुगोळा वापरुन इ.स. १३२१-२४ या मध्ये पहिली तोफ डागली. यानंतर दारुगोळा बनविणे आणि तोफा ओतणे (Gun Casting) या दोन क्षेत्रात फ्रेंच तज्ञांनी मोठी प्रगति केली. १४४० ते १४५० या दशकात फ्रेंच सेनेमध्ये तोफखाना हा एक स्वतंत्र विभाग म्हणून अस्तीत्वात आला. यावेळी फ्रेंच तोफेची क्षमता १०५ पौंडाचा गोळा फेकण्याइतकी वाढली. अर्थात त्यांचा पल्ला मात्र जास्तीतजास्त १०० ते १५० मिटर एवढाच होता. या नवीन शस्त्र सामुग्रीमुळे फ्रेंच सेनेची संहारशक्ती (Fire Power) खूप वाढली. यावेळी नॉर्मन्डी या नावाने ओळखला जाणारा फ्रान्सचा पश्चिम आणि दक्षिण किनारा इंग्लीशांच्या ताब्यात होता. या प्रदेशातून इंग्लीशांना घालवून द्यावे आणि तो पुनश्च फ्रेंच सत्तेखाली आणावा या उद्देशाने फ्रान्सने इंग्लंड विरुध्द पुन्हा युध्द सुरु केले. अशाच एका लढाईत १४२९ मध्ये ऑर्लिअन्स येथील फ्रेंच किल्ल्याला इंग्लीश सेनेने घातलेला वेढा उठविण्यासाठी फ्रेंच सेनेने निकराची लढाई दिली. याच लढाईच्या वेळी इतिहासात अजरामर झालेल्या जोन ऑफ आर्क या १८ वर्षाच्या एका लहून तरुणीने फ्रेंच तुकड्यांचे अधिपत्य करुन जोरदार चढाई करण्यास त्यांना उद्युक्त केले. विशेष म्हणजे जोन या तरुणीस तोफेमध्ये दारुगोळा कसा भरावा आणि योग्य वेळी

तोफा कशी उडवावी याबद्दलचे सखोल ज्ञान होते. १४३१ मध्ये इंग्लीश सैन्याकडून ती पकडली गेली आणि तिला जिवंत जाळून तिची हत्या करण्यात आली. तोफखान्याच्या विकासातील या कालखंडातील शेवटचा टप्पा म्हणजे रणक्षेत्रात फिरती राहणारी तोफखान्याची तुकडी (Field A rtillery)हा होय. १४२० ते १४६० या काळात सध्याच्या झेकोस्लोव्हाकीयातील प्राग येथे राहणाऱ्या जॉन झिझ्का या एका घोडदळ अधिकाऱ्याने फिरत्या तोफांची पध्दत सुरु केली. बाराचाकी मोठ्या अशा गाडीत (Wagon) दोन किंवा तीन तोफा निरनिराळ्या दिशांना बसवून आणि गाडीतच दारुगोळा साठवून ठेवून शत्रूचा जोर दिसेल तेथे प्रसंगाप्रमाणे तोफांची सरबत्ती करण्याची प्रथा झिझ्का याने प्रथम सुरु केली. आधुनिक तोफखान्याचा याच प्रथेपासून प्रारंभ झाला.

भारतातील युध्दशास्त्राची प्रगति
(Evolution of Warfare in India)

मध्ययुगीन काळाच्या या १४०० वर्षांत भारतातील युध्दशास्त्राचे दोन प्रमुख कालखंड पडतात. ख्रिस्त शताब्दीच्या प्रारंभापासून तो सातव्या शतकाच्या अखेरपर्यंत पहिला कालखंड आणि खि.स. ७०० पासून १५०० पर्यंत दुसरा कालखंड असे म्हणण्यास हरकत नाही. पहिल्या कालखंडाच्या ७०० वर्षांत गुप्त सम्राटांचे साम्राज्य संपूर्ण भरत खंडात अबाधित राहिले. गुप्त सम्राटांच्या सेना चतुरंग सेना असून त्यामध्ये हत्ती, रथ आणि घोडदळ यांना प्राधान्य असे. पायदळाचा दर्जा हा नगण्य असाच होता. प्रत्यक्ष लढाईत सम्राट किंवा राजा आणि त्याचे इतर सेनानी हत्तीवर आरुढ होऊनच रणक्षेत्रातील हालचाली करीत असत. अशा तऱ्हेच्या चतुरंग सेनेला ७०० वर्षांच्या काळात कोणतेही आव्हान न मिळाल्यामुळे ही सत्ता सात शतके टिकून राहिली.

ख्रि.स. ७०० पासून तो १५०० पर्यंत ही ८०० वर्षे हा अिस्लामी आक्रमणाचा अत्यंत जोरदार काळ मानावा लागेल. ख्रि.स. ७१२ मध्ये महंमद-बीन कासीमच्या स्वारी नंतर भारतीय युध्दशास्त्राला नवी कलाटणी मिळाली. अिस्लामी सेनेचा प्रमुख भर घोडदळावर असून रणक्षेत्रातील पुरवठा यंत्रणेत ते अुंट दलाचा वापर करीत. ख्रि.स. १००० पासून गझनीच्या महंमदाने भारतावर अेकंदर ११ वेळा स्वाऱ्या केल्या. प्रत्येक वेळी त्याच्याकडे २० ते ४० हजाराचे घोडदळ आणि त्यांना लागणारे अन्नधान्य आणि पाणी यांचा पुरवठा करण्यासाठी जवळजवळ २५ हजाराचे अुंटदल त्याच्या स्वारी बरोबर असे. घोडदळाच्या वापरा मुळे अिस्लामी सेनेच्या हालचाली अत्यंत त्वरीत होत. कोणत्याही ठिकाणी हल्ला करणे झाल्यास रात्रीच्या अंधारात ५।१० हजार घोडेस्वार बिनसावध असलेल्या शहरावर किंवा किल्ल्यावर अचानक हल्ला चढवित. या अचानक कारवाअीमुळे (Surprize Action) आणि घोडदळाने निर्माण केलेल्या धडकी मुळे (Shock Action) त्यांचा परिणामकारक प्रतिकार करणे त्या शहरास किंवा किल्ल्यास शक्य होत नसे. गझनीच्या महंमदाच्या बहुतेक स्वाऱ्यात अचानक कारवाअी, गतिमानता (Mobility) आणि घोडदळाची धडकी या तीन वैशिष्ठ्यांमुळेच तो निर्णायक विजय मिळवू शकला. ख्रि.स. १००० नंतर कुतुबुद्दीन अैबक या गुलाम वंशाच्या अेका नेत्याने दिल्लीमध्ये आपले राज्य स्थापन करून तो जवळजवळ २०० वर्षे टिकविले. त्याच्याही सेनेचा मुख्य भर घोडदळावर होता. तिच प्रथा १४ व्या शतकात अल्लाअुद्दीन खिलजीने पुढे चालू ठेवली. मात्र त्याने आपले आक्रमण अुत्तर भारतातच मर्यादित न ठेवता दूरवरच्या मोहिमा काढून खिलजी सेनेने रामेश्वर पर्यंत धडक मारली. अशा रितीने मध्ययुगीन कालखंडामध्ये अिस्लामी आक्रमणे आणि त्यांनी मोठ्या प्रमाणावर केलेला घोडदळाचा वापर या भारतीय युध्दशास्त्राच्या अुत्क्रान्तीतील महत्वाच्या घटना ठरल्या. या घटनेमुळेच स्थानिक

राजा महाराजांनी बचावात्मक पवित्रा घेऊन अचानक हल्ल्यांपासून सुरक्षित राहावे म्हणून मजबूत असे किल्ले आणि गड बांधण्यास सुरुवात केली. भारतातील महत्वाचे असे सर्व किल्ले मग ते गडावरील किल्ले असोत अथवा भुईकोट असोत ते ख्रि.स. १००० ते १५०० या ५०० वर्षांच्या काळातच बांधले गेले आहेत.

प्रकरण दुसरे

संदर्भसूची

१ Strategy : The Indirect Approach Liddell Hart Ch. 2 to 5

२ A History of Warfare Field Marshal Montgomery Part II Ch. 7-8-9

३ The Guinness' History of Land Warfare Kenneth Macksey Ch. 3 to 5

४ The History of Hindustan Vol.1-2 Dow.

प्रकरण तिसरे

आधुनिक युध्दशास्त्राचा प्रारंभ आणि प्रगति

(Origin and Development of Modern Warfare)

आधुनिक युध्दशास्त्राचा प्रारंभ सोळाव्या शतकापासून सुरु झाला असे म्हणण्यास हरकत नाही. या शतकामध्ये स्पेन, पोर्तुगाल, फ्रान्स आणि इंग्लंड या चार युरोपीयन देशात युध्दशास्त्राची वाढ फार झपाट्याने झाली. परंतु या चार राष्ट्रांपैकी स्पेन हे राष्ट्र मात्र युध्दशास्त्रात आघाडीवर राहिले. याचे कारण भूमीवरील युध्द (Land Warfare) आणि सागरी युध्द (Sea Warfare) या दोन्ही क्षेत्रात स्पेनची आणि त्याच्या बरोबरीनेच पोर्तुगालची प्रगति एका वेगाने चालु राहिली. ख्रि.स. १५०२ मध्ये गोंझालो कोर्डोवा या युध्दनेत्याचे नाव या प्रगतिशी प्रामुख्याने निगडीत आहे. ख्रि.स. १५०२ मध्ये कोर्डोवाने सुधारित अशी बंदूक प्रथम वापरात आणली. या वेळपर्यंत बंदूकीच्या नळीमध्ये दारु भरुन त्या दारुला जळता निखारा लावून बंदूक उडविण्याची प्रथा होती. या पध्दतित सैनिकाला फार त्रास होत असे. कारण जवळजवळ २० कि.ग्रॅ. वजनाच्या बंदूकी बरोबरच जळत्या शेगडया जवळ बाळगाव्या लागत असत. त्यामुळे अशा त-हेची बंदूक वापरात आणण्यास कमीत कमी दोन सैनिक लागत. या ऐवजी कोर्डोवाने सुरु केलेल्या बंदूकीचे वजन १० ते १५ किलो ग्रॅम असून बंदूकीची दारु उडविण्यासाठी त्याने मॅचलॉक (Match Lock) चा वापर सुरु केला. या पध्दतित काडयाच्या पेटीचा गोंद बंदूकीच्या घोड्याला चिटकवला जात असे आणि त्यामुळे बंदूकीचा चाप (Trigger) ओढल्याबरोबर घोडा पुढे सरकला जाऊन त्याचा नळीतील दारुशी होणा-या घर्षणामुळे स्फोट होई आणि बंदूक उडविणे शक्य होई. अशा त-हेच्या बंदूकीला आर्केबस

(Arquebus) असे नाव मिळाले. या बंदुकी स्पेनमधील सैनिकांना देण्यात आल्या त्यालाच आर्केबुझिअर्स (Arquebusiers) असे नाव पडले. आर्केबुझिअर्सच्या साह्याने युक्त झालेल्या स्पॅनिश सेनेने लवकरच आपल्या सत्तेचा विकास सुरु केला. या सत्तास्पर्धेमध्ये फ्रान्स हे राष्ट्र स्पेनचे मुख्य प्रतिस्पर्धी होते. १५०२ च्या अंतरिस इटलीमधील गॅरीग्लीयानो या नदीच्या तिरावर झालेल्या लढाईत फ्रेंच सेनेचे घोडदळ (Men at Arms) आणि भालाधारी सैनिक (Pikeman) यांच्यावर कोर्डोबाच्या आर्केबुझिअर्सनी तुफानी हल्ला करुन फ्रेंच सेनेचा निर्णायक पराभव केला. युध्दशास्त्राच्या दृष्टीने पाहता कोर्डोबाचा मुख्यभर आक्रमक पवित्र्यापेक्षा बचावात्मक पवित्र्यावर जास्त होता. सर्वसाधारणपणे एखाद्या टेकडीचा किंवा किल्ल्याचा आधार घेऊन कोर्डोबा हा आपल्या आर्केबुझिअर तुकड्यांना चारीही बाजूंनी मोक्याच्या ठिकाणी तैनात करीत असे. अशा सुरक्षित स्थानकांवर घोडदळाने किंवा पायदळाने हल्ला केल्यास त्यांच्यावर आर्केबुझ जातीच्या बंदुकांमधून गोळ्यांचा तुफानी मारा होत असल्यामुळे कोर्डोबा विरुध्द लढणारे शत्रू सैन्य सहजरीत्या पराभूत होत असे.

तोफखान्याची वाढ
(Development of Artillery)

१६व्या शतकाच्या उत्तरार्धात आपल्या सेनेतील उणिवा लक्षात घेऊन फ्रेंच सैन्याने तोफखान्याच्या विकासाकडे जास्त लक्ष दिले. फ्रान्समधील सुधारित तोफखान्याकरिता लोखंडा ऐवजी मिश्रधातूत (Bronze) तोफा ओतण्याची प्रथा प्रथम फ्रान्समध्ये सुरु झाली. तोफांचे गोळे दगडाचे न बनवता लोखंडाचे किंवा तांब्याचे बनवू लागले. रणांगणात तोफांची हालचाल जलदरीतीने करता यावी म्हणून चार चाकी गाड्यांवर असलेल्या तोफा गाड्यांसहित ओढण्यासाठी

घोड्यांचा वापर फ्रेंच तोफखान्याने प्रथम सुरू केला. या पध्दतितून पुढे गन कॅरेज (Gun Carriage) म्हणजे तोफ वाहक वाहन अस्तीत्वात आले. अशा त-हेच्या तोफखान्याच्या जोरावरच फ्रेंच सेनेने रॅव्हेना येथे स्पॅनिश सैन्याचा पराभव केला. त्याचप्रमाणे मॅरिग्नॅनोच्या लढाईत स्विझर्लन्ड मधील सैन्याचा पराभव करण्यात तोफखान्यामुळेच फ्रेंच सेना अधिक प्रभावी ठरली. या काळापासून पुढे १८१५ साली झालेल्या वाटर्लूच्या लढाई पर्यंत फ्रेंच तोफखाना युरोपातील सर्व राष्ट्रांमध्ये अत्यंत वरच्या दर्जाचे स्थान राखून होता. तोफखान्यामध्ये झालेल्या या लक्षणीय प्रगतीमुळे सहाजिकच किल्ले आणि तटबंदी यांच्यातही सुधारणा होणे अटळ ठरले. तोफगोळ्यांची बंबारी तटबंदी फोडण्यास समर्थ असल्यामुळे नवीन किल्ले शक्य तो तोफेचा गोळा पोहचणार नाही जितक्या उंचावर बांधण्याची प्रथा या काळातच सुरू झाली. त्याचप्रमाणे किल्ल्याभोवती असणा-या एका तटबंदी ऐवजी तीन किंवा चार तट आणि त्या प्रत्येकामध्ये खंदक असे नव्या तटबंदीचे स्वरूप होते.

नौसेनेचा विकास

(Naval Development)

जमिनीवरील युध्दशास्त्राप्रमाणेच सोळाव्या शतकात स्पेन आणि त्याच बरोबर पोर्तुगाल या दोन राष्ट्रांनी नौसेनेच्या विकासात फार मोठी प्रगति केली त्याच्या पाठोपाठ इंग्लंड आणि हॉलन्ड यांच्या नौसेनेतही विकास होत राहिला. याच कारणामुळे या चारही राष्ट्रांनी आपल्या देशाबाहेर जाऊन दूरवरच्या देशांमध्ये आपली साम्राज्ये उभारण्यास सुरूवात केली. स्पेन आणि पोर्तुगालच्या नौसेनांचा विकास होण्याचे मुख्य कारण असे की त्यांनी वल्हविणा-या बोटींचा त्याग करून त्या ऐवजी शिडांची जहाजे प्रथमच तयार केली. आणि

त्याबरोबर अशा तऱ्हेच्या शिडांच्या जहाजांवर तोफा असून ही जहाजे लाटांवर प्रभुत्व ठेवतील अशी क्षमता निर्माण केली. शिडांच्या जहाजांमुळे महासागरांमधले निरनिराळे प्रवाह, त्याप्रमाणे त्यांची गति आणि दिशा आणि निरनिराळ्या ठिकाणी केव्हा वारे वाहतात या सर्व गोष्टींचा सखोल अभ्यास करणे आवश्यक होते. नाविक तंत्रज्ञान (Naval Technology) सागरांवरील संचार, (Seamanship) पृथ्वी, सूर्य, चंद्र आणि तारे यांचे समुद्र आणि वारे यांच्याशी असलेले नाते (Naval Astronomy) इत्यादी शास्त्रात स्पेन आणि पोर्तुगीज नाविक दलाने उच्चांक गाठला. या शास्त्रांचा पद्धतशीर अभ्यास नौसैनिकांनी करावा म्हणून लिस्बन आणि सेव्हील या दोन बंदरात नाविक दलाच्या शाळा (Navigation Schools) प्रस्थापित करण्यात आल्या. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात संख्या, सराव आणि शास्त्र या तिन्ही अंगाने वरचढ ठरलेल्या स्पेन आणि पोर्तुगालच्या नौसेनेने जगातील सर्व सागरात संचार करून स्पॅनिश सत्ता दक्षिण अमेरिकेपर्यंत पोहचविली. स्पेन, पोर्तुगालच्या या वाढत्या सागरी वर्चस्वामुळे इंग्लंड सारख्या राष्ट्रास या नव्या घटनेची गंभीर दखल घ्यावी लागली. सागरी युद्धनिती बद्दल बोलताना सर वॉल्टर रॅले या प्रख्यात इंग्लीश दर्यासारंगाने असे म्हटले की जे राष्ट्र सागरी सत्ता गाजवील तेच राष्ट्र व्यापारात वरचढ ठरेल, जे राष्ट्र व्यापारात वरचढ आहे त्या राष्ट्राकडे जगातील सर्व संपत्तीचा ओघ वळेल आणि ज्या राष्ट्राकडे अशी संपत्ती असेल ते राष्ट्र अखेरीस सर्व जगावर सत्ता गाजवेल. या तत्त्वाला अनुसरून इंग्लंड मध्येही नौसेनेची झपाट्याने वाढ होऊ लागली. इंग्लीश सागरी सत्ता वाढविण्यामध्ये इंग्लीश दर्यासारंग सर फ्रॅन्सीस ड्रेक याचा सिंहाचा वाटा आहे. ड्रेकनेही शिडाची जहाजे तयार करून जागतिक सागरांवर संचार सुरु केला. आपल्या जहाजांचा ताफा घेऊन साता-समुद्रातून जगाला प्रदक्षिणा घालणारा फ्रॅन्सीस ड्रेक हा पहिलाच सागरी सेनापती होय.

त्यावेळची अिंग्लंडची राणी अेलिझाबेथ हिने ड्रेकच्या महान कार्याचा यथोचित गौरव केला. १६६० नंतर अिंग्लंड आणि स्पेन या दोन सागरी सत्तांमध्ये प्रखर असा सागरी संघर्ष सुरु झाला. स्पेनला शह देण्यासाठी त्यांचे सागरावरील व्यापारी मार्ग तोडणे, विखुरलेल्या स्पेनच्या आरमारावर अचानक हल्ला करणे आणि वेळ प्रसंगी प्रत्यक्ष स्पेनमधील बंदरावर हल्ला करणे अशा त-हेची सागरावरील अप्रत्यक्ष चढाओची युध्दनिती (Strategy of Indirect Approch) अिंग्लीश नाविक दलाने सुरु केली. अखेरीस १५५८ च्या जुलैमध्ये १२० जहाजांचा लढावू जहाजे असलेल्या स्पॅनिश आरमाराचा (Spanish-Armede) १९७ जहाजे असलेल्या अिंग्लीश आरमाराने अिंग्लीश खाडीच्या जवळ निर्णायक पराभव केला. आणि सागरावरील आपले वर्चस्व वरचढ ठरविले.

आधुनिक लष्करी पध्दतिचा प्रारंभ

(Beginning of Modern Military System)

१७ व्या शतकाचा पूर्वार्ध हा काळ युध्दशास्त्राच्या क्रांतिमध्ये अत्यंत महत्वाचा कालखंड समजला जातो. या कालखंडात स्विडनचा राजा गुस्ता-हस अॅडॉल्फस आणि अिंग्लंड मधील लष्करी नेता ऑलिव्हर क्रॉमवेल यांनी आपापल्या देशात आधुनिक पध्दत अस्तित्वात आणली. या घटना घडत असतांनाच युरोपीयन राष्ट्रात अनेक फेरफार घडून आले. ते म्हणजे सैन्यदलाच्या संख्येत लक्षणीय वाढ, अधिकारी आणि सैनिक यांची पध्दतशीर लष्करी भरती, व्यावसायीक सेनेची वाढ, तोफखान्याचा विकास व लष्करी अभियांत्रिकी दलाची स्थापना ही प्रमुख वैशिष्ठ्ये म्हणून सांगता येतील. याच शतकात आधुनिक राष्ट्र (Modern State) ही कल्पना वाढीस लागल्यामुळे सहाजिकच नवोदित राष्ट्रांमध्ये प्रादेशिक

सत्तेसाठी, देशोदेशींच्या व्यापारासाठी आणि साम्राज्यवादी वर्चस्व गाजविण्यासाठी प्रबळ सेना आणि समर्थ आरमार सज्ज ठेवणे ही काळाची गरज ठरली.

स्वीडनची लष्करी पध्दत

(Military System of Sweden)

१६११ मध्ये गुस्ताव्हस ॲडाल्फस हा स्विडीश राजपुत्र स्विडनच्या गादीवर विराजमान झाला (१५९४ ते १६३२) गादीवर येण्यापूर्वी पहिली १७ वर्षे ऐशारामात न घालवता गुस्ताव्हसने युध्दशास्त्राचा आणि आधुनिक विज्ञान आणि तांत्रिक ज्ञानाचा (Modern Science and Technology) सखोल अभ्यास केला होता. स्विडन हे एक प्रॉटेस्टंटवादी राष्ट्र असल्यामुळे स्विडनला युरोपीय राष्ट्रात मानाचे स्थान प्राप्त करुन द्यावयाचे असेल तर डेन्मार्क, पोलंड, रशिया आणि त्याचप्रमाणे फ्रांन्स ऑस्ट्रिया येथील साम्राज्ये यांच्याशी आपल्याला संघर्ष करावा लागेल याची गुस्ताव्हसला पूर्ण जाणीव होती. तसेच या दोन देशांच्या बाल्टीक समुद्रात होणाऱ्या हस्तक्षेपांपासून तो समुद्र या राष्ट्रांच्या वर्चस्वापासून मुक्त ठेवला पाहिजे आणि तेथे स्विडनचे वर्चस्व राहिले पाहिजे असा गुस्ताव्हसचा निर्धार होता. या विशाल युध्दनितीच्या (Grand Strategy) पार्श्वभूमीवर स्विडनची राज्य सूत्रे हाती घेताच स्विडन मधील सेनेत वाढ करुन तिला पहिल्या दर्जाची सेना बनवावी या उद्देशाने त्याने सैन्याच्या सुधारणेस प्रारंभ केला. त्या काळात उपलब्ध असलेल्या झेनोफॉन या लष्करी तज्ञाने लिहिलेल्या सायरोपिडीया (Cyropeadia) या युध्द शास्त्र विषयक ग्रंथातील मार्गदर्शक तत्वांचे तंतोतंत पालन करण्याचे त्याने ठरविले. कोणत्याही उत्कृष्ठ सेनेत सुसूत्र अशी संघटना, सेनेचे प्रशिक्षण आणि युध्दव्यवहाराचा सराव (Tactical Training)

या अत्यंत आवश्यक गोष्टी आहेत अशी त्याची ठाम समजूत होती. या तत्वांच्या आधाराने स्विडनमध्ये १८ ते २० वयोगटातील सर्व पुरुष व्यक्तींना गुस्ताव्हसने लष्करी सेवा सक्तीची (Conscription) केली. देशातील सैनिक सर्व थरातील चांगल्या घराण्यातून निवडले जावेत यावर गुस्ताव्हसचा विशेष भर होता. या सक्तीच्या लष्करी सेनेमधून त्याने शुद्ध स्विडीश लोकांचे ४०,००० चे सैन्य अुभे केले आणि त्याचबरोबर अिंग्लंड मधील स्कॉटीश लोकांची भरती करून त्याने आणखी २०,००० संख्येची भर आपल्या लष्करात टाकली. लष्कराची भरती ही केंद्रीय सत्तेकडून झाली पाहिजे, त्यांची शस्त्रसामुग्री सरकारने पुरविली पाहिजे त्याचप्रमाणे त्यांना योग्य वेतन आणि राहण्या-जेवण्याची सोय सरकारनेच केली पाहिजे असे अनेक कायदे गुस्ताव्हसने तयार केले. या दृष्टीने पाहता गुस्ताव्हस हा आधुनिक सशस्त्र दलांचा जनक होता असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

सैन्याची संघटना आणि शस्त्र सामुग्री ही गतिमानता (Mobility) आणि संहारशक्ती (Fire Power) हे दोन घटक लक्षात ठेवूनच केली पाहिजे असा त्याचा आग्रह होता. त्याप्रमाणे त्याने सेनेच्या प्रत्येक कंपनीत ७२ बंदुकधारी (Musketeers) आणि ५४ भालाईत (Pikemen) अशी १२६ सैनिकांची संख्या ठरवून दिली. चार कंपन्यांची अेक बटालीयन, आठ बटालीयनची अेक रेजीमेन्ट आणि दोन ते चार रेजीमेंट चे अेक ब्रिगेड अशी संघटना आपल्या सेनेकरिता त्याने निश्चित केली. बंदुकीचे वजन कमी करण्यात आले. मॅचलॉकच्या अैवजी फ्लींट लॉक (Flint Lock) म्हणजे अग्नी अुत्पन्न करणारा चकमकीचा दगड आणि बंदुकीची गोळी परिणामकारक ठरावी म्हणून बंदुकीची दारू कागदाच्या वेष्टणात बंद करणे या सुधारणा घडवून आणल्यामुळे बंदूक हे अेक अत्यंत प्रभावी शस्त्र ठरले. भाल्याची लांबी पाच मिटर पासून २.५ मिटर करण्यात आली आणि

माळशीतांचे ओझे कमी करण्यात आले. स्विडनचे घोडदळ दोन प्रकारचे असे. दोन्ही प्रकारात स्विडन मध्येच पैदास केलेल्या बुंध्यापु-या आणि धष्टपुष्ट घोड्यांचीच निवड केली जात असे. परंतु पहिल्या वर्गातील घोडदळातील स्वारा-पाशी तलवार आणि पिस्तूल ही शस्त्रास्त्रे असून दुस-या वर्गातील घोडेस्वारांकडे बंदुकी असत. या दुस-या वर्गाला ड्रॅगून (Draggon) असे नाव होते. पायदळ आणि घोडदळ बरोबर स्विडनच्या सैन्यातील तोफखानाही अद्यावत करण्यात आला. तोफखान्याच्या इतिहासात प्रथमच तोफांचे दोन वर्ग करण्यात आले. पहिल्या वर्गात रणक्षेत्रामध्ये प्रसंगानुरुप हलविता येण्यासारख्या म्हणजे फिरत्या तोफा (Field Guns) दुस-या वर्गात वेढ्याच्या कामासाठी शत्रूची तटबंदी फोडून काढण्यासाठी आणि शक्यतो एकाच जागी असून भडीमार करणा-या अवजड तोफा (Siege Guns) या वापरण्यात येत. अवजड तोफांचे वजन दोन ते तीन टन असून फिल्ड गन्स एक ते एक पॉईंट पाच टनाच्या बनविल्या जात. या शिवाय चार किंवा सहा पौंडाचा गोळा फेकणा-या हलक्या तोफाही स्विडनमध्ये तयार होऊ लागल्या. साधारणपणे बंदुकीच्या सहा गोळ्या झाडण्याला जेवढा वेळ लागे तेवढ्या वेळेत तोफेचे आठ गोळे सुटले पाहिजेत असा स्विडनच्या सेनेत नियम होता. शत्रूच्या स्थानकांचे अचूक ज्ञान बनविण्यासाठी दुर्बिण आणि लष्करी नकाशे यांचा वापरही गुस्ताव्हसने सुरु केला. त्याचप्रमाणे सेनेतील सर्व अधिका-यांनी भूगोल, विज्ञान आणि राजनिती यांचा अभ्यास केला पाहिजे असा गुस्ताव्हसचा सक्त हुकूम होता.

सैन्याची सज्जता कायम ठेवण्यासाठी सैन्याच्या प्रत्येक हालचालीत कडक शिस्त राहावी म्हणून गुस्ताव्हस जातीने लक्ष देई. सैनिकांचे आणि अधिका-यांचे आरोग्य युध्दयोग्य राहावे म्हणून प्रत्येक दिवशी सक्तीचे शारीरिक शिक्षण (Physical Training) आणि कवायत (Drill) ही त्याच्या

सैन्यातील मूलभूत अंगे होती. सैनिकांना आणि अधिका-यांना वेगवेगळे गणवेष देऊन त्यांच्यामध्ये सांघिकवृत्ती, (Team Spirit) शिस्त आणि मनोधैर्य वाढावे या दृष्टीने प्रयत्न करणारा गुस्ताव्हस हा पहिला संघटक होता. प्रत्येक रविवारी अधिका-यांनी आणि सैनिकांनी प्रार्थनेसाठी चर्चमध्ये गेलेच पाहिजे असा गुस्ताव्हसचा दंडक होता. ईश्वर भक्ति आणि धर्माची उपासना ही दोन तत्वे त्याने आपल्या सैन्याच्या आचरणात कसोशीने आणली. प्रमाणाबाहेर मद्य प्राशन करणे हे सैन्यामध्ये गुन्हा समजला जाई. सैनिकांनी धर्माचा अनादर केला, लूटालूट केली किंवा स्त्रियांवर अत्याचार केले तर अशा सैनिकांना देहान्ताची शिक्षा दिली जात असे. सर्व प्रथम परमेश्वरा विषयी भक्ति बाळगून त्याच्या खालोखाल आपल्या सैनिकांची देखभाल करा असे गुस्ताव्हस आपल्या अधिका-यांना नेहमी सांगत असे. गुस्ताव्हसच्या एकंदर आचार-विचारांकडे पाहिल्यास मराठा इतिहासाच्या वाचकाला छत्रपति शिवाजी महाराजांची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. गुस्ताव्हसच्या निधनानंतर १०० वर्षांनी जन्म घेतलेल्या शिवछत्रपतींच्या आचार-विचारात गुस्ताव्हसच्याच आचारविचारांची समानता आढळते. गुस्ताव्हसने आपल्या केवळ पंधरा वर्षांच्या कारकिर्दीत स्वीडन या छोट्या राष्ट्राला एक आदर्श आणि नमुनेदार सैन्याची देणगी आपल्या प्रयत्नाने दिली. १६८१ मध्ये झालेल्या ब्रेटन फिल्डच्या लढाईत स्वीडनच्या घोडदळाने ऑस्ट्रीया आणि फ्रान्स यांच्या संख्येने दुप्पट असलेल्या संयुक्त सेनेची धूळधाण केली आणि युरोपात स्वीडनचा दरारा निर्माण केला त्याचप्रमाणे ल्यूट्झेनच्या लढाईत त्याने ऑस्ट्रीयन सैन्याचाही निर्णायक पराभव केला परंतु दुर्दैवाने याच लढाईत तोफेचा गोळा लागून गुस्ताव्हसने रणांगणातच आपला देह ठेवला.

क्रॉम्वेल आणि आधुनिक ब्रिटीश सेना

(Cromwell and the New British Army)

१६४० या वर्षी अिंग्लंड मध्ये राज्यक्रांति होअून यादवी युध्दास सुरुवात झाली. राजाची बाजू घेणारा अेक गट आणि राजसत्ता लोकांच्या मतानेच चालली पाहिजे असा आग्रह धरणारे अिंग्लंड मधील पार्लमेंट यांचा युध्द संघर्ष सुरु झाला. पार्लमेंटच्या पक्षात अत्यंत धार्मिक वृत्तीचा असलेला अेकसदस्य ऑलीव्हर क्रॉम्वेल याने पार्लमेंट पक्षास अनुकूल असलेल्या घोडदळांच्या पलटणीत कॅप्टन म्हणून आपल्या कामास प्रारंभ केला. १६४२ मध्ये झालेल्या अेजहिल येथील लढाअीत क्रॉम्वेलला युध्दाचा प्रत्यक्ष अनुभव आला. तो अेक धडाडीचा नेता असून त्याची वृत्ती धार्मिक असल्यामुळे सैनिकांना त्याच्या बद्दल आदर वाटे. या लढाअीनंतर थोड्याच दिवसात क्रॉम्वेलने घोडदळाच्या पलटणी अुभ्या करण्यास सुरुवात केली. अत्यंत कडक शिस्त आणि सतत प्रशिक्षण या दोन सूत्रांवर क्रॉम्वेल आपल्या पलटणींवर नियंत्रण ठेवीत असे. त्यामुळे त्यांना लोखंडी भिंती (Iron Sides) हे नाव प्राप्त झाले. १६४४ मध्ये झालेल्या मार्स्टनमूरच्या लढाअीत क्रॉम्वेलने राजपक्षीय पायदळाच्या बगलेवर घोडदळाचा तुफानी हल्ला करुन राजपक्षीय सेनेचा दारुण पराभव केला आणि अेक राजकीय आणि लष्करी नेता म्हणून आपले स्थान पक्के केले. या विजयानंतर अिंग्लंड मधिल सेनेची त्याने संपूर्ण पुर्नरचना केली. १००० संख्येची अेक पायदळ तुकडी, अशा पलटणी तयार झाल्या. पायदळाच्या सैनिकांना फ्लिंट लॉकने अुडविल्या जाणाऱ्या बंदूकी आणि छोट्या तलवारी देण्यात आल्या या बंदूकीची गोळी सरासरी २०० ते ४५० मिटर अंतरावर परिणामकारक ठरत असे. चिलखते आणि शिरस्त्राणे ही काढून टाकून त्याअैवजी बंदगळ्याचे लालकोट (Red Tunich) आणि हॅट हा सैनिकांचा गणवेश ठरला हाच गणवेश पहिल्या महायुध्दापर्यंत ब्रिटिश सैन्याला लागू होता. घोडदळामध्ये ६०० घोडेस्वारांचा अेक रिसाला असे ११ रिसाले बनविण्यात आले.

घोडेस्वारास बंदूक आणि तलवार अशी दोन्ही हत्यारे देण्यात आली. तोफखान्यामध्येही सुधारणा करण्यात आल्या. या तोफांचा जास्तीतजास्त टप्पा २०० ते ५०० मिटर पर्यंत असे त्याच प्रमाणे वेढ्याच्या कामासाठी अवजड तोफा ही तयार करण्यात आल्या. या पुर्नरचनेनंतर सुधारित अशा ब्रिटीश सेनेला नवीन नमुनेदार सेना (The New Model Army) असे नाव प्राप्त झाले आणि लवकरच या सेनेचा सरसेनापती म्हणून क्रॉमवेलने सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. १६४८ ते ५१ च्या दरम्यान नेसबी, प्रेस्टन आणि वर्सेस्टर या ठिकाणी झालेल्या तिन्ही लढायात क्रामवेलच्या मॉडेल सेनेने राजमतीय सेनेचा दणदणीत पराभव केला या विजयानंतर राजकीय सत्तेची सूत्रेही आपल्या हातात घेऊन आपल्या निधना पर्यंत (१६५८) क्रॉमवेलने इंग्लंडचा सर्वसत्ताधिश म्हणून आपली कारकिर्द गाजविली. क्रॉमवेलच्या निधनानंतर १६६० ते १७०० या ४० वर्षाच्या काळात इंग्लंडने आपले लक्ष नौसेनेच्या विकासाकडे वळविले. इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस याने प्रमुख ठिकाणी लढाऊ जहाजे बांधण्याच्या गोदी (Dock Yards) स्थापन केल्या त्यामुळे १६८०च्या सुमारास इंग्लीश नौसेनेत २१० लढाऊ जहाजे सज्ज झाली. या नौसेनेस राजाने शाहीनौसेना (The Royal Navy) असे नाव दिले. नौसेनेकरिता परिक्षा घेऊन अधिकारी आणि नौसैनिक भरती करण्याची पध्दत याच वेळी सुरु झाली. त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांनी आणि नौसैनिकांनी कमीत कमी किती वर्षे सेवा केली पाहिजे यासंबंधी नियम ठरवून देण्यात आले. अशा रितीने स्थलसेने प्रमाणे नौसेनेतही व्यवसायिक दल (Professional Force) निर्माण झाले.

१७व्या शतकातील युध्दशास्त्राची प्रगति

(Development of Warfare in the 17th Century)

१७व्या शतकात युध्दशास्त्राच्या दृष्टीने घडलेल्या घटनांमध्ये सैन्यदलाची

वाढती संख्या, त्यांच्यावरील अेकतंत्री नियंत्रण, सैन्याच्या व्यवस्थापनाचा दर्जा, सैन्याची भिन्न संघटना आणि लढाअी पेशा बचावावर अधिक भर या प्रमुख म्हणून सांगता येतील. या काळात फ्रान्सचा राजा १४वा लुअी याने लढाअीचे महत्वाकांक्षी धोरण पुढे ठेवून आपल्या राज्याच्या सीमा चारी दिशांनी वाढविण्यास प्रारंभ केला. सुदैवाने त्याला सैन्याच्या विविध विभागातील अनेक तज्ञ मंडळींचे सहकार्य अुपलब्ध झाले. कोल्बोर्ट आणि लेव्हॉ हे सैन्याच्या व्यवस्थापनेतले विशारद, कॉन्डे आणि ट्यूरेन हे असामान्य संघटक आणि युध्दशास्त्रज्ञ आणि लष्करी अभियांत्रिकी ज्ञानाचा जनक सेबेस्टीन व्हॉबन या त्या त्या क्षेत्रातील तज्ञ नेत्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे फ्रान्सची लष्करी सत्ता अत्यंत प्रबळ बनली. फ्रान्स हे राष्ट्र कॅथॉलिक पंथानुयायी असलेल्यामुळे ऑस्ट्रिया या दुसऱ्या कॅथॉलिक पंथीय राष्ट्राशी त्याने अेकजूट केली. त्यामुळे साहजिकच प्रॉटेस्टंट पंथाचा [illegible] पुरस्कार करणारे अिंग्लंड आणि हॉलन्ड यांची अेकजूट होअून फ्रान्सच्या वाढत्या लष्करी वर्चस्वाला आणि प्रादेशिक आक्रमणाला आव्हान देणे त्यांना भाग पडले. अशा या बहुराष्ट्रीय प्रॉटेस्टंट सेनेचे अधिपत्य १६७५ पासून पुढील २५ ते ३० वर्षे ब्रिटीश सेनेचा सेनापती जॉन चर्चिल अुर्फ ड्यूक ऑफ मार्लबरो याच्याकडे आले.

या काळात जवळजवळ सर्व पश्चिम युरोप आणि मध्य युरोप आणि त्यातल्या त्यात विशेषतः ऱ्हाअीन आणि डॅन्यूब या मोठ्या आणि महत्वाच्या नद्यांची खोरी हीच प्रमुख रणक्षेत्रे बनली हा संघर्ष प्रादेशिक स्वरुपाचा नसल्यामुळे आणि त्याचे मूळ कॅथॉलिक आणि प्रॉटेस्टंट या दोन अेकाच धर्माच्या पंथामध्ये असल्यामुळे संबंधीत भाग घेणाऱ्या सेना अनेक राष्ट्रातील सैनिकांमधून बनलेल्या असत. अुदा. खि.स. १७०० मध्ये संमिश्र सेनांचे नेतृत्व करून ४०,००० सैन्य जवळ बाळगणाऱ्या मार्लबरोच्या सैन्यात फक्त १८००० ब्रिटीश सैनिक होते आणि बाकीचे २२०००

युरोपातील इतर प्रॉटेस्टंट राष्ट्रातील सैनिक होते. युध्दशास्त्राच्या कक्षा वाढल्यामुळे सेनेची गतिमानता हा अेक निर्णायक घटक ठरला आणि त्यामुळेच घोडदळाला मध्ययुगीन काळासारखेच अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले. याच काळात किल्ले बांधणीच्या तंत्रासही व्हॉबन या गणितशास्त्र तज्ञ असलेल्या लष्करी अभियांत्रिकी नेत्याने किल्ले आणि तटबंदी बनविण्याचे नवीन तंत्र प्रस्थापित केले. संपूर्ण दगडाच्या तटबंदीवर तोफेचा भडीमार केला तरी त्याच्यावर विशेष परिणाम होत नसे तोफेतून उडणाऱ्या ठिकऱ्यांनी आपल्याच सैनिकांचे नुकसान होत असे. हे टाळण्यासाठी मातीचे थरावर थर देऊन त्याची अभेद्य अशी तटबंदी बांधण्याचे नवीन यंत्र व्हॉबनने प्रत्यक्षात आणले. भारतात असलेल्या अनेक किल्ल्यांपैकी संपूर्ण मातीची तटबंदी असलेला असा अेकच किल्ला अस्तीत्वात होता आणि तो म्हणजे भरतपूरचा किल्ला होय. १८०४ ते १८२६ या २२ वर्षांच्या काळात ब्रिटीश सेनेने भरतपूरच्या किल्ल्यावर तीन वेळा हल्ले केले परंतु ते असफल ठरले चौथ्या हल्ल्याच्या वेळी तटबंदीचा भंग झाला म्हणून नव्हे तर किल्ल्यात असणाऱ्या लोकांच्या फदफितुरीमुळे किल्ला ब्रिटीशांच्या स्वाधीन झाला. व्हॉबनच्या किल्ला बांधणीच्या तंत्रातील दुसरे अेक प्रमुख सूत्र असे की त्याच्या बांधणीत केवळ चार दिशांना चार बुरुज नसून चारी दिशांना अनेक ठिकाणी थोड्या थोड्या अंतरावर बुरुज बांधून आणि हे बुरुज गोलाकृति न ठेवता त्रिकोणाकृती बांधून त्रिकोणाचे टोक बाहेर आणि दुसरी दोन टोके आत अशा पध्दतिची बुरुज बांधण्याची प्रथा त्यानेच सुरु केली. त्रिकोणाकृती बुरुज बांधण्यामागे त्याची भावना अशी होती की त्रिकोणाच्या बाहेरील टोकांवर शत्रूच्या तोफांचा भडीमार निकामी करावा आणि त्रिकोणाच्या कोणत्याही अेका भागावर भडीमार झाल्यास दुसऱ्या भागातील तोफांनी शत्रूच्या तोफांना प्रत्युत्तर देण्यासाठी अधिक ताकद मिळावी. अशातऱ्हेने बांधलेल्या अनेक किल्ल्यांचे अवशेष पश्चिम व मध्य युरोपात आणि विशेषतः

फ्लँडर्स मध्ये आन्ही आढळून येतात.

कॅथॉलिक आणि प्रॉटेस्टंट पंथीय राष्ट्रे यांच्यातील संघर्ष १६९० ते १७१० पर्यंत पश्चिम आणि मध्य युरोपात सुरू होता. या संघर्षाचा खरा शेवट १७०४ मध्ये झालेल्या ब्लेनहिमच्या घनघोर लढाईने झाला. या वेळी मार्लबरोची प्रॉटेस्टंट पंथीय सेना ४०,००० संख्येची असून फ्रान्स आणि इतर अनुयायी राष्ट्रे यांची सेना १७००० पर्यंत होती. दोन्ही सेनादलात घोडदळाचा भरणा मोठ्या प्रमाणात होता. हॉलण्ड पासून सुरुवात करून मार्लबरोची सेना मजल दरमजल करीत ऱ्हाईन नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर येऊन पोहोचली. तेथे आल्यावर ऱ्हाईन नदी ओलांडून आपण पूर्व किनाऱ्यावर जाणार आहोत असा आभास निर्माण करण्यासाठी नदीवर त्याने बोटींचा पुल उभारण्याचे काम सुरू केले. त्यामुळे साहजिकच प्रतिस्पर्धी सेना मोठ्या संख्येने नदीच्या पूर्व किनाऱ्यावर गोळा होऊ लागली. अशा अवस्थेत अचानक योजना बदलून मार्लबरोच्या सेनेने दक्षिणेकडे असलेल्या डॅन्युब नदीच्या दिशेने आगेकूच करून डॅन्यूबच्या उत्तर तीरावर ब्लेनहिम या गावाजवळ आपली स्थानके मजबूत केली. या अचानक कारवाईमुळे गोंधळून गेलेल्या फ्रेंच सेनेला परत डॅन्यूब नदीकडे धाव घ्यावी लागली आणि त्यामुळे झालेल्या गोंधळात युध्दसज्ज असलेल्या मार्लबरोच्या सैन्याने प्रतिस्पर्धी सेनेवर चौफेर हल्ला चढविला आणि या मार्लबरोची सेना फ्लॅन्डरकडे परत फिरली. परंतु त्याच्या पाठोपाठ फ्रेंच सेनेने वाटाघाटी बंद केल्यामुळे रामिलीस (१७०६) आणि माल्प्लॉकेट (१७०९) या दोन ठिकाणी प्रॉटेस्टंट आणि कॅथॉलिक पंथीय सेनांची पुन्हा चकमक उडून फ्रेंच सेनेला पराभव पत्करावा लागला. ब्लेनहिमच्या लढाईत मार्लबरोने वापरात आणलेली युध्दनिती ही अप्रत्यक्ष युध्दनितीच्या (Strategy of Indirect Approach) तत्वावर होती.

मॉरीस दे सॅक्स आणि महान फ्रेडरीक

(Maurice de Saxe and Frederick the Great)

अठराव्या शतकात म्हणजे १७०१ पासून ते १८०० पर्यंत युध्दशास्त्रात संघटना आणि युध्दनिती या दृष्टीने बरीच प्रगति झाली. या संबंध शतकात फ्रान्सच्या राजकीय आणि लष्करी सत्तेमध्ये अमित वाढ झाल्यामुळे जवळजवळ शतकभर इंग्लंड आणि फ्रान्स या दोन आघाडीच्या राष्ट्रांमध्ये संघर्ष होत राहिला. या संघर्षाचे युरोपातील दृश्य स्वरुप म्हणजे १७५६ ते १७६३ या सात वर्षांच्या काळात झालेले सप्त वार्षिक युध्द (Seven Years War) हे होय. हा इंग्रज फ्रेंच संघर्ष फक्त युरोपातच मर्यादित न राहता भूमध्य समुद्र, पश्चिम आफ्रिका आणि भारत अशा तिन्ही खंडात चालू राहिला. फ्रेंच युध्दशास्त्रामध्ये युध्दशास्त्रीय दृष्ट्या तात्विक भर घालणारा फ्रेंच सेनानी म्हणजे मॉरीस दे सॅक्स हा होय. त्याने युध्दशास्त्रावर "माझ्या आठवणी" (Mes Reveries) या नावाचा ग्रंथ लिहीला. किल्ले आणि तटबंदी यामध्ये बसून बचावात्मक पवित्रा घेण्याच्या युध्दनितीचा तो कट्टर विरोधक होता. तो म्हणत असे की एखादी टेकडी किंवा नदी अशी नैसर्गिक बचाव क्षेत्रे शोधून अशा क्षेत्रातच शत्रूला खेचून आणून त्याचा पराभव केला पाहिजे. या उद्देशा करिता त्याने तीन सूत्रांवर जास्त भर दिला. ती सूत्रे म्हणजे जलद अशी हालचाल (Rapidity of Movement), सोयीस्कर हालचाली (Easy Manouver) आणि सज्ज अशी पुरवठा यंत्रणा ही होत. (Efficient Supply) सेनेची संख्या अवाढव्य ठेवण्यापेक्षा सेनेमध्ये अधिकाधिक ४०,००० ते ५०,००० सैनिक असावे असा त्याचा आग्रह होता. सैन्यामध्ये पायदळ, घोडदळ आणि तोफखाना यांचे संतुलित प्रमाण राखून त्यांना जड शस्त्रास्त्रे न देता हलक्या वजनाची शस्त्रास्त्रे द्यावीत

असे त्याचे मत होते. शत्रू आपल्यावर हल्ला करेल याची वाट न पाहता आपण शत्रूला कुठे आणि कसे गाठू शकू या गोष्टीचा विचार सेनापतीने नेहमी केला पाहिजे असे त्याचे मत होते. शत्रूच्या कमजोर भागाचा शोध घेऊन त्या ठिकाणी आपली शक्ती केंद्रीत करावी आणि मग शत्रूवर अेक जबरदस्त धडक मारावी या तत्वाचा तो पुरस्कर्ता होता. सैन्याचे प्रशिक्षण आणि सैन्यामध्ये आवश्यक असणारी कडक शिस्त यावर त्याचा विशेष जोर होता. १७४० मध्ये फ्रेंच सेनेच्या तुकड्या घेऊन त्याने सध्याच्या झेकोस्लोव्हाकीया मधील प्राग या शहरावर रात्रीच्या वेळी अचानक हल्ला केला. आणि तेथे असणाऱ्या ऑस्ट्रीयन सैन्याची धूळधाण करुन प्राग शहर फ्रान्सच्या अमलाखाली आणले त्याचप्रमाणे १७४२ मध्ये फॉन्टेनॉय या ठिकाणी ब्रिटीश सैन्याची कोंडी करुन तिचा पराभव केला. सॅक्सच्या या विजयानंतर आणि त्याच्या युध्दशास्त्राच्या ग्रंथामुळे सर्व युरोपभर त्याने फ्रेंच सेनेचा दरारा निर्माण केला.

या सुमारास सध्याच्या जर्मनीमध्ये प्रशिया हे राष्ट्र उदयाला आले. १७४० मध्ये दुसरा फ्रेडरीक याने प्रशियन राजसत्तेची सूत्रे राजा म्हणून हाती घेतली याला च महान फ्रेडरीक (Fredrick the Great) असे नाव अितिहासाने दिले आहे. प्रशियन राज्याच्या भोवती चार विरोधी सत्तांचा गराडा पडला होता, पश्चिमेकडे अिंग्लंड व फ्रान्स, दक्षिणेकडे ऑस्ट्रीया आणि पूर्वेकडे रशिया ही ती चार राष्ट्रे होत. या चार राष्ट्रांच्या सेनांविरुध्द आपल्याला अेकाच वेळी लढता येणार नाही याची फ्रेडरीकला पूर्ण जाणीव होती म्हणून अंतर्गत पुरवठा यंत्रणेचा (Advantages of Interior Lines) पुरेपूर फायदा घेण्यासाठी त्याने सोयीची अशी युध्दनिती वापरली. अेका वेळी जलद हालचाली करुन अेका शत्रूवर जोरदार हल्ला करावा आणि त्याला पराभूत करुन आपली युध्द यंत्रणा ताजीतवानी करण्यासाठी थोडा अवधी देऊन पुन्हा विरुध्द दिशेला असलेल्या

दुस-या अेखाद्या शत्रूवर हल्ला करावा असे त्याचे तंत्र होते. युध्दामध्ये शत्रूचा केवळ पराभव करून गप्प न बसता किंवा केवळ शत्रूचा प्रदेश अंकित करून त्या मध्ये वेळ न काढता शत्रू सैन्याचा संपूर्ण नाश केला पाहिजे हे फ्रेडरीकच्या युध्दनितीचे प्रमुख सूत्र होते. या सूत्रांवर आधारीत अशी फ्रेडरीकची युध्दनिती आक्रमक स्वरूपाची होती त्यामुळे १७५७ च्या नोव्हेंबर मध्ये रॉसबाक या ठिकाणी झालेल्या लढाईत फ्रेडरीकच्या सैन्याने त्याच्या तिप्पट असलेल्या फ्रेंच आणि ऑस्ट्रीयन संयुक्त सेनेचा सपशेल धुव्वा उडविला. त्यानंतर लगेच अेक महिन्याने या दोन्ही संयुक्त सेनेला सायलेशिया मधील ल्यूथेन या ठिकाणी गाठून त्याने त्यांच्यावर निर्णायक विजय मिळविला. ल्यूथेनच्या लढाईत फ्रेडरीकने मिळविलेला विजय म्हणजे उत्कृष्ठ हालचाली, चपळ डावपेच आणि अतूट निश्चय या तिन्हींचा अेक नमुनाच होय असे खुद्द नेपोलियनने या लढाईबद्दल विवेचन करतांना सांगितले आहे.

फ्रेडरीकच्या निर्णायक विजयाचे मुख्य कारण म्हणजे त्याची युध्द सज्ज सेना ही होय. राज्यावर येताच फ्रेडरीकने आपल्या सैन्याची संख्या १८००० वरून ९०,००० पर्यंत वाढविली. लढाई चालू नसतांना त्याचे सैनिक सरावा करीता अनेक मैलाची रपेट आणि घोडदौड करीत असत. शिस्त आणि कवायत ही अत्यंत उच्च दर्जाची असल्याशिवाय कोणतीही सेना लढाईत विजयी होवू शकणार नाही असे फ्रेडरीकचे मत होते. त्याच्या सैन्यात पायदळाचा भरणा जास्त असून त्यांच्याकडे बंदूक हे प्रमुख शस्त्र असे. परंतु बंदुकीमध्ये फ्रेडरीकने केलेली सुधारणा म्हणजे बंदुकीला जोडता येण्यासारखी संगीन (Bayonet) ही होय. त्याचप्रमाणे बंदुकीची दारू मझल मध्ये ठासून भरण्यासाठी लाकडी दस्त्या (Ramzod) अैवजी लोखंडी दस्ते वापरावे अशी प्रथा फ्रेडरीकने सुरू केली. त्याच्या घोडदळात उंचपुरे घोडे घेतले जात. तोफखान्यामध्ये तोफांचे वजन कमी करून रणांगणामध्ये

तोफांची हालचाल घोड्यांच्या गाडीतून (Horse Artillery) व्हावी असा त्याचा हुकूम होता. अशा रितीने अेक अत्यंत युध्दसज्ज अशी शक्तीशाली सेना निर्माण करून युरोप मधील राजकीय आणि लष्करी रंगमंचावर फ्रेडरीकने प्रशियाचे स्थान अभेद्य करून ठेवले.

१८व्या शतकात झालेल्या दोन अैतिहासिक घटना म्हणजे १७७७ मध्ये झालेली अमेरिकन राज्यक्रांति आणि त्याच्या पाठोपाठ १७८९ मध्ये झालेली फ्रेंच राज्यक्रांति या होत. या राजकीय घटनांचा युध्दशास्त्रावर देखील दूरगामी परिणाम झाला. या दोन्ही क्रांतिमध्ये सामान्य जनतेचा प्रस्थापित सत्तेविरुध्द विजय हे प्रमुख सूत्र होते. त्यामुळे साहजिकच या दोन घटनांनंतर सर्व राष्ट्रांच्या सेनादलांवर लक्षणीय परिणाम झाला. सरदार, सरंजामदार यांच्या पदरी असणारे सैन्य संपुष्टात आले आणि सामान्य माणसाला वाव देणा-या पायदळाला (Infantry) सैन्यामध्ये मानाचा दर्जा मिळाला. त्याचप्रमाणे अवजड बंदूकी आणि तोफा या हळू हळू कमी होत जाऊन त्यांचे ठिकाणी हलक्या बंदूकी आणि हलक्या तोफा वापरात येऊ लागल्या.

नेल्सन, नेपोलीयन आणि वेलिंग्टन

(Nelson, Napolean and Wellington)

नेल्सन

१८ व्या शतकाचा बहुतेक काळ अिंग्लंड आणि फ्रान्स यांच्या संघर्षात गेला आणि फ्रान्सची लष्करी सत्ता सर्वसाधारणपणे अिंग्लीश लष्करी सत्तेपेक्षा वरचढ ठरली. या शतकाच्या शेवटच्या दशकात मात्र म्हणजे १७९२ पासून अिंग्लंडच्या नौसेनेत मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात आल्या आणि त्याचा परिणाम म्हणूनच

१९व्या शतकाच्या प्रारंभात सागरांवर अिंग्लंडला निर्विवाद प्रभुत्व मिळाले. १७४९ मध्ये ॲडमिरल ॲन्सन याची ब्रिटीश नौदलाचा प्रमुख म्हणून नियुक्ती झाली. त्याने आपल्या १७ वर्षांच्या कारकीर्दीत नौदलाचा विकास व्हावा या दृष्टीने अनेक सुधारणा घडवून आणल्या. डॉक्यार्डची संघटना सुधारून मोठ्या लढाऊ जहाजांबरोबरच फ्रिगेट (Frigate) या लहान लढाऊ जहाजांची निर्मिती प्रथमच सुरू झाली आणि त्यामुळे कालांतराने पुढील २० वर्षांत ब्रिटीश नौसेनेमध्ये १०० युध्दसज्ज जहाजे तयार झाली. नौसेनेचे अधिकारी आणि सैनिक यांच्या भरतीचे काटेकोर नियम त्याने चालू केले, सागराच्या युध्दनितीलाही त्याने नवीन दिशा दिली. अिंग्लंडच्या प्रतिस्पर्धी असलेल्या फ्रेंच नौसेनेची युध्दनिती सामान्यपणे बचावात्मक होती. सागरावर प्रत्यक्ष लढाई न करता आपल्या व्यापारी जहाजांचे समुद्रमार्ग (Sea Lanes) सुरक्षित ठेवणे हेच फ्रान्सच्या युध्दनितीचे प्रमुख सूत्र होते. याउलट ब्रिटीशांची सागरावरील युध्दनिती सर्वस्वी आक्रमक स्वरूपाची होती. फ्रान्सचे सागरावरील व्यापारी मार्ग तोडून व्यापारी जहाजांचा नाश करावा आणि फ्रान्सच्या लढाऊ जहाजांबरोबर सागरावर लढाई करून त्यांचे नुकसान करावे अशा दुहेरी अुद्देशाने ब्रिटीश नौसेना काम करीत असे. प्रत्यक्ष सागरी लढाई मध्ये अनुरेखेच्या संचाराचा (Line Ahead Formation) वापर ॲन्सने सुरू केला. त्याने केलेली सर्वात अैतिहासिक गोष्ट म्हणजे अशक्त प्रकृतीच्या परंतु अत्यंत तडफदार अशा होरॅशिओ नेल्सन या तरुण अधिका-याची महत्त्वाच्या जागेवर केलेली नियुक्ती ही होय. १७९७ मध्ये फ्रेंच नौसेने विरुध्द झालेल्या केपसेंटव्हिन्सेंटच्या लढाईत नेल्सनने आपल्या जहाजाची केलेली हालचाल अितकी यशस्वी ठरली की त्याने केलेल्या अनपेक्षित आणि अचानक कारवाईमुळे फ्रेंच नौसेनेचा निर्णायक पराभव झाला. पुढील ८-९ वर्षांत नेल्सनच्या नेतृत्वाखालील अिंग्लीश नौसेनेने फ्रेंच नौसेनेचा अनेक ठिकाणी

पराभव केला. पण ज्या लढाईमुळे नेल्सनचे नाव अितिहासात अजरामर झाले ती म्हणजे १८०५ च्या आक्टोबर मध्ये उत्तर समुद्रात झालेली (North Sea) ट्रॅफलगारची लढाई ही होय. या लढाईत फ्रेंच लढाऊ जहाजांच्या लाईन-मध्ये मुसंडी मारुन ब्रिटीश आरमाराचा तांडा पुढे सरकला आणि पुन्हा माघार घेऊन फ्रेंच लाईनवर त्याने संघटित हल्ला केला. (Melee) ही लढाई नौसेनेने जिंकली तरी लढाईचे नियंत्रण करणाऱ्या खुद्द नेल्सनला शत्रूच्या बंदुकीची गोळी लागून नेल्सन स्वतः ठार झाला. या लढाईत मिळालेल्या विजयामुळे अिंग्लीश नौसेनेचे सागरी प्रभुत्व निर्विवाद झाले आणि त्यात आघात झालेली फ्रेंच नौसेना पुन्हा १०० वर्षे डोके वर काढू शकली नाही. विडांच्या जहाजाने लढलेली ट्रॅफलगारची लढाई ही शेवटचीच लढाई होय.

नेपोलियन

१७८९ साली झालेल्या फ्रेंच राज्यक्रांती नंतर फ्रान्स मध्ये निर्माण झालेल्या रिपब्लिक शासनाने नव्या फ्रेंच सेनेची उभारणी केली. इ.स.१७९९ मध्ये याच रिपब्लिक सेनेचा प्रमुख म्हणून त्यावेळी ब्रिगेडियर या हुद्यावर असलेल्या नेपोलीयन बोनापार्ट या हुशार आणि कर्तबगार सेनाधिकाऱ्याची नियुक्ती झाली आणि त्याला लेफ्टनंट जनरल या हुद्याची बढती देण्यात आली. नेपोलीयन हा तोफखान्याचा अधिकारी असून यावेळी त्याचे वय फक्त २६ वर्षाचे होते. युध्दनिती आणि युध्दव्यवहार या दोन्हीमध्ये अेक अत्यंत निष्णात अधिकारी म्हणून त्याने नाव मिळविले होते. तल्लख बुध्दिमत्ता, अमाप काम करण्याची सवय आणि निरलसी स्वभाव या तीन गुणांमुळे सैनिकांचे मनोधैर्य वाढविण्यास तो अतिशय यशस्वी ठरत असे. त्याच्या युध्दनितीची मुख्य सूत्रे म्हणजे लांब अंतरावर जलद गतिने जाणे, प्रसंग ओळखून त्याप्रमाणे जरूर त्या हालचालीविना विलंब

करणे आणि शत्रूच्या कमजोर आघाडीवर सर्वशक्ती अेकत्रीत करून निर्णायक हल्ला चढविणे ही होत. लढाअीचे भवितव्य ठरविणारा नेमका क्षण कोणता याची अचूक पारख नेपोलीयनला होती. कोणत्याही लढाअीचे अुद्दिष्ट ठरवितांना त्या लढाअीमुळे केवळ लष्करी दृष्टया नव्हे तर राजकीय दृष्टया सुध्दा कोणते दूरगामी परिणाम होतील याची जाणीव ठेवणारी विशाल दूरदृष्टी नेपोलीयनपाशी होती. या सर्व अनन्यसाधारण गुणांमुळे लष्करी अितिहासातील अेक असामान्य युध्दनेता म्हणून त्याची किर्ती सर्वत्र झाली.

नेपोलीयनच्या सैन्यात पायदळाला फार मोठे महत्व प्राप्त झाले. त्याचे पायदळ रणक्षेत्रात संचार करतांना मुख्यतः दोन प्रकारांनी संचार करीत असे. अेका सरळ आडव्या रेषेमध्ये अेका मागे अेक अशा तीन ओळी (Line Formation) अशा कांही तुकडया रणक्षेत्रात संचार करीत. त्यांच्यामागे अेकामागे अेक अुभ्या अशा तीन ओळी (Column Formation) संचार करीत. आगेकूच करीत शत्रूला तोंड देतांना नेपोलीयनने अेक विशेष असे तंत्र वापरात आणले. लढाअीच्या आघाडीवर पायदळ आणि घोडदळाच्या १००।१०० च्या भिन्न टोळ्या संपूर्ण आघाडीवर वारंवार हल्ले करून शत्रू आघाडीला संत्रस्त करीत (Skirmishing) त्यांच्या मागून येणा-या लाअीन फॉरमेशनच्या तुकडया समोरच्या शत्रूवर बंदुकीचा गोळीबार करून शत्रूच्या आघाडीवर गोंधळ अुडवून देत. याच वेळी या तुकडयांच्या अुजव्या आणि डाव्या बगलेवर असलेल्या घोडदळाच्या तुकडयाही शत्रू सैन्यावर बंदुकीच्या गोळ्यांचा तुफानी वर्षाव करीत. अशा रितीने शत्रू सैन्याचा समतोल (Balance) पूर्णपणे बिघडला कि त्याच क्षणी मागाहून येणा-या कॉलम फॉरमेशनच्या तुकडया शत्रू सैन्यावर जोरदार धडक मारून शत्रूच्या आघाडीची फळी मोडून काढीत. (Break Through) फ्रेंच पायदळाकडे फ्लिंट लॉक बंदुकी आणि त्याला जोडलेल्या संगिनीही असत आताच्या मानाने गोळीबाराचा

वेग अत्यंत कमी म्हणजे अेका मिनीटाला दोन गोळ्या असा होता आणि या गोळीच्या माराचा टप्पा जास्तीतजास्त २०० मिटर अेवढाच होता. दूर अंतरावर जलद वेगाने सतत संचार करणे आवश्यक असल्यामुळे पायदळाच्या खालोखाल नेपोलीयनच्या सैन्यात घोडदळाचे महत्व होते. घोडदळाची विभागणी नेपोलीयनने दोन वर्गात केली. मुख्यतः टेहळणी (Reconnaissance) करुन नाअीलाज झाल्यास लढाअी करणा-या तुकड्यांना हलके घोडदळ (Light Cavalry) असा दर्जा असून त्यांना हुसार्स (Hussars) असे नाव दिले गेले. या उलट भारी घोडदळात (Heavy Cavalry) घोडेस्वारांना चिलखत देण्यात येत असून त्यांच्या जवळ तलवारी आणि बंदूक अशी दोन्ही शस्त्रे असत या घोडदळाला क्यूरेझिअर्स (Cuirassiers) किंवा ड्रॅगून्स (Dragoons) असे म्हणत. लढाअीमध्ये अेकत्रीत अशा भारी घोडदळाच्या अनेक तुकड्या शत्रूची आघाडी तोडण्यासाठी निकराचा हल्ला (Charge) चढवित. स्वतः तोफखान्याचा अधिकारी असल्यामुळे तोफखान्याचा कौशल्यपूर्ण वापर कसा करावा या बद्दल नेपोलीयनने अेक नवीन तंत्र वापरात आणले. नेपोलीयनच्या पूर्वी बहुतेक राष्ट्रातील तोफखान्याच्या तोफा शत्रूच्या संपूर्ण आघाडी विरुध्द तोफगोळ्यांचा भडीमार करीत असत. तोफखान्याच्या वापराची ही पध्दत नेपोलीयनने बंद केली आणि शत्रूच्या आघाडीचा कमजोर भाग कोणता हे ठरवून फक्त त्याच भागावर अेकत्रित तोफखान्याची तुफानी गोळाबारी करावी ही नवी पध्दत फ्रेंच तोफखान्यात त्याने रुढ केली. या सर्व सुधारणांमध्ये ब्रिगेड या संघटनेच्या वरती १५००० ची अेक डिव्हीजन आणि डिव्हजनच्या वरती ४०००० चे अेक कोअर अशी सैन्याची कुच संघटना यांचा प्रारंभ प्रथम नेपोलीयननेच केला.

वेलींग्टन

नेपोलीयनच्या युध्दनितीचे मुख्य सूत्र अप्रत्यक्ष पवित्रा (Strategy of Indirect Approach) हेच होते. १७९६-९७ मध्ये झालेल्या मान्टूआ आणि रिव्होली येथे अिटालियन सेनेविरुध्द झालेल्या लढाया, १८०५ आणि ६ या वर्षात ऑस्ट्रियन सेनेविरुध्द झालेल्या ऑस्टरलिट्झ आणि जेना येथील लढाया आणि १८०९-१० मध्ये रशिया विरुध्द झालेल्या वाग्राम टॉरीस्पार्न येथील लढाया या सर्व लढाया शत्रू सैन्याला आघाडीवर गुंतवून ठेवीत शत्रूच्या बगलेवर किंवा शत्रूच्या मागे दूरवर जाऊन अचानक हल्ला करविणे हेच मुख्य सूत्र होते. आपल्या लष्करी मोहिमपैकीच्या अुत्तरार्धात मात्र नेपोलीयनच्या शत्रूंनी नेपोलीयनची युध्दनिती त्याच्यावरच अुलटविली. त्याच्याच तंत्राचा अुपयोग करून पोर्तुगालच्या मोहिमेत (Peninsular War) अिंग्लंडने आणि पुढे रशियावरील स्वारीत रशियाने नेपोलीयनला माघार घेण्यास भाग पाडले. नेपोलीयनची अखेरची लढाअी म्हणजे १८१५ च्या जून मध्ये झालेली वाटर्लूची लढाअी होय या लढाअीत अिंग्लंड आणि प्रशिया यांच्या दोस्त सेनेचा सरसेनापती आर्थर वेलस्ली अुर्फ ड्यूक ऑफ वेलींग्टन हा होता. वेलींग्टनची सर्व लष्करी सेवा भारतात झालेली होती. त्यावेळी तो अीस्टअिंडिया कंपनीच्या सेनेचा प्रमुख असून १८०५ आणि ६ मध्ये असअी आणि अरगांव येथे झालेल्या अैतिहासिक लढायात शिंदे आणि होळकर यांच्या संयुक्त सेनांचा त्याने निर्णायक पराभव केला होता. त्यानेच पुढे पेनिन्सूलर युध्दात नेपोलीयनला पोर्तुगाल मधून माघार घेण्यास भाग पाडले. शेवटी वाटर्लू येथेही नेपोलीयनचा प्रमुख प्रतिस्पर्धी म्हणून तोच रणांगणात अुतरला. फिल्ड मार्शल मॉन्टगोमरी यांनी म्हटल्याप्रमाणे वेलींग्टनची युध्दनिती ही नेपोलीयनच्या युध्दनितीपेक्षा विरुध्द अशी होती. नेपोलीयन हा नेहमी आक्रमक युध्दनितीचा

पुरस्कार करे तर या अुलट वेलींग्टन हा बचावात्मक युध्दनितीचा पुरस्कर्ता होता असे असले तरी बचावात्मक पवित्रा कायम ठेवून प्रत्यक्ष लढाओीत शत्रूचा जोर कमी झाला असे आढळल्यास ताबडतोब कोणताही विलंब न करता शत्रूसेनेवर तो आक्रमक वृत्तीने तुटून पडत असे. असओीच्या लढाओीत मराठ्यांविरुध्द हेच तंत्र त्याने वापरले आणि पुन्हा याच तंत्राचा वापर करून वाटर्लु जवळील टेकड्यांवर नेपोलीयनच्या सैन्याचा त्याने निर्णायक पराभव केला. जगाच्या अितिहासाला कलाटणी देणा-या या अितिहास प्रसिध्द विजयामुळे नेपोलीयन बरोबरच वेलींग्टनचे नावही लष्करी अितिहासात अजरामर झाले. पुढे त्याने ड्यूक ऑफ वेलींग्टन या नात्याने ब्रिटीश पार्लमेंटच्या अुच्च सभागृहात प्रवेश केला आणि १८२२ मध्ये तो अिंग्लंडचा पंतप्रधान झाला.

भारतातील युध्दशास्त्राची प्रगति १५०० ते १८१८

(Evlution of Warfare in India - 1500 - 1818)

अि.स. १५०० ते १८१८ हा ३१८ वर्षांचा काळ भारतामध्ये युध्दशास्त्राच्या दृष्टीने पहिल्या १५०० वर्षाच्या तुलनेने फार महत्त्वाचा मानावा लागेल. अि.स. ७१२ पासून ते अि.स. १४०० पर्यंत महंमदबीन कासीम, गझनीचा महंमद आणि अल्लाअुद्दीन खिलजी या अिस्लामी आक्रमकांनी भारतावर आक्रमण करून घोडदळाच्या जोरावर भारतातील अनेक स्थानिक राजा-महाराजांचा पराभव केला व त्यांच्यावर विजय मिळविला. तरीदेखील भारतामध्ये कायमस्वरुपाचे राज्य ते स्थापन करू शकले नाहीत परंतु १६ व्या शतकात ही आतापर्यंत चालत आलेली प्रथा मोडली. अि.स. १५२६ मध्ये तुर्की आणि मोगल वंशाच्या जलाउद्दीन महंमद बाबर या अिस्लामी आक्रमकाने खैबर खिंडीच्या मार्गाने भारतात प्रवेश करून दिल्लीच्या दिशेने घोडदौड चालू ठेवली त्यावेळी दिल्लीत लोदी घराण्याचा

अिब्राहीमखान लोदी याची राजवट चालू होती. बाबराचा मार्ग अडविण्यासाठी जवळजवळ ५०,००० ची सेना घेऊन अिब्राहीम खानाने यमुना नदी ओलांडली. त्याच्या या सैन्यात जवळजवळ १०० हत्ती २०,००० घोडदळ, १०,००० पायदळ आणि कांही तोफखाना यांचा समावेश होता. यामुळे बाबराकडे फक्त १२००० घोडदळ होते परंतु त्याच्या घोडदळात त्या काळात युरोपात असलेल्या घोडदळा प्रमाणे घोडेस्वार तलवारी आणि बंदुकी वापरत होते. त्याचप्रमाणे युरोपीयन युध्दशास्त्रात त्या काळात ज्या प्रगत प्रवृती होत्या त्याचे ज्ञान बाबराला होते असे दिसते म्हणूनच त्याने पानिपतच्या ऐतिहासिक लढाअीत प्रत्यक्ष युध्दनितीचा वापर करुन अचानक कारवाअी (Surprise Action), प्रभावी संहारशक्ति (Overwhelming Fire Power) आणि कौशल्यपूर्ण हालचाली (Skilful Manouvre) ही तत्वे प्रत्यक्षात आणली आणि लोदी सैन्याच्या बगलेवर हल्ला करुन तिचा सपशेल पराभव केला. पानिपतच्या या पहिल्या युध्दाने ही गोष्ट सिध्द झाली की लढाअीतील विजय हा केवळ सेनेच्या संख्याबळावर अवलंबून नसून प्रगत युध्दशास्त्र आणि त्याची कठोरपणे केलेली अंमलबजावणी यांचाच शेवटी निर्णायक विजय होतो पानिपतच्या विजयानंतर बाबर परत फिरला नाही आणि त्याने भारतामध्ये मोगल या नवीन राजसत्तेची स्थापना केली. या सत्तेचे पुढील २०० वर्षात मोगल साम्राज्यात रुपांतर झाले दीर्घकाळ टिकू शकणारी सत्ता केवळ निर्णायक लष्करी यशानेच प्राप्त होते हाही अेक सिध्दांत बाबराच्या विजयाने प्रस्थापित केला.

या संदर्भात युध्दशास्त्राच्या विकासाच्या दृष्टीने अेक महत्वाचा मुद्दा अुत्पन्न होतो तो हा की बाबराच्या वेळेपर्यंत भारतामध्ये दारुगोळ्याचा वापर आणि त्यावर अवलंबून असलेल्या बंदुका आणि तोफखाना ही सैन्याची शस्त्रास्त्रे म्हणून वापरल्या गेल्या नव्हत्या बाबराच्या वेळेपासून मोगल सैन्यात बंदुकधारी सैनिक आणि तोफखाना सर्रास वापरात आला. या तऱ्हेची आधुनिक शस्त्-

सामुग्री बाबराच्या सैन्यात कोठून आली याचा शोध घेणे आवश्यक आहे. तेराव्या शतकात अिस्लाम धर्म अनुयायी असलेल्या सेलजूक नावाच्या तुर्की टोळ्यांनी तुर्कस्थान मध्ये आपली सत्ता प्रस्थापित केली (१२०१ ते १३२६) ही सत्ता पुढे झपाट्याने वाढत जाऊन तिचा अंमल पश्चिम आणि मध्य आशियातील बहुतेक सर्व अिस्लामी देशांवर लागू झाला. यालाच तुर्की साम्राज्य (The Ottoman Empire) असे म्हणतात. तुर्की सैन्यामध्ये मुख्यत: घोडदळाचा भरणा असून त्यांची पुरवठा यंत्रणाही उंट-दलाच्या साहाय्याने होत असे. चौदाव्या शतकात स्पेनने युध्दशास्त्राची आघाडी मारली त्यावेळी स्पेनच्या सैन्यामध्ये आणि विशेषत: तोफखान्यात अिस्लामी सैनिकांची भरती केली जात असे हेच सैनिक पुढे उत्तर आफ्रिकेत मोरोक्कोपासून अिजिप्त पर्यंत असलेल्या अनेक अरबदेशांमधून सेवा करु लागले आणि यांच्या पैकी कांही तुर्की सैन्यात भरती झाल्यामुळे तुर्की सैन्यातही दारुगोळा तयार करण्याचे तंत्र, तोफेच्या गोळ्यांची निर्मिती आणि बंदुकीचा वापर सुरु झाला. अि.स. १४५२ मध्ये दारु गोळ्याच्या निर्मितीत तज्ञ असलेला अर्बन या नावाचा हंगेरी मधील अेक अिंजिनिअर तुर्की सम्राट मेहमद दुसरा याच्याकडे नोकरी शोधत आला मेहमदने त्याला भरपूर पगार, सर्व तऱ्हेच्या सुखसोयी आणि दारुगोळा निर्मितीत सर्व तऱ्हेचे साहाय्य देऊ केले. लवकरच अर्बन हा मेहमदचा तांत्रिक सल्लागार बनला आणि त्याचा मुख्य परिणाम म्हणजे तुर्की सैन्यात अजिंक्य असा तोफखाना आणि त्यानंतर बंदुकी यांची झपाट्याने वाढ झाली. याचा अर्थ असा की बाबराने भारतावर स्वारी करण्यापूर्वी घोडदळ, तोफखाना आणि बंदुका या तीन प्रभावी शस्त्रास्त्रांचा त्याच्या मातृभूमित म्हणजे तुर्कस्थानात फार मोठा विकास झाला होता.

सतराव्या शतकात प्रथम दक्षिणेतील अिस्लामी राजांना आणि नंतर प्रत्यक्ष मोगल सत्तेला आव्हान देणारी अेक प्रभावी शक्ति महाराष्ट्रात निर्माण

झाली ही शक्ती म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेली मराठी सत्ता ही होय. त्यांनी स्थापन केलेल्या मराठी राज्याचे रुपांतर पुढे मराठी साम्राज्यात झाले. या संबंधीचे सविस्तर विवेचन पुढील प्रकरणात येणार असल्यामुळे मराठ्यांचा युध्दशास्त्राचा विकास कसा झाला याची सविस्तर चर्चा पुढील प्रकरणामधून करता येअील. अि.स. १८१८ मध्ये मराठे आणि अिंग्रज यांच्या मध्ये झालेल्या अखेरच्या लढाअीत अिंग्रजांचा विजय झाल्यामुळे मराठी सत्ता संपुष्टात आली आणि त्या बरोबरच भारतातील युध्दशास्त्राचे अेक युग समाप्त झाले.

प्रकरण तिसरे

संदर्भसूची

१ Strategy : The Indirect Approach
B.H.Liddell Hart Ch. 6 to 10

२ History of Warfare, Field Marshal Montgomery
Part 3, Ch. 10, 11, 12.

३ The Guinness , History of Land Warfare
Kenneth Macksey Ch. 6 to 9

४ The History of Hisdusthan Dow Vol.2

५ Baber - Lane Poole

६ A Empire Builder of the 16th Century -
Rushborook Welliams

७ The Art of Warfare in the Age of Marlborough - Devid Chandber

८ Makers of Modern Strategy - Edward Mead
Earle.

प्रकरण चौथे

विसाव्या शतकातील जागतिक संघर्ष

(Armed Conflicts in the 20th Century)

जागतिक संघर्षाची पार्श्वभूमी

(Background of World Wide Conflicts)

२०व्या शतकात १९१४-१८ आणि १९३९-४५ असे जे दोन महान संघर्ष झाले त्याच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करताना एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात राजकीय स्तरावर ज्या प्रवृत्ती वाढीस लागल्या आणि त्यामुळे युध्दशास्त्राच्या वैचारिक भूमीकेबद्दल जी परस्परांशी भिन्न अशी युध्दविषयक विचारसरणी सुरु झाली ती लक्षात घेणे जरुरीचे आहे. १८७८ पासून पहिल्या महायुध्दाच्या प्रारंभापर्यंत युरोपातील राष्ट्रामध्ये सर्व दृष्टींनी अनेक घडामोडी झाल्या. बहुतेक सर्व राष्ट्रातून लोकसंख्या झपाट्याने वाढत गेली. इंग्लंड फ्रान्स, प्रशिया आणि रशिया यांची साम्राज्ये जगाच्या सर्वभागात पसरत गेल्यामुळे आपल्या साम्राज्याची सत्ता अधिकाधिक समर्थ व्हावी या उद्देशाने ही साम्राज्यवादी राष्ट्रे महायुध्दाकडे वाटचाल करु लागली. साम्राज्यवादाबरोबरच प्रत्येक राष्ट्रात राष्ट्रवाद (Nationalism) हाही वाढू लागला. आपल्या पेक्षा दुस-या साम्राज्याची लष्करी ताकद अधिक वाढू नये आणि ती तशी वाढू लागल्यास तिला तात्काळ पायबंद घातला जावा अशा तऱ्हेची सत्तास्पर्धा नव्यानेच निर्माण झाली. याच प्रवृत्तीस सत्तेचा समतोल राखणे (Balance of Power) असे म्हणतात. जागतिक संघर्षाची थोडीशी झलक १८७०-७१ मध्ये झालेल्या फ्रान्स आणि प्रशिया यांचे युध्द (Franco - Prussian War)

आणि अमेरिकेतील यादवी (American Civil War) १८६१-६५ या युध्दांमुळे आली. राजपुत्र बिस्मार्क या तडफदार नेत्याच्या नेतृत्वाखाली प्रशियाचे लष्करी सामर्थ्य वेगाने वाढत जाऊन प्रशियन नेत्यांच्या नजरा फ्रान्सच्या रोखाने वळू लागल्या. फ्रान्स हे लोकशाहीवर आधिष्ठीत राष्ट्र असल्यामुळे इंग्लंड मधील लोकशाही शासन फ्रान्सच्या अधिक जवळ येऊ लागले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंड आणि फ्रान्स यांची एकजूट अधिक बळकट होऊन आज ना उद्या आपणास प्रशिया विरुध्द लढा द्यावा लागणार याची प्रखर जाणीव इंग्लीश आणि फ्रेंच नेत्यांना होऊ लागली. फ्रान्स विरुध्द लढल्या गेलेल्या युध्दात प्रशियाला मिळालेल्या निर्णायक विजयामुळे बिस्मार्कने जर्मन वांशिक सर्व जातींना एकत्र आणून त्यातून स्वतंत्र आणि सार्वभौम जर्मन राष्ट्राची स्थापना केली. या समर्थ जर्मन राष्ट्राने दिलेले आव्हान स्वीकारुन वाढत्या जर्मन सत्तेला पायबंद घालण्यासाठी इंग्लंड व फ्रान्स या मित्र राष्ट्रांना १९१४ च्या ऑगस्ट मध्ये रणांगणात उतरावे लागले.

औद्योगिक क्रांति आणि शस्त्रास्त्रांची निर्मिती

(Industrial Revolution and Development of Weapons)

औद्योगिक क्रांतिमुळे लोह, इस्पात उद्योग (Iron and Steel Industries) आणि त्याच प्रमाणे वस्त्र उद्योग (Textile Industries) या दोन उद्योगात वाफेचे इंजिन वापरात आल्यामुळे या दोन्ही वस्तूंचे उत्पादन झपाट्याने वाढू लागले. या औद्योगिक वाढीबरोबरच शस्त्रास्त्रांच्या निर्मितीत आणि जहाज बांधण्याच्या कामात क्रांतिकारक बदल घडून आले. सर्वप्रथम फ्लिंट लॉक बंदूक ही कालबाह्य ठरून त्या जागी नळीतून भरण्याची (Muzzle Loading)

ऐनफिल्ड ही बंदूक पायदळाकडे आली. मॅचलॉकच्या ऐवजी बंदूक उडविण्यासाठी गोळी (Bullet) आणि तिला धक्का देणारी दारूची पिस्तवी (Percussion Cap) यांचा वापर सुरू झाला. अशा त-हेच्या बंदुकीच्या मा-याचा टप्पा आणि त्याचा अचूकपणा (Range and Accuracy) ही अनेक पटींनी वाढली. तोफखान्यामध्ये तोफेच्या नळीच्या अग्रभागातून दारू भरण्याऐवजी ती नळीच्या मागील भागातून (Breech Loading) भरण्याची पध्दत अस्तीत्वात आली. त्याच प्रमाणे ९ पौंड आणि १२ पौंडाचे गोळे लोखंडाचे न बनता संपूर्ण दारूचे बनू लागले. त्याच प्रमाणे रणांगणात तोफेचा मारा कोणत्याही दिशेने करता यावा म्हणून फिरत्या बैठकीवर तोफ बसविली जाऊ लागली (Turret). अगदी थोड्या अंतरावर प्रतिस्पर्ध्यास जायबंदी करण्यासाठी सॅम्युअल कोल्ट या इंजिनिअरने पिस्तुल बनविले. या शस्त्रास्त्रांमुळे पायदळ, घोडदळ आणि तोफखान्यातील सैनिकांकडे तलवार आणि भाले यांच्या ऐवजी संगीन युक्त बंदुका आणि पिस्तूले यांचा वापर सार्वत्रिक झाला. स्थल सेनेच्या शस्त्रास्त्रांप्रमाणे नौसेनेच्या सामुग्रीतही फार मोठा बदल झाला. शिडाची जहाजे कालबाह्य होऊन ४०० ते ६०० अश्वशक्तीची वाफेची प्रचंड इंजिन्स बसविलेली जहाजे समुद्रावर संचार करू लागली. यावेळी लोह आणि इस्पात उद्योगाची वाढ झाल्यामुळे संपूर्ण जहाजाची बांधणी लोह आणि इस्पात यांच्यानेच होऊ लागली. शत्रूची जहाजे बुडवून देण्यासाठी पाण्यातील अग्नीबाण (Tarpedo) आणि पाण्यावर तरंगणारे सुरुंग (Floating Mines) या दोन शोधांमुळे नौसेनेच्या संहार शक्तित अमाप वाढ झाली. पाण्याच्या पृष्ठ भागावर संचार करणा-या जहाजांखेरीज (Surface Ships) पाण्याच्या खालून संच्यार करणा-या पाणबुड्या (Submarines) नौसेनेत दाखल झाल्या. १९०२ मध्ये राईट बंधूंनी तयार केलेले पहिले विमान रणांगणातील

अेक प्रभावी अस्त्र म्हणून अस्तित्वात आले. रणांगणातील विमानाचे स्थान किती महत्त्वाचे आहे हे फ्रान्सने प्रथम ओळखले आणि त्यामुळे प्रथम फ्रान्समध्ये आणि त्यानंतर अिंग्लंड आणि जर्मनीमध्ये रणांगणाची पाहणी करण्यासाठी विमानांचा अुपयोग सुरू झाला. अर्थात यावेळी विमानाच्या अुड्डाणाचा सरासरी वेग फक्त तासाला १५० किलोमिटर अेवढाच होता.

औद्योगिक क्रांति आणि शस्त्रास्त्रांची निर्मिती यांच्या बरोबरच रेल्वेचा प्रारंभही घटना युध्दशास्त्राच्या दृष्टीने फार महत्त्वाची ठरली. रेल्वेचे डबे ओढण्यासाठी वाफेचे अिंजिन अस्तीत्वात आल्यामुळे सेनेचे मोठे गट अेका टोकापासून दुस-या टोकापर्यंत जलद गतिने हलविणे शक्य झाले. बहुतेक युरोपियन राष्ट्रांमध्ये १८७० ते १९१० या ४० वर्षांच्या काळात रेल्वेचे अेक जाळेच तयार झाल्यामुळे सेनेच्या अुपस्थितीत तात्काळ बदल करण्यास फार मोठी मदत झाली.

युध्दनैतिक विचारांचा विकास
Development of Strategic Thought)

शस्त्रास्त्रांच्या वाढीबरोबरच अनेक युध्दात प्रत्यक्ष भाग घेतलेल्या युध्द नेत्यांनी आपले अनुभव जमेस धरून युध्दनैतिक विचारांची नवीन तत्त्व प्रणाली आपापल्या राष्ट्रांतील युध्दनेत्यांपुढे ग्रंथरुपाने मांडली. ज्या युध्दशास्त्रावर जगविख्यात ठरलेला जनरल व्हॉन क्लॉजविट्झ याचा युध्दावरील विचार (ON WAR) हा तीन खंडात लिहिलेला ग्रंथ १८३२ मध्ये प्रसिध्द झाला. स्वतः क्लॉजविट्झ ने प्रशियन आणि रशियन सैन्यात अनेक खात्यात महत्त्वाच्या पदांवर काम केलेले असल्यामुळे त्याचे ग्रंथ सर्व देशांमधून वाचले जाऊ लागले. मूळ ग्रंथ जर्मन भाषेत असला तरी क्लॉजविट्झचे विचार अितके प्रभावी ठरले की अनेक भाषांमधून त्याचे भाषांतर करण्यात आले. युध्द हे देशाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि मानसिक

घटकांवर हल्ले व्हावे अशी क्लॉझव्हिट्झची विचारधारा होती. राष्ट्रीय अुद्दिष्टांचा पाठपुरावा करण्यासाठी अितर सर्व मार्गांबरोबरच युध्द हा अेक मार्ग आहे असे क्लॉझव्हिट्झचे आग्रही मत होते. युध्दान्वयीत राष्ट्राने आपल्या विरोधकांचा संपूर्ण नाश केला पाहिजे हे त्याचे मुख्य सूत्र असून हे अुद्दिष्ट साध्य व्हावे म्हणून सेनेची संख्या शक्य तितकी मोठी असावी आणि प्रतिस्पर्ध्यांवर नेहमी धडक हल्ला करावा असे क्लॉझव्हिट्झचे मत होते. सेनेचे प्रभावी संख्याधिक्य (Mass) आणि सेनेची अेकत्रीत शक्ति (Concentration) ही नेपोलीयनच्या युध्दनितीतील दोन तत्वे प्रमाण मानून या दोन तत्वांच्या आधारानेच शत्रूच्या सर्वस्व नाशाचे अुद्दिष्ट साधता येअील असा क्लॉझव्हिट्झचा विश्वास होता. त्याच्या या आक्रमक तत्वांचा पगडा पुढील १०० वर्षे म्हणजे दुस-या महायुध्दाच्या अखेर पर्यंत जर्मन युध्दनेत्यांवर टिकून राहिला. १८५० ते १९१० या दरम्यान जर्मन सैन्याच्या सूत्रसंचालन विभागाचे प्रमुख (Germen General Staff) असलेल्या जनरल व्हॉन मॉल्क (General Von Moltke) आणि जनरल व्हॉन स्लीफेन (General Von Sliffien) यांनी क्लॉझव्हिट्झच्या तत्वांवर आधारित अशा युध्द योजना पहिले महायुध्द सुरु होण्यापूर्वीच करुन ठेवल्या होत्या. क्लॉझव्हिट्झच्या ग्रंथा नंतर थोड्याच वर्षात नेपोलीयनच्या सैन्यात अधिकारी म्हणून काम केलेल्या जोमीनी या सेनाधिका-याने युध्दशास्त्रावर लिहीलेला ग्रंथ प्रसिध्द झाला. जोमीनीच्या ग्रंथात युध्दनिती पेक्षा युध्दव्यवहार (Tactical Conduct of War) यावर अधिक भर आहे. जोमीनी हा गणित तज्ञ असल्यामुळे रणांगणातील प्रत्येक हालचाल गणिताच्या पध्दतिने अचूक आणि काटेकोर झाली पाहिजे असा त्याचा आग्रह होता. अेकोणिसाव्या शतकातील अखेरच्या दशकात युध्दशास्त्रावर प्रसिध्द झालेला तिसरा जगविख्यात ग्रंथ म्हणजे अमेरिकेतील नौसेनेचा अितिहासकार अे.टी.म्हान याने लिहीलेला

" अितिहासावरील सागरी सत्तेचा प्रभाव " (The Influence of Sea Power on History) हा ग्रंथ होय. कोणत्याही आधुनिक राष्ट्राची संपत्ति व्यापार आणि वसाहत यांच्यावर अवलंबून असल्यामुळे अशा राष्ट्रांनी सागरी सत्तेवर निर्विवाद प्रभुत्व मिळविले पाहिजे आणि असे प्रभुत्व केवळ सबळ अशा नौसेनेमुळेच शक्य होअील असे महान यांचे मत होते. महान यांच्या तत्त्वांचा विकसित अशा सर्व राष्ट्रांवर जोरदाररितीने परिणाम झाल्यामुळे पहिल्या महायुध्दाच्या प्रारंभी अिंग्लंड, फ्रान्स, जर्मनी आणि अमेरिका या देशांमध्ये शक्तिशाली नौसेना अस्तित्वात आल्या.

पहिले जागतिक युध्द १९१४-१८
(First World War)

पहिल्या महायुध्दाचा प्रारंभ १९१४ च्या ऑगस्ट मध्ये होअून त्याचा शेवट ११ नोव्हेंबर १९१८ मध्ये झाला. या पांच वर्षे चाललेल्या प्रदीर्घ महायुध्दाला फिल्ड मार्शल मॉन्टगॉमरी यांनी अेक विचारशून्य मनुष्यसंहार असे म्हटले आहे. याचे मुख्य कारण युध्दशास्त्राचे नियम विचारशून्यपणे वापरल्यामुळे झाले असेच म्हणावे लागेल. जगाच्या लष्करी अितिहासात पूर्वी कधीही वापरात न आणलेली प्रचंड मानवशक्ति दोन्ही पक्षांनी युध्दामध्ये रणांगणात आणली. महायुध्दाच्या सुरुवातीस जर्मन सैन्याची संख्या सात लाख (७५०,०००) असून त्या विरुध्द अिंग्लंड आणि फ्रान्स यांच्या संयुक्त सेनेची संख्या दहा लाखाच्या (१०,००,०००) आसपास होती. ही झाली फक्त युरोपातील रणांगणाची आकडेवारी. या खेरीज ब्रिटीश सेनेने तुर्की सैन्याविरुध्द गॅलीपोली, पॅलेस्टाअीन येथे आणि त्याचप्रमाणे पूर्व आफ्रिकेत जर्मनी विरुध्द दुसरी आघाडी अुभी केली. याबरोबर त्यावेळच्या भारतातील हिंदी सेनेने तुर्की सैन्याविरुध्द मेसापोटेमिया (सध्याचे अिराक) येथे तिसरी आघाडी

उघडली. यातच भर म्हणून अतिपूर्वेकडे जपानने जर्मनी आणि रशिया यांच्या ताब्यात असलेल्या प्रदेशांवर आक्रमण करून चौथी आघाडी उघडली या हिशेबाने युरोपातील मुख्य आघाडीवर युध्दान्वित असलेल्या सेना सोडून त्याशिवाय बाकीच्या तीन दुय्यम आघाडयांवर आणखी सहा ते सात लाख सेना युध्दक्षेत्रात प्रविष्ट होत्या. महायुध्दाच्या अखेरच्या पर्वात अमेरिकन सेनेचे विभाग दोस्त राष्ट्रांच्या बाजूने युरोपच्या रणक्षेत्रात दाखल झाले. अशा रितीने जगाच्या पश्चिमेकडून पूर्वेकडे बहुतेक सर्व देश या युध्दात गुंतले जाऊन जवळजवळ १६ ते १७ लाख सैनिक अनेक रणांगणांवर लढत राहिले. अेकंदर पाच वर्षाच्या काळात लढाईमध्ये प्राणार्पण केलेल्या सैनिकांची संख्या १० लाखाच्या आसपास पोहचून त्यांच्या दुप्पट किंवा तिप्पट युध्दात जखमी झाले. ही भीषण परिस्थिती इतका प्रदीर्घ काळ टिकली कशी याचा विचार करता असे आढळून येईल की १९१४ पर्यंत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया आणि जपान या राष्ट्रांची साम्राज्ये सर्व जगात पसरलेली असल्यामुळे अमर्याद मनुष्यबळ आणि अमर्याद साधन संपत्ती यांचा कधीच तुटवडा पडला नाही आणि त्यामुळे या राष्ट्रांची जबर मनुष्यहानी होऊन सुध्दा महायुध्द प्रदिर्घकाळ चालू ठेवणे शक्य झाले.

युध्दशास्त्रीय वैशिष्ठ्ये

(Salient Features of Warfare)

या महायुध्दाच्या प्रारंभी बचावात्मक प्रतिकाराला (Defensive Posture) फार महत्त्व देण्यात आले होते. लढाईच्या क्षेत्रात बचाव स्थानके (Defensive Positions) बनविण्याचे अेक नवे तंत्र यावेळी प्रथमच वापरले गेले. या तंत्राप्रमाणे अेका मागोमाग अेक असे सरळ रेषेमध्ये जवळ

जवळ १.५ मिटर खोल आणि १ मिटर रुंद अशा त-हेचे खंदक खोदून (Trenches) त्यामध्ये कित्येक आठवडे, महिने सैनिकाने बसून राहावे ही पध्दत सुरु झाली अशा त-हेच्या खंदकांची लाईन तयार झाल्यावर त्या खंदकाच्या टोकालाच उकरुन काढलेल्या मातीचे चबूतरे बनवून (Parapets) त्यावर मध्यम प्रतिच्या तोफा (Medium Machine Guns) बसविल्या जात. या तोफांच्या सोबती अर्थातच बंदूकधारी सैनिकही असत या चबुत-यांच्यापुढे शत्रूला येण्यास मज्जाव करण्यासाठी काटेरी तारांची दुपदरी किंवा तीन पदरी कुंपणे घातली जात आणि या काटेरी तारांच्या कुंपणा पलीकडे सर्व लाईनच्या समोर सुरुंग (Land Mines) पेरुन ठेवलेले असत. खंदकाच्या एकामागे एक असलेल्या तीन ओळीपैकी पहिल्या ओळीत येणा-या शत्रूवर गोळ्यांच्या फैरी झाडणारी पहिली ओळ (Firing Line) असे. मागच्या म्हणजे दुस-या ओळीत पहिल्या ओळीला मदत करणा-या सैनिकांची दुसरी लाईन म्हणजे मदत करणारी (Support Line) असे आणि सगळ्यात मागच्या म्हणजे तिस-या ओळीत राखीव ओळ (Reserve Line) असे. अशा रितीने तयार केलेल्या मजबूत बचाव स्थानकांवर आमने सामने धडक हल्ला करणे म्हणजे मृत्युला आमंत्रण देण्यापैकीच होते. ही वस्तुस्थिती लक्षात न घेता दोन्हीकडील कुच सेनापतिंनी अशा त-हेची बचाव क्षेत्रे ताब्यात घेण्यासाठी चुकीच्या युध्दतंत्राचा पुरस्कार आणि वापर केला. दोस्त पक्षाकडील सर्वोच्च सेनापती मार्शल फॉक (Foch) यांचे तर असे तत्व असे की युध्द करणे म्हणजे एकावर एक हल्ले चढविणे होय. असे हल्ले चढवितांना शत्रू पक्षाची बचाव स्थानके फाडून काढावी म्हणून हल्ल्याच्या अंतिम क्षणापूर्वी अर्धा तास ते तासभर एकाच वेळी ५०० ते १००० तोफा कार्यान्वित करुन शत्रू स्थानकावर गोळा फेकीचा तुफानी वर्षाव करण्यात येई अशा वर्षावाचा मुख्य उद्देश शत्रूस्थानका समोर पेरलेले सुरुंग उडवून देऊन निकामी

करणे आणि काटेरी तारांची कुंपणे तोडून टाकणे असा होता. या दोन गोष्टी शक्य झाल्या तरच पायदळी सैनिकांना बंदूकीवर संगीन चढवून खंदकाच्या ओळी मध्ये असलेल्या शत्रूवर हल्ला करणे सोपे जाई. परंतु या सर्व खटाटोपात मनुष्यहानी फार मोठ्या प्रमाणात होत असे याच घातक आणि अमानुष पध्दतीमुळे यिप्रेस येथील लढाया (Battles of Ypress) सोम नदीवरील लढाया (Battles of the Somme) आणि व्हर्डून व पॉसेंडेल येथील घनघोर संग्रामात जवळ जवळ पांच लाख सैनिक धारातीर्थी पडले आणि आठ लाखाच्या आसपास सैनिक जखमी झाले. या सर्व लढायातून आमने सामने धडक हल्ला करण्याचे तंत्र वापरले गेले आणि हल्ला करण्याच्या हुकमात "केवढेही नुकसान झाले तरी" (Regardless of Loss) ही पुस्ती जोडून दिल्यामुळे लढाऊ सैनिकांच्या अेकावर अेक लाटा शत्रूच्या स्थानकावर हल्ला करण्यास पाठविल्या जात आणि त्यासाठी ही जबरदस्त किंमत मोजावी लागे.

महायुध्दातील युध्दनिती आणि युध्दव्यवहार
(Strategy and Tactice of Warfare)

वर लिहील्याप्रमाणे पहिल्या महायुध्दातील पांच वर्षाच्या काळात बचावात्मक पवित्रा हे जरी सर्वसाधारण सूत्र म्हणून अेकंदर संघर्षात दिसून आले तरी दोन्ही पक्षाकडून पण विशेषतः जर्मनीकडून आणि काही लढायात दोस्त पक्षाकडील सेनापतींकडून युध्दनिती (Strategy) आणि युध्दव्यवहार (Tactics) यांचे अत्यंत चाणाक्ष दर्शन घडविणारे काही संग्राम लष्करी अितिहास नोंद करून ठेवण्यासारखे झाले. या बहुतेक वैशिष्ठ्यपूर्ण संग्रामांमध्ये विजयी पक्षाने अप्रत्यक्ष युध्दनितीचा पवित्रा (Strategy of Indirect

Approach)वापरल्याचे आढळून येते. अगदी सुरुवातीसच जर्मन सेनेच्या ७.५ लाख सैनिकांनी फ्रान्सवर केलेला घणाघाती हल्ला (Massive Attack) या अशाच प्रकारच्या अुल्लेखनिय संग्रामांपैकी अेक होय. जर्मनीकडून हल्ला झाला तर तो जर्मनीला लागून असलेल्या फ्रान्सच्या पूर्व सीमेवर फ्रान्सची संरक्षण फळी फोडून करण्यात येअील अशी फ्रेंच सेनापतींची अपेक्षा होती. याअुलट जर्मनीने अेक नवीन तंत्र यावेळी वापरले फ्रान्सच्या सीमेवर १.५ लाख सेनेचा दबाव कायम ठेवून आणि त्या आघाडीवर फ्रान्सला बिलकूल हलता येवू नये अशी व्यवस्था करुन जर्मनीने फ्रान्सच्या अुत्तरेस असलेल्या बेल्जीयम या राष्ट्राच्या तटस्थ भूमिकेचा भंग करुन बेल्जीयम मार्गे चार लाख सेना फ्रान्समध्ये घुसविली. लष्करी तज्ञ कॅप्टन लिडेल हार्ट याने या युध्दनितीस फिरत्या दरवाज्याची युध्दनिती (Strategy of Revolving Door) असे नाव दिले आहे. ज्या प्रमाणे फिरत्या दरवाज्यावर अेका बाजूला भर दिला की तो आत जाअून त्याचा दुसरा भाग अुघडतो त्याचप्रमाणे फ्रान्सच्या पूर्व सीमेवर दबाव ठेवल्यामुळे बेल्जीयम सारख्या तटस्थ राष्ट्रातून जर्मन सेना आगेकूच करणार नाही या गैरसमजावर फ्रान्सने आपली अुत्तर आघाडी कमजोर ठेवली. जर्मन सेनापतींनी नेमकी हीच गोष्ट हेरुन फ्रान्सच्या कमजोर भागातून हल्ला चढविला. या अचानक कारवाअीचा जर्मन सैन्याला भरपूर फायदा होअून फ्रेंच सेनेचा गोंधळ अुडाला आणि त्यामुळे झपाट्याने आगेकूच करणाऱ्या जर्मन सेनेला रोखणे फ्रेंच सेनेला अशक्य झाले. या हल्ल्याची योजना १८९६ मध्ये म्हणजे महायुध्द सुरु होण्यापूर्वी १८ वर्षे त्या वेळचा जर्मन सेनेचा सूत्र संचालक जनरल व्हॉन श्लीफेन याने तयार केली होती. मध्यंतरीच्या काळात महायुध्दा पूर्वी असलेला जर्मन सूत्रसंचालक जनरल व्हॉन मोल्ट (कनिष्ठ) याने या योजनेवर अनेक वेळा हात फिरवून आणि त्यातील बारीक सारीक अुणिवा दूर करुन अंतिम योजना सर्वदृष्टीने परिपूर्ण केली होती.

जर्मनीच्या या मुसंडी नंतर जर्मन सेनेने नोंदविलेला दुसरा नेत्रदीपक विजय म्हणजे टॅनेनबर्ग च्या लढाईत (आगस्ट १९१४) जनरल ल्यूडेन डॉर्फने केलेला, रशियाचा सेनापती सॅमसोनॉव्ह याचा दारुण पराभव हा होय. यावेळी रशियन सेना आपली सरहद्द ओलांडून जर्मनीच्या प्रदेशातील टॅनेनबर्ग या टेकडीवर आणि आजूबाजूस असणाऱ्या जर्मन सेनेशी झुंज देण्यासाठी आगेकूच करीत होती. जर्मन सेनापती ल्यूडेन डॉर्फ याने प्रथम रशियन सेनेच्या डाव्या बगलेवर हल्ला करुन त्यांना माघार घेण्यास लावले. त्यानंतर त्याने आपला रोख रशियन सेनेच्या उजव्या बगलेवर वळवून त्यांनाही बरेच अंतर मागे ढकलले. अशा रितीने डावी आणि उजवी बगल नष्ट झाल्यामुळे रशियन सेनेचा मध्यभाग (Centere) एकाकी पडला याच क्षणी जर्मन सेनेने रशियन सेनेच्या मध्य भागावर समोरुन आणि दोन्ही बगलेने जोरदार हल्ला करुन तिला संपूर्णपणे घेरुन टाकले. या धुमश्चक्रीत रशियन सेनेचा संपूर्ण मध्यभाग नष्ट झाला आणि या पराभवामुळे व्यथित झालेला रशियन जनरल सॅमसोनॉव्ह याने आत्महत्या केली. १९१५ च्या प्रारंभी कनिष्ठ मॉल्टकच्या जागी जर्मन सेनेचा सूत्र संचालक म्हणून जनरल फॉल्केनहॅन याची नियुक्ती झाली. त्याची युध्दनिती बचावात्मक पवित्र्याची असल्यामुळे १९१५ ते १८ पर्यंत युरोपातील लढाई ट्रेंच पध्दतीच्या युध्दात रेंगाळत राहिली.

सागरी संघर्ष
(Naval-warfare)

या काळात ब्रिटीश नाविक सत्तेचे सर्व सागरांवर प्रभुत्व असल्यामुळे शक्य त्या सर्व ठिकाणी जर्मन नौसेनेची नाकेबंदी करुन जर्मनीचा इतर राष्ट्रांशी असलेला व्यापार बंद करुन सागरी मार्गाने जर्मनीला होणारा पुरवठा तोडून

टाळणे हेच ब्रिटीश नौसेनेचे प्रमुख काम राहिले. त्याचप्रमाणे भूमध्य समुद्रात फ्रेंच नौसेनेने जर्मन नौसेनेची कोंडी केली आणि तेच काम बाल्टीक समुद्र आणि काळा समुद्र यामध्ये रशियन नौसेनेने बजावले. या कोंडीमुळे जर्मन नौसेनेची लढाऊ जहाजे शक्य तो आपल्या बंदरात राहात आणि खुल्या समुद्रात येण्याचे टाळत असत. १९१६ च्या अखेरीस मात्र ही परिस्थिती बदलली. यावेळी जर्मनीने पाणबुडयांच्या निर्मितीत लक्षणीय वाढ करुन दोस्त राष्ट्रांची व्यापारी जहाजे बुडविण्याचा सपाटा लावला. या जर्मन पाणबुडयांना यू-बोट असे म्हणत यावेळी ब्रिटीशांकडे २६ पाणबुडया तर जर्मनांकडे २८ पाणबुडया होत्या पण संख्येने कमी असून देखील जर्मन पाणबुडयांनी ब्रिटीश जहाजांचा मुख्य संचार बराच वेळा खंडीत केला. मोठ्या लढावू जहाजांमध्ये इंग्लंडकडे २७ तर जर्मनीकडे २० मोठी लढाऊ जहाजे होती. सबंध पांच वर्षाच्या युध्दात ब्रिटीश नौसेनेची जर्मन नौसेनेविरुध्द फक्त एकदाच खुल्या समुद्रात जटलन्ड येथे चकमक झाली. पण दोन्ही बाजू तुल्यबळ असल्यामुळे निर्णायक लढाई होऊ शकली नाही. १९१८ च्या मध्यापर्यंत जर्मन पाणबुडयांचा बराच उपद्रव दोस्त राष्ट्रांच्या व्यापारी जहाजांना झाला. परंतु त्यानंतर पाणबुडीचे अस्तित्व ताबडतोब हेरण्यासाठी ॲसडीक (Asidic) या यंत्राचा शोध लागल्यामुळे पाणबुडी कोठे आहे हे समजू लागले आणि अशा पाणबुडयांचा टारपेडोच्या वापराने नाश करणे शक्य झाले.

रणगाडे आणि विमाने यांचा उदय

(The Emergence of Tanks and Aircrafts)

१९१६ च्या मध्यास कर्नल स्विटन या ब्रिटीश इंजिनिअर अधिका-याने सर्व प्रथम रणगाडा बनविला परंतु १९१७ च्या सुरुवातीपर्यंत वरिष्ठ अधिका-यांनी त्यांची दखल घेतली नाही. त्यानंतर मात्र रणगाड्याची निर्मिती इंग्लंड मध्ये

वेगाने झाली. आणि याचा परिणाम म्हणून नोव्हेंबर १९१७ च्या कॅमरायच्या लढाअीत रणगाडयांचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला. या लढाअीत दोस्त सैन्याच्या बाजूने जवळजवळ ४०० ते ५०० रणगाडयांनी जर्मन आघाडीवर जोराचा हल्ला चढविला. रणगाडयांच्या या धडकीमुळे खंदकामध्ये असून लढाअी करणा-या सैनिकांना त्या ठिकाणी लढाअी करणे अशक्य झाले आणि या लढाअीत जर्मन सेनेचा निर्णायक पराभव झाला. रणगाडयाच्या या अुदयामुळे युध्दशास्त्राला अेक नवी कलाटणी मिळाली आणि लढाअीच्या हालचालीत क्रांतिकारक बदल घडून आला. ५० ते १०० रणगाडे आपल्या तोफांमधून आग ओकीत आगेकूच करीत असतांना जमीन खोदून त्यात बसणा-या सैनिकांना तेथे राहणे म्हणजे मृत्युला आमंत्रण देण्यासारखे होते. त्यामुळे साहजिकच रणगाडयांच्या धडकीमुळे ट्रेंच पध्दतीचे युध्द संपुष्टात आले. रणगाडयाचा दुसरा मोठा परिणाम म्हणजे त्यांची गतिमानता आणि संहार शक्ति जबरदस्त असल्यामुळे घोडदळाला त्यांच्यापुढे टिकाव धरणे हे सुध्दा अशक्य झाले. त्यामुळे रणगाडयांनी घोडदळाला युध्दाचा घटक म्हणून कायमची रजा दिली.

रणगाडयांच्या बरोबरच महायुध्दाच्या शेवटच्या दोन वर्षात दोन्ही पक्षांकडून विमानांचा वापर करण्यास सुरुवात झाली. कॅमरायच्या लढाअीत दोस्त सेनेकडे ७००।८०० विमाने होती. ही विमाने अत्यंत छोटी असून त्यामध्ये चालक आणि मार्गदर्शक असे दोनच व्यक्ति बसू शकत आणि त्यांचा वेगही तासाला ८० ते १०० कि.मिटर अेवढाच होता. त्यामुळे मुख्यतः रणांगणातील टेहाळणी करण्यासाठीच या विमानांचा अुपयोग केला गेला. १९१८ च्या ८ ऑगस्टला दोस्त सैन्याने पायदळ, तोफखाना, रणगाडे आणि विमाने यांची सर्व शक्ती अेकत्रित करुन अमिन्स या ठिकाणी जर्मन आघाडीवर निकराचा हल्ला केला. चार दिवस सतत चाललेल्या या घनघोर लढाअीमुळे जर्मन सेनेची कंबरच तुटली आणि त्यामुळे

सप्टेंबरच्या अखेरीस जर्मनीनीने शस्त्रसंधी करीता वाटाघाटी करण्याची तयारी दर्शविली. आक्टोबर मध्ये या वाटाघाटींना वेग येऊन ११ नोव्हेंबर १९१८ ला दोन्ही बाजूंनी युध्दबंदी जाहीर केली आणि त्यामुळे हे प्रदीर्घ महायुध्द संपुष्टात आले.

दुसरा जागतिक संघर्ष (1939-1945)
(Second World War)

१९३९ ते १९४५ ही तब्बल सहा वर्षे चाललेल्या जागतिक संघर्षाने केवळ युध्दशास्त्रातच नव्हे तर सबंध जगाच्या इतिहासात क्रांतिकारक बदल घडवून आणले. जर्मनी आणि जपान या देशात अस्तित्वात आलेल्या लष्करी हुकूमशहांनी आत्यंतिक राष्ट्रवादाच्या प्रखर शक्तिवर भर देऊन इंग्लंड फ्रान्स आणि अमेरिका या प्रबल लोकशाही राष्ट्रांना फार मोठे आव्हान दिले. पश्चिम युरोप पासून ते अतिपूर्वे पर्यंत जगाच्या प्रत्येक देशाला आणि जगातील सर्व समुद्रांवर थोड्याअधिक प्रमाणात या भयानक संघर्षाची झळ पोहचल्याशिवाय राहिली नाही. सर्वसाधारणपणे स्वातंत्र्य आणि लोकशाही टिकवण्यासाठी हे युध्द लढले गेले. या युध्दाची तीन प्रमुख वैशिष्ठये म्हणजे हे युध्द सर्वंकष (Total) होते. प्रत्येक लढाईत विद्युतवेगी चढाईचे तंत्र वापरले गेले. तिसरे वैशिष्ठय म्हणजे परंपरागत सशस्त्र सेनेकडून (By Conventional Forces) शत्रूचा मोड होत नाही याची खात्री झाल्यावर मनुष्यहानी आणि वित्तहानी टाळण्यासाठी आणि म्हणून महायुध्द लवकर संपावे याकरिता अणुबॉम्बचा वापर करणे अटळ म्हणून आवश्यक ठरले. केवळ युध्दशास्त्राच्या दृष्टीने या महायुध्दातील कांही महत्वाच्या घटनांचा या ठिकाणी उल्लेख करावा लागेल. त्या घटना खालीलप्रमाणे होत:

१) विद्युतवेगी लढाईचे तंत्र
२) वाळवंटातील युध्दतंत्राचा विकास
३) निबीड जंगलातील युध्दतंत्राचा विकास
४) सागरी किना-यावरील लढाई आणि छत्रीधारी सैनिकांचा वापर
५) हवाई हल्ल्याचा युध्दावरील प्रभाव
६) अणुबॉम्बचा वापर

विद्युतवेगी लढाई (Blitz Krieg)

महायुध्दाच्या प्रारंभीच जर्मन हुकूमशहा हिटलर याने पुरस्कृत केलेले विद्युतवेगी लढाईचे तंत्र जर्मनीने प्रत्यक्ष वापरात आणले. या तंत्राप्रमाणे लढाईला तोंड लागण्यापूर्वी १००।१०० लढाऊ विमानांचा ताफा शत्रूच्या प्रदेशात भ्रमण करून शत्रू प्रदेशावर, मग ती लष्करी ठाणी असोत किंवा नागरिकांनी गजबजलेला शहराचा भाग असो, कोणत्याही प्रकारचा विधिनिषेध न पाळता ही विमाने अशा भागांवर हजारो टन बॉम्बचा वर्षाव करीत आणि त्यामुळे लष्करी सेनां-बरोबरच सामान्य नागरिकांमध्येही फार मोठी जीवीत हानी होत असे. हवाई हल्ल्याची ही बॉम्ब फेक संपल्याबरोबर रणगाडयांचे ताफे शत्रूच्या बचाव सेनाची फळी फोडण्यासाठी आपल्या तोफातून आग ओकीत शत्रूच्या बचाव स्थानकावर तुटून पडत आणि अशी फळी फोडून रणगाडे आत घुसले की त्यांच्या पाठोपाठ मोटार गाडीवर आरूढ झालेले सशस्त्र पायदळ आगेकूच करून प्रदेशाचा ताबा घेत. पहिल्या महायुध्दातील रेंगाळणा-या लढाईची सवय झालेल्या जर्मनी खेरीज इतर सर्व राष्ट्रातील सेनेला हा एक नवीनच

भयानक अनुभव होता. १ सप्टेंबर १९३९ रोजी सूर्योदय होताच जर्मन विमान दलाने पोलंडच्या सर्व प्रदेशावर तुफानी हवाई हल्ले करून पोलंडची हिंम्मत तोडून टाकली आणि त्याच्या पाठोपाठ जर्मन रणगाड्यांनी पोलंडच्या हद्दीत घुसून दूरवर हल्ला करण्यास प्रारंभ केला. या रणगाड्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर स्थिरस्थावर करण्यासाठी वाहनारूढ सशस्त्र पायदळ सैनिक झपाट्याने आगेकूच करून प्रदेशाचा ताबा घेत. या पहिल्या विद्युतवेगी चढाईमुळे केवळ पांच दिवसात पोलंडला शरणागती घेणे भाग पडले. अिंग्लंडचा पोलंडशी मैत्रीचा करार असल्यामुळे पोलंडवर केलेल्या आक्रमणाला अुत्तर म्हणून अिंग्लंडने जर्मनी विरुध्द ३ सप्टेंबर १९३९ ला युध्द पुकारले. पोलंडच्या कब्जा घेतल्याबरोबर हिटलरने आपले लक्ष पुढील २१४ महिने नार्वे आणि डेन्मार्क या राष्ट्रांवर वळविले आणि हे देशही जर्मनीच्या अमलाखाली आणले. अेप्रिल १९४० मध्ये जर्मनीने फ्रान्स विरुध्द अतिभव्य चढाईची तयारी केली. पहिल्या महायुध्दानंतर जर्मनीकडून हल्ला झाल्यास त्याचा बचाव करता यावा म्हणून जर्मन पश्चिम सरहद्दीला लागून असलेल्या आपल्या पूर्व सीमेवर फ्रान्सने अुंच व लांब अशी अेक सिमेंटकॉंक्रीटची भिंत अुभी केली होती. मॅजीनो नावाच्या अिंजिनिअरची ही कल्पना असल्यामुळे या भिंतीस मॅजीनो तटबंदी (Magino Line) असे म्हणतात. ही तटबंदी असल्यामुळे आणि यावेळेस अुत्तरेस असलेले बेल्जियम हे राष्ट्र तटस्थ असल्यामुळे जर्मनीकडून आपणास कोणताही धोका नाही अशी फ्रान्सच्या राज्यकर्त्यांची समजूत होती. जर्मनीने मात्र ही समजूत तशीच ठेवून देवून मॅजीनो तटबंदीला धक्काही न लावता पहिल्या महायुध्दाप्रमाणेच बेल्जियमच्या अलिप्त भूमीकेचा भंग केला आणि पहिल्या महायुध्दाच्या स्लीफेन योजने प्रमाणेच जर्मन रणगाड्यांचे ताफे बेल्जियम सीमेवरून फ्रान्समध्ये घुसले. ही चढाई अितकी वेगाची होती की बेल्जियम सीमा पार केल्यानंतर केवळ १० दिवसात पॅरिसचा कब्जा करून संपूर्ण

फ्रान्स जर्मन सेनेने आपल्या ताब्यात घेतली. याच विद्युतवेगी चढाईचे तंत्र वापरात आणून १९४१ च्या जूनमध्ये हिटलरने ६ लाख जर्मन सेना रशियात घुसविली (Operation Barbarossa) यावेळी केवळ पाच महिन्याच्या अवधीत जर्मन रणगाड्यांच्या मुसंडीने रशियन प्रदेशात १६०० किलोमिटरपर्यंत धडक मारली आणि १९४१ च्या डिसेंबर मध्ये जर्मनसेना मास्कोच्या जवळ येऊन ठेपल्या. रशियन नेता स्टॅलीन याच्या नेतृत्वाखाली रशियन सेनेने मास्कोच्या बचावासाठी जीवानिशी झुंज दिली. त्यामुळे १९४२ च्या प्रारंभी जर्मन सेना प्रथम कॉकेशस मध्ये घुसली आणि नंतर त्यांनी मास्कोच्या पूर्वेस असलेल्या स्टॅलीनग्राडला वेढा घातला. या ठिकाणी सुध्दा रशियन सेनेने प्रखर प्रतिकार करुन चार महिने झुंज दिली आणि शेवटी जर्मन सेनेला माघार घेण्यास भाग पाडले. यावेळेपासुन मात्र जर्मन सेनेला मागे ढकलण्याचे रशियन सेनेने जीवापाड प्रयत्न केले. कुर्स्क (Kursk) या ठिकाणी झालेल्या लढाईत जर्मनीच्या २००० रणगाड्यांविरुध्द रशियाने २००० रणगाडे रणक्षेत्रात उतरविले आणि जर्मन सेनेचा निर्णायक पराभव केला. जर्मनीने वापरात आणलेल्या त्याच विद्युतवेगी तंत्राचा उपयोग करुन १९४३।४४ आणि ४५ या तीन वर्षात जर्मन सेनेला मागे रेटत १९४५ च्या जूनमध्ये रशियन सेना बर्लीनच्या समोर येऊन ठाकली.

वाळवंटातील युध्दतंत्राचा विकास

(Development of Desert Warfare)

फ्रान्सच्या पाडाव झाल्यानंतर इटलीचा फॅसिस्ट हुकूमशहा मुसोलीनी यांने हिटलरशी हात मिळवणी केली आणि याचा परिणाम म्हणून इटालीयन सेनेने उत्तर आफ्रिकेतील इजिप्त आणि सोमालिया या देशात अधिसत्ता असलेल्या ब्रिटीश सत्तेला सशस्त्र आव्हान दिले. १९४० च्या मध्यास

ब्रिटीश सेनेविरुध्द लढण्यास अिटालीयन सेना असमर्थ ठरल्यामुळे जर्मन सेनेचे अेक निवडक पथक फिल्डमार्शल रोमेल या जगविख्यात सेनापतीच्या अधिपत्याखाली अुत्तर आफ्रिकेत दाखल झाले. आफ्रिका पथक (Africa Korps) असे नाव या विभागाला देण्यात आले. यात मुख्यतः पॅन्झर जातीच्या युध्दगाड्यांचा भरणा असून या पथकाची संख्या दीड लाख (१५०,०००) अशी होती. १९४० पासून ४२ पर्यंत तब्बल तीन वर्षे जर्मन आणि ब्रिटीश सेना यांचा अुत्तर आफ्रिकेच्या २५०० कि. मिटरच्या प्रदेशात पाठशिवणीचा खेळ चालू राहिला. जर्मनसेना ब्रिटीश सेनेवर हल्ले करून त्यांना ४०० ते ५०० कि.मिटर माघार घेण्यास भाग पाडत असे त्यातून सावरून ब्रिटीश सेनेने तेवढे अंतर चढाअी करून पुन्हा कब्जात घेतले की त्यांच्यावर पुन्हा हल्ला करून रोमेल त्यांना मागेरेटीत असे. अशा या चढाअीपुढे जनरल वेव्हेल आणि जनरल ऑकीनलेक हे गाजलेले सेनापती हतबल ठरले तर आफ्रिकेच्या या आवाढव्य वाळवंटात सर्व हालचाली रणगाडे आणि मोटारी यांच्या वापरामुळे आणि रणक्षेत्रावर हवाअी हल्ल्याचा जोर असल्यामुळे यश किंवा अपयश हे पिण्याचे पाणी, पेट्रोल, दारूगोळा, शस्त्रास्त्रे, अन्नधान्य आणि माणसांची कुमक या युध्दाला आवश्यक असणा-या सर्व घटकांचा पुरवठा होण्यावरच अवलंबून असे. म्हणून वाळवंटातील लढाअीस "पुरवठ्याची लढाअी" (Battle of Logistics) असे म्हणतात. शेवटी १९४२ च्या आक्टोबरमध्ये अेलअलामीन या संरक्षण फळीवर ब्रिटीशच्या सेनेचे अधिपती जनरल मॉन्टगॉमरी याने रोमलच्या सैन्यावर अेक प्रचंड हल्ला केला आणि त्याचा निर्णायक पराभव केला. तेथून ब्रिटीश सेनेने जर्मन सेनेला २८०० कि.मिटर मागे रेटले. आणि मे १९४३ मध्ये जर्मन सेनेने शरणागती पत्करल्यावर वाळवंटी युध्दाचा शेवट झाला.

जंगलातील युध्द तंत्राचा विकास

(Development of Jungle Warfare)

महायुध्द सुरु झाल्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे ७ डिसेंबर १९४१ ला जपानी युध्दनेत्यांनी हिटलरच्याच विद्युतवेगी तंत्राचा अुपयोग करुन पॅसिफीक महासागरातील पर्लहारबर या ठिकाणी अमेरिकन नाविक तळावर जपानी नौसेनेकडून निकराचा हल्ला केला आणि अमेरिकेची सर्व लढावू जहाजे जाळून नष्ट केली या अनपेक्षित घटनेमुळे दोन दुरगामी परिणाम झाले पहिला म्हणजे महायुध्दाच्या सुरुवातीपासून तटस्थ भूमिका घेतलेल्या अमेरिका या बलाढ्य राष्ट्राला स्वतःवरच आघात झाल्यामुळे रणक्षेत्रात अुतरणे भाग पडले. रशियावर केलेल्या स्वारीमुळे अिंग्लंडच्या बाजूने रशिया अिंग्लंडचे दोस्त राष्ट्र म्हणून अुभा होता त्यात आता अमेरिकेची भर पडली आणि त्यामुळे लंडन, मास्को, वॉशिंग्टन असा जर्मन विरोधी अत्यंत प्रबळ गट निर्माण झाला. दुसरा परिणाम म्हणजे अमेरिकेन नौसेनेवर केलेल्या अचानक हल्ल्यामुळे जपानला जो नेत्रदिपक विजय मिळाला त्यामुळे जपानी युध्दनेत्यांच्या आकांक्षा वाढल्या आणि तेच विद्युतवेगी चढाअीचे तंत्र वापरुन त्यांनी सयाम (सध्याचे थायलंड) या राष्ट्राच्या तटस्थ भूमिकेचा भंग करुन ब्रिटीशांच्या अमलाखाली असलेल्या मलायावर (सध्याच्या मलेशिया) तुफानी हल्ला चढविला. या हल्ल्यात जमिनीवरुन जपानी स्थल सेना मलायाच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर, जपानी नौसेनेचे गट आणि या दोहोच्या जोडीला जपानी वायुसेना असा जपानच्या तीन सशस्त्र दलांनी ७ डिसेंबर १९४१ लाच मलायावरील आपले आक्रमण सुरु केले. या चढाअीचा वेग अितका प्रखर होता की केवळ ५५ दिवसात १२०० कि.मिटर लांब असलेल्या मलायाच्या व्दीपकल्पातून ब्रिटीश सेनेला घालवून देअून तेथे जपानी सेनेने आपला

अंमल प्रस्थापित केला. त्याच्या पाठोपाठ मलायाच्या दक्षिण टोकाशी असलेल्या सिंगापूर या बेटावरील अभेद्य समजल्या जाणा-या ब्रिटीश नाविक तळावर जपानी सशस्त्र दलांनी प्रखर हल्ले सुरू केले आणि केवळ १५ दिवसात दोन लाख ब्रिटीश सेनेला शरणागती पत्करण्यास भाग पाडले. जपानच्या या विद्युतवेगी चढाईची तीन प्रमुख सूत्रे होती. जंगलामध्ये रणगाड्यांचा विशेष वापर करता येणे अशक्य असल्यामुळे हल्ल्याची सर्व भिस्त युध्दकलेचे प्रशिक्षण मिळालेल्या जपानी पायदळावर होती. जपानी सैनिक बंदूक, हातबॉम्ब (Hand Grenades) आणि तांदुळाची एक पिशवी एवढेच जवळ बाळगीत जलदरितीने हालचाल करण्यासाठी प्रत्येक पलटणीत छोटे भाग जोडून तातडीने घुमारण्यात येणा-या सायकली असत. सैनिकांचा वेष डोक्यावर हॅट, अंगात फक्त बनियान, हाफ पॅन्ट आणि पी टी बूट असा असे. जपानी सेनेत पुरवठा यंत्रणेचा कोणताच पसारा नव्हता. जिंकून घेतलेल्या प्रदेशात जे कांही मिळेल त्याच्यावरच आपला निर्वाह चालवावा असे त्यांचे धोरण होते. अशा त-हेच्या सुटसुटीत व गतिमान तंत्रामुळे जपानच्या तिन्ही सेनादलांना मलाया आणि सिंगापूर येथे नेत्रदिपक विजय मिळाले हेच तंत्र वापरून १९४२ च्या मध्यास जपानने ब्रम्हदेशावर हल्ला केला आणि तेथे असलेल्या ब्रिटीश सेनेला मागे रेटून जपानी सेना चिंडवीन नदीच्या पलीकडे म्हणजे सध्याच्या नागाप्रदेश आणि मणिपूर यांच्या पूर्व सीमेवर येऊन थडकली.

सागरी किना-यावरील चढाई आणि छत्रधारी सैनिकांचा वापर

(Ambhibious Operations and Use of Para Troops)

आता पर्यंत केलेल्या युध्दशास्त्राच्या अभ्यासात जमीनीवरील सशस्त्र संघर्ष आणि खुल्या सागरावरील सशस्त्र संघर्ष असे दोनच प्रमुख संघर्ष आपण पाहिले.

दुस-या महायुद्धामध्ये तिस-या प्रकारचा संघर्ष होण्याचा प्रसंग आला. तो म्हणजे शत्रूने व्याप्त असलेल्या देशाच्या किना-यावर हल्ला करून किनारपट्टीवर आपली सेना अुतरविणे आणि तेथून शत्रूचा मुकाबला करीत शत्रूला मागे रेटीत नेणे - (Ambhibious Operation) हा तो तिसरा प्रकार होय. १९४४च्या जून महिन्यात अिंग्लंड आणि अमेरिका यांच्या दोन लाख संयुक्त सेनेने जर्मन व्याप्त फ्रान्सच्या नॉर्मन्डी या पश्चिम किना-यावर हल्ला करून प्रथम किना-याचा कब्जा घेतला आणि जर्मन सेनेला मागे रेटीत प्रथम पॅरिस आणि नंतर बर्लीन ही दोन शहरे मुक्त केली. किना-यावर अुतरण्यापूर्वी ही प्रचंड सेना अिंग्लंड आणि अमेरिकन संयुक्त नौसेनेच्या लढाऊ जहाजांमधून ६ जून १९४४ ला नॉर्मन्डी किना-यावर अुतरविण्यात आली ही कारवाअी चालू असतांना जर्मन सेनेकडून कोणताही अडथळा होऊ नये म्हणून अिंग्लंड आणि अमेरिकेच्या २५०० भारी विमानांनी (Heavy Bombers) नॉर्मन्डीचा किनारा आणि संपूर्ण फ्रान्स यावर तुफानी बॉम्ब वर्षाव करून जर्मन सेनेची संरक्षण व्यवस्था खिळखिळी करून टाकली. युरोपातील या शेवटच्या युद्धात छत्रीधारी सैनिकांचा फार मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला. प्रथम नॉर्मन्डीच्या किना-यावर दोस्त सेना अुतरण्यापूर्वी ८ तास अगोदर ६०,००० अमेरिकन छत्रीधारी सैनिक मोक्याच्या ठिकाणी अुतरविण्यात आले. किना-यावर अुतरण्याचा दोस्त सैन्याच्या प्रगतीस अडथळा होऊ नये म्हणून किना-याकडे जाणा-या रस्त्यांवरील सर्व पूल अुडवून देणे, संचार स्थानके नष्ट करून वाहतूक रोखणे आणि अशा रितीने किना-यावर अुपस्थित असलेल्या जर्मन सेनेला कोणत्याही त-हेची रसद आणि कुमक मिळू नये या दृष्टीने सर्व प्रकारची कारवाअी करणे हे छत्रीधारी सैनिकांचे मुख्य काम होते. यानंतर सप्टेंबर १९४४ मध्ये झालेल्या आरनेम्हच्या लढाअीत (Battle of Arnhem) चार पुल हस्तगत करण्याकरिता जर्मन व्याप्त प्रदेशात

दोस्त सैन्याने अेक लाख छत्रीधारी सैनिक अुतरविले होते.

हवाअी-दलाचा युध्दावरील प्रभाव

(Influence of Air Power in War)

पहिल्या महायुध्दापर्यंतची २००० वर्षे भूमीवरील आणि सागरावरील लष्करी कारवाया असे युध्दाचे दुहेरी स्वरूप होते दुस-या महायुध्दात वायुसेनेच्या अुदयामुळे रणक्षेत्राच्या कारवाया तिहेरी स्वरूपाच्या झाल्या. (Three Dimentional) पृथ्वी, समुद्र आणि आकाश अशा तिन्ही ठिकाणी मानवी संघर्ष होणे अटळ ठरले. १९१९ ते १९३९ या केवळ २० वर्षांच्या काळात अिंग्लंड, फ्रान्स, रशिया व अमेरिका या प्रगत राष्ट्रांमध्ये भू-सेना आणि नौसेनेबरोबरच वायुसेना ही राष्ट्राच्या संरक्षण यंत्रणेतील अेक अत्यंत महत्त्वाचा दुवा बनली. वायुसेनेमध्ये शत्रूच्या प्रदेशात दूरवर जाअून महत्त्वाची ठिकाणे अुध्वस्त करणे (Deep Penetration Strike) या कामासाठी भारी बॉम्ब फेकी विमाने (Heavy Bombers), शत्रूची विमाने आपल्या प्रदेशात आल्यास त्यांचा मार्ग अडवून ती नष्ट करणे या कामासाठी फायटर अिंटरसेपटर्स (Fighter Interceptors), शत्रू प्रदेशाची टेहळणी करण्यासाठी आणि शत्रू स्थानकांची छायाचित्रे काढण्यासाठी टेहळणी आणि छायाचित्रण विमाने (Reconnaissance and Photo Aircraft), सैनिकांची आणि सामुग्रीची वाहतूक करण्यासाठी मालवाहू विमाने (Transport Aircrafts) अशी चार प्रमुख त-हेची विमाने वायुसेनेकडून वापरात आणली गेली.

वायुसेनेचे सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे प्रथम आपल्या देशात आणि नंतर रणक्षेत्र असलेल्या प्रदेशात हवाअी वर्चस्व (Air Supremacy) प्रस्थापित

दोस्त सैन्याने अेक लाख छत्रीधारी सैनिक अुतरविले होते.

हवाअी-दलाचा युध्दावरील प्रभाव

(Influence of Air Power in War)

पहिल्या महायुध्दापर्यंतची २००० वर्षे भूमीवरील आणि सागरावरील लष्करी कारवाया असे युध्दाचे दुहेरी स्वरूप होते दुसऱ्या महायुध्दात वायुसेनेच्या अुदयामुळे रणक्षेत्राच्या कारवाया तिहेरी स्वरूपाच्या झाल्या. (Three Dimentional) पृथ्वी, समुद्र आणि आकाश अशा तिन्ही ठिकाणी मानवी संघर्ष होणे अटळ ठरले. १९१९ ते १९३९ या केवळ २० वर्षांच्या काळात अिंग्लंड, फ्रान्स, रशिया व अमेरिका या प्रगत राष्ट्रांमध्ये भू-सेना आणि नौसेनेबरोबरच वायुसेना ही राष्ट्राच्या संरक्षण यंत्रणेतील अेक अत्यंत महत्त्वाचा दुवा बनली. वायुसेनेमध्ये शत्रूच्या प्रदेशात दूरवर जाअून महत्त्वाची ठिकाणे अुध्वस्त करणे (Deep Penetration Strike या कामासाठी भारी बॉम्ब फेकी विमाने (Heavy Bombers), शत्रूची विमाने आपल्या प्रदेशात आल्यास त्यांचा मार्ग अडवून ती नष्ट करणे या कामासाठी फायटर अिंटरसेपटर्स (Fighter Interceptors), शत्रू प्रदेशाची टेहाळणी करण्यासाठी आणि शत्रू स्थानकांची छायाचित्रे काढण्यासाठी टेहाळणी आणि छायाचित्रण विमाने (Reconnaissance and Photo Aircraft), सैनिकांची आणि सामुग्रीची वाहतूक करण्यासाठी मालवाहू विमाने (Transport Aircrafts) अशी चार प्रमुख तऱ्हेची विमाने वायुसेनेकडून वापरात आणली गेली.

वायुसेनेचे सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे प्रथम आपल्या देशात आणि नंतर रणक्षेत्र बनलेल्या प्रदेशात हवाअी वर्चस्व (Air Supremacy) प्रस्थापित

करणे हे होय. रणक्षेत्रात अशा त-हेचे वर्चस्व नसल्यास लष्करी हालचाली करणा-या आपल्या सेनेला शत्रूच्या वायुसेनेकडून होणा-या हवाअी हल्ल्यास तोंड द्यावे लागेल आणि त्यामुळे शत्रूशी लढण्याचे काम त्यांना करता येणार नाही. शत्रू प्रदेशात दूरवर जाअून शत्रूची शक्तिस्थानके नष्ट करणे (Strategic Bombing) हे वायुसेनेचे दुसरे महत्त्वाचे काम होय. ही दोन कामे करीत असतानाच रणक्षेत्रातील ज्या ज्या ठिकाणी शत्रूच्या प्रखर विरोधांमुळे आपल्या सेनेच्या कारवाअींची प्रगती होत नसेल तर शत्रूच्या जमावावर तुफानी बंबारी करून शत्रूला कमजोर करणे आणि आपल्या सैन्याला मदत करणे (Close Support) हे वायु सेनेचे तिसरे महत्त्वाचे काम होय. बाकी अितर कामे या कार्यांच्या अनुषंगानेच होत राहतात. दुस-या महायुद्धाच्या काळात युद्ध प्रविष्ट राष्ट्रांच्या वायुसेनेमध्ये २००० ते ४००० लढाऊ विमानांचा समावेश असे. १९४० च्या जून ते ऑगस्ट मध्ये जर्मनीने अिंग्लंड विरुद्ध भीषण हवाअी युद्ध सुरु ठेवले. त्यावेळी अेकट्या लंडन शहरावर अेका पाठोपाठ अेक अशा हजार-हजार जर्मन विमानांनी बॉम्बचा वर्षाव करून ब्रिटीश जनतेचा कणा मोडून काढण्याची पराकाष्ठा केली पण त्यात त्यांना यश आले नाही. युरोपच्या लढाअीत जुलै १९४४ मध्ये कान (Caen) येथे झालेल्या संग्रामात जर्मन सेनेने १००० रणगाडे रणक्षेत्रात आणल्यामुळे ब्रिटीश सेनेने वारंवार हल्ले करूनही कानचा कब्जा होत नव्हता हे अुद्दिष्ट साध्य करण्यासाठी ८ जुलै १९४४ रोजी केलेल्या अखेरच्या ब्रिटीश हल्ल्यापूर्वी दोस्त वायुसेनेच्या २५०० भारी बॉम्ब फेकी विमानांनी जर्मनीच्या रणगाड्यांचा जमाव मोडून काढला आणि त्यामुळेच कानच्या लढाअीत ब्रिटीश सेनेला विजय मिळाला आणि त्यांचा पॅरीसकडे आगेकूच करण्याचा मार्ग मोकळा झाला.

Th. 7042

अणुबॉम्बचा वापर

(Use of Atombomb)

१९४५ च्या अेप्रिल मध्ये जर्मन सैन्याने शरणागती पत्करल्यावर पश्चिम आघाडीवरील महायुध्द समाप्त झाले. अतिपूर्वेकडे मात्र जपानचा प्रतिकार चालूच होता. पॅसीफीक महासागरातील जपानने अंकीत केलेली सर्व ठिकाणे अमेरिकन सेनेने ताब्यात घेअुन फिलीपिन्स मधूनही जपानी सेनेस घालवून दिले. त्यामुळे प्रत्यक्ष जपानवर चढाअी करणे आणि जपान ताब्यात घेणे हा अेकच प्रश्न शिल्लक होता. लष्करी कारवाअी झाली तर जपान शेवटचा निकराचा प्रतिकार करेल आणि त्या प्रयत्नात अपरिमीत मनुष्यहानी आणि वित्त हानी होअील ही गोष्ट स्पष्ट होती. हे सर्व टाळावे म्हणून आणि सात वर्षे चाललेले जागतिक युध्द लवकरात लवकर संपवून जगाला शांतिचा दिलासा द्यावा या हेतूने नागासाकी आणि हिरोशिमा या दोन, वस्तीने गजबजलेल्या शहरांवर ७ आणि ८ ऑगस्टला अमेरिकन विमानांनी प्रत्येक दिवशी अेक असे फक्त दोन अणुबॉम्ब टाकले. या प्रत्येक बॉम्बची अणुशक्ती २० किलोटन या वजनाची होती. या दोन अणुबॉम्बच्या स्फोटाने ही दोन्ही शहरे भूअीसपाट होअून जवळजवळ चार लाख लोक मृत्युमुखी पडले आणि अितर चार लाख जखमी झाले. या भयानक हल्ल्यामुळे बिनशर्थ शरणागती पत्करण्याशिवाय जपान पुढे कोणताच पर्याय उरला नाही. अशा रितीने दुस-या महायुध्दाच्या शेवटी जगाच्या युध्दशास्त्रात अणुयुगाचा प्रारंभ झाला.

Th. 7042

प्रकरण चवथे

संदर्भसूची

१ Strategy : The Indirect Approach
B.H.Liddell Hart Ch. 11 to 18

२ History of Warfare Field Marshal
Montgomery Part 5 Ch. 18 to 21

३ The Makers of Modern Strategy Edward
Mead Earle

प्रकरण पाचवे

अत्याधुनिक युद्धशास्त्र : तत्व आणि पद्धती

(Sophisticated Warfare :
Principles and Practices*)

१९४५ च्या ऑगस्ट मध्ये नागासाकी आणि हिरोशिमा या जपान मधील दोन शहरांवर अॅटमबॉम्ब टाकून दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाला. आणि त्यानंतर युद्धशास्त्रातील अेका नव्या पर्वाची सुरुवात झाली. गेल्या ४० वर्षात अमेरिका आणि रशिया या दोन बड्या शक्तिंकडे अनेक प्रकारच्या कमी अधिक प्रमाणात सर्वनाश करणाऱ्या आण्विक शस्त्रास्त्रांचे प्रचंड साठे तयार झाले आहेत. ही शस्त्रास्त्रे अितकी शक्तिशाली आहेत की ज्या प्रदेशात या शस्त्रास्त्रांचा वापर करण्यात येईल तो प्रदेश बेचिराख होईल. ही भिती (Deterrent) या दोन्ही महाशक्तिंना वाटत असल्यामुळे जागतिक सुरक्षितेच्या दृष्टीने संघर्ष करण्याचे त्यांनी टाळले आहे आणि म्हणूनच गेल्या चार दशकात जागतिक महायुद्धाचा वणवा पेटलेला नाही.

शीत युद्ध

(Cold War)

आण्विक अस्त्रांच्या बाबतीत अत्यंत धोकादायक अशी कोणती गोष्ट असेल तर ती ही की काही मतभेद होऊन या दोन शक्तिंमध्ये तडजोडीचा मार्ग खुंटला आणि अेका शक्तिकडून केवळ अपघाताने (By Accident) किंवा केवळ बेअंदाजी हिशेबाने (Miscalculation) किंवा केवळ नैराश्याने (By Frustration) अण्वस्त्रांचा वापर केला गेला तर, दुसरी शक्ति त्याही पेक्षा प्रखर अशा अण्वास्त्रांचा वापर करून अधिक युद्धास प्रारंभ करेल व त्यातूनच

जागतिक अणुयुद्ध सुरू होईल (Chain Reaction) या चक्राओढीत सर्व मानव जातच होरपळून जाईल. १९७२ पासून गेली १२ वर्षे अण्वास्त्रबंदी करण्याकरिता अमेरिका आणि रशिया यांच्यात वाटाघाटी चालू असून काही करार-मदारही झाले आहेत. पण हे सर्व करार होऊन सुद्धा दोन्ही महाशक्तिंनी अत्याधुनिक अण्वास्त्रांच्या निर्मितीत कोणताही खंड पडू दिलेला नाही. या चमत्कारिक परिस्थितीमुळे प्रत्यक्ष युद्ध सुरू नसले तरी सर्व जगात युद्धसदृश्य परिस्थिती किंवा थंड युद्ध (Cold War) चालू आहे. गेल्या दोन वर्षात अत्याधुनिक युद्धशास्त्राने आणखी अेक पुढची पायरी गाठली असून ती म्हणजे अवकाशातील युद्धाची (Space War OR Star War) ही होय. अवकाशातील युद्धाचे समर्थन आणि तयारी अमेरिकेने सुरू केल्यामुळे त्याची प्रतिक्रिया म्हणून रशियानेही त्याच मार्गाने आपली तयारी करण्यास प्रारंभ केला आहे.

मर्यादीत युद्ध

(Limited War)

आण्विक शस्त्रस्पर्धेची (Neuclear Arms Race) हीच जरी दोन शक्तींमध्ये चालू असली तरी त्यामुळे युद्ध ही घटना जगातून नाहीशी झालेली नाही, फरक अेवढाच झाला आहे की १९५० पासून १९७५ पर्यंतच्या २५ वर्षांच्या काळात जगाच्या निरनिराळ्या भागात अनेक संघर्ष झालेले आहेत परंतु ते मर्यादित स्वरूपाचे आहेत. आजच्या जगात अमेरिकेशी जवळीक साधणारी राष्ट्रे आणि रशियाशी लागेबांधे असलेली राष्ट्रे दोन स्पष्ट गट राष्ट्रमंडळात दिसून येतात.

रशिया, अमेरिका आणि युरोपातील विकसित राष्ट्रे या सर्वांमध्ये पारंपारिक शस्त्रास्त्रांची (Conventional Arms) निर्मिती फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. शस्त्रास्त्रांची निर्मिती करणे आणि गरजू राष्ट्रांना ती विकणे हा अेक आंतरराष्ट्रीय व्यापार झालेला असून त्यामध्ये हजारो कोटी रुपये गुंतलेले आहेत. सहाजिकच अविकसित राष्ट्रांमध्येही मोठ्या शक्तिंना अनुसरून शस्त्रास्पर्धा सुरू आहे. त्यामुळेच छोट्या राष्ट्रांमधील मतभेद विकोपाला गेले की राष्ट्रे युध्द करण्यास अुत्सुक होतात. अुत्तर आणि दक्षिण कोरीयाचे युध्द, अमेरिका आणि व्हिअेटनाम यांचे युध्द, चीन आणि भारत यांचे युध्द, भारत-पाक संघर्ष, ~~अर्मा~~ अरब अिस्त्राअीली संघर्ष, अिराक-अिराण युध्द आणि लेबनॉनमधील संघर्ष ही सर्व मर्यादित युध्दांच्या मालीकेतील अेक लांब लचक यादीच होय. मर्यादित युध्दाचे वैशिष्टय असे की अशा तऱ्हेचे युध्द फक्त त्या दोन राष्ट्रातच मर्यादित राहून त्या दोन राष्ट्रांच्या प्रदेशाखेरीज अितर कोणालाही त्याची झळ पोहचत नाही या दोन्ही राष्ट्रांना मात्र त्या त्या विचारसरणीच्या महाशक्तिंकडून अनिर्बंधशस्त्र पुरवठा होत राहतो. परंतु अशा स्थानिक स्वरूपाच्या संघर्षात आपले राष्ट्र प्रत्यक्ष गुंतले जाणार नाही याची पूर्ण काळजी महाशक्तिंकडून घेण्यात येते. (No Direct Involvement) या परिस्थितीमुळे यातील पुष्कळ मर्यादित संघर्ष ४ ते ६ आठवड्यांपेक्षा जास्त काळ चालू शकत नाही. युध्दमान प्रवण दोन्ही राष्ट्रे संघर्षाने थकून गेली म्हणजे त्यांच्यावर दबाव आणून महाशक्ति त्यांना युध्दबंदी करण्यास भाग पाडतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर शस्त्रसंधी केला जातो.

प्राचीन काळापासून आजतागायत जगातील युध्दशास्त्राची अुत्पत्ति आणि प्रगति गेल्या साडेतीन हजार वर्षात कशी झाली याचा सर्वसाधारण आढावा

या पांच प्रकरणात घेण्यात आला आहे. आण्विक युध्द होईल की नाही किंवा ते झाले तर कधी होईल हे आज कोणीही सांगू शकणार नाही. परंतु याच बरोबर ही गोष्टही खरी आहे की युध्द ही घटना मानवी जीवनातून नष्ट झालेली नाही. ज्या ज्या ठिकाणी आणि ज्या ज्या वेळी मर्यादित अथवा अमर्याद संघर्ष होईल त्या त्या ठिकाणी आपण अभ्यासिलेल्या युध्द शस्त्रास्त्राची मूलभूत सूत्रे ही दोन्ही पक्षाच्या सेना सर्व शक्तिनिशी वापरात आणतील याबद्दल कोणतीहि शंका नाही.

प्रकरण पाचवे

संदर्भसूची

१ National Strategy and Nuclear War
Henry Kissinger

२ Korea - The Limited War-Michael Howard

भाग दुसरा

मराठ्यांचे युध्दशास्त्र

(Maratha Warfare)

प्रकरण

६ भारतीय युध्दनैतिक परिस्थिती (१६८०-१७२०)

७ मराठ्यांचे युध्दशास्त्र : तत्व आणि पध्दती

८ गुरिला युध्द पध्दत

प्रकरण सहावे

भारतीय युद्धनैतिक परिस्थिती

१६८०-१७२०

(Strategic Situation in India - 1680-1720)

सर्वसामान्य राजकीय परिस्थिती

(General Political Sitiation)

१६८० ते १७२० हा ४० वर्षांचा काळ भारताच्या राजकीय आणि लष्करी इतिहासात एक फार मोठ्या स्थित्यंतराचा काळ होता असे म्हणण्यास हरकत नाही. त्यापूर्वी जवळजवळ १५० वर्षे मोगल साम्राज्याची पकड भारताच्या बहुतेक सर्व भागात स्थिरावली होती. [illegible] औरंगजेब बादशहाची कारकिर्द ४० वर्षांहून अधिक काळ लांबल्यामुळे या साम्राज्यास उघडपणे आव्हान देणारी मराठ्यांखेरीज इतर कोणतीही शक्ति देशात निर्माण झालेली नव्हती. पश्चिम किनाऱ्यावरील गोव्या मध्ये स्थापन झालेली पोर्तुगीजांची वसाहत सोडल्यास इंग्रज, फ्रेंच आणि डच या परकीय राष्ट्रांचे अस्तित्व पश्चिम आणि पूर्व किनाऱ्यावर केवळ त्यांच्या व्यापारी वखारी पुरतेच मर्यादित होते. भारतातील सत्ताधाऱ्यांच्या [illegible] ते [illegible] देऊन व्यापाराची वृद्धी करावी अशाच मर्यादित हेतूने या राष्ट्रांचे व्यापारी प्रतिनिधी आपल्या कारवाया करीत असत. १७०७ मध्ये झालेल्या औरंगजेबाच्या मृत्यूनंतर जी [illegible] पोकळी निर्माण झाली आणि त्यामुळे पुढील ५० वर्षे मोगल सत्ता ही केवळ नाममात्र राहिली देशाच्या बहुतेक प्रत्येक भागात अंतर्गत कलहाचे एक विदारक चित्र उभे राहिले.

परकीय व्यापाऱ्यांपैकी विशेषतः इंग्रज आणि फ्रेंच या राष्ट्रांच्या प्रतिनिधींना भारतातील राजकीय परिस्थिती किती नाजूक आहे आणि अंतर्गत संघर्षामुळे अस्थिर परिस्थिती किती अनुकूल आहे याचे प्रत्यक्ष दर्शन झाले. या काळात त्यांच्या मायदेशी म्हणजे इंग्लंड व फ्रान्स येथे राजकीय स्पर्धा कशी चालू होती आणि आपली साम्राज्ये वाढविण्यासाठी या सत्ता कशा उत्सुक होत्या हे आपण युद्धशास्त्राचा अभ्यास करताना पाहिले आहे त्यामुळे साहजिकच भारतातील राजकीय गोंधळाचा फायदा घेऊन आपापल्या राष्ट्रांची सत्ता येथे प्रस्थापित करता आल्यास करावे ते प्रयत्न केले जावेत या दृष्टीनेच त्यांच्या हालचाली सुरू झाल्या. या कालखंडाच्या सुरुवातीसच मोगल सत्तेला आव्हान देणाऱ्या मराठी सत्तेचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे निधन झाल्यामुळे १७२० नंतर मराठ्यांच्या सत्तेचे पुनरुज्जीवन होईपर्यंत सर्व देशच निर्नायकी झाला. १७२० मध्ये थोरल्या बाजीरावाने पेशवाईची सूत्रे हाती घेतल्यावर २० वर्षांत अखंड मोहिमगिरी करून मराठी सत्तेचा अंमल सर्व उत्तर हिंदुस्थानभर पसरला. याच काळात मराठ्यांच्या आरमाराचे सेनापती कान्होजी आंग्रे यांनी संघटीत आणि शक्तिमान असे मराठ्यांचे आरमार तयार करून १८ व्या शतकाच्या अखेरपर्यंत पश्चिम किनाऱ्यावर आलेल्या इंग्रज आणि फ्रेंच या परकीय सागरी सत्तांना पूर्ण नियंत्रणाखाली ठेवून पश्चिम किनाऱ्यापलीकडे कोणत्याही लष्करी किंवा राजकीय हालचाल करण्याची संधी त्यांना मिळू दिली नाही. १७५५ ते १८१८ या शेवटच्या कालखंडात मात्र मराठी राज्यातील अंतर्गत हेव्यादाव्यांमुळे मराठी सत्तेच्या सामर्थ्याला फार मोठे तडे गेले. १७०७ नंतर औरंगजेबाचे निधन झाल्यानंतर दिल्लीतील मोगलांची केंद्रसत्ता ही नाममात्र राहिली. अशा रीतीने १८१८ मध्ये झालेल्या इंग्रज आणि मराठे यांच्यातील अखेरच्या लढाईत इंग्रजांचा

निर्णायक विजय झाल्यामुळे १८१८ नंतर भारतात मूळ धरून लागलेल्या इंग्रजी सत्तेला आव्हान देणारी कोणतीही शक्ति भारतात उरली नाही, त्यामुळे पुढील ४० वर्षांच्या काळात इंग्रजांना सर्व देशाचा ताबा घेऊन आपले साम्राज्य मजबूत पायावर उभे केले.

मोगल सत्तेचे लष्करी सामर्थ्य

(Military Power of the Mughal)

बाबरापासून औरंगजेब पर्यंत (१५२६ ते १७०७) जवळजवळ २०० वर्षांच्या मोगल साम्राज्याच्या इतिहासाकडे दृष्टीक्षेप केल्यास दोन गोष्टी प्रामुख्याने डोळ्या समोर येतात त्या म्हणजे अनियंत्री आणि शक्तिशाली केंद्रसत्ता आणि या सत्तेचा अंमल प्रत्यक्ष पार पाडण्यासाठी संख्येने आणि सामर्थ्याने युक्त असलेली प्रबळ अशी भू-सेना हा होय. बाबरापासून पुढे ही सत्ता वंशपरंपरेने चालल्यामुळे आणि तिचे अधिष्ठान दिल्ली आग्र्या मोगलांच्या ऐतिहासिक शहरांशी असल्यामुळे या सत्तेला सर्व शक्तिमान आणि अनियंत्री असण्यावाचून दुसरा पर्यायच नव्हता. त्या काळात सुद्धा भिन्नधर्म भिन्न भाषा आणि भिन्न आचार विचार असलेल्या देशाच्या निरनिराळ्या भागात स्थानिक शक्तींना त्यांच्या प्रदेशात मुक्त सत्ता देऊन केंद्रसत्तेशी त्यांची बांधीलकी कायम ठेवणे ही महत्त्वाची प्रथा मोगल साम्राज्याने प्रथमच सुरू केले. प्रत्येक प्रदेशावर बादशहाने नियुक्त केलेले सुभेदार आपापल्या प्रदेशात शक्तिमान असून केंद्रसत्तेला ठरवून दिलेला जमीन महसूल आणि करार मदारा प्रमाणे ठरलेल्या सेना दलाचा पुरवठा या दोन गोष्टींची तरतूद केल्यावर केंद्र सत्तेकडून त्यांच्या अंतर्गत कारभारात सहसा ढवळाढवळ करण्याचा आवश्यकता

दिल्लीत राहून साम्राज्य चालविणाऱ्या मोगल सम्राटांना कधीच वाटली नाही. महसूल गोळा करणे (Revenue Collection) आणि केंद्र सत्तेच्या संमतीने सैन्यबळाचा ताबा राखणे (Meintenance of Force) या दोन गोष्टी वगळता प्रादेशिक सुभेदार केंद्रसत्तेशी निगडीत असत, याच कारणामुळे मोगल राजवटीत सर्व देशाची अशी केंद्रीय सेना उभी राहू शकली नाही. परंतु अशी केंद्रीय सेना नसली तरी मोगल सेना म्हणून स्वतंत्र सेना अस्तित्वात होती. केंद्र नियंत्रीत सैन्य बनातांना त्या वेळच्या लष्करी प्रथे प्रमाणे मुख्य भर घोडदळावरच असे. मोगल सैन्याविषयी सविस्तर माहिती देणारी मूळ कागदपत्रे हैद्राबाद येथील पुरातत्त्व विभागात उपलब्ध आहेत या कागदपत्रांवरून असे दिसते की केंद्रनियंत्रीत मोगल सत्तेच्या घोडदळामध्ये सर्वात अधिक प्रमाण तुर्कस्थान, अरबस्थान आणि इराण येथून आयात केलेल्या घोड्यांचे असे. या घोडदळाचे अधिकारी दसहजारी, पंचहजारी किंवा दोनहजारी अशा संख्येने बहुधा मोगल राजघराण्यातील व्यक्ती आणि त्याचप्रमाणे तुर्की, अरबी, इराणी आणि अफगाण वंशाचे सरदार लोक यांच्या वर्गातील असत. या घोडदळाबरोबरच केंद्रनियंत्रीत मोगल सैन्य तोफखाना आणि बंदुकधारी पायदळ यांचाही मोठा भरणा होता. आपण यापूर्वी पाहिलेच आहे की १४,१५ आणि १६व्या शतकात तुर्कस्तान मध्ये तोफखाना आणि बंदुका या दोन शस्त्रास्त्रांचा विकास फ्रान्स आणि पोर्तुगाल सारख्या युरोपीय राष्ट्रांच्या बरोबरीने चालू होता. त्यामुळे तुर्कस्थान, इराण आणि अरबस्थान या देशातून येणारे आणि मोगल सैन्यात सेवा करणारे अधिकारी आणि सैनिक यांना ही शस्त्रास्त्रे चांगल्या प्रकारे परिचित होती.

मोगलांच्या लष्करी सामर्थ्याबद्दल दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक सेना विभागात [illegible] अर्धे सैनिक आणि अधिकारी मांडलिक आलेल्या

मनसबदार अधिकाऱ्यांच्या हुद्यातील असत. विशेषतः अकबराच्या वेळेपासून पुढे राजपुतान्यामधील बहुतेक सर्व राजांनी मोगल सत्तेचे सार्वभौमत्व मान्य केल्यामुळे राजपुताना आणि त्याजवळचा पंजाब या प्रदेशातील लढाऊ जमातीत मनसबदारी सैन्याच्या घोडदळात आणि पायदळात मोठ्या संख्येने भरती होत आणि यामुळेच महत्त्वाच्या अशा राजपूत मनसबदारांचे मोगल सैन्यात स्थान फार वरच्या दर्जाचे होते. अनेकवेळा तुर्की किंवा अफगाण सेनानीपेक्षा राजा मानसिंगासारख्या राजपूत सेनापती बद्दल बादशहाला अधिक विश्वास वाटे अनेक वेळा राजा मानसिंग किंवा राजा जयसिंग यांच्यासारख्या श्रेष्ठ सेनापतींची मोहिमेचे मुख्य अधिकारी म्हणून बादशहाकडून नियुक्ती होत असे. अशा तऱ्हेच्या मनसबदारी सैन्यात घोडदळ बरोबरच पायदळांचे प्रमाण अधिक होते. परंतु या दोन्ही दलांकडे ढाल, तलवार, भाले आणि धनुष्यबाण ही अस्त्रे सर्व सामान्यपणे वापरली जात. या मनसबदारी सैन्याचा सर्वात मोठा फायदा असा असे की देशाची भौगोलिक परिस्थिती त्यांना चांगल्या प्रकारे परिचित असल्यामुळे प्रत्यक्ष लढाईचे डावपेच व बारकावे नेमके हेरून लढाईचे नियोजन करण्यात मोगल सेनेला या दुय्यम सैन्याचा फार मोठा उपयोग होत असे. मराठ्यांच्या विरुद्ध झालेल्या संघर्षात ज्या मोगल सेना रणांगणात उतरल्या त्यामध्ये बहुतेक ठिकाणी राजपूत सैन्याचे मोठे गट मोगलांच्या बाजूने मराठ्यांविरुद्ध लढलेले आढळतात.

मोगल सेनेमध्ये त्या काळात युरोपात चालू असलेल्या तटबंद्यांचे तंत्र आणि वेढा घालण्याची पद्धत (Siege Craft) यांचाही विकास प्रगत स्वरुपात झाला असावा असे दिसते. किल्ल्याचे महत्त्व ओळखून मोगल सम्राट रणथंभोर, चितोड, मांडू आणि त्याचप्रमाणे रायगड, पुरंदर आणि जिंजी या सारखे मजबूत आणि अभेद्य किल्ले ताब्यात घेण्यासाठी वाटेल ती किम्मत

भेदण्यास तयार असत. वेढा घालण्याच्या तंत्रातही तटबंदीचा भंग करण्यासाठी किल्ल्यावर तोफांचा भडीमार करणे, किंवा दमदमे उभारून त्यावर तोफा स्थापन करणे आणि किल्ल्याचे दरवाजे तोडण्यासाठी हत्तींचा उपयोग करणे, या पद्धती मोगल सैन्यात अनेक वर्षे रूढ होत्या. अशा त-हेचा भारी शस्त्रसामुग्री केंद्र नियंत्रित मोगल सैन्याकडे असल्यामुळे घोडदळ, तोफखाना, मनसबदारी सैन्य आणि वेढा तोडण्याची सामुग्री या सर्व घटकांमुळे मोगल सेना ही एक शक्तिशाली सेना बनली. या सेनेची अधिकाधिक संख्या दीड ते दोन लाख पर्यंत होती असे सर्व साधारण अनुमान निरनिराळ्या काळात वापरण्यात आलेल्या सेना विभागांचे जे आकडे उपलब्ध आहेत त्यावरून करता येते.

मराठी लष्करी सत्तेचा उदय

(Rise of Maratha Military Power)

अकबरापासून औरंगजेब पर्यंत साधारणपणे सर्व उत्तर भारतात राजपूत ही जमात ज्या प्रमाणे मोगलांची मनसबदारी पत्करून मोगल सैन्यात आपले मनसबदारी सैन्य मोगल सम्राटाच्या लष्करी सेवेत सामील करीत असत. त्याचप्रमाणे दक्षिणेतील निजामशाही, आदिलशाही आणि कुतुबशाही या तीन प्रमुख बहामनी वंशाच्या इस्लामी राज्यांतून प्रबळ मराठा सरदार या स्थानिक राज्यकर्त्यांच्या सैन्यामध्ये दसहजारी किंवा पंचहजारी अशा त-हेचे लष्करी पद स्विकारून या राज्यांचे लष्करी बळ समर्थ करीत असत. सर्वसाधारणपणे अशा स्थानिक मराठा सरदारांचा उल्लेख आदिलशाही आणि निजामशाहीच्या कागदपत्रांमध्ये दख्खनी राजपूत असा केलेला आढळतो. या मराठा सरदारांच्या सेनेमध्ये

सामान्यपणे अेक तृतीयांश घोडदळ आणि दोन तृतीयांश पायदळ अशी अुपस्थिती असे. पंचहजारी सरदाराकडे १५०० ते २००० घोडदळ आणि ३५०० ते ४००० पायदळ या प्रमाणात प्रमुख दलांचा भरती केली जाअी. घोडदळामध्ये बारगीर आणि शिलेदार असे दोन वर्ग होते. बारगीराला घोडा आणि शस्त्रास्त्रे सरदाराकडून म्हणजेच पर्यायाने अिस्लामी राज्याकडून मिळत असे व त्याला महिन्याचा ठराविक पगार दिला जाअी या अुलट शिलेदार हे आपला स्वतःचा घोडा आणि शस्त्रास्त्रे घेअून सैन्य सेवेत दाखल होत आणि त्यांना मासिक वेतन मिळे. तलवार आणि ढाल या बरोबर भाला हे प्रमुख शस्त्र होते. पायदळामध्येही काही तुकड्या फक्त ढाल तलवार घेणाऱ्या सैनिकांच्या आणि काही तुकड्या ढाल तलवारी बरोबर भाले वापरणाऱ्या सैनिकांच्या होत्या. मराठा सरदारांना मंजूर झालेले सैन्य बाळगण्यासाठी सरंजाम किंवा जहागीर म्हणून काही प्रदेश सुलतानाच्या हुकमाने तोडून देण्यात येत असे. शिवाजी महाराजांचे पणजोबा मालोजी राजे भोसले दौलताबादच्या निजामशाहीचे पंचहजारी सरदार होते. त्यांच्यानंतर शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे यांनी प्रथम निजामशाहीत आणि नंतर विजापूरच्या आदिलशाहीत पंचहजारी म्हणूनच आपल्या लष्करी सेवेस प्रारंभ केला. पुढे त्यांना पुणे प्रांताची जहागीर देण्यात आली. मराठा सरदारांच्या सरंजामी सेनातील घोडदळ आणि पायदळामध्ये बहुसंख्य मराठ्यांचीच भरती होत असे. या परंपरेमुळे शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वी जवळजवळ १०० वर्षे महाराष्ट्रामधे अिस्लामी सत्ताधाऱ्यांच्या अमलाखाली का होअीना मराठ्यांची लष्करी आवड आणि युद्ध प्रशिक्षण क्रमाक्रमाने वाढत च राहिला. शिवाजी महाराजांनी सुरुवातीच्या काळात म्हणजे १६४५ पासून ते १६५५ च्या वाअीच्या लढाअीपर्यंत मावळातल्या मावळे लोकांची भरती करून पायदळी पथके अुभारली आणि आदिलशाही सेवेत असलेल्या निरनिराळ्या

लढायांमध्ये हस्तगत झालेल्या घोड्यांचा अुपयोग करून त्यामधून त्यांनी घोडदळाचे रिसाले तयार केले. १६५५ ते ७० या १५ वर्षांच्या काळात शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील पायदळाची संख्या जवळजवळ २०००० आणि घोडदळ जवळ जवळ १५००० ते २००००, अशी ४०००० च्या पुढे खडी सेना तयार झाली. स्वराज्याची सर्व सेना मराठी राज्याच्या अेकसूत्री अशा केंद्रीय नियंत्रणाखाली असावी असा त्यांचा आग्रह असल्यामुळे सैन्य ठेवण्यासाठी प्रदेश आणि वतन वंशपरंपरागत इनामी देण्याची पद्धत त्यांनी पूर्णपणे बंद करून टाकली. परंतु सैन्यामध्ये कोणताही असंतोष राहू नये म्हणून सैनिकांचे आणि अधिका-यांचे मासिक पगार वेळेच्या वेळी सरकारी तिजोरीतूनच मिळाले पाहिजे असा त्यांचा दंडक होता. घोडदळाच्या व्यवस्थेत पूर्वीपासून चालत आलेली जहागीर आणि शिलेदार ही पद्धत पुढे त्यांनी तशीच चालू ठेवली. १६७० ते १६८० या १० वर्षांच्या काळात शिवाजी महाराजांनी दक्षिण भारतात मद्रास पर्यंत दूरगामी मोहिमा सुरू केल्यामुळे मराठी सैन्य घोडदळाची संख्या जास्त होऊन त्या मानाने पायदळाची संख्या कमी झाली. १६७६ मध्ये मद्रास वर केलेल्या स्वारीत त्यांच्याकडे ६०००० ची फिरती फौज (**Mobile Field Force**) बरोबर होती. असा मद्रास येथील अीस्टअिंडिया कंपनीच्या कागदपत्रात स्पष्ट अुल्लेख आहे. यामध्ये केवळ घोडदळच ४०००० असून २०००० पायदळ होते असाही अुल्लेख केलेला आढळतो. याच काळात अिंग्रज आणि पोर्तुगीज यांच्याशी मैत्रीचे व्यापाराच्या सवलतीचे करार करून त्यांच्या बदल्यात पोर्तुगीज बनावटीच्या तलवारी आणि त्याचप्रमाणे बंदुका, तोफा, दारुगोळा (**Explosives**) आणि हातबॉम्ब (**Granades**) अशा पोर्तुगीज आणि अिंग्रज बनावटीच्या शस्त्रास्त्रांची मोठ्या प्रमाणावर आयात केली.

१६८० मध्ये शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर मराठी सत्तेची सूत्रे संभाजी महाराजांच्या हातात गेली त्यावेळी सैन्य संख्या जवळ जवळ ४०००० घोडदळ आणि २५००० पायदळ म्हणून होती असे दिसते. याशिवाय महाराष्ट्रात आणि महाराष्ट्रापासून जिंजीकडे संरक्षणाच्या दृष्टीने २०।४० किल्ले मराठी अमलाखाली होते. या किल्ल्यावर कमीत कमी २००० आणि अधिकाधिक ५००० घोडदळ आणि पायदळाची संमिश्र शिबंदी प्रत्येक किल्ल्यावर तैनात असे. याशिवाय प्रत्येक किल्ल्यावर लहान आणि मोठ्या तोफा, दारुगोळा, अन्न धान्य आणि वैरण यांचे साठे भरपूर प्रमाणात उपलब्ध असत. किल्ल्यावरील व्यवस्थेसाठी सबनीस आणि गडकरी असे मुलकी अधिकारी असून त्यांच्यावर किल्लेदार म्हणून लष्करी अधिकारी नेमला जात असे.

१६८० ते १७०० या २० वर्षांच्या काळात उत्तर महाराष्ट्रापासून जिंजीपर्यंत प्रथम संभाजी महाराजांविरुद्ध आणि नंतर छत्रपती राजारामाविरुद्ध मोगल सम्राट औरंगजेब याने अखंड संघर्ष चालू ठेवून मराठी सत्ता नष्ट करण्याचे आटोकाट प्रयत्न केले आणि तरीसुद्धा तो अयशस्वी ठरला याचे मुख्यकारण संभाजी आणि राजाराम यांच्यामागे ठामपणे उभी असलेली मराठ्यांची लष्करी सत्ता हे होय. भारताच्या इतिहासात देशाच्या इतर कोणत्याही भागात मराठ्यांखेरीज कोणाही स्थानिक शक्तिला इतका प्रदीर्घकाळ कोणत्याही मोगल सम्राटाला आव्हान देऊ शकला नाही. १७०० मध्ये झालेल्या राजारामाच्या निधनापासून ते १७१३ मध्ये छत्रपती शाहूने पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांना सेनाकर्ते हा किताब देऊन लष्कर प्रमुख नेमेपर्यंत १३ वर्षांच्या काळात कोणतेही केंद्रीय लष्करी नेतृत्व उपलब्ध नसताना देखील मराठी सेनेच्या विखुरलेल्या घटानी मराठी राज्याचे प्राणपणाने रक्षण केले आणि म्हणूनच पुढे थोरले बाजीराव

पेशवे यांनी १७२० मध्ये पेशवाईची सूत्रे हाती घेतल्यानंतर मराठी सत्तेचे पुनरुज्जीवन होऊ शकले. १७२० ते १८१८ या जवळजवळ १०० वर्षांच्या काळात मराठी सत्ता दक्षिणेतील जिंजीपासून उत्तरेस पंजाबपर्यंत आणि पश्चिमेस राजस्थानपासून पूर्वेस बंगाल ओरीसा पर्यंत पसरली. या काळात शिंदे, होळकर, गायकवाड आणि भोसले हे मराठे शाहीचे मातब्बर सरदार ६०००० ते ७०००० ची घोडदळ, पायदळ आणि तोफखाना यांनी सज्ज असलेली सेना जवळ बाळगून होते.

मराठ्यांच्या सागरी सत्तेचा उदय

(Rise of Maratha Naval Power)

मोगल साम्राज्याच्या जवळजवळ २०० वर्षांच्या राजवटीत मोगल सत्ता ही मुख्यतः भूसत्ता (Land Power) म्हणूनच टिकून राहिली. सागरी सत्तेकडे त्यांचे विशेष लक्ष कधीच गेले नाही. केवळ व्यापारासाठी सुरत हे एकमेव बंदर मोठ्या प्रमाणावर आयात निर्यातीचा व्यापार करीत असे. या व्यापाराला संरक्षण मिळावे म्हणून त्या काळात समुद्रावर अनेक वर्षे संचार करणा-या सिद्दी जमातीला हाताशी धरून आणि त्यांना अनेक प्रकारच्या सवलती देऊन मोगल सम्राटांनी सागरी रक्षणाची जबाबदारी सिद्दी जमातीच्या आरमारावरच टाकली होती.

याउलट शिवाजी महाराजांच्या वेळेपासून महाराष्ट्र आणि पश्चिम किनारा यांचे सान्निध्य लक्षात घेऊन सागरावरतीही मराठ्यांची सत्ता असली पाहिजे या वस्तुस्थितीची मराठा सत्ताधा-यांना पूर्ण जाणीव होती. किंबहुना

महाराष्ट्राचा पश्चिम किनारा ही स्वराज्याची पश्चिम ढाल असून ती नेहमी मराठ्यांच्याच अमलाखाली राहिली पाहिजे असा आग्रह शिवाजी महाराजांपासून तो थोरल्या माधवराव पर्यंत दिसून येतो. मुंबई, कल्याण आणि भिवंडी ही उत्तर कोकणातील ठिकाणे आणि विजयदुर्ग, सिंधुदुर्ग यासारखे सागरी किल्ले ही सर्व ठिकाणे कब्जात ठेवण्यासाठी आणि त्यांचा नाविक तळाप्रमाणे वापर करून सिद्दी, इंग्रज आणि पोर्तुगीज यांना शह देण्यासाठी स्वतंत्र मराठी आरमाराची गरज निर्माण झाली. १६५७ मध्ये कल्याण, भिवंडीचा ताबा घेतल्या वर शिवाजी महाराजांनी लढाऊ जहाजे निर्माण करण्यासाठी कारखाना उभारला. आणि पोर्तुगीज नौसेनेत काम केलेल्या नारोन्हा या पोर्तुगीज अधिका-याची जहाज बांधणी प्रकल्प प्रमुख म्हणून नियुक्त केले. याच प्रारंभावर १६७० ते ८० च्या सुमारास मराठी गलबते, मचवे आणि तारवे यांची एक प्रबळ नौसेना तयार झाली. कोकण पट्टीवरील समुद्राशी सतत संपर्क असणा-या मराठा खलाश्यांची मराठी नौसेनेत भरती होत असल्यामुळे सागरी सत्ता राखून स्वराज्याची किनारपट्टी संरक्षित ठेवण्याचे काम या सैनिकांनी आत्मीयतेने केले. विशेष आश्चर्याचा गोष्ट म्हणजे मराठ्यांच्या आरमारात कोणताही जाती धर्माचा फरक केला जात नसे आणि केवळ दर्यावर्दी गुणावरच मराठी आरमारातील खलाशी भरती केले जात अनेक वर्षे मराठी आरमाराचा प्रमुख म्हणून दौलतखान हा इस्लामी धर्मीय दर्यासारंग होता. त्याच्याच हाताखाली तांडेल म्हणून काम केलेले कान्होजी आंग्रे यांनी १७२१ च्या सुमारास मराठी आरमाराची प्रमुख सूत्रे हाती घेतली, आणि पुढील जवळजवळ ६०।७० वर्षे मराठी आरमार हा बलशाली नौसेना बनविला.

युध्दनैतिक आव्हाने

(Strategic Spectrum)

आतापर्यंत केलेल्या विवेचनावरुन ही गोष्ट स्पष्ट होईल की केवळ मराठे शाहीच्या दृष्टीने विचार केला तर असे दिसते की मोगल सम्राट औरंगजेब याच्या आक्रमणाने मराठी राज्याला जरी २६ वर्षे प्रखर संघर्षाला तोंड द्यावे लागले तरी मराठी सत्तेची लष्करी बैठक अत्यंत मजबूत पायावर उभी असल्यामुळेच इतका प्रदिर्घ संघर्ष करुनही मराठी सत्ता त्यातून सहीसलामत बाहेर पडू शकली. त्यातूनच पुढे मराठी स्वराज्याचे मराठी साम्राज्य निर्माण झाले. औरंगजेब बादशहाच्या हयातीमध्ये मोगल सत्तेला दुसरे आव्हान कुणीही देवू शकले नव्हते, परंतु १७०७ मध्ये बादशहाचे निधन झाल्यावर मोगली सत्ता एकदम ढासळली. सुभेदारी आणि मनसबदारी या दोन अनिष्ठ पद्धतीमुळे औरंगजेब सारख्या एकांगी राज्यकर्त्याचे नियंत्रण नष्ट झाल्याबरोबर निझाम सारखा सुभेदार आणि राजपूत मनसबदार आपापल्या प्रदेशात स्वतंत्र झाले आणि त्यामुळेच दिल्लीच्या तख्तावर असलेल्या नामधारी बादशहाचा वचक कोणावरही राहू शकला नाही. याउलट संभाजी महाराजांचा क्रूर वध आणि त्यांच्या पाठोपाठ ११ वर्षांनी छत्रपती राजारामाचे अकाली निधन हे दोन जबरदस्त धक्के मराठी सत्तेला बसले तरी मराठा सरदारांनी केवळ देश प्रेमाने प्रेरित होऊन मराठी राज्याचे रक्षण केले आणि त्यामुळेच पुढे १०० ते १२५ वर्षे मराठी राज्य हे अभिसत्ता म्हणून भारतात टिकून राहिले. १६८० ते १७२० या ४० वर्षांच्या काळात मोगल साम्राज्याची उतरती कळा, आणि इंग्रज व पोर्तुगीज या परकीय वखारवाल्यांचे व्यापारातच लागून राहण्याचे मर्यादित धोरण या दोन कारणांमुळे

केवळ युध्दनैतिक दृष्ट्या मराठी सत्तेची वाढ होण्यास दुसरा कोणताही विरोधी असा अडथळा नव्हता. मराठ्यांच्या सुदैवाने बाळाजी विश्वनाथ आणि त्याच्यानंतर त्यांचे पुत्र थोरले बाजीराव असा पराक्रमी पिता पुत्रांची जोडी मराठी सत्तेच्या संरक्षणासाठी लाभल्यामुळे मराठी राज्य वाढीस लागण्यास फार मोठी मदत झाली.

प्रकरण सहावे

संदर्भसूची

१ History of the Mahrattas Grent Duff -
Vol. 1-2

२ The Main Currents of Marathe History
G.S.Sardesai - Lecture~~r~~s 1 to 5

३ छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र. वा.सी.बेंद्रे

४ मराठी रियासत छत्रपती संभाजी खंड १ला, गो.स.सरदेसाई

प्रकरण सातवे

मराठ्यांचे युद्धशास्त्र : तत्व आणि पद्धती

(Maratha Warfare Principles and Practices)

मराठ्यांच्या युद्धशास्त्राचे वैशिष्ट्य

(Significance of Maratha Warfare)

मागील प्रकरणात आपण ही गोष्ट पाहिली की अुत्तर भारतात मोगल साम्राज्याची स्थापना झाल्यापासून ते थेट त्या साम्राज्याच्या अस्तापर्यंत आणि दक्षिण भारतातील बहामनी वंशाच्या सुलतानी राज्यातून अनुक्रमे राजपूत आणि मराठे या दोन लढाऊ जमाती मोगलांच्या आणि निजामशाही, आदिलशाही व कुतुबशाही या तीन अिस्लामी राज्यातून त्यांच्या सैन्यामध्ये फार मोठ्या संख्येने सैनिक आणि अधिकारी म्हणून काम करीत होत्या. त्यामुळे लष्करी पेशाचा राजपूत आणि मराठे या दोन्ही जमातींना जवळ जवळ २०० वर्षे पिढ्यांपिढ्यांचा अनुभव होता. अनेक महत्वाच्या लढायांमधून त्यांनी अिस्लामी सैनिक आणि अधिकारी यांच्या बरोबरीने युद्धातील कामगिऱ्या पार पाडल्या होत्या. ही परिस्थिती असली तरी राजपूत आणि मराठे या दोन जमातींमध्ये अेक मूलभूत व खास फार मोठा फरक राहील, हा फरक म्हणजे राजपुतांपैकी पृथ्वीराज चव्हाण, राणाप्रताप, आणि राणा संगा या तीन अैतिहासिक व्यक्तींशिवाय बाकी सर्व राजपूत राजांनी मोगलांचे स्वामित्व पत्करून त्यांच्या सैन्यात सैनिक व अधिकारी या नात्याने सेवा करणे अधिक पसंत केले. त्यामुळे राजपूत ही लढाऊ जमात असली तरी मोगल

सैन्याचा एक घटक म्हणून मोगल सम्राटांच्या अधिपत्याखालीच ते काम करीत राहिल्यामुळे आपली विशिष्ट अशी युद्धपद्धती ते निर्माण करू शकले नाहीत. या उलट छत्रपती शिवाजी महाराजांनी इस्लामी सत्तेचे स्वामित्व मंजूर करण्यास साफ नकार दिला आणि मोगल किंवा दक्षिणेतील सुलतानी राज्ये यांना उघड आव्हान देऊन मराठ्यांचे स्वतंत्र राज्य स्थापण्याचा निर्धार केला. मोगल सैन्याची संघटना, व्यवस्थापन आणि युद्धपद्धती यांचा अपूर्व अभ्यास करून त्यांच्यातील उणीवा त्यांनी नेमक्या हेरल्या आणि इस्लामी सैन्यांना वरचढ ठरणारी आणि पूर्णतः नवी अशी संघटना, व्यवस्थापन आणि युद्धपद्धती निर्माण केल्या. महाराष्ट्राच्या भूमीत जे काटक लोक उपलब्ध आहेत, त्यामध्ये लष्करी पेशास योग्य असणारे गुण ओळखले, महाराष्ट्रातील कमजोर परंतु वेगाने चाल करणाऱ्या घोड्यांचा उपयोग कसा करावा आणि महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती या सर्व घटकांचा दूरवर विचार करून महाराष्ट्राला सर्वांगाने साजेशी अशी आणि मोगलांना भारी ठरणारी एक नवीन युद्ध पद्धती सुरू केली हीच मराठ्यांच्या युद्धशास्त्राची मूलभूत बैठक होय. महाराष्ट्राला लाभलेली लांबलचक सागरी किनारपट्टी, सह्याद्री आणि त्यावरील किल्ले व नद्या आणि या सर्वांचा घेरा, यात असलेल्या महाराष्ट्राचा प्रदेश यांचा लष्करीदृष्ट्या पुरेपूर उपयोग करून घेण्याचे काम तंत्र शिवाजी महाराजांनी नव्याने प्रस्थापित केले. त्यांच्यानंतर पुढील १०० ते १५० वर्षे परिस्थिती झपाट्याने बदलली आणि मराठ्यांच्या युद्धतंत्रात टप्प्याटप्प्याने उत्क्रांति होत राहिली, अशी उत्क्रांति होत राहिल्या त्यामुळे १६४५ ते १८१८ या जवळपास २०० वर्षांच्या काळात आपली स्वतंत्र सत्ता स्थापन करणाऱ्या मराठ्यांना एक नवीन अशी लष्करी परंपरा सुरू केली. याच लष्करी परंपरेला मराठ्यांचे युद्धशास्त्र किंवा मराठा वॉरफेअर)

असे नाव देणे योग्य ठरेल. मराठ्यांच्या युद्धशास्त्राचे वैशिष्ट्य स्पष्ट करण्यासाठी आपण या पूर्वीच अभ्यासिलेल्या युद्धशास्त्राच्या जागतिक उत्क्रांतिचा आधार घेऊन मराठ्यांचे युद्ध शास्त्र हे त्यांच्या पूर्वीच्या आणि त्यांच्या वेळच्या युद्धशास्त्रापेक्षा वेगळे कसे होते हे आपणास पाहावे लागेल.

प्राचीन भारतीय युद्धशास्त्र
(Anceint Indian Waffare)

सर्वसाधारणपणे रामायण महाभारताच्या काळापासून म्हणजे ख्रिस्त शताब्दिपूर्वी १६०० वर्षांपासून ते ६व्या शतकात झालेल्या गुप्त साम्राज्याच्या अस्तापर्यंत म्हणजे जवळजवळ २२०० वर्षे भारतामध्ये जे युद्धशास्त्र प्रचलीत होते त्याला प्राचीन युद्धशास्त्र असे म्हणण्यास हरकत नाही. या काळात वंश परंपरागत चालत आलेल्या राज्यपद्धतीमुळे राजा किंवा महाराजा एकाच व्यक्तीमध्ये राज्याची किंवा साम्राज्याचा राजकीय आणि लष्करी सत्ता केंद्रीत झालेली असे. अशा तऱ्हेच्या साम्राज्यामध्ये त्या सम्राटाचे स्वामीत्व मानणारे इतर मांडलीक राजे सम्राटाच्या आज्ञेप्रमाणे काम करीत असत. साम्राज्याचा प्रदेश वाढावा (Territorial Expansion) आणि सम्राटाची सत्ता वृध्दींगत व्हावी या एकाच हेतू करता युद्धाचा प्रसंग उभा राहत असे. या काळातील सम्राट स्वतः ला "समरजन्त विजयी" म्हणजे शंभर लढाया जिंकणारा अशी पदवी प्राप्त करून घेत. या काळात प्रचलीत असलेली अश्वमेध यज्ञाची प्रथा म्हणजे लष्करी सत्तेच्या जोरावर राजकीय सत्ता प्रस्थापित करण्याचे एक तंत्रच होते असे म्हणण्यास हरकत नाही. सम्राटाचे प्रतीक असलेला घोडा बरोबर सैन्य घेऊन निरनिराळ्या दिशांना पाठविला जाई. जर एखाद्या प्रदेशात या घोड्याला स्थानिक सत्तेने अडथळा केला

तर ती स्थानिक सत्ता सम्राटाचे सार्वभौमत्व मानण्यास तयार नाही अशा त्याचा अर्थ केला जात असे. साहजिकच ते सार्वभौमत्व प्रस्थापित करण्यासाठी सम्राट आपली सेना घेऊन त्या स्थानिक सत्तेशी युद्ध करण्यास तयार होअी अशा त-हेच्या युद्धाचे युद्धनैतिक उद्दिष्ट (Strategic Aim) हे राज्याची अधिसत्ता वाढविणे आणि त्यातून नवीन देश जिंकून घेणे अेकमेव होते.

अशा त-हेच्या युद्धनैतिक उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी सम्राट जी सेना जवळ बाळगी ती आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे चतुरंग सेना असे. या सेनेत हत्तीदल, रथदल, अश्वदल आणि पदाती असे चार प्रमुख घटक असत. हत्ती, रथ आणि घोडे हा मानाची आणि वैभवाची प्रतिके असल्यामुळे या दलांमधून राजघराण्यातील पुरुष, राजाचे आप्तगण व राजाचे वरिष्ठ वर्गातील सरदार यांच्याच भरणा अधिक होता. हत्ती, रथ आणि अश्वदल हे तीन्ही घटक पायदळी सेनेपेक्षा जलद गतीने संचार करणारे असल्यामुळे युद्धामध्ये लागणारी गतिमानता (Mobility) त्यांना सहज साध्य होअी. साहजिकच या तीन घटकांच्या तुलनेने पदाती किंवा पायदळ यांचा दर्जा अत्यंत खालच्या श्रेणीचा होता आणि त्यामध्ये बहुधा वन्य जमाती आणि रानटी व क्रूर लोक यांचाच प्रामुख्याने भरती केली जाअी.

युद्ध पद्धतीबद्दल (Pattern of War) सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येअील की युद्धामध्ये दोन्ही पक्षांच्या सेना अेकमेका समोर मोठ्या समारंभ पूर्वक अुपस्थित होत असत, महाभारत युद्धाचे वर्णनात दर्शविलेले चित्र हीच गोष्ट सिद्ध करते. युद्धाचा प्रारंभ देखील निरनिराळी रणवाद्ये वाजवून आणि निरनिराळ्या वाद्यांचा घोष करून मग होत असे. अंधार होण्यापूर्वी रणांगणात लढत असणा-या सेना लढाअी बंद करून आपापल्या शिबीरात परत जात आणि रात्रीची विश्रांती घेऊन दुस-या दिवशी पुन्हा युद्धास प्रारंभ होत असे.

म्हणून अशा युद्धांना धर्मयुद्ध असे म्हटले जाई.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होअील की युद्धदृष्टि, सैन्याची संघटना आणि युद्ध करण्याची पद्धत या तीनही महत्त्वाच्या युद्धशास्त्रीय बाबतीत प्राचीन युद्धशास्त्राचे ठराविक असे काही नियम होते.

अिस्लामी युद्धशास्त्र

(Islamic Warfare)

सातव्या शतकाच्या प्रारंभी महंमद पैगंबराचा अुदय झाला (६१२ अे.डी.) आणि त्यानंतर लगेच आपल्या नवीन धर्माच्या प्रसारासाठी महंमदाने आपले अनुयायी जमवून मध्यपूर्वेतील बहुतेक देशातून संचार करण्यास सुरुवात केली. या नवीन धर्माचा अरबस्थान, तुर्कस्थान, अिराण आणि अफगाणिस्थान या देशात झपाट्याने प्रसार झाला आणि त्यातूनच पुढे अरब, तुर्की, अिराणी, तुराणी आणि दुराणी अशा निरनिराळ्या अिस्लामी वंशाचे लोक धर्माच्या प्रसाराकरिता जवळपासच्या प्रदेशात स्वाऱ्या करू लागले. या बहुतेक देशातून लोकसंख्या अतिशय मर्यादित होती. प्रत्येक देशाचा अर्धा अधिक भाग वाळवंट आणि डोंगर यांनी व्यापलेला असल्यामुळे मर्यादित असलेल्या लोकसंख्येला सुद्धा अुपलब्ध होणारे अन्नधान्य पुरे पडत नसे. वाळवंटी प्रदेशामुळे अत्यंत अुष्मा आणि अत्यंत थंडी अशी हवामानाची दोन टोके या देशात असत. या सर्व कारणांमुळे अिस्लामी धर्माचा प्रसार होअू लागल्यावर वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी सुपीक आणि समृद्ध अशा देशांवर लष्करी आक्रमण करून ते देश जिंकून घेणे आणि तेथे अिस्लामी सत्ता स्थापन करणे हेच बहुतेक अिस्लामी आक्रमकांचे युद्धनैतिक

अुद्दिष्ट असे. साहजिकच सत्ता स्थापन झाल्याबरोबर तेथील स्थानिक लोकांना धर्मांतर करण्यास भाग पाडून राज्यसत्तेच्या वाढी बरोबरच धर्माचा प्रसारही आपोआप होत राहील.

अिस्लामी धर्माचा प्रसार झालेल्या सर्व देशात जीवनोपयोगी अशा बाबींच्या गोष्टींची अुणीव असली तरी या देशांना अेक मोठे वरदान लाभले होते. हे वरदान म्हणजे अुच्च प्रतीच्या घोड्यांची पैदास हे होय, त्यामुळे आरबी, तुर्की आणि अिराणी घोडे हे जगातील सर्व घोड्यांपेक्षा अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे मानले जात. घोड्यांच्या जोडीला अुंटांची पैदासहि या देशामध्ये मोठ्या प्रमाणावर होती. वाळवंटी प्रदेशातील देशामधून पाण्याचे दुर्भिक्ष फार मोठे होते. त्यामुळे कोणत्याही प्रवासात जाताना वाहन म्हणून घोडा आणि पाण्याच्या पुरवठ्यासाठी अुंट ही मध्य पूर्वेतील देशांची अेक अतूट जोडी होती. याचबरोबर हवामानाच्या आत्यंतिक प्रकारांमुळे दूरवरचे अंतर कापून जाणे आणि अुन्हातान्हाची पर्वा न करता आपले काम चालू ठेवणे या दोन गोष्टी सवयीच्या वा त्यामुळे येथील लोकांमध्ये काटकपणा आणि आक्रमकवृत्ती जन्मतःच निर्माण होत असे. या गोष्टींचा परिणाम साहजिकच अिस्लामी देशांमधून अुभ्या राहिलेल्या लष्करी संघटनेवर झाला आणि घोडदळ हे अिस्लामी सेनेचे सर्वात प्रमुख अंग बनले. अि.स. ७१२ मध्ये महंमद बीन कासीमने केलेल्या भारतावरील पहिल्या स्वारी पासून ते १७३९ मध्ये अिराणच्या नादिरशहाने भारतावर केलेल्या शेवटच्या स्वारी पर्यंत अशी जवळजवळ तब्बल १००० वर्षे अिस्लामी आक्रमकांचा मुख्य भर घोडदळावर असे. अिराण, तुर्कस्थान किंवा अरबस्थान या देशांमधुन भारतामध्ये येण्यास हजारो मैलांचे अंतर यातऱ्हेच्या सेनेला कापावे लागे. या गरजेपोटी गतिमान अशा घोडदळाशिवाय त्यांना दुसरा पर्यायच नव्हता. घोडेस्वारांकडे तलवार

आणि भाला अशी दोन प्रमुख शस्त्रे असत. कोणतीही मोहीम यशस्वी करण्यासाठी गतिमानता (Mobility), अचानक चढाई (Surprise Action) आणि घबराहट निर्माण करण्याची क्षमता (Shock Action) या तिन्ही गोष्टी घोडदळाच्या वापरामुळे सहज शक्य होत. प्रत्यक्ष युद्धामध्ये बहुतेक सर्व ठिकाणी चढाई (Attack) हेच इस्लामी आक्रमकांचे मुख्य सूत्र असल्यामुळे बहुतेक लढायातून त्यांना विजय प्राप्त होत असे.

इस्लामी सेनांची ही परंपरा बाबरापासून मोगल साम्राज्याच्या अस्तापर्यंत आणि भारतामध्ये असलेल्या इतर इस्लामी राज्यातूनही ४०० वर्षे कायम राहिली. मोगल सेनेतही घोडदळावर मुख्य भर असून भारतातील मांडलीक झालेल्या स्थानिक राजा महाराजांचा पायदळ सेना विभागांचा योग्य त्या ठिकाणी वापर केला जाई. भारतातील राजे लोकांचे अनुकरण करून अकबराच्या वेळेपासून पुढे सेनेत असलेल्या अमीर, उमरावांसाठी हत्तींचा उपयोग ही मोगल सेनेत सुरू झाला.

अशा रीतीने धर्माच्या प्रसारासाठी नव्या प्रदेशांवर आक्रमक चढाई हे इस्लामी युद्धशास्त्राचे युद्धउद्दिष्ट होते. त्यांच्या सेनेच्या संघटनेत घोडदळाला अग्रक्रम होता. आणि चढाई हेच त्यांच्या युद्धशास्त्राचे प्रमुख सूत्र होते.

मराठ्यांच्या युद्धशास्त्राचे युद्धनैतिक उद्दिष्ट

(Strategic Aim Under Maratha Warfare)

प्राचीन युद्धशास्त्र आणि इस्लामी युद्धशास्त्र यांच्या पार्श्वभूमीवर

आता आपण मराठ्यांच्या युद्धशास्त्राकडे दृष्टी टाकली तर ही गोष्ट स्पष्ट होते की मराठ्यांचे युद्धनैतिक उद्दिष्ट हे अत्यंत वेगळे आणि विशिष्ट अशा ध्येय धारणाने प्रेरित झालेले होते. आपल्या स्वतःच्या देशात आपल्या लोकांचीच सत्ता स्थापन झाली पाहिजे आणि अशी सत्ता स्थापन करावयाची असल्यास सर्व त-हेच्या परकीय आक्रमणाला झुगारून देऊन ते आक्रमण नष्ट करून टाकले पाहिजे. हेच मराठ्यांच्या युद्धशास्त्राचे अंतिम उद्दिष्ट होते. याच अर्थाने शिवाजी महाराजांनी स्वराज्य या शब्दाचा मूलमंत्र महाराष्ट्रामध्ये वापरात आणला. अशा त-हेचे स्वराज्य स्थापन करणे ही एक परमेश्वरी इच्छा असून या इच्छेच्या आड येणा-या कोणत्याही शक्तीस प्राणपणाने प्रतिकार करून स्वराज्याची जोपासना केली पाहिजे असा ठाम निर्धार त्यांनी आपल्या ३५ वर्षांच्या (१६४५ ते १६८०) अखंड मोहिमगिरीत कायम ठेवला. स्वराज्याची स्थापना हेच त्यांच्या विशाल युद्धनीतीचे (Grand Strategy) अधिष्ठान होते असे म्हणावे लागेल. हे विशाल युद्धनैतिक उद्दिष्ट समोर ठेवून महाराष्ट्रातील राजकीय, लष्करी, आर्थिक आणि सामाजिक अशा सर्व शक्तींचा वापर त्यांनी स्वराज्य स्थापनेसाठी केला. प्रसिद्ध इंग्रज युद्धशास्त्रज्ञ लिडेल हार्ट याने असे म्हटले आहे की विशाल युद्धनीतीचे उद्दिष्ट हे देशातील सर्वोच्च अशा नेत्याने ठरवावयाचे असते. अशा त-हेचे उद्दिष्ट एकदा निश्चित झाल्यावर देशाची सर्वांगीण शक्ती या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी वापरात आणली गेली पाहिजे. या शक्तींमध्ये केवळ राजकीय आणि लष्करी शक्तींचाच समावेश होतो असे नव्हे तर राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक शक्तीचे पाठबळही अशा प्रयत्नात सामील झाले पाहिजे. १६८० ते १७१० या ३० वर्षांच्या काळात शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या मराठी सत्तेच्या विकासामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी आल्या. औरंगजेब सारखा समर्थ मोगल सम्राट दोन लाख सशस्त्र सेना घेऊन २७ वर्षे महाराष्ट्रात ठाण मांडून बसला.

शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर केवळ ९ वर्षांनीच मराठी सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्या संभाजी महाराजांचा वध झाला. त्यानंतर केवळ ११ वर्षांनीच संभाजी चे वारस छत्रपती राजाराम यांचे इ.स.१७०० मध्ये निधन झाले. १७०० ते १७०८ पर्यंत सत्तेला कोणी वारस नसल्यामुळे केंद्रीय सत्ता अदृश्य झाली आणि १७०८ मध्ये शाहू महाराज गादीवर आले तरी पुढील १२ वर्षे त्यांना या आपत्तीतून सावरण्यासच वेळ खर्च करावा लागला. इतक्या सर्व आपत्तीतून पुन्हा १७१८ ते १८१८ पर्यंत १०० वर्षे मराठी सत्ता वैभवाने अस्तीत्वात राहिली याचे एकमेव कारण म्हणजे शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राच्या जनतेपुढे ठेवलेले विशाल युद्धनैतिक युद्ध उद्दीष्ट हे होय. कोणत्याहि प्रकारची संकटे आली तरी त्यांचा जिद्दीने मुकाबला करुन मराठी सत्ता कायम राखली पाहिजे हाच महान मूल मंत्र मराठ्यांच्या युद्धशास्त्राचा गाभा होता.

१६८० पूर्वीचे मराठ्यांचे युद्धशास्त्र

(Maratha Warfare Prior to 1680)

या प्रबंधाचा कालखंड १६८० ते १७२० या ४० वर्षांच्या काळात मराठ्यांच्या युद्धशास्त्रात कोणती उत्क्रांति झाली याचा अभ्यास करणे हा आहे. याच कारणाकरिता स्वराज्याच्या स्थापनेपासून (१६४५) ते शिवाजी महाराजांच्या मृत्युपर्यंत (१६८०) या ३५ वर्षांच्या कालखंडात मराठ्यांच्या युद्धशास्त्रात कोणती उत्क्रान्ति झाली याची नोंद घेणे आवश्यक ठरते. या ३५ वर्षांच्या काळाकडे दृष्टी टाकल्यास असे आढळून येईल की मराठ्यांचे युद्धशास्त्र तीन प्रमुख टप्प्यांनी बदलत गेले हे तीन प्रमुख टप्पे म्हणजे १६४५ ते १६६० हा पहिला टप्पा, १६६० ते

१६७० हा दुसरा टप्पा आणि १६७० ते १६८० हा तिसरा टप्पा होय. १६४५ ते १६६० या १५ वर्षांच्या काळात मराठी सत्ता निश्चित आणि मजबूत पायावर उभी करणे हे प्रथम कर्तव्य होते, यावेळी सर्व महाराष्ट्रावर विजापूरच्या आदिलशाहीचा अंमल चालू असल्यामुळे आदिलशाही सत्ता झुगारून देऊन महाराष्ट्राच्या भूमीवर मराठ्यांचा सत्ता प्रस्थापित करणे ही अग्रक्रमाची बाब होती. प्रारंभीचा काळ असल्यामुळे मराठी सेनेची वाढ हळू हळू करणे प्राप्त होते. आदिलशाहीच्या संघटीत लष्करी सत्तेला उघड पणे आव्हान देणे शक्य नसल्याने प्रसंग पडेल त्याप्रमाणे उपलब्ध लष्करी शक्तीचा वापर करून विजापूरी सत्तेचे जाळे मिळेल त्या ठिकाणी तोडून टाकणे हा केवळ मार्ग शिवाजी महाराजांपुढे होता. हे उद्दिष्ट महाराष्ट्रातील उपलब्ध असलेल्या मनुष्यबळावर अवलंबून होते. म्हणून मावळातील मावळे लोकांची पायदळ सेना उभी करून आणि महाराष्ट्रातील दऱ्या-डोंगरांचा उपयोग किंवा फायदा घेऊन मोगल सेनेच्या तुकड्यांवर छुपे हल्ले करणे त्यांचे जमेल ते किल्ले मिळवून घेणे आणि शक्यत्या सर्व उपायांनी आदिलशाहीच्या लष्करी शक्तीचे खच्चीकरण करणे याच युद्धनीतीचा छक्क्यांना वापर करावा लागला. याच कारणामुळे या काळातील मराठ्यांच्या खच्चीकरणाच्या कार्यवाहीला मराठी इतिहासकारांनी गुरीला युद्ध पद्धतीचा किंवा गनिमी काव्याचा वापर असे नाव दिले. केवळ युद्धशास्त्राच्या दृष्टीने पाहिल्यास १६४५ ते १६६० या काळातील पुरंदरची लढाई (१६४८), जावळीची लढाई (१६५५), कल्याण-भिवंडीवरील मोहिम आणि अखेरीस प्रतापगडची लढाई (१६५५) या सर्व लष्करी कारवाया या बचावात्मक पवित्र्याचा (Defensive Posture) एक अखंड आविष्कार असून शत्रूच्या शक्तीचे पद्धतशीर खच्चीकरण हे या कारवायांचे प्रमुख सूत्र होते.

१६६० ते १६७० या १० वर्षांच्या काळात मराठ्यांच्या युद्धशास्त्राचे स्वरुप बचावात्मक पवित्र्यापासून आक्रमक बचाव (Offensive Defence) असे झालेले आढळते. १६६० च्या सुमारास मराठी सेनेची उपस्थिती २५००० पायदळ आणि जवळजवळ १५००० घोडदळ इतकी झाली आणि ही सर्व खडी सेना शिवाजी महाराजांच्या प्रभावी नेतृत्वाखाली आणि त्यांनी घालून दिलेल्या कठोर तसा शिस्तबद्ध चौकटीत काम करू लागल्यामुळे कोणत्याही शत्रूला ते अेक प्रबळ आव्हान ठरले. १६५९ मध्ये झालेल्या प्रतापगडच्या लढाईत स्वतः अफझलखान आणि त्याची सेना संपूर्णपणे नष्ट झाल्यामुळे १६६० च्या पुढील काळात विजापूरच्या आदिलशाही सत्ताधाऱ्यांना मराठ्यांशी वैर न पत्करता त्यांच्याशी सलोख्याचे धोरण ठेवावे लागले, पण हा अेक शत्रू कमजोर झाला तरी मोगल सम्राट औरंगजेब याच्या रूपाने मोगल साम्राज्याची सर्व ताकद मराठ्यांपुढे शत्रू म्हणून अुभी राहिली, तरीसुद्धा शक्य तेथे आक्रमक आणि अशक्य झाल्यास बचावात्मक असा आक्रमक बचावाचा नवीन पवित्रा शिवाजी महाराजांना अवलंबन करावा लागला. शाहिस्तेखानाविरुद्ध केलेला धाडशी हल्ला, कारतलबखानाविरुद्ध अुंबरखिंडीच्या लढाईत शाहीसेनेची केलेली दैना, सुरत आणि हुबळी या बाजारपेठांवर केलेले हल्ले, वणी दिंडोरीच्या लढाईत दाऊदखानावर केलेला हल्ला अुमराणीच्या लढाईत बहादूरखानावर केलेला हल्ला आणि शेवटी मोगलांच्या ताब्यात असलेल्या सिंहगड किल्ल्यावर तानाजी मालुसरे यांनी चढविलेला दुर्दम्य आणि प्राणघाती चढाअी ही मराठ्यांच्या आक्रमक पवित्र्याची ठळक अुदाहरणे म्हणून सांगता येतील. परंतु याचबरोबर ८०००० ची सेना घेऊन राजा जयसिंग आणि दिलेरखान यांनी पुरंदरला चार महिने वेढा घातल्यानंतर किल्ला लढवूनही शिवाजी महाराजांनी बचावात्मक पवित्रा घेतला आणि

जयसिंगाशी तहसंधी करून बादशहाच्या भेटीसाठी आग्र्यास जाण्याचे मान्य केले.

१६७० ते १६८० ही १० वर्षे हा मराठ्यांच्या युद्धशास्त्राचा एक वैभवशाली काळ होता असे म्हणता येईल. या काळात महाराष्ट्रातील बहुतेक सर्व किल्ले आणि महाराष्ट्रापासून दूर असा जिंजीचा अभेद्य किल्ला मराठ्यांच्या सत्तेखाली आले. या प्रत्येक किल्ल्यावर पायदळ घोडदळाचे मिश्र सैन्य अशी शिबंदी जमा झाली आणि त्या बरोबरच अन्नधान्य आणि दारूगोळा यांचे भरपूर साठे प्रत्येक किल्ल्यावर करण्यात आले. किल्ल्यांच्या आतील प्रशासन कोणतेही संघर्ष न होता योग्य रितीने चालावे या हेतूने सरकार नियुक्त अशा मुलकी आणि लष्करी अधिकाऱ्यांची नियुक्ति करण्यात आली. या सर्व किल्ल्यांवरील शिबंदी शिवाय ४००० घोडदळ आणि २०००० पायदळ आणि हलक्या व भारी तोफा असलेला तोफखाना अशा तिन्ही अंगानी सज्ज असलेली एक फिरती सेना (Mobile Field Force) तयार झाली. या वाढत्या शक्ति मुळे सहाजिकच बचावाचा पवित्रा घेण्याचे कारणच उरले नाही. त्यामुळे संपूर्ण आक्रमक पवित्र्याचा (Full Scale Offensive) वापर करून शिवाजी महाराजांनी दक्षिण भारतात मध्य मोहिम हाती घेतली. या मोहिमेच्या अखेरीस संपूर्ण दक्षिण भारतात मराठ्यांच्या घोडदौडीला कुणीही आव्हान देऊ शकले नाही आणि त्यामुळे मद्रास, कांजीवरम पर्यंत मराठ्यांचा दरारा प्रस्थापित करून विजयी मराठी सेना महाराष्ट्रात परत आली. भू सेनेच्या या विकासाबरोबरच मराठ्यांच्या नौसेनेची किंवा आरमाराची ताकदही या १० वर्षात झपाट्याने वाढली. इंग्लीश आणि पोर्तुगीज आरमाराला खुल्या समुद्रात आव्हान देऊन मराठ्यांच्या आरमाराने आपले वर्चस्व सुरतेपासून कारवारपर्यंत संपूर्ण किनारपट्टीवर

प्रस्थापित केले.

अशा रितीने २५ वर्षांचा अखंड काळ मराठ्यांच्या युध्दशास्त्राची जाणिव पूर्वक आणि पध्दतशिर उत्क्रान्ति होत गेल्यामुळेच पुढील ४० वर्षांत अनेक संकटांचा मुकाबला करून मराठी सत्ता मजबूत पायावर उभी राहू शकली.

प्रकरण सातवे

संदर्भसूची

१ Strategy : The Indirect Appraoch
B.H.Lid[illegible]rt Ch.19 to 22

२ The Main Currents of Maratha History
G.S.Sardesai - Lectures 1 to 5

३ The Army of the Indian Mughals its Organisation and Administration - William Irvine.

४ ON War - Gen Carl Von Clauswitz Vol.3

५ Rise of the Maratha Power M.G.Ranade

६ The Military System of the Marathas
S.N.Sen

७ A History of the Maratha People C.A. Kincaid and Rao Bahadhur Parasnis Vol.2

प्रकरण आठवे

गुरिला युद्ध पद्धत
(Guerilla Warfare)

व्याख्या आणि व्याप्ती
(Definition and Scope)

मराठ्यांच्या युद्धशास्त्राबद्दल बोलताना किंवा लिहिताना हे युद्धशास्त्र म्हणजे गुरीला युद्ध पद्धत असा समज गेली १०० वर्षे भारतात रूढ झालेला आहे. असे होण्याचे मुख्य कारण असे की मराठ्यांच्या युद्धशास्त्राची केवळ लष्करी दृष्टीकोनातून अभ्यास चिकित्सक चर्चा न झाल्यामुळे हा सामान्य समज झालेला आढळतो. याच समजुतीच्या आधारावर मराठ्यांचे युद्धशास्त्र म्हणजे गनिमीकावा असेही म्हटले जाते. हे गैरसमज दूर होण्यासाठी गुरिला या शब्दाची व्याख्या आणि व्याप्ती समजून घेणे आवश्यक आहे. गुरिला हा शब्द गेयर (Guer) म्हणजे लढाई किंवा युद्ध या फ्रेंच शब्दापासून झालेला आहे. या शब्दापासून पुढे गुरिला (Guerille) हा शब्द प्रयोग एका विशिष्ट युद्धपद्धतीच्या युद्धाला अनुलक्षून वापरला गेला. सर्वसामान्यपणे समोरासमोर होणारा संघर्ष म्हणजे युद्ध ही रूढ समजूत असल्यामुळे शत्रूला आमने सामने तोंड न देता त्याच्यावर अनेक त-हेने छुपे हल्ले करून त्याची शक्ति क्षीण करण्याचा एक मार्ग या दृष्टीकोनातून जो संघर्ष निर्माण होतो त्याला गुरिला युद्धपद्धत असे म्हणण्यात येऊ लागले. युद्धशास्त्राच्या उत्क्रांतिमील पहिल्या १००० वर्षांच्या काळात दास्यत्व (Boundage) आणि गुलामी (Slavery) यांनी पिडलेल्या

जमाती आपल्यापेक्षा अधिक संघटीत आणि प्रबळ अशा सत्ताधाऱ्यांविरुध्द जुलमाचा प्रतिकार करण्यासाठी ज्या युध्द सदृश्य कारवाया करीत त्यांना गुरिला असे म्हटले जाई. मॉंटगोमरी यांच्या म्हणण्याप्रमाणे गुरिला पध्दतीचा अवलंब सर्व प्रथम करणारी पहिली जमात म्हणजे स्पेन मधील लोक होत. ख्रिस्त शताब्द पूर्वी १११ मध्ये रोमन साम्राज्याच्या प्रचंड सामर्थ्या विरुध्द स्पेन मधील काही जमातींनी प्रतिकाराचे शस्त्र उपसले आणि तेव्हा पासूनच संघटीत आणि प्रस्थापित अशा कोणत्याही बलाढ्य शक्ति विरुध्द सुरु होणाऱ्या संघर्षास गुरिला युध्द अशी संज्ञा प्राप्त झाली. कालांतराने अशा तऱ्हेची युध्द पध्दत यशस्वी होण्यासाठी गतिमानता, अचानक कारवाई, फसवेगिरी (Deception) आणि चाणाक्ष युक्त्या (Cunning) या प्रमुख सूत्रांवर गुरिला व दलिचे युध्द सुरु झाले आणि त्यातूनच पुढे "मारा आणि नाहिसे व्हा" (Hit and Run) या तत्वाचा गुरिला युध्द पध्दतीत समावेश झाला.

वर वर्णन केलेल्या गुरीला युध्द व दलिता काही विशिष्ट अशा मर्यादा होत्या. अशा तऱ्हेचे छुप्या युध्दाचे क्षेत्र हे देशातील काही भागापुरते मर्यादीत असे. या युध्दास प्रवृत्त होणारी जमात हि प्रस्थापित सत्तेच्या तुलनेने राजकीय दृष्ट्या नगण्य, आर्थिक दृष्ट्या शोषण केलेली आणि सामाजिकदृष्ट्या उपेक्षित राहिलेली अशी असल्यामुळे कोणत्याही तऱ्हेची मजबूत संघटना मोठ्या प्रमाणावर उभी करणे अशक्य होते. अशाच अन्याया विरुध्द प्रतिकार करुन त्यातून मुक्त होणे केवळ मर्यादीत उद्देश अशा तऱ्हेच्या युध्दाचा असतो. या सर्व मर्यादांमुळे गुरिला व दलिचे युध्द प्रदीर्घ काळ टिकू शकत नाही.

परकीय शक्तींना मराठ्यांचे आव्हान

(Maratha challenge to Alien Powers)

मराठी सत्तेच्या उदयापूर्वी गुरिला युद्धपद्धत ही कोणत्या स्वरूपात अस्तित्वात होती याची चर्चा वर केलेलीच आहे. त्या चर्चेतील मुख्य मुद्दे ध्यानात घेतले तर हा मुद्दा स्पष्ट होण्यास हरकत नाही की मराठी सत्तेचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रथम विजापूरची आदिलशाही आणि नंतर दिल्लीची मोगलशाही या भारतात राज्य करीत असलेल्या परकीय शक्तींना जे उघड उघड आव्हान दिले त्याला कोणत्याही मर्यादा नव्हत्या हे आव्हान विचारपूर्वक केलेल्या अत्यंत उच्च अशा राजकीय, आर्थिक आणि नैतिक अधिष्ठानावर उभारलेले होते. केवळ इस्लामी सत्ता झुगारून देणे एवढाच मर्यादित उद्देश शिवाजी महाराजांच्या सर्व योजनेमागे नव्हता. परकीय सत्ता झुगारून देऊन आपल्या देशात आपलेच राज्य झाले पाहिजे आणि त्या राज्यात कुणबी व अशा सर्व जमातींना सन्मानाने राहता आले पाहिजे ही उदात्त भावना हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याच्या ध्येयामागे अधिष्ठीत होती. वरील त-हेच्या नैतिक बैठकीवर उभारणार असा सर्व सामान्य माणसांचे सहकार्य मिळाल्याशिवाय राजसत्ता फारकाळ टिकू शकणार नाही याची तीव्र जाणीव शिवाजी महाराजांना होती. लोकांचे सहकार्य हा गुरिला युद्धपद्धतीचा एक पाया आहे. संघटना नसल्यामुळे सामान्य माणसांच्या सहकार्याशिवाय हे गुरिला युद्ध यशस्वी होऊ शकत नाही, या त-हेचे व्यापक सहकार्य स्वराज्य स्थापनेच्या कामात शिवाजी महाराजांना

नेहमी मिळत गेले ही गोष्ट मराठ्यांची युध्दपध्दती आणि गुरिला युध्द पध्दती यांच्यात समान म्हणून सांगता येईल परंतु या दोन पध्दतींमध्ये महत्त्वाचा फरक असा होता की मराठी सत्ता दिवसेंदिवस वाढत असतांना ती समर्थ आणि वैभवशाली व्हावी या दृष्टीने अष्टप्रधान पध्दती सारखी आधुनिक धर्तीची राज्यव्यवस्था आणि आपण पूर्वीच्या प्रकरणात पाहिल्या प्रमाणे सुसंघटित अशी सैन्य व्यवस्था, २५ वर्षे अखंड मोहिमगिरी करुन सुध्दा शिवाजी महाराजांनी उभी केली आणि ती केवळ त्यांच्याच हयातीत नव्हे तर त्यांच्या निधनानंतर १५० वर्षे टिकली. या एका गोष्टीवरुनच ही गोष्ट सिध्द होईल की मराठ्यांच्या युध्दपध्दतीला गुरिला युध्दपध्दत म्हणून संबोधणे हे केवळ चूकच आहे असे नव्हे तर मराठ्यांच्या युध्द पध्दतीचे महत्व कमी लेखणे असा त्याचा अर्थ होईल.

गुरिला युध्द पध्दतीची तात्त्विक बैठक

(Ideological Basis of Guerilla Warfare)

एखादा विशिष्ट ध्येय धोरणाने प्रस्थापित सत्तेविरुध्द संघर्ष सुरु करणारे शिवाजी महाराज हे एका अर्थाने गुरिला युध्दपध्दतीचे जनक म्हणावे लागतील हा संघर्ष त्यांनी सुरु केला त्यावेळी तो अत्यंत मर्यादित असा पुणे जहागिरीतच सुरु केला. वास्तविक पाहता ही जहागिर त्यांच्या कडे सरंजामी हक्काने विजापूरच्या आदिलशाही कडून मिळाली होती याच कारणामुळे आदिलशाही कडून त्यांना येणाऱ्या फर्मानात "बगावत महाराज शिवाजी राजे" असा उल्लेख करण्यात येई या दृष्टीने पाहिल्यास [illegible]

गुरिला चळवळ मराठ्यांप्रमाणेच प्रारंभीच्या काळात त्यांना आपला संघर्ष केवळ लोकांच्या सहकार्यावर अवलंबून राहून मर्यादित असा सामना करावा लागला, परंतु या मर्यादित संघर्षाला एक ध्येय-धोरण असल्यामुळे त्या संघर्षाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत गेली आणि त्यातूनच संघटीत अशी मराठी सत्ता उभी राहिली. त्यांच्या पूर्वीच्या काळात झालेल्या गुरिला युद्धपद्धतीच्या युद्धांमध्ये अशा प्रकारच्या ध्येयधोरणाचा अभाव असल्यामुळे स्वतंत्रपणे सत्ता प्रस्थापित करणे त्यांना शक्य होऊ शकले नाही. परकीय सत्ताविरुद्ध सुरू केलेला संघर्ष हे एका अर्थाने राजकीय बंड होते किंवा राजकीय क्रांतिचा तो एक भव्य प्रयत्न होता असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. या कारणामुळेच १६४५ ते १६६० या काळात शिवाजी महाराजांना डाकू किंवा लुटारू या नावाने ओळखणारे ईस्ट इंडिया कंपनीचे इंग्रज अधिकारी १६६० नंतर त्यांचा उल्लेख 'महान बंडखोर' (The Grand Rebel) असा करू लागले. मराठी सत्तेच्या उदयानंतर पुढील १०० वर्षांत अशा त-हेचे बंड जगातील निरनिराळ्या देशांत झाले. १६४० मध्ये इंग्लंडमध्ये इंग्रज लोकांनी आपल्याच राजाविरुद्ध लोकांची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी बंड केले. त्याला इतिहास राज्यक्रांति असे नाव देतो. त्यानंतर १७७६ मध्ये अमेरिकेच्या वसाहतीतील लोकांनी त्यांच्याच वंशाच्या परंतु परकीय अशा इंग्लिश साम्राज्याविरुद्ध बंड पुकारून सशस्त्र संघर्ष सुरू केला आणि त्यात ते यशस्वी झाले म्हणून त्याला आपण अमेरिकन राज्यक्रांति असे म्हणतो, त्याच्या पाठोपाठ फ्रान्स मध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ह्या तीन तत्वे प्रस्थापित करण्यासाठी फ्रेंच जनतेने आपल्याच राजाविरुद्ध बंड पुकारून देशात राजक्रांति घडवून आणली त्याला फ्रेंच राज्यक्रांति असे म्हणतात, थोडक्यात

साम्यवादाची राजकीय आणि आर्थिक तत्वे अमलात आणण्यासाठी लेनीनच्या नेतृत्वाखाली रशियातील शेतकरी आणि कामगारांनी आपल्याच रक्ताच्या झार या बादशहा विरुद्ध बंड पुकारले आणि रशियाची राज्यक्रांति घडवून आणली, यानंतर तीच तत्वे प्रत्यक्षात आणण्यासाठी आधुनिक गुरिला युद्धाचा जनक ही पदवी प्राप्त झालेला चीनचा नेता माओ झेडौंग यानेही प्रस्थापित चीनी राजसत्तेविरुद्ध बंड पुकारुन चीनमध्ये राज्यक्रांति घडवून आणली या सर्व राज्यक्रांत्यामध्ये वॉशिंग्टन, नेपोलियन, लेनीन आणि माओ झेडौंग यांच्या नेतृत्वाखाली राज्यक्रांति यशस्वी करणाऱ्या सशस्त्र सेनेला क्रांतिकारी सेना किंवा मुक्तिसेना (Revolutionary Forcess OR Liberation Forcess) असे म्हटले जाते. या ऐतिहासिक घटनांकडे पाहता १०० वर्षांपूर्वी मराठ्यांना परकीय सत्तेविरुद्ध सुरु केलेला संघर्ष हे केवळ एक गुरिला युद्धपद्धतीचे युद्ध नसून ती एक यशस्वी राज्यक्रांति होती असेच निर्विवादपणे म्हणावे लागेल, आणि म्हणूनच इतर देशातील क्रांतिकारी सेनेने जे एक स्वतंत्र युद्धशास्त्र निर्माण केले त्याच प्रमाणे मराठ्यांनी आपल्या १०० वर्षांच्या राजकीय इतिहासात मराठ्यांचे असे वैशिष्ठ्य पूर्ण युद्धशास्त्र वापरात आणले.

गुरिला युद्धाची आर्थिक बैठक

(Financial Basis of Guerilla Warfare)

मराठ्यांना सुरु केलेला संघर्ष आणि सामान्य गुरिला युद्धपद्धत

यांच्यात आणखी एक गोष्टीचे साम्य होते आणि ते म्हणजे आर्थिक विवंचना हे होय. (Financial Problems). सामान्यपणे गुरिला युद्धपद्धतीचा अवलंब करणाऱ्या जमाती आर्थिक दृष्ट्या कमजोर असल्यामुळे संघर्ष चालू ठेवण्याकरिता लागणारे भरपूर द्रव्यबळ त्यांच्याकडे नसते आणि म्हणून असे द्रव्यबळ मिळविण्यासाठी त्यांना अनेक वेळा छापामारी आणि लुटालूट करणे आवश्यक होते. मराठी सत्तेच्या प्रारंभीच्या काळात ही समस्या वारंवार निर्माण झाली. १६५७ मधील कल्याणच्या खजिन्यावर केलेला छापा आणि लुटालूट आणि पुढे सुरतेवर चालेले दोन हल्ले आणि हुबळी येथे केलेली लुटालूट ही पैशाच्या अभावीच हाती घेण्याचा प्रसंग आला. १६७० नंतर मात्र मराठी सत्तेची राजकीय आणि लष्करी स्थिती इतकी सुदृढ झाली की अशा तऱ्हेची लुटालूट करण्याची गरजच राहिली नाही. १६८० ते १७०० या २० वर्षांच्या काळात मात्र मोगल, सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्या विरुद्ध अखंड संघर्ष चालू झाल्यामुळे बऱ्हाणपूर, धरणगाव व चोपडा आणि गुजराथेतील सुरत आणि भडोच अशा भरभराटीस आलेल्या बाजारपेठांवर हल्ले करून त्यांची लुटालूट करण्याची गरज मराठी सेनेला उत्पन्न झाली. १७०० ते १७०७ या ७ वर्षांच्या काळात विखुरलेल्या मराठी सेनेच्या तुकड्या युद्धसज्ज ठेवण्यासाठी मोगलांच्या छावण्यांवर हल्ले करून त्यांची युद्धसामग्री, अन्नधान्य आणि दारुगोळा ही लुटून नेणे हा मराठी सेनेचा एक प्रमुख प्रयत्न राहिला.

मराठ्यांच्या युद्धशास्त्राचे सांस्कृतिक अधिष्ठान
(Cultural Basis of Maratha Warfare)

सामान्य गुरिला युद्धपद्धत आणि मराठ्यांचे युद्धशास्त्र यांच्यात एक

अत्यंतमहत्वाचा कारक म्हणजे गुरिला पद्धतीत सहसा आढळून न येणारी धार्मिक आणि सांस्कृतिक ऐक्य मराठ्यांच्या युद्धास्त्रामागे होतो. मराठी सत्तेचा उदय (Rise of Maratha Power) या विख्यात ग्रंथामध्ये न्यायमूर्ती रानडे यांनी म्हटल्याप्रमाणे मराठी सत्तेच्या प्रत्यक्ष उदयापूर्वी ~~जवळजवळ~~ ४०० वर्षे ज्ञानेश्वरांपासून तुकाराम - रामदासांपर्यंत सर्व थरातून पुढे आलेल्या साधु संतांनी धर्माच्या तत्वांवर विचार मंथन करून एका प्रबोधनासच (Renaissance) चालना दिली होती. धर्माच्या मूळ तत्वांबरोबर समाजात रूढ झालेल्या अनिष्ट पद्धती नष्ट केल्या पाहिजेत, समाज एकजीव होण्यासाठी जातीभेदांची बंधने तोडली पाहिजेत आणि सर्व अर्थाने मुक्त असा नवीन समाज निर्माण झाला पाहिजे, अशा तऱ्हेची शिकवण सामान्य माणसांना समजणाऱ्या अभंग आणि ओव्या यांच्या रूपाने महाराष्ट्रात प्रचलित झाली. याच विचारसरणीचा पुढचा आविष्कार म्हणजे धर्मावर होणारा जुलूम थांबविण्यासाठी परकीय सत्तेचे उच्चाटन केले पाहिजे ही भावना आपोआपच महाराष्ट्रात जागृत झाली. या भावनेला पूर्ण स्वरूप देण्याचे कार्य हिंदवी स्वराज्याचा घोष करून शिवाजी महाराजांनी प्रत्यक्षात आणले. मराठ्यांचे इंग्रज इतिहासकार ग्रँट डफ यांनी असा विचार मांडला की सह्याद्रि पर्वतावरील वाळलेल्या गवतात ठिणगीपडून जंगलामध्ये एखादा अचानक वणवा पेटावा त्याप्रमाणे मराठी सत्ताही अचानक उदयाला आली या विचाराचे खंडन करतांना न्यायमूर्ती रानड्यांनी हे दाखवून दिले आहे की मराठी सत्तेचा उदय हा अचानक पेटलेला वणवा नव्हता, तर ३००-४०० वर्षे चालू असलेल्या धार्मिक आणि सांस्कृतिक प्रबोधनाचा तो एक राजकीय आविष्कार होता. रानड्यांच्या या विचाराचे अधिक पुढचे विवेचन करून

असे म्हणता येईल की मराठ्यांचे युध्दशास्त्र हा केवळ अेक गुरिला युध्द पध्दतिचा सामान्य प्रकार नसून प्रगत अशा युध्दशास्त्राचा तो अेक पध्दतशिर विकास होता.

प्रकरण आठवे

संदर्भसूची

१ Guerillas - A History and Analysis
Arthur Campbell.

२ Mao Tse-Tung-ON Guerilla Warfare -
Brigadier General Samuel B. Griffth.

३ मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष - मूळग्रंथकार न्यायमूर्ती महादेव
गोविंद रानडे. अनुवादक नरहर रघुनाथ फाटक

भाग तिसरा

मराठ्यांची युध्दविषयक कार्यवाही (१६८०-१७२०)

(Maratha Military Operations -
1680 - 1720)

प्रकरण

९ संभाजीकालीन मोहिमा - पश्चिम किनारा
१० संभाजीकालीन मोहिमा - मध्य महाराष्ट्र
११ संभाजीकालीन मोहिमा - दक्षिण भारत
१२ राजारामकालीन मोहिमा - मध्य महाराष्ट्र
१३ राजारामकालीन मोहिमा - दक्षिण भारत
१४ खच्चीकरणाच्या (गुरिला) युध्दपध्दतीचा उज्वल काळ
१५ मराठ्यांचा तापी-नर्मदा खोऱ्यात संचार
१६ मराठ्यांची दिल्लीला धडक

प्रकरण नववे

संभाजी कालीन मोहिमा - पश्चिम किनारा

(Maratha Operations Under Sambhaji - Western Coast)

सामान्य राजकीय आणि युद्धनैतिक परिस्थिती

(General Political and Strategic Situation)

मागील प्रकरणात मराठ्यांच्या युद्धशास्त्राचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या युद्धशास्त्राचा प्रारंभ श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी १६४५ च्या दरम्यान केला आणि २५ वर्षांच्या काळात काही विशिष्ट ध्येय धोरणे पुढे ठेवून युद्धशास्त्राची अुत्क्रान्ति घडविली. त्यांनी घालून दिलेली सूत्रे ही पुढील १०० ते १५० वर्षांच्या काळात मार्गदर्शक ठरली. या संदर्भात ही गोष्ट लक्षात ठेवावी लागेल की युद्धनिती आणि युद्धशास्त्र ही सर्वस्वी राजकीय परिस्थितीवरच अवलंबून असतात. किंबहुना राजकीय ध्येय धोरणाशिवाय युद्धाला कोणताच अर्थ राहात नाही. जर्मन युद्धशास्त्रज्ञ जनरल व्हॉन क्लॉझविट्झ यांनी तर असे म्हटले आहे की "राजकीय अुद्दिष्टासाठीच युद्धाचा प्रपंच करावा लागतो, राजकीय अुद्दिष्टापासून युद्धशास्त्राची फारकत केली तर युद्ध आणि युद्धनिती ही अर्थशून्य ठरतील." शिव छत्रपतींच्या काळात राजकीय परिस्थिती त्यांना विशेष सोयीची होती असे नव्हे, परंतु त्या राजकीय परिस्थितीतील कमजोरी नेमकी हेरून स्वराज्य स्थापनेच्या आपल्या अुद्दिष्टासाठी प्राप्त परिस्थितीचा त्यांनी पुरेपूर फायदा घेतला आणि भारतीय अितिहासात प्रथमच मराठ्यांची सत्ता स्थिर आणि सुदृढ पायावर अुभी केली. या पार्श्वभूमीवरून १६८० ते १६८९ या मराठ्यांच्या अितिहासातील अेका महत्त्वाच्या

नकाशा // नं.

मराठी राज्याचा विस्तार-१६८०.


रामसेज
अहिवंतगड
नासिक
साल्हेर
कल्याण
मुल्हेर
भिवंडी
पुणे
रायगड
सातारा
विजापूर
कोल्हापूर
गोदावरी
गोवळकोंडा
कृष्णा नदी
तुंगभद्रा
वेलोर
जिंजी
कावेरी नदी
तंजावर

कालखंडाचे लष्करी विश्लेषण आपणास करावयाचे आहे. ते खालीलप्रमाणे करता येअील.

अ) अैतिहासिक साधनांच्या आधारावर अुपलब्ध होणा-या माहितीवरून या कालखंडातील प्रत्येक लढाअी कशा त-हेने लढली गेली याचे लष्करी विश्लेषण. (Military Analysis)

ब) अशा लष्करी विश्लेषणानंतर त्यातून स्पष्ट होणा-या युध्दनिती (Strategy) आणि युध्दव्यवहार (Tactics) या दोन्ही तत्वप्रणालीवर आधारीत लष्करी मूल्यमापन (Military Evaluation and Assess-ment)

१६८० मधील स्वराज्याचा विस्तार (नकाशा नं.१)

अेप्रिल १६८० मध्ये शिवाजी महाराजांच्या मृत्यु नंतर मराठी सत्तेच्या राजकीय आणि लष्करी नेतृत्वाची धुरा त्यांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी राजे यांच्यावर पडली. वास्तविक पाहता अशा त-हेची सुवर्णसंधी जगाच्या अितिहासात फारच थोड्या लोकांच्या नशिबी असते. पुण्याच्या आसपास असलेल्या अेका छोट्या जहागिरीचा विस्तार चारी दिशांना होअून अेक संपन्न असे मराठी राज्य संभाजी राजांना वारसा हक्काने प्राप्त झाले होते. हा विस्तार खालील प्रमाणे होता.

अुतरेकडे

सध्याच्या नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यांचा प्रदेश. यामध्ये

साल्हेर, मुल्हेर, मढा, जावळा, हनुमंतगड, अहिवंतगड, रामसेज, त्रिंबकगड अित्यादी संरक्षणाच्या दृष्टीने मजबूत किल्ले होते.

दक्षिणेकडे

तुंगभद्रा आणि कावेरी या नद्यांपर्यंत म्हणजे सध्याचा आंध्रप्रदेश व कर्नाटक या राज्यांचा पश्चिमेकडील पुष्कळसा प्रदेश मराठी सत्तेखाली होता.

पश्चिमेकडे

कल्याण भिवंडीपासून किनारपट्टीचा प्रदेश (सिद्दींचा प्रदेश वगळून) दक्षिणेत आंकोटच्या खाडीपर्यंत मराठ्यांचा अंमल होता. या प्रदेशात कल्याण भिवंडी या मोक्याच्या ठिकाणाशिवाय पेण, पनवेल, चौल, उरण, चिपळूण, राजापूर, दाभोळ, शिवेश्वर आणि वेंगुर्ले अित्यादी त्यावेळची महत्त्वाची बंदरे मराठ्यांच्या ताब्यात होती.

मध्यभागी

सध्याच्या पुणे जिल्ह्याचा सर्व प्रदेश, सातारा, कोल्हापूर, या जिल्ह्यांचा प्रदेश मराठी राज्यात सामील होता. त्यामध्ये पुरंदर, सिंहगड, राजगड, प्रतापगड, रायगड, अित्यादी अनेक किल्ल्यांचा समावेश होता.

पूर्वेकडे

विजापूरच्या आसपासचा प्रदेश सोडून गदग, हुबळी, धारवाड, तंजावर, वेलोर हा प्रदेशही मराठी सत्तेखाली होता.

वर निर्दीष्ट केलेला प्रदेश हा सर्वसामान्यपणे मराठी अमलाखाली आला होता तरी मराठ्यांची प्रत्यक्ष हुकमत काही ठिकाणी प्रत्यक्षरितीने तर इतर ठिकाणी अप्रत्यक्ष रित्या होती. सर्वसामान्यपणे असे म्हणता येईल की उत्तरेकडील जिल्हे, कोकण किनारपट्टीचा प्रदेश आणि मध्यभागातील कृष्णा नदीपर्यंत ज्या प्रदेशावर मराठ्यांची सत्ता प्रत्यक्ष स्वरुपाची असून ठिकठिकाणच्या किल्ल्यांवर असणारे सरकार नियुक्त किल्लेदार आणि त्यांच्या दिम्तीस दिलेले सैन्य मराठ्यांची सत्ता प्रत्यक्षात अमलात आणित असत. कृष्णा नदीच्या, दक्षिणेकडे मात्र मराठ्यांनी बहुसंख्य हिंदुराजांकडून चौथाईचे हक्क प्राप्त करून घेतले होते. आणि या स्थानिक सत्ताधाऱ्यांना परकीय शक्ती पेक्षा मराठ्यांची अधिसत्ता मान्य करणे हिताचे होते.

मराठ्यांचे अंतर्गत आणि बाह्य धोके

(Internal and External Threats)

अंतर्गत धोके

(Internal Threats)

ज्या विशिष्ट परिस्थितीत शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर संभाजीने मराठ्यांचे राज्य हाती घेतले त्यामुळे या सत्तेला अंतर्गत शत्रू निर्माण होणे अटळ होते. शिवाजी महाराजांच्या मृत्यू पूर्वी १-१२-१६७८ मध्ये वडिलांशी मतभेद होऊन संभाजीने मराठ्यांच्या शत्रूशी म्हणजेच मोगलांशी जवळीक साधली होती. या त्याच्या अक्षम्य राष्ट्रद्रोही वर्तनामुळे मराठा मंडळात आणि विशेषतः जाणत्या आणि कर्तबगार मुत्सद्द्यांमध्ये त्याच्याबद्दल अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. त्यातूनच त्याच्या सावत्र माता राणी सोयराबाई यांनी त्यांचे पुत्र राजाराम यांना गादीवर बसविण्याचा प्रयत्न केला. परस्पर हित संघर्षामुळे राजकीय तणाव

वाढत गेला आणि त्याची परिणती म्हणजे राज्यकारभारात आणि युध्दयोजनात मातब्बर आणि मुत्सद्दी सेनापती यांचे सहकार्य त्यांना मिळू शकले नाही.

बाह्य धोके

(External Threats)

वर सांगितल्याप्रमाणे गुंतागुंतीच्या अंतर्गत दुहित मराठी सत्तेला शिवाजी महाराजांच्या काळात सुप्त आणि स्वस्थ असलेले शत्रू डोके वर काढून मराठी राज्यात असणा-या अनिश्चित परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेण्यास उद्युक्त झाले. ही एक सहाजिक अशी घटना होती. या शत्रूमध्ये युध्दशास्त्राच्या दृष्टीने खालील परकीय शक्तींचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

मोगल

१६८० च्या सुमारास मोगल बादशहा औरंगजेब याची राजवट २० वर्षाहून अधिक काळ संपूर्ण भारतात स्थिरावली होती. शिवाजी महाराज जिवंत होते तोपर्यंत औरंगजेबाची सारी शक्ती राजस्थान मधिल रजपूत राजे पंजाब मधील शीख आणि पंजाबच्या पलीकडे काबूलपर्यंतचा प्रदेश आणि तेथे उद्भवणा-या कटकटी आणि पूर्वेकडील बंगालपर्यंत मोगलसत्ता दृढ करण्यासाठी खर्ची पडत होती. दक्षिणेमधील विजापूरची आदिलशाही आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही ही दोन स्वतंत्र मुसलमान राज्ये अंकित करून त्यांचा सर्व प्रदेश मोगलाईत आणण्याचे औरंगजेबाचे बरेच दिवसाचे स्वप्न साकार झाले नव्हते. तशातच भर म्हणून बादशहाचा पुत्र अकबर याने वडिलांशी संघर्ष सुरू केला, आणि तो अयशस्वी ठरल्यामुळे मारवाडचा शूर आणि कल्पक नेता दुर्गादास राठोड याच्या मदतीने

मराठ्यांचे सहकार्य मिळविण्यासाठी तो दक्षिणेत अुतरला. दुर्गादासाच्या मध्यस्तीने संभाजीने अकबरास राजकीय आश्रय (Political Asylum) देअू केला. या अकल्पित घटनेमुळे साहजिकच औरंगजेबाचे लक्ष अुत्तरेकडून दक्षिणेकडे वळले. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर मराठी राज्यात सुरू झालेल्या अंतर्गत संघर्षाची बादशहाला पूर्ण कल्पना होती. त्यामुळे भारी सेनासामुग्री घेअून मराठी मुलखात चौफेर चढाअी केल्यास मराठी सत्ता नष्ट करता येअील, त्याचबरोबर शहाजादा अकबराच्या कारवायांना आपोआप पायबंद बसेल आणि बरोबरच विजापूर आणि गोवळकोंडा येथील राज्येही धुळीस मिळवता येतील. अशी दूरगामी राजकीय अुद्दिष्टये समोर ठेवून औरंगजेबाने दक्षिणेकडे चाल केली. आपणास हे माहितच आहे की प्रत्यक्ष शिवाजी महाराजांनी सुध्दा औरंगजेबाविरुध्द अुघड अुघड युध्दाचा कधीही अवलंब केला नाही. १६६८ मध्ये मिर्झाराजा जयसिंग आणि दिलेरखान यांच्या ८० हजार संयुक्त सेनेपुढे शिवाजी महाराजांनी पुरंदरचा किल्ला लढविला परंतु शेवटी त्यांना सक्त संधी ~~[illegible]~~ करावा लागला. संभाजीची परिस्थिती तर त्या मानाने पुष्कळच कमकुवत होती. आणि म्हणूनच मराठी सत्तेसमोर सर्वात धोकादायक आव्हान बादशहा औरंगजेब याचे कडून होते.

आदिलशाही आणि कुतुबशाही

आदिलशाही

१६८० च्या सुमारास आदिलशाही सत्ता दरबारातील अंतर्गत हेवेदावे आणि सुलतानाचे कमकुवत धोरण या दोन कारणांमुळे खिळखिळी झाली होती. या खेरीज औरंगजेबाच्या विजापूर विरोधी धोरणामुळे मोगली सत्तेकडून होअू

शकणाऱ्या संभाव्य आक्रमणाचा धोका विजापूर राज्यास कायम होता. विजापूर आणि मोगल दरबार यांच्या विरोधाचे आणखी अेक कारण असे होते की, दोन्ही राजवटी अिस्लामी धर्माच्या अनुयायी असल्या तरी त्यांच्यात अुत्तर-दक्षिण वाद हा बऱ्याचशः प्रमाणात धुमसत होता. दक्षिणेतील मुसलमानी राज्यात अफगाण गटाचे अनेक वर्षे प्राबल्य असून तुर्की वंशाच्या मोगलसत्तेपासून शक्यतो फटकून वागण्याचेच त्यांचे धोरण होते. शिवाजी महाराजांना या अंतर्गत संघर्षाची पूर्ण कल्पना असल्यामुळे प्रसंग पडेल त्यावेळी त्यांनी मोगलांशी राजनैतिक जवळीक साधून आदिलशाहीवर राजकीय आणि लष्करी दडपण आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला. या अुलट मोगल सत्तेचा जोर दिसल्यास विजापूरकरांशी सख्य साधून मोगलांच्या विरुध्द त्यांना सर्व तऱ्हेची लष्करी मदत त्यांनी देअु केली. सुदैवाने या बाबतीत संभाजीने वडिलांचे धोरण पुढे चालू ठेवून आदिलशाहीशी सामान्यपणे मित्रत्वाचे संबंध कायम राखले.

कुतुबशाही

कुतुबशाही सत्ता गोवळकोंड्यात म्हणजे सध्याच्या हैद्राबाद जवळच्या प्रदेशावर असल्यामुळे मराठ्यांच्या राज्याला त्यांचा जवळचा असा कोणताच धोका नव्हता. याशिवाय शिवाजी महाराजांच्या काळापासून मराठे आणि कुतुबशाही यांचे संबंध अत्यंत सलोख्याचे होते. कुतुबशाही राज्याला मोगली आक्रमणाचा कायमचा धोका असल्यामुळे मराठी सत्तेची मदत जरुर पडल्यास घेणे त्यांना हिताचे होते. संभाजीनेही पूर्वीचे धोरण पुढे चालू ठेवून आदिलशाही बरोबरच कुतुबशाहीशी मित्रत्वाचे संबंध ठेवले.

कोकण किनारा-सिद्दी विरोधी संग्राम


अलीबाग (कुलाबा)
चौल
दंडाराजपुरी
जंजिरा

सिद्दी व पोर्तुगीज

सिद्दी (नकाशा नं.३)

पश्चिम किना-यावर मराठी प्रदेशाला सतत अुपद्रव करणारा मुख्य शत्रू म्हणजे जंजि-याचा सिद्दी हा होय. १६३६ च्या मोगल आणि आदिलशाही यांच्यामध्ये झालेल्या शस्त्रसंधी प्रमाणे अुत्तर कोकण म्हणजे ठाणे, मुंबअी, कल्याण भिवंडी आणि त्यांच्या दक्षिणेला असलेला करंजा खाडी पर्यंतचा प्रदेश निजामशाही अमलातून आदिलशाहीकडे आला होता. कल्याण येथे आदिलशाहीचा सुभेदार या प्रदेशावर आदिलशाही सत्ता चालवित असे. किना-याचा प्रदेश विशेषतः कुरणखाडीच्या खाली असलेले दंडाराजपुरी हे बंदर, तेथून १२ कि.मीटर वर असणारा चौलचा किल्ला आणि दक्षिणेकडे करंजा खाडीच्या तोंडावर असलेला जंजिरा हा अभेद्य सागरी किल्ला ही सर्व ठिकाणे आदिलशाहीचे सागरी सेनापती असलेल्या सिद्दी या जमातीकडे होती. सिद्दी जमात ही मूळची अॅबिसिनिया (सध्याचा अेथिओपिया) या आफ्रिकी देशातील असून अरब लोकांच्या सान्निध्यामुळे अनेक शतके त्यांनी दर्यावर्दी नोकरीत घालविली होती. याशिवाय अरबांशी असलेल्या सतत संपर्कामुळे या जमातीने अिस्लामी धर्माचा स्विकार केला होता. अरबांच्या बरोबरीने १६०० पूर्वी अनेक शतके सिद्दी जमातीचे लोक हिंदी महासागरात चाचेगिरी करीत असत. मोगल, आदिलशाही या प्रामुख्याने भू सत्ता (Land Powers) असल्यामुळे किना-यावरतीही आपली अधिसत्ता असावी या हेतूने त्यांनी सिद्दी जमातीला जवळ केले होते. आणि १७व्या शतकापासून मोगल आणि आदिलशहा यांचे मांडलिक या नात्याने सिद्दी आरमार हेच मोगल आणि आदिलशाही आरमार म्हणून काम करु लागले. जंजिरा आणि चौल हे त्यांचे नाविक तळ असून (Nava 1 Bases) त्यांचे आरमार ठाणे,

नकाशा नं. ३

पश्चिम किनारा-पोर्तुगीज


दमण
दिव
वसई
ठाणे
तारापूर
माहिम
चौल
दंडाराजपुरी
गोवा
अंजदीव

दंडाराजपुरी आणि जंजिरा यांच्या दरम्यान गस्त घालीत असे. अर्थातच या आरमाराचा वसई आणि गोवे येथील पोर्तुगीजांच्या आरमाराशीही समव्यवसायी म्हणून अगदी जवळचा संपर्क होता. त्यामुळे सिद्दी नेहमीच मोगल इंग्रज आणि पोर्तुगीज यांच्या संगनमताने मराठ्यांच्या प्रदेशाला उपद्रव करीत असे. या कारणांमुळे जंजीरील सिद्दीचा कायमचा बंदोबस्त करणे आवश्यक होऊन बसले होते.

पोर्तुगीज (नकाशा नं.१)

पश्चिम किनारपट्टीवर दीव दमण पासून गोव्यापर्यंतचा सागरी किनारा पोर्तुगीजांच्या सर्वसामान्य सत्तेखाली होता, असे म्हणण्यास हरकत नाही. याचे कारण म्हणजे पोर्तुगीजांची नाविक सत्ता इंग्रज नाविक सत्ते बरोबरीची असून वास्कोडगामा हा पोर्तुगीज दर्यासारंग कालीकतला उतरल्यापासूनच जवळजवळ १०० वर्षे पोर्तुगीज आरमाराने आपले वर्चस्व पश्चिम किनारपट्टीवर अबाधित ठेवले होते. गोवा हे त्यांचे मुख्य केंद्रस्थान असून पोर्तुगालच्या बादशहाने नेमलेला व्हाईसरॉय हा गोव्यामध्ये राहून या भागातील पोर्तुगालच्या वसाहतींवर आणि नाविक दलावर देखरेख ठेवीत असे. गोव्याखेरीज दीव आणि दमण, मुंबई जवळ वसई आणि ठाणे या ठिकाणी पोर्तुगीज आरमाराचे काफीले होते. इ.स.१६०० साली पोर्तुगालच्या राजाने आपल्या मुलीस आहेर म्हणून मुंबईबेट इंग्लंडच्या राजाला दिले होते. आणि तेव्हापासून मुंबई येथे इंग्रजांची व्यापारी वखार आणि तिच्या संरक्षणासाठी छोटेसे आरमार तैनात होते. शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांच्या नाविक सत्तेचे महत्त्व ओळखून त्याला प्रतिस्पर्धी असे मराठी आरमार तयार केले. पोर्तुगीजांचा गोवा प्रदेश आणि वसई-ठाण्याजवळचा प्रदेश मराठी

राज्याला मिळणारा असल्यामुळे बरेच वेळा येणा-या जाणा-या मालावरुन मराठे आणि पोर्तुगीज यांच्यात स्थानिक चकमकी होत असत. सर्वसामान्यपणे असे म्हणता येअील की पोर्तुगीजांना मराठ्यांच्या आक्रमणाची भिती सदैव वाटत असल्यामुळे त्यांच्याशी जवळीक असणारे मुंबअीचे अिंग्रज आणि जंजि-याचे सिद्दी यांना लष्करी आणि आर्थिक मदत करुन मराठ्यांविरुद्ध कारवाअी करण्याचे अुद्योग पोर्तुगीज व्हाअीसरॉय सतत करीत असे. संभाजीने पोर्तुगीजांविरुद्ध आक्रमक धोरण स्विकारुन पोर्तुगीजांचा मुलूख हस्तगत करण्याचा आणि त्यांच्या सत्तेस पायबंद घालण्याचा कसून प्रयत्न केला.

पश्चिम किना-यावरील सिद्दीच्या आक्रम कारवाया

(Offensive Operations by the Siddis on Western Coast)

पश्चिम किना-यावर मराठी सत्तेचा संघर्ष प्रामुख्याने पोर्तुगीज आणि सिद्दी यांच्या विरुद्ध झाला. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर १६८० च्या अुत्तरार्धात जंजि-याच्या सिद्दीने मराठी राज्यातील अनिश्चित राजकीय परिस्थितीचा फायदा घेअून मराठी मुलखावर हल्ले करण्यास सुरुवात केली. सर्वप्रथम त्याने कुर्ले आणि कल्याण या दोन ठिकाणी हल्ला करुन स्थानिक लोकांना पकडून नेले, आणि मुंबअीस त्यांना गुलाम म्हणून विकले. या कृत्याबद्दल संभाजीने आपल्या वकीलामार्फत मुंबअीतील अिंग्रजांकडे जोरदार निषेध प्रदर्शित केला आणि सिद्दीच्या कारवाया थांबविल्या नाहीत तर मुंबअीवर हल्ला करण्याची धमकी दिली. अिंग्रजांनी या प्रकरणाची दखल घेअून सिद्दीला योग्य ती तंबी दिली, आणि पुन्हा आपण मराठी मुलखास अुपद्रव देणार नाही अशी त्याच्याकडून लेखी हमी घेतली. अर्थात अशा प्रकारच्या दंडेलीस हे अेक

जंजिऱ्याचा किल्ला

नकाशा,नं. ४.



अ - शिद्दीचे घर.
ब - मशीद - दरगा.
क - पाण्याची तळी
ड - तोफेचे गोळे व सुरुंगाच्या दारूचे कोठार
इ - दोनदरवाजे

तात्पुरते अुत्तर होते, याची संभाजीला पूर्ण जाणीव होती. म्हणूनच सिद्दी विरुध्द आक्रमक पाअूल अुचलून त्याचा कायमचा बंदोबस्त करण्याचे संभाजीने ठरविले. या निर्णयाप्रमाणे मराठी आरमाराला लढाअीसाठी सज्ज राहण्याचे तातडीचे हुकूम दिले गेले.

जंजि-याचा संग्राम (नकाशा नं.४)

सिद्दीच्या सागरी सत्तेची दोन प्रमुख केंद्रे होती. ती म्हणजे कुंडलिका खाडीच्या तोंडावर असलेले दंडाराजपुरी (सध्याचे रेवदंडा) हे बंदर आणि तेथून २५ कि.मी. दक्षिणेस असलेला जंजि-याचा सागरी किल्ला या किल्ल्याचे तट तीस फूट रुंदीचे असून सभोवताली असणा-या अेकंदर १७ बुरुजांवर ५७२ तोफा कायमच्या लावण्यात आल्या होत्या. अशा त-हेच्या मजबूत संरक्षण यंत्रणेमुळे जंजि-याचा किल्ला हा अेक अभेद्य किल्ला समजला जात असे. प्रत्यक्ष शिवाजी महाराजांनी जंजि-याचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी दोन तीन वेळा निकराचे प्रयत्न केले. परंतु ते अयशस्वी ठरले. किल्ला हस्तगत करण्यासाठी सागरी हल्ला हा अेक प्रमुख अुपाय होता आणि त्याच बरोबर किल्ला आणि मुख्य प्रदेश यांना जोडण्याचा कांही मार्ग अुपलब्ध झाल्यास जमिनीवरुनही लढाअी करणे अशक्य नव्हते. सागरी हल्ल्यासाठी संभाजीच्या आज्ञेप्रमाणे मराठी आरमाराचा दर्यासारंग दौलतखान आणि त्याचा दुय्यम मायनाक भंडा-याचा पुत्र यांच्या नेतृत्वाखाली १५० गलबतांचा अेक काफीला सज्ज झाला. याशिवाय सिद्दी संबूलचा मुलगा आणि पुतण्या असे दोघे सिद्दीचा पक्ष सोडून मराठी आरमारात सामील झाले होते. या काफील्यात सुमारे पांच हजार अनुभवी निवडक खलाशांचा भरणा होता.

सिद्दीवरील स्वारीची पूर्व तयारी म्हणून सिद्दीच्या कब्जात असलेल्या उंदेरी या छोट्या बेटावर प्रथम हल्ला करण्याचे संभाजीने ठरविले. या निर्णया प्रमाणे नागोठाणे येथे असलेल्या तीन हजार सैनिक आणि २२ गलबते यांच्या एका मराठी काफील्याने ऑगस्ट १६८० मध्ये उंदेरी बेटावर हल्ला चढविला. परंतु सिद्दीच्या आरमाराने जोर धरून हा हल्ला परतवून लावला. या अपयशाने खचून न जाता ७ जुलै १६८१ च्या पहाटे मराठी आरमाराने उंदेरीवर दुसरा हल्ला चढविला सतत चार तास मराठे आणि सिद्दी यांच्यात घुमश्चक्रीची लढाई जारी होती. परंतु या वेळेसही मराठी हल्ला यशस्वी होऊ शकला नाही.

उंदेरीवरील दोन हल्ले अयशस्वी झाल्यामुळे संभाजीने आपले लक्ष दंडाराजपुरी या सिद्दीच्या दुस-या सागरी केंद्राकडे वळविले. दंडाराजपुरी वरील हल्ल्यात संभाजीने आपल्या युध्दनितीत थोडा बदल केला. सागरी बाजूने हल्ल्याची सुरुवात न करता मराठी मुलखातून पुढे सरसावून मराठी सैन्याने दंडाराजपुरीस वेढा घातला सतत १५ दिवस तोफखान्याचा भडीमार करून किल्ल्याच्या भिंती जमीनदोस्त करण्यात आल्या आपल्या स्थानकाचा बचाव करणे अशक्यप्राय आहे याची जाणीव झाल्यावर दंडा येथील सिद्दीच्या सेनेने आणि आरमाराने माघार घेऊन त्यांनी जंजिरा येथील आपल्या मुख्य स्थानकाचा आश्रय घेतला.

दंडाराजपुरीस सिद्दी नामोहरण झाला तरी जंजिरा येथील त्याचे केंद्रस्थान अबाधित राहिले होते. उंदेरी आणि दंडा येथे झालेल्या निकराच्या चकमकी नंतरही सिद्दीने आपल्या कारवायात खंड पडू दिला नव्हता. १६८१ च्या डिसेंबरात पनवेल पासून चौलपर्यंत सिद्दीचे छुपे हल्ले चालूच होते. त्यामुळे जंजि-याच्या मोहीमेतील अखेरचा आणि निर्णायक टप्पा कार्यान्वीत करणे आवश्यक होते. यासाठी १६८१ च्या डिसेंबर महिन्याच्या अखेरीला २० हजार पैदलबरोबर घेऊन

संभाजीने जंजि-यावरील चढाअीस प्रारंभ केला. प्रथमारंभी मराठी तोफखान्याने गोळाबारी सुरु करुन लढाअीस भोंड फोडले. जंजि-याचा बचाव करणारे सिद्दी खैरात आणि सिद्दी कासम आपल्या सेनेस धीर देवून प्रतिकाराची शर्थ करीत होते. मुख्य अडचण अशी होती की समुद्रात असलेला जंजिरा किल्ला आणि मुख्य प्रदेशाच्या टोकावर असलेली मराठी सेना यांच्यामध्ये सिद्दीच्या आरमाराची जहाजे गस्त घालीत असल्यामुळे (Patrolling) किल्ल्यावरील शिबंदीस नुकसान होवूनही प्रतिकार करणे शक्य होते. ही अडचण दूर करुन कोंडी फोडण्याच्या दृष्टीने संभाजीने अेक धाडशी आणि अभिनव असा प्रयोग करण्याचे ठरविले. कदाचित ही योजना रामायणाचे धडे घेतलेल्या संभाजीस लंकेवरील स्वारी साठी प्रभुरामचंद्राने रामेश्वर पासून सेतू बांधण्याच्या घटनेवरुन आली असावी. जंजि-याचा किल्ला आणि मराठी स्थानके यामध्ये असलेली छोटीशी खाडी भरुन काढण्यासाठी मोठमोठया शिळा, दगडी खडी, आणि मोठमोठया वृक्षांचे बुंधे व फांद्या हे सर्व जलमार्गात टाकून प्रत्यक्ष सेनेला किल्ल्या पर्यंत पोहचता यावे या अुद्देशाने अेक प्रचंड प्रयत्न करण्यात आला या योजनेची तत्परतेने कार्यवाही व्हावी म्हणून सर्वकामावर संभाजीने स्वतः जातीने देखरेख ठेवली होती. त्याबरोबर सैनिकांचे मनोधैर्य वाढावे म्हणून प्रत्येक सैनिकास अर्धाशेर सोने आणि चांदीची कडी बक्षीस म्हणून देवू केली. अेवढया निश्चय पूर्वक केलेल्या तयारी नंतर आणि मराठी फौजेचे संख्याबळ लक्षात घेता कदाचित जंजि-यावरील हल्ला यशस्वी झालाही असता परंतु दैवगति वेगळी होती. याच सुमारास मोगल सरदार हसन अली खान याने कल्याण भिवंडीवर चाल करुन दोन्ही शहरांना वेढा घातला हे वृत्त समजताच जंजि-याची मोहीम तशीच सोडून हसन अलीस घालवून देण्यासाठी संभाजीला आपल्या फौजेची दिशा कल्याण भिवंडी कडे वळवावी लागली. आणि परिणामी सिद्दी आणि त्याचा अंमल

किल्ला अजिंक्यच राहिले.

संभाजीच्या आक्रमक हालचाली (नकाशा नं. २)

(Sambhaji's Offensive Operations)

पश्चिम किनार पट्टीवर मराठी सत्तेला पोर्तुगीजांशीही संघर्ष करावा लागला. उत्तरेस दीव-दमण पासून दक्षिणेस गोव्यापर्यंत सुमारे ९०० कि.मी.लांबीच्या पश्चिम किनारपट्टीवर पोर्तुगीज आरमाराची नाविक सत्ता अबाधित होती. असे असले तरी प्रत्यक्ष जमिनीवर गोव्याचा प्रदेश, वसई, ठाणे आणि दीव-दमण ही एकमेकांपासून विभागलेली असल्यामुळे शेजारच्या प्रादेशिक विभागांवर सत्ता गाजविणाऱ्या मराठ्यांची पोर्तुगीजांना सदैव धास्ती वाटत असे. मराठी प्रदेश आणि गोवा यांच्या सरहद्दीवर पणजीच्या दक्षिणेस २२ कि.मीटरवर असणारा फोंडा हा किल्ला शिवाजी महाराजांनी जिंकून घेतल्यामुळे त्यांच्या अखेरच्या काळात पोर्तुगीजांनी मराठी सत्तेशी नमते घेऊन मित्रत्वाचे संबंध ठेवले होते. मराठी सत्तेची सूत्रे हाती आल्यास संभाजीनेही पोर्तुगीजांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने रामजी पंडीत नावाचा आपला वकील पोर्तुगीज व्हाइसरॉयकडे रवाना केला. व्हाइसरॉयने ही संभाजीच्या शिष्टाईस प्रतिसाद देऊन मराठे आणि पोर्तुगीज यांच्यामध्ये कायमचा तह व्हावा अशी सूचना केली.

वरील प्रमाणे तहाच्या वाटाघाटी चालू असतांनाच पोर्तुगीजांवर जरब बसावी या हेतूने संभाजीने अंजदीव नावाच्या बेटावर स्वारी करून ते आपल्या ताब्यात घेण्याचे ठरविले. वास्तविक अंजदीव बेट हे गोव्याच्या प्रदेशापासून दूर असून ते कारवारच्या दक्षिणेस पांच कि.मीटरवर असणारे एक अत्यंत

छोटे बेट आहे. (नकाशा नं.२) तसे पाहता पोर्तुगीजांचा आणि या बेटाचा कोणताही संबंध नव्हता. परंतु गोवा प्रदेशास लागणारे अन्नधान्य आणि इतर सामुग्री ही कर्नाटकातून समुद्रमार्गाने येत असल्यामुळे अंजदीव बेट मराठ्यांच्या ताब्यात गेल्यास तेथे मराठी आरमाराचा काफीला तैनात होईल. आणि त्यामुळे पोर्तुगीज आरमाराच्या हालचालींना पायबंद बसेल अशी पोर्तुगीजांना भिती वाटत होती. जानेवारी १६८२ मध्ये संभाजीच्या आज्ञेप्रमाणे मराठी आरमाराने अंजदीव बेटावर कब्जा केला तेथे अेक छोटा किल्ला बांधण्याची तयारी सुरु केली, ही बातमी गोव्याच्या व्हाईसरॉयला कळताच त्यानेही आपली अेक तुकडी अंजदीव कडे पाठविली. आणि तेथे पोर्तुगीजांचा किल्ला बांधण्याची प्रतिकारात्मक कारवाई सुरु करण्याचे हुकूम दिले. ही घटना संभाजीला समजताच त्याने आपल्या वकिला मार्फत पोर्तुगीजांना त्यांच्या कृत्याचा जाब विचारला त्याबरोबर पणजीच्या ईशान्येस १० कि.मीटरवर असणाऱ्या डिचोली या ठाण्याचा मराठी सुभेदार शिवाजी विनायक यास पोर्तुगीजांच्या पौंअे या छोट्या बेटावर हल्ला करण्याचे हुकूम दिले.

या घडामोडी होत असतांनाच डिचोली व त्याच्या उत्तरेस असलेले कुडाळ येथे तोफेचे गोळे बनविण्यासाठी आवश्यक असणारे दोन दारुगोळा कारखाने सुरु करण्यात आले. मलबार मधून या कार्यासाठी गंधक आणि सोरा या जिन्सा आयात करण्यात म्हणून अधिकृतरित्या संभाजीने पोर्तुगीजांची परवानगी मागितली आणि हा माल घेऊन येणाऱ्या मराठी जहाजांना अडविण्यात येवू नये असे पोर्तुगीजांना कळविले. व्हाईसरॉयने या सर्व मागण्या मान्य केल्या. याच सुमारास झालेल्या अेका अैतिहासिक घटनेमुळे पोर्तुगीजांनी त्यांच्या मराठे विषयक धोरणात बदल करुन सामोपचारा अैवजी संघर्षाची तयारी केली. ही

ऐतिहासिक घटना म्हणजे १२-१२-१६८१ रोजी औरंगजेब बादशहाचे दक्षिणेत झालेले आगमन ही होय. मराठ्यांचा काटा समूळ उपटून टाकावा हे बादशहाने आपल्या दक्षिण मोहिमेचे अंतिम उद्दिष्ट ठरविल्यामुळे राजकीय आणि लष्करी दृष्ट्या मराठ्यांना कसे कोंडीत पकडता येईल हाच औरंगजेब पुढे मुख्य प्रश्न होता. या प्रश्नाच्या प्रश्नाचा एक भाग म्हणून पश्चिम किना-यावरील सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्याशी बादशहाचा पत्रव्यवहार सुरु झाला. आणि मोगली सैन्याच्या हालचाली सुलभ व्हाव्या या उद्देशाने औरंगजेबाने पोर्तुगीजांकडे काही सवलती मागितल्या अशा सवलतीपैकी ठाणे खाडीतून धान्य घेऊन जाणा-या मोगली जहाजांना पोर्तुगीजांकडून मुक्त परवाना असावा ही एक सवलत होती. पोर्तुगीज आणि मराठे यांच्या दरम्यान चाललेल्या संबंधाला शत्रुत्वाचे स्वरुप येण्यास हीच सवलत मुख्यतः कारणीभूत ठरली.

मराठ्यांच्या मध्य कोकणातील आक्रमक हालचाली

(Maratha Operations in Central Konkan)

पोर्तुगीजांनी मोगलांना दिलेल्या सवलतीमुळे ही गोष्ट स्पष्ट झाली की मोगल पोर्तुगीज यांची युती मोडून न काढल्यास त्याचा मराठी मुलुखाच्या सुरक्षितेवर गंभीर परिणाम होतील. यापूर्वी सांगितलेच आहे की १६८१ पासूनच संभाजीने पोर्तुगीजांशी राजनैतिकदृष्ट्या मित्रत्वाचे संबंध ठेवले होते. तरी लष्करी दृष्ट्या मराठ्यांचा पवित्रा आक्रमक स्वरुपाचा होता. याच पवित्र्यास अनुसरुन संभाजीने पोर्तुगीजांविरुध्द पहिली आघाडी मध्य कोकणात उघडावी. अलिबागच्या दक्षिणेस २० कि.मी. अंतरावर कुंडलिकाखाडी आहे. या खाडीच्या तोंडावरच

दंडाराजपुरी (सध्याचे रेवदंडा) हे पोर्तुगीजांचे नाविक ठाणे होते. दंडाराजपुरीच्या पूर्वेस आणि खाडीच्या काठावर असणा-या चौल या ठिकाणी पोर्तुगीजांनी किल्ला बांधला होता. किल्ल्याच्या चारी बाजूंनी खोल खंदक असून त्याची दोन्ही टोके खाडीला मिळालेली होती. या संरक्षक अुपायांमुळे चौलच्या किल्ल्यावर हल्ला करणे कोणत्याही शत्रूला जड गेले असते. केवळ लष्करी आणि नाविक तळ म्हणूनच नव्हेतर परदेशी व्यापाराचे अेक केंद्र म्हणून चौलला खूपच महत्त्व प्राप्त झाले होते. पोर्तुगीजांविरुध्द करावयाच्या आक्रमक चढाअीचा प्रारंभ संभाजीने चौल पासूनच करण्याचे ठरविले. १६८२ मध्ये मराठ्यांनी चौलच्या किल्ल्याला वेढा घातला चौलचा किल्लेदार शेख हबीबुल्ला याने मराठी सेनांवर प्रतिहल्ले करून वेढा तोडून टाकण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यामुळे चौलमधून माघार घेअुन २१-७-१६८२ रोजी मराठ्यांनी आपले लक्ष दंडाराजपुरी आणि त्याच्या दक्षिणेस असलेले कोरलाअी या दोन्ही ठाण्यांवर केंद्रीत करून चढाअी सुरु केली. दंडाराजपुरी आणि कोरलाअी यावर झालेल्या मराठी हल्ल्यामुळे या दोन ठाण्यांच्या मदतीकरीता थोडीशी कुमक तेथे पाठविणे चौलच्या किल्लेदारास भाग पडले. मराठे नेमकी याच प्रतिक्रियेची वाट पहात होते. ही अपेक्षा खरी ठरताच २२ जुलै १६८२ च्या रात्री धो धो पाअुस पडत असतांना सहा हजार पायदळ आणि दोन हजार घोडदळ घेअून मराठी सेनापती निळोमोरेश्वर यांच्या तुकडीने चौलवर दुसरा हल्ला चढविला. गडावरील बचाव ढिला असल्यामुळे खंदक पार करून आणि शिडया लावून मराठी सेनेच्या तुकडया किल्ल्यात प्रवेश करू लागल्या. याच सुमारास किल्ल्यातील शिबंदीला हल्ल्याची कल्पना येताच त्यांनीही जोराचा प्रतिकार केला. या धुमश्चक्रीत तटावर चढत असलेले अनेक मराठे सैनिक कामास आले आणि त्यामुळे हा हल्ला अयशस्वी ठरला. याच दिवशी मराठी सेनेची छोटी तुकडी कोरलाअीच्या छोटया किल्ल्यावरही

करून गेली परंतु त्या तुकडीतील बरेचसे सैनिक पकडले गेले. मराठी सेनेने अुठविलेल्या या चौफेर वावटळीमुळे पोर्तुगीजांनी, चौल, कोरलाअी, आणि दंडाराजपुरी या तिन्ही ठिकाणी असलेल्या तोफखान्याचा वापर करून मराठी सेनेवर भारी गोळामारी केली.

मराठ्यांची अुत्तर कोकणातील चढाअी
(Maratha Operations in North Konkan)

संभाजीने अुत्तर कोकणातही पोर्तुगीजांविरुध्द आक्रमक मोहीम (Offensive Operations) सुरु केली. १६८२ च्या जानेवारीत मराठी सैन्याने डहाणूच्या दक्षिणेस असलेल्या तारापूर आणि माहीम या पोर्तुगीजांच्या दोन किनारी ठाण्यांवर हल्ला करून ती ताब्यात घेतली. ही ठाणी ताब्यात घेतल्यामुळे सुरतेहून दक्षिणेकडे जाणा-या मोगली जहाजांना अडकाव करणे मराठ्यांना सहज शक्य झाले असते. मराठ्यांच्या या कार्यवाहीची खबर औरंगजेबाला मिळताच त्याने वंदि-याचा शिद्दी सबीद याकूदखान याला ही गेलेली दोन्ही ठाणी परत मिळविण्यासाठी निकराचा प्रयत्न करण्याची आज्ञा केली. या हुकमाप्रमाणे याकूदखानाने माहीमवर प्रतिहल्ला करून ते ठाणे परत मिळविले. थोड्याच दिवसात मोगल सरदार बहादूरखान याने तारापूरवर हल्ला केला आणि तेथील किल्ला मराठ्यांपासून परत मिळविला.

वरील घटना घडल्या तरी संभाजीने आपल्या आक्रमक धोरणात कोणताही बदल केला नाही. दोन, तीन महिने सैन्याची जमवा जमव करून १५ अेप्रिल १६८२ रोजी पांच हजार पायदळ आणि अेक हजार घोडदळ अशी

निवडक सेना घेऊन संभाजीने स्वतःच्या अधिपत्याखाली तारापूरवर जोरदार हल्ला चढविला. आणि पोर्तुगीजांची साधनसंपत्ती नष्ट करण्याच्या दृष्टीने संपूर्णगांव जाळून टाकले. चढाईस आलेला हा वेग कायम ठेवून मराठी फौजेचे काही विभाग अुत्तरेस डहाणू आणि दमण काबीज करण्यासाठी रवाना झाले. आणि त्याबरोबर काही तुकड्या तारापूरच्या दक्षिणेस असलेल्या वसईकडे सरसावल्या. अशा रितीने तारापूर हे आपल्या लष्करी प्रयत्नांचे केंद्रस्थान बनवून (Strong point) दमण पासून ठाणे वसई पर्यंत जवळजवळ १०० ते १५० कि.मिटर लांबीच्या किनारपट्टीवर मराठ्यांचा दबदबा निर्माण केला. यामुळे मोगल आणि पोर्तुगीज यांना कडक जरब बसली. हे हल्ले होत असताना अनेक ठिकाणी पोर्तुगीजांच्या होड्या आणि पडाव हे मराठ्यांच्या हस्तगत झाले. त्यांचा मराठी आरमारात समावेश करण्यात आला. मराठ्यांच्या या चढाईला प्रत्युत्तर म्हणून पोर्तुगीज आरमाराने वेंगुर्ल्याच्या बंदराजवळ कर्नाटकातून अन्नधान्य घेऊन येणारे मराठी व्यापा-यांचे काही पडाव आणि मचवे पकडून नेले आणि गोवे दरबारातील मराठ्यांचा वकिल येसाजी गंभीरराव यास कैद केले.

सप्टेंबर १६८२ मध्ये मराठ्यानी वसई तालुक्यातील अंजार आणि त्याच्या आसपासच्या सुपीक गावांवर हल्ला चढविला आणि कापणीस आलेली पिके हस्तगत करून बाकी गाव अुध्वस्त करून टाकले. ही बातमी समजताच तेथील पोर्तुगीज अधिका-याने स्वारांची अेक तुकडी मराठ्यांच्या बंदोबस्तासाठी पाठविली परंतु मराठी सेनेची संख्या जास्त असल्यामुळे त्यांनी या तुकडीवर हल्ला करून त्यांना पिटाळून लावले.

चौलवर पुन्हा चढाई

(Operations at Chaul)

जुलै १६८२ मध्ये चौल विरुध्द मराठयांनी अुघडलेली मोहीम अनिर्णीत राहिली होती. पोर्तुगीजांवर वचक ठेवण्याच्या दृष्टीने ही मोहीम तडीस नेणे आवश्यक होते. या अुद्देशाने आक्टोबर १६८२ मध्ये आठ हजार सैन्याची अेक ताजी तुकडी घेअून संभाजी राजे स्वतः चौलच्या परिसरात दाखल झाले. या सैन्याने पोर्तुगीजांची नाकेबंदी करण्याच्या अुद्देशाने चौलच्या अुत्तरेस असणा-या अनेक गावातील दाणा वैरण हस्तगत करून पोर्तुगीजांवर दबाव आणण्याच्या कारवाया सुरु केल्या. प्रत्यक्ष चौलच्या किल्ल्यावर तोफांचा भडीमार करता यावा म्हणून मराठी सेनापती निळो मोरेश्वर याच्या नेतृत्वाखाली चौलच्या आसपास असणा-या दोन तीन टेकड्यांवर अुंच बुरुज अुभारण्यात आले. या बुरुजांवर अवजड तोफा (Heavy Guns) लावून मराठयांनी चौलच्या किल्ल्यावर तोफांचा भडीमार सुरु केला. मराठी सेनेने केलेली चौफेर नाकेबंदी आणि त्यावरती सुरु झालेला तोफांचा भडीमार या दुहेरी कात्रीत सापडलेली पोर्तुगीज सेना संत्रस्त झाली. अनेक पोर्तुगीज अधिकारी गुप्तपणे किल्ल्यातून बाहेर पडले. आणि त्यांनी गोव्याची वाट धरली. याच मार्गाने सुमारे चार हजार पोर्तुगीजांनी मुंबअीकडे प्रयाण करुन तेथील अिंग्रजांचा आश्रय घेतला.

मराठी सेनेच्या वाढत्या जोरामुळे आपला फार काळ टिकाव लागणार नाही हे लक्षात घेअून चौलच्या पोर्तुगीज अधिका-याने चौल वाचविण्यासाठी गोव्याच्या व्हाअीसरॉयकडे आणि वसअीचा अधिकारी जनरल मॅन्युअेल लोबो अिमान्यूअेल या दोघांकडे तातडीच्या मदतीची याचना केली. यावेळी

खुद्द गोव्यामध्ये राखीव सैन्य नसल्यामुळे व्हाअीसरॉयने मोगल अधिकारी सअीद याकूदखान आणि खैरातखान यांना चौलसाठी कुमक पाठविण्याची विनंती केली. त्याप्रमाणे याकूद खानाने चारशे पांचशे सैनिकांची अेक तुकडी रवाना केली. या दोन्ही तुकड्या घेअून येणारी जहाजे थोड्याच दिवसात रेवदंड्यास पोहचल्यामुळे मराठ्यांच्या गलबतांना या किनाऱ्यावर मुक्त संचार करणे कठीण झाले.

चौल येथील परिस्थितीत आहेरुन येणारी कुमक मिळाली तरी पोर्तुगीजांच्या दृष्टीने काहीच फरक पडला नाही. चौलची नाकेबंदी विशेषतः चौलच्या अुत्तरेकडील मराठी मुलखातून कायम राहिल्यामुळे चौलचे ठाणे हातचे जाते की काय अशीच धास्ती गोव्याच्या व्हाअीसरॉयला वाटू लागली. या संकटातून पार पडण्याचा खात्रीचा अुपाय म्हणून गोवा व्हाअीसरॉयने गोव्याच्या हद्दीतच असलेला परंतु मराठी कब्जात असलेल्या फोंडा किल्ल्यावर स्वारी करण्याची योजना आखली. त्याची स्वाभाविक अपेक्षा होती की फोंड्यावरती हल्ला केल्यास मराठ्यांचा युध्द प्रयत्न विभागला जाअील आणि फोंड्याच्या रक्षणासाठी पुष्कळशी मराठी फौज अुत्तर आणि मध्य कोकणातून फोंड्याकडे हलविली जाअील. तसे झाल्यास चौल आणि वसअी या दोन्ही ठिकाणी मराठ्यांचे दडपण कमी होअील आणि पोर्तुगीजांना आपली परिस्थिती अधिक मजबूत करता येअील. व्हाअीसरॉयच्या दुर्दैवाने त्याचा हा अंदाज (Appreciation) सपशेल चुकीचा ठरला. फोंड्याच्या मोहीमेची हकीगत सविस्तरपणे या पुढे देण्यात येअील. मराठ्यांनी फोंड्यावर हल्ला झाला असतानादेखील चौलचा वेढा न अुठविता किंवा त्यावरील आपली पकड थोडीसुध्दा ढिली न करता फोंड्याचा किल्ला हिरीरीने लढविला. डिसेंबर १६८२ मध्ये तर निळोमोरेश्वराने मुंबअी जवळील कॅमूर, केळवा, माहीम, दंतोरा, सारगांव, सुपारा ही सर्व गावे जिंकून

पोर्तुगीज वसाहती


GOA DAMAN & DIU
ADMINISTRATIVE DIVISIONS
1971
MILES
KILOMETRES
STATE BOUNDARY
TALUK
CAPITAL OF UNION TERRITORY
DISTRICT HEADQUARTERS
TALUKA HEADQUARTERS
DAMAN
ARABIAN SEA
GUJARAT
DIU
GUJARAT
ARABIAN SEA
SIMBOR VILLAGE
ARABIAN SEA
SCALE: 1:50,000
ANGEDIVA ISLAND
ARABIAN SEA
SCALE:- 1:20.000
MAHARASHTRA
MYSORE
ARABIAN SEA
PERNEM
MAPUSA
BARDEZ
BICHOLIM
SATARI
VALPOI
PANAJI
TISWADI
S Jacinto I
Camborem Island
St GEORGE'S IS
Pequeno I
Grande Islands
MORMUGAO
PONDA
SANGUEM
MARGAO
SALCETE
QUEPEM
CANACONA
CHAURI
40 EAST OF GREENWICH
74°

BASED UPON SURVEY OF INDIA MAP WITH THE PERMISSION OF THE SURVEYOR GENERAL OF INDIA
THE TERRITORIAL WATERS OF INDIA EXTEND INTO THE SEA TO A DISTANCE OF TWELVE NAUTICAL MILES MEASURED FROM THE APPROPRIATE BASE LINE.

© GOVERNMENT OF INDIA COPYRIGHT, 1970

घेऊन तेथील पोर्तुगीज सामुग्री नष्ट करून टाकली. त्याचप्रमाणे कारंजा आणि केळीपंढा घेऊन पोर्तुगीजांच्या ताब्यातील ४० मैलाचा टापू मुक्त केला.

फोंड्याची लढाई (नकाशा नं. ५)

(Battle of Phonda)

फोंड्याचा किल्ला (पणजीच्या आग्नेयेस २२ कि.मि.अंतरावर) हा त्या काळचा पोर्तुगीज प्रदेश आणि मराठी प्रदेश यांच्या सरहद्दीवर असल्यामुळे लष्करीदृष्ट्या त्यास अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. अहमदनगरच्या किल्ल्याप्रमाणे फोंड्याचा किल्ला हा भुईकोट असून तो १५व्या शतकातच पोर्तुगीजांनी बांधलेला होता. किल्ल्याच्या भिंती जवळजवळ ५ फूट रुंदीच्या असून किल्ल्याच्या चारी बाजूस भक्कम बुरुज होते. सभोवताली खंदक असून या खंदकाच्या पलीकडे आणखी एक तट बांधण्यात आला होता. त्यामुळे या भागातील एक अभेद्य किल्ला म्हणून फोंड्याच्या किल्ल्याची ख्याती होती.

२७ ऑक्टोबर १६८१ रोजी गोव्याच्या व्हाइसरॉयने फोंड्याच्या स्वारीचे प्रस्थान ठेवले. सुमारे १५०० लढाऊ सैनिक आणि २५०० घोडेस्वार आणि चार भारी तोफा अशी सामुग्री घेऊन व्हाइसरॉयच्या सेनेने पणजी मधून कूच केले. जुने गोवे, आगाशी, दुर्भाट, कावळे, आणि फोंडा असा त्यांच्या चढाईचा सर्वसामान्य मार्ग होता. फोंड्याच्या दक्षिणेस असलेल्या खाडीतील दुर्भाट या बंदराजवळ पोर्तुगीज सैन्य पोहचताच तेथे असलेल्या मराठ्यांच्या टेहाळणी तुकड्यांनी (Covering Troops) त्यांना प्रतिकार केला. आणि तेथून माघार घेऊन किल्ल्यावर शत्रूच्या चढाईची खबर दिली. १ नोव्हेंबर १६८१ रोजी

दुर्गाड वरून पोर्तुगीजांचे सैन्य फोंड्याच्या किल्ल्याच्या परिसरात येअून पोहचले. यावेळी फोंडा किल्ल्यावर किल्लेदार म्हणून मराठी सेनेचे अेक अनुभवी आणि निष्णांत सेनापती येसाजी कंक सरनोबत म्हणून नियुक्त होते. खुद्द किल्ल्यात मराठा सैनिकांची अुपस्थिती ६०० पर्यंत होती आणि त्याचा ताबा येसाजीचा पुत्र कृष्णाजी कंक याजकडे होता. याखेरीज दोन तीनशे मराठा सैनिकांची अेक तुकडी किल्ल्याबाहेरील जंगलात पोर्तुगीज सैन्याच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी तैनात झाली होती. पोर्तुगीज सैन्य किल्ल्याच्या जवळच्या तटबंदी बाहेर येताच मराठी तोफखान्याने त्यांच्यावर जोराचा भडीमार सुरु केला. पोर्तुगीज तोफखान्यांनी या बंबारीला प्रत्युत्तर दिले. सतत तीन दिवस मराठी आणि पोर्तुगीज तोफा अेकमेकांवर आग ओकीत होत्या. परंतु कुणीच माघार घेण्याचे चिन्ह दिसेना चौथ्या दिवशी पोर्तुगीज गोळ्यांच्या मा-यापुढे बाहेरच्या तटबंदीला अेके ठिकाणी भगदाड पडले. या अनपेक्षित घटनेमुळे आता आपण किल्ला सर करू अशा आवेशाने पोर्तुगीज सैन्य तटबंदीच्या आत शिरू लागले. परंतु प्रत्यक्ष किल्ल्यापर्यंत पोहचण्यास अजून त्यांना खंदक पार करावयाचा होता. आणि या ठिकाणी त्यांची कोंडी झाली. याच नेमक्या वेळी किल्ल्याबाहेर असणा-या मराठा तुकडीने पाठीमागून येअून आणि पोर्तुगीजांनी पाडलेल्या भगदाडाचाच अुपयोग करून त्यांच्यावर जोरदार हल्ला केला. पाठीमागून होणारा हल्ला पुढे तटावरून होणारा गोळ्यांचा भडीमार आणि अत्यंत संकुचित जागा अशा कैचित सापडलेल्या पोर्तुगीज सैन्याला भारी किंमत मोजावी लागली. पोर्तुगीजांचे अनेक सैनिक कामास आले आणि त्यांना आपल्या स्थानकावर परत जाणे भाग पडले.

फोंड्यावरील स्वारीसाठी पोर्तुगीज व्हाअीसरॉय ने भारी सेना घेअून फोंड्याकडे प्रयाण केले. तेव्हापासून संभाजी राजांनी या लढाअीकडे जातीने

ञ्ज देण्याचे ठरविले होते. पोर्तुगीज आणि मराठी तोफखाना यांची अेकमेकांवरील गोळामारी सुरू असतानाच ४-११-१६८३ रोजी अेक हजार घोडेस्वार आणि दोन हजार पायदळ अशी तीन हजाराची अेक नव्या दमाची तुकडी संभाजीने फोंड्याच्या मदतीसाठी रवाना केली. पोर्तुगीज सेनापती डॉम रॉद्रीगो दि कॉस्टा याच्या सैन्याने मराठ्यांची ही तुकडी अडविली आणि अेक घुमश्चक्रीची चकमक या दोन्ही सैन्यात सुरू झाली. सेनापती डॉम रॉद्रीगो हा स्वतः हातघाअीच्या लढाअीत अुतरला आणि त्याच्यावर अेका मराठा सैनिकाने जबरदस्त वार करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या सुदैवाने त्याचा सहाय्यक फ्रॅन्सीस्को ऑल्वीज याने तो वार आपल्यावर घेअून रॉद्रीगोचे प्राण वाचविले. दिनांक १ नोव्हेंबरला संभाजी राजे स्वतः फोंड्याच्या परिसरात दाखल झाले आणि कुमक म्हणून पाठविलेली तीन हजाराची तुकडी आपल्या नेतृत्वाखाली आणून त्यांनी स्वतः किल्ल्यात प्रवेश केला. प्रत्यक्ष सेनापती सेनेच्या आघाडीवर असल्यामुळे किल्ल्याबाहेरील आणि किल्ल्यातील मराठा सैनिकांचे मनोधैर्य लाखोपटींनी वाढले. खुद्द पोर्तुगीज अितिहासकारांनीही नमूद करून ठेवले आहे की संभाजी राजे आपल्या बरोबरचे सैन्य घेअून किल्ल्यात प्रवेश करीत असताना त्यांच्या आजूबाजूस पोर्तुगीज सैन्य आणि तोफा होत्या आणि तरीही त्यांना अडविण्याची हिंम्मत पोर्तुगीजांना झाली नाही.

नोव्हेंबर महिन्याच्या प्रारंभी फोंड्याची लढाअी सुरू झाली तेव्हापासून गोव्यामध्ये सतत पाअूस पडत होता आणि बरोबरच थंडीही वाढत होती. अशातच संभाजीने स्वतःच्या अधिपत्याखाली कुमक किल्ल्यात आणल्यामुळे आणि किल्ल्यात प्रवेश करण्याच्या प्रयत्नात मनुष्य हानी झाल्यामुळे पोर्तुगीजांनी लढाअी बंद करून माघार घेण्यास सुरुवात केली. त्यांच्या माघारीचा रस्ताही दुर्घट

मार्गेच होता. या माघारीतही शत्रूचा पाठलाग करावा आणि त्याच्या सैन्याचे अधिकाधिक नुकसान करता यावे या हेतूने दुर्भाटच्या अलिकडील परंतु दुर्भाट बंदरावर लक्ष ठेवता येईल अशी एक महत्वाची टेकडी मराठी सैन्याने अगोदरच हस्तगत करून त्यावर आपल्या चौक्या बसविल्या होत्या. पोर्तुगीज सैन्यास या घटनेची यत्किंचितही कल्पना नव्हती. माघारीच्या रस्त्यावर पोर्तुगीज सैन्याच्या तुकड्या या टेकडीच्या जवळून जात असतांना टेकडीवरील मराठी सैन्याने त्यांच्यावर अचानक हल्ला चढविला. गोंधळून गेलेल्या पोर्तुगीज सैन्याची या चकमकीत जबर हानी झाली आणि एका तुकडीचा अधिपति मॅन्युअल दि सिल्व्हा हा मारला गेला. या अपयशाचा बदला घेण्यासाठी पोर्तुगीज सेनानी डॉम रॉड्रीगो डि कास्ता याने एक घोडदळाची तुकडी टेकडीच्या दिशेने रवाना केली. टेकडीवरील मराठी सैन्याने या तुकडीस टेकडीच्या मध्य भागापर्यंत येवू दिले आणि त्यानंतर दोन्ही बाजूंवरून त्यांच्यावर एक निकराचा हल्ला चढविला या अनपेक्षित कारवाईमुळे पोर्तुगीज घोडदळाची तुकडी मागे हटली आणि या माघारीमुळे टेकडीच्या पायथ्याशी असलेले पोर्तुगीज पायदळ सैन्याने प्राण वाचविण्यासाठी दुर्भाटची खाडी पार करण्याकरीता पोबारा केला. या चकमकीत अनेक पोर्तुगीज सैनिक मारले गेले. अशारितीने गोव्याच्या व्हाईसरॉयने केलेला फोंडा किल्ला घेण्याचा प्रयत्न सपशेल फसला आणि संभाजीच्या आक्रमक कारवाईला निर्विवाद यश मिळाले.

मराठ्यांचा जुवे बेटास वेढा

(Maratha Siege of Juve Island)

लगेचच प्रत्यक्ष गोव्यावर कब्जा करण्यासाठी १५००० पायदळ आणि

७००० घोडदळ घेऊन संभाजी राजांनी नव्या स्वारीचे प्रस्थान ठेवले. जुन्या गोव्यापासून जवळच असलेल्या मांडोवी नदीमध्ये जुवे नावाचे अेक छोटे बेट आहे. पोर्तुगीजांनी याचे नामकरण सांतोआंस्तेव्हाव असे केले होते. ओहटीच्या वेळी पायवाटेने या बेटावरून गोवे शहरात जाता येते. बेटाच्या पलीकडे आणि नदीच्या पैलतिरावर धावशी नावाचे गाव आहे. गोवे शहरात प्रवेश करण्याचा जमीनीवरील मार्ग आपल्या ताब्यात असावा या हेतूने संभाजीने जुवे बेटावर हल्ला करून ते आपल्या ताब्यात घेण्याचे ठरविले. या कार्यवाहीची पूर्व तयारी म्हणून धावशी गावाच्या बाजूने नदीच्या किना-यावर बुरूज बांधण्याचे तातडीचे हुकूम देण्यात आले. दिनांक २४ नोव्हेंबर १६८३ रोजी अंधाराचा फायदा घेऊन रात्री आठ वाजण्याच्या सुमारास ४० मराठा सैनिकांच्या अेका तुकडीने जुवे बेटावर प्रवेश केला. सुदैवाने तेथे कोणतीच शिबंदी नसल्याने तेथे असणा-या छोट्याशा किल्ल्याला शिड्या लावून मराठा तुकडीने गोवे शहराच्या तटबंदीच्या दिशेने जोरावर आणलेल्या छोट्या तोफांतून नाममात्र बंबारी केली. रात्री १० च्या सुमारास व्हाइसरॉयला खबर कळली की प्रत्यक्ष गोवे शहरावरच मराठी सेना चाल करून येत आहे. दि. २५ नोव्हेंबरला सकाळी आलेल्या बातम्यांवरून पोर्तुगीजांना कळून आले की जुवे बेट आणि त्यावरील किल्ला मराठ्यांच्या हस्तगत झाला असून त्यांचे पुढचे पाऊल प्रत्यक्ष गोवे शहरावरच पडणार आहे. गोवे शहराच्या रक्षणासाठी काही तरी निश्चित पाऊल उचलणे आवश्यक असल्यामुळे खुद्द व्हाइसरॉय काऊंट ऑफ अल्व्होर हा आपल्याबरोबर ४०० सैनिकांची तुकडी घेऊन मराठ्यांचा प्रतिकार करण्याच्या हेतूने जुवे बेटाच्या दिशेने पुढे सरसावला. याच सुमारास आणखी २०० सैनिकांची अेक मराठा तुकडी बेटावरील सैनिकांना कुमक म्हणून बेटावरील किल्ल्यात दाखल झाली होती. मराठी तुकडी बेटावरील उंचवट्यावर मोक्याच्या ठिकाणी असल्यामुळे आणि नवीन

आलेल्या तुकडीत घोडदळाचा भरणा असल्यामुळे मराठी सेनेच्या तुकडीने पुढे सरसावणाऱ्या पोर्तुगीज पायदळ सैनिकांवर कडाडून हल्ला चढविला तो इतका प्रखर होता की खुद व्हाईसरॉय मराठी घोडेस्वारांच्या घेऱ्यात सापडून घायाळ झाला त्याच बरोबर शेकडो पोर्तुगीज सैनिक मारले गेले. या भयानक प्रसंगातून बचाव करण्यासाठी व्हाईसरॉयने आपल्या सैनिकांना तातडीने माघार घेण्याची आज्ञा दिली. मागे हटणाऱ्या पोर्तुगीज सैन्याची पुष्कळ सामुग्री आणि दारुगोळा मराठ्यांच्या हाती पडला. लढाईचा वेग कायम ठेवण्याच्या दृष्टीने संभाजीने ही कार्यवाही अशीच चालवून प्रत्यक्ष गोवे शहरावर हल्ला करण्याचा निर्णय केला. याच दरम्यान मांडोवी नदीला अचानक पूर आल्यामुळे पुढील कार्यवाही स्थगित करणे संभाजीस भाग पडले.

मराठ्यांची माघार

(Maratha Withdrawal)

पोर्तुगीजांविरुध्द सुरु केलेली आक्रमक कारवाई स्थगित झाल्यामुळे आणि एकंदर परिस्थिती अनिर्णयीत राहिल्यामुळे या पुढे कोणते पाऊल उचलावे याचा विचार संभाजी राजे करीत असतानाच दोन महत्वाच्या बातम्या मराठी गोटात येऊन धडकल्या. पहिल्या बातमी प्रमाणे औरंगजेबाचा पुत्र शहाआलम भारी सेना घेऊन मराठी मुलुखात घुसला आहे ही होय. दुसऱ्या बातमी प्रमाणे पोर्तुगीज व्हाईसरॉयने जमीनीवर कोंडमारा झाल्यामुळे आपल्या आरमाराची मदत घेऊन सागरी मार्गाने मराठ्यांची कोंडी करण्याचे ठरविले होते. या बातम्यांप्रमाणे पोर्तुगीजांची जहाजे मांडोवी नदीच्या तोंडाशी असलेल्या अग्वाद.

कोळे, महगांव या महत्त्वाच्या आणि मोक्याच्या सागरी केंद्रावर नाकेबंदी करण्यासाठी आणण्यात आल्या. अशा परिस्थितीत जुवे बेटावर वेळ काढल्यास शहाआलमच्या सैन्याकडून मराठी मुलखाचे नुकसान होण्याची शक्यता होती आणि शिवाय पोर्तुगीजांनी घेतलेल्या सागरी अुपाय योजनांमुळे गोवे शहरावर यशस्वी हल्ला करण्याची शक्यता दुरावली होती. या दोन कारणांमुळे संभाजीने जुवे बेटावरून माघार घेण्याचे ठरविले. पण असे करताना आपण कोणत्याही संकटात सापडून माघार घेत आहोत अशी पोर्तुगीजांची समजूत होअु नये म्हणून त्यांनी आघाडी तेवत ठेवण्याचा (Maintain the Front Intact) संघटीत प्रयत्न केला. अेका बाजूने आपला वकील राव क्वीरसिंग याला गोव्याच्या व्हाअीसरॉयशी तहाची बोलणी करण्यासाठी रवाना करण्यात आले. याच बरोबर १००० घोडदळ आणि २००० पायदळ असलेली मराठी सैनेची अेक तुकडी पणजीच्या अुत्तरेस असलेल्या साष्ट आणि बारदेश या प्रदेशात दहशत बसविण्यासाठी पाठवून दिला. या तुकडीने संपूर्ण डिसेंबर महिन्यात साष्ट आणि बारदेश या प्रदेशातील अनेक ठिकाणी हल्ले करून पोर्तुगीजांची धान्य सामुग्री लुटून घेतली आणि काही ठिकाणची युध्द विषयक स्थानके नष्ट करून टाकली.

लष्करी मूल्यमापन

(Military Assessment)

आतापर्यंत केलेल्या लष्करी विश्लेषणावरून हे स्पष्ट होअील की संभाजीने आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीला (१६८० ते १६८४) सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्या विरुध्द गर्वान्वित केलेली आक्रमक मोहीम ही मराठ्यांच्या युध्दशास्त्रातील अेक महत्त्वाचा टप्पा होती. ही मोहीम युध्दनितीचे काही

आडाखे लक्षात ठेवूनच प्रयत्नपूर्वक जाणीवेने आखलेली दिसते. या तीन चार वर्षात बादशहा औरंगजेब हा आपली सैन्यसामुग्री घेऊन विजापूर आणि गोवळकोंडा येथील राज्ये नष्ट करण्याच्या प्रयत्नात गुंतला होता. औरंगजेब सारखा अेक अत्यंत प्रबळ शत्रू दुसरीकडे गुंतला आहे हे ध्यानात घेअुनच मराठी राज्याचे दुय्यम शत्रू म्हणजे सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्यावर घणाघाती प्रहार करून त्यांना कायमचे ठेचून काढायचे हाच निर्धार संभाजींच्या मनात होता. चौल, जंजिरा, आणि फोंडा या तिन्ही ठिकाणी झालेल्या घनघोर लढायांवरून हे स्पष्ट होअील की या सर्व लढायांमध्ये अुद्दिष्टाचा सातत्याने पाठपुरावा करणे (Maintenance of the Aim) आणि आक्रमक कारवाअी (Offensive Action) ही युद्धशास्त्राची दोन महत्त्वाची तत्त्वे संभाजीने केव्हाही दृष्टीआड करून दिली नाहीत. अुंदेरी बेट पहिल्या हल्ल्यात हस्तगत झाले नाही तरी थोड्याशा दमाने अुंदेरीवर दुसरा हल्ला चढविण्यात आला. हा हल्ला अयशस्वी झाला तरी निराश न होता अुलट दुप्पट जोराने मराठी सेना दंडाराजपुरीवर तुटून पडली. दंडाराजपुरीवरील हल्ला अितका प्रखर होता की तेथून माघार घेतलेल्या सिद्दीच्या सैन्याला थोडीशीही अुसंत मिळू शकली नाही. जंजिऱ्याच्या अभेद्य किल्ल्यावर लगेचच जोरदार हल्ला चढविण्यात आला. समुद्रमार्गाने किल्ला सर होत नाही ही खात्री पटल्यावर खुष्कीच्या मार्गाने आपली सेना किल्ल्याच्या तटापर्यंत भिडवावी म्हणून प्रत्यक्ष खाडी भरून काढण्याचा अचाट प्रयत्न संभाजीने हाती घेतला. या दुर्दम्य हालचाली हा केवळ अट्टाहास नसून स्वतःच्या अुद्दिष्टासाठी निर्धारपूर्वक घेतलेले अेक गंभीर पाअूल होते. जी धडाडी आणि निश्चय सिद्दी विरुध्द वापरले गेले त्याचाच पाठपुरावा पोर्तुगीजां विरुध्द दिसून आला. तारापूर, माहीम ही जिंकून घेतलेली ठाणी पोर्तुगीजांनी परत हस्तगत केल्यानंतर स्वस्थ न

असता ताज्या दमाच्या तुकडया घेअून तारापुरवर पुनश्च हल्ला झाला आणि पोर्तुगीज सेनेला तेथून घालवून दिले. अेवढे करून मराठी सेना स्वस्थ बसली नाही तर आक्रमक अुद्दिष्ट पुढे ठेवून आणि तारापूरला शक्तीस्थान बनवून मराठी तुकडया अुत्तरेस दमण आणि दक्षिणेस वसअी काबीज करण्यासाठी रवाना झाल्या. फोंडयाच्या लढाअीतही स्वत: पोर्तुगीज व्हाअीसरॉय किल्ल्यावरती चाल करून येत आहेत हे अैकल्यावर किल्ला प्राणपणाने लढविला गेला आणि शत्रूची चहूकडून अुपस्थिती असतांनाही किल्ल्यात नव्या दमाच्या तुकडया दाखल करून शत्रूला माघार घेण्यास भाग पाडले. अशा रितीने अुद्दिष्ट कायम राखणे आणि त्याला जोड म्हणून आक्रमक कार्यवाही कार्यान्वित करणे ही दोन तत्वे या मोहीमेची खास वैशिष्टये म्हणून सांगता येतील. या पुढे जाअून असेही म्हणता येअील की मराठयांच्या आक्रमक प्रवृत्तीला दोन अंगी (Two Dimentional by Land and Sea) स्वरूप देण्याचे श्रेय संभाजीलाच द्यावे लागेल. अितक्या निर्धाराने या लढाया लढविल्या गेल्या की आपोआपच युध्दाचे अग्रेसरत्व (Initiative) संभाजीने आपल्या ताब्यात ठेवले. जंजि-याचा संग्राम घुमधडाक्याने सुरू असतांना कल्याण भिवंडीवर झालेल्या मोगली हल्ल्याचे गांभीर्य लक्षात घेअून त्याला प्रतिकार करण्यासाठी जंजि-याची लढाअी दुय्यम सेनापतीवर सोडून कल्याण, भिवंडी मधून मोगली सैन्यास हाकून देण्यासाठी संभाजीने ठोस पाअूल अुचलले. ही गोष्ट फोंडयाच्या लढाअीत पुन्हा घडली. फोंडयाची लढाअी जारी असतांनाच राजपुत्र शहाआलम मराठी मुलखात घुसल्याचे कळताच फोंडयाची लढाअी येसाजी कंक यांच्यावर सोडून संभाजीने शहाआलमला अडविण्यासाठी महाराष्ट्राकडे धाव घेतली. यावरून हे सिध्द होते की कोणता शत्रू आधी निवारला पाहिजे आणि दुय्यम शत्रू कोण याची नेता या नात्याने संभाजी

ला पूर्ण जाणीव होती आणि कोणत्याही परिस्थितीत मराठी राज्यात सामील झालेला कोणताही प्रदेश शत्रूच्या हातात पडता कामा नये हा युध्दनेता या दृष्टीने संभाजीचा निर्धार होता.

शत्रू नष्ट करण्याच्या अनेक मार्गांपैकी शक्य तो शत्रूची चहू बाजूने कोंडी करणे आणि जमीन आणि सागर या दोन्ही मार्गांवरून त्याचे दळणवळण बंद करणे हे युध्दशास्त्राचे आणखी अेक मान्य तत्व आहे. या तत्वास अनुसरूनच संभाजीने अंजदीव बेटावर प्रथम आक्रमण करून कर्नाटकातून सागरी मार्गाने गोव्यात होणारी अन्नधान्याची रसद तोडून टाकण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष गोवे शहरावर हल्ला करण्यासाठी पोर्तुगीजांच्या ध्यानी मनी नसतानाही अचानक कारवाई (Surprise Actions) करून संभाजीने जुवे बेट हस्तगत केले. आणि तेथून पुढे जुवे बेट हे शक्तीस्थान (Strong Point) बनवून प्रत्यक्ष गोव्यावर चढाई करण्याची योजना तयार केली. याच बरोबर आणखी अेक मार्गदर्शक तत्व म्हणून पाळण्यात आले ते असे की संभाजीच्या कारवायांमध्ये त्याने लवचिकपणा (Flexibility) हे तत्वही सातत्याने डोळ्यासमोर ठेवले. चौलवरील दोन हल्ले यशस्वी होत नाहीत हे पाहिल्यावर नजीकच्या टप्प्यात असणा-या दंडाराजपुरी आणि कोरलाई या पोर्तुगीज ठाण्यांवर हल्ला चढविण्यात आला.

युध्दव्यवहाराच्या दृष्टीने पाहताही प्रत्येक लढाईची हाताळणी (Conduct of the Battle) अत्यंत पध्दतशिरपणे केल्याचे आपणास दिसून येईल. चौल, दंडाराजपुरी, जंजिरा आणि फोंडयाचा किल्ला ही सर्व ठाणी तटबंदीने युक्त आणि बचावाच्या दृष्टीने संरक्षित अशी स्थानके होती. या ठिकाणांवर केवळ पायदळांकरवी हल्ले चढविणे आत्मघातक ठरले असते, म्हणून या सर्व ठिकाणांवरील हल्ल्यात संभाजीने तोफखान्याचा भरपूर वापर केला. तोफ-

सान्याची ताकद अशात-हेच्या बंदीस्त स्थानकांविरुध्द किती प्रभावी ठरते याची पूरेपूर जाणीव असल्यामुळे पुरवठ्याच्या दृष्टीने (Logistics) त्यांचा तुटवडा पडू नये म्हणून डिचोली आणि कुडाळ येथे दारुगोळा त्यार करण्याचे कारखाने संभाजीने सुरु केले. अेकदा लढाअी सुरु झाल्यावर लढाअीचा वेग कोणत्याही कारणास्तव खंडीत होता कामा नये आणि तो कायम राहला पाहिजे (To maintain the momentum of Attack) हे तत्व संभाजीने मार्गदर्शक म्हणून वापरले. तारापूर हस्तगत झाल्यावर दीव दमण आणि वसअी घेण्यासाठी सेना रवाना करणे दोन दोनदा हल्ले अयशस्वी झाले तरी चौल आणि जंजिरा घेण्यासाठी तिस-यांदा हल्ला करणे आणि फोंडयातून पोर्तुगीजांनी माघार घेतल्यावर कुंभे बेट कब्जात घेअून प्रत्यक्ष गोव्यावर हल्ला करण्याची तयारी करणे ही लढाअीचा वेग कायम राखण्याच्या संभाजीच्या दंडकाची जागती अुदाहरणे म्हणून सांगता येतील.

कोणत्याही लढाअीत सर्वोच्च सेनापतीला प्रत्येक ठिकाणी जातीने नेतृत्व आणि नियंत्रण करणे (Personal Command and Control) शक्य नसते. अशा त-हेची जबाबदारी निवडक, विश्वासू आणि अनुभवी अशा दुय्यम सेनापतीच्या हातीच सुपूर्त करावी लागतात. पण जर काही कारणांमुळे दुय्यम सेनापतीचे प्रयत्न अयशस्वी ठरले तर सैनिकांचा हौसला अुंच करण्यासाठी सर्वोच्च सेनापतीला प्रत्यक्ष स्वतः लढाअीचे नेतृत्व हाती घ्यावे लागते. या बाबतीतही शिवाजी महाराजांनी घालून दिलेला आदर्श या मोहिमेत संभाजीने पुढे चालू ठेवला. तारापूरवरील दुस-या हल्ल्यात, चौलच्या लढाअीत, जंजि-याच्या संग्रामात आणि शेवटी फोंडयाच्या लढाअीत ताज्या दमाच्या तुकडया बरोबर घेअून अुद्दिष्टाची पूर्तता करण्यासाठी संभाजी राजे जातीने रणक्षेत्रात हजर

झाले आणि सहाजिकच प्रत्यक्ष छत्रपति आपले नेतृत्व करणार या केवळ भावनेनेच सैनिकांचे मनोबल दुपटीने वाढले. त्याबरोबर सैनिकांचे मनोधैर्य (Morale) वाढविण्यास त्यांच्यात अिर्षा अुत्पन्न करणे हे सेना नायकाचे आद्य कर्तव्य आहे. याचा विसरही संभाजीने पडू दिला नाही. जंजि-याच्या संग्रामात प्रत्यक्ष स्वतः हजर असून देखील त्यांनी प्रत्येक सैनिकास अर्धाशेर सोने आणि चांदीची कडी देवू केली. लढाअी हा देखील अेक खेळ आहे ज्या प्रमाणे सामान्य खेळातील खिलाडी अेखादा चषक मिळविण्याच्या अिर्षेने सर्वशक्ती पणास लावून खेळतात त्याचप्रमाणे सैनिकांनाही अशा त-हेचा मान सन्मान अपेक्षित असतो. अेक जागृत युध्द नेता या दृष्टीने ही गोष्टही संभाजीने नेमकी हेरली होती असे दिसते.

वरील मुल्यमापनावरुन ही गोष्ट स्पष्ट होअील की युध्दनिती, युध्द व्यवहार आणि युध्दपुरवठा या तिन्ही युध्दशास्त्राच्या तत्वांचे प्रकट स्वरुप पश्चिम किना-यावरील मोहिमेत ठळकपणे दृष्टीस पडले आणि म्हणूनच मराठे कालीन युध्दशास्त्राच्या अुत्क्रांतीतील ही मोहिम म्हणजे अेक महत्त्वाचा टप्पा होता असे म्हणण्यास कोणतीच हरकत नाही.

प्रकरण नववे

संदर्भसूची

१ श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांचे चरित्र, मल्हार रामराव चिटणीस - विरचित संपादक - र.वि.हेरवाडकर

२ मराठी रियासत - उग्रप्रकृती संभाजी - खंड पहिला - गो.स. सरदेसाअी

३ मराठ्यांचे स्वातंत्र्य समर पूर्वार्ध - १६८१ - १७०७ - ग.श्री.पुराणीक

४ शिवपुत्र संभाजी - सौ. कमल गोखले

५ छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र - वा.सी.बेंद्रे

६ पोर्तुगीज - मराठे संबंध अर्थात पोर्तुगीजांच्या दप्तरातील मराठ्यांचा अितिहास - डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर

७ हिंदवी स्वराज्य आणि मोगल - सेतु माधवराव पगडी - संभाजी काळ.

८ A History of the Maratha People - C.A. Kincaid and Rao Bahadhur Parasnis

प्रकरण दहावे

संभाजी कालीन मोहिमा-मध्य महाराष्ट्र

(Maratha Operations Under
Sambhaji - Central Maharashtra)

झिजीकरणाचे युध्द

(The War of Attrition)

शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर (२ अेप्रिल १६८०) मराठी सत्तेची सूत्रे त्यांचे ज्येष्ठ पुत्र संभाजीराजे यांच्या हाती आली. याच सुमारास मोगल सम्राट औरंगजेबचे राजपुतांबरोबर चालू असलेले युध्द संपुष्टात आले. मेवाड राज्यातील मोगली मोहीम फसल्यामुळे पुढील युध्दनिती कशी असावी याचा विचार करीत असतानाच शिवाजी महाराजांच्या मृत्युची बातमी दिल्लीत येऊन धडकली. त्यामुळे राजपुतान्यात गुंतलेल्या मोगल सैन्याला नवीन क्षेत्र उपलब्ध होणार ही गोष्ट स्पष्ट झाली. तातडीची कारवाई म्हणून मोगल सरदार बहादुरखान यांस खान अि जहान असा नवीन किताब देऊन औरंगजेबाने त्यास दक्षिणेत रवाना केले (मे १६८०) त्या वेळेपासून तो पुढची नऊ वर्षे म्हणजे मार्च १६८८ पर्यंत मोगल आणि मराठे यांच्यात अेक अखंड युध्द सुरु होते. या नऊ वर्षात जवळजवळ दोन लाख (२०००००) मोगल सेना उत्तर महाराष्ट्रापासून दक्षिणेत त्रिचनापल्लीपर्यंत मराठ्यांशी लढत राहिली. मराठी सैन्याची संख्या या काळात ६०,००० पासून ८०,००० पर्यंत असावी असे निरनिराळ्या लढायात गुंतलेल्या आणि वेगवेगळ्या अैतिहासिक साधनातून उल्लेख केलेल्या आकड्यांवरुन सरासरी अनुमान करता येईल.

मोगलांचे उद्दिष्ट

वरील नऊ वर्षांच्या युध्दकाळात औरंगजेबाचे मुख्य युध्दउद्दिष्ट (Strategic aim) हे मराठ्यांची सत्ता संपूर्णपणे नष्ट करणे हे होते. हे उद्दिष्ट पुढे ठेवून ज्या ज्या ठिकाणी मराठी सत्ता प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रितीने प्रस्थापित झाली होती ती मोडून काढून त्या त्या ठिकाणी मोगली अंमल कायम करणे हा औरंगजेबाचा सतत प्रयत्न होता. १६८० च्या मे पासून जुलै १६८१ पर्यंत मोगल मोहिमेची सूत्रे दक्षिणेतील नव्याने नियुक्त झालेला मोगल सुभेदार खानजी जहान याजकडे होती. जुलै १६८१ मध्ये शाहजादा मुअज्जम उर्फ शहाआलम याची बादशहाने दक्षिणेत रवानगी केली आणि मोगल मोहिम शहाआलम आणि खान जी जहान यांनी संयुक्तपणे पुढे चालू ठेवली. सप्टेंबर १६८१ मध्ये स्वतः औरंगजेबाने राजपुतान्यामधून बाहेर पाय घेतला आणि नोव्हेंबर मध्ये तो बऱ्हाणपुरला पोहचला. प्रत्यक्ष बादशहा दक्षिणेत हजर झाल्यामुळे सप्टेंबर १६८१ पासून मोगलांच्या लष्करी कारवायांचे नेतृत्व आणि नियंत्रण खुद्द औरंगजेबाकडेच राहिले. दक्षिणेतील विजापूरची आदिलशाही आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही ही दोन्ही राज्ये इस्लाम धर्मीयांची असली तरी मोगल सत्ता अखंडपणे प्रस्थापित करण्यास या दोन राज्यांचा नेहमीच अडथळा होत असे. विशेषतः इस्लामी धर्माचा दुवा असून देखील या दोन्ही मुस्लीम राज्यात दक्षिण ही दक्षिण्यांची राहावी आणि त्यात उत्तरेतील मोगलांचा शक्य तो शिरकाव होऊ नये अशी या दोन्ही राज्यात प्रबळ भावना होती. या भावनेमधूनच विजापूर आणि गोवळकोंडा या दोन्ही राज्यांचे शिवाजी महाराजांबरोबर आणि त्यांच्या नंतर संभाजी बरोबर मित्रत्वाचे संबंध होते. वेळोवेळी मोगलांच्या विरुध्द मराठी सेना ~~मोगलांच्या विरुध्द~~ लढाईत हजर असत त्यामुळे मराठी राज्यावरील आक्रमण सुरु असतानाच

औरंगजेबने १६८२ च्या नोव्हेंबरपासून विजापूरची आदिलशाही नष्ट करण्यासाठी निर्णायक मोहिम सुरु केली आणि चार वर्षांच्या अखंड मोहिमेनंतर सप्टेंबर १६८६ मध्ये सिकंदर आदिलशहाच्या शरणागतीने आदिलशाहीचा अस्त झाला. त्याच्या पाठोपाठ गोवळकोंड्याची कुतुबशाही नष्ट करण्याकरीता मोगलांची दुसरी मोहिम सुरु झाली. १६८६ आणि १६८७ या दोन वर्षात झालेल्या युध्दानंतर गोवळकोंड्याच्या अबुल्हसनने शरणागती पत्करली आणि जून १६८७ मध्ये कुतुबशाहीचा अंत झाला. साहाजिकच १६८७ नंतर मोगलांची सर्वशक्ती मराठी सत्ता नष्ट करण्याकडे केंद्रीत झाली.

मराठ्यांची युध्दनिती
(Maratha Strategy)

औरंगजेबसारखा अनुभवी आणि कसलेला सेनापति, त्याच्या हाताखालचे जवळ जवळ २०।२५ मातब्बर सेनानी आणि २००००० पर्यंतची सुसज्जसेना अशा तिहेरी दडपणामुळे मराठी सत्ता टिकली कशी हे अेक अैतिहासिक आश्चर्यच म्हणावे लागेल. कोणत्याही आघाडीवर निर्णायक लढाई करणे मराठी सेनेस केवळ अशक्य होते. कारण मोगली हल्ले अेकाच वेळी अनेक ठिकाणी होत होते. या अुलट मराठी सेना ही मध्य महाराष्ट्र, सध्याचा कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात तसेच सध्याच्या तामीळनाडूच्या प्रदेशात विभागली गेली होती. याशिवाय मोगली आक्रमणाविरुध्द लढत असतांनाच विजापूर आणि गोवळकोंडा या दोन राज्यांबरोबर असलेले पूर्वापार मित्रत्वाचे संबंध लक्षात घेता अधुनमधुन त्यांनाही लष्करी मदत करणे हे मराठ्यांचे कर्तव्य होते. अशा या विचित्र परिस्थितीत मराठ्यांनी स्थळ आणि काळ लक्षात घेऊन ज्या युध्दनितीने मोगल सेनेची शक्ती खच्ची करता येईल आणि

लढा कायम चालू ठेवता येईल अशा युध्दनितीचा अवलंब केला. शत्रूने अेखाद्या ठिकाणी हल्ला केल्यास त्याच्या पाठोपाठ प्रतिहल्ला करणे, शत्रू सेनेचे शक्य तितके नुकसान करणे आणि शत्रू अंगावर होत आहे असे पाहताच त्या ठिकाणाहून पध्दतशिर माघार घेणेहीच या लवचीकरणाच्या युध्दनितीची प्रमुख सुत्रे होती. उत्तर महाराष्ट्रातून ते थेट त्रिचनापल्ली बेंगलुर पर्यंत जवळजवळ २००० कि.मि. च्या टापूत अनेक ठिकाणी अनेक वेळा मोगल आणि मराठे यांच्यात घुमश्चक्रीचे संग्राम झाले परंतु कोणत्याही अेका ठिकाणी मोगलांना निर्णायक विजय प्राप्त होऊ शकला नाही. काही ठिकाणी मराठ्यांच्या ताब्यात असलेले किल्ले युध्दनैतिक दृष्ट्या अत्यंत मोक्याचे असल्यामुळे दोन तीन वर्षे पर्यंत हे किल्ले मराठ्यांनी शर्थीने लढविले. नाशिक जवळील रामशेजचा किल्ला हस्तगत करण्यासाठी अनेक मातब्बर मोगली सरदारांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. तरीही तो किल्ला मोगलांच्या हातात पडू शकला नाही. ठाण्याजवळील कोथळागडचा किल्लाही मराठी सैन्याने मोठ्या शर्थीने झुंजविला आणि जरी तो शेवटी मोगलांच्या हातात पडला तरी त्यासाठी त्यांना जबर किंमत द्यावी लागली.

१६८० ते १६८८ या काळात मोगल आणि मराठे यांच्या दरम्यान ज्या असंख्य लढाया झाल्या त्याकडे नुसता दृष्टीक्षेप केला तरी असे दिसून येईल की शिवाजी महाराजांनी आपल्या ३५ वर्षांच्या अखंड लष्करी मोहीमगिरीत मराठी सत्ता अत्यंत मजबूत लष्करी पायावर उभी केली होती. आणि कितीही अडचणी आल्या तरी मराठी सत्ता मोगली आक्रमणा पुढे हार पत्करणार नाही अशी वैचारिक भूमिका मराठी जनतेत निर्माण केली होती त्यामुळेच औरंगजेब बादशहाचा लष्करी वरवंटा चौफेर फिरत असतांना देखील मारू अथवा मरू या युध्द सूत्रावर मराठी सत्ता निश्चिंत राहू शकली.

नकाशा नं ६

उत्तर महाराष्ट्र- संघर्ष


सुरत
अहिवंतगड
बुऱ्हाणपूर
बागलाण
रामसेज
औरंगाबाद
फर्दापूर
नासिक
अहमदनगर
पेडगांव (बहादुरगड)
पुणे
सोलापूर
सातारा

मध्यमहाराष्ट्रातील संघर्ष (१६८०) (नकाशा नं. ६)

(Operations in Central Maharashtra (1680))

श्री शिवाजी महाराजांच्या निधनानंतर थोड्याच दिवसात म्हणजे मे १६८० मध्ये औरंगजेब बादशहाने राजपुत्र मुअज्जम अुर्फ शहाआलम यास दक्षिणेस रवाना केले. त्याच्या बरोबर सेनापती बहादूर खान यास खान अी जहान असा किताब देऊन त्याची दक्षिणेचा सुभेदार म्हणून औरंगाबादकडे नियुक्ती केली. औरंगाबाद येथे आपला लष्करी तळ स्थिर-स्थावर करुन जुलैच्या मध्यास मराठ्यांच्या ताब्यात असलेल्या नाशिक जवळील अहिवंतगड या किल्ल्यास खानअी जहानने वेढा घातला. किल्ला मजबूत असला तरी तो फार काळ लढविणे शक्य नव्हते. त्याचप्रमाणे वेढा घालणा-या मोगली सैन्याबरोबर प्रत्यक्ष प्रतिकार करण्याइतकी शक्ती मराठी सैन्याकडे नव्हती. त्यामुळे मोगल सैन्याचे लक्ष वेधले जाअील आणि त्यांच्या सैन्याची विभागणी करणे त्यांना भाग पडेल अशा दुहेरी अुद्देशाने मराठ्यांनी आपली कारवाअी आयोजित केली. मराठी सेनेचा अेक घट औरंगाबादच्या वायव्येस सुरतेकडे, दुसरा घट अुत्तरेस असलेल्या ब-हाणपूर कडे आणि तिसरा घट खुद्द औरंगाबादच्या परिसरातच रवाना करण्यात आला. या हालचालींचा अुद्देश असा होता की सुरत आणि ब-हाणपूरकडे गेलेल्या मराठी घटांना रोखण्यासाठी अहिवंत गडाला वेढा घालून बसलेल्या मोगली सैन्याचा थोडा तरी भाग या दिशांना पाठविला जाअील आणि त्यामुळे वेढ्याची पकड पुष्कळशी ढिली पडेल. याबरोबर औरंगाबाद मार्गाने पश्चिमेस २०० कि.मी. वर असलेल्या नाशिक जवळील अहिवंत गडावर औरंगाबादहून जाणारी सैन्य-शक्ती आणि सामुग्री तोडणे हे देखील तितकेच महत्वाचे होते. याच कामा-

साठी तिसऱ्या गटाची औरंगाबादच्या परिसरातच नियुक्ती केली गेली. ऑगस्ट महिन्यामध्ये मोगल सैन्यावरील दडपण वाढावे म्हणून मराठ्यांनी औरंगाबाद पासून २५५ कि.मी. आग्नेयेस असलेल्या सोलापूरकडे दुसरी आघाडी उघडली या किल्ल्यावरील तोफा दुसरीकडे हलविण्याचे काम करण्यात मोगली सैन्य गुंतले असताना मराठी सैन्याने त्यांच्यावर अचानक हल्ला करून त्या तोफा हस्तगत केल्या आणि पुढील दोन तीन महिने सोलापूरच्या मजबूत किल्ल्यावर वारंवार हल्ले करण्याचे सत्र चालू ठेवले. डिसेंबरमध्ये स्वतः संभाजीराजांनी सोलापूर परिसरात असलेल्या सेनेच्या गटास भेट देऊन सोलापूर किल्ला आणि आजूबाजूचा परिसर यांची जातीने पाहणी केली. या प्रसंगी सोलापूरचा किल्लेदार रणमस्तखान याने मराठी सेनेच्या गटावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात उभय पक्षाची पुष्कळच मनुष्यहानी झाली आणि लढाई अनिर्णित राहिली. १६८० च्या अखेरीस कर्नाटकातही हालचाली करण्याची गरज निर्माण झाल्यामुळे हरजीराजे महाडीक या मातब्बर मराठा सरदाराची कर्नाटकात नियुक्ती करण्यात आली.

मध्य महाराष्ट्रातील संघर्ष १६८१

(Operations in Central Maharashtra1681)

१६८१ या वर्षात नाशिक ते सोलापूर हा ४००।४५० कि.मी.चा प्रदेश हेच मुख्य युद्ध क्षेत्र राहिले. या संबंध वर्षात मराठ्यांच्या सर्वच हालचाली आक्रमक स्वरूपाच्या राहिल्या. त्यांनी उत्तरेत खानदेशात (सध्याचा धुळे, जळगांव) परिसर आणि पुढे बऱ्हाणपूर पर्यंत धडक मारली. या उलट मोगल सैन्याने दक्षिणेच्या बाजूस युद्धक्षेत्र वाढवून पुण्याच्या आसपासच्या प्रदेशात चढाई केली. मोगल सैन्याची कुमक सातत्याने वाढत राहिल्यामुळे ज्या ज्या ठिकाणी मोगलसेना

प्रबळ आढळून आली त्या त्या ठिकाणी मुकाबला करून नंतर माघार घेणे हीच मराठ्यांची युध्दनिती होती. या वर्षातील त्यांच्या अेकंदर हालचालींचे वर्णन बचावात्मक आणि आक्रमक (Defensive - Offensive) अशा दुहेरी स्वरूपाचे होते असे म्हणणे योग्य ठरेल.

जानेवारी १६८१ च्या मध्यासच २०,००० स्वारांची अेक तुकडी घेअून सेनापती हंबीरराव मोहिते यांनी खानदेशातील अनेक मोगली ठाण्यांवर हल्ला करून ती ठाणी लुटली, त्याचप्रमाणे जळगांव च्या पश्चिमेस असलेल्या धरणगांव येथील अिंग्रज फॅक्टरीवर हल्ला करून तीहि लुटण्यात आली. अेवढेच करून न थांबता मराठी सेनेने चढाअी करून जळगांवच्या अुत्तरेस असलेल्या ब-हाणपूर या प्रमुख मोगली ठाण्यावर हल्ला केला. मराठ्यांच्या या चढाअीचे वृत्त समजताच खानजीहान आपली सेना घेअून औरंगाबाद फर्दापूर मार्गाने ब-हाणपूर कडे निघाला. खानजीहानच्या सैन्याची ताकद अधिक असल्यामुळे मोहित्यांनी त्याच्याशी बावा लागणारा संभाव्य संघर्ष टाळून ब-हाणपूरहून थेट नाशिकच्या दिशेने माघार घेतली आणि नाशिकच्या अुत्तरेस असलेल्या साल्हेरगड या किल्ल्याचा आश्रय घेतला. खानजीहान व त्याची सेना औरंगाबादेतून ब-हाणपूरच्या दिशेने गेली आहे हे वृत्त संभाजी राजांना कळताच त्यांनी अेक गट अहमदनगर - मुंगी पैठण - या मार्गाने प्रत्यक्ष औरंगाबादवर हल्ला करण्यासाठी रवाना केला. हा गट तातडीने औरंगाबादेस पोहचला आणि त्याने बहादरपुरा हा शहराचा प्रमुख भाग व्यापून टाकला. या घटनेमुळे मोगली ठाण्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि त्यांनी ही बातमी ताबडतोब खानजीहानाकडे पाठविली. ब-हाणपूरच्या वाटेवर असलेल्या खान जी जहानास हे गंभीर वृत्त समजताच आगेकूच करण्याचा बेत रद्द करून त्याने आपल्या सैन्याचा मोर्चा

औरंगाबादकडे वळविला. वास्तविक मराठी सेना औरंगाबादेत घुसली त्यावेळेस खानाची छावणी औरंगाबादपासून ६० कि.मी. वर असलेल्या बाभूळगांव या गावी होती. आपल्या कारवाईमुळे ब-हाणपूरकडे जाणारा खान औरंगाबादकडे परत येतो आहे हे समजताच मराठ्यांनी औरंगाबादहून माघार घेतली.

जून १६८१ मध्ये मोगल आणि मराठे यांच्या राजकीय आणि लष्करी हालचालीवर प्रभाव टाकणारी एक अनपेक्षित घटना घडून आली. औरंगजेबचा बंडखोर राजपुत्र अकबर आणि त्याचा समर्थक मारवाडचा दुर्गादास राठोड हे दोघे १००० पायदळ आणि ४०० घोडेस्वार अशी कुमक बरोबर घेऊन संभाजी राजांकडे राजकीय आश्रय (Political Asylum) मागण्यासाठी पाली सुधागड या ठणावळ्याच्या दक्षिणेस असलेल्या गावाजवळ पोहचले. अकबराने मराठ्यांचा आश्रय घेण्यासाठी दक्षिणेकडे प्रयाण केले आहे आणि तो मराठी मुलखात दाखल झाला आहे ही घटना ऐकून औरंगजेब अस्वस्थ झाला. ८ सप्टेंबर १६८१ ला त्याने राजपुतान्यातून पाय काढला आणि तेथून तो नोव्हेंबर मध्ये ब-हाणपूरला येऊन पोहचला. प्रत्यक्ष बादशहा युध्दक्षेत्रात हजर झाल्यामुळे मराठ्याविरुध्दच्या लढाईची सूत्रे आता त्याच्याच हातात केंद्रीत झाली.

मध्यंतरीच्या काळात म्हणजे जून-जुलै १६८१ मध्ये मराठीसेना आणि रणमस्तखानाच्या हाताखालील मोगली सेना यांची नाशिक परिसरातील धरमपूरच्या शिंडीजवळ एक चकमक झडली आणि मोगली सेनेचा जोर पाहून मराठी सेनेने माघार घेतली. थोड्याच दिवसात ८००० घोडदळाची एक ताजी तुकडी घेऊन नेताजी पालकरांनी नाशिक जिल्ह्याच्या बागलाण भागावर एक जोरदार हल्ला चढविला या प्रदेशात २।१ महिने चकमकी होत राहिल्या ऑक्टोबरात १००० चा एक मराठी सेनापट नेताजी पालकरांच्या मदतीसाठी बागलाणात दाखल झाला.

ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये अहमदनगर आणि सोलापूर या मोगली ठाण्यांवर मराठ्यांनी सतत हल्ले चालू ठेवले. २५००० च्या एका मराठी पथकाने अहमदनगर किल्ल्यावर हल्ला चढविला हे वृत्त ऐकताच खान जी जहान अहमदनगरकडे रवाना झाला. त्याची सेना नगरला पोहचण्या आधीच मराठ्यांनी तेथून माघार घेतली होती. सोलापूरच्या मोगली किल्ल्याला ६००० च्या एका मराठी पथकाने नोव्हेंबर च्या मध्यास वेढा घातला. किल्लेदार मनोहरदास गौड याने काही दिवस किल्ला लढविला या वेढ्याचे वृत्त अहमदनगर येथे असलेल्या खान जी जहान यास कळताच मराठ्यांचा वेढा मोडून काढण्यासाठी त्याने तातडीने नगरहून सोलापूरकडे कूच केले. खान सोलापूरकडे येत आहे हे समजताच मराठ्यांनी सोलापूर हून माघार घेतली.

नोव्हेंबर महिन्यामध्ये घडलेली अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे राजपुत्र अकबर आणि संभाजी राजे या दोघांच्या दरम्यान झालेल्या एका भव्य लष्करी योजनेच्या वाटाघाटी ही होय अकबराने दुर्गादासाच्या संपूर्ण पाठींब्यावर संभाजी राजांपुढे असा प्रस्ताव मांडला की खुद्द औरंगजेब बादशहा राजधानी सोडून दक्षिणेस आला आहे आणि राजपुतान्यातील अनेक राजेही त्याच्यावर नाराज आहेत या सुवर्ण संधीचा फायदा घेऊन मराठ्यांनी एक मोठी सेना घेऊन अकबर, दुर्गादास आणि संभाजी राजे या तिघांच्या संयुक्त नेतृत्वाखाली प्रत्यक्ष दिल्लीवर धडक मारावी ही योजना यशस्वी झाल्यास औरंगजेब ऐवजी अकबर स्वतः बादशहा होईल आणि राजपूत व मराठे या दोघांच्या सर्व मागण्या तो मान्य करीन. योजनेचे स्वरूप अत्यंत आकर्षक असून देखील संभाजी राजांनी त्यावर कोणताच तातडीने निर्णय केला नाही आणि कालांतराने ही योजना बारगळली. या घटनेकडे लष्करी दृष्ट्या पाहिले असता या काळातील संभाजी राजांनी या योजनेचा पाठपुरावा

का केला नाही हा अेक महत्वाचा प्रश्न आहे. त्यांच्या दृष्टीने पाहिल्यास असे म्हणता येअील की महाराष्ट्राच्या भूमीत औरंगजेब सारखा प्रबळ शत्रू प्रत्यक्ष दाखल झाला असतांना आणि त्याच्या सेनेचे अनेक गट मराठी मुलखात चौफेर हल्ले करीत असताना आपला मुख्य तळ (Home Base) असलेला महाराष्ट्र प्रदेश सोडून दिल्लीकडे धाव घेणे योग्य ठरले असते काय? राजपूत आणि मोगल यांचे अकबरकाहून अधिक असलेले घनिष्ठ संबंध लक्षात घेता राजपुतान्यातील सर्वच राजांनी अकबराच्या महत्वाकांक्षी योजनेस सक्रीय पाठींबा दिला असता काय? प्रत्यक्ष दिल्लीत मोगल शासनाचा अकबराला खराखुरा पाठिंबा होता काय? अशा त-हेचे अनेक प्रश्न संभाजी राजांच्या मनात अुभे राहिले असतील. दुस-या बाजूने विचार केल्यास ही योजना फसली तर अुत्तरेतील मोगल साम्राज्य अभंग राहून शिवाजी महाराजांनी अनेक प्रयत्नांनी अुभी केलेली मराठी सत्ताही औरंगजेबने अुध्वस्त केली असती. या दृष्टीकोनातून पाहता संभाजी राजांनी अकबराच्या योजनेवर वेळकाढूपणाचे धोरण अवलंबिले ते योग्यच होते असे म्हणावे लागेल.

आक्टोबर-नोव्हेंबर १६८१ मध्ये मराठ्यांच्या सेना औरंगाबाद, अहमदनगर आणि सोलापूर या भागात घुसल्या असताना मोगल सेनेने नाशिकच्या अुत्तरेस असलेले साल्हेर आणि मुल्हेर हे दोन किल्ले ताब्यात घेतले होते. नोव्हेंबरच्या अखेरीस हे दोन किल्ले हस्तगत करण्यासाठी मराठ्यांनी या दोन्ही किल्ल्यांवर हल्ले चढविले. परंतु औरंगाबादहून शिहाबुद्दीनखान याच्या नेतृत्वाखाली ४०००० चा मोगल सेनेचा अेक प्रतिकार करण्यासाठी हजर झाल्यामुळे मराठ्यांनी त्या भागातून माघार घेतली. डिसेंबरच्या सुरुवातीस युध्दाचे क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने मोगलसरदार हसनअली खान १०००० ची तुकडी घेअून पुरंदर किल्ल्याचा

उत्तर कोकण- संघर्ष


धुळे
भिवंडी
कल्याण
कोथळागड
मुंबई
ठाणे
अहमदनगर
रायगड
सोलापूर
सातारा

कब्जा घेण्यासाठी पुण्याच्या परिसरात घुसला त्याबरोबर शिरवळ मार्गाने पुरंदर वरील मराठी सेनेस मदत मिळू नये या हेतूने ४००० घोडदळाची अेक तुकडी मोघलखान याच्या अधिपत्याखाली शिरवळ भागात येअून दाखल झाली. याच तुकडीवर डिसेंबरअखेर मराठी सेनेने अेक प्रखर हल्ला करून त्यांचे बरेच नुकसान केले. त्याबरोबर संभाजी राजांनी अहमदनगरच्या दक्षिणेस असलेल्या श्रीगोंदा परिसरातील पेडगाव अथवा बहादूरगड या मोगली ठाण्यावर हल्ला करण्यासाठी दुसरी तुकडी रवाना केली. हे वृत्त अौरंगजेबाला समजताच त्यांचा प्रतिकार करण्यासाठी त्याने शहाआलमचा पुत्र मुअीजुद्दीन याच्याबरोबर अेक तुकडी देअून त्याला बहादूरगडाकडे रवाना केले. कर्नाटकात मराठ्यांच्या हालचाली वाढवाव्या या हेतूने १६८० च्या अखेरीस हरजीराजे महाडीक यांना कर्नाटकात पाठविण्याचा निर्णय झाला होता. पुढे अेप्रिल १६८१ मध्ये शामजी नाअीक पुंडे, नेताजी काटकर आणि दादाजी काकडे हे तीन सरदार आणि त्यांच्या तुकड्या बरोबर घेअून सरदार महाडीक कर्नाटकात रवाना झाले.

मध्य महाराष्ट्र आणि अुत्तर कोकण येथील संघर्ष १६८२ (नकाशा नं.७)

(Operations in Central Maharashtra and North Konkan 1682)

मोगल युद्धनिती

(Mughal Strategy)

१६८२ या सबंध वर्षात मोगल आणि मराठे यांच्या लष्करी कारवाया अधिक प्रखर झाल्या आणि त्यांना खूपच वेग आला. याचे मुख्य कारण असे होते

की १६८१ च्या नोव्हेंबर मध्ये औरंगजेब बादशहा बऱ्हाणपूरास मुक्कामास आला व या नंतर २२ मार्च १६८२ला त्याने औरंगाबाद येथेच आपली पक्की छावणी केली त्यामुळे मोगली कारवायात अधिक जोर आणि सुसूत्रता येणे ही गोष्ट स्वाभाविक होती. या हालचालींचा आढावा घेतल्यावर हे स्पष्ट दिसून येते की या वर्षात मराठी सत्ता संपूर्णपणे नष्ट करावी या अेकमेव अुद्देशाने औरंगजेबने सर्वदिशांना चौफेर मोहिम सुरु केली. नाशिक जवळील रामसेजचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी मोगल सेनेने आटोकाट प्रयत्न केले. या किल्ल्याचे भौगोलिक स्थान असे होते की नाशिक जळगांव यांच्या अुत्तरेस असलेल्या मोगली प्रदेशावर आक्रमण करण्यास अेक सुरक्षित तळ म्हणून या किल्ल्याचा वापर मराठी सेना करीत असत. मराठे आणि विजापूर दरबार यांचे सलोख्याचे संबंध आणि परस्परांना लष्करी मदत करण्याची त्यांची गरज या गोष्टींची औरंगजेबाला पूर्ण जाणीव होती. म्हणूनच १६८२ या वर्षात मराठे आणि विजापूर यांचे संबंध तोडता यावेत म्हणून बादशहाने दोन अुपाय योजले. पहिला म्हणजे नाशिक, अहमदनगर, पुणे, सोलापूर या चार जिल्ह्यात पसरलेल्या रणक्षेत्राची कक्षा आणखी वाढवून मिरजेपर्यंत पोहचणारा सातारा भागाचा परिसर मोगली सेनेने ढवळून काढला. मिरज हे आदिलशाहीचे अेक महत्वाचे लष्करी ठाणे असल्यामुळे विजापूर कडून येणारी लष्करी मदत।कुमक मिरज मार्गाने सातारा पुणे येथे पोहचत असे. दुसरी गोष्ट म्हणजे अुत्तर कोकण (कल्याण-भिवंडी) आणि दक्षिण कोकण (तळ कोकण) या संपूर्ण कोकण पट्टीवर विजापूरी अंमल चालत असल्यामुळे मराठी सत्ता आणि विजापूरी सत्ता या दोन्ही सत्तांचा कणा मोडून काढावा म्हणून कोकणामध्ये बादशहाने अेक जोरदार मोहीम अुघडली या मोहिमेचे अेक वैशिष्ट्य असे की कल्याण भिवंडी पासून राजापूर दाभोळपर्यंत भू मार्गाने सैन्याच्या हालचाली होत असतांनाच कुठेही कमतरता पडल्यास सुरतेवरून समुद्र मार्गाने सैन्य आणि सामुग्री पाठविण्याचा

अेक नवीन प्रयोग मोगलांनी केलेला आढळतो.

मराठा युध्दनिती

(Maratha Strategy)

१६८१ च्या तुलनेने १६८२ च्या लष्करी कारवायात मराठ्यांनीही बदललेली परिस्थिती लक्षात घेऊन आपल्या युध्दनितीत जरूर तो फेरफार केल्याचे आढळते. १६८१ मध्ये कमितकमी १००० च्या ते जास्तीतजास्त २०००० च्या मराठी सेनेच्या अनेक गटांनी मोगली सेनेशी ठिकठिकाणी झुंज दिली. परंतु अेकंदरीने मोगली सेनेचे प्रमाण प्रत्येक ठिकाणी अधिक असल्यामुळे मराठी सेनांच्या गटांना माघार घ्यावी लागली. १६८२ च्या लष्करी कारवायात मराठ्यांनी आपले तंत्र बदलले. अेकाच मोठ्या गटाने शत्रूवर हल्ला करण्याअेवजी त्याच गटाच्या अनेक तुकड्या करून मोगली स्थानकांवर वारंवार थोडे थोडे थांबून सातत्याने हल्ले करीत रहावे, शत्रू सैन्याची मनुष्य हानी करून, सामुग्रीची लुटालूट करणे आणि अशा रितीने मोगली सैन्याला जेरीस आणावे, ही युध्दनिती मराठ्यांनी १६८२ च्या वर्षात अमलात आणली. हे तंत्र यशस्वी ठरले असे म्हणण्यास हरकत नाही. कारण बादशहाच्या प्रत्यक्ष हुकमाप्रमाणे मोगली सेनेचे अनेक गट अनेक ठिकाणी आक्रमक कार्यवाही करीत असताना देखील त्यांना कोणत्याही ठिकाणी निर्णायक विजय प्राप्त झाला नाही आणि मोगल सरदारांचे अिकडून तिकडे आणि तिकडून अिकडे अशी ससेहोलपट झाल्यामुळे मोगली सेना जेरीस आली.

वर केलेल्या विवेचनास अनुसरून प्रत्यक्ष कारवायांचा तपशील यानंतर येणाऱ्या परिच्छेदामध्ये केला आहे.

जानेवारी १६८२ मध्ये औरंगजेब बरोबर राजपुतान्यातून आलेला एक श्रेष्ठ आणि अनुभवी सरदार हसनअली खान याच्या अधिपत्याखाली १४००० घोडदळाची एक तुकडी देऊन त्याच्यावर मराठ्यांविरुध्द नवी चढाई करण्याची कामगिरी सोपविली गेली. बादशहाच्या हुकुमा प्रमाणे हसनअलीखानाने प्रथम दक्षिण कोकणात चढाई करून दाभोळ पासून राजापूरपर्यंत मराठ्यांची ठाणी हस्तगत करावयाची होती. ती मोहीम संपल्यावर महाडकडे वळून मराठ्यांची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यास वेढा घालण्याचे काम त्याला करावयाचे होते. यावेळी संभाजी राजे पोर्तुगीजांविरुध्दच्या लढाईत गुंतलेले असल्यामुळे त्यांना मोगलांच्या चढाई विरुध्द कोणतेही ठोस पाऊले उचलता येणार नाहीत असा बादशहाचा अंदाज होता. या हुकमाप्रमाणे मोगल सेनेचे दोन प्रमुख गट लवकरच दक्षिण कोकणाकडे वळले. एका गटात हसनअलीखानाचा मुलगा तर दुस-या गटात राजा म्हासिंघ भदौरीया आणि दलपत बुंदेला यांचे राजपूत सैन्य होते. हे दोन्ही गट दक्षिण कोकणात जात असताना नक्की कोणत्या मार्गाने त्यांची हालचाल झाली याची माहिती उपलब्ध साधनात आढळत नाही. परंतु लष्करी दृष्ट्या असे अनुमान करणे शक्य आहे की मोगल सैन्याचा खुद्द हसनअलीखानाच्या हाताखालील गट सातारा-क-हाड-मार्गाने दाभोळकडे रवाना झाला असावा आणि दुसरा राजपूतांचा गट पुणे-भोर मार्गाने महाडच्या दिशेने पुढे गेला असावा. यापैकी राजपूत सैन्याचा गट दक्षिण कोकणाच्या वाटेवर असतानाच मराठी सेनेने त्याच्यावर प्रखर हल्ला चढविला. यावेळी झालेल्या लढाईत राजाम्हासिंघ, दलपत बुंदेला आणि लोदीखानाचा पुत्र महमूद हे जबर जखमी झाले. लढाईत निश्चित असा जय कुणालाच मिळाला नाही. तरीपण या गटाची दाणादाण उडाल्यामुळे हसनअलीखानाची पैताब विस्कळीत झाली. केवळ मोगली सैन्याच्या पहिल्या गटाने पुढे चाल करून ही मोहीम यशस्वी होण्यासारखी नव्हती म्हणून

हसनअलीखानाने दोन्ही गट एकत्र करून दक्षिण कोकणातील मोहीम अर्ध्यावरच सोडली आणि त्याने आपला मोर्चा उत्तर कोकणातील कल्याण-भिवंडीकडे वळविला. कल्याण-भिवंडीच्या परिसरात हसनअलीखान आणि मराठ्यांच्या फौजा यांच्यात अनेक चकमकी झडत राहिल्या परंतु फेब्रुवारी १६८२ पर्यंत खानास त्यामध्ये यश न आल्यामुळे बादशहाने त्याला रामसेजकडे जाण्याची आज्ञा केली. त्याच्या हुकमाप्रमाणे हसनअलीखानाची सेना रामसेजच्या परिसरात मार्च १६८२ मध्ये दाखल झाली. रामसेजचा किल्ला नाशिकच्या उत्तरेस १४।१५ कि.मी. (नकाशा नं.६ पहा) वर असून त्याची बांधणी मजबूत असल्यामुळे हा किल्ला जिंकून घेणे ही सोपी गोष्ट नव्हती. हसनअलीखान रामसेजच्या परिसरात पोहचण्यापूर्वी औरंगजेबने शियाबुद्दीनखान याच्या हाताखाली रामसेज किल्ला घेण्यासाठी काही सेना अगोदरच रवाना केली होती. हसनअलीखानाने शियाबुद्दीन खानास कुमक म्हणून मदत द्यावयाची होती. किल्ल्यावर तोफेच्या गोळ्यांचा भडीमार करून किल्ल्यास खिंडार पाडता आले तरच आपले सैन्य किल्ल्यात प्रवेश करून किल्ल्याचा ताबा घेऊ शकेल अशी मोगल सरदारांची खात्री पटली. त्यामुळे किल्ल्याच्या भोवती असणाऱ्या १।२ टेकड्यांवर उंच सज्जे तयार करण्यात आले. आणि त्यावर तोफा चढविण्यात आल्या. ही तयारी पूर्ण झाल्यावर मोगल सैन्याच्या तोफा काही दिवस किल्ल्याच्या रोखाने भडीमार करू लागल्या परंतु अनेक दिवस गोळाबारी करूनही किल्ल्याच्या तटाला कोणतेही नुकसान पोहचू शकले नाही. त्यानंतर मोगल सैन्याने किल्ल्याच्या सर्व बाजूंनी उंच असे धमधमे (Platforms) तयार केले आणि त्यावरही तोफा चढविल्या आणि गोळाबारी चालू ठेवली. अशा रितीने जवळजवळ सहा महिने रामसेजचा वेढा चालू होता. वेढ्याच्या काळात रामसेज जवळ असलेल्या त्र्यंबकेश्वर या मराठ्यांच्या किल्ल्यातून किल्लेदार केशव त्रिमल पेशवे याने अन्नधान्य आणि सैन्याच्या छोट्या तुकड्या रामसेजवर पाठवून किल्ला शर्थीने झुंजविण्यासाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न केले.

सहा महिन्याच्या वेढ्यानंतरही किल्ला ताब्यात येत नाही असे पाहून औरंगजेबाने झियाउद्दीन खान आणि हसनअलीखान या दोघांना परत बोलविले आणि त्यांच्या जागी खानजीजहानाची नियुक्ती केली. खानजीजहानाने वेढ्याची सूत्रे हाती घेताच किल्ला घेण्यासाठी पुन्हा प्रयत्न सुरु केले. दरम्यानच्या काळात किल्यावरील मराठ्यांची ताकद वाढल्यामुळे वेढा तोडून काढण्यासाठी मराठी सेनेने नवीन तंत्राचा वापर केला. रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन मराठी सैन्याच्या छोट्या छोट्या तुकड्या किल्ल्याबाहेर पडत आणि अनेक दिशांनी वेढा घालून असलेल्या मोगली सैन्याच्या छावण्यांवर अचानक हल्ले करीत. या कारवायांमुळे खानजीजहानाला देखील म्हणावी तितकी प्रगती करता आली नाही. ऑक्टोबर १६८२ पर्यंत म्हणजे जवळजवळ तब्बल आठ महिने वेढा चालू होता. त्यामुळे निराश होऊन मोगली सैन्याने वेढा उठवून औरंगाबादकडे परत जाण्यासाठी वाटचाल सुरु केली. या सेना परतीच्या मार्गावर असतानाच वेढा उठविण्यासाठी अहमदनगरहून येत असलेल्या हंबीरराव मोहिते यांच्या १०,००० च्या तुकडीशी त्यांची गाठ पडली. मोगली सेना वेढा उठवून चालली आहे याची मोहित्यांना कल्पना नसल्यामुळे त्यांनी लढाईचे आव्हान स्वीकारले आणि उभय पक्षात चकमक सुरु झाली परंतु लवकरच वेढा उठलेला आहे आणि मोगल सेना परत जात आहे ही बातमी समजताच हंबीररावने माघार घेतली.

कोकणपट्टीवरील हसनअलीखानाची मोहीम आणि रामसेजचा वेढा ही दोन्ही चालू असताना सुध्दा औरंगजेबाने मराठ्यांना स्वस्थ बसू दिले नाही. रामसेजला पाठविण्यापूर्वी खानजीजहानास त्याने साता-याकडे पाठविले. खानाने साताऱ्याच्या किल्ल्यावर कब्जा करुन रहिमतपूर येथे मोगली ठाणे प्रस्थापित केले. या बरोबर शिहाबुद्दीनखान आपली तुकडी घेऊन नाशिकच्या बागलाण भागात शिरला नंतर पुढे तो रामसेजच्या वेढ्यात सामील झाला. परंतु वेढ्याचे काम

त्याच्याकडून होत नाही असे पाहिल्यावर त्याला जुन्नरकडे पाठविण्यात आले. रूहुल्लाखान आणि मुअीजुद्दीन यांची अहमदनगरकडे रवानगी झाली व शहा आलमला आणखी अेक तुकडी देअून विजापूरकडे रवाना करण्यात आले. मे १६८२ मध्ये मोगली सेनेचा संचार चारही दिशांना होत असतांना मराठी स्वारांच्या अेका तुकडीने पुणे-नाशिक मार्गावरील संगमनेर येथील मोगली ठाण्यावर अचानक हल्ला केला. या हल्ल्याचे वृत्त कळताच औरंगजेबाने अिंद्रसिंग कछवा आणि सय्यद मुझफ्फरखान यांच्या हाताखाली सेनेचा अेक गट देअून त्यांना संगमनेरकडे रवाना केले. मोगलसेना येत आहे असे कळताच मराठ्यांनी संगमनेरच्या पश्चिमेस असलेल्या डोंगराळ मुलखाचा आश्रय घेतला. त्याबरोबर मोगल सेनेने त्यांच्या पाठलागास सुरुवात केली. या पाठलागात अेका अडचणीच्या ठिकाणी दबा धरून असलेल्या ४००० मराठा सैनिकांनी मोगल सेनेवर निकराचा हल्ला चढविला झालेल्या घनघोर लढाअीत अिंद्रसिंग कछवा जबर जखमी झाला. आणि मोगल सैन्याला फार मोठी मनुष्यहानी पत्करावी लागली.

मे १६८२ मध्ये मोगलांनी कोकणच्या मोहिमेस पुन्हा सुरुवात केली. हसनअलीखानाचा गट यावेळी कल्याण भिवंडी परिसरात होता त्याची शक्ती वाढविण्यासाठी सुरतेहून ६००० ची अेक तुकडी मीर महंमद याच्या नेतृत्वाखाली समुद्रमार्गाने कल्याणकडे रवाना झाली. याबरोबर रणमस्तखानाच्या हाताखाली आणखी अेक गट कल्याणकडे पाठविण्यात आला. मोगलांच्या या हालचालींची मराठ्यांना चाहूल लागताच कल्याणच्या दक्षिणेस ८ कि.मी.वर असणाऱ्या म्हंदळी या गावांत मराठ्यांनी प्रवेश केला आणि लवकरच त्यांनी कल्याण जवळील मोगल तळावर हल्ला चढविला. या हल्ल्याची खबर कळताच रणमस्तखानाचा दुय्यम अधिकारी मुकर्रमखान हा आपली तुकडी घेअून मराठ्यांच्या मार्गावर आडवा आला.

परीणामी दोन्ही पक्षात चकमक झडून त्यांना अनेक सैनिक गमवावे लागले.

उत्तरकोकणात मोगल सैन्याचा जोर वाढतच चालल्यामुळे दुसरी अेखादी आघाडी उघडून उत्तर कोकणावरील त्यांचा दबाव कमी करणे आवश्यक होते. हे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून मे-जून १६८२ मध्ये ५०० पायदळ आणि २०० घोडेस्वार अशा अेका संयुक्त मराठा तुकडीने संगमनेरच्या उत्तरेस असलेल्या सिन्नर या मोगली ठाण्यावर हल्ला चढविला ही घटना मोगली अधिकारी नारोजी यांस कळताच तो प्रतिकारासाठी उभा राहिला परंतु आपली शक्ती कमी पडेल हे लक्षात घेऊन त्याने तातडीने माघार घेतली सप्टेंबरमध्ये संभाजी राजांनी दक्षिण कोकणातील काही सैन्य काढून घेऊन त्यांना संगमनेर भागात लढत असलेल्या मराठी सेनेस कुमक म्हणून रवाना केले. ही कुमक आल्या नंतर मराठी सेनेच्या पथाने संगमनेर आणि सिन्नर या दरम्यानच्या सर्व प्रदेशात वसुली गोळा करून काही मोगल स्थानके उध्वस्त करून टाकली. नोव्हेंबरच्या सुरवातीस ७००० ची मराठ्यांची अेक घोडदळाची तुकडी संगमनेर-सिन्नर भागात येऊन दाखल झाली. मराठ्यांची ताकद वाढत आहे असे आढळताच औरंगजेबने दोन मोठ्या तुकड्या राव मोहकमसिंग याच्या नेतृत्वाखाली मराठी सैन्याच्या प्रतिकारासाठी पाठविल्या. नोव्हेंबरच्या मध्यास सिन्नरपासून पश्चिमेस ७।८ कि.मी. अंतरावर असलेल्या मोजापूर या गावाजवळ मराठी आणि मोगल सैन्याची घुमश्चक्रीची लढाओ झाली. या लढाओत मराठ्यांचे सरदार लखूजी हे मारले गेल्याने मराठी सेनेने या भागातून माघार घेतली.

मे १६८२ पासून मराठी सेनेचे अनेक गट अहमदनगरच्या किल्ल्यावर वारंवार हल्ले करीत होते. या ठिकाणी लढणा-या मराठी सेनांना जुले आगस्ट मध्ये बरीचशी कुमक धाडण्यात आली. त्यामुळे अहमदनगरवरील मराठ्यांचे हल्ले अधिकच प्रखर होऊ लागले. ही परिस्थिती लक्षात घेऊन २८-९-१६८२ रोजी शहजादा

मुअीजुद्दीन आणि शियाबुद्दीनखान यांच्या बरोबर ८००० पायदळ आणि ६००० घोडदळ असा १४००० चा अेक मुसज्जगट अहमदनगरकडे रवाना झाला. हा गट अहमदनगरच्या परिसरात आल्यावर मराठ्यांनी तेथून माघार घेअून आपल्या सेना सोलापूरच्या परिसरात हलविल्या. या सेना अहमदनगरहून सोलापूरच्या मार्गावर असतांना पेडगांवजवळ मोगल सरदार दुर्जनसिंग याने त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला या ठिकाणी झालेल्या लढाअीत माणकोजी वल्लाळ हा ठार झाला. त्यामुळे त्याचा दुय्यम अधिकारी लखमजी याने सोलापूरच्या दिशेने माघार घेतली. डिसेंबर १६८२ मध्ये सोलापूर -पंढरपूर या परिसरात मराठ्यांनी आपली शक्ती वाढविण्यास सुरुवात केली. पंढरपूरच्या अुत्तरेस २५ कि.मी. वर असणाऱ्या टेंभूर्णी गावी शहाआलमने आपली छावणी प्रस्थापित केली होती. अहमदनगरहून येणाऱ्या मराठा सेनेच्या गटांनी डिसेंबरच्या मध्यास शहाआलमच्या छावणीवर हल्ले चढविण्यास सुरुवात केली. ही घटना औरंगजेबाला कळताच खान जी जहानास अेक तुकडी देअून त्याला टेंभूर्णीकडे रवाना करण्यात आले. ही कुमक येणार असे कळताच मराठ्यांनी त्याच्या सेनेची रसद तोडावी म्हणून टेंभूर्णी आणि सोलापूरच्या दरम्यान अनेक ठिकाणी मोगली सेनेचा पुरवठा बंद केला. आणि त्यामुळे टेंभूर्णी-पंढरपूर-सोलापूर यांच्या दरम्यान विखुरलेल्या मोगलसेनेचे गट पूर्णपणे जेरीस आले. या सुमारास या भागात मराठ्यांची जवळजवळ २०००० ची फौज जमा होअू लागली होती. दोन्ही पक्षांना या अस्थिर परिस्थितीचा निर्णय लावणे आवश्यक होते शेवटी सांगोल्याच्या पश्चिमेस १०।१२ कि.मी. अंतरावर असलेल्या सवासपूर या ठिकाणी मोगल मराठा सेनांची लढाअी झुंजली या लढाअीत मोगल सेनेला भारी नुकसान पोहचले. अर्थातच मोगलांचे या भागातून संपूर्ण अुच्चाटन करण्या अितकी शक्ती मराठ्यांकडे नसल्यामुळे मोगली सेनेस तेथेच सोडून त्यांनी पुण्याकडे माघार घेतली.

कोकण किनाऱ्यावरील संघर्ष १६८२ (नकाशा नं.२ पाहा)

(Operations on Konkan Coast)

१६८२ या वर्षात औरंगजेब बादशाहने मध्य महाराष्ट्रात मराठी सत्तेच्या उच्चाटनासाठी आटोकाट प्रयत्न केले. परंतु कोणत्याही एका ठिकाणी मोगल सेनेला निर्णायक विजय प्राप्त झाला नाही. रामसेजचा किल्ला हस्तगत करण्यासाठी ६।७ महिने वेढा घालून आणि वारंवार हल्ले करून देखील तो ताब्यात न आल्यामुळे मोगल सेनेला वेढा उठवून औरंगाबादकडे परत जावे लागले. अशा रितीने मोगल युद्धनिती संपूर्ण फसल्यामुळे १६८२ या वर्षात औरंगजेबाने आपले सर्व लक्ष कोकण किनारपट्टीवर आणि विशेषतः उत्तर कोकणात असलेल्या कल्याण आणि भिवंडी येथे केंद्रीत करून तेथील भुईकोट किल्ले ताब्यात घेण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. एका पाठोपाठ एक अशा अनेक मोगल सरदारांना प्रत्येक वेळी अपयश पत्करावे लागल्यामुळे शेवटी स्वतः औरंगजेब औरंगाबाद येथे असलेली आपली छावणी हलवून नोव्हेंबर १६८२ च्या मध्यास अहमदनगर येथे येऊन दाखल झाला आणि तेथूनच पुढे त्याने आपल्या लष्करी कारवायांचे सूत्र संचलन करण्याचे ठरविले.

मराठ्यांची युद्धनिती

(Maratha Strategy)

मध्य महाराष्ट्रात मोगल सेनेस जेरीस आणून मराठी सत्ता नष्ट करण्याचे औरंगजेबाचे सर्व प्रयत्न मराठ्यांच्या खच्चीकरणाच्या युद्धनिती (Strategy of Attrition) मुळे निष्फळ ठरले. हीच युद्धनिती

१६८३ च्या वर्षातही संभाजी राजांनी पुढे चालू ठेवली. वास्तविक पाहता मराठी सत्तेवर १६८२।८३ या दोन वर्षात परकीय शत्रुंचा फार मोठा दबाव जारी होता. कोकण किनार पट्टीवर वसईपासून ते दक्षिण गोव्यापर्यंत सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्या विरुध्द जमीनीवर आणि सागरावर मराठी सत्तेचा संघर्ष चालूच होता. त्यातच औरंगजेब बादशहा स्वतः औरंगाबादेत आल्यामुळे आणि त्याच्या सैन्याच्या अनेक तुकड्या नाशिकपासून साताऱ्यापर्यंत संपूर्ण मध्य महाराष्ट्रात आक्रमक हालचाली करीत असतांना मराठी सत्ता टिकली कशी हेच अेक आश्चर्य मानावे लागेल. परंतु शिवाजी महाराजांनी प्रारंभीच्या काळात वापरात आणलेले खच्चीकरणाचे तंत्र (War of Attrition) थोडेसे सुधारून संभाजी राजांनी यशस्वीपणे वापरात आणले. या नितीमुळे रामसेजवर मोगलसेना ताबा घेऊ शकल्या नाहीत. त्याचप्रमाणे कल्याण भिवंडीवर अनेक हल्ले करून कोथळागड या किल्ल्याचा ताबा मिळाला तरी कल्याण भिवंडी परिसरावर मोगली सत्ता स्थिर होऊ शकली नाही. मराठ्यांच्या या यशाचे श्रेय खच्चीकरणाच्या युध्दनितीसच द्यावे लागेल. कल्याण भिवंडीचा संघर्ष चालू असतांना अहमदनगर जिल्ह्यातील अनेक ठिकाणी आक्रमक हल्ले करून त्यांनी मोगली सैन्याला उसंत मिळू दिली नाही.

वरील सामान्य विवेचनास अनुसरून १६८३ या वर्षातील मोगल आणि मराठे यांच्या लष्करी कारवायांच्या सविस्तर आढावा या नंतर येणाऱ्या परिच्छेदांमध्ये घेतला आहे.

कल्याण-भिवंडीची मोहीम

(Kalyan-Bhiwandi Operation)

१६८२ मध्ये औरंगजेबने खास नियुक्त केलेला मोगल सरदार हसनअली खान याने आपल्या १५००० सैन्यानिशी कल्याण-भिवंडी मधून मराठी सत्तेला नष्ट करण्याचे अनेक प्रयत्न केले. परंतु त्यात तो अयशस्वी ठरल्यामुळे जानेवारी १६८३ मध्ये बादशहाने खान जहान यास कल्याण-भिवंडी मोहिमेची सूत्रे हाती घेण्यासाठी रवाना केले. फेब्रुवारी महिन्यात खान जहानचे सैन्य आणि मराठी सेना यांच्यात अनेक चकमकी झडल्या परंतु कल्याण आणि भिवंडी येथील गड त्याच्या ताब्यात येवू शकले नाहीत त्यामुळे बादशहाने कासीमखान आणि रुहुल्लाखान या दोन सरदारांना आणखी फौज तैनात करुन भिवंडी कडे जाण्याची आज्ञा केली. या ठिकाणी कल्याण-भिवंडी परिसराचे युध्दनैतिक महत्व काय होते याचा विचार करणे योग्य ठरेल. वास्तविक किल्ले या दृष्टीने येथील किल्ल्यांना रामसेज सारखी मजबूती नव्हती किंवा पुरंदर सारखी अभेद्यताही नव्हती. परंतु त्या काळात कल्याण हे एक महत्वाचे बंदर असल्यामुळे सागरावरुन होणारा मोठा व्यापार कल्याण मधूनच होत असे आणि भिवंडीही कल्याणची पार्श्वभूमी(Hinterland) असल्यामुळे या परिसराला लष्करीदृष्ट्या अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले होते. उत्तरेतून येणाऱ्या मोगली सेनेला कोकणात आणि पुढे दक्षिणेत जाण्यासाठी कल्याण हे एक सोयीस्कर स्थानक होते. मोगलांच्या नौसेनेचा व्यवस्था सिद्दीच पहात होता आणि पोर्तुगीज अधिकारी सामान्यपणे मोगल सत्तेशी सलोख्याने राहत होते.

१६८३ च्या फेब्रुवारी - मार्च मध्ये कासीमखान आणि रुहुल्लाखान यांच्या फौजांनी कल्याण-भिवंडी परिसरात मोर्चे बंदी केली असताना त्यांना

दारुगोळा आणि अन्नधान्य यांचा पुरवठा सुरतेहून सागरी मार्गाने होत होता. त्यांची ही रसद तोडून टाकावी म्हणून संभाजी राजांनी सुरतेहून कल्याण-भिवंडीकडे येणाऱ्या जहाजांना रोखण्यासाठी ठाण्याच्या अुत्तरेस पारसिक हा अेक सागरी किल्ला बांधला. मोगली सेनेला पोर्तुगीजांकडूनही युद्धसामुग्रीची मदत होत आहे हे कळताच वसअीच्या दक्षिणेस असलेले माहीम आणि तारापूर येथील किल्लेही मराठ्यांनी आपल्या ताब्यात घेतले. सुरतेहून येणारी जहाजे जर वसअी, पारसिक, माहीम आणि पुढे ती मुंबअीच्या दक्षिणेस असलेल्या अुरण-करंजा खाडीपर्यंत पोहचली तर त्यांनाही नष्ट करता यावे म्हणून मराठी आरमाराची १०० गलबते पाळत ठेवण्यासाठी अुरण खाडीत दाखल झाली. अशा रीतीने मोगल सैन्याच्या रसदीचा सागरावर नाकेबंदी करून संभाजी राजांनी जमिनीवरील सर्व मार्ग रोखण्यासाठी ४००० घोडदळ आणि पायदळ अशा अेका संमिश्र तुकडीस कल्याण-भिवंडीकडे रवाना केले. या चौफेर नाकेबंदीमुळे कल्याण भिवंडी परिसरात असलेल्या मोगल सेनेची परिस्थिती अतिशय अडचणीची झाली. ही नाकेबंदी मोडून टाकणे आवश्यक होते म्हणून रुहुल्लाखानाने पदमसिंग नावाच्या राजपूत सरदारास कल्याणच्या दक्षिणेस असलेल्या मराठी तुकडीवर हल्ला करण्यासाठी पाठविले. १९ फेब्रुवारी १६८२ रोजी झालेल्या घुमश्चक्रीच्या लढाअीत दोन्ही सैन्याचे भारी नुकसान झाले. आणि मराठी सेनेने ८ कि.मी. माघार घेतली.

कल्याण-भिवंडी परिसरात मोगल सेनेला निर्णायक विजय प्राप्त झालाच पाहिजे असा ठाम निर्धार औरंगजेबने केल्याचे आढळते. फेब्रुवारी १६८२ च्या मध्यास खान जी जहानाच्या सेनेस कुमक म्हणून रणमस्तखान आणि राजपूत सरदार भगवानसिंग, रघुनाथसिंग आणि काबूलसिंग यांच्या नेतृत्वाखाली अेका मोठा सेना विभाग त्याने कल्याण - भिवंडीकडे रवाना केला. मोगलांच्या या

हालचालींची माहिती संभाजी राजांना लागली त्याबरोबर त्यांनी सेनापती हंबीरराव मोहिते आणि अितर तीन सरदार यांच्या बरोबर दोन हजार (२०००) घोडदळ आणि १००० पायदळ अशी संमीश्र तुकडी देऊन कल्याण-भिवंडी कडे पाठविले. २५।२६ फेब्रुवारी १६८२ रोजी मराठे आणि मोगल यांच्या मधील निकराच्या लढाअीस प्रारंभ झाला. मराठी सेनेतील स्वतः हंबीरराव मोहिते जखमी झाले. त्यामुळे मराठी सेनेला माघार घ्यावी लागली. मार्च १६८२ मध्ये दोन्ही सेना पुर्नबांधणी करीत होत्या या दरम्यान बादशहाने सैफुल्लाखान याच्या हाताखाली आणखी अेक तुकडी कल्याणकडे पाठविली. मराठी सेनेत मोहित्यांच्या अेवजी लढाअीची सूत्रे नव्याने आलेले सरदार रुपाजी भोसले आणि मानाजी मोरे यांच्याकडे सोपविण्यात आली. अेप्रिलच्या तिस-या आठवड्यात कल्याणच्या दक्षिणेस २५ कि.मी. वर असलेल्या मोगल सेनेच्या अेका स्थानकावर हल्ला करण्यासाठी मराठी पथक सज्ज झाली होती ही बातमी रणक्षेत्रात नुकत्याच आलेल्या सैफुल्ला खानास समजताच त्याने मराठी सेनेवर कडाडून हल्ला चढविला. मोगली सेनेचा जोर अधिक झाल्यामुळे लढाअी पुढे चालू ठेवणे अशक्य होते. म्हणून आपल्या नेहमीच्या तंत्रास अनुसरुन मराठी सेनेने माघार घेतली. अेप्रिल अखेर कल्याण भिवंडीवर संपूर्णपणे कब्जा करणे अशक्य आहे हे लक्षात घेऊन बादशहाने मोगली सेनेला परत बोलविले.

कल्याण-भिवंडी परिसरात धुमश्चक्रीच्या लढाया चालू असतांना मराठी सेनेच्या छोट्या छोट्या तुकड्या अहमदनगरचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी निकराचा प्रयत्न करीत होत्या. या किल्ल्यात संभाजी राजांच्या काही निकटवर्ती कुटुंबीयांना मोगल सरदार दिलेरखान याने पकडून कैदेत ठेवले होते त्यामुळे अहमदनगरचा किल्ला ताब्यात घेणे आणि या मंडळींची सुटका करणे ही अेक मराठी सेनेच्या अिज्जतीची गोष्ट होऊन बसली होती. हे हल्ले थांबविण्यासाठी

औरंगजेबाने तिरंदाजखान यास एक तुकडी देऊन अहमदनगरकडे रवाना केले होते. या तुकडीच्या मराठी सेनेबरोबर अनेक चकमकी झडल्या परंतु कोठेही मराठी सेनेस संपूर्णपणे थोपविणे त्यांना शक्य झाले नाही. ऑक्टोबर १६८२ मध्ये अहमदनगर येथील मोगल सेनेचे लक्ष वेधण्यासाठी मराठ्यांच्या एका तुकडीने अहमदनगरच्या दक्षिणेस असलेल्या पेडगांव (बहादूरगड) येथील लष्करी स्थानकावर हल्ला केला. आणि मोगली सेनेचे भारी नुकसान केले.

अशा रीतीने १६८२ च्या जानेवारी पासून ऑक्टोबर पर्यंत सतत १० महिने कल्याण-भिवंडी आणि अहमदनगर या सर्व ठिकाणी आटोकाट प्रयत्न करून देखील औरंगजेब मराठी सत्ता नष्ट करू शकला नाही. मराठ्यांचा जोर सतत वाढत चालल्यामुळे औरंगाबादहून सूत्र संचलन करणे अवघड आहे असा विचार करून ११ नोव्हेंबर १६८२ ला त्याने औरंगाबाद येथील छावणी हलविली आणि तो अहमदनगर येथे येऊन दाखल झाला. यापुढील कारवाया त्याने अहमदनगरहूनच सुरू केल्या.

वरील विवेचनावरून दिसून येईल की बादशहाने योजलेल्या आक्रमक चढाईला कोणत्याही ठिकाणी भरीव असे यश मिळाले नाही. या उलट पोर्तुगीजांविरुध्द मराठ्यांचे अनेक ठिकाणी घनघोर युध्द चालू असतांना देखील कोकणपट्टीत आणि मध्य महाराष्ट्रात मराठी सेनेच्या तुकड्यांनी मोगल सरदारांशी शर्थीने झुंज दिली आणि त्यांची चढाईची योजना संपूर्णपणे उध्वस्त करून टाकली. औरंगजेबाने औरंगाबाद येथील आपली पक्की छावणी सोडून तो अहमदनगर सारख्या मध्यवर्ती ठिकाणी स्थानापन्न झाला यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की लष्करी सूत्र संचलनामध्ये कमजोरी आढळल्यामुळे रणक्षेत्रावर संपूर्ण नियंत्रण करणे शक्य व्हावे म्हणूनच त्याने हा निर्णय घेतला असावा.

नकाशा नं. ८

दक्षिण महाराष्ट्र - संघर्ष


सिरूर
नासिक
संगमनेर
अहमदनगर
रायगड
पुणे
चंदन-वंदन
सातारा
सोलापूर
टेंभुर्णी
कऱ्हाड
मिरज

अुत्तर कोकण आणि मध्यमहाराष्ट्रातील संघर्ष १६८४-८५

(नकाशा नं. ६ आणि ७), ८.

(Operations In North and Central Maharashtra
1684-85)

मोगल युध्दनिती (Mughal Strategy)

नोव्हेंबर १६८२ च्या मध्यास औरंगजेब बादशहाने अहमदनगर येथे आपली पक्की छावणी स्थापन केल्यामुळे १६८४च्या आरंभापासून त्याने आपले लक्ष अुत्तर कोकण (कल्याण - ठाणे परिसर) आणि मराठी सत्तेची केंद्रस्थाने असणाऱ्या पुणे आणि रायगड या मधील प्रदेश यावर केंद्रित केले. १६८३ चे सबंध वर्ष अनेक अनुभवी सरदारांना अमर्याद सेना देअून देखील कल्याण-भिवंडीच्या परिसरावर आपला ताबा घेअु शकला नाही हा खंत बादशहाच्या मनात जारी होता. तसेच मोगल सेनेविरुध्द होत असलेल्या प्रखर प्रतिकाराची सूत्रे पुणे आणि रायगड येथूनच हलविली जात आहेत हे लक्षात येताच ही दोन केंद्रस्थानेच नष्ट करण्याचा बादशहाने निश्चय केला या दोन प्रमुख रणक्षेत्रात मराठा विरोधी उघड कारवाओ सुरु असतानाच पुणे - नाशिक मार्गावरील सिन्नरच्या परिसरात आणि अहमदनगरच्या नैऋत्येस असलेल्या पारनेरच्या परिसरातही मोगल सैन्याचा दबाव कायम ठेवण्यात आला.

मराठा युध्दनिती
(Maratha Strategy)

१६८१ पासून १६८३ पर्यंत तीन वर्षे मोगली सैन्याचे अनेक ठिकाणी जोरदार हल्ले होत असताना त्या हल्ल्याचा प्रतिकार करुन अनेक ठिकाणी मोगल स्थानका-

वर मराठी सेनेने प्रतिहल्ले चढविले परंतु बहुतेक ठिकाणी मोगल सेनेची संख्यात्मक शक्ती अधिक असल्यामुळे शत्रूचे शक्य तितके नुकसान करून नंतर माघार घेणे हीच मराठ्यांची सामान्य युध्दनिती होती. १६८४ च्या सुरुवातीस औरंगजेब बादशहा अहमदनगर सारख्या मध्यवर्ती ठिकाणी स्वतः हजर झाल्यामुळे साहजिकच त्याने ताज्या दमाच्या अनेक तुकड्या रणक्षेत्रात दाखल केल्या आणि काही विशिष्ट स्थानके ठरवूनच त्यावर सर्व शक्तीनिशी हल्ले सुरु केले. या बदललेल्या परिस्थितीमुळे मराठ्यांना आपली युध्दनिती बदलावी लागली या युध्दनितीचे मुख्य सूत्र असे होते की कोणत्याही स्थानकावर सुसज्जपणे [illegible] असलेल्या शत्रूवर हल्ला करण्याअैवजी, शत्रूला कुमक घेअुन येणा-या तुकड्यांना मार्गामध्येच अडविणे (interception) आणि त्यांची मनुष्यहानी करून साधनसामुग्री नष्ट करणे किंवा लुटून नेणे. या कारवाअींचा साहजिकच परिणाम असा होअी की कुमक घेअुन येणा-या अशाच तुकडीवर हल्ला झाला आहे असे कळताच जवळ असलेल्या मोगली स्थानकातून काही तुकड्या मराठ्यांच्या प्रतिकारार्थ बाहेर पडत आणि परिणामी त्या स्थानकाची शक्ती कमी होत असे. या युध्दनितीला प्रसिध्द युध्दशास्त्रज्ञ कॅप्टन लिडेल हार्ट यांनी अप्रत्यक्ष आघाताची कारवाअी (Strategy of Indirect Approach) असे नाव दिले आहे. शत्रूवर प्रत्यक्ष हल्ला न करता त्याच्या योजना अुधळून लावणे (Dislocate his plans), त्याची अुपस्थिती खिळखिळी करणे (Disorganise his Deployments) आणि त्याची रसद आणि दळणवळण तोडून टाकणे (Disrupt his communications and supplies अशी तीन सूत्रे अप्रत्यक्ष आघाताच्या कारवाअीची मार्गदर्शक तत्वे म्हणून सांगता येतील. १६८४ मध्ये ज्या ज्या ठिकाणी मराठ्यांनी मोगल सेनेचा प्रतिकार केला त्यात वरील सूत्रे समाविष्ट झाली होती असे दिसून येअील. या विवेचनास अनुसरून १६८४ मधील मोगल आणि मराठे यांच्यातील लष्करी कारवायांचा आढावा पुढे येणा-या परिच्छेदात केला आहे.

जानेवारी १६७४ मध्ये अहमदनगरच्या दक्षिण भागात पारनेर आणि बहादूरगड या परिसरात मोगल सैन्याच्या लष्करी कारवायांना पुन्हा सुरुवात झाली. बहादूरगडावर मराठ्यांचा पुन्हा हल्ला होईल या भितीने दिलेरखानाच्या हाताखाली बहादूरगडचा किल्लेदार सरबुलंदखान यास मदत म्हणून अेक तुकडी रवाना करण्यात आली. दिलेरखानाची तुकडी संख्येने कमी असल्यामुळे फेब्रुवारीच्या सुरुवातीस शहजादा आझम आणि त्याचा मुलगा बेदरबख्त यांनाही बहादरगडाकडे जाण्याचा हुकूम झाला. ही बातमी मराठ्यांना समजताच तिमाजी माने हा मराठा सरदार आपल्या सैन्यासह आझमच्या तुकडीचा मार्ग अडविण्यास सिध्द झाला. तिमाजीने आझमच्या वाटेत असणाऱ्या छावणीवर प्रखर हल्ले चढविले. हे वृत्त समजताच मोगलसरदार किशोरसिंग हाडा याला अहमदनगरहून पाठविण्यात आले. आझम आणि किशोरसिंग यांच्या संयुक्त फौजांनी तिमाजीच्या तुकडीस घेरण्याचा डाव टाकला, तो सफल होऊन तिमाजी मोगलांच्या हातात सापडला. त्यामुळे त्याच्या तुकडीने पुण्याकडे माघार घेतली. या परिसरात आणि अुत्तरेस सिन्नरच्या बाजूस मार्च १६७४ पासून तो जवळजवळ डिसेंबर पर्यंत मराठ्यांचे छुपे हल्ले चालूच राहिले. डिसेंबरच्या मध्यास औरंगजेबाने तीन हजार घोडेस्वारांची अेक तुकडी अितिकादखान याच्या नेतृत्वाखाली पारनेरचा ठाणेदार अब्दुल करीम याच्या मदतीसाठी पाठविली. ही तुकडी पोहचण्यापूर्वीच मराठी सेनेने पारनेरच्या किल्ल्यावर हल्ला चढविला होता. त्यामुळे ७०० घोडेस्वारांची अेक तुकडी गझनफरखान याच्या हाताखाली पुन्हा पाठविण्यात आली. या वाढीव मोगली सैन्याच्या आगमनामुळे पारनेरवरील मराठ्यांचा हल्ला यशस्वी होऊ शकला नाही. तरीपण मराठी सैन्याच्या छोट्या तुकड्या अहमदनगर पारनेर-आणि बहादूरगड यांच्या दरम्यानच्या प्रदेशात मोगल सैन्याची साधन सामुग्री अुध्वस्त करण्यासाठी हल्ले करीत राहिल्या.

सप्टेंबर १६८४ च्या प्रारंभी मोगल सरदार शियाबुद्दीनखान ४०००० घोडदळ घेअून मराठ्यांची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्याच्या परिसरात दाखल झाला. याच वेळी पुण्याच्या चारही दिशांना मोगल सेनेच्या अनेक तुकड्यांनी वेढून टाकले. पुरंदर, शिरवळ, राजगड, रोहिडेश्वर (रोहिडखोरे) आणि त्याच प्रमाणे मावळप्रांत या सर्व परिसरात मोगली सेनांचा संचार होअू लागला. अशा परिस्थितीत कोणत्याही ठिकाणी मोठ्या संख्येने निर्णायक लढाअी देता येणे शक्य नसल्याने मराठी सेनेच्या छोट्या तुकड्यांनी, या भागातील सर्व खिंडी, घाट, खोरी, मैदाने आणि जंगले, थोडक्यात म्हणजे जेथे दिसेल तेथे मोगलांच्या लष्करी कारवायांना थोपवून धरून त्यांचा प्राणपणाने प्रतिकार केला. या परिसरातील अेक घुमश्चक्रीची लढाअी नोव्हेंबर १६८४ मध्ये सातारा परिसरात झाली. तेथील मोगल स्थानकावर हल्ला करण्यासाठी संभाजी राजांनी नारोजी भोसले याच्या हाताखाली १००० घोडेस्वारांची अेक तुकडी रवाना केली. ही तुकडी साताऱ्याकडे जात आहे असे समजताच रायगडच्या परिसरात असलेला शियाबुद्दीनखान अुर्फ गाझीअुद्दीन फिरोज जंग या तुकडीस अडविण्यासाठी मार्गात आडवा आला. दोन्ही तुकड्यांची गाठ पडताच अेक घनघोर लढाअी झाली आणि दोन्ही पक्षांना जबर नुकसान सोसावे लागले.

ऑक्टोबर १६८४ च्या अखेरीस अुत्तर कोकणातील लढाअीस पुन्हा तोंड फुटले. कल्याण-भिवंडीच्या अुत्तरेस १०।१२ कि.मी. अंतरावर शहापूर या गावा जवळ तेल्या घाटाच्या डोंगरात कोथळागड हा अेक मजबूत असा डोंगरी किल्ला मोक्याच्या जागी असल्यामुळे त्याला लष्करी महत्व प्राप्त झाले होते. किल्ल्याच्या मजबूती मुळे मराठी सेनेला लागणारी शस्त्रास्त्रे, दारुगोळा, अन्नधान्य यांचा साठा या किल्ल्यात केला जात असे. हा किल्ला ताब्यात आला तर मराठ्यांचे अेक महत्वाचे स्थान नष्ट होअून कल्याण-भिवंडी परिसरावर हल्ले करणे

सोपे जाअील या अुद्देशाने औरंगजेबने आपले सर्व लक्ष कोथळागड घेण्यावर केंद्रीत केले. ८-११-१६८४ रोजी अब्दुल कादर या मोगली सरदाराच्या हाताखाली २००० चे अेक पायदळ तुकडी किल्ल्याच्या परिसरात दाखल झाली. या तुकडीचे वैशिष्ट म्हणजे सर्व सैनिकांजवळ त्या काळात आधुनिक समजल्या जाणा-या बंदुका होत्या. मोगल सेना किल्ल्याच्या आसपास आहे याची चाहूल लागताच किल्ल्याबाहेर असलेल्या मराठी तुकड्यांनी त्यांचा प्रतिकार केला आणि त्यांना मागे रेटून थोपवून धरले. या चकमकी नंतर ४।५ दिवस मोगल सेनेने कोणतीच हालचाल केली नाही या दरम्यान अब्दुलकादरच्या मदतीस माणकोजी पांढरे हा मोगल सरदार येअुन मिळाला. अेके दिवशी रात्री माणकोजीच्या सैनिकांनी गडाच्या मगरकोट दरवाज्या जवळ जाअून मराठी मध्ये दरवाज्या अुघडण्याविषयी खूप आरडाओरडा केला. गडावरील शिबंदीची त्यामुळे दिशाभूल झाली आणि हे आपलेच सैनिक आहेत अशी गैरसमजूत होअून त्यांनी दरवाजा अुघडला. त्याबरोबर माणकोजीच्या हाताखालील सैनिक आणि त्याच्या मागावून येणारे अब्दुल कादरचे मोगल सैनिक यांनी झपाट्याने किल्ल्यात प्रवेश केला. झालेली चूक लक्षात येताच गडावरील मराठा सैनिकही लढाअीसाठी सज्ज झाले. परंतु मोगल सैन्याकडे बंदुका असल्यामुळे त्यांचा फार काळ टिकाव लागला नाही आणि अब्दुलकादरच्या सैन्याने गडावर कब्जा केला. दुस-या दिवशी म्हणजे ९ नोव्हेंबर १६८४ ला आदल्या रात्री गडावर झालेल्या गोंधळाची आणि गड मोगलांच्या ताब्यात गेला आहे या वस्तुस्थितीची कल्पना येताच कल्याण परिसरातील मराठी सैन्याच्या २।४ तुकड्या कोथळागडाकडे रवाना झाल्या, तेथे पोहचताक्षणीच त्यांनी किल्ल्याला चारही बाजूंनी वेढा घालून गडावर असलेल्या मोगल सेनेची संपूर्ण नाकेबंदी केली. मराठी सेना फक्त बाणाच्या साहाय्याने लढत होती. तर याअुलट गडावर असलेले मोगल सैनिक मराठी सेनेवर बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव करीत होते. हा घुमश्चक्री

चालू असतांनाच किल्ल्यावरील दारुगोळ्याच्या कोठाराला अचानक आग लागली. आणि त्यामुळे तेथील मोगल सेनेची परिस्थिती अत्यंत कठीण झाली. या वेळेपर्यंत कोथळागडावर चाललेल्या लढाअीचे वृत्त जुन्नरचा मोगल किल्लेदार अब्दुलअजीजखान याच्याकडे पोहचले होते. त्याने तावडतोब आपला मुलगा अब्दुल्लाखान यास कादरच्या मदतीसाठी अेक तुकडी देअून रवाना केले. जुन्नरकडील मोगली सेना कोथळागडावरील मराठ्यांचा वेढा तोडण्यासाठी येत आहे ही बातमी कळताच मराठी सरदार नारोजी त्रिंबक याने जुन्नर-कोथळागड मार्गावर आडवे येअून अब्दुल्लाखानाचा मार्ग रोखून धरला. तेथे अुडालेल्या चकमकीत दोन्ही पक्षाकडील सैनिकांना तलवारी आणि खंजीर यांच्या साहयाने हातघाअीची लढाअी (Close Combat Battle) केली. ही लढाअी जारी असतांनाच जुन्नरच्या बाजूने रनअंदाजखान हा आपली तुकडी घेअून अब्दुल्लाखानाच्या मदतीसाठी रणक्षेत्रात दाखल झाला. मराठे आणि मोगल यांच्यात पुन्हा अेकवार निकराची लढाअी जुंपली आणि पराक्रमाची शर्थ करीत असतांनाच नारो त्रिंबक हा मराठा सरदार धारातीर्थी पडला. मोगल सेनेचा जोर यावेळी वाढत गेल्याने मराठी सेनेला माघार घ्यावी लागली. आणि शेवटी १६-११-१६७४ला कोथळागडचा किल्ला संपूर्णपणे मोगलांच्या हातात पडला. डिसेंबर १६७४ च्या अखेरीस कोथळागड परत मिळविण्यासाठी मराठी सेनेने गडावर पुन्हा हल्ले सुरु केले. हे हल्ले थोपविण्यासाठी अहमदनगरहून रणमस्तखान हा आपली तुकडी घेअून कोथळागडाच्या वाटेवर असतांना ७००० च्या अेका सुसज्ज मराठा तुकडीने त्याची वाट अडविली. आणि त्याच्यावर हल्ला करुन त्याची सर्व साधन सामुग्री लुटून नेली. या पराभवामुळे रणमस्तखानास अहमदनगरकडे माघार घेणे भाग पडले. यानंतर चार महिन्यांनी म्हणजे ४ अेप्रिल १६७५ ला कोथळागड घेण्यासाठी अेक अखेरचा प्रयत्न म्हणून मराठा सेनेने गडास पुन्हा अेकदा वेढा घातला परंतु गडावरील मोगल शिबंदी मजबूत असल्या-

मुळे हा प्रयत्न पुन्हा फसला १६८५ च्या जानेवारीत कोथळा गडावरील मोहिम असफल ठरल्यामुळे मोगल सेनावरील दबाव कायम राखण्यासाठी मराठ्यांनी पुण्याच्या अुत्तरेस दुसरी मोहिम अुघडली. सुरुवातीसच पुणे-नाशिक मार्गावर संगमनेर आणि सिन्नर या दोन्ही ठिकाणी असणा-या मोगल ठाण्यांवर प्रखर हल्ले चढविण्यात आले आणि मोगल रसद तोडण्याच्या अुद्देशाने आजूबाजूचा प्रदेश अुध्वस्त करण्यात आला. त्याचप्रमाणे संगमनेरहून अेक तुकडी अहमदनगरकडे पाठविण्यात आली आणि संगमनेर-अहमदनगर मार्गावरील मोगली सेनेची पुरवठा व्यवस्था तुटून नेली. अशा रितीने मध्य महाराष्ट्रात मोगल सेनेवरील दबाव कायम ठेवून कोथळागडावरील मोगल सेनेची पकड ढिली करण्याचा कसोशिने प्रयत्न करण्यात आला. या सर्व कारवाया चालू असताना ११००० च्या मराठी सेनेच्या अेका गटाने रायगडवरून कूच करून कल्याण भिवंडी मार्गे खानदेशातील धरणगांव या समृद्ध शहरावर हल्ला करून लूटालूट केली आणि तसेच पुढे जाअून ब-हाणपूर येथील मोगल ठाण्यावर हल्ला चढविला ही वार्ता औरंगजेब बादशहास कळताच त्याने आपला पुत्र कामबक्ष याच्या हाताखाली १२००० स्वारांची अेक तुकडी देअून त्याला मराठ्यांच्या प्रतिकारासाठी ब-हाणपूरकडे रवाना केले. कामबक्षाची फौज ब-हाणपूरकडे येत आहे हे समजताच मराठी सेनेने ब-हाणपूरहून माघार घेअून पुनश्च धरणगांव येथे आपली छावणी प्रस्थापित केली. १६८५ च्या मे महिन्यात मराठी सत्तेवरील दडपण वाढविण्याच्या दृष्टीने २०००० ची अेक तुकडी बादशहाने सातारच्या पूर्वेस २२ कि.मीटरवर असलेल्या खटाव येथे रवाना केली. ही बातमी मराठ्यांना समजताच सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या हाताखालील रायगडहून आलेल्या तुकडीने खटाव येथील मोगल छावणीवर अचानक हल्ला चढवून त्यांचे जबर नुकसान केले. याचवेळी नागोजी बल्लाळ याने ५००० ची अेक पायदळ तुकडी घेअून साता-याच्या जवळच असलेल्या चंदन आणि वंदन या दोन्ही किल्ल्यांवर हल्ले करून ते ताब्यात घेतले आणि तेथूनच सातारा खटाव परिसरावर पुन्हा धडक

मारली. सुदैवाने याचवेळी नारोजी भोसले यांच्या हाताखालील रायगडाहून आलेली १०००० ची अेक तुकडी नागोजी बल्लाळ यांना येअून मिळाली. अशा रितीने सेनापती हंबीरराव मोहिते, नागोजी बल्लाळ आणि नारोजी भोसले या तिघांच्या हाताखालील तुकड्यांचा सातारा खटाव परिसरात खूपच दबाव वाढला. ही बातमी शिरवळ येथे छावणी करून राहिलेल्या गाझीअुद्दीन फिरोजजंग यांस समजताच मराठी सेनेला हाकून पाडण्यासाठी त्याने शिरवळहून तातडीने साताऱ्याकडे कूच केले. यावेळी साताऱ्याच्या अुत्तरेस शिरवळ मार्गावर प्रथमच त्याची गाठ मोहित्यांच्या तुकडीशी पडली आणि अुभय पक्षात घुमश्चक्रीची लढाई झाली. दोन्ही बाजूस जबर मनुष्यहानी झाल्यामुळे ही चकमक अनिर्णीतच राहिली.

युध्दनैतिक विश्लेषण आणि मूल्यमापन

(Strategic Evqluation and assessment)

१६८० ते १६८५ अशी तब्बल सहा वर्षे मध्य महाराष्ट्रात आणि पश्चिमेकडील किनार पट्टीवर मोगल सम्राट औरंगजेब याने मराठी सत्तेविरुध्द अेक प्रखर अशी आक्रमक मोहिम अुघडली. मराठी सत्ता नष्ट करणे हे या मोहिमेचे अेकमेव अुद्दिष्ट होते. या मोहिमेची योजना बादशहाने तयार केली आणि ती प्रत्यक्षात राबविण्यासाठी तो प्रथम दिल्लीहून बऱ्हाणपुरास नंतर बऱ्हाणपुराहून औरंगाबादेस आणि नंतर औरंगाबादहून अहमदनगर येथे शाही छावणी करून राहिला. छावण्या बदलण्याचा मुख्य अुद्देश असा दिसतो की आपल्या सेनापतींकडून हुकमाप्रमाणे काम न झाल्याने रणक्षेत्राच्या शक्य तितक्या जवळ जाअून प्रत्येक मोहिमेचे सूत्र संचलन व्यक्तीशः करावे अशीच बादशहाची धारणा झाली. अशारितीने भव्य योजना आणि ठाम निश्चय या दोहोंच्या पाठबळावर २०-२५ जेष्ठ आणि अनुभवी सेनापती

आणि जवळजवळ दोन लाखाची सेना मराठ्यांना अुध्वस्त करण्यासाठी बादशहाने ६ वर्षे खर्च केली, तरीसुध्दा कोणत्याही अेका मोहिमेत मोगल सेनेला यश मिळू शकले नाही आणि मोगल योजना पुढीला फसल्या. अेवढ्या मोठ्या या आपत्तीला मराठ्यांनी असे तोंड दिले आणि मोगल सेनेला थोडीही अुसंत न देता त्यांना अपयशी ठरविले याची युध्दनैतिक पाहाणी करणे अत्यंत बोधप्रद ठरेल.

मोगलांच्या तुलनेने मराठ्यांची लष्करी ताकद सर्वांगाने कमजोर होती. संभाजी महाराजांना मोगलांशी मुकाबला करावा लागला त्यावेळी ते केवळ २४ वर्षांचे होते आणि अेप्रिल १६८० मध्ये झालेल्या शिवाजी महाराजांच्या निधनानंतर मराठी सत्तेची सूत्रे त्यांनी नुकतीच हाती घेतली होती. याअुलट औरंगजेब हा साठी अुलटलेला आणि अनेक मोहिमा स्वतःच्या हिम्मतीवर लढविलेला अेक अनुभवी आणि निष्णांत सर्वोच्च सेनापती होता. मोगली सेनेला जवळजवळ १५० वर्षांची लढाअू परंपरा होती. याअुलट मराठी सेना या केवळ २५ वर्षांच्या काळातच सुसंघटीत झाल्या होत्या. मोगलांअितकी साधनसंपत्ती आणि शस्त्रास्त्रेही त्यांच्याकडे नव्हती असे असतांना देखील मराठ्यांनी अत्यंत कुशल अशी युध्दनिती वापरून मोगलांशी प्राणपणाने प्रतिकार केला आणि आपली सत्ता कायम टिकविली. या युध्दनितीला काही युध्दशास्त्रज्ञ गुरीला वॉरफेअर असे म्हणतात तर मराठी अितिहासकार त्याला गनिमीकावा असे नाव देतात वस्तुस्थिती अशी आहे की या काळात मराठ्यांनी वापरात आणलेल्या युध्दनितीला युध्दशास्त्रीयदृष्ट्या खच्चीकरणाची युध्दनिती (Strategy of Attrition) हेच नाव देणे योग्य ठरेल. या युध्दनितीचा आविष्कार निरनिराळ्या प्रकाराने होवू शकतो हे मराठ्यांनी आपल्या लष्करी कार्यवाहीने सिध्द केले. या युध्दनितीचे सर्व प्रथम तत्व हे आहे की ही युध्दनिती शक्य तेथे आक्रमक (Off-ensive) आणि नाअिलाज झाल्यास बचावात्मक (Defensive) असू शकते. ब-हाणपूर आणि

औरंगाबाद येथे हंबीरराव मोहित्यांनी केलेले हल्ले, नेताजी पालकरने बागलाण वर केलेले हल्ले, अहमदनगर आणि सोलापूर येथील किल्ल्यांवर मराठ्यांनी केलेले वारंवार हल्ले, कोथळागडचा किल्ला मोगलांच्या हाती पडल्यावर मराठ्यांनी घातलेला कोथळागडचा वेढा आणि १६८५ मध्ये हंबीरराव मोहिते, नागोबल्ला, आणि नागोजी भोसले यांच्या जवळजवळ २०००० च्या सैन्यानी सातारा व वाईच्या दरम्यान गाझी-अुद्दीनच्या सैन्यावर केलेला निकराचा हल्ला ही मराठ्यांच्या आक्रमक सज्जीकरणाची अुदाहरणे म्हणून सांगता येतील. याउलट रामसेजच्या किल्ल्यावर अनेक मातब्बर मोगल सरदारांनी धडक मारूनही बचावात्मक पवित्र्यात असलेल्या मराठी सेनेने त्यांना दाद दिली नाही आणि वेढा अुठवून मोगल सेनेला औरंगाबाद कडे परत जावे लागले. त्याचप्रमाणे दक्षिण कोकण आणि अुत्तर कोकणातील कल्याण, भिवंडी येथे हल्ला करणाऱ्या शाहजादा आझम आणि हसनअली खान यांच्या सेनांची रसद तोडून जमीनी वरून आणि सागरी मार्गाने मराठ्यांनी अितकी चमत्कारिक कोंडी केली की मोगल सेनांचे त्यामुळे फार नुकसान झाले आणि त्यांना नामुष्कीने जीव बचावून माघार घ्यावी लागली.

आक्रमक आणि बचावात्मक स्वरूपाच्या सज्जीकरणाच्या युद्धनितीची अितर दुय्यम तत्वे खालीलप्रमाणे सांगता येतील.

अ) आपल्या अेखाद्या स्थानकावर शत्रूचा हल्ला झाला असतांना त्याचे दुसरीकडे लक्ष वेधून घेण्यासाठी आणि त्याची अुपस्थिती (Deployment) विभागण्यासाठी विरुध्द दिशेला आघाडी अुघडणे नाशिक जवळील अहिवंतगडावर मोगल सैन्याचे हल्ले होत असतांना मराठी सेनेने नाशिकच्या अुत्तरेस बऱ्हाणपूर आणि सूरत येथे हल्ले करून मोगल प्रदेशात धुमाकूळ घातला आणि नंतर औरंगाबाद येथील मुख्य छावणीवर हल्ला केला. रामसेज किल्ल्यावर मोगल हल्ले होत असतांना

पुणे-नाशिक मार्गावरील संगमनेर येथील मोगली ठाण्यावर हल्ला करून दुसरी आघाडी उघडली, कल्याण-भिवंडीवर हल्ला होत असतांना सिन्नरकडे दुसरी आघाडी उघडली त्याचप्रमाणे अहमदनगर येथील हल्ले सफल होत नाहीत हे पाहून सोलापूरच्या किल्ल्यावर हल्ले सुरू केले.

ब) शत्रूसैन्यावर आपल्या हल्ल्यांनी दबाव कायम राखणे, अहमदनगर किल्ल्यावर हल्ले चालू असतांना सोलापूर भागातील पंढरपूर, टेंभुर्णी आणि सांगोला या भागातील मोगली ठाण्यांवर मराठ्यांनी सतत हल्ले केले, कोथळा गडावर मोगलांची ताकद वाढत असतांना दबाव कायम ठेवण्यासाठी संगमनेर, सिन्नर, पेडगांव (बहादूरगड) आणि पारनेर येथील मोगली स्थानकांवर हल्ले चढविले.

क) कोणत्याही एका शत्रू स्थानकावर मोठ्या गटाने हल्ला करण्यापेक्षा निरनिराळ्या शत्रूस्थानकांवर छोट्या तुकड्यांनी थोडे थोडे थांबून वारंवार सहतत्याने हल्ले करणे आणि अशा रितीने शत्रूची मनुष्यहानी करून शस्त्रसामुग्री आणि अन्नधान्य यांची लूटालूट करणे पुण्याजवळील जुन्नर, साताऱ्याजवळील रहिमतपूर आणि कल्याण-भिवंडी जवळील शहापूर या मोगली ठाण्यांवर मुख्य लढाया चालू असतांना मराठी सेनेच्या छोट्या गटांनी हल्ले करून मोगल सेनेला हैराण करून सोडले.

ड) शत्रू अडचणीच्या जागी सापडला असतांना त्याची भूमार्गाने आणि शक्य झाल्यास सागरी मार्गाने नाकेबंदी करून त्याची रसद तोडून टाकणे, बेळगांव जवळील रामघाट खिंडीतून दक्षिण कोकणात सावंतवाडीच्या परिसरात उतरलेल्या शहाजादा आझमच्या सेनेची त्याचप्रमाणे महाड मार्गाने कल्याण-

भिवंडीकडे येणा-या हसनअली खानाच्या फौजेची सर्व मार्गाने रसद तोडून मराठ्यांनी मोगल सेनेला संपूर्ण हतबल केले. सुरतेहून अन्नधान्य घेअून येणारी जहाजे कल्याण-भिवंडी मधील मोगल ठाण्याकडे रसद आणत असतांना ठाणे, ठाण्याच्या अुत्तरेस असलेला पारसिक किल्ला आणि त्याचप्रमाणे तारापूर आणि माहिम या सागरी स्थानकांवर असलेल्या मराठी नौसेनेच्या गलबतांनी सुरतेहून येणा-या मोगल जहाजांना अडविले आणि ही नाकेबंदी यशस्वी करुन कल्याण भिवंडी परिसरातील मोगल सेनेची मराठा सैन्याने दारुण अवस्था केली.

अि) लवचीकरणाच्या युध्दनितीचे शेवटचे तत्व असे की संख्येने शत्रू सेना अधिक असेल तर तिच्याशी आमने सामने लढा न देता शक्यतोवर प्रतिकार करुन नंतर सुरक्षित ठिकाणी माघार घेणे. औरंगाबाद येथे मराठ्यांचा हल्ला होत असतांना ४०००० ची सुसज्ज सेना घेअून औरंगाबादच्या बचावासाठी खानजहान येत आहे हे कळताच मराठी सेनेने तेथून माघार घेतली. नाशिक जवळील धरमपूर खिंडीत मोगल सैन्याचा जोर वाढत असल्यामुळे तेथे प्रत्यक्ष लढाअी न करता मराठी सेनेने तेथून माघारी घेतली. साता-याजवळील हंबीरराव मोहित्यांचा गट अेकाकी असतांना शिरवळवरुन गाझीअुद्दीनखान मोठ्या तुकड्या घेअून साताराकडे येत आहे ही वार्ता मिळताच मोहित्यांनी साता-यावरुन वाअीकडे माघार घेतली. सुदैवाने तेथे त्यांना रायगडावरुन येणा-या नागो बल्लाळ आणि रानोजी भोसले यांच्या तुकड्या येअून मिळाल्यामुळे त्यांनी गाझीअुद्दीन खानाशी सामना देण्याचे निश्चित करुन मोगल सेने विरुध्द शर्थीची झुंज दिली.

वरील सर्व अुदाहरणांवरुन हे स्पष्ट होअील की या सहा वर्षात लवचीकरणाच्या युध्दनितीचे अनेक पैलू मराठ्यांनी आपल्या प्रत्यक्ष कार्यवाहीने यशस्वी रित्या अुपयोगात आणले आणि त्यामुळे मराठ्यांच्या युध्दशास्त्राच्या

अुत्क्रांतित अेक फार मोठा महत्वाचा टप्पा नोंद करून ठेवला. किंबहुना असे म्हणण्यास हरकत नाही की या सहा वर्षांतील मराठ्यांनी केलेला लवचीकरणाच्या युद्धनितीचा वापर हा या विषयावरील अेक आलेख ठरण्यास हरकत नाही.

प्रकरण दहावे

संदर्भसूची

१ श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांचे चरित्र - मल्हार रामराव चिटणीस विरचित - संपादक र.वि.हेरवाडकर

२ मराठी रियासत - उग्रप्रकृती संभाजी - खंड पहिला, गो.स. सरदेसाअी

३ मराठ्यांचे स्वातंत्र्य समर १६८१-१७०७, ज.श्री.पुराणिक

४ शिवपुत्र संभाजी - प्रा. कमल गोखले

५ छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र - वा.सी.बेंद्रे

६ पोर्तुगीज - मराठे संबंध अर्थात पोर्तुगीजांच्या दफ्तरातील मराठ्यांचा अितिहास - डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर

७ हिंदवी स्वराज्य आणि मोगल संभाजी काल - सेतू माधवराव पगडी

८ A History of the Mahratta People - C.A.Kincaid and Rao Bahadhur Parasnis.

प्रकरण अकरावे

संभाजी कालीन मोहिमा - दक्षिण भारत

१६८२-१६८९

(Maratha Operations Under Sambhaji - South India - 1682 - 1689)

सामान्य विवेचन

(General Consideration)

संभाजी महाराजांनी १६८० च्या अेप्रिल मध्ये मराठी सत्तेची सूत्रे हाती घेताच त्यांच्यापुढे अनेक आव्हाने अुभी होती. पश्चिम किनाऱ्यावर सुरतेपासून दक्षिणेस मंगलोरपर्यंत पोर्तुगीज आणि अिंग्रज या प्रामुख्याने नाविक सत्ता असणाऱ्या विदेशी राष्ट्रांचे सर्व सामान्य वर्चस्व होते. यापैकी या काळात पोर्तुगीज सत्ता ही अधिक लढाअू असून सामान्यपणे मोगल साम्राज्याशी शक्यतो जमवून घेणे आणि महाराष्ट्रात नवीन अुदयास आलेल्या मराठी सत्तेस पायबंद घालणे हे पोर्तुगीजांचे सर्वसाधारण धोरण होते. अिंग्रजांच्या यावेळी मुंबअी, मंगलोर आणि पूर्व किनाऱ्यावर मद्रास या ठिकाणी प्रमुख वखारी असून शक्य तो व्यापारी हालचालीच कायम करणे हे त्यांचे सामान्य धोरण असून मोगल किंवा मराठे यांना धक्का देण्याची संधी अनायासे अुपलब्ध झाल्यास पोर्तुगीजांना काळ आणि वेळ साधून मदत करणे हे त्यांचे प्रसंगोचित धोरण होते. मोगल सत्तेला स्वतंत्र आरमार नसल्यामुळे जंजिरा भागात प्रबळ असलेल्या सिद्दीसच मोगल सम्राट आपल्या दर्यावर्दी सत्तेचे प्रमुख नेमीत असत याच कारणामुळे मोगल आणि मराठे यांच्यामध्ये संघर्ष सुरु होताच सिद्दी मोगल सत्तेचे हस्तक म्हणून मराठ्यांविरुद्ध लढण्यास सदैव तयार असत.

प्रकरण ९ मध्ये पश्चिम किनार पट्टीवर सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्याविरुध्द मराठ्यांनी जी लष्करी कार्यवाही केली त्याचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे. प्रकरण दहा मध्ये स्वतः मोगल सम्राट औरंगजेब दक्षिणेत आल्यापासून मराठे आणि मोगल यांच्यात जो लष्करी संघर्ष सतत सहा वर्षे चालू होता त्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. चालू प्रकरणात पश्चिम किनाऱ्यावरील सिद्दी आणि पोर्तुगीज आणि मध्य महाराष्ट्रात मोगल या प्रबळ शत्रूंविरुध्द लष्करी संघर्ष चालू असताना देखील दक्षिण भारतातील राजकीय आणि लष्करी हालचालींकडे मराठ्यांनी दुर्लक्ष न करता आक्रमक लष्करी हालचाली कशा केल्या याचा आढावा घेण्यात येअील. सर्वसाधारण अितिहासाच्या पुस्तकात अिंग्रज अितिहासकारांचे अनुकरण करून दक्षिण भारतास कर्नाटक (Carnatic) या सामान्य नावाने संबोधण्याची रूढ पध्दत आहे. वास्तविक पाहता या काळातील लष्करी हालचाली विजापूर, धारवाड, म्हैसूर, बंगलोर आणि मंगलोर या सध्याच्या कर्नाटक राज्यातील प्रदेशापासून तो पूर्वेकडे हैद्राबाद, गोवळकोंडा, मच्छलीपट्टण, या सध्याच्या आंध्रप्रदेशाच्या राज्यात आणि खाली मद्रास, चेंगलपट, त्रिचनापल्ली या सध्याच्या तामीळनाडू राज्यातील प्रदेशापर्यंत पसरल्या होत्या म्हणूनच या विभागातील लष्करी कारवायांचा आढावा घेताना कर्नाटक हे मर्यादित आणि चुकीचे नामकरण न वापरता दक्षिण भारत हे सर्व संग्राहक नाव या मोहिमांच्या विचारासाठी वापरात आणले आहे.

१६८५ ते ८७ या तीन वर्षांच्या काळात औरंगजेब बादशहाने आपली सर्व लष्करी ताकद विजापूर आणि गोवळकोंडा येथील आदिलशाही आणि कुतुबशाही यांच्या अमलाखालील अिस्लामी राज्ये नष्ट करण्याकडे वळविली. संभाजी राजांना या गोष्टीची पूर्ण जाणीव होती की ही राज्ये नष्ट झाली तर मोगल

सत्तेचा वरवंटा मराठे सत्तेविरुध्द जोरदारपणे फिरल्याशिवाय राहणार नाही या प्राप्त परिस्थितीत त्यांच्यापुढे अेकच पर्याय होता आणि तो म्हणजे मित्रत्वाचे संबंध असलेल्या आदिलशाही आणि कुतुबशाही सत्तांना मोगलांच्या विरुध्द शक्य ती लष्करी मदत करुन मोगलांची लष्करी ताकद घोपट करणे हा होय. या अुद्देशाने मराठे, आदिलशाही आणि कुतुबशाही या दक्षिणेतील सत्ताधाऱ्यांची अेक संयुक्त आघाडी (Alliance) अुभी करावी म्हणून संभाजी राजांनी आटोकाट प्रयत्न केले आणि अनेक ठिकाणी या आघाडीच्या सेना मोगलांविरुध्द लढण्यास सिध्द झाल्या. लष्करी दृष्टया अशा तऱ्हेच्या लष्करी आघाडीत अेकमेव लष्करी सूत्र संचालक (Single Allied Commender असल्या खेरीज आघाडीचे राजकारण किंवा रण कारण यशस्वी होअू शकत नाही. मोगलांच्या बाजूस त्यांच्या लष्करी कारवायांचे सूत्र संचलन सर्वोच्च सेनापती या नात्याने खुद्द औरंगजेब बादशहाच करीत होता त्यामुळे कोणत्या ठिकाणी आणि कोणत्या वेळी निर्णायक लष्करी हालचाली कराव्या हे त्याच्याच हुकमाने ठरत होते. याअुलट विजापूर, गोवळकोंडा आणि मराठे यांचे सेना विभाग अेकत्रपणे लढत असले तरी आपापसातील हेव्यादाव्यांमुळे त्यांच्या लष्करी कार्यवाहीत समन्वय साधू शकला नाही आणि त्यामुळेच निरनिराळ्या लढायात आघाडीच्या सेनेला पराभवच पत्करावा लागला. याचा परिणाम म्हणून प्रथम आदिलशहाला आणि नंतर कुतुबशहाला शरणागती पत्करावी लागली आणि विजापूर व गोवळकोंडा येथील अिस्लामी राजवटी अितिहास जमा झाल्या.

१६८० ते १६९० या काळात दक्षिण भारतात म्हणजे विशेषतः सध्याचा कर्नाटक आणि आंध्र प्रदेशच्या विभागात आणि तामिळनाडूच्या राज्यात अनेक हिंदू राजे आपापल्या मर्यादित राज्यात स्वतंत्रपणे राज्यकारभार करीत असत. शिवाजी महाराजांच्या आधीपासूनही त्यांचे वडिल शहाजीराजे यांना आदिलशाही

कडून बंगलोर या ठिकाणी कर्नाटकाची सुभेदारी बहाल करण्यात आली होती. तेव्हापासून शहाजी राजांचे या सर्व हिंदू राजांबरोबर सलोख्याचे संबंध होते हीच परंपरा शिवाजी महाराजांच्या काळातही कायम राहिली विशेषतः तंजावर येथे शिवाजी महाराजांचे सापत्न बंधु एकोजी राजे यांना जहागिर दिली असल्यामुळे आणि जिंजीसारखा अभेद्य किल्ला मराठी सत्तेखाली असल्यामुळे दक्षिणेतील हिंदू राजांना मराठी सत्तेचा मोठा आधार वाटत असे. या राजे लोकांना पाळेगार अथवा नायक या नावाने संबोधण्यात येई. महाराष्ट्रातील मराठी सत्ता आणि तंजावर येथील मराठी सत्तेचे केंद्र यातील संबंध तसेच कायम रहावे म्हणून १६८१ च्या एप्रिल मध्ये संभाजी राजांनी एक सेनेची तुकडी हरजी राजे महाडिक यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण भारतात रवाना केली. आणि जी ठिकाणे व जे किल्ले मराठ्यांच्या अंमलाखाली होते त्यांच्या कारभार महाडीकांकडे सोपविला १६८३-८४ नंतर म्हैसूरचा राजा चिक्कदेवराय याने आपली लष्करी ताकद वाढवून दक्षिणेकडे मदुरा, मद्रास आणि त्रिचनापल्ली या परिसरात आपला अंमल बसविला. चिक्कदेवरायाच्या या हालचालींमुळे मराठ्यांनी या भागात आक्रमक लष्करी हालचाली चालू केल्या. १६८६-८७-८८ या तीन वर्षात मराठी सेनेचे गट मद्रास त्रिचनापल्लीपर्यंत जाऊन पोहचले. या सर्व हालचाली चालू असताना मराठ्यांना पायबंद घालावा म्हणून औरंगजेबानेही मोगल सैन्याच्या तुकड्या मद्रासपर्यंत रवाना केल्या. या लष्करी कारवाया १६८८ च्या अखेर अनिर्णितपणे चालूच राहिल्या मध्यंतरी संभाजी राजांना अंतर्गत कलहास तोंड देण्यासाठी महाराष्ट्रात यावे लागले आणि याच हालचालीत ते औरंगजेबाच्या हाती सापडले आणि त्यातच त्यांचा शेवट झाला.

नकाशा नं. ८

आदिलशाही प्रदेश


सातारा
अक्कलकोट
इंडी
पन्हाळा
कोल्हापूर
विजापूर
रायचूर
बेळगांव
अडोनी

मराठे - आदिलशाही आघाडीची लष्करी कार्यवाही

(नकाशा नं. ९)

(Maratha - Adilshahi Joint Military Operations)

१६८४ च्या ऑक्टोबर मध्ये मोगल सेनेच्या तुकड्या आदिलशाही विरुध्द लष्करी कारवाअी करण्यासाठी बाहेर पडल्या आणि पुढील २-३ महिन्यात मोगल सेनेच्या अनेक गटांनी विजापूरच्या आसपास अेक लष्करी कडेच निर्माण केले. अशा त-हेची कारवाअी होणार याची आदिलशहाला कल्पना असल्यामुळे त्याने आधिपासूनच संभाजी राजांकडे आपले दूत पाठवून लष्करी मदतीची मागणी केली होती. या मागणी नुसार १६८४ च्या अखेरीस १८००० घोडदळाची मराठी सेनेचा अेक गट साता-याहून विजापूरकडे रवाना करण्यात आला. हा गट विजापूरच्या वायव्येस मार्गावर असतानाच त्यांच्या हालचालीची खबर मोगल गोटात येअून पोहचली त्या बरोबर या गटास अटकाव करण्यासाठी विजापूरच्या अुत्तरेस ११० कि.मिटरवर असलेल्या अक्कलकोट या मोगली ठाण्याचा सरदार रुहुल्लाखान याला ताबडतोब मराठ्यांवर चाल करुन जाण्याचे हुकूम मिळाले मराठी सेना विजापूरच्या वायव्येस ४० कि.मिटरवर असलेल्या अिंडी या गावाजवळ पोहचली असतानाच त्यांची रुहुल्लाखानाच्या सेनेशी गांठ पडली या लढाअीत मराठ्यांच्या मदतीसाठी २००० चे आदिलशाही सेनाहि रणक्षेत्रात येअून दाखल झाली होती. परिणामी मराठे आणि आदिलशाही यांच्या संयुक्त सेना आणि रुहुल्लाखानाची मोगल सेना यांच्यात अेक घनघोर लढाअी झाली त्यात मराठ्यांचे १००० सैनिक ठार झाले मोगल सेनेचा जोर वाढता असल्यामुळे संयुक्त फौजांना माघार घ्यावी लागली. मार्च १६८५ मध्ये मराठे आणि आदिलशाही यांच्या फौजा पुन्हा अेकत्रीत झाल्या आणि त्यांनी विजापूरच्या परिसरात

असलेल्या शहजादा आझम याच्या छावणीवर हल्ला चढविला तथापि आझमशहाची सेना संख्येने आणि विशेषतः तोफखान्यात भारी असल्यामुळे संयुक्त फौजांचा त्यांच्यापुढे टिकाव लागू शकला नाही. पुढे १६८५ च्या ऑगस्ट मध्ये संभाजी राजांनी अेक नव्या दमाची तुकडी पन्हाळ्याहून विजापूरकडे रवाना केली. या तुकडीचे नेतृत्व सेनापती हंबीरराव यांच्या कडे होते. सप्टेंबरच्या प्रारंभास मोहित्यांचा सेना विभाग आणि आदिलशाही सरदार सर्जाखान यांची अेकजूट होअून अेकंदर ५०००० फौज जमा झाली आणि मोगल सेने विरुध्द निर्णायक कार्यवाही करण्याची तयारी पूर्ण झाली. ही वार्ता विजापूरच्या दक्षिणेस ११५ कि.मिटरवर अडोनी येथे असलेला मोगल सरदार गाझीअुद्दीनखान यास समजली त्याने तातडीने अडोनीहून कूच करून मोहिते आणि सर्जाखान यांच्या संयुक्त फौजेवर जोरदार हल्ला चढविला या घुमश्चक्रीच्या लढाअीत संयुक्त आघाडीचे २००० सैनिक मारले गेले. खुद्द सर्जाखान जखमी झाला आणि जमालुद्दीन हैद्राबादी आणि त्याच्या बरोबरच्या १०० सरदारांना गाझीअुद्दीनखानाने कैद केले. या अपयशामुळे संयुक्त सेनेला माघार घ्यावी लागली. या लढाअीत संयुक्त फौजांपैकी आदिलशाही विभागाला जबर तडाखा मिळाल्यामुळे मोगल सेने विरुध्द युध्द चालू ठेवण्याची त्यांची हिम्मत कमी होअु लागली. कोणत्याही परिस्थितीत आघाडीला न तोडता मोगल विरोधी संघर्ष सुरु ठेवणे भाग होते. या हेतूने १६८५ च्या नोव्हेंबर मध्ये नागोजी बल्लाळ याच्या अधिपत्याखाली ७००० ची अेक पायदळ तुकडी हंबीरराव मोहिते यांच्या हाताखालील घोडदळाला कुमक म्हणून पाठविण्यात आली. मराठ्यांच्या सर्व हालचालींवर गाझी-अुद्दिनखानाचे अहोरात्र लक्ष होते. संयुक्त फौजांना [illegible]ल्या नवीन मदतीची कल्पना येताच त्यानेही आपल्या सैन्याच्या हालचाली सुरु केल्या. संयुक्त फौजांची छावणी यावेळी मिरज आणि विजापूर यांच्या दरम्यान कृष्णा नदीच्या अुत्तर तिरावर होती. याअुलट अडोनी

आणि रायचूर या परिसरात कृष्णा आणि तुंगभद्रेच्या खोऱ्यात गाझीउद्दीन आपला तळ ठोकून बसला होता. आघाडीच्या हालचालीची पुढील वाट न पाहता आज ना उद्या त्यांची सेना विजापूरकडे झेप घेणार आणि विजापूर भोवती पडलेले मोगल सेनेचे कडे तोडणार याची खात्री असल्यामुळे गाझीउद्दीनने तातडीने आपल्या सैन्यास कृष्णा नदी पार करण्याचा हुकूम दिला आणि लगेचच संयुक्त फौजांवर जोरदार हल्ला चढविला हल्ला अनपेक्षित झाल्यामुळे दोन्ही फौजा प्राणपणाने लढल्या आणि दोन्ही पक्षास जबर मनुष्यहानी पत्करावी लागली. मोगल सेनेचा हल्ला जोपट झाला तरीपण आपले स्थानक कायम ठेवून आघाडीचे सेनापती हंबीरराव मोहिते यांनी तात्पुरती माघार घेऊन आपली स्थानके पक्की केली. डिसेंबर १६८५ मध्ये मोहित्यांनी विजापूरला पडलेला मोगल वेढा तोडून काढण्यासाठी अखेरचा प्रयत्न म्हणून मोगल सेनेविरुध्द पुन्हा एकदा चढाई केली. परंतु या सुमारास औरंगजेब बादशहाने दक्षिणेतील सर्व फौजा विजापूरच्या आसपास एकत्रीत केली होती आणि त्यांच्या अफाट सामर्थ्यापुढे मोहित्यांचा हल्ला सफल होऊ शकला नाही. मराठी सेनेचे गड सातारा व कोल्हापूर येथून मिरज मार्गावरुन येत असल्यामुळे मराठ्यांच्या हालचालींना कायमचा पायबंद घालावा म्हणून मोगल सरदार अली रुहुल्लाखान आणि रणमस्त खान यांच्या संयुक्तसेना विभागांनी विजापूरहून मिरजेकडे धडक मारली आणि मिरजेचे ठाणे आपल्या ताब्यात घेतले. मिरज ताब्यात येताच त्यांनी चढाई पुढे चालू करुन कोल्हापूरहून पन्हाळ्याकडे आगेकूच सुरु केली. यावेळी कोल्हापूर आणि पन्हाळगड यांच्या दरम्यान हंबीरराव मोहित्यांच्या हाताखालील आघाडीच्या फौजा त्यांना वाटेत आड आल्या यावेळी मात्र आघाडीच्या फौजांनी रुहुल्लाखान आणि रणमस्तखान यांच्या सेना विभागांवर कडाडून हल्ले चढविले आणि त्यामुळे मोगल सेनेला कोल्हापूरच्या दिशेने माघार घ्यावी लागली अशा वेळी शत्रूला उसंत देणे योग्य नसते याची मोहित्यांना पूर्ण जाणीव होती म्हणून

त्यानी मोगलसेने विरुध्दचा पाठलाग चालूच ठेवला. शेवटी मार्च-अेप्रिल १६८६ च्या दरम्यान मराठ्यांच्या आक्रमक हालचालीपुढे टिकाव लागत नाही असे पाहून मोगल सेनेने बेळगाव च्या दिशेने माघार घेतली (कोल्हापूर-बेळगांव हा सध्या पुणे-बंगलोर या राष्ट्रीय महामार्ग नं. ४ चा अेक भाग असून दोन्ही ठिकाणांमधील अंतर १८० कि.मिटर आहे.) मराठ्यांचा पाठलाग तसाच चालू राहिला आणि अेप्रिल अखेरीस बेळगांव हे ठाणेही मराठी सेनेच्या हातात पडले जून ते सप्टेंबर १६८६ या चार महिन्यात मोगल सेना विभागांनी विजापूर भोवताली आपला वेढा आवळण्यास सुरुवात केली. आणि त्यामुळे १२ सप्टेंबर १६८६ ला विजापूरच्या आदिलशाहीने शरणागती पत्करुन विजापूर औरंगजेबाच्या हातात दिले. अशारितीने आदिलशाही नष्ट करुन आणि विजापूरच्या सुभ्यात मोगली अंमल जारी करुन लगेचच आक्टोबर मध्ये गोवळकोंड्याच्या कुतुबशाही विरुध्द चढाई करण्यासाठी मोगल सेनेने गुलबर्ग्याकडे कूच केले.

१६८६ च्या अखेरीस मोगल सेनेने गोवळकोंड्या भोवती संपूर्ण वेढा घातला गोवळकोंड्याचा प्रदेश महाराष्ट्रापासून दूर असल्यामुळे आणि कुतुबशाहीची लष्करी ताकद सुसंघटीत नसल्यामुळे ज्या प्रमाणात मराठ्यांना आदिलशाहीबरोबर लष्करी आघाडी उभी करता आली त्या प्रमाणात त्यांना कुतुबशाहीवरील मोगली वेढ्यात लष्करी मदत देता आली नाही आदिलशाही नष्ट करुन विजापूर हस्तगत केलेल्या मोगली सेना विभागांचे मनोधैर्य (Morale) साहजिकच उच्च प्रतिचे होते ह्या सर्व कारणांमुळे आणि कुतुबशहा अेकाकी पडल्यामुळे त्याची अवस्था फार कठीण झाली. मराठी सेनेच्या छोट्या तुकड्यांनी अनेक वेळा मोगली रसद तोडून काढण्यासाठी छुपे हल्ले केले परंतु मोगल लष्करी यंत्रणेवर त्याचा फारसा परिणाम होऊ शकला नाही. वास्तविक पाहता १६८७ च्या जानेवारीपासून पुढे ६-७ महिने मोगल सेनेचीही खूप दुर्दशा झाली. सुरुवातीसच प्लेगची साथ पसरल्यामुळे

दक्षिण भारत - कार्यवाही


रायगड
कोल्हापूर
बेळगांव
हुबळी
चित्रदुर्ग
सिरा
चिकबाळापूर
चिकमंगळूर
तुमकुर
म्हैसूर
मद्रास
कांजीवरम्
जिंजी
पोर्टोनोव्हो
तंजावर
नेगापट्टण
मदुरा

अनेक सैनिक साथीला बळी पडले. पुढे पावसाळ्यात पाऊस बिलकूल न झाल्यामुळे अन्नधान्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा तीव्र तुटवडा पडला. शेवटी फंदफितुरीने आणि मोठ्या प्रमाणात लाचलुचपत करून औरंगजेबाने कुतुबशाहीची राज्ययंत्रणा पूर्णपणे पोखरून काढली आणि त्यामुळे कुतुबशहाला शरणागती पत्करून गोवळकोंड्याचा ताबा मोगलांच्या हाती द्यावा लागला. अशा रीतीने १६८६-८७ या दोन वर्षात दोन्ही अिस्लामी राज्ये नष्ट करून आपले सर्व लष्करी सामर्थ्य मराठ्यांविरुद्ध अेकत्रित करण्यात औरंगजेबाला कोणतीच अडचण अुरली नाही.

दक्षिण भारतातील मराठ्यांच्या आक्रमक कारवाया (नकाशा नं.१०)

(Maratha Offensive in South India)

१६८१ च्या अुत्तरार्धात संभाजी महाराजांनी सर्वाधिकारी म्हणून दक्षिणेत पाठविलेले मराठा सरदार हरजीराजे महाडीक, शामजी नाअीक पुंडे, नेताजी काटकर आणि दादाजी काकडे या मंडळींनी अनेक गडांचा प्रत्यक्ष ताबा घेऊन दक्षिणेतील पाळेगारांवर आणि विशेषतः म्हैसूरच्या राजवटीवर मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित केले होते. परंतु मराठ्यांशी वरकरणी मित्रत्वाचे संबंध राखून म्हैसूरचा राजा चिक्कदेवराय याने मोगलांशी आतून संधान सुरू केले. १६८२ च्या अेप्रिल मध्ये मोगलांची लष्करी मदत घेऊन चिक्कदेवरायाने म्हैसूर पासून मदुरेपर्यंत २२० कि.मिटर धडक मारली आणि मदुरेच्या आसपासचा टापू आपल्या नियंत्रणाखाली आणला या घटनेमुळे तंजावर येथे असलेले मराठी सत्तेचे ठाणे आणि पश्चिमेकडे त्रिचनापल्ली आणि पूर्वेकडे नेगापट्टण या मराठी नियंत्रणाखालील प्रदेशाला सहाजिकच धोका अुत्पन्न झाला. चिक्कदेवरायाच्या या हालचालीस

वेळीच पायबंद घालणे अत्यंत जरुरीचे होते म्हणून तातडीचे उपाय करून चिक्कदेवरायाच्या सत्तेचे केंद्रस्थान असलेल्या म्हैसूर आणि बंगलोर या प्रदेशावर हल्ला करून तो ताब्यात घेणे आणि चिक्कदेवरायाच्या पुढील आक्रमक योजनांना खिळ घालणे या गोष्टींचा मराठ्यांच्या गोटात गंभीरपणे विचार करण्यात आला. संभाजी राजांना म्हैसूरकरांच्या वाढत्या सामर्थ्याची पूर्ण कल्पना होती म्हणून लष्करी कारवाई करण्यापूर्वी शक्य तेथे राजकीय आघाडी निर्माण करणे आवश्यक होते. या दृष्टीने मराठ्यांनी गोवळकोंड्याच्या कुतुबशाहीशी असलेले आपले राजकीय आणि लष्करी संबंध अधिक दृढ केले आणि त्याचप्रमाणे इक्केरीच्या नायकाशी लष्करी मदतीचा तह केला. ही व्यवस्था पूर्ण झाल्यावर मराठ्यांनी संभाजी राजांच्या नेतृत्वाखाली म्हैसूरच्या दिशेने कवाईस प्रारंभ केला. सातारा-मिरज-हुबळी-धारवाड या मार्गाने आगेकूच करून मराठी सेना म्हैसूरच्या वायव्येस १६० कि.मी. वर असलेल्या चिक्कमंगळूर या ठिकाणी पोहचली आणि लवकरच चिक्कमंगळूर आणि पूर्वेकडे असलेले तुमकूर या दोन्हींच्या मध्ये असलेल्या बाणावर येथे आपला लष्करी तळ ठोकला. याच ठिकाणी जून १६८२ मध्ये चिक्कदेवरायाने इतर पाळेगारांची मदत घेऊन मराठी लष्करी तळावर हल्ला केला. चिक्कदेवरायाची लष्करी ताकद वरचढ ठरल्यामुळे बाणावरच्या लढाईत मराठ्यांना हार पत्करावी लागली आणि म्हणून त्यांनी उत्तरेकडे ५० कि.मिटर वर असलेले चित्रदुर्ग येथे माघार घेऊन नवीन लष्करी तळ उभा केला. चिक्कदेवरायाला युद्ध त्याच्याच राज्यात पायबंद घालण्याचा हेतू फसल्यामुळे काहीतरी नवीन डावपेच टाकणे आवश्यक होते. त्या दृष्टीने चिक्कदेवरायाचा शत्रू मदुरेचा नायक याच्याशी लष्करी साह्याचा करार करून आणि तंजावरच्या एकोजी राजांचे संपूर्ण लष्करी व आर्थिक साह्य घेऊन युद्ध त्रिचनापल्लीतच लष्करी तळ स्थापन करण्याचा निर्णय करण्यात आला आणि तेथून पुढे मदुरेकडे धडक मारून तेथूनच चिक्कदेवरायाच्या

लष्करी हालचालीस पायबंद घालता येईल अशी खात्री झाली. या योजनेनुसार कुतुबशहा, असप्पा नाईक अेकोजीराजे आणि मदुरेचा नायक यांच्याशी लष्करी करार पूर्ण करून मराठ्यांची सेना चित्रदुर्गाहून प्रथम तुमकूरच्या पूर्वेस ५० कि.मिटर वर असलेल्या चिक्कबाळापूर येथे रवाना झाली. तेथून लवकरच १६८१ च्या जानेवारी फेब्रुवारीत चिक्कबाळापूरहून दुसरी छावणी म्हैसूरच्या पूर्वेस ५० कि. मिटरवर असलेल्या धर्मपुरी येथे हलविण्यात आली. पावसाळा संपल्यानंतर आक्टोबर मध्ये संभाजी राजांच्या व्यक्तीशः नेतृत्वाखाली मराठ्यांनी त्रिचनापल्ली वर चढाई केली आणि त्रिचनापल्ली ताब्यात घेऊन तेथून ८० कि.मिटर वर असलेल्या मदुरा येथे मराठी सेना हजर झाल्या दरम्यान मदुरेचा नायक चोक्कराय हा मरण पावला आणि मदुरेवरही मराठ्यांचा कब्जा झाला. या विजयाचा संपूर्ण फायदा उठवावा म्हणून संभाजीने आपली चढाई तशीच चालू ठेवली आणि पूर्वेकडे वळून मद्रासच्या दक्षिणेकडे असलेल्या मायावरम, पोर्टोनोव्हो आणि नेगापट्टम, या किनारपट्टीवरील सर्व ठाण्यांवर मराठी अंमल बसविला. या मोहिमेत बिदनूरच्या राणीनेही मराठ्यांना सर्व प्रकारची लष्करी मदत केली. मराठ्यांच्या या आक्रमक हालचालीमुळे चिक्कदेवरायांच्या लष्करी हालचालींना पुष्कळच पायबंद बसला आणि त्याने नाईलाजाने मराठ्यांशी तहाची बोलणी सुरू केली. या वाटाघाटी नंतर चिक्कदेवरायाशी शस्त्रसंधी करून संभाजी महाराज रायगडाकडे परत रवाना झाले.

१६८४-८५ या दोन वर्षात दक्षिण भारतातील पाळीगार नायक आणि म्हैसूरकर चिक्कदेवराय यांनी विशेष हालचाली न करता १६८२ च्या तहा प्रमाणे मराठ्यांच्या अंमलात विशेष अडचणी उत्पन्न केल्या नाहीत. १६८५ च्या सप्टेंबर मध्ये मोगल सेनेच्या तुकड्या विजापूर भोवती जमा होऊ लागल्या आणि विजापूर ची आदिलशाही लवकरच नष्ट होणार अशी स्पष्ट चिन्हे दिसू लागला. चिक्कदेव-

रायाने तर आदिलशाही विरुध्द मोगल सेनेला मदत करण्याचे धोरण आखले त्या बरोबरच जिंजर पाळेगार नायक मराठयांच्या विरोधी हालचाली करु लागले मध्यंतरी १६८६ मध्ये औरंगजेबाने खुनायतखान या मोगल सरदाराचा अेक तुकडी देऊन चिक्कदेवरायाकडे पाठविले आणि श्रीरंगपट्टण येथील मजबूत किल्ल्यात म्हैसूरकरांनी मोगल सेनेच्या साहयाने आपली लष्करी ताकद वाढविण्यास सुरुवात केला. येथूनच अेक मोगल तुकडी पुढे मद्रासकडे रवाना झाली आणि त्यानी मद्रासच्या दक्षिणेस ८० कि.मिटरवर असलेल्या कांजीवरम येथील मराठी ठाण्याच्या आसपास लष्करी हालचाली सुरु केल्या यावेळी कांजीवरम येथे असलेला मराठा सरदार गोपाळ दादाजी याने मोगली हालचालीस सक्त विरोध केला. त्याच्या मदतीस अेक मराठा तुकडी विठ्ठल परशुराम याच्या नेतृत्वाखाली तंजावर मधून पाठविण्यात आली. गोपाळदादाजी आणि विठ्ठल परशुराम यांच्या संयुक्त तुकडयांनी मोगल सेनेविरुध्द तडफदार कारवाई करुन त्यांना कांजीवरम परिसरातून धाळून दिले. १६८८ मध्ये हरजीराजे महाडीक हे अेकाकी पडले आहेत हे कळताच संभाजी राजानी केशव त्रिमल आणि संताजी घोरपडे यांना आपापल्या तुकडया घेऊन तातडीने दक्षिण भारतात जाण्याची आज्ञा केली. १४००० घोडदळाच्या या तुकडया पेनकुंडारो १६८९ मध्ये मद्रासच्या दक्षिणेस दाखल झाल्या आणि आल्याबरोबरच त्यांनी उत्तर अर्काट आणि दक्षिण अर्काट या संपूर्ण विभागात मराठयांचा दबदबा निर्माण केला व तेथील सर्व गड आणि शहरे आपल्या ताब्यात घेतली. त्याचप्रमाणे कावेरीपाक, चौक आणि चंगलपट ही महत्वाची लष्करी ठाणीही मराठी सत्तेखाली आणली. १६८७ च्या सप्टेंबर मध्ये गोवळकोंडयाची कुतुबशाही नष्ट केल्या. नंतर मोगल सेनेचे विभाग म्हैसूरच्या प्रदेशात घुसले आणि त्यांनी चिक्कबाळापूर, तुमकूर, पेणुकोंडा ही म्हैसूरकरांची सर्व शहरे जिंकून मोगल सरदार कासीमखान याने बंगलोर शहराचा ताबा

घेतला. कासीमखानाच्या चढाअीची बातमी लागताच हरजीराजे आणि केशव त्रिमल आपल्या तुकड्या घेऊन कासीमखानाला अडविण्यासाठी तंजावर, त्रिचनापल्ली भागातून बंगलोरकडे रवाना झाले होते. परंतु ते पोहचण्यापूर्वीच कासीमखानाने बंगलोरवरील आपली पकड मजबूत केली होती. त्यामुळे मराठी सेनेला जिंजीकडे परत जाण्याशिवाय दुसरा मार्ग अुरला नाही. १६८७ च्या अखेरीस अेकोजीराजे मरण पावल्यानंतर दक्षिण भारतातील मराठ्यांची लष्करी आणि राजकीय सत्ता व जबाबदारी सर्वस्वी हरजीराजे महाडीक यांच्या शिरावर पडली. या संधीचा फायदा घेऊन बंगलोर येथे स्थिरावलेला मोगलसरदार कासीमखान याने आक्रमक हालचाली सुरु केल्या. त्याने अेक तुकडी मद्रासच्या अुत्तरेस मच्छलीपट्टण कडे रवाना केली आणि आपल्या स्वतःच्या नेतृत्वाखाली बाकीच्या तुकड्या घेऊन जिंजीकडे कूच केले. कासीमखानाच्या या आक्रमक हालचालींना वेळीच रोखणे अत्यंत आवश्यक होते म्हणून हरजीराजे स्वतः अेक मोठा सेना विभाग घेऊन जिंजीच्या अुत्तरेस असलेल्या तिवेनापट्टण येथे दाखल झाले आणि बाकी तुकड्या संताजी घोरपडे यांच्या हाताखाली पश्चिमेस तिरुन-मलाअी येथे पाठविण्यात आल्या. डिसेंबर १६८७ पासून फेब्रुवारी मार्च १६८८ या २-४ महिन्यात २००० घोडदळ आणि ५००० पायदळ असा ७००० च्या अनेक मराठी तुकड्या मद्रासच्या पश्चिम आणि दक्षिण भागात सतत संचार करीत होत्या. अर्काट, चेंगलपट आणि कांजीवरम या सर्व भागात यावेळी मराठ्यांनी आपले लष्करी वर्चस्व प्रस्थापित केले मद्रास जवळील फोर्टसेंट जार्ज पासून दक्षिणेकडे २० कि.मिटर अंतरावर १०००० घोडदळ आणि पायदळाची अेक मराठा तुकडी राखीव म्हणून सज्ज ठेवण्यात आली. मराठी सैन्याच्या या आक्रमक हालचालीमुळे औरंगजेबाने त्यांच्या विरुध्द कारवाअी करण्यासाठी महंमद सादिक, अिस्माअील खान आणि माचच्या नाअीक यांच्या नेतृत्वाखाली १५००० ची अेक घोडदळाची

मोगला सेनेची चढाई


पेडगांव (बहादुरगड)
अहमदनगर
संगमेश्वर
कराड
सोलापूर
मलकापूर
मिरज
विशाळगड
विजापूर
कोल्हापूर
बेळगांव

तुकडी तातडीने मद्रासकडे पाठविली मार्च १६९० मध्ये कांजीवरम आणि वांदीवॉश यांच्या परिसरात मोगल आणि मराठा सैन्यामध्ये २-३ धुमश्चक्रीच्या चकमकी झाल्या. वांदीवॉश येथे मोगल सेनेकडे भारी तोफखाना असल्यामुळे मराठी सेनेला माघार घ्यावी लागली. परंतु कांजीवरम येथे मात्र मराठी घोडदळाने प्रभावी हल्ले करून मोगल सेनेला वांदीवॉशकडे माघार घेण्यास भाग पाडले. पुढे १६९९ च्या अखेर पर्यंत जिंजीचे ठाणे आणि नेगापट्टण व त्रिचनापल्ली हा प्रदेश मराठी अमलाखाली कायम राहिला परंतु तेथे असलेल्या मोगल सेनेविरुध्द मधून मधून त्यांचा संघर्ष चालूच राहिला.

मोगलांची मराठ्यांविरुध्द चढाई (नकाशा नं.११)

(Mughal Offensive Against the Marathas)

१६८६ च्या अखेरीस आदिलशाही नष्ट करून आणि विजापूर भागात मोगली अम्मल प्रस्थापित करून मोगल सेना तातडीने गुलबर्ग्यावरून गोवळकोंड्याकडे रवाना झाल्या. विजापूर प्रमाणेच गोवळकोंड्याचा वेढा बरेच दिवस चालणार आणि मोगल सेना बराच काळ तिकडे गुंतून पडणार हे स्पष्ट असल्यामुळे या संधीचा पुरेपूर फायदा घेण्याचे संभाजी राजांनी ठरविले. अखेर त्यांनी दक्षिण भारतात मराठी सेनेच्या नव्या तुकड्या पाठवून हरजीराजे महाडीक आणि इतर सरदार यांना मद्रासच्या पश्चिमेकडे आणि दक्षिणेकडे आक्रमक हालचाली करण्याची आज्ञा दिली. या मोहिमेचा आढावा वरती घेण्यात आलेला आहे. याबरोबर विजापूरच्या भागात नवीनच स्थापन केलेल्या मोगल शासकीय आणि लष्करी यंत्रणा खिळखिळी करणे ही योजना मराठ्यांनी प्रथम कार्यवाहीत आणली. मराठी सेनेच्या अनेक छोट्या तुकड्यांनी विजापूर परिसरात ठिकठिकाणी हल्ले करून

लुटालूट करण्याचा सपाटा लावला. आदिलशाही नष्ट झाल्यामुळे तेथील ब-याच स्थानिक सरदारांना आणि अधिका-यांना औरंगजेबाने कामावरून दूर केले होते. त्यामुळे सहाजिकच बेकार झालेली ही सर्व मंडळी मराठ्यांना येऊन मिळाली त्यांना त्यांच्या अधिकाराप्रमाणे पगार किंवा मान मरातब देण्यास मराठ्यांकडे पैसा नव्हता परंतु मराठी सेनेची मदत घेऊन त्यांनी हवा तो मुलूख लुटून घ्यावा आणि आपली सत्ता प्रस्थापित करावी अशी संपूर्ण मोकळीच त्यांना देण्यात आली. या धोरणामुळे औरंगजेबाने नेमलेला शासकीय आणि लष्करी अधिकारी वर्ग अत्यंत संत्रस्त झाला. त्यांच्या मदतीला मोगल सेनेचे पाठबळ नसल्यामुळे मराठ्यांच्या या लुटालुटीच्या प्रकारास कसा पायबंद घालावा हेच त्यांना समजेना. त्यांच्याकडून हे वर्तमान गोवळकोंड्याच्या स्वारीवर असलेल्या बादशहास वरचेवर मिळत होते. तिकडून दक्षिणेकडूनही मराठ्यांच्या आक्रमक हालचालींची हकिगत औरंगजेबाच्या गोटात रोजच्या रोज होती. तरीपण बादशहाचे सर्वलक्ष गोवळकोंड्यावरील मोहिमेकडे लागल्यामुळे मराठ्यांविरुध्द कोणतीही निर्णायक कार्यवाही करणे त्याला शक्य नव्हते.

१६८७ च्या सप्टेंबर मध्ये कुतुबशाही नष्ट झाल्यानंतर गोवळकोंडा भागात मोगल शासन प्रस्थापित करून विजापूर भागातील परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी आपली बहुसंख्य सेना घेऊन बादशहाने तातडीने विजापूरकडे प्रयाण केले. आदिलशाहीचे दोन प्रबळ सरदार सर्जाखान आणि शेख जमालुद्दीन हैद्राबादी हे दोन सरदार मात्र औरंगजेबाच्या बरोबर सतत छावणीत होते. श्री.वा.सी. बेंद्रे यांच्या म्हणण्याप्रमाणे शिकंदर आदिलशहाने शरणागती पत्करण्यापूर्वी बादशहाला लिहीलेल्या पत्रात असे आश्वासन दिले होते की मराठ्यांविरुध्द होणा-या कोणत्याही लष्करी कारवाईत आदिलशाहीची संपूर्ण मदत मोगल सेनेला मिळू शकेल त्याने असाही प्रस्ताव दिला होता की मोगल सेनेने चाकण-पुणे मार्गाने

मराठी मुलखात घुसावे आणि आदिलशाही सरदार लक्ष्मेश्वर-गदक-मिरज मार्गाने मराठी प्रदेशात चाल करतील. अशा त-हेने दुहेरी डाव टाकून अथणी पन्हाळा व रायगड ही मराठी सत्तेची केंद्रस्थाने हस्तगत करून मराठयांची सत्ता नष्ट करता येईल अशा त-हेची योजना औरंगजेबाच्या डोक्यात घोळत होती. डिसेंबर १६८७ मध्ये गोवळकोंडयावरून निघालेली बादशहाची स्वारी जानेवारी १६८८ मध्ये विजापूरास येऊन दाखल झाली थोडयाच दिवसात म्हणजे २५ जानेवारी १६८८ ला शहजादा आझम आणि गाजीउद्दीनखान यांच्या हाताखाली ४०००० चा घोडदळाचा एक विभाग देऊन बादशहाने त्यांना कोल्हापूरवरून रायगडाकडे चाल करून जाण्याची आज्ञा केली या सेना विभागाने विजापूरहून कूच केल्या नंतर फेब्रुवारीच्या मध्यास मराठयांच्या ताब्यात असलेला बेळगांवचा किल्ला काबीज केला आणि बादशहाच्या पुढील हुकमाची वाट पहात हा विभाग काही काळ बेळगांव परिसरातच राहिला.

मोगल सेना बेळगांवपर्यंत पोहचली असल्याचे वर्तमान हाती येताच पन्हाळगडावर असलेल्या कविकलश या संभाजी राजांच्या कारभा-याने सैन्याची जमवाजमव सुरु केली आणि बेळगांव मार्गे कोल्हापूरवर मोगली हल्ला झाल्यास त्याचा प्रतिकार करण्यासाठी कोल्हापूर-पन्हाळा परिसरात जय्यत तयारी सुरु केली. संभाजी महाराज यावेळी रायगड येथे होते. कविकलशाच्या मदतीसाठी संभाजी राजांनी आपली सेना घेऊन विशाळगडाकडे प्रयाण केले. कोल्हापूराहून मलकापूर मार्गे विशाळगड २० कि.मिटर अंतरावर आहे. याचवेळी म्हणजे १५ डिसेंबर १६८८ च्या दरम्यान औरंगजेब बादशहा विजापूराहून मिरज मार्गाने पन्हाळ्याकडे येण्यास निघाला. मिरजेच्या मुक्कामात आदिलशाही सरदार पन्हाळ्याच्या वाटेवर असल्याचे वृत्त त्याला समजले आणि त्याच प्रमाणे संभाजी

राजे विशाळगडावर असल्याचे आणि विशाळगडाहून ते परत रायगडास जाणार असल्याचेही वृत्त त्याच्या हाती आले. या दोन वार्ता अेकाच वेळी मिळाल्यामुळे बादशहाने आपला बेत ताबडतोब बदलला, शेख निझाम यास मुकर्रबखान ही पदवी व २५००० सेना देऊन त्याला तातडीची आज्ञा देण्यात आली की त्याने पन्हाळ्याकडे न जाता दुस-या मार्गाने ताबडतोब मलकापूरकडे रवाना व्हावे आणि तेथून संभाजी राजांच्या हालचालींवर अहोरात्र लक्ष ठेवून त्यांच्या पाठलाग करावा आणि शक्य तो त्यांना जिवंत अथवा मृत ताब्यात घ्यावे. बादशहाच्या गोटात होत असलेल्या या जलद निर्णयांची संभाजी राजांना काहीच कल्पना नसल्यामुळे विशाळगडावरची सर्व बचावाची व्यवस्था मार्गी लावून फेब्रुवारी १६८९ च्या पहिल्या आठवड्यात मलकापूराहून त्यांनी आंबेघाटातून रायगडाकडे प्रयाण केले. शत्रूकडून कोणत्याही प्रकारची अनपेक्षित कारवाअी होऊ नये म्हणून त्यांनी ५००० स्वारांची अेक तुकडी आंबेघाटाच्या तोंडावरच मार्ग रोखण्यासाठी मलकापूर येथे सज्ज ठेवली. ~~आणि [illegible]~~ या लष्करी तयारीची वार्ता कोकणातील शृंगारपूरचे शिर्के यांना कळताच त्यांनी कविकलशाचा डाव अुलथून पाडण्यासाठी प्रतिकारवाअी सुरु केली. संभाजी राजांच्या सापत्न माता आणि छत्रपती राजारामाच्या मातोश्री शिर्के घराण्यातील असून या घराण्यावर संभाजी राजांचा फार रोष होता. त्यामुळे कविकलशाची आणि अप्रत्यक्षपणे संभाजी राजांची खोड मोडावी असा विचार करून शिर्क्यांनी आदिलशाही सरदार सर्जाखान आणि शेख जमालुद्दीन हैद्राबादी यांच्याशी संधान बांधले आणि त्यांनी पन्हाळ्यावर हल्ला करून कविकलशाचा डाव अुलथून टाकावा अशी व्यवस्था केली. शिर्क्यांच्या या आत्मघातकी हालचालींचा सुगावा संभाजी राजांना रायगड मुक्कामी कळविण्यात आला. त्याबरोबर शिर्क्यांचे पारिपत्य करावे म्हणून २०००० ची अेक घोडदळ तुकडी घेऊन त्यांनी तातडीने पन्हाळ्याकडे प्रयाण

केले. रायगड ते पन्हाळा हा मार्ग कोकणातील आंबेघाटातून सह्याद्रीच्या द-याखो-यातून जाणारा आहे. १६८८ च्या आक्टोबर नोव्हेंबर मध्ये संभाजी राजांच्या सेनेने मार्गात शृंगारपूर येथे शिर्क्यांवर हल्ला करुन त्यांचा प्रदेश लुटला आणि पुढे चाल करुन ते पन्हाळ गडावर पोहचले. पन्हाळा आणि त्याला लागूनच असलेला पावनगड हे मजबूत किल्ले असून त्यांच्या रक्षणाकरीता मराठ्यांचा भारी तोफखानाही तेथे सज्ज होता. त्यामुळे शिर्क्यांकडून प्रोत्साहन मिळाले असतानाही मिरजेहून निघालेले सर्जाखान शेख निजाम हैद्राबादी यांच्या संयुक्त सेनेला पन्हाळ्याविरुध्द तातडीने कारवाई करण्याचे धाडस झाले नाही. इकडे पन्हाळ्याच्या बचावाचा सर्व व्यवस्था पूर्ण करुन घोडेस्वार घेऊन राजे स्वतः संगमेश्वराकडे रवाना झाले. संगमेश्वर हे गांव मलकापूर पासून ६० कि.मिटर अंतरावर मलकापूर-म्हाड रस्त्यावर वसलेले असून आजूबाजूने सह्याद्रीचे कडेकोट आणि दाट जंगले यानी ते वेढलेले आहे. अलक्कोंडा आणि वरुणा या दोन नद्यांच्या संगमावर हे गाव असल्यामुळे त्याला संगमेश्वर हे नाव असून तेथील शिवाचे मंदीर प्रसिध्द आहे. संगम झालेल्या या दोन नद्यांना समुद्राकडे मिळताना शास्त्री नदी असे म्हणतात. मलकापूर पासून सुरु होणा-या आंबेघाटाशिवाय तिवरा, माळ आणि कुडी या पूर्वेकडील तीन घाटातूनही संगमेश्वराला जाणे शक्य आहे.

औरंगजेबाच्या नव्या हुकमाप्रमाणे मोगल सेनेचा अधिपती शेखनिजाम उर्फ मुकर्रबखान याने निवडक २००० घोडदळ व १००० पायदळ बरोबर घेऊन ताबडतोब संभाजी राजांच्या पाठलागाची हालचाल सुरु केली. कोल्हापूर ते पन्हाळा आणि पन्हाळा ते मलकापूर या सर्व मार्गावर मराठी सेनेचा कडक बंदोबस्त असल्यामुळे मुकर्रबखानाने तो मार्ग टाळला असावा असे अनुमान करणे भाग पडते परंतु १२-१४ फेब्रुवारी १६८९ ला आपला पट घेऊन मुकर्रबखान संगमेश्वराच्या आसपास उतरला यात शंका नाही. बहुधा तो क-हाडमार्गे तिवरा घाटातून थेट संगमेश्वर

मध्ये दाखल झाला असावा ही त्याची हालचाल अत्यंत अनपेक्षित आणि अचानक स्वरूपाची ठरली. संगमेश्वरकडे येणारा शत्रू मलकापूर मार्गानेच येईल आणि तसे झाल्यास मलकापूर येथील तुकडी त्याचा प्रतिकार करेल आणि आपणास योग्य ती खबर मिळेल अशी ठाम खात्री असल्यामुळे संभाजीराजे आणि कविकलश संगमेश्वर येथे निर्धास्त होते. त्यामुळे १५ फेब्रुवारीला संगमेश्वर भोवती मुकर्रबखानाच्या फौजेचा संपूर्ण गराडा पडताच मराठ्यांच्या छावणीत एकच गोंधळ उडाला. संभाजी राजांच्या बरोबरीस असलेल्या ४००-५०० स्वारांनी कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला परंतु मुकर्रबखानाची तुकडी संख्येने अधिक असल्याने त्यांचा टिकाव लागला नाही. खानाच्या सैनिकांनी संभाजी राजे राहात असलेल्या वाड्याची आणि जवळील मंदिराची संपूर्ण नाकेबंदी केली तेथे झालेल्या चकमकीत कविकलशाच्या एका हाताला बाण लागल्यामुळे तो जायबंदी झाला आणि पडकला गेला. यापुढील चकमकीत प्रतिकार करण्यास असमर्थ ठरल्यामुळे कविकलश आणि स्वतः संभाजीराजे मुकर्रबखानाचे कैदी झाले. या सुमारास औरंगजेबाची छावणी मिरजेहून हालून प्रथम अकलूज येथे गेली आणि तेथून पुढे शिरूर जवळील बहादूरगड ऊर्फ ~~बहादूर गड~~ पेडगाव येथे छावणी हलविण्यात आली. मुकर्रबखानाने संभाजीराजे आणि कविकलश यांना बरोबर घेऊन तातडीने बहादूरगडाकडे प्रयाण केले. आणि त्यांना बादशहा जवळ हजर केले १।२ आठवडे त्यांचा अनन्वित छळ करून ११ मार्च १६८९ ला संभाजी राजांचा वध करण्यात आला. अशा रितीने १६८० ते १६८९ ही नऊ वर्षे सिद्दी, पोर्तुगीज आणि मोगल यांच्याशी सतत झुंज देणाऱ्या संभाजी महाराजांचा थोड्याशा गाफीलपणामुळे दुर्दैवी अंत झाला आणि मराठे शाहीच्या सत्ता संपादनातील दुसरे पर्व समाप्त झाले.

युध्दनैतिक विश्लेषण आणि मुल्यमापन
(Strategic Evqluation and Assessment)

१६८१ ते १६८८ या तब्बल आठ वर्षांच्या काळात मराठयांनी दक्षिण भारतात सुरु ठेवलेल्या आक्रमक लष्करी हालचाली या मराठयांच्या युध्दशास्त्राचा अेक उच्चांक मानावा लागेल. वास्तविक पाहता उत्तरेकडे पश्चिम किना-यावरील पोर्तुगीज आणि सिद्दी आणि त्याचप्रमाणे ब-हाणपूर पासून सोलापूर पर्यंत मध्य महाराष्ट्रात अनेक मोगली सेनापती यांच्याशी अविरत संघर्ष चालू असतांनाच रायगड पासून जवळजवळ ~~[illegible]~~ १३०० कि.मीटर असलेल्या पूर्वकिना-यावरील कॉनिमार (मद्रास) पोर्टोनोव्हो - कांजीवरम आणि चेंगलपट अितक्या दूर अिलाख्यात मराठी सैन्याला आक्रमक हालचाली कशा करुन शकल्या ही अेक आश्चर्यकारक घटनाच म्हणावी लागेल. या काळात दक्षिण भारतात विजापूरची आदिलशाही आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही ही दोन्ही अिस्लाम धर्मीय राज्ये अस्तीत्वात होतीच. आज ना अुद्या मोगल आक्रमणाचा वरवंटा आपल्यावर फिरणार याची आदिलशहाला आणि कुतुबशहाला पूर्ण जाणिव होती. मोगलांच्या अफाट सामर्थ्यापुढे टिकाव धरणे त्यांना शक्य नव्हते तरी सुध्दा आपला विनाश अटळ आहे हे समजूनही या दोन्ही राज्यातील मातब्बर सरदार औरंगजेबाला फितूर झाले आणि त्यांनी मराठयांविरुध्द हालचाली चालू ठेवल्या. कृष्णा आणि तुंगभद्रा यांच्यामध्ये असलेल्या अडोनी येथून मराठयांवर हल्ला करणारा सर्जाखान आणि संभाजी महाराजांना अचानक कारवाअी करुन पकडणारा शेखनिजाम हैदराबादी अुर्फ मुकर्रबखान हे याच कंपूतले सरदार होत.

दक्षिण भारतातील मोहिमेचे १६८२-८१ मध्ये संभाजी राजांनी स्वतः नेतृत्व केले आणि आक्रमक चढाअी करुन रायगड पासून चिक्कबाळापूर, चिक्कमंगळूर

अित्यादी ठाणी हस्तगत करून मराठी फौजा बंगलोरच्या दक्षिणेस जाअून पोहचल्या. यावेळी दक्षिण भारतात ज्या हिंदू राजांचा अंमल प्रामुख्याने जारी होता त्यात म्हैसूरचा चिक्कदेवराय आणि मदुरेचा नायक हे प्रमुख होते. या दोन्ही राज्यकर्त्यांमध्ये अनेक पिढ्यांचे शत्रुत्व होते याचा फायदा घेअून मराठ्यांनी वेळ पाहून दोघांशी करार मदार केले आणि दोघांच्या प्रदेशात चढाअी करून आपला अम्मल पूर्व किनाऱ्यावर प्रस्थापित केला. लष्करीदृष्ट्या या चढाअीत अेक गोष्ट प्रामुख्याने दिसून येते ती ही की मराठ्यांच्या निरनिराळ्या गटात भावनिक अेकता नसल्यामुळे परस्पर हेवेदावे वाढले आणि त्यामुळे जिंकून घेतलेल्या प्रदेशात सूत्रबद्ध शासन प्रस्थापित करून मराठी सत्तेचे पाय भक्कम रोवणे त्यांना शक्य झाले नाही. या यामध्ये तंजावरचे अेकोजीराजे, संभाजी महाराजांनी नेमलेले सुभेदार हरजीराजे महाडीक आणि जिंजीचे किल्लेदार रामचंद्र पंत हणमंते हे प्रमुख तिन गट होते. १६८२-८१ नंतर पश्चिम किनाऱ्यावर आणि मध्य महाराष्ट्रात चाललेल्या लष्करी हालचालींमुळे प्रत्यक्ष संभाजी राजांना या सर्व हालचालींचे सूत्रसंचलन करण्यास वेळ मिळू शकला नाही. मराठ्यांच्या बहुतेक हालचाली ५ ते १० हजाराच्या घोडदळाच्या गटाने झाल्या असे दिसते. घोडदळाच्या गटाचा चढाअीसाठी हुकमी अुपयोग होत असला तरी प्रदेश जिंकल्यावर ते आपल्या काबूत ठेवण्यास पायदळाची जरूरी लागते. मराठ्यांच्या युद्धनिपुण अशा पायदळी तुकड्या मध्य महाराष्ट्रात मोगली सत्ते विरुद्धच्या संघर्षात गुंतून पडल्यामुळे मराठ्यांच्या दक्षिण भारतातील आक्रमक हालचाली केवळ घोडदळावरच अवलंबून राहिल्या त्यामुळे साहाजिकच अशा कारवायांना लूटालूट आणि विध्वंस असे स्वरूप येत राहिले. कोणतीही लष्करी कारवाअी शत्रू प्रदेशात जारी असताना त्याला अनुषंगिक असलेली लूटमार कोणत्याही सेनेला थांबवता येत नाही हे खरे असले तरी अशा चढाअीचे स्वरूप केवळ लूटमारीचेच असेल तर त्या संघर्षातून प्राप्त

होणारी सत्ता स्थिर आणि मजबूत पायावर अुभी राहू शकणार नाही. नेमकी हीच गोष्ट मराठ्यांच्या दक्षिण भारतात झालेल्या मोहिमेत आढळून येते. त्याच कारणामुळे मद्रासच्या दक्षिणेकडे असलेल्या संपूर्ण किनाऱ्यावर आणि अर्काट त्रिचनापल्ली यासारख्या अंतर्गत प्रदेशावरही मराठी सत्ता प्रस्थापित होअू शकला नाही. या आक्रमक हालचालींची फलश्रुती कोणत्याही स्वरूपात पुढील अितिहासात दिसून येत नाही. हे सर्व खरे असले तरी पश्चिम किनाऱ्यावरील ठाणे, मुंबई पासून तो पूर्व किनाऱ्यावरील मछलीपट्टण, मद्रास पोर्टोनोव्हो आणि नेगापट्टण पर्यंतच्या जवळजवळ १००० कि.मि.च्या अवाढव्य प्रदेशात आक्रमक लष्करी हालचाल करण्याजितकी ताकद सुमारे नअू वर्षे मराठ्यांनी आपल्या हातात ठेवली ही गोष्ट त्यांच्या युध्दशास्त्राच्या अुत्क्रांतितील अेक महत्त्वाचा टप्पा म्हणूनच नोंद करावी लागेल.

या संदर्भात केवळ युध्दशास्त्राच्या दृष्टीने अेक प्रश्न अुपस्थित होतो तो असा की मध्य महाराष्ट्रात मोगल सेनेविरुध्द आणि पश्चिम किनाऱ्यावर सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्या विरुध्द १६८० पासूनच प्रखर संघर्ष चालू असतांना दक्षिण भारतात आक्रमक हालचाली करणे हे मराठ्यांचे धोरण बरोबर होते का? युध्दशास्त्राचे अेक प्रमुख तत्व असे आहे की कोणत्याही परिस्थितीत आपल्या शक्तिचे आणि साधनांचे अेकत्रीकरण (Concentration of Force) केले पाहिजे. याचे कारण अुघड आहे की अशा तऱ्हेचे अेकत्रीकरण न केल्यास आणि शक्ति व साधने यांची फाटाफूट झाल्यास कोणत्याच ठिकाणी निर्णायक विजय मिळविता येत नाही. त्यामुळेच मध्य महाराष्ट्रात आणि दक्षिण भारतात मराठ्यांना निर्णायक विजय मिळू शकले नाहीत. अर्थात ही गोष्ट खरी की तंजावर सारख्या दूरवरच्या प्रदेशात शिवाजी महाराजांच्या वेळेपासून मराठी सत्ता प्रस्थापित झालेली होती या आणि मराठी सत्तेखाली असणाऱ्या प्रदेशाचे शर्थीने संरक्षण करणे ही

आवश्यक अशी गोष्ट ~~ग्रष्ट~~ होती. कदाचित या परिस्थितीमुळे १६८१ मध्येच हरजीराजे महाडीक आणि अितर मातब्बर सरदार यांच्या बरोबर अेक [illegible] सेनागट पाठवून संभाजी राजांनी दक्षिण भारतातील मोगल सेनेचा प्रतिबंद केला. स्वत:च्या शक्तिचे विकेंद्रीकरण करुन त्यामुळे शत्रूलाही आपल्या शक्तिचे विकेंद्रीकरण करण्यास भाग पाडणे हा उद्देश मात्र मराठयांनी प्रत्यक्षात वापरलेल्या धोरणामुळे फायद्याचा ठरला. कदाचित असेही म्हणता येअील की दक्षिण भारतातील मराठयांच्या आक्रमक हालचाली थोपविण्यासाठी औरंगजेबाला बराचसा फौजफाटा तिकडे पाठवावा लागला आणि त्यामुळेच प्रथम आदिलशाही नंतर कुतुबशाही आणि त्यानंतर मराठे अशा तिघांविरुध्द अेकाच वेळी मोगली सेनेचे अेकीकरण टळू शकले. परंतु हा फायदा केवळ तात्कालिक (Temporary) स्वरुपाचा होता. आदिलशाही आणि कुतुबशाही ही दोन्ही राज्ये अंतर्गत परिस्थितीमुळे अितकी पोखरुन निघाली होती की त्यांचा संपूर्ण नाश होणार ही परिस्थिती स्पष्टच होती. ही दोन राज्ये नष्ट झाल्यावर म्हणजे १६८७ नंतर दक्षिण भारतातील हालचाली थांबवून मराठयांनी सर्व सेना अेकत्रित करुन मध्य महाराष्ट्रातच औरंगजेब विरुध्द शर्थीची झुंज दिली असती तर कदाचित अितिहासाला वेगळी कलाटणी मिळाली असती.

प्रकरण अकरावे

संदर्भसूची

१ श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांचे चरित्र - मल्हार रामराव चिटणीस - विरचित - संपादक र.वि.हेरवाडकर

२ मराठी रियासत - उग्रप्रकृती संभाजी - खंड पहिला, गो.स. सरदेसाई

३ मराठ्यांचे स्वातंत्र्य समर - १६८१-१७०७, श.श्री.पुराणिक

४ शिवपुत्र संभाजी, सौ कमल गोखले

५ छत्रपती राजाराम महाराज यांचे चरित्र, वा.सी.बेंद्रे

६ पोर्तुगीज-मराठे संबंध अर्थात पोर्तुगीजांच्या दप्तरातील मराठ्यांचा इतिहास - डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर

७ हिंदवी स्वराज्य आणि मोगल - संभाजी काल - सेतु माधवराव पगडी

८ A History of the Mahratta People C.A.Kincaid and Rao Bahadhur Parasnis

९ महाराष्ट्र आणि मराठे - सेतु माधवराव पगडी - प्रकरण ७-८-९

१० मोगल आणि मराठे (तारीखे दिल्कुशा) संपादक सेतुमाधवराव पगडी प्रकरण ५ ते १७.

११ मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध (समकालीन साधन ग्रंथ) संपादक
सेतु माधवराव पगडी

१२ मासिरी आलमगिरी - यदुनाथ सरकार

१३ English Records on Shivaji
शिवचरित्र कार्यालय.

प्रकरण बारावे

राजाराम कालीन मोहिमा - पश्चिम महाराष्ट्र - १६८९ - १७००

(Maratha Military Operations
Under Rajaram - Western
Maharashtra - 1689 -1700)

१६८९ च्या मार्चमध्ये मराठी सत्तेवर अेक अभूतपूर्व संकट कोसळले दक्षिण कोकणातील संगमेश्वर मुक्कामी मोगल सेनेने संभाजी महाराजांना पकडल्या नंतर त्यांची रवानगी औरंगजेबाच्या छावणीकडे करण्यात आली. यावेळी बादशहाची छावणी पुण्याच्या ईशान्येस भीमानदी पलीकडे असलेल्या कोरेगाव या गावाजवळ होती. छावणीत कैदी म्हणून आणल्यानंतर त्यांचा अनन्वित छळ करण्यात आला आणि शेवटी दिनांक १२ मार्च १६८९ ला त्यांची अत्यंत निर्दयपणे हत्या करण्यात आली. मराठी सत्तेला बसलेला हा पहिलाच मोठा धक्का होता. या हत्येमुळे महाराष्ट्राचे शक्ती नष्ट होऊन मराठी सत्ता संपेल कोसळून पडेल असा औरंगजेबाचा कयास होता. मराठी सत्तेला प्रेरणा देणारे प्रमुख अधिष्ठान अचानक उध्वस्त झाल्यामुळे मराठी सेना निर्नायक बनेल आणि त्यामुळे महाराष्ट्र जिंकण्याची आपली अनेक वर्षांचे स्वप्ने साकार होतील अशीही कदाचित औरंगजेबाची विचारधारा असावी. परंतु या हत्तेचा परिणाम वेगळ्याच रितीने झाला. राजा या नात्याने संभाजी राजांच्या आचरणात काही वैयक्तिक दोष होते ते माहित असूनही मराठी राज्यसंस्थापक श्री छत्रपति शिवाजी महाराज यांचे ज्येष्ठ पुत्र म्हणून आणि ज्या पध्दतिने त्यांचा वध करण्यात आला त्याची चीड येऊन मराठी सत्तेचे मानकरी आणि महाराष्ट्रातील सामान्य जनता यांच्या मनात अत्यंत प्रक्षोभक अशी लाट उसळली आणि त्याचा परिणाम म्हणूनच मोगलांविरुध्दच्या प्रतिकाराचे शक्ति कमी न होता ती उलट धारदार झाली.

मारुन किंवा मरुन अशा अिर्षेने मातब्बर मराठा सरदारांनी अेकजूट करुन मोगली सत्तेच्या आक्रमणाला यशस्वीपणे तोंड दिले.

संभाजीराजांच्या वधाची बातमी राजधानी रायगडवर येऊन धडकली त्यावेळी त्यांचे कनिष्ठ बंधू राजाराम किल्ल्यावरच नजरकैदेत होते. ही अनिष्ट वार्ता मिळताच रायगडचे किल्लेदार चांगोजी काटकर आणि सेनापती येसाजी कंक यांनी अेकमताने राजारामाची त्वरीत मुक्तता केली आणि छत्रपती म्हणून त्यांच्या नावाची घोषणा केली. त्यांच्याबरोबरच बंदीस्त असलेले मानाजी मोरे, प्रल्हाद निराजी आणि अितर काही सरदार यांचीही मुक्तता करण्यात आली आणि त्या सर्वांना पूर्वी असलेल्या नेमणुका कायम करुन देऊन राज्यकारभार सुरु केला. परिस्थिती अत्यंत बिकट होती, किल्ले बेसरंजाम झाले होते, खजिन्यात पैसा नसल्यामुळे लष्कराचे पगार अनेक वर्षे थकले होते. अनेक अनुभवी आणि मुत्सद्दी व्यक्ती काळाच्या पडद्याआड गेल्या होत्या. मराठा मंडळाचा निश्चय दृढ असला तरी मोगली सत्तेचे आक्रमण थोपविण्या अितकी संघटीत शक्ती मराठी सत्ताधाऱ्यांजवळ नव्हती. तशातच संभाजी राजांच्या वधानंतर बेहोश झालेल्या मोगल सेनेच्या गटांनी संपूर्ण महाराष्ट्रभर चौफेर हालचाली सुरु केल्या होत्या. औरंगजेबाने आपला वजीर आसदखान याचा मुलगा अितिकादखान याला झुल्फिकारखान असा किताब देऊन आणि त्याच्याबरोबर १०००० ची निवडक फौज देऊन त्याला रायगडकडे जाण्याची आज्ञा केली. रायगड किल्ल्यावर संभाजीराजांचे बंधू राजाराम व त्यांचे कुटुंबिय संभाजीच्या पत्नी महाराणी येसूबाअी आणि पुत्र शाहू हे मुक्कामास असल्याची बादशहाला खबर होती. त्यामुळे रायगडचा किल्ला हस्तगत करुन संभाजीराजांच्या सर्व परिवारास कैद करणे आणि मराठा सत्तेचा कणा मुळातच मोडून टाकणे हा या स्वारीचा अुद्देश होता. मजल दर मजल करीत झुल्फिकारखानाची सेना तातडीने रायगडकडे रवाना झाली

आणि २५ मार्च १६८९ ला त्याच्या सेनेने रायगडाला चहूकडून वेढा घातला.

त्यावेळच्या लष्करी परिस्थितीमध्ये रायगडचा किल्ला हा अेक अभेद्य किल्ला मानला जात असे. अिंग्रज आणि पोर्तुगीज अितिहासकारांनी या किल्ल्याला पूर्वेकडचा जिब्राल्टर (Gibraltar of the East) असे नाव दिले होते. मराठ्यांची राजधानी रायगडावर झाल्यापासून बचावाच्या दृष्टीने किल्ल्याची तटबंदी, मोक्याच्या जागा अत्यंत अुत्तम स्थितीत ठेवलेल्या होत्या. त्याचप्रमाणे गडावर भरपूर लष्कर सज्ज असून अन्नधान्य, दारुगोळा, आणि दाणागोटा साठवून ठेवलेला होता. यदाकदाचित किल्ल्यास वेढा पडला तर कमीत कमी सहा महिने ते अेक वर्ष भर बाहेरुन रसद न येताही किल्ला लढविणे शक्य होअील अशी व्यवस्था शिवाजी महाराजांच्या वेळेपासूनच करण्यात आली होती. वस्तुस्थिती अशी असली तरी शत्रू प्रत्यक्ष समोर अुभा राहिल्यावर आगामी संकटे केवळ कल्पनेपेक्षा जास्त भीषण दिसू लागतात. रायगडावर अुपस्थित असलेल्या मराठा सरदार आणि मुत्सद्यांना किल्ल्याचे रक्षण करुन तो लढविता येअील याबद्दल खात्री असली तरी किती काळपर्यंत ही परिस्थिती कायम राहील याची प्रत्येकाला शंका होती आणि म्हणूनच वेढा पडल्यानंतर मराठी सत्तेचे लष्करी धोरण काय असावे याबद्दल मराठा मंडळात अहोरात्र चर्चा आणि मसलती सुरु होत्या. केवळ रायगडचे रक्षण करुनच मराठी राज्यावरील संकट टाळता येणे शक्य नव्हते. झुल्फिकारखानाच्या सेनेखेरीज अनेक मोगल सरदारांनी औरंगजेबाच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या सर्व भागात धुमाकूळ घालण्यास सुरवात केली होती. त्यामुळे रायगडचे रक्षण करणे आणि किल्ल्याबाहेर असलेल्या मराठी प्रदेशाचे रक्षण करुन मोगल सत्तेला पायबंद घालणे अशी दुहेरी स्वरुपाची गंभीर समस्या मराठा सरदारांपुढे होती. कांही

सरदारांच्या मते राजारामाने किल्ल्यातून बाहेर पडून विशाळगड आणि रांगणा या दुर्गम किल्ल्यांचा आश्रय घ्यावा आणि सतत फिरते राहून मोगलांविरुध्द युध्द सुरु ठेवावे असा प्रस्ताव होता. या अुलट अितर काही सरदारांच्या मते राजारामाबरोबरच रामचंद्रपंत आमात्य, प्रल्हादनिराजी, शंकराजी मल्हार या मातब्बर मंडळींनी बाहेरपडून सैन्याची अलग अलग जमवा जमव करावी आणि ज्याज्यावर जसा प्रसंग येअील त्याप्रमाणे त्याची विभागणी करुन मोगलांविरुध्दचा संघर्ष चालू ठेवावा असाही अेक विचार होता. या दोन्ही विचारधारणा मराठ्यांच्या लढाऊ वृत्तीला साजेसा असल्या तरी युध्दनितीच्या दृष्टीने त्यातून निर्णायक यश मिळेल ही गोष्ट अशक्यप्राय होती. यावेळेस अेकंदर मोगल सेना जवळजवळ दोन लाखांच्या घरात असून ती अनेक ठिकाणी पसरली असल्यामुळे आणि खुद्द औरंगजेब जातीने नियंत्रण करीत असल्यामुळे अशा सेनेला आमने सामने आव्हान देणे मराठी सत्तेच्या शक्ती पलिकडचे होते. दुसरा अेक दोष या दोन्ही विचारात असा होता की हा संघर्ष पश्चिम महाराष्ट्रातच चालू राहिला असता तर मोगल सेनेच्या लुटालूट, जाळपोळ आणि धर्मांतर या तिहेरी धोरणामुळे मराठी प्रदेशाची फार जबर हानी झाली असती म्हणून या दोन्ही विचारापेक्षा वेगळा आणि लष्करी दृष्ट्या अधिक सोयीस्कर असलेला मार्ग शोधणे हाच मराठा मंडळापुढे फार मोठा प्रश्न होता.

मराठ्यांची खच्चीकरणाची युध्दनिती

(Maratha Strategy of Attrition
and Indirect Approach)

वर अुल्लेख केलेल्या परिस्थितीमुळे केवळ मध्य महाराष्ट्रातच मोगल विरोधी संघर्ष चालू ठेवून कोणताही विशिष्ट फायदा होणार नाही याची पूर्ण जाणीव रायगडावर असलेल्या लष्करी आणि राजकीय व्यक्तींना पुरेपूर होती.

अशा परिस्थितीत दोन गोष्टी करणे आवश्यक होते. पहिली म्हणजे महाराष्ट्रा बाहेर दूरवर मोगल सत्तेला आव्हान देवून तेथे नवीन आघाडी अुघडणे ही होय. यामुळे मोगल सैन्याची विभागणी होअून (Dispersion of Forces) मोगलांचा महाराष्ट्रातील दबाव कमी झाला असता आणि तेवढ्या प्रमाणात महाराष्ट्राचा प्रदेश सुरक्षीत राहीला असता. दुसरी गोष्ट अशी की महाराष्ट्राबाहेर संघर्ष चालू ठेवूनही महाराष्ट्रात जी मोगल सेना अुपस्थित राहील, तिच्याशी संघर्ष चालू ठेवून महाराष्ट्रात असलेले मोगलांचे किल्ले आणि महत्वाची ठाणी मराठी अम्लाखाली ठेवणे आवश्यक होते. याचा अर्थ असा की दोन्ही अुद्दिष्टये पूर्ण करण्यासाठी आगामी संघर्ष हा पश्चिम महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर अशा दोन आघाड्यांवर चालू ठेवणे हिच काळाची खरी गरज होती. नेमकी हीच, निर्णय मराठा सरदारांनी घेतला हा त्यांच्या प्रगत युध्दशास्त्रातला फार मोठा टप्पा मानावा लागेल. ज्यावेळी शत्रूला आमनेसामने आव्हान (Direct Confrontation) देणे अशक्य होते. त्यावेळी अशा तऱ्हेच्या दोन किंवा तीन आघाड्या अुघडून शत्रूच्या योजना, शत्रू सैन्याची अुपस्थिती आणि शत्रूची पुरवठा यंत्रणा खिळखिळी करण्याचा हाच अेकमेव मार्ग आहे. अशा तऱ्हेच्या युध्दनितीला अिंग्रज युध्दशास्त्रज्ञ कॅप्टन लिडल हार्ट यांनी अप्रत्यक्ष युध्दनैतिक पवित्रा (Strategy of Indirect Approach) असे नाव दिले आहे. त्यांच्या मते केवळ लढाईसाठी लढाई करणे हे युध्दनितीचे सूत्र असता कामा नये तर या अुलट शत्रूच्या योजना अुधळून लावणे (Dislocating Enemy Plan) शत्रूची अुपस्थिती खिळखिळी करणे (DisOrganizing Enemy Deployments) आणि शत्रूची पुरवठा यंत्रणा मोडून काढणे (Disruptting Enemy Supply Lines) अशा तीन गोष्टी यशस्वीपणे करता आल्या तर शत्रूची लढाअू शक्ती अितकी कमी होअील की अेक

दोन प्रखर तडाख्यात तो नामशेष होअून जाअील. यालाच केंद्रीकरण किंवा असे नाव देता येअील. रायगडावर अुपस्थित असलेल्या मराठे सरदार आणि मुत्सद्दी यांनी युध्दशास्त्राचा अभ्यास केला नसला तरी त्यांना प्रत्यक्ष युध्दाचा अनुभव अनेक वर्षे असल्यामुळे प्राप्त परिस्थितीत अचूक अुपाय कोणता याची त्यांना पूर्ण जाण होती हे निर्विवादपणे म्हणता येअील. वरील अुद्देश लक्षात ठेवून छत्रपती राजारामाने रायगडच्या वेढ्यातून बाहेर पडून टप्प्याटप्प्याने रायगडपासून १२०० कि.मी. दूर असलेल्या मद्रास जवळील मराठ्यांच्या ताब्यात असलेल्या जिंजीच्या किल्ल्याचा आश्रय घ्यावा असा निर्णय पक्का करण्यात आला. हा निर्णय नेमका कोणी घेतला याचा खुलासा या मुद्दावर अधिक संशोधन करूनच सिध्द करावा लागेल. परंतु अुपलब्ध साधनांच्या आधारे अेक गोष्ट प्रामुख्याने आढळते ती ही की हा निर्णय रामचंद्रपंत अमात्य या वयोवृध्द आणि अनुभवी मुत्सद्याच्या पुरस्काराने झाला असावा असे अनुमान केल्यास वावगे होणार नाही. हा निर्णय घेतांना संभाजी राजांच्या पत्नी महाराणी येसूबाअी यांचीही वैयक्तीक संमती त्यांनी घेतलेली दिसते. सरदेसायांच्या म्हणण्याप्रमाणे या निर्णयाची संमती देताना येसूबाअीने प्रधान मंडळास सांगितले की "तुम्ही सर्व पराक्रमी सरदारांनी अेक विचारे चालून राजारामानी त्यांच्या बायकामुलांसहित किल्ल्याबाहेर पडावे. तुम्ही सर्व बाहेर पडल्यावर शत्रू तुमच्या अंगावर जाअील, तुमचा सर्वांचा जमाव अेके ठिकाणी पोक्त झाला म्हणजे आम्हास काढून तिकडे नेण्याचे करावे".

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होअील कि राजारामाने रायगडच्या वेढ्यातून बाहेर पडून जिंजीकडे प्रयाण केले. हा अेक अत्यंत विचारपूर्वक आणि युध्दशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत योग्य असा निर्णय होता. जदुनाथ सरकार

यांनी राजारामाच्या रायगडावरून प्रयाणास पलायन असा जो शब्द वापरला आहे तो सर्वस्वी चुकीचा असून अशा तऱ्हेची समजूत या विषयाची युध्दशास्त्राच्या दृष्टीने चिकित्सा न झाल्यामुळेच झाली असावी ही गोष्ट स्पष्ट होते. १६८९ पासून १७०० पर्यंतच्या ११ वर्षांच्या काळात मराठ्यांनी महाराष्ट्रापासून तो जिंजीपर्यंत अशा १२००।१४०० कि.मि.च्या टापूत मोगल सत्तेशी जो संघर्ष चालू ठेवला त्याला मराठी इतिहासकार गुरीला पध्दतीचे युध्द किंवा गनिमी काव्याच्या लढाया असेही नाव देतात. यावेळी हे लक्षात ठेवले पाहिजे की शिवाजी महाराजांपासून तो राजाराम महाराजांपर्यंत लढाऊ स्वरूपात चालत आलेली मराठ्यांची लष्करी सत्ता, ही काही मूठभर असंतुष्ट लोकांनी चालविलेली चळवळ नव्हती. संपूर्ण महाराष्ट्रातल्या जनतेची सर्वांगिण शक्ती मराठी स्वराज्याच्या मागे उभी होती. या दृष्टीकोनातून पाहिल्यास १६८९ ते १७०० पर्यंत झालेल्या मराठा मोगल संघर्षास गुरीला युध्दपध्दत असे नाव देणे योग्य होणार नाही. या ११ वर्षांच्या अवधित पश्चिम महाराष्ट्रात साताऱ्याचा अजिंक्यतारा हा किल्ला आणि कोल्हापूर जवळील पन्हाळा हा किल्ला असे दोन्ही किल्ले वारंवार होणाऱ्या मोगल हल्ल्यांना यशस्वीपणे तोंड देऊन मराठ्यांनी झुंजविले. त्याचप्रमाणे दक्षिण भारतात दोडेरीच्या आणि बसवपट्टणच्या लढायात मोगली सेनेचा निर्णायक पराभव करून जिंजीचा किल्ला तब्बल ८ वर्षे मोगल सेनेशी प्रखर प्रतिकार करून आपल्या ताब्यात ठेवला. जगातील कोणत्याही गुरीला युध्दामध्ये अशा तऱ्हेच्या संघटीत आणि निर्णायक लष्करी कारवाया झालेल्या नाहीत. म्हणून मराठ्यांच्या लष्करी कारवायाना गुरीला युध्दपध्दत असे नाव देणे चुकीचे होईल. प्रथमच उल्लेख केल्याप्रमाणे मराठ्यांनी या अवधित केलेल्या लष्करी कारवाया या पध्दतशीर आणि संघटीत अशी लष्करीकरणाची मोहीम होती असेच म्हणणे योग्य ठरेल. या संदर्भात गनिमीकावा या

नकाशा नं. ७१

रायगड ते जिंजी


रायगड
विशाळगड
प्रतापगड
पन्हाळा
रायचूर
कर्नूल
नंद्याळ
कडप्पा
वेलोर
मद्रास
जिंजी

शब्दप्रयोगाची चिकित्सा करणे अुपयुक्त ठरेल. गनिम या फारसी शब्दाचा अर्थ शत्रू असा होतो. या अर्थाने शत्रूचा कावा म्हणजे बेत किंवा योजना ही अुधळून लावण्याची जी कृती ती म्हणजेच गनिमी कावा असे म्हणावे लागेल. खच्चीकरणाच्या मोहिमेतही शत्रूच्या योजना, अुपस्थिती आणि पुरवठा यंत्रणा अुधळून लावण्याची कृती करावी लागते. या दृष्टीने मराठी अितिहासकार ज्याला गनिमी-काव्याची पध्दत असे म्हणतात ती युध्दशास्त्रीयदृष्ट्या पाहता खच्चीकरण करण्याचे युध्दतंत्र (Strategy of Attrition) हेच असल्याचे सिध्द होते.

रायगडचा वेढा (नकाशा नं. १२)

(Siege of Raigad)

संभाजी राजांच्या वधा नंतर (११ मार्च १६८९) लगेच झुल्फिकार खानाच्या नेतृत्वाखाली पायदळ घोडदळाची २०००० संख्येची अेक मोठी तुकडी रायगडला वेढा घालण्यासाठी रवाना झाली आणि २५-२-१६८९ पासून रायगडला मोगल सेनेचा वेढा पडला. वर अुल्लेख केलेल्या सल्ला मसलती नंतर छत्रपती राजाराम आणि त्यांचे कुटुंबिय आणि त्याच प्रमाणे रामचंद्र पंत आमात्य, प्रल्हाद निराजी, शंकराजी मल्हार, ही सरदार मंडळी दिनांक ५ अेप्रिल १६८९ रोजी रायगडच्या वेढयातून हिकमतीने बाहेर पडली. तेथून पुढे प्रतापगड, विशाळगड, रांगणा, पन्हाळा आणि वेलोर अित्यादी ठिकाणी अल्प मुक्काम करीत करीत स्वतः राजाराम आपला वैयक्तीक सरंजाम बरोबर घेअून २९ नोव्हेंबर १६८९ला जिंजीमध्ये दाखल झाले. रामचंद्रपंत आमात्यांच्या नेतृत्वाखाली अितर सरदार मंडळींनी महाराष्ट्रातच राहून सैन्याची जमवाजमव करण्यास आरंभ केला.

दरम्यानच्या काळात राजारामाच्या जिंजीस जाण्याअगोदर औरंगजेबाच्या छावणीतही पुढे काय करावे या संबंधी सल्ला मसलत चालू होती. रायगडचा लवकरच पाडाव होऊन संभाजीचे सर्व परिवार कैदी म्हणून आपल्या ताब्यात येतील आणि तसे झाल्यास मराठी राज्य संपले अशी घोषणा करून आपण दिल्लीस परत जावे असा बादशहाचा विचार होता. तेवढ्यातच राजाराम आणि इतर प्रबळ मराठा सरदार वेढ्यातून निसटून गेल्याची बातमी बादशहाला कळली. वेढ्याच्या नाड्या आवळून मराठ्यांची पूर्ण नाकेबंदी करण्याचे बादशाही हुकूम सुटले व परिणामी ऑक्टोबरला रायगडचा पाडाव होऊन किल्ला मोगलांच्या हातात पडला. आणि त्याबरोबर महाराणी येसूबाई आणि राजपुत्र शाहू यांनाही मोगल छावणीत कैदी म्हणून जाण्याचा प्रसंग आला. या वेळी राजाराम नक्की कोणत्या दिशेने गेला आहे याची निश्चित कल्पना नसल्यामुळे झुल्फिकार खानाने रायगडचा वेढा उठवून शक्य तितक्या त्वरेने राजारामाच्या पाठलागावर निघावे असा बादशाही हुकूम झाला. १०-११-१६८९ रोजी झुल्फिकार खानाचा सेना विभाग रायगडच्या वेढ्यातून बाहेर पडला आणि येणाऱ्या माहिती प्रमाणे राजारामाचा पाठलाग करीत रायचूर, कुर्नुल, नंदीहाळ, कडप्पा या मार्गाने १६९० च्या जून महिन्यात ही सेना मद्रासच्या जवळपास येऊन धडकली. १।२ महिने विश्रांती घेऊन आणि सेनेची पुनर्रचना करून ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस झुल्फिकार खानाने जिंजीस वेढा घातला. या वेळी औरंगजेबाची छावणी विजापूरच्या नैऋत्येस ७० कि.मि. असलेल्या कृष्णा नदीच्या काठावरील गलगले या गावी होती.

साताराची लढाई

(Battle of Satara)

राजाराम जिंजीला सुरक्षित पोहचून त्यांची तिकडे व्यवस्था

लागल्याचे समजताच रामचंद्रपंत आमात्यांनी छत्रपतिंचे श्रेष्ठ मंत्री या नात्याने प्रल्हाद निराजी, शंकराजी नारायण, आणि दोन घडाडीचे मराठा सेनानी संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांच्याशी विचारविनिमय करून मध्य महाराष्ट्रात मोगल विरोधी संघर्ष कसा चालू ठेवावा या विषयी काही ठाम निर्णय केले. सर्वप्रथम मोगलांच्या हाती पडलेला रायगडचा किल्ला सोडवून घेणे हे महत्वाचे काम होते. त्याचप्रमाणे १६८९ ते ९० या काळात मोगलांनी हस्तगत केलेले प्रतापगड रोहिडा आणि तोरणा हे लष्करीदृष्ट्या महत्वाचे किल्ले पुन्हा मराठी अमलाखाली आणणे आवश्यक होते. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शंकराजी नारायण आणि धनाजी जाधव यांचा एक विभाग आणि स्वतः पंत आमात्य आणि संताजी घोरपडे यांचा दुसरा विभाग अशी फौजेची वाटणी करून मराठी सेना आपल्या कार्यासाठी पुन्हा सज्ज झाली. या सेना विभागानी पाच-सहा महिन्याच्या अवधितच प्रतापगड, रोहिडा आणि तोरणा हे किल्ले परत मिळविले आणि मोगलांच्या हातात असलेल्या रायगड किल्ल्याला वेढा घातला. किल्याची संपूर्ण नाकेबंदी करून मोगल किल्लेदार अबूल खैर खान याला किल्ला झुंजविणे अशक्य करून सोडले नंतर रायगडवर हल्ला करून खानाला त्याच्या सेनेसह किल्ल्यातून काढून टाकून किल्ला पुन्हा आपल्या ताब्यात घेतला. या कामगिरी नंतर मराठ्यांच्या या दोन सेना विभागांनी १६९० च्या पूर्वार्धात संपूर्ण कोकण पट्टीवर आणि कऱ्हाड पासून दक्षिणेकडे बेळगांव धारवाड पर्यंत मोठा प्रदेश पुन्हा मराठी अमलाखाली आणला. मराठ्यांच्या या लष्करी हालचालींची सूत्रे यावेळी साताऱ्याच्या किल्ल्यावरून केली जात असत. सातारा शहराजवळच पश्चिमेकडे असलेला अजिंक्यतारा हा किल्ला शिवाजी महाराजांच्या वेळेपासून मराठ्यांच्या ताब्यात होता. प्रतापगड

आणि रायगड हे दोन्ही महत्वाचे किल्ले साताऱ्यापासून जवळ असल्यामुळे लष्करी ठाणे या दृष्टीने आणि अजिंक्य ताऱ्यासारख्या मजबूत किल्ल्यामुळे मध्यमहाराष्ट्रात साताऱ्याचे महत्व खूपच वाढले होते. उत्तरेकडे पुणे, सोलापूर, अहमदनगर नाशिक हे प्रांत आणि दक्षिणेकडे कोल्हापूर बेळगांवचा प्रदेश या दोन्हींच्या मध्यावर सातारा असल्यामुळे साताऱ्याचे स्थान लष्करीदृष्ट्या निर्णायक ठरणारे होते. ही सर्व परिस्थिती ओळखून रायगडचा किल्ला मराठ्यांच्या पुन्हा ताब्यात गेला हे कळताच औरंगजेबाने साताऱ्याचा किल्ला हस्तगत करण्यासाठी त्या भागाशी परिचित असलेला विजापुरी सरदार सर्जायास रुस्तमखान असा किताब देऊन साताऱ्याच्या स्वारीवर रवाना केले. सातारा-वाई हा परिसर सर्जाखानाने या पूर्वीच लढवून काढला होता. वाईच्या लढाईत याच सर्जाखानाने हंबीरराव मोहित्यांशी घनघोर लढाई करून त्यांना रणक्षेत्रात ठार केले होते. या त्याच्या पूर्वीच्या कामगिरीमुळे सातारा घेण्यासाठी बादशहाने त्याची मुद्दाम नेमणूक केली.

२५ मे १६९० रोजी रुस्तमखान आपल्या तुकड्या बरोबर घेऊन साताऱ्याच्या मार्गाने निघाला त्याच्या हालचालीवरून असे दिसते की भीमेच्या काठी असलेल्या कोरेगांव येथील मोगलांच्या मुख्य छावणीतून बाहेर पडल्यावर रुस्तमखानाने जेजुरी-लोणंद-वाठार हा मार्ग आपल्या हालचालींसाठी निवडला असावा खान साताऱ्यावर चालून येत आहे ही वार्ता साताऱ्यामध्ये असलेल्या मराठा मंडळाला तावडतोब समजली आणि खानाला साताऱ्यापर्यंत येवू न देता मार्गातच त्याची अडवणूक करावी असा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाप्रमाणे रामचंद्रपंत आमात्यांच्या नेतृत्वाखाली शंकराजी नारायण संताजी आणि धनाजी हे आपापल्या तुकड्या घेऊन साताऱ्याच्या उत्तरेस असलेल्या वाठारजवळील

टेकड्यांवर खानाच्या आघाडीच्या तुकड्यांवर लक्ष ठेवण्या करीता रवाना झाले. लेरपंद आणि वाठार यांच्यामधील सपाट प्रदेश ओलांडून खानाची फौज वाठार टेकड्यांच्या जवळच मा-याच्या टप्प्यात आल्याबरोबर मराठी तुकड्यांनी त्यांच्यावर तिन्ही बाजूंनी हल्ला चढविला खानाच्या आघाडीवर त्याचा मुलगा गालीब हा नेतृत्व करीत होता. मराठ्यांच्या हल्ला होताच तो हल्ला मोडून काढण्यासाठी गालीबच्या तुकडीने त्यांच्यावर घडक हल्ला करण्याचा प्रयत्न केला. या तुकडीत काही हत्ती होते. मराठ्यांनी आपल्या बंदुकीच्या गोळ्यांचा मारा समोर येणा-या हत्तींवर केला त्यामुळे हत्ती बिथरले आणि त्यांनी तोंड फिरवून गालीबच्या सैन्यावरच तुडवातुडवी करण्यास सुरुवात केली. या अनपेक्षित घटनेमुळे मोगलांच्या आघाडीच्या तुकड्या मधील अनेक सैनिक जखमी झाले आणि त्यामुळे मोठा गोंधळ निर्माण होऊन आघाडीचे दस्ते विस्कळीत झाले ही परिस्थिती लक्षात येताच मोगल सेनेच्या मध्यभागी असलेला रुस्तमखान ताज्या दमाच्या तुकड्या घेऊन मराठी सेनेवर तुटून पडला. टेकडीवरुन खाली उतरलेल्या मराठा सैनिकांनी तात्पुरती माघार घेऊन पुढे सरसावणा-या खानाच्या तुकडीला टेकड्यांच्या पायथ्यापर्यंत येऊ दिले. खानाची अशी समजूत झाली की मराठे माघार घेत आहेत. म्हणून त्याने आगेकूच चालूच ठेवली स्वतः रुस्तमखान हत्तीवर असून सैन्याचे नियंत्रण करीत होता. टेकड्यांवर उपस्थित असलेल्या मराठा सैन्याच्या इतर तुकड्या खानाचे सैन्य जितके मा-याच्या टप्प्यात येई पर्यंत प्रतिक्षा करीत राहिले आणि लगेचच मोर्च्यांच्या जागांमधून मराठा सैनिकांनी मोगल सैन्यावर बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव केला. या अनपेक्षित कारवाईमुळे मोगल सैन्याचे जवळजवळ पंधराशे सैनिक मारले गेले आणि खुद्द रुस्तमखान जखमी होऊन हत्तीवरुन खाली पडला खानाचा प्रतिकार करणा-या बनाजी मोरे यांच्या

तुकडीने खानास आणि त्याच्या मागून येणाऱ्या खानाच्या जनानखान्यासही आपल्या ताब्यात घेतले. बाकीची मोगल सेना निर्नायकी झाल्याने त्यांनी कोरेगांवकडे माघार घेतली. इकडे रुस्तमखान आणि त्याचे कुटुंबिय यांची साताऱ्यास रवानगी करण्यात आली आणि त्यांना अजिंक्यतारा किल्ल्यावर बंदिस्त करण्यात आले. या लढाईनंतरच्या लुटालुटीत मोगलांचे ८ हत्ती ४००० घोडे आणि सर्व सामुग्री मराठ्यांच्या हातात पडली.

रुस्तमखानाच्या पराभवाची वार्ता ऐकून औरंगजेबाने साताऱ्यावर पुन्हा हल्ला करण्याचे ठरविले. यावेळेस गाझीउद्दीन फिरोज जंग याच्या दिमतीस अब्दुलकादीर हा दुसरा एक सरदार देऊन मोगल सैन्याची एक तुकडी सातारा हस्तगत करण्यासाठी रवाना झाली. फिरोजजंगाची तुकडी रुस्तमखान आला त्याच मार्गाने साताऱ्याकडे आगेकूच करीत होती. त्याच्या आघाडीवर अब्दुरकादीर याचा गट होता. यावेळी रुपाजी भोसले याने अब्दुल कादीरचा मार्ग अडवावा असा हुकूम झाल्यामुळे रुपाजीच्या तुकड्या अब्दुलकादीरचा मार्ग अडविण्यास सज्ज झाल्या. रुपाजीने पुन्हा वाठार टेकड्यांच्या उत्तरेस कादीरच्या सैन्यावर प्रखर हल्ला करुन त्याला जखमी केले आणि त्याच्या सैन्याची लुटालूट केली. या घटनेमुळे फिरोजजंगाला आपल्या हालचाली बंद कराव्या लागल्या. या दुसऱ्या पराभवाची वार्ता मोगल छावणीत येऊन पसरताच फिरोजजंगास परत बोलावून साताऱ्याच्या स्वारीची कामगिरी लुत्फुल्लाखान याजवर टाकण्यात आली बादशहाच्या हुकमाप्रमाणे लुत्फुल्लाखानाबरोबर २०००० ची ताज्या दमाची तुकडी देण्यात आली. रुस्तमखान आणि फिरोजजंग यांनी घेतलेला मार्ग अडचणीचा असल्याचे आढळून आल्याने लुत्फुल्लाखानाने त्या मार्गाने आगेकूच न करता केडगांव-बारामती-धर्मपुरी आणि दहीवडी या

मार्गाने जाऊन साताऱ्याच्या पूर्वेस १२ कि. मिटर असलेल्या खटाव या गावी मुख्य छावणी ठेवावी तेथून फिरते राहून साताऱ्यावर हल्ले करावे अशी औरंगजेबाची योजना होती. या योजनेप्रमाणे लुत्फुल्लाखानाची फौज १६९० च्या जून महिन्याच्या अखेरीस खटाव मुक्कामी दाखल झाली. खानाची स्वारी येत आहे ही खबर माहित असूनही मराठ्यांनी त्याची मार्गात कुठेही अडवणूक केली नाही. त्यामुळे खानाच्या मनात एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला. जुलैच्या प्रारंभी या परिसरात जोरदार पावसास सुरुवात झाली. १४ जुलै १६९० रोजी संततधार पाऊस पडत असतांना संताजी घोरपडे यांनी १०००० स्वारांची एक तुकडी बरोबर घेऊन लुत्फुल्लाखानाच्या छावणीवर अचानक छापा घातला. सतत तीन तास घनघोर रणसंग्राम होऊन दोन्ही बाजूला जबर मनुष्यहानी पत्करावी लागली. शत्रूचे पुरेपूर नुकसान झाले आहे याची खात्री पटताच लढाई बंद करून मराठा तुकड्या चारी दिशांना पसार झाल्या. या संग्रामानंतर खटाव हे ठिकाण बचावाच्या दृष्टीने धोक्याचे आहे हे ध्यानात घेऊन लुत्फुल्लाखानाने खटावच्या पूर्वेस ४० कि.मीटरवर असलेल्या माण नदीच्या काठावरील म्हसवड येथे आपली छावणी हलविली. मराठ्यांनी खानाला नव्या छावणीत स्थिरस्थावर होऊ दिले आणि जुलै महिन्याच्या अखेरीस संताजी, धनाजी, डफळे आणि मोरे यांच्या २०००० च्या संयुक्त सेना विभागाने मोगल छावणीवर पुन्हा हल्ला चढविला या वेळेस मराठी सेना मोठ्या तयारीनिशी आल्याने घनघोर युध्द झाले आणि लुत्फुल्लाखानास फार जबर मनुष्यहानी सोसावी लागली. या तिसऱ्या पराभवामुळे खानाने माघार घेऊन त्याची सेना मुख्य मोगल छावणीकडे परत फिरली.

यानंतर म्हणजे जवळजवळ पुढील नऊ वर्षे सातारा हस्तगत करण्याचे

औरंगजेबाचे स्वप्न हवेतच राहिले. याचे मुख्य कारण म्हणजे कोल्हापूर जवळील पन्हाळगडावर आणि दक्षिणभारतात जिंजीच्या वेढयात मोगल सेनेची अधिकांश शक्ती गुंतून पडली होती. त्यामुळे बादशहाने सातारा घेण्याचा आपला मनसुबा बाजूस ठेवून आपले सर्व लक्ष पन्हाळा आणि जिंजी घेण्याकडे वळविले होते. यापुढे १६९९च्या डिसेंबर मध्ये सातारा घेण्याचा ठाम निश्चय करून त्या मोहिमीची सूत्रे बादशहाने स्वतःकडे घेण्याचे ठरविले. यावेळी बादशहाची मुख्य छावणी पंढरपूरच्या दक्षिणेस २६ कि.मी. अंतरावर असलेल्या भीमा नदीच्या डाव्या किनाऱ्यावर ब्रम्हपुरी येथे होती. स्वतः बादशहा सेनेबरोबर असल्यामुळे मुख्य सेनापती झुल्फिकार खान याच्या अधिपत्याखाली राजपूत्र मुअज्जम उर्फ आझमशहा, नातू बेदरबख्त व शिवाय रुहूल्लाखान, हमीदुद्दीन, रुस्तमखान, इखलासखान, आणि लुत्फुल्लाखान असा अनेक सरदारांच्या तुकडया होत्या. या खेरीज तर्बीयत खानांच्या नेतृत्वाखाली सुसज्ज असा तोफखाना स्वारी बरोबर होता. नोव्हेंबर १६९९ च्या शेवटच्या आठवडयात बादशहाच्या सैन्याने साताऱ्याच्या दिशेने आगेकूच सुरू केली आणि ८ डिसेंबर १६९९ रोजी साताऱ्याच्या उत्तरेस कृष्णा नदीच्या काठावरील करंजा या गावाजवळ शाही सैन्याची छावणी प्रस्थापित झाली. पुढील दोन तीन आठवडयात मोगली सेनेच्या अनेक तुकडयांनी अजिंक्यतारा किल्ल्याच्या चारही बाजूस दुय्यम छावण्या प्रस्थापित करून किल्ल्याची नाकेबंदी करण्यास सुरुवात केली. किल्ल्याच्या पश्चिमेस आझमशहाची तुकडी, उत्तरेस तरबीयतखानाचा तोफखाना आणि दक्षिणेस रुस्तमखानाची तुकडी अशी मोगल सेनेची उपस्थिती होती. प्रत्यक्ष अजिंक्यतारा किल्ल्यावर मराठी सैन्याची २।२ हजार केवळच शिबंदी होती. परंतु किल्लेदार सुभानजी लवघरे आणि त्याच्या हाताखालील हवालदार प्रयागजी प्रभू हे दोघेही शिवाजी महाराजांच्या वेळे

पासून किल्ल्याच्या बंदोबस्तास आल्यामुळे किल्ल्याच्या बचावाचे काम कोणत्या अुपायाने परिणामकारक होअील याची त्यांना पुरेपूर माहिती होती. किल्ल्याच्या बाहेर आणि मोगल छावण्यांच्या पलीकडे चारी बाजूने धनाजी जाधव, हणमंतराव निंबाळकर, राणोजी घोरपडे यांच्या हाताखालील मराठी सैन्याच्या तुकड्या होत्या.

डिसेंबर १६९९ च्या मध्यापासून ख्रि.स.१७०० च्या २१ अेप्रिल पर्यंत अजिंक्यता-याचा मोगली वेढा चालू राहिला. किल्ल्याबाहेर असलेल्या निरनिराळ्या मोगल छावण्यातून किल्ल्यावर मोगलांचे वारंवार हल्ले होत राहिले तरीसुध्दा किल्लेदार सुभानजी खघरे आणि हवालदार प्रयागजी प्रभू यांनी प्रत्येक वेळी किल्ल्यावरुन मोठमोठे दगड लोटून गोफणींचा मारा करुन आणि प्रसंगी बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव करुन मोगल सैन्याचे सर्व प्रयत्न हाणून पाडले प्रत्यक्ष किल्ल्यात ही परिस्थिती असताना मोगल छावण्यांच्या पलीकडे असणा-या मराठी सेनेच्या तुकड्या मोगल छावण्याची रसद तोडून टाकण्यात अहोरात्र गुंतलेल्या होत्या. किल्ल्याच्या आजूबाजूचा जवळजवळ ६० कि.मि. परिघाचा प्रदेश त्यांनी जाळून उध्वस्त केला. या दग्धभू (Scorch Earth) धोरणा खेरीज मोगल सेनेवर धडक हमले करुन त्यांची मनुष्यहानी करण्याचे प्रयत्न मराठ्यांनी चालूच ठेवले. २७ डिसेंबर १६९९ रोजी हणमंतराव निंबाळकराने साता-याच्या अुत्तरेस असलेल्या अिखलासखान याच्या छावणीवर हल्ला करुन त्याला आणि त्याच्या मुलास लढाअीत ठार केले. १० जानेवारी १७०० रोजी मराठी सेना आणि झुल्फिकारखानाची छावणी यांच्यात रहिमतपूरजवळ घनघोर लढाअी होअून खानाच्या सेनेची धुळधाण झाली. हे सर्व संग्राम चालू असतांना देखील साता-याच्या वायव्येस असलेल्या परळी येथील किल्ल्याचा प्रमुख परशुराम त्रिंबक

याने छुप्या मार्गाने परळीहून अजिंक्यता-यास अन्नधान्य आणि दाणागोटा पाठविण्याचा अखंड क्रम चालू ठेवला होता. अशा रितीने डिसेंबर १६९९ पासून अेप्रिल १७०० पर्यंत तब्बल ४।४।। महिने खुद्द बादशहाच्या नेतृत्वाखाली तोफखान्याने सज्ज असलेली ५० हजार मोगल सेना किल्ल्याचा पाडाव करू शकली नाही. अखेरीस किल्ला हस्तगत करण्यासाठी कोणतेही अुपाय योजावेत आणि किल्ल्यावर निकराचा हल्ला करावा असा बादशाही हुकूम सर्व सरदारांना देण्यात आला. या निकराच्या प्रयत्नाचा अेक भाग म्हणून तर्बीयत खानाने किल्ल्याच्या अैशान्येस असलेला मंगलाअीचा बुरुज अुडवून देण्याचे ठरविले त्यासाठी त्याने बुरुजाखाली दोन मोठे सुरुंग तयार केले. १५।२० अेप्रिलला यापैकी पहिला सुरुंग अुडविण्यात आला त्यामुळे प्रचंड आवाज होअून बुरुजाचा अेक भाग कोसळला आणि तो किल्ल्याच्या आत पडला आणि किल्ल्याची तटबंदी निखळून गेली. याचा परिणाम किल्ल्यातील शिबंदीवर होअून अनेक सैनिक मृत्युमुखी पडले आणि अनेक घायाळ झाले. पहिल्या सुरुंगाने आपले काम व्यवस्थित केले असे पाहिल्यावर दुसरा सुरुंग लावण्यास संपूर्ण बुरुज कोसळेल अशी तर्बीयतखानाची अपेक्षा होती म्हणून त्याने दुसरा सुरुंग अुडविला आणि मोगल सेनेस किल्ल्यात घुसण्याची आज्ञा केली. मोगलांच्या दुर्दैवाने या दुस-या सुरुंगामुळे प्रत्यक्ष बुरुज न कोसळता त्याच्या डाव्या बाजूस असलेला डोंगराचा अेक कडा कोसळला आणि किल्ल्यात घुसण्याचा प्रयत्न करणारे जवळजवळ दोन हजार मोगल सैनिक त्या कड्याखाली गाडले गेले. याच सुमारास छत्रपती राजाराम निधन पावल्याची वार्ता सातारच्या किल्ल्यावर येअून धडकली या अनिष्ट वार्तेमुळे किल्लेदाराचे आणि किल्ल्यातील शिबंदीचे मनोधैर्य खचले. चारपांच महिन्याच्या वेढ्यामुळे आणि सतत होणा-या मनुष्यहानीमुळे किल्लेदार सुभानना

खवधरे आणि सबनीस प्रयागजी अनंत हे बेरीस आले होते त्यामुळे आणि वैयक्तिक हेव्यादाव्यामुळे १७०० च्या मे महिन्यात अजिंक्यतारा मोगलांच्या स्वाधीन करावा लागला. बादशहाने या विजयाप्रित्यर्थ अजिंक्यतारा हे नाव बदलून त्याला आपल्या राजपुत्राच्या नावे आझमतारा हे नाव दिले. नंतर थोड्याच दिवसांनी मोगल सेनेने परळीच्या किल्ल्याचाही कबजा केला.

पन्हाळ्याचा वेढा

(Seige of Panhala)

कोल्हापूरच्या वायव्येस २५ कि.मी. अंतरावर पन्हाळगड हा ऐतिहासिक किल्ला आहे. हा किल्ला मराठा सत्तेच्या पूर्वी २५० ते ४०० वर्षे आधी बांधला गेला आहे. सभोवतालच्या सपाट प्रदेशामुळे हल्ला करणाऱ्याच्या दृष्टीने किल्ला अत्यंत अडचणीचा आहे आणि आज तागायत किल्ल्याची तटबंदी मजबूत असून प्रत्यक्ष किल्ल्यावर असलेल्या विस्तृत मोकळ्या जागेमध्ये लोकवस्तीही आहे. पन्हाळ्याला लागूनच दक्षिणेकडे दुसरा छोटा किल्ला असून तो पावनगड या नावाने ओळखला जातो. छत्रपती राजारामाने रायगडच्या वेढ्यातून बाहेर पडून जिंजीकडे प्रयाण केले. त्यानंतर थोड्याच दिवसांनी मोगल सेनेने पन्हाळा आणि पावनगड या दोन्ही किल्ल्यांवर हल्ला करून ते हस्तगत केले. १६९१।९२ ही दोन वर्षे किल्लेदार परशुराम त्रिंबक याने फौजेची जमवाजमव करून किल्ल्यावर चहूबाजूंनी हल्ला करण्याचे सत्र चालू ठेवले आणि १६९२ च्या मे-जून महिन्यात पन्हाळगड आणि पावनगड हे दोन्ही किल्ले पुन्हा मराठ्यांच्या ताब्यात आणले. ही वार्ता औरंगजेब बादशहास समजताच त्याने आपला नातू मुईजुद्दीन याच्या नेतृत्वाखाली एक सेना विभाग देऊन त्याला पन्हाळगडला वेढा घालण्यासाठी पाठवून दिले. ऑक्टोबर १६९२ मध्ये पन्हाळगडला पुन्हा मोगलांचा वेढा पडला. कोणत्याही

परिस्थितीत पन्हाळा आणि पावनगड हे किल्ले मोगलांच्या हाती लागू द्यावयाचे नाहीत असा मराठयांचा ठाम निर्धार असल्यामुळे मोगलसेनेचा वेढा उठवून टाकण्यासाठी मराठा सरदारांनी अेक तिहेरी योजना केली. या योजनेप्रमाणे किल्ल्याच्या आतील शिबंदीने परशुराम त्रिंबक याच्या नेतृत्वाखाली किल्ल्याचा प्राणपणाने बचाव करावा व त्यासाठी शक्यते सर्व बचावात्मक अुपाय योजावे असे ठरले. वेढा घालणाऱ्या मोगल सेनेला त्रस्त करण्यासाठी त्यांच्यावर वारंवार चोफेर हल्ले करून त्यांना मनुष्यहानी पोहचविणे आणि त्यांची रसद तोडणे ही कामगिरी धनाजी जाधवाच्या सेना विभागाकडे देण्यात आली आणि याचबरोबर धनाजीच्या लढाऊ कारवायांना अडथळा येऊ नये म्हणून कोल्हापूरच्या अुत्तरेस पूर्वेस आणि दक्षिणेस असलेल्या सातारा, सोलापूर, विजापूर आणि बेळगांव या प्रदेशामध्ये सतत फिरते राहून पन्हाळगडाकडे जाणाऱ्या मोगल सैन्यास अटकाव करावा आणि रसद तोडावी हे काम संताजी घोरपडे यांना देण्यात आले. या व्यवस्थेप्रमाणे १६९२।९३ या दोन वर्षात परशुराम त्रिंबक धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे या त्रिवर्गांनी अेकजूट करून पन्हाळा घेण्याचे मोगलांचे सर्व प्रयत्न सपशेल अुधळून लावले. १६९२ च्या नोव्हेंबर महिन्यात मोगल सेनापती हिंम्मतखान हा पन्हाळगडच्या वाटेवर असताना कोल्हापूर - बेळगांव या परिसरात माणगांव मुक्कामी मोगल आणि मराठे यांच्यात पहिली चकमक झाली. त्याच्या दुसऱ्याच दिवशी विक्रमहल्ली या गावाजवळ दोन्ही पक्षात निकराची लढाओ होअून मोगली सेनेच्या वाढत्या सामर्थ्यामुळे संताजीला माघार घ्यावी लागली. या नंतरच्या अेकदोन आठवडयात अमृतराव निंबाळकर याची अेक ताज्या दमाची तुकडी संताजीला येअून मिळाली मोगलसैन्यालाही याच वेळी कुमक मिळाल्यामुळे त्याच क्षेत्रात त्यांच्याशी टक्कर देणे योग्य होणार नाही असा विचार करून मोगल सेना पांगली जावी या अुद्देशाने संताजीने आपल्या सेनेचा अेक गट अमृतराव निंबाळकराच्या हाताखाली

क-हाडच्या दिशेने रवाना केला आणि स्वतः आपल्या सेनागटाची दिशा बदलून हिंमतखानाला झुकांडी देण्यासाठी बेळगांवच्या दक्षिणेकडे असलेल्या हैद्राबादच्या मुलखात कूच केले. संताजीची ही चाल ध्यानात घेऊन हिंम्मत खानाने आपलीही दिशा बदलली आणि तो संताजीच्या पाठलागावर निघाला १६९२ च्या २७ नोव्हेंबरला मोगल आणि मराठे यांच्यात मालखेड मुक्कामी पुन्हा अेक निकराची लढाई झाली आणि दोन्ही पक्षांना जबर नुकसान सोसावे लागले.

अिकडे पन्हाळ्यावर १६९४ च्या अखेरपर्यंत वेढा चालू ठेवूनही गड हाती येत नाही असे पाहून मुअिजुद्दीनखानाने पन्हाळ्याचा वेढा अुठविला आणि तो मुख्य मोगल छावणीकडे परत गेला. १६९५ च्या सुरुवातीस पन्हाळ्याचा वेढा पुन्हा चालू ठेवण्यासाठी राजपूत बेदरबख्त याला अेक तुकडी देऊन पुन्हा पन्हाळ्याकडे रवाना करण्यात आले. १६९६ च्या जानेवारीच्या अखेरीस बेदरबख्तालाही किल्ला हस्तगत न करता आल्यामुळे बादशहाने गाझीअुद्दीन फिरोजजंग या नावाजलेल्या मोगल सेनापतीला बेदरबख्ताच्या मदतीसाठी पाठविले. फिरोजजंग आणि बेदरबख्त यांच्या संयुक्त सेनेने १६९६।९७ मध्ये पन्हाळा घेण्याचे शर्थीचे प्रयत्न केले परंतु त्यात त्यांना यश येऊ शकले नाही त्यामुळे १६९७ च्या अखेरीस वेढा अुठवून मोगल सेनेचे विभाग आपल्या मुख्य छावणीकडे परत फिरले अशा रितीने पन्हाळा आणि पावनगड हे शेवटपर्यंत अजिंक्यच राहिले.

मराठ्यांच्या कार्यवाहीचे लष्करी विश्लेषण

(Analysis of Maratha Military Operations)

चालू प्रकरणात १६८९ ते १७०० या अकरा वर्षांच्या अवधीत पश्चिम

महाराष्ट्रात मराठयांनी मोगलांच्या विरुध्द जो सतत संघर्ष चालू ठेवला त्याचा तपशिलवार आढावा घेण्यात आला आहे. या तपशिलावरुन हे सिध्द होओील की या अवधीत मोगलांनी ताब्यात घेतलेले प्रतापगड, रोहिडा, रांगणा अि. महत्वाचे किल्ले मराठयांनी पुन्हा हस्तगत केले अितकेच नव्हे तर साता-याचा किल्ला १६९० पासून १७०० पर्यंत म्हणजे तब्बल १० वर्षे झुंजत ठेवला. रुस्तमखान, लुत्फुल्लाखान आणि खुद्द औरंगजेब बादशहा आणि त्याचे अितर मातब्बर सरदार यांना त्यांच्याबरोबर वेळोवेळी आलेल्या अेकंदर ६०।७० हजार सैन्याला अितक्या प्रदीर्घ काळ पर्यंत गुंतवून ठेवून मोगल सैन्याचे खच्चीकरण करण्याचे धोरण यशस्वीपणे अमलात आणले त्याचप्रमाणे १६९० पासून १६९७ पर्यंत सतत सात वर्षे मुअीजुद्दीन आणि बेदरबख्त या दोन राजपुत्रांनी त्यांच्या सैन्याला टेकीस आणून त्यांना मदत करणारे हिंम्मतखान आणि अिखलासखान यांच्या सैन्यासही मराठयांनी जबर तडाखा दिला आणि परीणामी पन्हाळ्याच्या वेढयामध्ये ४०।५० हजाराची मोगल सेना ६।७ वर्षे गुंतवून ठेवली. या घटना लक्षात घेता संभाजीच्या मृत्युनंतर ओढवलेल्या अत्यंत बिकट प्रसंगाला धैर्याने तोंड देअून मराठयांचे नेतृत्व या संघर्षातून अुजळून निघाले. पश्चिम महाराष्ट्रातील संघर्ष हा मराठयांच्या खच्चीकरणाच्या धोरणाचा अेक भाग होता. आणि त्याचे क्षेत्र पश्चिम महाराष्ट्रापुरते मर्यादित होते. परंतु या आघाडीवर ११ वर्षाच्या काळात हा संघर्ष चालू असतांना त्याच अवधीत दक्षिण भारतात जिंजीच्या आसपास आणि जिंजीपासून पश्चिम महाराष्ट्रापर्यंतच्या अफाट प्रदेशात मराठयांनी दुसरी आघाडी तेवत ठेवून खच्चीकरणाची मोहीम यशस्वी केली. युध्द व्यवहाराच्या दृष्टीने (Tactical View Point) ज्या पध्दतीने अजिंक्य-तारा आणि पन्हाळा हे दोन किल्ले मराठयांनी लढविले ते पाहिले असता युध्द व्यवहाराच्या बाबतीत मराठयांना अेक नवे तंत्रच शोधून काढले असे म्हणावे लागेल. पन्हाळा किंवा अजिंक्यतारा

यासारखे मजबूत किल्ले बचावाच्या दृष्टीने बचाव करणा-यांसाठी सोयीचे असतात आणि बाहेरून हल्ला करणा-याला ते फारच जड जातात ही जरी वस्तुस्थिती असली तरी अशा किल्ल्यांना वेढा पडला आहे. ही परिस्थितीच बचाव करणा-यांच्या दृष्टीने मनोधैर्य खचवणारी ठरते. आपण अलग पडलो आहोत (Isolated) ही भावनाच बचाव करणा-यांची शक्ती कमी करण्यास कारणीभूत होते. तसे पाहिल्यास अजिंक्यतारा आणि पन्हाळा या दोन्ही किल्ल्यांचे किल्लेदार किल्ले कोणत्याही परिस्थितीत मोगलांच्या हाती पडू द्यावयाचे नाहीत या बद्दल जागृत आणि निश्चयी होते. तरीसुध्दा धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे या दोन खंबीर सेनापतींनी किल्ल्या बाहेर असलेल्या मोगल सेनेवर वारंवार हल्ले करणे आणि किल्ल्याच्या परिसरातील ८० ते १०० कि.मी. टापूत फिरते राहून लष्करी सामुग्री आणि मदत येणा-या वाटा बंद करणे हेही तितकेच महत्वाचे होते. या नव्या तंत्रामुळेच दोन्ही किल्ले ८।१० वर्षे मराठ्यांना मोगलांविरुध्द लढविता आले. युध्दव्यवहाराच्या दृष्टीने आणखी अेका प्रमुख गोष्टीचा अुल्लेख करावा लागेल आणि तो म्हणजे रुस्तमखानाच्या सेनेविरुध्द मराठ्यांनी केलेल्या वाढारच्या टेकड्यांजवळील लढाई ही होय. स्वतः रुस्तुमखान आणि त्याच्या बरोबरचे दुय्यम सेनापती हत्तीवर बसून मराठी सेनेवर चाल करून येत असताना मराठ्यांनी आपल्या मा-यांचे लक्ष हत्तीवर केंद्रीत केले आणि बंदुकीचा मारा हत्तींना सहन न झाल्यामुळे ते अुधळून मोगल सैन्याचीच तुडवातुडव करू लागले ही गतकाळातील अेक अैतिहासिक लढाईची पुर्नावृत्ती होय असे म्हणावे लागेल. ख्रिस्त शताब्दी पूर्वी २०२ वर्षे आफ्रिकेमध्ये झामा येथे झालेल्या लढाईत रोमन सेनापती स्किपीओ याने हॅनीबालच्या हस्तीदलाला असेच अुधळून हनीबालच्या सैन्याचे अपरिमीत नुकसान केले होते. झामाच्या लढाईतील हॅनीबालच्या पराभवाचे तेच मुख्य कारण ठरले. या ११

वर्षांच्या मोगल विरोधी संघर्षात युध्दनिती आणि युध्दव्यवहार या दोन्ही बाबतीत मराठ्यांचे युध्दशास्त्र हे अधिक प्रगत झालेले आढळून येते आणि म्हणूनच मराठ्यांच्या युध्दशास्त्राने या काळात आणखी अेक महत्त्वाचा टप्पा गाठला याची प्रचिती येते.

प्रकरण बारावे

संदर्भसूची

१ श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांचे चरित्र - मल्हार रामराव चिटणीस - विरचित संपादक र.वि.हेरवाडकर

२ मराठ्यांचे स्वातंत्र्य समर - पूर्वार्ध - १६८१-१७०७, स.श्री.पुराणीक

३ मोगल आणि मराठे (तारीखे दिल्कुशा) संपादक - सेतु माधवराव पगडी

४ मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध (मोगलकालीन साधन ग्रंथ) संपादक - सेतु माधवराव पगडी

५ मासिरी आलमगिरी - यदुनाथ सरकार

६ English Records on Shivaji
शिवचरित्र कार्यालय

७ मराठे व औरंगजेब - मासिरी आलमगिरी या फारसी ग्रंथाचा मराठी अनुवाद - संपादक सेतु माधवराव पगडी

८ रामचंद्र निळकंठ अमात्यकृत - आज्ञापत्र अथवा मराठेशाहीतील राजनिती - संपादक वामन गोपाळ गुध्वरेषे

प्रकरण तेरावे

राजाराम कालीन मोहिमा - दक्षिण भारत

१६८९-१७००

(Maratha Military Operations Under
Rajaram 1689 - 1700)

सामान्य लष्करी परिस्थिती
(General Military Situation)

दक्षिण भारतात म्हणजे विजापूर पासून दक्षिणेकडे तिनेवेल्लीपर्यंत मराठ्यांच्या लष्करी कारवाया १६७७/७८ पासून सुरु झाल्या. या दोन वर्षांत छत्रपती शिवाजी महाराजांनी विजापूरच्या सुलतानशाही खाली असलेला हा सर्व प्रदेश जिंकून घेतला आणि रघुनाथ नारायण हणमंते यांची या प्रांताचा सुभेदार म्हणून नियुक्ती केली. सुभेदाराचे मुख्य ठाणे म्हणून मद्रासच्या नैऋत्येस असलेल्या जिंजी या अभेद्य किल्ल्याची निवड करण्यात आणि त्याचप्रमाणे त्याच्या हाताखाली दोन नायब सुभेदार नेमण्यात आले. या व्यवस्थेप्रमाणे पाँडेचरीच्या उत्तरेस २६ कि.मी. असलेल्या कुनीमेडू येथे नायब सुभेदार आणि पाँडेचरीच्या दक्षिणेस असलेल्या पोर्टोनोव्हो येथे दुसऱ्या नायब सुभेदाराने रहावे असे हुकूम देण्यात आले. १६८१ मध्ये संभाजी महाराजांनी रघुनाथ पंत हणमंते यांना अधिकारावरून दूर करून त्यांच्या जागी आपले मेव्हणे हरजीराजे महाडीक यांची नियुक्ती केली. त्याचप्रमाणे शामजी नाईक पुंडे यास महाडीकांचे नायब सुभेदार म्हणून नियुक्त करण्यात आले. १६८१ ते १६८६ या पांच वर्षांच्या काळात महाडीकांनी आपले आसन मजबूत करून आपला अंमल खूपच वाढविला आणि त्यामुळे ते रायगडावरून येणाऱ्या हुकूमाकडे दुर्लक्ष करू लागले ही परिस्थिती ध्यानात येताच ऑक्टोबर १६८६ मध्ये संभाजीराजांनी केशव त्रिंबक पिंगळे यांच्या हाता-

खाली १२००० स्वार देऊन त्यांचा दक्षिणेकडे रवानगी केली. मराठ्यांची तेथील ठाणी जास्त मजबूत करणे हा पिंगळे यांच्या स्वारीचा वरकरणी अुद्देश असला तरी आतून त्यांना असे सांगण्यात आले की त्यांनी म्हाडीकांना अधिकारावरून काढून टाकून मराठ्यांचे सुभेदार म्हणून स्वतः जिंजीमध्ये अधिकार ग्रहण करावे. या हुकमाप्रमाणे आपल्या तुकड्या घेऊन केशव त्रिंबक १६८१ च्या फेब्रुवारीत जिंजीमध्ये दाखल झाले. मध्यंतरी औरंगजेबाने पाठविलेला सरदार कासीमखान याने म्हैसूरवर स्वारी केली त्यामुळे त्याला हाकून लावण्यासाठी केशव त्रिंबक म्हैसूरच्या स्वारीवर निघाला. कासीम खानाचा पराभव करून केशव त्रिंबक जिंजीला पोहचल्यावर म्हाडीक आणि केशव त्रिंबक यांच्यात अुघड वैमनस्य निर्माण झाले. पिंगळ्यांची वाढती सत्ता लक्षात घेऊन म्हाडीकांनी जिंजीचा किल्ला सोडला आणि कडलोर नजीकच्या तेवेनापट्टम येथील किल्ल्याचा आश्रय घेतला.

१६८८।८९ या वर्षात केशव त्रिंबक पिंगळे याने गोपाळ पंडित आणि विठ्ठल प्रल्हाद यांच्या हाताखाली २००० घोडदळ आणि ५००० पायदळ अशा तुकड्या देऊन त्यांना मद्रासच्या दक्षिणेकडे असलेला सर्व मुलूख ताब्यात घेण्यासाठी रवाना केले. २४ डिसेंबर १६८८ ला अर्काटवर कब्जा करून ११ जानेवारीस मराठी सेना कांजीवरम मध्ये घुसली तेथून पुढे चिटणाक, कावेरीपाक ही ठाणी घेऊन ८ मार्च १६८९ ला वांदीवॉश येथे महंमदसादिक, रुस्तमखान आणि याचप्पा नाअीक यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या मोगल सैन्याच्या तुकड्यांविरुद्ध अेक जोरदार लढाअी सुरू केली. संबंध दिवसभराच्या लढाअीत दोन्ही पक्षाची जबर हानी झाली आणि मराठी सेना जिंजीकडे परतल्या. केशव त्रिंबकच्या तुकड्या दक्षिणेकडे गुंतलेल्या आहेत असे पाहून फेब्रुवारी १६८९ मध्ये हरजीराजे म्हाडीक यांनी जिंजीच्या किल्ल्याचा पुन्हा ताबा घेतला. थोड्याच दिवसात संभाजी राजांना औरंगजेबाने पकडले असून त्यांचा वध केला आहे. ही वार्ता जिंजीस येऊन थडकली.

मराठी राज्यात झालेल्या या दुर्घटनेमुळे औरंगजेबाचे लक्ष आता दक्षिण भारताकडे वळेल आणि त्यामुळे जिंजीच्या किल्ल्याला आणि पर्यायाने मद्रासच्या आसपास असलेल्या मराठ्यांच्या अमलाखाली असलेल्या प्रदेशाला नवा धोका निर्माण होईल याची महाडिक यांना स्पष्ट जाणीव झाली. या बदललेल्या परिस्थितीमुळे हरजीराजे महाडीक यांनी केशव त्रिंबकशी मिळते घेतले आणि ते दोघेही जिंजीच्या किल्ल्याचे संरक्षणाच्या दृष्टीने पुर्नबांधणी करु लागले. १९ सप्टेंबर १६८९ रोजी महाडिकांचे निधन झाले आणि साहजिकच जिंजीच्या रक्षणाची सर्व जबाबदारी केशव त्रिंबककडे आली. थोड्याच दिवसात म्हणजे १ नोव्हेंबर १६८९ ला छत्रपती राजाराम स्वतः जिंजीस येऊन दाखल झाले. महाडीक यांची पत्नी अंबिकाबाई ही राजारामाची मोठी बहिण असल्यामुळे शासकीय आणि राजकीय असे दोन्ही अधिकार कोणताही संघर्ष न होता राजारामाकडे आले.

जिंजीचा वेढा
(The Siege of Jinjee)

आक्टोबर १६८९ च्या मध्यास झुल्फिकार खानाने रायगड जिंकून घेतल्यावर राजाराम जिंजीच्या वाटेवर असून तो १ नोव्हेंबर १६८९ ला जिंजीत दाखल झाल्याची वार्ता औरंगजेबाला कळली. शिवाजी महाराजांचा कायदेशीर वारस या नात्याने संभाजीच्या वधानंतर छत्रपती राजाराम हाच मराठ्यांच्या सत्तेचे प्रमुख स्थान आहे याची औरंगजेबाला जाणीव होती. त्यामुळे साहजिकच पश्चिम महाराष्ट्रामधून त्याचे लक्ष जिंजीकडे वळले. राजारामाचा प्रतिकार करुन त्याला ताब्यात घेतल्याशिवाय मोगलसाम्राज्याच्या मार्गातील मराठे हा

मोठा अडसर दूर होणार नाही ही गोष्ट स्पष्टच होती. अशा परिस्थितीत रायगडच्या परिसरातून निघून झुल्फिकारखानाने तातडीने जिंजीकडे प्रयाण करावे आणि जिंजीच्या किल्ल्यास वेढा घालावा असा हुकूम बादशहाने दिला या हुकमा प्रमाणे २०-११-१६८९ रोजी झुल्फिकारखान आपली सेना घेऊन रायचूर-कुर्नूल - नंदीहाळ आणि कडप्पा या मार्गाने १६९० च्या जून महिन्यात जिंजीपुढे येऊन दाखल झाला. पुढील २।२ महिन्यात सेनेची पुर्नबांधणी करून १९-८-१६९० रोजी मोगल सेनेने जिंजीचा वेढा सुरू केला.

जिंजीचा किल्ला हा पूर्व किनाऱ्यावरील सपाट मैदानी प्रदेशात अेक अभेद्य दुर्ग म्हणून समजला जातो. किल्ल्याच्या पूर्वेस असलेल्या किनारपट्टी पासून तो दक्षिणेकडे त्रिचनापल्लीपर्यंत पसरलेल्या विस्तीर्ण अशा मैदानी प्रदेशात संपूर्ण खडकावर उभा असलेला हा किल्ला म्हणजे या प्रदेशातील अेक अुत्तुंग स्थान मानण्यात येते. प्रत्यक्षात हा अेक किल्ला नसून त्रिकोणाकृती अशा तीन खडकाळ टेकड्यांवर वसलेले हे तीन किल्ले आहेत. परंतु या तिन्ही टेकड्या मजबूत अशा दगडी तटबंदीने जोडलेल्या असल्यामुळे तो अेकच किल्ला असावा अशी त्याची रचना आहे. या तिन्ही टेकड्यांचा मिळून अेकंदर परिघ ६ ते ७ कि.मी. अंतराचा आहे. किल्ल्या भोवती अेकावर अेक उभ्या अशा तटबंदीच्या भिंती असून ठिकठिकाणी बुरूज, तोफा ठेवण्याच्या जागा आणि बंदुकीच्या फैरी झाडण्यासाठी झरोके ठेवण्यात आले आहेत. किल्ल्याच्या भोवती आतील तटबंदी ५ मीटर जाडीची असून तिच्या खाली १ मीटर रुंद असा खंदक आहे. या तटबंदीने बंदिस्त असलेला भाग हा खालचा किल्ला असून त्याच्या मध्ये असलेल्या टेकड्यांवर तीन बाले किल्ले आहेत. खालच्या किल्ल्यातून बालेकिल्ल्यात जाण्याकरिता खडकामध्ये कोरलेल्या पायऱ्यांचे जिने आहेत.

किल्ल्याच्या आत पश्चिमेस असलेली सर्वात मोठी टेकडी ही राजगिरी या नावाने परिचित असून ती जवळपासच्या प्रदेशापेक्षा २७० मीटर अुंच आहे. आणि किल्ल्याच्या खालील भागापासून १३५ मीटरच्या तुटलेल्या कड्यांवर अुभी आहे. राजगिरीवर जाणारा अेकच मार्ग असून तो अत्यंत अरुंद अशा खडकावरील जिन्याने टेकडीच्या टोकापर्यंत पोहचतो. त्याच्या सभोवताली ८ मीटर रुंद आणि १८ मीटर खोल असा अेक जिवंत पाण्याचा झरा वाहतो. त्यामुळे राजगिरी हा किल्ल्याचा भाग १० सैनिकांनी ताब्यात ठेवला तर १०००० सैनिकांविरुद्ध ते टेकडीचा बचाव करू शकतील असे ऑर्मे या अितिहासकाराने म्हटले आहे. (अर्काट जिल्हा - गॅझेटीयर - पान नं. २४७।२४८). किल्ल्याच्या आत अुत्तरेकडे असलेल्या टेकडीला कृष्णगिरी हे नाव असून दक्षिणेकडील टेकडीस चंद्रायण दुर्ग असे म्हणतात. किल्ल्यात प्रवेश करण्यास फक्त तीन दरवाजे असून अुत्तरेकडील दरवाज्यास वेल्लोर गेट किंवा अर्काट गेट असे म्हणतात. पूर्वेस पाँडेचेरी गेट हा दरवाजा असून किल्ल्यात जाण्याचे हेच मुख्य प्रवेशव्दार म्हणून वापरात होते. पाँडेचेरी गेटच्या दक्षिणेस अेक छोटेसे प्रवेशव्दार असून त्याला सैतान दरी असे स्थानिक लोक म्हणतात.

राजाराम महाराज जिंजीस आले त्यावेळी त्यांचे मुख्यमंत्री म्हणून प्रल्हाद निराजी हे सोबत होते. जिंजीमध्ये दाखल झाल्यावर राजारामाने आपण छत्रपती म्हणून मराठी राज्याची सुत्रे हाती घेतली आहेत अशी घोषणा केली आणि दक्षिण भारतातील मराठी अमलाखाली असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना आणि अितर सर्व हिंदूनायक सरदारांना पत्रे पाठवून त्यांनी आपल्या दरबारात हजर रहावे अशी आज्ञा पाठविली. प्रल्हाद निराजी याला पंतप्रतिनिधी हे नवीनपद देवून निळो मोरेश्वर पिंगळे याचा पेशवा म्हणून नियुक्ती केली. त्याच प्रमाणे केशव त्रिंबक पिंगळे याचा [illegible] निमाजी यास जिंजी जिल्ह्याचा सुभेदार

म्हणून नेमून सुंदरबाळाजी यास कुनामेडूचा नायबसुभेदार म्हणून कारभार सांगितला.

झुल्फिकारखानाने १६९० च्या सप्टेंबर मध्ये जिंजीच्या किल्ल्यास चोहोकडून वेढा घातला. या वेळी मोगली सेनेचे संख्याबळ १० ते १५ हजाराच्या आसपास असून त्यांच्याकडे युद्ध सामुग्रीही भरपूर होती त्यामुळे किल्ला थोड्याच दिवसात मोगलांच्या हाती पडेल अशी खानाची कल्पना होती. परंतु नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीसच नेमाजी शिंदे, माणकोजी पांढरे आणि नागोजी माने हे तीन मराठा सरदार मोगलांची बाजू सोडून २००० स्वारांची तुकडी घेऊन राजारामाच्या सेवेसाठी जिंजीस येऊन दाखल झाले. या ताज्या दमाच्या मराठा तुकड्यांनी किल्ल्याच्या बाहेर सतत फिरते राहून मोगल सेनेवर वारंवार छापे घालावे आणि त्यांची रसद तोडणे या दोन मार्गांनी मोगला सेनेस बेजार करून सोडले. त्यामुळे हैराण झालेल्या झुल्फिकार खानाने बादशहाकडे मदतीची याचना केली. झुल्फिकार खानाचीमदतीची मागणी औरंगजेबाला मिळताच त्याने झुल्फिकारचा पिता आणि मुख्यवजीर आसदखान यास आणि राजपुत्र कामबक्ष यालाही तातडीने झुल्फिकार खानाच्या मदतीस जाण्याबद्दल फर्माविले. हे दोघेही या वेळी दक्षिणेत कडप्पाच्या परिसरात होते. बादशहाचा हुकूम मिळूनही डिसेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत दोघांनीही कोणतीही हालचाल केली नाही. इकडे जिंजीच्या किल्ल्यावर केलेले कोणतेही हल्ले यशस्वी न झाल्यामुळे आणि बादशहाकडून कोणतीही मदत येण्याची चिन्हे न दिसल्यामुळे झुल्फिकारखानाने जिंजीचा वेढा तसाच रेंगाळत ठेवला. १६९१ चे सर्व वर्ष खानाने आजूबाजूच्या प्रदेशात छोट्या स्वाऱ्या करून ठाणी नष्ट करण्याचा उपक्रम चालू ठेवला. १६९१ च्या डिसेंबर मध्ये आसदखान आणि कामबक्ष यांच्या सेनेचे गट झुल्फिकार खानाच्या सेनेस येऊन मिळाले ही कुमक मिळाल्यावर जिंजीचा वेढा आवळण्यास झुल्फिकारखानाने सुरुवात केली. मोगलांना प्रथम लाभले ते पूर्वेकडील पौंडेचेरी गेट आणि

किल्ल्याच्या खालील कृष्णगिरी या टेकडीवर केंद्रीत करून या दोन्ही स्थानकांवर तोफांचा भडीमार केला. अै रात्री तोफांची बंबारी बंद असताना चंद्रायन दुर्गातून निघालेल्या ५००० च्या मराठा तुकडीने सैतान दरीतून बाहेर पडून झुल्फिकारखान आणि कामबक्ष या दोघा प्रमुखांच्या छावण्यांवर निकराचा हल्ला चढविला. मोगल सैन्याचे भारी नुकसान करून दिवस उजाडण्यापूर्वीच मराठी तुकडी किल्ल्यात परत गेली. वेढा चालू असताना देखील सैतान दरीचा दरवाजा आणि त्याच्या बाहेर असलेले जंगल यावर मराठ्यांनी संपूर्ण नियंत्रण ठेवलेले असल्यामुळे आतून बाहेर पडण्यास आणि बाहेरून रसद किल्ल्यात आणण्यास मराठ्यांना कोणताच अडचण पडत नसे. १६९२ च्या पावसाळ्यात सतत १४ महिने अनपेक्षित असा जोराचा पाऊस पडल्यामुळे जिंजीच्या किल्ल्याबाहेरील सपाट प्रदेशाला अेखाद्या मोठ्या तलावाचे स्वरूप आले आणि त्यामुळे वेढा घालून असलेल्या मोगल सेनेचे विलक्षण हाल झाले या परिस्थितीमुळे १६९२ च्या उत्तरार्धात जिंजीचा वेढा तसाच रेंगाळत राहिला. १६९२ च्या जानेवारीत मोगल सैन्याची स्थिती अधिकच क्षीण झाली. यावेळी रामचंद्रपंत अमात्याने पश्चिम महाराष्ट्रात उभी केलेली २०००० घोडेस्वारांची अेक तुकडी धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण भारतात येऊन दाखल झाली. येता येताच त्यांनी कांजीवरम जिल्ह्यात अनेक ठिकाणी छापे घातले आणि आपण आल्याची खबर मोगल सेनेस कळविली. त्यांचा प्रतिबंध करण्यासाठी म्हणून कांजीवरम येथील मोगल फौजदार अलिमर्दानखान हा त्यांची वाट अडविण्यासाठी पुढे सरसावला. मराठी सेना विभागाचे सामर्थ्य किती आहे याची कल्पना न आल्यामुळे अलिमर्दानच्या तुकडीत फक्त २००० स्वार आणि सहा हत्ती होते. मराठ्यांच्या अफाट शक्ती पुढे अर्धातच ही तुकडी [illegible] कमी पडली. मराठ्यांची ताकद लक्षात येताच माघार घेण्याचा त्याने अयशस्वी प्रयत्न केला पण त्यात तो स्वतः पकडला गेला

आणि त्याची सर्व सामुग्री हत्ती आणि १५०० घोडे मराठ्यांच्या हाती लागले. अलिमर्दानाला बंदोबस्त करून त्याची जिंजीच्या किल्ल्यावर रवानगी करण्यात आली. नंतर त्याने अेक लाख होन दंड भरून आपली सुटका करून घेतली. (होन हे सोन्याचे नाणे असून त्यावेळी त्याची किंमत ५।- रुपये होती. (मद्रास डायरी १३।१७।२१ डिसेंबर १६९२) आणि दिलकशा पृ.१२०८) कांजीवरम येथील विजया नंतर मराठी सेनेने आपला मोर्चा जिंजीच्या बाहेर गूळा पसरलेल्या मोगल सेनेकडे वळवून त्यांच्या विखुरलेल्या छावण्यांवर जोरदार हल्ले सुरू केले. हे संकट लक्षात येताच झुल्फिकारखानाने आपल्या सर्व छावण्यांना तातडीने मुख्य छावणीपाशी अेकत्रित होण्याचे हुकूम सोडले. या हुकूमाप्रमाणे किल्ल्याच्या अुत्तरेस लष्करखानाची तुकडी आणि दक्षिणेस असलेली दाऊदखानाची तुकडी या पूर्वेकडे असलेल्या मुख्य छावणीत येऊन दाखल झाल्या. या गडबडीत किल्ल्याच्या पश्चिमेस असलेली अिस्माअिलखान माका याची तुकडी धनाजी जाधवाच्या टप्प्यात सापडली. अिस्माअिलखानाने प्रतिकार करण्याची शर्थ केली. परंतु धनाजीच्या संख्याबळापुढे त्याचा प्रयत्न तोकडा पडला आणि चकमकीत जखमी होअून तो मराठ्यांच्या हाती पडला. त्याची जिंजी किल्ल्यावर रवानगी करण्यात आली. या चकमकीत मोगल सेनेचे दोन हत्ती आणि ५०० घोडे मराठ्यांच्या हाती लागले. या सनसनाटी विजयानंतर कडप्पा पासून कांजीवरमच्या सर्व प्रदेशावरील कुतुबशाहीचा हक्क नष्ट होअून ते प्रदेश मराठी राज्याचे भाग झाले आहेत अशी घोषणा करण्यात आली आणि या प्रदेशाचा मराठा सुभेदार म्हणून केशव रामण्णा याची नियुक्ती झाली. त्याला १००० स्वार आणि ४००० पायदळ असा सरंजाम देण्यात आला.

मराठ्यांच्या या विजयी घोडदौडीमुळे मोगल सेनेची परिस्थिती अत्यंत

बिकट झाली. सभोवतालच्या प्रदेशातून रसद मिळण्याचे सर्व मार्ग बंद झाले अितकेच नव्हेतर बादशहाच्या मुख्य छावणीतून येणारा पैसा आणि दैनंदिन वार्ता पत्रे ही देखील मराठ्यांनी मार्गात अडथळा केल्यामुळे झुल्फिकारखानाकडे पोहचणे बंद झाले. प्रत्यक्ष मोगल छावणीत तर अेक नवीनच गंभीर समस्या निर्माण झाली. राजपुत्र कामबक्ष याला वृध्द वझीर आसदखान याचा वरचष्मा सहन न झाल्यामुळे आणि त्याने आसदखानाची मानहानी केल्यामुळे या दोघांमध्ये फार मोठा तणाव अुत्पन्न झाला तशातच मराठ्यांनी अशी अफवा अुठविली की औरंगजेब मरण पावला असून कामबक्षाचा मोठा भाऊ शहाआलम याने मोगल सिंहासन बळकावले आहे. या अफवांवर विश्वास ठेवून आणि आपल्या नोकर चाकरांच्या सल्ल्याने आसदखान आणि झुल्फिकारखान या दोघांना शह देण्यासाठी कामबक्षाने आपले दूत राजारामाशी बोलणी करण्यासाठी जिंजीच्या किल्ल्यात पाठविले. पूर्वी औरंगजेबाचा दुसरा राजपुत्र अकबर बापाच्या विरुध्द संघर्ष करून संभाजी राजांना जाऊन मिळाला हे अुदाहरण कामबक्षापुढे होतेच. राजारामाने सर्व हालचालींवर लक्ष ठेवून कामबक्ष जिंजीत आल्यास त्याची देखभाल करण्याचे आश्वासन दिले. मोगल छावण्यातील या अंतर्गत झगड्यांची वार्ता औरंगजेबाला कळताच त्याने कामबक्षावर करडी नजर ठेवण्याकरिता राव दलपत या आपल्या विश्वासू राजपूत सरदाराला जिंजीकडे रवाना केले.

कांजीवरम जिल्ह्यातील यशस्वी मोहीम आणि अलिमर्दान खान याच्या विरुध्द झालेल्या लढाईत मिळालेला विजय या दोन घटनांनी अुत्साहित झालेल्या मराठी सेना संताजी आणि धनाजी यांच्या नेतृत्वाखाली जिंजीच्या परिसरात दाखल झाल्या. आता जिंजीला वेढा घालण्याच्या मोगल सेनेस मराठ्यांनी वेढा घातल्यामुळे मोगल सेना दुहेरी कात्रीत सापडली. अन्नधान्याचा साठा

संपून गेल्यामुळे सैनिकांची आणि जनावरांची भीषण अुपासमार होअू लागला अशा परिस्थितीत जिंजीच्या अिशान्येस ५० कि.मी.वर असलेल्या वांदोवॉश येथे माघार घेणे हा अेकच अुपाय झुल्फिकारखानापुढे होता. त्यादृष्टीने निर्णय घेअून त्याने वांदोवॉशकडे जाण्यास प्रारंभ केला परंतु वांदोवॉश पासून ही सेना २० कि.मीटर अलीकडे असतानाच संताजी घोरपडे यानी देसूर या मुक्कामी आपल्या २०००० च्या घोडेस्वारांच्या तुकडीने त्यांची वाट अडविली आणि त्यांच्यावर हल्ले सुरु केले. अुपासमार झालेल्या मोगल सेनेचे भारी नुकसान झाले आणि अत्यंत कष्टाने ही सेना कशीबशी देसूरच्या किल्ल्यात पोहचली. मराठी सेना त्यांच्या पाठलागावर होतीच. परिस्थितीचे गांभीर्य जाणून वझीर आसदखान आणि झुल्फिकारखान यांनी आपले दूत राजारामाकडे जिंजीस रवाना केले आणि आपण दहा लाख रुपये खंडणी भरण्यास तयार असून आपल्या सेनेस सुखरुपपणे वांदोवॉश येथे जाण्याची परवानगी मिळावी अशी याचना केली. संताजी आणि धनाजी या दोघांनी ही मागणी राजारामाने मान्य करु नये आणि हाती सापडलेल्या मोगल सेनेचा संपूर्ण नाश करुन टाकावा असा सल्ला राजारामाला दिला. राजारामाने विचार करुन आसदखानाची विनंती मान्य करण्याचे कबूल केले परंतु ते या अटीवर कि त्याने बादशहाशी बोलणी करुन मराठ्यांनी घेतलेल्या प्रदेशास मान्यता द्यावी आणि मराठ्यांशी युद्धबंद करुन तहाच्या वाटाघाटी कराव्यात. वझीराने ही अट मान्य केल्यावर मोगल सेनेस वांदोवॉश येथे जाण्याची परवानगी मिळाली आणि त्याप्रमाणे २२ जानेवारी १६९२ ला आसदखान आणि झुल्फिकारखान यांच्या तुकड्या वांदीवॉश येथे दाखल झाल्या.

१६९२ पासून १६९७ पर्यंत चार वर्षे झुल्फिकारखानाने औपचारिक-

रित्या जिंजीचा वेढा चालू ठेवला असला तरी वेढा परिणामकारक रितीने आवळण्याचे कोणतेही प्रयत्न त्याने केले नाहीत. यदुनाथ सरकार यांच्या म्हणण्याप्रमाणे मासिर-ऑ-आलमगिरी, मद्रास डायरी, दिलकशा आणि मोगलांच्या छावणी बरोबर असलेला अखबार भीमसेन यांच्या लिखाणावरून ही गोष्ट स्पष्ट होते की जिंजीस आल्यापासूनच झुल्फिकारखानाचे छत्रपति राजारामाशी अंतस्थ संधान होते त्यामुळे मराठ्यांनी झुल्फिकारच्या सैन्याचे गंभीर नुकसान करावयाचे नाही आणि त्याबद्दल खानाने जिंजीचा वेढा दिरंगाईने आणि कामचुकार पध्दतिने चालवावयाचा असे ह्याचे ठरल्याचे दिसते. केवळ बादशहा नाराज होवू नये म्हणून आणि आपण काहीतरी करतो आहोत असे दाखविण्यासाठी हवामान चांगले असतांना तंजावर त्रिचनापल्ली आणि कांजीवरम इत्यादी ठिकाणी असलेल्या स्थानिक राजांवर प्रासंगिक हल्ले करून आणि खंडणी वसूल करून त्याने काळकाढूपणा चालविला (यदुनाथ सरकार. History of Aurangzeb भाग ५ पृ.१०६-१०७) दर वर्षीच्या पावसाळ्यामध्ये झुल्फिकार आपली सेना घेऊन वांदीवॉश किंवा अर्काट किंवा वेलोर या कोणत्यातरी एका किल्ल्याचा आश्रय घेऊन स्वस्थपणे रहात असे. १६९७ च्या आक्टोबर मध्ये झुल्फिकार खाना बद्दल सर्व माहिती बादशहास कळल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत जिंजीचा किल्ला जिंकून घेतलाच पाहिजे असा सक्त हुकूम औरंगजेबने खानाकडे पाठविला आणि आपल्या हुकमाची अंमलबजावणी योग्यरितीने केली जाते की नाही यावर नियंत्रण ठेवण्यासाठी दाऊदखान पन्नी याला एक सैन्याची तुकडी देऊन झुल्फिकारखानाचा मदतनिस म्हणून जिंजीकडे रवाना केले. हा हुकूम मिळाल्याची वार्ता झुल्फिकारकडून राजारामास लगेचच कळली. इकडे महाराष्ट्रातही छत्रपतींचे प्रत्यक्ष वास्तव्य नसल्यामुळे तिकडे जाऊन मराठ्यांचा दरारा कायम राखणे ही एक समस्या राजारामापुढे होतीच. त्यामुळे जिंजीचा किल्ला सोडून विशाळगडाकडे परत जाण्याचा निर्णय

नकाशा क्र. १२

संताजी-धनाजी यांच्या हालचाली


वैराटगड
वर्धनगड
सातारा
संताजी
धनाजी
कृष्णा
दुदेरी
बसवपट्टण
तुंगभद्रा
चित्रदुर्ग
अर्काट
वांदिवाश
मद्रास
वेलोर
जिंजी
चिंगलपुट
पाँडेचरी
कांजीवरम
पोर्टोनोव्हो
म्हैसूर
कावेरी
तंजावर

राजारामाने केला. या निर्णयाप्रमाणे बरोबरचे सर्व अधिकारी आणि बहुतेक सर्व सेना घेऊन राजारामाने जिंजी सोडून विशाळगडाकडे प्रयाण केले. २।२ फेब्रुवारी १६९८ ला राजाराम आणि त्याचे अष्टप्रधान सुखरूपपणे विशाळगडावर स्थानापन्न झाले. राजारामाने जिंजीहून प्रयाण केल्यानंतर झुल्फिकारखानाने आपल्या सेनेस जिंजीच्या किल्ल्यावर हल्ला करण्याचा हुकूम दिला. हा हुकमाप्रमाणे रामसिंग हाडा याने उत्तरेकडील वेलोर गेट मार्गे, दाऊदखान पन्नी याने दक्षिणेकडील चक्रायणगड या मार्गाने आणि राव दलपतने उत्तरेकडील कृष्णगिरी या मार्गाने जिंजीवरती चौफेर हल्ला केला. किल्ल्यावर शिबंदी फारच थोडी असल्यामुळे विशेष प्रतिकार न होता ७ फेब्रुवारी १६९८ ला जिंजीचा किल्ला मोगलांच्या स्वाधीन झाला.

संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांच्या लष्करी कारवाया (नकाशा नं. १३)

(Military Operations by Santaji Ghorpade and Dhanaji Jadhv)

१६९१ ते १६९७ पर्यंत जिंजीचा प्रदीर्घ वेढा चालू असतानाच संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव या दोन धडाडीच्या मराठी सेनापतींनी सातारा-कऱ्हाड पासून कांजीवरम आणि कडलोर या पूर्व किनाऱ्यावरील महत्वाच्या लष्करी ठाण्यांपर्यंत जवळजवळ १२०० कि.मीटर अंतराच्या प्रदेशात निरनिराळ्या ठिकाणी विखुरलेल्या मोगल सेनेच्या तुकड्यांवर प्रखर हल्ले करून मोगल सेनेच्या खच्चीकरणाची मोहीम अत्यंत यशस्वीपणे चालू ठेवली. १६९१।९२ या वर्षात पन्हाळ्याचा वेढा चालू असतांना वेढा घालणाऱ्या रुस्तमखानाच्या सैन्यावर वारंवार हल्ले करून त्यांनी रुस्तमखानाला वेढा उठवून परत जाण्यास भाग पाडले. संताजी घोरपडे

हे साता-याच्या अीशान्येस असलेल्या महादेव टेकड्यांवरील वर्धनगड येथे आपला मुख्यतळ (Firm Base) ठेवून दूरवरच्या प्रदेशात मरा-या मारीत असत. त्याप्रमाणे धनाजी जाधव यांचा मुख्य तळ साता-याच्या अुत्तरेस २५ कि.मि. असलेल्या वैराटगड या किल्ल्यावर असे. १६९२ च्या आक्टोबर-नोव्हेंबरमध्ये संताजी आणि धनाजी यांच्या संयुक्त तुकड्यांनी बेळगांवचा किल्ला काबीज करून धारवाडवर हल्ला केला आणि तेथे मतलबखान या मोगल सेनापतीचा पराभव करून धारवाडच्या १०० कि.मी. अीशान्येस असलेल्या नरगुंद येथील किल्ल्यावर आपले ठाणे बसविले. १६९२ च्या अखेरीस धनाजी जाधवाने आपल्या तुकड्या घेऊन तो पन्हाळ्याच्या मदतीस गेला आणि त्यावेळी संताजी आपल्या सैन्यासह जिंजीकडे रवाना झाला. कांजीवरमच्या लढाईत, अलीमर्दानचा पराभव करून आणि नंतर जिंजीस वेढा घातलेल्या झुल्फिकारखानाच्या फौजेला संत्रस्त करून १६९२ च्या मे मध्ये संताजी पुन्हा पश्चिम महाराष्ट्रात दाखल झाला. आल्या बरोबरच त्याने विजापूरच्या वायव्येस १३० कि.मि. अंतरावर असलेल्या मोगलांच्या ताब्यातील भूपाळगड या किल्ल्यावर हल्ला करून तो किल्ला ताब्यात घेतला. नोव्हेंबरच्या दुस-या आठवड्यात संताजीच्या पाठलागावर औरंगजेबाने विजापूरचा फौजदार हिंम्मतखान यास रवाना केले. भूपाळगड आणि विजापूर यांच्या दरम्यान असलेल्या विक्रमहळ्ळी या गावाजवळ १४ नोव्हेंबर १६९४ ला संताजीच्या सैन्याची आणि हिंम्मतखानाच्या तुकड्यांची गाठ पडली. या ठिकाणी झालेल्या घनघोर लढाईत दोन्ही पक्षाचे भारी नुकसान झाले. लढाअी नंतर दोनच दिवसांनी अमृतराव निंबाळकर यांच्या हाताखाली ४००० स्वारांची अेक तुकडी विक्रमी हळ्ळीच्या परिसरात ठेवून संताजीने बरोबर ६००० स्वार घेऊन तो हैद्राबादकडे रवाना झाला. ही घटना कळताच हिंम्मतखान पुन्हा त्याच्या पाठलागावर निघाला. २१ नोव्हेंबर १६९२ ला बेळगांवच्या दक्षिणेस असलेल्या मास्खेड या गावी

संताजीने हिंम्मतखानावर जोरदार हल्ला करून त्यास पिटाळून लावले. १६९४ या वर्षात संताजी घोरपडे आणि हिंम्मतखान यांच्या सेनागटांमध्ये सातारा विजापूर-बेळगांव आणि धारवाड या प्रदेशांमध्ये अनेक चकमकी होत राहिल्या १६९४ च्या डिसेंबरमध्ये नळदुर्ग येथे झालेल्या लढाईतहि मराठी सैन्याकडून हिम्मतखानाचा पराभव झाला. १६९५ च्या आक्टोबर मध्ये दसऱ्याच्या दिवशी रामचंद्रपंत आमात्याने सर्व मराठा सरदारांना अेकत्र बोलाविले आणि मोगलांवर अेक सुसूत्र आणि संघटीत चढाई करण्याची योजना आखली. अेकंदर मराठी सैन्याचे चार विभाग करून या चार विभागांनी चारीही दिशास ज्या ज्या ठिकाणी मोगलसेना विखुरलेल्या आढळतील त्यांच्यावर हल्ले करून त्यांना नष्ट करावे अशी ही योजना होती. यापैकी संताजी घोरपडे यांच्या सेनाविभागाने दक्षिण भारतात तुंगभद्रा नदी पार करून जिंजीच्या आसपास असलेल्या मोगल सेनेवर दबाव ठेवण्याचे काम करण्याचे होते. धनाजी जाधवांच्या विभागाने पश्चिम आणि मध्य महाराष्ट्रात राहून बादशहाच्या हालचालींवर लक्ष ठेवावे आणि या भागातील मोगल हालचालींना पायबंद घालावा असे ठरले.

दुद्देरी आणि बसवपट्टणच्या लढाया

(The Battles of Dudderi and Basavpattan)

वर उल्लेख केलेल्या मराठ्यांच्या युद्ध योजनेप्रमाणे नोव्हेंबर १६९५ च्या प्रारंभी आपला सेना विभाग घेऊन संताजी घोरपडे यांनी दक्षिण भारताकडे प्रयाण केले. औरंगजेब बादशहाची छावणी यावेळी भीमेच्या काठी ब्रम्ह~~ण्डी~~पुरी येथे होती. संताजी घोरपडे दक्षिण भारताकडे निघाल्याची वार्ता बादशहास कळताच

त्याने बंगलोरचा सुभेदार कासीमखान यास हुकूम पाठवून त्याने संताजीची वाट अडवावी असे सांगितले. त्याप्रमाणे कासीमखानाच्या मदतीसाठी म्हणून खानजादाखान, शिकस्तिखान आणि महंमदमुरादखान यांच्या तुकड्यांनाही कासीमखानाच्या मदतीस जाण्याची रजा दिली. या मोगल सरदारांचे आदरातिथ्य आणि स्वागत करावे या विचाराने कासीमखानाने त्यांना सामोरे जाण्यासाठी म्हणून तुंगभद्रेच्या दक्षिण काठावर असलेल्या अडोनीच्या किल्ल्यातून भारी सामान आणून त्यांच्या स्वागताची तयारी केली. या वेळी संताजी घोरपडे यांच्या तुकड्या तुंगभद्रेच्या दक्षिण काठावरील प्रदेशात (सध्याच्या गुंटकल स्टेशनच्या) उत्तरेस संचार करीत होत्या. त्यांना कासीमखानाच्या या स्वागताबद्दलची खडाखडा माहिती मिळाली. संताजीने आपल्या सेना विभागाच्या तीन तुकड्या करून खानावर कोणत्या पद्धतीने हल्ला करावा याची योजना ठरवून दिली. १८ नोव्हेंबर १६९६ रोजी म्हणजे कासीमखान आणि त्याचे पाहुणे नियुक्त ठिकाणी येण्यापूर्वी थोडा वेळ स्वागतासाठी उभारलेल्या तंबूंना मराठ्यांनी आग लावून दिल्या या धामधुमीत चित्रदुर्गचा किल्लेदार आणि कासीमखानाचा कट्टर शत्रू ब्रम्हाप्पा नाईक यानेही संताजीच्या मदतीस आपल्या तुकड्या पाठविल्या होत्या. तंबूंना आग लावून इतर सामानाचा मराठ्यांना लूटालूट चालविली हे कळताच कासीमखान मराठ्यांच्या प्रतिकारासाठी पुढे सरसावला. लढाईस सुरुवात होताच संताजीच्या राखीव तुकडीने पाठीमागून येऊन कासीमखानाच्या सैन्यावर हल्ला चढविला आता बचाव करणे अशक्य आहे याची खात्री झाल्यामुळे कासीमखानाने आपल्या सैन्यास दुद्देरीच्या किल्ल्याचा आश्रय घेण्याचा हुकूम दिला हा किल्ला अडोणीच्या थेट दक्षिणेस १९० कि.मी. अंतरावर आणि चित्रदुर्गपासून पूर्वेस ४५ कि.मी. अंतरावर आहे. पाठलाग करणाऱ्या मराठी सेनेपासून मोठ्या कष्टाने माघार घेत कासीमखानाची सेना दुद्देरीच्या किल्ल्यापर्यंत पोहचली परंतु तेथील

किल्लेदाराने किल्ल्याचे दरवाजे बंद करून त्यांना आत प्रवेश देण्यास नकार दिला. त्यांच्याबरोबर खानजादाखान आणि मुरादखान हेही होतेच. १९ नोव्हेंबर हा सर्व दिवस कासीमखानाच्या सेनेने किल्ल्याच्या बाहेर थांबूनच काढला. परंतु तेवढ्यात संताजीच्या तुकड्यांनी तेथे पोहचून कासीमखानाच्या सैन्याची चोहूकडून नाकेबंदी केली. १९।२० च्या रात्री आपल्या सैन्याला मागेच सोडून कासीमखान, मुरादखान आणि खानजादाखान यांनी पुष्कळशा पैशाच्या अमिषाने स्थानिक माहितगाराकरवी दुडेरीच्या किल्ल्यात प्रवेश मिळविला ही वार्ता १९ नोव्हेंबरच्या रात्री संताजीस कळताच त्याने दुडेरीच्या गडावरील वेढा संपूर्णपणे आवळून टाकला आणि तिन्ही खानांनी शरण यावे अशी मागणी केली. या गडबडीत आलेल्या संकटाने घाबरून जाऊन कासीमखानाने विष प्राशन करून आत्महत्या केली (२० नोव्हेंबर १६९५) खानजादाखान आणि मुरादखान यांना संताजीकडे आपली माणसे पाठवून प्राणदान करण्याची याचना केली. संताजीने २० लाख रु. दंड आणि २५।३० लाखाचे इतर सर्व सामान दोन्ही खानांकडून घेऊन त्यांच्याबरोबर आपले रक्षक देऊन त्यांना बादशहाकडे रवाना केली.

कासीमखान आणि इतर दोघे यांची दुडेरी येथे झालेली नामुष्कीची परिस्थिती औरंगजेबाला कळताच त्याने हिंम्मतखान यास बेळगांव धारवाडच्या मुलखातून त्याने ताबडतोब संताजीच्या पाठलागावर जावे असा हुकूम सोडला. त्याप्रमाणे हिंम्मतखान आपल्या तुकड्या घेऊन संताजीचा पाठलाग करण्यास निघाला. जानेवारी १६९६ च्या दुस-या आठवड्यात दुडेरीच्या दिशेने निघालेल्या हिंम्मतखानाच्या सेनेस संताजी घोरपडे याने २० जानेवारी १६९६ रोजी दुडेरीच्या पश्चिमेस ८० कि.मी. असलेल्या बसवपट्टण या ठिकाणी गाठले. यावेळी संताजीकडे

१०००० स्वार आणि ७००० पायदळ अशा तुकड्या असून त्यामध्ये कर्नाटकात प्रसिध्द असलेल्या आणि नेमबाजीत नाणावलेल्या बंदुकधाऱ्यांच्या दोन तुकड्या होत्या. बसवापट्टणच्या जवळ असलेल्या टेकडीवर संताजीने आपले स्थानक बनवून तो हिंम्मतखानाची वाट अडवून राहिला. मार्गावरील टेकडी ही संताजीच्या ताब्यात आहे असे कळताच हिंम्मतखानाने हत्तीवर बसून टेकडीच्या दिशेने आगेकूच केली आणि आपल्या सैनिकांना डाव्या उजव्या बाजूने टेकडीवर हल्ला करण्याचा हुकूम दिला. हत्तीवर आरुढ झालेला खान टेकडी चढत असताना बंदुकधाऱ्यांच्या टप्प्यात येताच बंदुकधारी सैनिकांनी त्याच्यावर बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव केला त्यामुळे स्वतः हिम्मतखान आणि त्याच्या मागून हत्तीवरुन येणारा त्याचा मुलगा या दोघानाही गोळ्या लागून ते ठार झाले. त्यानंतर संताजीने खानाच्या इतर सेनेवर हल्ला करुन त्यांची लुटालूट केला. हिंम्मतखानाच्या मागून बादशहाच्या हुकमाप्रमाणे हमीदुद्दीनखान नावाचा दुसरा सरदार संताजीवर चढाई करुन आला. यावेळी संताजीने हमीदुद्दीनखानाच्या सेनेशी प्रतिहल्ला चढविला परंतु खानाचे सैन्य अधिक असल्यामुळे लढाई बंद करुन संताजीने चित्रदुर्गकडे माघार घेतली.

दक्षिण भारतातील मोहिमेचे लष्करी विश्लेषण आणि मुल्यमापन

(**Military Analysis and Assessment of Maratha Military Operations in South India**)

छत्रपति राजारामाने रायगड सोडून जिंजी सारख्या दूरवरच्या प्रदेशात जाण्याचा जो निर्णय घेतला तो निर्णय युध्दनैतिक दृष्ट्या किती योग्य आणि अचूक होता याची चर्चा प्रकरण नंबर १२ मध्ये केलेलीच आहे. चालू प्रकरणात जिंजीचा वेढा १६९० च्या ऑगस्ट पासून १६९७ च्या डिसेंबर पर्यंत जवळजवळ आठ वर्षे मराठ्यांनी कोणत्या पध्दतीने झुंजत ठेवला आणि योग्य वेळ आणि संधी येताच आणि किल्ल्याचे

महत्व युध्दनैतिकदृष्ट्या कमी होताच किल्ला मोगलांचा हाती देऊन राजारामाने परत मध्य महाराष्ट्रात कसे प्रयाण केले ही हकीकत आपण पाहिलीच आहे. या सर्व हकीकतीवरून काही नवीन असे युध्द तंत्राचे नियम मराठ्यांनी या मोहिमेत प्रत्ययास सिध्द केले. जिंजी सारखा अभेद्य किल्ला काय किंवा अजिंक्यतारा आणि पन्हाळगड यासारखे तितके अभेद्य नाहीत परंतु संरक्षणदृष्ट्या मजबूत असे किल्ले अनेक काळ पर्यंत लढवत ठेवायचे असतील तर कोणत्या प्रकाराने ही गोष्ट शक्य होऊ शकेल याचे राजारामकालीन मध्य भारतातील मोहिम आणि दक्षिण भारतातील मोहिम ही निर्वंत अशी उदाहरणेच ठरावित. कोणत्याही बचावाचे स्थानक किंवा क्षेत्र, मग ते किल्ला असो किंवा मराठा लाईट इन्फन्ट्रीने १८४१ मध्ये टोळा-वाल्यांविरुध्द लढविलेली कहान सारखी एखादी छोटी टेकडी असो किंवा १९१६।१७ मध्ये ६व्या पुणे डिव्हिजनने लढविलेला कुटअलअमाराच्या सारखी एखादी युध्दनैतिक दृष्ट्या मोक्याची जागा असो. ती टेकडी म्हणून किंवा ती मोक्याची जागा म्हणून समर्थपणे बचाव करण्यास अयोग्य ठरते. बचाव स्थानकास किंवा बचाव क्षेत्रात शत्रूचे संपूर्णपणे वेढून टाकले असताना जोपर्यंत वेढा घालणाऱ्या शत्रूचे खच्चीकरण होत नाही तोपर्यंत वेढा चालूच राहील आणि बचाव स्थानकातील रक्षकांना शरणागती करण्याशिवाय कोणताही उपाय राहणार नाही. मराठा लाईट इन्फन्ट्रीने तीन महिने गड लढविला परंतु वेढा घालणाऱ्या टोळीवाल्यांना बाहेरून कोणताच त्रास न झाल्यामुळे कहानच्या वेढ्यात अडकलेल्या मराठा तुकडीला शरण जाणे भाग पडले. कुटअलअमाराच्या वेढ्यात ६ पुणे डिव्हिजनची अवस्था तर या पेक्षाही वाईट झाली. पाच महिने वेढा लढवूनही बाहेरून कोणताच मदत न आल्यामुळे वेढा घालणाऱ्या तुर्की सैन्याला जास्तच उत्साह आला आणि त्यामुळे जनरल टाऊनशेंड याला शरणागती पत्करून तुर्की सैन्याच्या हवाली व्हावे लागले. याउलट मराठ्यांनी जिंजी, पन्हाळा, आणि अजिंक्यतारा हे तिन्ही किल्ले सतत ७ ते ८ वर्षे लढवत ठेवले

आणि या अेवढ्या कालावधीत वेढा घालणा-या सेनेचे अतोनात हाल करून आपणास पाहिजे त्या सोयीस्कर वेळेस आणि आपल्या शर्तीवर किल्ला सोडण्याचा निर्णय केला. या युद्धनीतीचे रहस्य काय असा प्रश्न केल्यास वेढा घालणा-या सेनेचे खच्चीकरण हे अेकच अुत्तर आपणास मिळू शकते. या खच्चीकरणाचे मुख्य सूत्र म्हणजे अशा त-हेचे खच्चीकरण वेढा घालणा-या सेनेच्या नजीकच्या परिसरातच नव्हे तर दुरगामी प्रदेशात खच्चीकरणाचे हे सत्र सातत्याने चालू ठेवणे हे होय. असे म्हणता येअील. जिंजीसारख्या पश्चिम महाराष्ट्रापासून १२०० कि.मि.अंतरावर असलेल्या बचाव स्थानकाचे संरक्षण व्हावे म्हणून संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव या धडाडीच्या सेनापतींनी ज्या ज्या वेळी आणि ज्या ज्या ठिकाणाहून वेढा घालणा-या सेनेला कुमक आणि रसद मिळण्याची शक्यता होती त्या त्या वेळी आणि त्या त्या ठिकाणी शत्रूच्या तुकड्यांच्या वाटा अडवून आणि त्यांच्यावर आक्रमक हल्ले करून मोगल सेनेचे पध्दतशीर रित्या खच्चीकरण केले. या खच्चीकरणाच्या मोहिमेने अस्वस्थ झालेल्या औरंगजेब बादशहासारख्या प्रबळ सम्राटाची झोप अुडाली. अलीमर्दानखान आणि अिस्माअीलखान यांच्यासारखे मातब्बर सरदार मराठ्यांचे कैदी झाले. कासीम खानासारख्या सेनापतीला विष खाअुन आत्महत्या करावी लागली आणि हिंम्मतखान लढाअीत मारला गेला. जिंजीकडील वेढा अनेक वर्षे रेंगाळल्यामुळे मोगल छावण्यांच्या गोटातून राजकीय अस्थैर्य निर्माण झाले. यावरून हे सिद्ध होअील की खच्चीकरणाच्या तंत्रामध्ये शत्रूची कुमक आणि रसद ही केवळ बंद करून भागणार नाही. शत्रूच्या मनोधैर्याचे (Morale) खच्चीकरण ही या युद्धनीतीचा अेक भाग आहे. पश्चिम महाराष्ट्रापासून जिंजीपर्यंत २० ते ३० हजार स्वारांच्या तुकड्या धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे यांनी वर्षानुवर्षे सतत फिरत्या ठेवल्या आणि सापडेल त्या ठिकाणी मोगल तुकड्यांवर हल्ले करून त्यांना थोडीही अुसंत

मिळू दिली नाही. हा मराठ्यांच्या युध्दशास्त्रातील अेक उच्चांक मानावा लागेल. अेकंदरीत पाहता १६८९ मध्ये मराठी राज्याची सूत्रे हाती घेतल्यापासून तो १७०० पर्यंत छत्रपती राजारामाने खुद्द औरंगजेब बादशहा विरुध्द जी लढत दिली त्या लढतीमुळे केवळ मराठी सत्ता सुरक्षित राहिली अेवढेच नव्हे तर छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरु केलेल्या मराठ्यांच्या युध्दशास्त्रात अेक अत्यंत महत्वाची आणि मौलिक भर घातली हा निर्विवाद निष्कर्ष आपणास काढावा लागेल.

प्रकरण तेरावे

संदर्भसूची

१ श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांचे चरित्र - मल्हार रामराव चिटणीस - विरचित संपादक र.वि.हेरवाडकर

२ मराठी रियासत खंड पहिला - स्थिरबुध्दी राजाराम - गो.स.सरदेसाअी

३ मराठ्यांचे स्वातंत्र्य समर - पूर्वार्ध १६८१-१७०७- श्र.गो.पुराणिक

४ मोगल आणि मराठे (तारीखे दिल्कुशा) संपादक - सेतुमाधवराव पगडी

५ मासिरी आलमगिरी - यदुनाथ सरकार

६ English Records on Shivaji
शिवचरित्र कार्यालय

७ मराठे व औरंगजेब - मासिरी आलमगिरी या फारसी ग्रंथाचा मराठी अनुवाद - संपादक सेतू माधवराव पगडी

८ रामचंद्र निळकंठ अमात्यकृत - आज्ञापत्र अथवा मराठेशाहीतील राजनिती संपादक वामन गोपाळ कुवरेषे

९ मराठ्यांचे स्वातंत्र्य युध्द (फारसी ज्ञान साधन ग्रंथ) संपादक सेतू माधवराव पगडी

१० The Jinjivas OR The Stay of Chatrapati Rajaram at Jinji - Vishnu Laximan Kale 1896.

प्रकरण चौदावे

गुरीला (खच्चीकरणाच्या) युध्दपध्दतीचा उज्वल काळ

१६९९-१७०७

(The Glorious Period of the War of Attrition (Guerilla) 1699-1707)

मराठयांच्या यशाचे वैशिष्ठ्य - १६९९-१७०७
(Significance of Maratha Success)

या आठ वर्षाच्या काळाला मराठयांच्या युध्दशास्त्रातील खच्चीकरणाच्या मोहिमेचा अत्यंत उज्वल काळ म्हणावा लागेल. १६९७ च्या नोव्हेंबर मध्ये छत्रपती राजारामाने जिंजीच्या किल्ल्यातून बाहेर पडून महाराष्ट्राकडे प्रयाण केले आणि तीन महिन्याच्या वाटचालीनंतर २२ फेब्रुवारी १६९८ ला तो आपल्या मंत्री मंडळातील सर्व प्रमुख व्यक्तिंबरोबर सुखरुपपणे विशाळगड किल्ल्यावर पोहचला. दोन महिने विशाळगडास मुक्काम करुन तेथून त्याने आपला मुक्काम हलवून २१ मे १६९८ रोजी सातारा मुक्कामी छत्रपतींच्या गादीची पुन्हा स्थापना केली. त्यानंतर केवळ दोनच वर्षांनी म्हणजे १ मार्च १७०० ला राजारामाचे सिंहगडाच्या किल्ल्यावर निधन झाले. त्याच्या निधनापूर्वी ६ महिने (आक्टोबर १६९९) औरंगजेब बादशहाने दक्षिण भारतातून आपली सेना काढून घेऊन आपले सर्व लक्ष महाराष्ट्रातील मराठयांच्या ताब्यात असलेले सर्व किल्ले ताब्यात घेण्याकडे वळविले. बादशाही सेनेचे विभाग कोणत्या ना कोणत्या तरी मराठयांच्या अमलाखालील किल्ला घेण्या-

साठी सर्व महाराष्ट्रभर संचार करीत राहिले. असे असुनसुध्दा विखुरलेल्या मोगल सेनेवर रात्रंदिवस हल्ले करून मराठ्यांनी त्यांना अितके संत्रस्त करून सोडले की त्या पध्दतशिर खच्चीकरणामुळे मोगल सेनेत कोणताही त्राण अुरला नाही. मराठ्यांकडून होणाऱ्या या अखंड हल्ल्यांशिवाय मोगल सेनेच्या कमजोरीत आणखी दोन गोष्टींची भर पडली, पहिली म्हणजे महाराष्ट्रातील भू प्रदेशाचे आणि हवामानाचे योग्य ज्ञान नसल्यामुळे मोगल सेनेचे विभाग चुकीच्या ठिकाणी आणि चुकीच्या वेळी आपल्या छावण्या अुभारीत आणि आकस्मात येणाऱ्या पावसामुळे मोगल सैनिक त्यांच्या राहुट्या आणि हत्ती घोड्यांसहित सर्व जनावरे पुराच्या पाण्यात वाहून जात. मोगल सेनेची प्रशासकीय व्यवस्था आणि त्यांचे मनोधैर्य खच्चीकरणारी आणखी अेक घटना यावेळी घडली ती म्हणजे मोगल छावणीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये अुघड अुघड गैरसमज आणि भांडणतंटे सुरु झाले. १६८० पासून सतत २० वर्षे चाललेल्या युध्दामुळे मोगल सेनेतील सामान्य सैनिक आणि दुय्यम दर्जाचे अधिकारी युध्दाच्या कारवाअीला कंटाळून गेले होते. तशातच औरंगजेबाचे वय आणि त्याची वृध्दावस्था दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळे काही दिवसातच बादशहाचे आयुष्य संपणार ही गोष्ट मोगल सेनेतील वरिष्ठ सरदार आणि कामबक्ष व बेदरबख्त यांच्यासारख्या बादशहाच्या नातेवाअीक गोटात स्पष्ट होत होती. साहजिकच बादशहाचे निधन झाल्यास सत्ता कोणाच्या हाती जाणार या बद्दलची साधी स्पर्धा या ७-८ वर्षात अगदी शिगेला पोहोचली. अशा परिस्थितीत १७०० मध्ये राजारामाचे निधन होअून सुध्दा सात वर्षे औरंगजेबाचे निधन होअीपर्यंत नैसर्गिक आपत्तीने पिडलेल्या आणि अंतर्गत भांडण-तंट्यांमुळे पोखरून निघालेल्या मोगल सेनेला मराठ्यांकडून होणाऱ्या अखंड हल्ल्यांना यशस्वीरित्या तोंड देणे कठीण झाले. आश्चर्याची गोष्ट अशी की १७०० ते १७०८ या आठ वर्षाच्या काळात कोणतीही

केंद्रीय सत्ता नसताना मराठा सरदारांनी कोणत्याही परिस्थितीत मराठी सत्ता जिवंत ठेवली पाहिजे असा निर्धार केला आणि आपल्या युध्द पध्दतीचे अेक आगळे दर्शन घडवून म्हाराष्ट्राचा अितिहास निर्माण केला.

राजारामापुढील आव्हाने

(Challenges Facing Rajaram)

नोव्हेंबर १६९७ मध्ये राजारामाने जिंजीच्या किल्ल्यातून बाहेर पडण्याचा आणि म्हाराष्ट्रात परत येण्याचा जो निर्णय घेतला तो निर्णयही आठ वर्षे अगोदर रायगडावरुन जिंजीकडे जाण्याच्या निर्णया अितकाच युध्दनैतिक दृष्टया अत्यंत योग्य आणि अचूक असा होता. १६८९ मध्ये रायगडाहून जिंजीकडे जाण्याच्या वेळी महाराष्ट्रात मोगलांचा जोर अतिशय वाढता होता. तो शक्य तितका कमी करुन मोगली सेनेचे शक्य तितके विकेंद्रीकरण करण्यासाठी १३०० कि.मिटर दूर असलेल्या जिंजीसारख्या अभेद्य किल्ल्याचा आश्रय घेणे हा अेकच मार्ग राजाराम आणि त्यांचे मंत्रीमंडळ यांच्यासमोर होता. त्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करुन मराठयांचे शक्तिस्थान जिंजी येथे हलविण्यात आले आणि पुढील ७।८ वर्षे जिंजीचा किल्ला शर्थीने लढविण्यात आला ज्या रितीने मोगलांनी अेका पाठोपाठ अेक असे आपले मातब्बर सरदार आणि त्यांच्या हाताखालील सेना विभाग जिंजीच्या कब्जा करण्यासाठी पाठविले त्यावरुन राजारामाच्या निर्णयाचे अंतिम अुद्दिष्ट १०० टक्के पूर्ण झाले. या सात वर्षाच्या काळात मोगल सेनेचे अवगुण, त्यांच्या सेनेतील वैशिष्ठ्ये, सरदारांचे अंतर्गत तंटे-बखेडे आणि प्रत्येकवेळी बादशहाकडून व्यक्त होणारा त्यांच्याविषयीचा गैरविश्वास या सर्व गोष्टींची मराठी नेत्यांना स्पष्ट जाणीव झाली.

जिंजीचा वेढा चालविणारा सर्वोच्च मोगल सेनापती झुल्फिकारखान हा बादशहाचे हुकूम धाब्यावर बसवून मराठ्यांशी कसे संधान बांधीत असे आणि वेढा रेंगाळत ठेवण्यात तो अप्रत्यक्ष मदत करीत असे, याची चांगली जाणीव मराठी नेत्यांना झाली या सर्व कारणांमुळे युध्दनैतिक दृष्ट्या १६९७ च्या सुमारास जिंजीचे महत्व कमी झाले. इकडे महाराष्ट्रात आठ वर्षांचा प्रदिर्घ काळ छत्रपतींचे प्रत्यक्ष वास्तव्य नसल्यामुळे त्या ठिकाणी मराठ्यांच्या केंद्रीय शक्तीची लोकांना जाणीव करून देणे ही गोष्ट फार महत्वाची होती आणि म्हणूनच काळाचे महत्व ओळखून आपले कोणतेही नुकसान होणार नाही याची झुल्फिकारखानाकडून हमी घेऊन राजारामाने महाराष्ट्रात परत येण्याचा निर्णय केला. हा निर्णय युध्दनैतिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचा होता असेच म्हणावे लागेल.

विशाळगडाला पोहचल्यानंतर तेथील दोन महिन्याच्या मुक्कामात राजारामाने आग्रक्रमाने केलेली पहिली गोष्ट म्हणजे आपण महाराष्ट्रात परत आलो आहोत आणि छत्रपतींची गादी पुन्हा पहिल्याप्रमाणे महाराष्ट्रात स्थापित झाली आहे अशी घोषणा करून मराठी राज्यातील सर्व लहान थोर मंडळींना त्याने आपल्याकडे बोलावून घेतले. १६९८ च्या मे मध्ये सातारा मुक्कामी यथासांग गादीची प्रस्थापना करून छत्रपतींना सर्व सरदार लोकांकडून मानाचे मुजरे घेतले. महाराष्ट्रात चहूकडे मोगल सेनेचा संचार सुरूच होता, म्हणून मराठी राज्यातील सर्व प्रदेशावर आणि सर्व मोक्याच्या किल्ल्यांवर मराठी सत्ता हक्काने शाबीत झाली पाहिजे हे ठामपणे निदर्शनास आणण्यासाठी शिवाजी महाराजांनी बंद केलेली जहागिरी आणि वतन देण्याची पध्दत

राजारामाने पुन्हा सुरू केली. प्रत्येक सरदारास त्याच्या त्याच्या प्रदेशाचे सरंजाम आणि सनदा बहाल करण्यात आल्या आणि या सर्व सरदारांनी मनसब आणि सनद मिळालेल्या आपल्या प्रदेशात जाअून नवी सेना अुभी करावी आणि तिच्या सहायाने ज्या ज्या ठिकाणी मोगल सेना आढळेल त्या त्या ठिकाणाहून त्यांना काढून टाकावे आणि मराठी अंमल सक्तीने बसवावा असे हुकूम देण्यात आले, त्याचप्रमाणे सनद मिळालेल्या प्रदेशाखेरीज त्याच्या आसपास असलेल्या प्रदेशावर चौथाअी लागू करून त्या प्रमाणे ती वसूल करावी अशाही आज्ञा त्यांना देण्यात आल्या. सरंजाम आणि सनद वंश-परंपरागत वहिवाट देण्याची ही पद्धत पुढे पेशवाअीतही कायम राहिली आणि त्यामुळेच शिंदे होळकर, भोसले आणि गायकवाड या प्रबळ सरदारांची मराठी राज्ये अुत्तर हिंदुस्थानभर पसरली.

वरील प्रमाणे महाराष्ट्रात आल्याबरोबर मराठी केंद्रसत्ता विधीपूर्वक प्रस्थापित झाली आणि राजारामाच्या नव्या राजकीय धोरणामुळे मराठयांच्या नव्या राज्य व्यवस्थेला अनेक वर्षे न लाभलेले स्थैर्य मिळाले ही घडी बसल्यावर आक्टोबर १६९९ मध्ये धनाजी जाधव, रामचंद्रपंत आमात्य, दादोमल्हार या सेना विभाग प्रमुखांना बरोबर घेअून ७००० स्वारांच्या तुकडीनिशी राजारामाने मोगल प्रदेशात हल्ले करण्यासाठी स्वारीचे प्रस्थान ठेवले. मराठयांच्या या आक्रमक हालचालीची खबर लवकरच औरंगजेब बादशहाला लागली, त्यावेळी त्याची छावणी भीमा नदीवरील ब्रम्हपुरी येथे (पंढरपूरच्या आग्नेयेस ४० कि. मी) होती. राजारामाला अडविण्यासाठी बादशहाने राजपुत्र बेदरबख्त आणि झुल्फिकारखान अुर्फ नुसरतजंग (जिंजी काबीज केल्याबद्दल ही नवीन पदवी बादशहाने झुल्फिकारखानास दिली होती) याच्या हाताखाली दोन तुकडया

देअून त्यांना रवाना केले. या दोन तुकड्या रवाना होण्यापूर्वीच धनाजी जाधव याच्या हाताखालील अेका तुकडीने ब्रम्हपुरी येथील प्रत्यक्ष बादशहाच्या छावणीवर निकराचा हल्ला चढवून लूटालूट केली. त्यानंतर ब्रम्हपुरीच्या रक्षणासाठी झुल्फिकारखान आपली सेना घेअून येत आहे असे कळताच तेथून प्रथम मिरजेकडे आणि नंतर रहिमतपुराकडे धनाजी जाधवाने माघार घेतली. झुल्फिकारखानही धनाजीच्या पाठलागावर प्रथम मिरजेकडे आणि नंतर रहिमतपूरकडे गेला. शेवटी वसंतगडा जवळ (साता-याच्या अीशान्येस २० कि.मी.) धनाजी जाधव आणि झुल्फिकारखान यांच्या सैन्याची गाठ पडून अेक घनघोर लढाअी झाली. तेवढ्यात बक्षीबरामंदखान हा आणखी अेक तुकडी घेअून झुल्फिकारखानाच्या मदतीस येत आहे असे कळताच धनाजीने तेथून साता-याकडे माघार घेतली. हा संघर्ष चालू असतांना राजाराम भीमेच्या अुत्तरेकडील प्रदेशात संचार करीत होता झुल्फिकारखानाच्या हालचालीची माहिती कळताच भीमानदी पार करून राजाराम साता-यास दाखल झाला. धनाजीने साता-यास माघार घेतल्यानंतर ताबडतोब क-हाडच्या दिशेने आगेकूच केले आणि तेथे हमीदुद्दीनखानाच्या हाताखाली असलेल्या तुकडीस गाठून त्याचा पराभव केला. याचवेळी झुल्फिकारखानाने चंदन-वंदन जवळील प्रदेश सोडला आहे आणि तो क-हाडच्या दिशेने येत आहे असे धनाजीस कळले त्याबरोबर झुल्फिकारखानाची वाट अडविण्यासाठी धनाजी आपला सेना विभाग घेअून मसूरच्या दिशेने निघाला. (मसूर हे क-हाडच्या अुत्तरेस १८ कि.मिटरवर आहे) यावेळी झुल्फिकारखानाला कुमक मिळाल्यामुळे त्याची सेना जास्त प्रबळ होती परिणामी मसूर येथे १ जानेवारी १७०० रोजी झालेल्या लढाअीत धनाजीला पराभव पत्करावा लागला. या सर्व हालचालींमुळे मोगली सेनेचे विभाग साता-याच्या दक्षिणोत्तर चारही बाजूंनी दडपण आणू लागले अशा परिस्थितीत साता-यास राहणे धोकादायक आहे याची

नकाशा नं १४

मोगल विरोधी कार्यवाही


अहमदनगर
खटाव
सातारा
पंढरपूर
भीमा
विशाळगड
बीजापूर
वाकीनखेडा
कोल्हापूर
कृष्णा
संताजी
धनाजी
मद्रास
जिंजी

जाणीव होअून राजाराम महाराजांनी सिंहगडाकडे प्रयाण केले आणि तेथेच १ मार्च १७०० रोजी त्यांचे निधन झाले.

मोगलांच्या अयशस्वी लष्करी कारवाया - १६९९-१७०७ (नकाशा नं. १४)

(Failure of Mughal Military Operations 1699-1707)

१६९८ ते १७०१ या तीन वर्षांच्या काळात जिंजीचा किल्ला (फेब्रुवारी १६९८), सातारचा किल्ला - अजिंक्यतारा (अेप्रिल १७००), आणि कोल्हापूरचा पन्हाळा, पावनगड (मे १७०१) असे तीन महत्वाचे किल्ले जे मराठ्यांनी सतत ८-९ वर्षे झुंजवत ठेवले ते अखेरीस मोगलांच्या स्वाधीन झाले. याचे मुख्य कारण असे होते की केवळ युध्दनैतिक दृष्ट्या या किल्ल्यांना अि.स. १७०० च्या सुमारास फारसे महत्व अुरले नव्हते, त्यामुळे ते आणखी कांही काळ झुंजवत ठेवून आपली लष्करी ताकद व्यर्थ घालविणे मराठी लष्करी नेत्यांना पसंत नव्हते. त्यापेक्षा अुपलब्ध असलेल्या लष्करी सामर्थ्याचा पुरेपूर अुपयोग करून महाराष्ट्रभर संचार करीत असलेल्या मोगल सेनेच्या अनेक तुकड्यांवर वारंवार हल्ले करून त्यांची लष्करी क्षमता शक्य तितकी कमी करणे हेच अधिक फायद्याचे होते, म्हणूनच पन्हाळा आणि अजिंक्यतारा या दोन्ही ठिकाणी मोगलांकडून भरपूर रक्कम वसूल करून किल्ले त्यांच्या हवाली करण्यात आले. कोणत्याही ठिकाणी मोगल सेनेविरुध्द समोरासमोर युध्द करण्याचे हेतू पुरस्कर टाळून त्यांचा संचार सुरू झाल्यावर त्यांना अडचणीच्या ठिकाणी गाठून त्यांच्यावर हल्ला करणे हेच मराठ्यांचे सर्वसाधारण तंत्र होते. ही मोहिमगिरी आक्टोबर ते अेप्रिल अशा ६-७ महिन्याच्या कोरड्या हवामानात मराठी सेना करीत असे. अुन्हाळ्याच्या प्रारंभी आणि सबंध पावसाळ्यात कोणच्या तरी

दुर्गम ठिकाणी विश्रांती घेऊन सेनेची पुनर्बांधणी करणे ही त्यांची प्रथा होती.

जिंजीचा किल्ला हाती आल्यावर मराठ्यांचे अितर सर्व किल्ले ताब्यात घेण्यासाठी औरंगजेबाने १६९९ च्या आक्टोबरात नवी मोहिम हाती घेतली आणि या मोहिमेचे सूत्र संचलन त्याने आपल्याकडे ठेवले. राजारामाच्या निधनानंतर लगेचच सातारा आणि त्याच्या परिसरातील परळी आणि वसंतगड हे किल्ले मोगलांनी हस्तगत केले. अि.स. १७०० च्या आगस्ट मध्ये साता-याच्या पूर्वेकडील माण नदीच्या काठी खवासपूर येथे बादशहाने आपली छावणी प्रस्थापित केली. नदीच्या दोन्ही तीरावर आणि कोरड्या पात्रात देखील सरदारांनी आणि सैनिकांनी आपले तंबू आणि राहुट्या ठोकल्या होत्या. सर्व साधारणपणे या भागात पाऊस अत्यंत कमी असून बहुतेक वेळी अवर्षण आणि दुष्काळ यांनी हा तालुका पिडलेला असतो. मोगल सैन्याच्या दुर्दैवाने त्या वर्षी मात्र १ आक्टोबरच्या रात्री शाही छावणीतील हजारो लोक आपल्या राहुट्यांमधून गाढ झोपलेले असतांना अचानक मुसळधार पाऊस सुरु झाला आणि पाण्याच्या ओघामध्ये अनेक सैनिक, जनावरे, युध्दोपयोगी सामुग्री आणि दारुगोळा वाहून गेला. याच वेळी झालेल्या गडबडीत स्वतः औरंगजेब अडखळून पडला आणि त्यामुळे त्याचा अुजवा गुडघा निखळला अशा रितीने १७०० च्या अखेर पर्यंत मोगल सैन्याची स्थिती अत्यंत सोचनीय झाली. याच काळात हणमंतराव निंबाळकराने साता-याच्या पुर्वेकडील खटाव येथे असलेल्या मोगल ठाण्यावर हल्ला करून तेथील किल्लेदारास ठार केले.

वरील नैसर्गिक आपत्तीला तोंड देत असतानाच १७०१।२ मध्ये मोगल सेनेच्या वरिष्ठ अधिका-यांमध्ये आपापसातील व्देषाची फार मोठी लाट

अुसळली, झुल्फिकारखान अुर्फ नुसरतजंग आणि गाझीअुद्दीन फिरोजजंग या अुता सेनापतीमध्ये अुघडअुघड मतभेद झाले. त्याचप्रमाणे तोफखान्याचा प्रमुख तबीयतखान आणि दुसरा अेक मातब्बर सेनानी लुत्फुल्लाखान यांच्या दरम्यानही संघर्ष निर्माण झाला. या अंतर्गत भांडण-तंट्यामुळे बादशहाच्या हुकमाने घातले गेलेले अनेक किल्ल्यांवरील वेढे रेंगाळत राहिले आणि त्यामुळेच केवळ बादशहाला खुष करण्यासाठी विशाळगड (१७०२), सिंहगड (१७०३) आणि राजगड (१७०४) हे किल्ले मराठ्यांशी अंतस्थ संधान बांधून आणि त्यांना खूपमोठी रक्कम देअून हे किल्ले मोगलांनी आपल्या ताब्यात घेतले. १७०४ व १७०५ मध्ये धनाजी जाधवाच्या हाताखालील सरदार दादो मल्हार, कृष्णाजी मल्हार, राणोजी व बहिर्जी घोरपडे या निरनिराळ्या सेनाधिका-यांनी बादशाही छावणीवर अनेक वेळा हल्ले केले आणि त्याचबरोबर खानदेश आणि मोगल अमलाखाली असलेल्या प्रांतात लुटालूट करण्याचे सत्र सुरु केले. १७०५ मध्ये बादशहाने पन्हाळ्यावरुन निघून अकलूजकडे प्रयाण केले आणि तेथून पुढे बादशहाची छावणी अहमदनगरच्या दक्षिणेकडील पेडगांव अुर्फ बहादूरगड येथे हलविण्यात आली. या संधीचा फायदा घेअून १७०५ आणि १७०६ या दोन वर्षात मराठ्यांनी मोगलांच्या ताब्यात गेलेले लोहगड, राजमाची, रोहिडा, राजगड, पन्हाळा, पावनगड, सातारा आणि वसंतगड हे सर्व किल्ले मोगलांपासूनकाढून घेअून मराठी अमलाखाली आणले. ही कामगिरी प्रामुख्याने शंकरजी नारायण आणि परशुराम त्रिंबक यांच्या हाताखालील तुकड्यांनी पार पाडली.

औरंगजेबाची शेवटची मोहिम म्हणजे मोगल सेनेने सुरु केलेली बेरड लोकांचा नेता पि-या नाअीक याच्या विरुध्दची चढाअी ही होय. विजापूरच्या पूर्वेस कृष्णा आणि भीमा या नद्यांच्या दोआबात बेरड लोकांची मोठी वस्ती

असून तेथे असलेल्या वाकीनखेडा या गावाजवळ अेका गढीत पि-या नाअीक या बेरड नेत्याचे वास्तव्य होते. फेब्रुवारी १७०५ मध्ये औरंगजेब आपली सेना घेअून बहादूरगडावरून निघाला आणि विजापूरकडे कूच करून पुढे त्याने वाकीनखेडयाच्या गढीस वेढा घातला. पि-या नाअीकाचे आणि मराठयांचे संबंध अत्यंत सलोख्याचे होते, त्यामुळे वाकीनखेडयाला मोगली सेनेने वेढा घातला आहे हे कळताच धनाजी जाधव आणि हिंदूराव घोरपडे व अितर मराठा सरदारांनी तातडतोब वाकीनखेडयाकडे धाव घेअून वेढा घालणा-या मोगल सेनेवर प्रखर हल्ला चढविला. ही धुमश्चक्री चालू असतानाच पि-या नाअीक आपली महत्वाची माणसे घेअून गढीच्या चोर वाटेने मराठयांच्या छावणीत येअून दाखल झाला. शेवटी मोठ्या कष्टाने मोगल सेनेने गढी ताब्यात घेतली परंतु त्यांच्या हातात काहीच आले नाही. वाकीनखेडयाच्या झालेल्या या महागडया लढाअी नंतर बादशहाने आपल्या फौजेस अहमदनगरकडे जाण्याचे हुकूम दिले. ५०।६० हजाराची मोगल फौज माघार घेत वाटचाल करीत असताना प्रत्येक मुक्कामावर त्यांना मराठी सेनेच्या तुकडयांबरोबर अनेक हाताघाअींच्या लढाया कराव्या लागल्या या सर्व अडचणीतून टप्प्याटप्प्याने मार्ग काढीत बादशहाची स्वारी २० जानेवारी १७०६ रोजी अहमदनगर येथे पोहचली. २४ वर्षापूर्वी याच अहमदनगरहून मराठयांचे राज्य बुडविण्यासाठी आपल्या बलाढ्य सेना घेअून औरंगजेब बाहेर पडला होता परंतु २४ वर्षाच्या प्रदिर्घ काळात मराठयांविरूध्द कोणत्याही निर्णायक विजय न मिळता बादशहाला परत यावे लागले. १७०६ च्या डिसेंबर अखेर मराठयांनी विजापूरच्या दक्षिणेस पुन्हा चढाअी करून बेरड नाअीकाच्या मदतीने वेणूकोंडा येथे असलेली मोगलांच्या ताब्यातील गढी काबीज केली आणि आपली चढाअी सेरा या शहराच्या दिशेने चालू ठेवली. याच सुमारास धनाजी जाधवाला राणी

ताराबाअीने कोल्हापुरास बोलविल्यामुळे मराठयांच्या चढाअीचा जोर कमी झाला. २० फेब्रुवारी १७०७ मध्ये औरंगजेबाचे अहमदनगर मुक्कामी निधन झाले आणि त्या बरोबरच मराठयांच्या युध्दशास्त्रातील अेक महत्वाचे पर्व संपुष्टात आले. १६८० ते १७०७ ही २७ वर्षे मराठयांनी महाराष्ट्रापासून जिंजीपर्यंत औरंगजेब बादशहाच्या प्रचंड सेनेविरुध्द सतत संघर्ष चालू ठेवला आणि प्रसंगाला साजेल अशी युध्दनिती व परिस्थितीला जमेल असा युध्दव्यवहार या दोन तत्वांच्या आधारावर मराठी राज्याचे रक्षण केले, अितकेच नव्हेतर आपल्या युध्द कौशल्याने मराठयांच्या युध्दशास्त्राच्या अुत्क्रांतीत महत्वाची भर टाकली.

प्रकरण चौदावे

संदर्भसूची

१ श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांचे चरित्र - मल्हार रामराव चिटणीस - विरचित संपादक र.वि.हेरवाडकर

२ मराठी रियासत खंड पहिला स्थिरबुद्धी राजाराम गो.स. सरदेसाअी

३ मराठ्यांचे स्वातंत्र्य समर - पूर्वार्ध - १६८१-१७०७, ब.श्री. पुराणिक

४ मोगल आणि मराठे (तारीखे दिल्कुशा) संपादक सेतुमाधवराव पगडी

५ ताराबाअी कालीन कागदपत्रे खंड पहिला - संपादक डॉ.अप्पासाहेब पवार

६ English Records on Shivaji
शिवचरित्र कार्यालय

७ मराठे व औरंगजेब - मासिरी आलमगिरी या फारसी ग्रंथाचा मराठी अनुवाद - संपादक सेतु माधवराव पगडी

८ रामचंद्र निळकंठ अमात्यकृत - आज्ञापत्र अथवा मराठे शाहीतील राजनिती - संपादक वामन गोपाळ कुब्वेरबे

९ मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध (खाफीखान साधन ग्रंथ) संपादक सेतु माधवराव पगडी

१० The Jinjivas OR The Stay of Chatrapati Rajaram at Jinji - Vishnu Laximan Kale 1896.

प्रकरण पंधरावे

मराठ्यांच्या तापी-नर्मदा खोऱ्यातील मोहिमा

(Maratha Compaigns in Tepi Narmada Region)

सामान्य लष्करी परिस्थिती

(General Military Situation)

ख्रि.स. १७०० ते १७०७ हा सात वर्षांचा काळ म्हणजे मोगल आणि मराठे यांच्या प्रदिर्घ संघर्षाचे शेवटचे पर्व होय. या काळात औरंगजेब बादशहाच्या वृध्दावस्थेमुळे मोगल सेनेच्या विखुरलेल्या तुकड्यांवर बादशहाचे नियंत्रण जवळजवळ नष्ट झाले होते. मोगल अधिकारी बादशहाचा अंत कधी होणार आणि त्यानंतर निर्माण होणाऱ्या राजकीय पोकळी मध्ये सत्ता कोणाच्या हाती जाणार या गोष्टींचाच प्रामुख्याने विचार करु लागले होते. या वेळी मानुसी नावाचा इटालीयन प्रवासी बादशहाच्या छावणीत जातीने हजर होता. त्याने लिहिलेल्या हकीगतीवरुन मोगलांची एकंदर लष्करी व्यवस्था अत्यंत डबघाईला आली होती असे दिसते. सेनेची वाटचाल चालू असतांना वृध्दबादशहा पालखीत बसून परमेश्वराची प्रार्थना करीत असे. बादशहाची छावणी म्हणजे जगातील एक अत्यंत गलिच्छ जागा होती असे मानुसी म्हणतो. औरंगजेबाच्या या दैन्यावस्थेत मराठ्यांचे हल्ले होत त्यावेळी त्यांचा प्रतिकार करण्याऐवजी त्यांना पुष्कळशा रकमा देऊन मोगल सेनेचे अधिकारी युध्दबंदीची व्यवस्था करीत असत. बादशहाला या वस्तुस्थितीची पूर्ण जाणिव होती. परंतु अशा कारवायांवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती नाहिशी

तापी-नर्मदा खोरे मोहिम


झांशी
बुंदेलखंड
माळवा
सिरोंज
उज्जैन
भोपाळ
नर्मदा नदी
हुशंगाबाद
बडोदे
राजपिपला
भडोच
थ
रा
विदर्भ
तापी नदी
सुरत
ज
बऱ्हाणपूर
गु
औरंगाबाद
सातारा

झाल्यामुळे या कारवाया बंद करणे त्याच्या आटोक्या बाहेरचे होते.

याअुलट कोणतीच केंद्रीय सत्ता अस्तित्वात नसताना देखील प्रबळ मराठा सरदार आपापल्या सेनेच्या तुकड्या घेअून मोगल सेनेवर शक्य असेल तेथे हल्ला करीत. ही सेना आतून किती पोखरली गेली आहे याची स्पष्ट कल्पना असल्यामुळे आणि आक्रमक हल्ला चढविल्यास कोणतेही नुकसान न होता अुलट सैन्याच्या खर्चाकरिता द्रव्यसाधना करण्याचा तो अेक अुत्तम मार्ग आहे हे माहित असल्यामुळे स्वतःच्या हिंमतीवर ते मोगलांविरुध्द आक्रमक कारवाया करू लागले. मोगली छावण्यांवरील लूटालूटीत अुत्तम जातीचे घोडे आणि क्वचित प्रसंगी तोफा ही महत्वाची युध्दोपयोगी सामुग्री हस्तगत होत राहिल्यामुळे मराठी सैन्यात घोडदळाची संख्या वाढू लागली. त्यामुळेच महाराष्ट्रात पसरलेल्या मोगल छावण्यांवर हल्ले करून त्याशिवाय महाराष्ट्रा बाहेरील दूरवरच्या मोगल अमलाखालील प्रदेशावर आक्रमण करून तेथे चौथाअीचे हक्क प्रस्थापित करण्याचा महत्वाकांक्षी अुद्योग मराठ्यांनी सुरू केला.

मराठ्यांच्या तापी-नर्मदा क्षेत्रातील मोहिमा (नकाशा नं. ९५)

(Maratha Campaigns in the Tapi and Narmada Region)

ख्रि.स. १७०२ च्या पावसाळ्यानंतर नेमाजी शिंदे हा १५००० स्वारांची अेक तुकडी घेअून प्रथम मध्य महाराष्ट्रातून बाहेर पडला. सध्याच्या विदर्भातील सर्व मोगल ठाणी लुटून त्याने तापी नदी ओलांडली आणि भोपाळ जवळील हुशंगाबाद पर्यंत धडक मारली. तेथील मोगल ठाण्यावर कब्जा करून त्याने नर्मदा नदी पार केली आणि पुढे पश्चिमेकडे अुज्जैनपर्यंत धाडदौड करून

माळव्यातील अनेक मोगल ठाण्यांवर मराठी अंमल प्रस्थापित केला. ही वार्ता औरंगजेबाला कळताच त्याची वाट अडविण्यासाठी बादशहाने गाझीउद्दीन फिरोजजंग याच्या हाताखाली २००० घोडदळ देऊन आणि त्याचप्रमाणे आझमशहा आणि बेदरबख्त यांच्या तुकड्याही त्याच्या अधिपत्याखाली तैनात करून त्यांना नेमाजीला रोखण्यासाठी पाठविले. या फौजांची आणि नेमाजीच्या सैन्याची सिरोंज मुक्कामी गाठ पडली. त्या ठिकाणी झालेल्या घुमश्चक्रीच्या लढाईत मोगल सेनेचे संख्याबळ अधिक असल्यामुळे नेमाजीला पराभव पत्करावा लागला आणि त्याने तेथून माघार घेतली. परंतु त्याने तेथे तेवढ्यावरच न थांबता पूर्वेकडे वळून तो बुंदेलखंडात पोहचला आणि तेथील राजपूत अधिपती राजा छत्रसाल याच्याशी त्याने मदतीची याचना केली. नेमाजीची ही चाल ओळखून फिरोजजंगाच्या तुकड्यांनी नेमाजीच्या तुकड्यांचा पाठलाग सुरू केला त्यामुळे नेमाजीला नाईलाजाने दक्षिणेकडे वळून विदर्भातून पुन्हा महाराष्ट्रात परत यावे लागले.

यानंतर १७०५ च्या आक्टोबर मध्ये नेमाजी शिंदे, दादो मल्हार आणि रंभाजी निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली ४०००० स्वारांची एक मोठी मराठा तुकडी घेऊन सेनापती धनाजी जाधवाने गुजराथकडे प्रयाण केले. प्रथम सुरतेवर हल्ला करून त्यांनी तेथे लूटालूट केली आणि मोगल ठाणेदाराला कैद केले. सुरतेवरील हल्ला यशस्वी झाल्यानंतर मराठी सेनेने उत्तरेच्या दिशेने आपली घोड दौड चालू केली आणि एक आठवड्याच्या आतच त्यांनी भडोचवर हल्ला केला. सुरत आणि भडोच यांच्या दरम्यान घोडदौड करीत असताना भडोचाचा फौजदार नझरअलीखान आणि त्याचा दुय्यम ख्वाजाहमीद हे दोन

मोगल सरदार ६००० चे घोडदळ घेऊन मराठ्यांवर हल्ला करण्यास सिध्द झाले. यावेळी झालेल्या चकमकीत मराठी सेनेची ताकद अधिक असल्यामुळे कांही तासातच मोगल सेनेला पराभव पत्करावा लागला आणि हे दोन्ही सरदार मराठ्यांचे कैदी झाले. त्यांनी ८ लाख रुपये दंड भरल्यामुळे धनाजीने त्यांची सुटका केली. त्यानंतर नोव्हेंबर १७०५ पासून ते फेब्रुवारी १७०६ पर्यंत सर्व गुजराथ प्रांतात जागोजागी हल्ले करुन मराठ्यांनी अमाप लूट जमा केली. मार्च १७०६ च्या प्रारंभी मराठी सेनेने आपले लक्ष पुन्हा बडोद्याकडे वळविले ही वार्ता बडोद्याचा मोगल फौजदार नजरअली याला कळताच आदल्या वर्षी झालेल्या पराभवाचे उट्टे काढण्यासाठी मराठी सेनेची वाट अडविण्यास तो बडोद्याहून निघाला आणि मराठी सेनेने नर्मदा पार करु नये या उद्देशाने त्याने नर्मदेच्या दक्षिण तीरावरील राजपिपळा जवळ असलेल्या रतनपुरा या गावी मराठ्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु पुन्हा नझरअलीखानाची सेना संख्येने अपुरी असल्यामुळे धनाजीने तिचा सपशेल पराभव केला. या लढाईतून वाचलेल्या मोगल सेनेच्या कित्येक छोट्या तुकड्यांनी जीव बचावण्यासाठी भडोच शहराचा आश्रय घेतला. या विजया नंतर मराठा सेनेने आपली घोडदौड पुढे चालू ठेवली आणि मार्चच्या अखेरीस बडोद्याचे मोगल ठाणे उध्वस्त करुन तेथेही मराठी अंमल प्रस्थापित केला. अशा रितीने सुरत, भडोच आणि बडोदा ही मोगलांच्या ताब्यात असलेली अत्यंत सधन आणि समृध्द शहरे ताब्यात घेऊन गुजराथेतील सर्व प्रदेशावर चौथाईचे हक्क स्थापन केले. गुजराथची मोहिम संपल्यावर एप्रिल १७०६ मध्ये मराठी सेना पूर्वेकडे वळली आणि त्यांनी बऱ्हाणपूर या प्रमुख मोगल ठाण्यावर हल्ला करुन तेथेही लुटालूट केली. शेवटी पावसाळा सुरु होण्याच्या अगोदर मराठी सेना महाराष्ट्रात परत आली. मानुसीच्या म्हणण्याप्रमाणे स्वारी केलेल्या या सर्व

प्रदेशात मराठी अम्मल कायम करावा म्हणून धनाजीने मोगलांच्या धर्तीवरच राज्य व्यवस्था पाहण्यासाठी सुभेदार, कमावीसदार आणि राहदार हे अधिकारी नियुक्त केले. सामान्यपणे सुभेदाराकडे ८ ते १० हजार मराठी सेनेची तुकडी ठेवली जात असे. सुभेदाराच्या हुकमाप्रमाणे कमावीसदार निरनिराळ्या तालुक्यातून जाऊन चौथाईची रक्कम गोळा करीत असे. राहदाराकडे मोठ्या रस्त्यांवर मोक्याच्या जागी चौक्या बसवून गाड्या आणि जनावरे यांच्यापासून कर वसुल करण्याचे काम तो करीत असे. जर अेखाद्या ठिकाणी प्रतिकार होऊन कामात अडथळा आला तर ती खबर तातडीने सुभेदारास देण्यात येई आणि लगेच सैन्याची तुकडी घेऊन सुभेदार प्रतिकाराचा मोड करीत असे. या पध्दतीमुळे १७०५ व १७०६ या दोन वर्षात संपूर्ण गुजराथ प्रांत, माळव्याचा दक्षिण भाग आणि खानदेशचा अुत्तर भाग या सर्व प्रदेशावर मराठ्यांनी आपला अम्मल जारी केला.

गुजराथ, माळवा आणि खानदेश हे तिन्ही प्रदेश सुपीक, सधन आणि समृध्द असल्यामुळे मोगल सेनेला द्रव्य आणि सामुग्री यांचा पुरवठा करणारे ते अेक महत्वाचे क्षेत्र होते. त्या खेरीज दिल्लीहून दक्षिणेकडे येणारा मुख्य मार्ग याच प्रदेशातून जात असल्यामुळे हे सर्व प्रांत मराठ्यांच्या हातात गेल्याने मनुष्यबळाची कुमक, द्रव्य आणि अन्नधान्याचा साठा या दक्षिणेतील मोगल सेनेला लागणा-या मुख्य गरजा प्रमुख मार्गच बंद झाला. त्यामुळे आधीच डबघाईला आलेला बादशाही सेनेची अेकंदर परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच बिकट होत चालली आणि या सर्वांचा परिणाम म्हणून थकलेल्या औरंगजेब बादशहाने १७०७ च्या फेब्रुवारीत दक्षिणेतच आपला देह ठेवला.

मराठे आणि राजपूत यांची युती

(Maratha-Rajpat Alliance)

मराठ्यांनी औरंगजेबासारख्या प्रबळ मोगल सम्राटाला दिलेले अुघड आव्हान आणि त्यामुळे मोगल सत्तेची झालेली दमछाक यांचा दूरगामी परिणाम अुत्तर भारतातील राजपूत जमातीवर झाल्याशिवाय राहिला नाही. सर्व साधारणपणे राजस्थानमधील राजपूत राजा-महाराजांनी मोगलांची सेवा करण्यात धन्यता मानली तरी बुंदेलखंडातील राजपूत त्याला अपवाद ठरले. यांना बुंदेल राजपूत असे म्हणत. यापूर्वी आपण पाहिलेच आहे की संभाजी आणि राजा राम यांच्याविरुध्द केलेल्या अनेक मोगल स्वाऱ्यांमध्ये राव दलपत बुंदेला याला बादशहा नेहमी जोखमेची आणि जबाबदारीची कामगिरी सांगत असे. १६७० नंतर मात्र मोगल सत्तेविरुध्द अुघड संघर्ष करणारा बुंदेलखंडातील प्रमुख राजपूत नेता म्हणजे राजा छत्रसाल हा होय. खि.स. १६६८ मध्ये मिर्झा राजा जयसिंगाच्या सैन्याबरोबर मोगल सरंजामदार म्हणून त्यावेळी १५ वर्षे वयाचा असलेला छत्रसाल दक्षिणेत आला होता, आणि पुरंदरचा वेढा चालू असताना प्रत्यक्ष शिवाजी महाराजांना पाहण्याचा आणि भेटण्याचा योग त्याला आला. शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वामुळे प्रभावित होअून मोगल सेना अुत्तरेकडे परत फिरल्यावर त्याने मराठ्यांचेच अनुकरण करून औरंगजेब बादशहा विरुध्द अुघड संघर्ष करण्याचा निश्चय केला. बुंदेलखंड आणि माळवा या प्रदेशावर त्यानेही आपला चौथाईचा हक्क बसविला. सध्याच्या अुत्तर प्रदेशातील आग्रा-झाशी, या अुत्तर दक्षिण रेषेच्या पूर्वेकडील प्रदेशास बुंदेलखंड हे नाव आहे.

या रेषेच्या पश्चिमेकडील इंदोर, भोपाळ, धार, देवास, उज्जैन या भागास माळवा असे म्हटले जाते. बुंदेलखंड आणि माळवा हे प्रदेश युध्दनैतिक दृष्टया त्या काळात अत्यंत महत्वाचे होते. कारण दिल्लीहून दक्षिणेकडे जाण्याचे सर्व मार्ग याच प्रदेशातून खाली जात असल्यामुळे मोगलांच्या दृष्टीने त्यांच्या विरुध्द संघर्ष करणा-या मराठे आणि राजपूत यांचा अंमल या प्रदेशावर असणे अतिशय धोकादायक होते. याच गोष्टीची मराठे आणि बुंदेले यांना पुरेपुर जाणीव असल्यामुळे या दोन्ही प्रदेशांवर आपला अंमल ठेवण्यासाठी दोन्ही पक्षांनी पुढील ६० वर्षे कसोशीने प्रयत्न केले. इ. स. १७०० मध्ये औरंगजेब आणि त्याच्या सेना अजिंक्यतारा आणि पन्हाळगड हे किल्ले घेण्याच्या प्रयत्नात असताना ती संधी साधून छत्रसालाने मोगल सरदार शेरअफगाण याच्यावर हल्ला करुन त्याला ठार केले. छत्रसालाच्या या मोगल विरोधी धोरणामुळेच १७०२ साली सिरोंज मुक्कामी झालेल्या लढाईत फिरोजजंगाकडून झालेल्या पराभवानंतर नेमाजी शिंदे या मराठा सरदाराने शिरोंजच्या पूर्वेकडे धाडदौड सुरु केली आणि बुंदेलखंडात प्रवेश करुन तो छत्रसालकडे मदत मागण्यासाठी गेला, अर्थात फिरोजजंगाने त्याचा पाठलाग केल्यामुळे बुंदेलखंड सोडून नेमाजी शिंदे याला महाराष्ट्रात परत यावे लागले. या पुढील काळात छत्रसालाच्या बरोबरच जयपूरचा सवाई जयसिंग, मारवाडचा अजितसिंग आणि मेवाडचा अमरसिंग या राजपूत प्रमुखांनी मराठ्यांशी मित्रत्वाचे संबंध कायम ठेवले. आणि शाहू महाराज व बाजीराव पेशवे यांना मोगलांच्या विरुध्द मराठी सत्तेचा विकास करण्यास फार मोठी मदत केली.

लष्करी मुल्यमापन

१६९९ पासून १७०७ पर्यंतच्या सात आठ वर्षांच्या काळात मराठी राज्याच्या मातब्बर सरदारांनी कोणत्याही त-हेचे केंद्रीय नेतृत्व किंवा सूत्र संचलन नसताना अेकमेकांच्या सांघिक विचाराने मोगल सत्ते विरुध्द प्रत्यक्ष महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राच्या बाहेर गुजराथ, माळवा आणि बुंदेलखंड अशा दूरवरच्या प्रदेशात मोगल सत्तेला प्रखर आव्हान देअून मराठी सत्ता नुसती कायम राखली अितकेच नव्हे तर ती भक्कम पायावर अुभी करुन तिच्या विकासाच्या नव्या दिशा स्पष्ट करुन ठेवल्या या नेत्रदिपक कामगिरी मुळेच प्रकरण १२ मध्ये या काळाला मराठ्यांच्या युध्दपध्दतीचा अुज्वल काळ असे नाव दिले आहे. मराठ्यांनी मिळवलेल्या या असाधारण यशाचे रहस्य कोणते असा प्रश्न विचारल्यास त्याचे अुत्तर त्यांच्या युध्दनैतिक पवित्रा असेच द्यावे लागेल. अेका बाजूने प्रत्यक्ष महाराष्ट्रात शक्तिपात झालेल्या मोगल सैन्यावर शक्य असेल त्या सर्व ठिकाणी हल्ले करणे, त्यांच्या युध्द सामुग्रीची लूटालूट करणे आणि त्यांच्या संचाराचे मार्ग अडवून व त्यांची रसद तोडून त्यांची नाकेबंदी करणे अशी चौफेर खच्चीकरणाची मोहिम त्यांनी अखंडपणे चालू ठेवली. याच्या अुलट महाराष्ट्राबाहेर गुजराथ, माळवा आणि बुंदेलखंड या प्रदेशात संपूर्णपणे आक्रमक चढाअी करुन प्रत्येक ठिकाणी मोगल सेनेचा पराभव केला तेथून अमाप संपत्ती गोळा केली आणि अेवढे करुन न थांबता या प्रदेशात मराठ्यांचा अंमल जारी करुन तेथे आपला परंपरागत चौथाअीचा हक्क स्थापन केला. अशारितीने अेकाच वेळी त्याच शत्रूच्या विरुध्द परस्परां-

पासून दूर असलेल्या दोन वेगळ्या सेनांमध्ये अेकीकडे खच्चीकरणाची मोहिम आणि दुसरीकडे संपूर्ण आक्रमक चढाअी अशा दुहेरी युध्दनितीचा यशस्वी वापर करुन या काळात मराठ्यांनी आपल्या युध्दशास्त्राच्या तंत्रात आणखी अेक क्रांतिकारक बदल केला.

प्रकरण पंधरावे

संदर्भसूची

१ श्री छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन हिंदवी स्वराज्याचा मोगलांशी झगडा, वा.सी.बेंद्रे

२ थोरले शाहू महाराज यांचे चरित्र - मल्हार रामराव चिटणीस विरचित संपादक - र.वि.हेरवाडकर

३ छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र - कृष्णराव अर्जुन केळुसकर, भाग १५वा (मराठ्यांचे आरमार)

४ Kanhoji Angrey - Maratha Admiral - Manohar Malgaonkar

५ The Maratha Navy B.K.Apte

६ The Maratha Supremacy (The History and Culture of Indian People) Edited by R.C.Mujumdar Ch.1,3,5 15-18.

प्रकरण सोळावे

मराठ्यांची दिल्लीकडे धाडदौड

१७०७ - १७२०

(Maratha Dash to Delhi 1707-1720)

मराठ्यांचे यादवी युध्द

(Maratha Civil War)

खि.स. १७०७ मध्ये औरंगजेब बादशहाचे निधन झाल्यानंतर त्याचा मुलगा आझमशहा याने दिल्लीचे तख्त बळकावून मोगल साम्राज्याची सूत्रे हाती घेतली. यावेळी मराठी सत्ता हिच मोगलांच्या विरुध्द असलेली प्रमुख शक्ति होती. या शक्तिचा नाश रणक्षेत्रावर करणे अशक्य आहे याबद्दल नवीन बादशहा आझमशहा आणि त्याचा सल्लागार झुल्फिकारखान यांची खात्री होती. म्हणून मराठी राज्यामध्ये अंतर्गत भांडण-तंटे वाढवून दिल्यास त्यांची शक्ति आपोआपच कमी होत जाईल आणि मग मराठ्यांशी सशस्त्र संघर्ष करण्याचे कारणच उरणार नाही, असा अंदाज दिल्लीतील मोगल नेत्यांनी केला. छत्रपती राजारामाच्या निधना नंतर त्यांची पत्नी महाराणी ताराबाई हिने मराठा सत्तेचे वारसदार आपणच आहोत अशी घोषणा करून कोल्हापूर येथे मराठ्यांची नवी गादी प्रस्थापित केली होती. यावेळी छत्रपती संभाजीच्या पत्नी महाराणी येसूबाई आणि पुत्र शाहू आणि त्यांचे सर्व परिवार १६८९ पासून बादशहाच्या कैदेत असल्यामुळे आणि ते मुक्त होऊन परत कधी येतील याबद्दल अनिश्चिती असल्यामुळे रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी मल्हार, धनाजी जाधव आणि इतर अनेक मराठा मातब्बर सरदार आपण कोणत्या पक्षाकडे जावे या विषयी साशंक होते. यापैकी बऱ्याच जणांनी

उघडपणे आणि काहींनी ~~गुप्तीस्त्या~~ गुप्तरित्या ताराबाईला आपला पाठिंबा व्यक्त केला. महाराष्ट्रात निर्माण झालेली ही गोंधळाची परिस्थिती अधिक विस्कटून टाकावी असा धूर्त विचार करून १७०७ च्या एप्रिल महिन्यात झुल्फिकारखानाने आझमशहा कडून फक्त शाहूची मुक्तता करण्याचा हुकूम मिळविला आणि त्याप्रमाणे तो सिध्दीस नेला. हा हुकूम मिळाला. त्यावेळी आझमशाही ची छावणी नर्मदेच्या परिसरात होती. शाही हुकमाप्रमाणे थोडासा सरंजाम बरोबर देऊन शाहूला १७०७ च्या मे महिन्यात साताऱ्याकडे रवाना करण्यात आले आणि लगेचच शाहूने सातारा येथे मराठ्यांची दुसरी गादी स्थापन केली. या नंतर पुढील सात वर्षे म्हणजे १७११ च्याअखेर पर्यंत ताराबाईचा पक्ष आणि शाहूचा पक्ष यांनी एकमेकांवर हल्ले सुरु केले आणि या यादवी युध्दामुळे (Civil War) संपूर्ण महाराष्ट्रभर अराजकाचे वातावरण चालू राहिले. जवळजवळ १८ वर्षे मोगलांच्या कैदेत राहिल्यामुळे आणि शेवटी त्यांनीच त्याची मुक्तता करून त्याला गादीवर बसण्याची संधी दिल्यामुळे दिल्लीच्या सत्तेविरुध्द उघड संघर्ष करणे शाहूस मान्य नव्हते. उलट बादशहाने दक्षिणेतील मराठ्यांची सत्ता मान्य करून दक्षिणेतील बादशहाचे सुभेदार म्हणून चौथाई आणि सरदेशमुखीची सनद आपणास द्यावी अशीच त्याची अपेक्षा होती. महाराणी ताराबाईने सुध्दा बादशहाकडे याच हक्काची मागणी केली होती. झुल्फिकारखानाचे आणि राजारामाचे जिंजीच्या वेढ्यापासून सलोख्याचे संबंध असल्यामुळे त्याच्या पत्नीस म्हणजे ताराबाईस शक्यतो सवलती द्याव्यात असा त्याचा विचार होता. ताराबाई आणि शाहू यांच्या या परस्पर विरोधी मागण्या मोगल दरबारी पोहचल्या त्यावेळी दिल्ली येथे राज्यक्रांति होऊन आझमशहा मारला गेला होता आणि नवीन बादशहा म्हणून त्याचा पुत्र बहादूरशहा याने

मोगल सत्तेची सूत्रे हाती घेतली होती. बहादूरशहाच्या दृष्टीने त्याचा धाकटा कामबक्ष हा महाराष्ट्रातच असल्यामुळे तो आपल्याला डोईजड होईल अशी भिती होती. हे संकट निवारण्यासाठी त्याने कामबक्षाविरुध्द मोहिम सुरु केली आणि त्याकरिता शाहू आणि त्याच्या पक्षाचे मराठे सरदार यांची मदत मागितली. शाहूने ही मदत तात्काळ दिल्यामुळे कामबक्षाचा पाडाव झाला आणि साहजिकच शाहूची विनंती मान्य करावी असे बहादूरशहास वाटू लागले. या सुमारास मुन्यिमखान हा त्याचा वजीर होता. मराठ्यांमधील भांडणे तेवत ठेवणे हीच मोगल सत्ता टिकविण्याची हमी आहे असा सल्ला बहादूरशहास देऊन त्याने असा फतवा काढला की शाहू आणि ताराबाई यांनी आपले भांडण युध्द करून मिटवावे आणि त्यात जो पक्ष विजयी होईल त्यास बादशहाकडून दक्षिणेची सुभेदारी बहाल करण्यात येईल. मोगलांनी टाकलेल्या या धूर्त डावामुळे मराठ्यांचे यादवी युध्द धुमसतच राहिले. वंशपरंपरागत चाललेल्या राजवटींमध्ये यादवी युध्द ही घटना अटळच ठरते. इंग्लंडमध्येही लँकेस्टर आणि यॉर्क या दोन राजघराण्यांमध्ये असेच यादवी युध्द झाले होते. अमेरिकेसारख्या लोकशाही राष्ट्रात सुध्दा उत्तर पक्ष आणि दक्षिण पक्ष यांच्यामध्ये गुलामी नष्ट करण्याच्या प्रश्नावरून १८६२-६४ असे यादवी युध्द झाले.

शाहूच्या सत्तेचा विकास

(Expansion of Shahu's Power)

मराठे शाहीतील यादवी युध्द ६-७ वर्षे चालू असले तरी मराठी सत्तेच्या सुदैवाने आणि शाहूच्या उदार आणि मनमिळावू स्वभावामुळे त्याच्याभोवती

कर्तबगार आणि हुषार व्यक्ति आपोआपच गोळा होत गेल्या. यापैकी सर्वात प्रमुख व्यक्ति म्हणजे सेनापती धनाजी जाधव ही होय. धनाजी बरोबर व सर लष्कर हैबतराव निंबाळकर, खंडेराव दाभाडे, मानसिंग मोरे, नेमाजी शिंदे, कंठाजी कदम, परसोजी भोसले, बहिरोपंत पिंगळे आणि खंडो बल्लाळ असे अनेक लढाऊ सरदार शाहूच्या सेवेत अेकनिष्ठपणे काम करु लागले. १७०८-९ या दोन वर्षांत शाहू ने ताराबाअी विरुध्द मोहिम सुरु केली आणि पन्हाळा व विशाळगड या किल्ल्यांवर कब्जा करुन कोल्हापूरात आपले ठाणे बसविले. या पराभवामुळे संपूर्ण मराठी राज्य हस्तगत करण्याचा आपला नाद सोडून देऊन ताराबाअीने कोल्हापूरच्या आसपासच आपली सत्ता स्थापन करावी आणि शाहूशी मिळते घेऊन रहावे असा पोक्त सल्ला रामचंद्रपंत अमात्यांनी ताराबाअीस दिला. यामुळे यापुढील यादवी युध्दाची धार पुष्कळ अंशाने कमी झाली. ताराबाअी विरुध्दची मोहिम आटोपून शाहूची सेना साताऱ्याकडे परत येत असताना वारणा नदीच्या काठी वडगांव येथे जून १७१० मध्ये सेनापती धनाजी जाधव मृत्यु पावला. धनाजीच्या मृत्युमुळे शाहूच्या सेनेत आणि राज्यकारभारात अेक मोठी पोकळी निर्माण झाली परंतु मराठी सत्तेच्या सुदैवाने राज्य व्यवस्थेत हुषार आणि युध्दकार्यात तडफदार असलेली अेक महत्वाकांक्षी व्यक्ति या वेळी शाहूजवळ आली ती म्हणजे बाळाजी विश्वनाथ भट ही होय. अितिहासकार राजवाडे आणि रावबहादूर सरदेसाअी यांनी केलेल्या संशोधनाप्रमाणे सिद्दीच्या अमलाखालील श्रीवर्धन या गावच्या भट घराण्यात जन्म झालेला बाळाजी विश्वनाथ हा १६९९ च्या सुमारास कोकणातून देशावर आला आणि त्याने धनाजी जाधवांच्या सेनाविभागात काम करण्यास सुरुवात केली. बाळाजीची हुषारी आणि तडफ हेरुन

धनाजीने अनेक महत्वाची लष्करी कामे त्याच्यावर सोपवली आणि बाळाजीने ती राजनिती आणि युध्दनिती यांचा कौशल्यपूर्ण वापर करून यशस्वी करून दाखविली. १७०६ पासून पुढे धनाजीच्या मृत्युपर्यंत बाळाजीने प्रथम दौलताबाद येथे आणि नंतर पुणे मुक्कामी सर सुभेदार म्हणून काम केले. या पार्श्वभूमीमुळे धनाजीच्या निधनानंतर लगेचच शाहूने बाळाजीस साता-यास बोलावून राज्य कारभाराचे सर्व काम त्याच्याकडे सुपूर्त केले. १७११ च्या प्रारंभी धनाजीचा पुत्र चंद्रसेन जाधव आणि हैबतराव निंबाळकर हे दोघे सरदार शाहूचा पक्ष सोडून शत्रूस जाऊन मिळाले आणि या प्रकारामुळे उत्तेजित होऊन ताराबाईने शाहू-विरुध्द मोहिम काढण्याची तयारी सुरु केली. ही वार्ता समजताच बाळाजीने साता-यास असलेले २००० स्वारांचे लष्कर तयार ठेवून आणि नवीन सैन्यभरती ताबडतोब करून ताराबाईच्या मोहिमेस उत्तर देण्यासाठी एक प्रबळ सेनाविभाग उभा केला. या तडफदार कारवायांमुळे ताराबाईच्या योजना धुळीस मिळाल्या. बाळाजीच्या कर्तबगारी बद्दल ऑगस्ट १७११ मध्ये शाहूने त्याला सेनाकर्ते हा किताब देऊन त्याला मराठा सेनेच्या प्रमुख पदाचे अधिकार बहाल केले. त्यानंतर दोनच वर्षांनी म्हणजे १७१३ च्या नोव्हेंबर मध्ये बाळाजी विश्वनाथाची मराठी राज्याचे प्रधान मंत्री म्हणून पेशवे या पदावर नियुक्ति करण्यात आली. अशा रीतीने मराठ्यांच्या सत्तेचे सर्वोच्च मुलकी आणि लष्करी अधिकार बाळाजीच्या हातात एकत्रित झाले आणि त्या बरोबरच मराठ्यांच्या युध्दशास्त्रातील एका नव्या पर्वाचा प्रारंभ झाला.

राजनैतिक धोरणाची युध्दनैतिक बैठक

(Strategic Foundations of Diplomatic Policy)

खि.स. १७१३ मध्ये बाळाजी विश्वनाथ याची पेशवे म्हणून नियुक्ति

झाल्यावर शाहूची सत्ता अधिक शक्तिमान कशी होईल या प्रश्नावरच बाळाजीने आपले लक्ष केंद्रीत केले. शाहू आणि ताराबाई यांच्या पक्षातील निरनिराळ्या सरदारांमध्ये तंटे-बखेडे यांना ऊत आल्यामुळे या मंडळींना महाराष्ट्राच्या बाहेर काही तरी क्षेत्र उपलब्ध करून दिल्याखेरीज ही भांडणे मिटणार नाहीत याची बाळाजीला खात्री पटली. बाळाजीची नियुक्ती झाली त्याच सुमारास गाझीउद्दीन फिरोजजंग याचा मुलगा चीनकिलीजखान उर्फ निझाम-उल-मुल्क याची दक्षिणेतील मोगलांचा सुभेदार म्हणून नेमणूक झाली. औरंगाबाद येथे आपले मुख्य ठाणे प्रस्थापित करून ब-हाणपूर व-हाड, विजापूर, कर्नाटक, बिदर आणि हैद्राबाद या सहा सुभ्यांवरील नायब सुभेदारांवर त्याचा अंमल जारी झाला. दक्षिणेचा कारभार हाती घेतल्यापासून चौथाई सरदेशमुखीच्या हक्कावरून निझाम आणि शाहू यांच्यात संघर्ष सुरू झाला. शाहूच्या वाढत्या सत्तेला खिळ घालावी या हेतूने ताराबाईचा पुत्र शिवाजी दुसरा आणि तिच्या पक्षाकडील इतर सरदार यांच्याशी संगनमत करून निजामाने शाहू आणि बाळाजी यांच्यापुढे नवीन समस्या निर्माण केल्या. १७१२ ते १७१५ ही दोन वर्षे अशी परिस्थिती चालू राहिली. १७१५ च्या मध्यास दिल्लीच्या तख्तावर फर्रुखसियर याची नियुक्ती झाली आणि त्या बरोबरच हसनअली आणि हुसेनअली या दोन सय्यद बंधूंचे फार मोठे प्रस्थ माजले. वस्तुस्थिती अशी होती की स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी सय्यदबंधूंनी फर्रुखसियर यास गादीवर आणले होते आणि नेमक्या याच कारणासाठी सय्यदांचे अधिकार शक्यतितके कमी करून त्यांची उचलबांगडी कशी करावी याचा फर्रुखसियर सदैव विचार करीत होता. या हेतूने या दोन बंधूंची युती मोडून काढावी म्हणून बादशहाने

सय्यद हुसेनअलीस दक्षिणेचा सुभेदार नेमून त्याची औरंगाबादेस रवानगी केली आणि निझामास तेथून काढून टाकून त्याला मुरादाबादचा सुभा सांभाळण्याची कामगिरी दिली. हुसेनअलीने औरंगाबादेस पोहचल्यावर मराठ्यांशी मैत्रीच्या वाटाघाटी करण्यास सुरुवात केली. याचा अर्थ त्याला मराठ्यांबद्दल काही आपुलकी होती असा नव्हे. खरे कारण असे होते की हुसेनअलीला दक्षिणेत पाठवल्यावर बादशहाने मराठ्यांबरोबर मैत्रपूर्ण संबंध ठेवून त्यांनी परस्पर हुसेनअलीचा काटा काढावा अशा खटपटी सुरु केल्या बादशहाच्या या कारस्थानाची हुसेनअलीला वेळीच खबर मिळाल्याने बादशहाचा हा डाव अुलटविण्यासाठी त्यानेही मराठ्यांशी तहाच्या वाटाघाटी सुरु केल्या. ब-याच दिवसाच्या गाठीभेटी नंतर हुसेनअलीने बादशहाचे मार्फत मराठे आणि मोगल यांच्यात अेक तह घडवून आणला.

वरील तहाच्या अटींमध्ये खालील गोष्टींचा समावेश होता.

१) शिवाजीच्या वेळचे सर्व स्वराज्य शाहूच्या हवाली करण्यात यावे.

२) १७०० सालापासून मराठ्यांनी जिंकलेले प्रदेश म्हणजे खानदेश, व-हाड, हैद्राबाद, कर्नाटक अित्यादी मोगलांनी सोडून द्यावेत आणि ते रितसर मराठी स्वराज्यात सामील व्हावे.

३) दक्षिणेतील सर्व मुलुखांवर मराठ्यांनी चौथाअी आणि सरदेशमुखी वसुल करावी.

४) या बदल्यात मराठ्यांनी दरवर्षी बादशहाला दहा लाख रुपये खंडणी द्यावी आणि बादशहाच्या मदतीसाठी मराठ्यांनी १५००० स्वारांची अेक तुकडी सदैव तयार ठेवावी.

५) शाहूची मातोश्री येसूबाअी आणि त्याच्या परीवारातील अितर

नकाशा नं.१६

दिल्लीकडे घोडदौड


दिल्ली
जयपूर
राजस्थान
आग्रा
जोधपूर
झाशी
बुंदेलखंड
माळवा
उज्जैन
भोपाळ
इंदौर
गुजराथ
बुऱ्हाणपूर
औरंगाबाद
सातारा

मंडळी दिल्लीत बादशहाच्या कब्जात होती त्यांना मुक्त करून स्वराज्यात परत पाठविण्यात यावे.

१७१८ च्या अखेरीस हुसेनअलीने बादशहातर्फे हा तह मंजूर केला आणि शाही फर्मान लवकरच दिल्लीहून येअील असे आश्वासन दिले. या तहामुळे महाराष्ट्रात शाहूची प्रतिष्ठा वाढू लागली आणि त्यामुळे त्याचा जम बसण्यास मोठी मदत झाली. बादशहाच्या मदतीला मराठी पैदान देणे याचा अर्थच त्याच्या संरक्षणाची जबाबदारी मराठ्यांनी घेणे असाच होता. मात्र बादशहाला खंडणी देण्याच्या अटीमुळे मोगल सत्तेला संपूर्णपणे झुगारून देण्याची मराठ्यांची अिच्छा नव्हती असा समज झाला. शाहूचे मुख्य कारभारी या नात्याने चौथाअी सरदेशमुखीचे हक्क वसुल करण्यासाठी बाळाजीने लष्करी आणि मुलकी व्यवस्था तातडीने कार्यान्वीत केली.

मराठ्यांची दिल्लीकडे घोडदौड (नकाशा नं.१६)

(Maratha Desh to Delhi)

मोगल आणि मराठे यांच्या तहातील बाकीच्या अटी प्रत्यक्षात आणण्यासाठी योग्य ती कारवाअी सुरू झाल्यावर शेवटची मुख्य अट म्हणजे शाहूच्या कुटुंबीय मंडळींना दिल्लीहून महाराष्ट्रात परत आणणे ही अत्यंत महत्वाची गोष्ट बाकी होती. शाहूच्या आणि समस्त महाराष्ट्राच्या दृष्टीने जवळजवळ २९ वर्षे मोगल कैदेत असणाऱ्या महाराणी येसू बाअीस मुक्त करून परत स्वगृही आणणे ही अेक अस्मितेची गोष्ट होती. या अटीची अंमलबजावणी करण्यासाठी बाळाजी विश्वनाथाने हुसेनअलीकडे लकडा लावला.

त्यामुळे हुसेन अलीने तह मंजूर असल्या बद्दलचे बादशाही फर्मान लवकर निघावे म्हणून फर्रुखसियर च्या मागे तगादा लावला. बादशहाने मात्र हुसेनअलीची मानहानी करण्याची ही अुत्तम संधी आहे असा विचार करुन तहासंबंधी फर्मान काढण्यास नकार दिला आणि हुसेनअलीला शह देण्यासाठी नव्या २।१ सरदारांना औरंगाबादकडे रवाना केले. यामुळे नाराज झालेल्या हुसेनअलीनेही दिल्लीहून येणा-या अधिका-यांना कोणत्याही प्रकारचे सहकारी देण्यास नकार दिला. अिकडे दिल्ली मध्ये हुसेनअलीचा मोठा भाऊ हसनअली अुर्फ सय्यद अब्दुल्ला यानेही बादशहा विरुध्द जोराची कारस्थाने सुरु केली आपली बाजू अधिक बळकट करावा या हेतूने ज्येष्ठ सय्यदाने आपल्या कनिष्ठ भावास तातडीने दिल्लीस येण्याबद्दल निरोप पाठविला. या हालचालींमुळे हुसेनअलीने दिल्लीस जाण्याचे ठरविले. परंतु त्यासाठी तहाच्या अटीत ठरल्याप्रमाणे वरकरणी बादशहाच्या संरक्षणासाठी म्हणून १५००० मराठी सेना आपल्याबरोबर दिल्लीस पाठवावी अशी हुसेन अलीने शाहूकडे मागणी केली. शाहू आणि बाळाजी अशा त-हेच्या सुवर्ण संधीची वाटच पाहात होते. त्यांनी विनाविलंब १५००० स्वारांची अेक तुकडी तयार करुन सेनापती खंडेराव दाभाडे, खुद्द बाळाजी विश्वनाथ आणि अितर मराठी मातब्बर सरदार यांना हुसेनअली बरोबर दिल्लीस जाण्याची आज्ञा केली. मराठी सेनेचा हा विभाग नोव्हेंबर १७१८ मध्ये औरंगाबादेत दाखल झाला. २ डिसेंबरला सय्यदहुसेन आणि त्याच्या बरोबरची मराठी सेना यांनी औरंगाबादेतून कूच केले आणि १४ डिसेंबरला हा गट ब-हाणपूरमध्ये दाखल झाला. पुढे माळवा आणि राजस्थानमधून वाटचाल करीत असतांना मोहकमसिंग बुंदेले, जोधपूरचा राजा अजितसिंग आणि जयपूरचा सवाई जयसिंग हे मराठयांचे दोस्त सेनापतीही आपापल्या तुकडया घेऊन मराठी

सेनेला येऊन मिळाले. अशारितीने १७१९ च्या फेब्रुवारीच्या सुरुवातीसच मराठे आणि राजपूत यांची १०००० ची संयुक्त सेना खंडेराव दाभाडे आणि बाळाजी विश्वनाथ यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीत येऊन पोहचली. अेवढी मोठी फौज शहरात आल्यावर बादशहा त्याचे वरिष्ठ अधिकारी आणि दिल्लीतील आमजनता हे सर्व घाबरून गेले स्वतः बादशहाची तर अत्यंत केविलवाणी परिस्थिती झाली. या हालचालीमुळे ज्येष्ठ सय्यदाची बाजू अधिकच जोरदार झाली. या मंडळींनी फरुखसेअरला घाबरविण्याकरीता आणखी अेक डाव टाकला होता. पूर्वी संभाजी महाराजांच्या आश्रयासाठी आलेला औरंगजेबाचा मुलगा अकबर याचा पुत्र मुअीजुद्दीन हा आपल्या ताब्यात आहे आणि त्याला आम्ही आपल्याकडे दिल्लीस घेऊन येत आहोत असे फरुखसेअरला कळविण्यात आले होते. २२ फेब्रुवारी १७१९ रोजी बाळाजी विश्वनाथ आणि सय्यद बंधू यांची फरुखसेअरशी लालकिल्ल्यात मुलाखत झाली. या मुलाखतीत शाहूच्या कुटुंबीयांना ताबडतोब मुक्त करावे असे बादशहास सांगण्यात आले. त्यावेळी बादशहाने अुडवा अुडवीची अुत्तरे दिली. आणि बाळाजी आणि सय्यद बंधू आपापल्या छावण्यात परत गेले. लगेचच त्यांनी संपूर्ण दिल्ली शहराची नाके बंदी करून शाही राजवाड्यावर मराठी सेनेच्या चौक्या बसविल्या. अखेरीस १२ ते २४ मार्च १७१९ या अवधीत मोगल कैदेत असलेली महाराणी येसूबाअी व अितर कुटुंबीय मंडळी यांना बाळाजीच्या हवाली करण्यात आले. या दरम्यान फरुखसेअरचा खून झाला आणि सय्यद बंधूंनी महम्मदशहा याची तख्तावर स्थापना केली त्याचप्रमाणे नवीन बादशहाकडून मराठ्यांना चौथाअी आणि सरदेशमुखीचा हक्क देणा-या सनदा

नकाशा नं. १७

मराठा आरमार हालचाली


मुंबई
अलीबाग (कुलाबा)
विजयदुर्ग
सिंधुदुर्ग

बाळाजीकडे सुपूर्त करण्यात आल्या. अशा रितीने मराठी सैन्याने दिल्लीपर्यंत धडक मारली आणि लष्करी सत्तेच्या जोरावर अेक फार मोठा विजय संपादन केला. शाहूने दिलेली कामगिरीपूर्ण झाल्यामुळे मे च्या अखेरीस मराठी सेना होअून बाळाजी आणि दाभाडे महाराष्ट्राकडे परत फिरले आणि जुलैच्या प्रारंभी ते साता-यास येअून दाखल झाले.

मराठी आरमाराचे पश्चिम किना-यावरील वर्चस्व (नकाशा नं. १७)

(Maratha Supremacy on the Western Coast)

१६९० ते १७२० या ३० वर्षांच्या काळात मोगल आणि मराठे यांचा संघर्ष महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर चालू असतांना मराठ्यांच्या आरमाराने पश्चिम किना-यावर आपले निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. १६९० मध्ये मराठी आरमाराचा प्रमुख सुकोजी आंग्रे याचा मृत्यु झाल्यावर त्याची जागा ~~त्या[illegible] जा[illegible]~~ त्याचा मुलगा कान्होजी आंग्रे याने घेतली. पुढील १०-१५ वर्षांत विजय दुर्ग आणि सिंधुदुर्ग या दोन सागरी किल्ल्यांमध्ये मराठी आरमाराचे तळ प्रस्थापित करून आंग्रे यांनी मराठी आरमारातील लढाअू गलबतांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढविली. मराठ्यांचे हे आरमारी वर्चस्व त्या वेळचा मुंबअीचा अिंग्रज गव्हर्नर प्रेन्डरीक बून याच्या डोळ्यात सलू लागले आणि मराठी आरमाराला धडा शिकविला पाहिजे असा निश्चय करून त्याने अिंग्लंडमधून ५ अुत्कृष्ठ लढाअू जहाजे मागविली. या जहाजांवर १२५० नौ सैनिक आणि १४८ तोफा होत्या. १७ अेप्रिल १७१७ ला ब्रिटीश आरमाराच्या या कापनीत्याने विजय दुर्ग येथील (याला अिंग्रज अितिहासकार 'घेरिया' असे म्हणतात.) मराठ्यांच्या नावीक तळावर हल्ला केला. नक्द

गतीने संचार करणा-या मराठी आरमारातील गलबते आणि तारवे यांनी ब्रिटीशांच्या ओनड जहाजांवर प्रखर प्रतिहल्ले केले आणि त्यामध्ये २०० अिंग्रज खलाशी मृत्युमुखी पडले आणि २०० जखमी झाले. परिणामी या पराभवाने नामोहरम झालेल्या अिंग्रज कप्तानाला मुंबअीस परत जावे भाग पडले. त्यानंतर गव्हर्नर बून याने अिंग्लंड मधून आपली दोन जहाजे मागवून १७१८ च्या अखेरीस मराठी आरमाराच्या ताब्यात असलेल्या खांदेरी या सागरी किल्ल्यावर हल्ला चढविला. या हल्ल्यातही मराठी आरमाराने अिंग्रज आरमाराचा पुन्हा पराभव केला. या दोन पराभवांची हकीगत अिंग्लंड मध्ये पोहचल्यावर अिंग्रज सरकारने अिंग्रज लढावू जहाजांचा अेक स्कॉड्रन ॲडमिरल मॅथ्यूज याच्या हाताखाली मुंबअीकडे पाठविला. यावेळी अिंग्रज आरमाराने आपली ताकद वाढविण्यासाठी पोर्तुगीज आरमाराचीही मदत घेतली आणि १७२२ मध्ये मराठ्यांच्या ताब्यात असलेल्या अलीबाग येथील कुलाबा या किल्ल्यावर हल्ला केला. या तिस-या वेळेसही मराठी आरमाराने अिंग्रज आरमाराचा कडाडून प्रतिकार करून त्यांना मुंबअीकडे माघार घेण्यास भाग पाडले. या तीन पराभवांनंतर मात्र पुन्हा जवळ जवळ ६० वर्षे अिंग्रज आरमार पश्चिम किना-यावरील मराठी आरमाराची खोडी काढण्यास धजावले नाही.

मराठ्यांच्या यशाचे लष्करी मुल्यमापन १७०७-१७२०

(Military Assessment of Maratha Success- 1707-1720)

मराठ्यांना दिल्लीवरील मोहिमेत साध्य केलेल्या लष्करी प्रभाव

आणि त्यामुळे त्यांना प्राप्त झालेले राजकीय अधिकार या दोन्ही गोष्टींची शाहूची सत्ता समर्थ होण्यास फार मोठी मदत झाली. आणि त्यामुळेच मराठी सत्तेला पुन्हा वैभवाचे दिवस प्राप्त होतील याबद्दल महाराष्ट्रात आणि मराठ्यांचा अंमल असलेल्या सर्व प्रदेशात कोणालाही शंका अुरली नाही. अेप्रिल १७२० च्या सुरुवातीस बाळाजी विश्वनाथाचे पुण्याजवळील सासवड मुक्कामी निधन झाले आणि त्यानंतर केवळ १५ दिवसांनीच मराठी राज्याचे पंतप्रधान म्हणून बाळाजीचे पुत्र बाजीराव यांना १७ अेप्रिल दोन्ही छत्रपती शाहू यांनी समारंभ पूर्वक पेशवाअीची वस्त्रे दिली. १६८० पासून जवळजवळ ३५ वर्षे अंतर्गत आणि बाहेरील शत्रूंचा पूर्ण बीमोड करून मराठी सत्ता पुन्हा भक्कम पायावर अुभी राहिली. मराठ्यांच्या या यशाचे मुख्य रहस्य प्रमुख शत्रू असलेल्या मोगल या साम्राज्य सत्तेविरुध्द अखंड संघर्ष चालू ठेवण्यात मराठ्यांनी जी चिकाटी दाखविली आणि प्रसंगाला योग्य असे युध्दनैतिक पवित्रे वापरून शत्रूला जेरीस आणले या दोन गोष्टींतच दडलेले आहे असे म्हणावे लागेल.

१७०७ ते १७२० या १२ वर्षांच्या काळात मराठ्यांच्या युध्दशास्त्रातील अुत्क्रांतित घडून आलेला अेक महत्त्वाचा बदल म्हणजे राजकीय अुद्दिष्टाच्या पूर्तीसाठी युध्दनीतीचे धोरण कसे हाताळले पाहिजे याचे अेक नवीन तंत्र या १२ वर्षांत मराठ्यांनी प्रस्थापित केले. प्रसिध्द जर्मन युध्दशास्त्रज्ञ जनरल व्हॉन क्लॉझ्विट्झ यांनी असे म्हटले आहे की कोणतेही युध्द हे राजकीय अुद्दिष्टाच्या पूर्तीसाठीच लढले जाते. केवळ हौस म्हणून कोणतेही राष्ट्र युध्दासारख्या भयानक आपत्तीत पडण्यास तयार होत नाही. मूलभूत राजकीय ध्येयधोरण

प्रत्यक्षात राबविण्यासाठी ज्या अनेक मार्गांचा कोणत्याही राष्ट्राकडून अवलंब केला जातो त्यात युध्द करणे हा अेक मार्ग आहे, किंबहुना राजकीय धोरण प्रत्यक्षात आणण्याचा तो अेक असाधारण असा मार्ग आहे. राजकीय धोरणाची युध्दनैतिक धोरणापासून फारकत झाली तर युध्दास कोणताच अर्थ राहणार नाही आणि युध्द ही घटनाच अर्थशून्य ठरेल. क्लॉझव्हिट्झ यांच्या या विचाराचा खोलवर जाअून विचार केला तर असे दिसून येअील की कोणत्याही राष्ट्राच्या राजकीय धोरणामध्ये राष्ट्राची अंतर्गत अेकात्मता आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याचे बाह्य आक्रमणापासून संरक्षण अशा दोन स्पष्ट बाजू आहेत, किंबहुना असेही म्हणता येअील की विचार करून ठरविलेल्या राष्ट्रीय धोरण या नाण्याच्या अंतर्गत स्थैर्य आणि बाह्य आक्रमणापासून सुरक्षितता या दोन बाजू आहेत.

१७०७ ते १७१० या ११ वर्षांच्या कालखंडात मराठ्यांच्या सत्तेला प्रथम यादवी युध्दास तोंड द्यावे लागले. या प्रयत्नात मराठी सत्ताधाऱ्यांनी हा दृष्टीकोन ठेवला की देशाच्या अंतर्गत प्रश्नांमध्ये भांडणे अुत्पन्न झाल्यास ती शक्य तो सामोपचाराने आणि जरूर तेव्हा लष्करी सत्तेचा वापर करून परिणामकारकरित्या मिटविली पाहिजे याच हेतूने शाहू छत्रपतीने राज्यसत्ता हाती घेताच महाराणी ताराबाअींचे स्थान ओळखून त्यांच्याशी अनिवार्य परिस्थितीतच युध्दनैतिक पावले अुचलली आणि म्हणूनच मराठी सत्तेचे स्थिरस्थावर झाल्यावर सातारच्या गादीचे वैभव कायम राहून मराठ्यांची कोल्हापूर येथील गादी मर्यादित क्षेत्रात पुढे चालू राहिली. १७११ ते १७२० या कालखंडाने मराठ्यांच्या राजकीय आणि लष्करी अितिहासात अेक नवीन पर्व अुघडले.

मराठी सत्ता केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर सर्व हिंदुस्थानभर स्थापन करावयाची असेल तर त्यासाठी केवळ महाराष्ट्रात राहून भागणार नाही ही [illegible] तीव्र जाणीव मराठ्यांनी प्रथमच अनुभविली. भारतीय राजकारणात केंद्रबिंदू असलेल्या दिल्ली येथून जे सत्ता चालू राहते त्या सत्तेवर आपला प्रभाव पाडणे ही ती जाणीव होय. दिल्लीच्या राजकारणातील पक्षोपक्षांच्या अंतर्गत हेव्यादाव्यांवर काळजीपूर्वक नजर ठेवून त्याचा अधिकाधिक फायदा आपल्याला कसा घेता येईल आणि त्यामधून आपले अुद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपल्याजवळ असलेल्या लष्करी सत्तेचा प्रत्यक्ष युद्ध न करता अप्रत्यक्ष दबाव पाडून आपले कार्य कसे साधता येईल याचे अेक प्रात्यक्षिकच मराठ्यांच्या दिल्लीवरील घोडदौडीने दाखवून दिले. राजनैतिक धोरण राबविण्यासाठी युद्धनैतिक पवित्र्याचे आणि कार्यवाहीचे अधिष्ठान असलेच पाहिजे हा अेक नवीन मूलमंत्र मराठ्यांच्या युद्धशास्त्रात घातला गेला. आपण अभ्यासिलेल्या ४० वर्षांच्या मराठेशाहितील युद्धशास्त्राच्या अुत्क्रांतिचा हा अेक अुल्लेखनीय आणि दूरगामी टप्पा होता असे म्हटल्यास ते चूक ठरणार नाही.

प्रकरण सोळावे

ग्रंथसूची

१ छत्रपती राजाराम महाराज आणि नेतृत्वहीन हिंदवी स्वराज्याचा मोगलांशी लढा - त्रा.गो.ओंदे

२ थोरले शाहू महाराज यांचे चरित्र - मल्हार रामराव चिटणीस विरचित - संपादक र.वि. हेरवाडकर

३ छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र - कृष्णराव अर्जुन केळूसकर - भाग १५वा (मराठ्यांचे आरमार)

४ Kanhoji Angrey Maratha Admiral Manohar Malgaonkar

५ The Maratha Navy B.K.Apte

६ The Maratha Supremacy (The History and Culture of Indian People) Edited by R.C.Mujumdar Ch. 1-3-5-15-18.

भाग चवथा

अुत्क्रान्ति आणि निष्कर्ष

(Evolution and Assessment)

प्रकरण

१७ मराठ्यांच्या युध्दशास्त्राची अुत्क्रान्ति (युध्दनीति)

१८ मराठ्यांच्या युध्दशास्त्राची अुत्क्रान्ति (युध्दव्यवहार आणि पुरवठा यंत्रणा)

प्रकरण सतरावे

मराठ्यांच्या युध्दशास्त्राची अुत्क्रांति (१६८०-१७२०)

युध्दनिती

(Evolution of Maratha Warfare-Strategy)

सामान्य विवेचन

(General Consideration)

१६८० ते १७२० या ४० वर्षांच्या कालखंडात मराठ्यांनी प्रथम पश्चिम किना-यावरील सिद्दी आणि पोर्तुगीज आणि त्याबरोबरच मोगल सम्राट औरंगजेब आणि त्याच्या नंतरची मोगलसत्ता यांच्या विरुध्द अखंड असा सशस्त्र संघर्ष केला. जागतिक लष्करी अितिहासाचा आणि युध्दशास्त्राच्या अुत्क्रांतिचा अभ्यास आपण पहिल्या पांच प्रकरणात केलेला आहे. त्याबरोबर अेक गोष्ट निश्चितपणे म्हणता येअील की ही चार दशके मराठ्यांनी आपल्या शत्रूंविरुध्द जो संघर्ष केला त्याला जागतिक लष्करी अितिहासात कोणतीही तोड नाही. अेका विकसित जमातीने दोन किंवा तीन विरोधी शक्तींविरुध्द अितका प्रदीर्घ काळ संघर्ष करुन त्यात विजय प्राप्त करणे आणि त्या सर्वांवर मात करुन आपले अस्तित्व आणि आपली सत्ता कायम टिकवणे असे अेकही अुदाहरण लष्करी अितिहासात सापडत नाही. अशा त-हेचे अनन्यसाधारण कार्य मराठ्यांनी कोणत्या पध्दतीने साध्य केले असा प्रश्न केल्यास त्याचे अुत्तर त्यांनी वापरात आणलेल्या काळ आणि स्थळ यांना अनुरुप अशा बदलत्या अुत्क्रांतिकारक युध्दशास्त्रालाच द्यावे लागेल. या दृष्टीकोनातून प्रकरण ९ ते १६ या आठ प्रकरणामध्ये मराठ्यांनी हाती घेतलेल्या शत्रुविरोधी संघर्षाच्या ज्या अनेक बाजू आपण पुढे मांडल्या त्यांची युध्दशास्त्राच्या तात्त्विक बैठकीतून विवेचन करण्याची आवश्यकता आहे. हे विवेचन प्रामुख्याने युध्दनिती (Strategy) युध्दव्यवहार (Tactics) / आणि युध्द पुरवठा (Logistics) या तीन प्रमुख घटकांच्या संदर्भातच करावा

लागेल. या पैकी युध्दनितीचा अविष्कार या प्रकरणात केला जाईल.

युध्दनितीचा दृष्टीकोन
(Strategic Perception)

युध्दनितीची आखणी करताना ही गोष्ट ध्यानात ठेवणे आवश्यक आहे की कोणत्याही शत्रुविरुध्द युध्दाची कारवाई हाती घेण्यापूर्वी त्या शत्रूचे बळ आणि त्याची युध्दक्षमता लक्षात घेऊनच युध्दाचे आडाखे ठरवावे लागतात. खि.स. १६८० ते ८४ ही चार वर्षे औरंगजेब सारखा अत्यंत प्रबळ शत्रू विजापूर आणि गोवळकोंडा येथील राज्ये नष्ट करण्याच्या प्रयत्नात गुंतला आहे, हे ध्यानात घेऊनच मराठी सत्तेचे दुय्यम शत्रू म्हणजे सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्यावर घणाघाती प्रहार करुन त्यांना कायमचे नष्ट करायचे, या निर्धारानेच संभाजीने पश्चिम किनाऱ्यावर सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्या विरुध्द आक्रमक लढाई सुरु केली. हा संघर्ष चालू असताना आपल्या सत्तेचा प्रमुख शत्रू कोण याची जाणीव ठेवून प्रथम त्याला आवरला पाहिजे. आणि नंतर दुय्यम शत्रूंचा समाचार घेतला पाहिजे ही जाणीव ही मराठी सत्तेचा नेता या नात्याने संभाजीने दृष्टीआड केली नाही. जंजिऱ्याचा संग्राम धुमधडाक्याने सुरु असतांना कल्याण भिवंडीवर झालेल्या मोगली हल्ल्याचे गांभीर्य ध्यानात घेऊन ते आक्रमण आधी निपटून टाकण्यासाठी संभाजीने जंजिऱ्याची लढाई दुय्यम सेनापतीवर सोपविली आणि कल्याण-भिवंडीवरुन मोगल सैन्यास हाकून देण्यासाठी स्वतः सेना विभाग घेऊन त्या क्षेत्रात चाल केली. हीच गोष्ट पुन्हा फोंडयाच्या लढाईत घडली. फोंडयाची लढाई जारी असताना राजपुत्र शहाआलम मराठ्यांच्या स्वराज्यात घुसल्याचे कळताच फोंडयाची लढाई येसाजी कंक याचेवर सोडून शहाआलमला अडविण्यासाठी

महाराष्ट्राकडे धाव घेतली. १६८१ ते १६८८ या तब्बल आठ वर्षांच्या काळात सिद्दी पोर्तुगीज आणि मोगल सेना यांच्या विरुध्द पश्चिम आणि मध्य महाराष्ट्रात प्रखर संघर्ष चालू असतांना देखील मोगलांची शक्ति विभागली जावी या हेतूने हरजीराजे महाडिक यांच्या हाताखाली एक समर्थ सेना विभाग देऊन त्यांना महाराष्ट्रापासून १२०० कि.मिटर दूर असलेल्या पूर्व किना-यावरील मद्रास, पोर्टोनोव्हो आणि कांजीवरम या प्रदेशात आक्रमक चढाई करण्याकरीता रवाना केले.

१६८९ ते १७०० या अकरा वर्षांच्या काळातही मोगल सत्तेचे विभाजन करण्यासाठी राजारामाने रायगड सोडून जिंजीस जाण्याचा निर्णय घेतला. या अकरा वर्षांनी हे सिध्द केले की युध्दनैतिकदृष्ट्या हा निर्णय अत्यंत अचूक होता. या निर्णयामुळे मोगली सेना मध्य महाराष्ट्रात आणि जिंजीपर्यंतच्या १२०० कि. मिटर अंतरात विभागल्या जाऊन त्यांची लढावू क्षमता अत्यंत क्षीण झाली. १७०० ते १७०७ या काळात युध्दक्षमतेत क्षीण झालेली मोगल सेना आणि बादशहाच्या वार्ध्यक्यामुळे मोगल सेनेच्या वरिष्ठ गोटात उफाळून आलेले वैयक्तिक मतभेद यांचा पुरेपुर फायदा मराठयांनी घेतला आणि संघर्ष चालू ठेवून मोगली सेना खिळखिळीत करुन टाकली. औरंगजेबाच्या निधनानंतर मोगलांचे केंद्रीय नेतृत्व विस्कळीत झाले आणि त्यामुळे मराठयांच्या विरुध्द मुकाबला करण्याची ताकद त्यांच्याकडे राहिली नाही.

१७०७ ते १७१२ ही सात वर्षे महाराष्ट्रात सुरु असलेल्या यादवी युध्दामध्ये छत्रपती शाहूने प्रगल्भ राजकीय शहाणपण दाखवून सामोपचाराने अंतर्गत संघर्ष मिटविला आणि मराठी सत्तेचे खरे शत्रू कोण याकडे मराठयांच्या लष्करी नेतृत्वाचे लक्ष वळवून महाराष्ट्राबाहेर मराठी सत्ता वाढविण्यासाठी नवीन संधी

आणि क्षेत्र अुपलब्ध करून दिले. या राजकीय सामंजस्यामुळेच १७११ ते १७२० या काळात राजकीय धोरण राबविण्यासाठी लष्करी वर्चस्वाचा पुरेपुर फायदा घेतला पाहिजे हे बाळाजी विश्वनाथाने सिध्द केले. १०,००० घोडदळ दिल्ली पर्यंत नेवून दिल्लीच्या सत्ताधिशांना मराठ्यांच्या तुल्यबळ शक्तिची दखल घ्यावीच लागेल, अशी परिस्थिती निर्माण केली. मानवनिर्मित परिस्थितीच्या आधारावरच पुढे १७२० ते १७४० या २० वर्षाच्या काळात थोरल्या बाजीरावाने मराठी सत्तेचे झेंडे सर्व अुत्तर भारतभर प्रस्थापित केले.

युध्दनितीचा आविष्कार

(Strategic Manifestation)

मराठ्यांच्या युध्दनितीमध्ये परिस्थितीला अनुरूप असा जो युध्दनितीचा दृष्टीकोन बदलत गेला त्याबद्दलाप्रमाणेच युध्दनितीचा प्रत्यक्ष अविष्कार त्यांनी आपल्या गतिमान आणि आक्रमक हालचालींनी सिध्द केला. मोगलांच्या आणि त्याचप्रमाणे सिद्दी आणि पोर्तुगीज या विरोधी सत्तांच्या तुलनेने मराठ्यांची लष्करी ताकद सर्वांगाने कमजोर होती संभाजी महाराजांनी मराठीसत्तेची सूत्रे हाती घेतली त्यावेळी ते केवळ २४ वर्षाचे होते या अुलट औरंगजेब हा साठी अुलटलेला आणि अनेक मोहिमा स्वतःच्या हिंमतीवर लढविलेला अेक अनुभवी आणि निष्णात सेनापती होता. मोगल सैन्याला जवळजवळ १५० वर्षाची लढावू परंपरा होती. त्याचप्रमाणे सिद्दी आणि पोर्तुगीज हे तर २०० वर्षे सशस्त्र संघर्षात तरबेज झाले होते. राजाराम महाराज सुध्दा मराठी सत्तेची सुत्रे हाती घेतली त्यावेळी केवळ १९ वर्षाचे होते. तिच गोष्ट शाहू आणि बाळाजी विश्वनाथाच्या बाबतीत होती या दोन्हीही व्यक्ति २० ते २५ या वयोगटात होत्या ही परिस्थिती लक्षात घेता मोगलांची साधन संपत्ती आणि त्यांचे संख्याधिक्य या विरुध्द प्रदीर्घ काळ टिकाव धरणे मराठ्यांना केवळ अशक्यच झाले असते परंतु तसे न होता सिद्दी,

पोर्तुगीज आणि मोगल या तिन्ही शक्तिना मराठे यशस्वीपणे तोंड देवू शकले. याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांनी वापरात आणलेली कुशल युध्दनिती ही होय. या युध्दनितीला गुरिला युध्दनिती किंवा गनिमी कावा असे मोघम नाव न देता या युध्दपध्दतीस खच्चीकरणाची युध्दनिती (Strategy of Attrition) हेच नाव देणे योग्य ठरेल. अशा तऱ्हेच्या युध्दनितीची तत्वे विशद करतांना युध्दशास्त्रज्ञ लिडलहार्ट यांनी शत्रूच्या युध्दयोजना विस्कळीत करून टाकणे, शत्रूची अुपस्थिती बिघडविणे आणि शत्रूची पुरवठा व्यवस्था खंडीत करणे अशी प्रमुख तीन सूत्रे सांगितली आहेत. या तीन सूत्रांचा प्रत्यक्ष आविष्कार १६८० ते १७०७ या २७ वर्षात मराठ्यांनी कसा केला हे आता पाहावे लागेल. या युध्दनितीत केवळ बचावात्मक पवित्रा घेऊन भागणार नाही. आवश्य असेल तेथे आक्रमक आणि नाईलाज झाल्यास बचावात्मक असे खच्चीकरणाच्या युध्दनितीचे दुहेरी स्वरूप आहे. १६८० ते १६८९ या ९ वर्षांच्या काळात या युध्दनितीचा अविष्कार खालील प्रमाणे झाला.

अ) आपल्या एखाद्या स्थानकावर शत्रूचा हल्ला झाला असतांना त्याचे दुसरीकडे लक्ष वेधून घेण्यासाठी आणि त्याची अुपस्थिती विभागण्यासाठी त्याच्या विरुध्द दिशेला दुसरी आघाडी अुघडणे. नाशिक जवळील अहिवंत गडावर मोगल सैन्याचे हल्ले होत असतांना मराठी सेनेने नाशिकच्या अुत्तरेस बऱ्हाणपूर आणि सूरत येथे हल्ले करून मोगल प्रदेशात धुमाकूळ घातला आणि औरंगाबाद येथील मुख्य छावणीवर हल्ला केला. रामसेजच्या किल्ल्यावर मोगल हल्ले होत असतांना पुणे-नाशिक मार्गावरील संगमनेर येथील मोगली ठाण्यावर हल्ला करून दुसरी आघाडी अुघडली. कल्याणभिवंडीवर हल्ला होत असतांना सिन्नरकडे दुसरी आघाडी अुघडली त्याचप्रमाणे अहमदनगर येथील हल्ले सफल

होत नाहीत हे पाहून सोलापूरच्या किल्ल्यावर हल्ले सुरु केले.

ब) शत्रू सैन्यावर आपल्या हल्ल्यांनी दबाव कायम राखणे. अहमदनगर किल्ल्यावर हल्ले चालू असतांना सोलापूर भागातील पंढरपूर टेंभुर्णी आणि सांगोला येथील मोगल ठाण्यांवर मराठ्यांनी सतत हल्ले केले. कोथळागडावर मोगलांची ताकद वाढत असतांना दबाव कायम ठेवण्यासाठी संगमनेर, सिन्नर, बहादूरगड आणि पारनेर येथील मोगल स्थानकांवर हल्ले चढविले.

क) कोणत्याही एका शत्रुस्थानकावर मोठ्या गटाने हल्ला करण्या ऐवजी निरनिराळ्या शत्रू स्थानकांवर छोट्या तुकड्यांनी थोडे थोडे थांबून वारंवार सतत हल्ले करणे आणि अशा रितीने शत्रूची मनुष्यहानी करून अन्नधान्य आणि शस्त्र सामुग्री यांची लूटालूट करणे. पुण्याजवळील जुन्नर, साताऱ्याजवळील रहिमतपूर आणि कल्याणभिवंडीजवळील शहापूर या मोगली ठाण्यांवर मुख्य लढाया चालू असतांना मराठी सेनेच्या छोट्या गटांनी हल्ले करून मोगल सेनेला हैराण करून सोडले.

ड) शत्रूची सेना संख्येने जास्त असेल तर तिच्याशी आमनेसामने लढा न देता अकस्मातावर प्रतिकार करून नंतर सुरक्षित ठिकाणी माघार घेणे. औरंगाबाद येथे मराठ्यांचा हल्ला होत असतांना ४० ,००० ची सुसज्ज सेना घेवून औरंगाबादच्या बचावासाठी खानजहान येत आहे हे कळताच मराठी सेनेने तेथून माघार घेतली. नाशिक जवळील धरमपूर खिंडीत मोगल सैन्याचा जोर वाढत असल्यामुळे तेथे प्रत्यक्ष लढाई न करता मराठी सेनेने तेथून माघार घेतली. साताऱ्या जवळ हंबीरराव मोहित्यांचा गट एकाकी असताना शिरवळवरून गाझीउद्दीनखान मोठी सेना घेवून येत आहे हे कळताच मोहित्यांनी साताऱ्याहून माघार घेवून वाईकडे कूच केले.

ब) आपल्या राज्याच्या परिसीमेत शत्रू विरुध्द लढा चालू असतांना आपल्या राज्यापासून हजारो किलो मिटर दूर असलेल्या अशाच प्रदेशात शत्रूची ताकद विभागण्यासाठी आक्रमक चढाई करणे. १६८० ते ८७ पर्यंत मध्य महाराष्ट्रात मोगल विरोधी संघर्ष चालू असतांनाच १५००० ची घोडदळ तुकडी पूर्वकिनाऱ्यावर मद्रासपर्यंत पाठवून मराठ्यांनी आक्रमक हालचाली सुरु केल्या अशा रितीने बहुतांशी आक्रमक हालचाली सुरु ठेवून आणि नाईलाज झाल्यास बचावात्मक पवित्रा घेऊन शत्रूचे खच्चीकरण कसे करता येईल हे मराठ्यांनी आपल्या यशस्वी हालचालींनी सिध्द केले.

या युध्द केवळ बचावात्मक पवित्रा घेऊन मोक्याचे किल्ले झुंजवत असताना शत्रूचे खच्चीकरण कोणत्या प्रकारे करावे याचा एक आलेखच १६८९ ते १७०० या अकरा वर्षात मराठ्यांनी घालून दिला. साताऱ्याचा अजिंक्यतारा, कोल्हापूरजवळील पन्हाळा आणि मद्रास जवळील जिंजी हे तीन किल्ले जवळजवळ आठ वर्षे मराठ्यांनी कसे झुंजविले याचे रहस्य त्यांच्या सर्वांगिण खच्चीकरणाच्या पध्दतीला च दिले पाहिजे. साताऱ्याच्या किल्ल्यावरील शिबंदी निष्ठेने किल्ला लढविला असताना किल्ल्याबाहेर वेढा घालून असलेल्या मोगल सेनेवर धनाजी जाधवाने एक प्रतिवेढा घालून मोगल सेनेला संत्रस्त करुन सोडले आणि याच वेळी धनाजीच्या प्रतिवेढ्याचे काम (Counter-Siege Operations) सुलभ व्हावे म्हणून अजिंक्यतारा आणि पन्हाळा यांना वेढा घालणाऱ्या मोगल सेनेची कुमक आणि रसद तोडून टाकावी म्हणून सातारा आणि कोल्हापूर यांच्या पूर्वेस असलेल्या जवळजवळ २०० मैलाच्या टापूतील सर्व मोगल ठाण्यांवर संताजी घोरपडे यांनी सतत हल्ले चालू ठेवले हीच पध्दत जिंजीच्या वेढ्यातही वापरात आणली गेली.

जिंजीच्या किल्ल्यात प्रत्यक्ष राजाराम महाराज प्रबळ सैन्याच्या साहाय्याने किल्ला लढवित असतांना धनाजी जाधवाने जिंजीच्या आसपास असलेल्या प्रदेशात म्हणजे मद्रास, वेलोर, कांजीवरम आणि त्रिचनापल्ली या सर्व ठिकाणी उपस्थित असलेल्या मोगल तुकड्यांवर घणाघाती हल्ले चढविले. त्याच वेळी दक्षिण भारत आणि मध्य महाराष्ट्र यांच्या मधील १२०० कि.मि. अंतरातील मोगल ठाण्यांवर संताजी घोरपडे यांनी हल्ले करण्याचे सत्र चालू ठेविले. त्यामुळे धनाजीच्या प्रतिवेढ्याचे काम व किल्ल्यावरील शिबंदीचे काम अधिक परिणामकारक झाले.

खि.स. १७०० ते १७०७ या खच्चीकरणाच्या उज्ज्वल काळात मराठ्यांनी आपली युद्धनिती अत्यंत चौफेर केली. मध्यमहाराष्ट्रात मोगलसेनेच्या विखुरलेल्या तुकड्यांवर जागोजागी हल्ले करीत असतांना दिल्लीहून येणारी त्यांची कुमक, द्रव्य आणि अन्नधान्याचा पुरवठा संपूर्णपणे तोडून टाकावा म्हणून नेमाजी शिंदे, धनाजी जाधव, हैबतराव निंबाळकर आणि परसोजी भोसले या चार मातब्बर मराठा सरदारांनी गुजराथ, माळवा आणि बुंदेलखंड या विस्तीर्ण प्रदेशांवर अंमल प्रस्थापित करून मोगल सेनांचे सर्व पुरवठा मार्ग बंद करून टाकले. हे तिन्ही सधन आणि सुपीक प्रांत मोगल सेनेची कोठारेच समजली जात होती. ती मराठ्यांच्या ताब्यात आल्यामुळे दक्षिणेतील मोगल सेनेची संपूर्ण नाकेबंदी झाली.

वरील विवेचना वरून हे स्पष्ट होईल की खच्चीकरणाच्या युद्धनितीचा सर्वांगीण पद्धतीने प्रत्यक्षात वापर करून या ४० वर्षाच्या काळात मराठ्यांनी युद्ध हे केवळ अेक शास्त्रच नसून ती अेक कला आहे ही वस्तुस्थिती सिद्ध केली. मराठी सत्तेचे प्रत्यक्ष केंद्रीयनेते युद्धाच्या कार्यवाहीत अननुभवी असतांना देखील अखंड संघर्षाची सर्व जबाबदारी मराठा सरदारांनी आपल्या शिरावर घेतली आणि मराठा सैनिकांनी निष्ठा आणि स्वार्थत्याग यांच्या पायावर नेतृत्वाला

योग्य ती साथ देऊन मराठी सत्ता जिवंत ठेवली. या ४० वर्षांच्या काळात युरोपमध्ये सुध्दा अशा त-हेच्या लष्करी डावपेचांची अशी मोहिम घडून आलेली नाही. मार्लबरोने युरोपात केलेल्या लढायात अशा त-हेच्या सक्षीकरणापेक्षा रणक्षेत्राचा अंदाज घेऊन वरचढ हालचालींवर (Superier Manouvre) यावरच अधिक भर दिलेला दिसतो. सैनिक आणि सैन्य या बाबत बोलावयाचे झाल्यास या काळातील मराठी सेना जेवढी एकजीव आणि एकसंघ होती तशी परिस्थिती युरोपीय सेनाजात नव्हती यावेळी युरोपीयन सेनांमध्ये भाडोत्री सैनिकांचे प्रमाण अधिक असे. मार्लबरोच्या युरोपमधील स्वा-यात एकंदर ६०,००० सैन्यापैकी फक्त १८,००० इंग्रज सैनिक असून बाकीचे भाडोत्री सैनिक होते. युध्दाचे हे सर्व घटक लक्षात घेता युध्दनीती युध्दतंत्र आणि सैन्यव्यवस्था या हिन्दी क्षेत्रात मराठे आणि त्यांच्या सेना कोणत्याही दृष्टीने कमी नव्हत्या असे म्हणणे ही अतिशयोक्ती होणार नाही.

प्रकरण सतरावे

संदर्भसूची

१ Strategy : The Indirect Approach
B.H.Liddell Hart - Ch. 19-20-21-22.

२ ON War - Gen Carl Von Clauswitz
Vol.3

३ The Face of Battle John Keegan.

प्रकरण अठरावे

मराठ्यांच्या युध्दशास्त्राची उत्क्रांति

युध्दव्यवहार आणि पुरवठा यंत्रणा

(Evolution of Maratha Warfare
Tacties and Logestics)

सामान्य विवेचन

(General Considerations)

मागील प्रकरणात १६८० ते १७२० या ४० वर्षांच्या काळात मराठ्यांच्या युध्दशास्त्रात प्रामुख्याने युध्दनैतिक दृष्ट्या (Strategic Point of Wiew) जी उत्क्रांति झाली त्याबद्दलचे मुल्यमापन करण्यात आलेले आहे. या शेवटच्या प्रकरणात युध्दनितीच्या मूलभूत बैठकीवर आधारीत प्रत्यक्ष लढाईचे सूत्र संचलन (Conduct of the Battle) करण्यात मराठ्यांनी ज्या सूत्रांचे पालन केले ती सूत्रे कोणती आणि ती आधुनिक युध्दशास्त्राच्या प्रचलित नियमांमध्ये कशी असतात या बद्दलचे निष्कर्ष मांडणे आवश्यक आहे. सर्वसामान्यपणे अशा तऱ्हेच्या मुल्यमापनात खालील गोष्टींचा समावेश करण्यात येईल.

अ) लढाईच्या सर्वमान्य तत्वांचे पालन
ब) लष्करी संघटना आणि शस्त्रास्त्रे
क) नेतृत्वाचे गुण
ड) सैन्याचे मनोधैर्य (Morale) कायम राखण्याचे उपाय
इ) पुरवठा व्यवस्था
ई) जमीनीवरील लढाईच्या प्रगतिसाठी नौसेनेचे सहकार्य

लढाअीच्या सर्वमान्य तत्वांचे पालन

आधुनिक युध्दामध्ये कोणतीही लढाअी यशस्वीपणे जिंकावयाची असल्यास सर्वमान्य अशा तत्वांचे पालन करावे लागते. अर्थात प्रत्येक लढाअीत सर्वच तत्वे लागू पडतील असे नाही. यादृष्टीने पाहिल्यास असे आढळून येअील की १६८० ते १६८४ या चार वर्षात सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्या विरुध्द आक्रमक लढाअी करतांना संभाजीने अुद्दिष्टाचा सातत्याने पाठपुरावा (Maintenance of the Aim) आणि आक्रमक कार्यवाही (Offensive Action) ही युध्दशास्त्राची दोन महत्वाची तत्वे केव्हाही दृष्टीआड होअू दिली नाहीत. अुंदेरी बेट पहिल्या हल्ल्यात हस्तगत झाले नाही तरी थोडयाशा क्रमाने अुंदेरीवर दुसरा हल्ला चढविण्यात आला, हा हल्ला अयशस्वी झाल्यावर निराश न होता अुलट दुप्पट जोराने मराठी सेनेने दंडाराजपुरीवर हल्ला चढविला हा हल्ला अितका प्रखर होता की तेथून माघार घेतलेल्या सिद्दीच्या सैन्याला थोडीशीही अुसंत मिळू शकली नाही. याच्या पाठोपाठ जंजि-याच्या अभेद्य किल्ल्यावर लगेचच निकराचा हल्ला करण्यात आला. समुद्रमार्गाने किल्ला सर होत नाही ही खात्री पटल्यावर खुष्कीच्या मार्गाने आपली सेना किल्ल्याच्या तटापर्यंत पोहचवावी म्हणून प्रत्यक्ष खाडी भरुन काढण्याचा अचाट प्रयत्न संभाजीने हाती घेतला या दुर्दम्य हालचाली हा केवळ हट्टाहास नव्हता तर अुद्दिष्टाच्या पूर्तिसाठी व निर्धारपूर्वक अुचललेले ते अेक गंभीर पाअूल होते. पोर्तुगीजांविरुध्द लढत असतांना तारापूर आणि माहिम ही पोर्तुगीजांची ठाणी मराठ्यांनी जिंकून घेतली होती. मराठ्यांची पाठ फिरताच पोर्तुगीजांनी ती परत हस्तगत केली. या परिस्थितीत स्वस्थ न बसता ताज्यादमाच्या तुकडया

पाठवून तारापूरवर पुन्हा हल्ला करण्यात आला आणि तेथून पोर्तुगीज सेनेला घालवून देण्यात आले. अेवढे करून मराठी सेना स्वस्थ बसली नाही आक्रमक अुद्दिष्ट पुढे ठेवून आणि तारापूरला शक्तिस्थान बनवून मराठी सेनेच्या तुकडया अुत्तरेस दमणकडे आणि दक्षिणेस वसअीकडे ही दोन्ही ठिकाणे घेण्यासाठी रवाना झाल्या. फोंडयाच्या लढाअीतही हीच घडाडी पुन्हा प्रचितीला आली. स्वतः पोर्तुगीज व्हॉअीसरॉय किल्ल्यावरती चालून येत आहे ही वार्ता मिळताच किल्ला प्राणपणाने लढविला गेला आणि किल्ल्याला पोर्तुगीजांनी वेढून घेरले असताना ही नव्या तुकडया किल्ल्यात दाखल करून पोर्तुगीजांना माघार घेण्यास भाग पाडले अचानक कारवाअी(Surprise Action) हे युध्दशास्त्राचे आणखी अेक मान्य तत्व आहे. या तत्वास अनुसरून गोव्यातील पोर्तुगीजांना कर्नाटकातून अन्नधान्यांची रसद येत असे ती तोडून टाकण्यासाठी मराठी आरमाराला अंजदीव बेटावर अचानक हल्ला करून ते ताब्यात घेण्याचा हुकूम देण्यात आला. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष गोवे शहरावर हल्ला करण्यासाठी पोर्तुगीजांच्या ध्यानीमनी नसतानाही मराठयांनी जुवे बेट हस्तगत केले आणि तेथून पुढे जुवे बेट हे शक्तिस्थान (Strong Point) बनवून प्रत्यक्ष गोव्यावर चढाअी करण्याची योजना तयार केली.

१६८० ते ८९ या नऊ वर्षांच्या काळात मराठी सत्ता कोणत्याही परिस्थितीत टिकली पाहिजे हे ठाम अुद्दिष्ट पुढे ठेवून मध्य महाराष्ट्रात मोगली सेनांच्या विरुध्द अखंड संघर्ष चालू ठेवण्यात आला. त्याचप्रमाणे मध्यमहाराष्ट्रात अेकत्रीत झालेली मोगल सेना विभागली जावी म्हणून मद्रास जवळील प्रदेशात आक्रमकचढाअी करण्यासाठी मराठी गट तिकडे रवाना करण्यात आले. आणि त्यांचा मार्ग अडविण्यासाठी मोगल सेनेच्या तुकडयांना आपल्या सैन्याचे विभाजन

करणे भाग पडले.

१६८९ ते १७०० आणि १७०० ते १७०७ या १८ वर्षात मोगल सेनेचे खच्चीकरण करण्यात बचावात्मक धोरणाबरोबरच मिळेल त्या ठिकाणी आक्रमक कारवाई करून शत्रूचे भारी नुकसान करण्यात आले. या कालखंडाच्या अखेरच्या पर्वातही दिल्लीकडे घोडदौड करण्यात आक्रमक पवित्रा घेतल्यामुळेच मराठ्यांच्या लष्करी वर्चस्वाचा दरारा दिल्लीत निर्माण झाला आणि त्यामुळे मोगल सत्ताधाऱ्यांनी कोणतीही खळखळ न करता मराठ्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या.

लष्करी संघटना आणि शस्त्रास्त्रे

सर्वसामान्यपणे असे म्हणता येईल की या संबंध ५० वर्षांच्या काळात समकालीन युरोपातील सैन्यांप्रमाणे मराठी सेनेचा जास्तभर घोडदळावरच होता. घोडदळाच्या मानाने पायदळाची संख्या कमी असे. याचे मुख्य कारण असे की खच्चीकरणाच्या युद्धपद्धतीत गतिमानता (Mobility) आणि संहार शक्ति (Striking Power) ही दोन तत्वे महत्त्वाची असल्यामुळे दूर अंतरावर घोडदौड करून शत्रू स्थानकावर अचानक हल्ला करण्यास घोडदळाशिवाय दुसरा पर्याय नव्हता. घोडदळाचा वापर मोठ्या प्रमाणावर होण्याचे आणखी एक कारण असे की पश्चिम महाराष्ट्रात, दक्षिण भारतात आणि उत्तरेस गुजराथ, माळवा आणि बुंदेलखंड या सर्व प्रदेशात जमीन सपाट असल्यामुळे घोडदळाच्या गतिमानतेला ता अत्यंत सोयीस्कर ठरला. घोडदळाची संघटना बारगीर आणि शिलेदार या दोन वर्गांवरच होत राहिली परंतु बारगीरांचे प्रमाण वाढविण्यात आले. अनेक ठिकाणच्या मोगल ठाण्यांवर केलेल्या लुटींमध्ये तऱ्हेचे घोडे मोठ्या संख्येने हस्तगत होत असल्यामुळे ते बारगीरांकडे वाटून देण्यात कोणतीच अडचण नव्हती.

या काळातील मोगल सेनेकडे हलक्या आणि भारी अशा दोन्ही तऱ्हेच्या तोफा असत. पोर्तुगीज आणि सिद्दी यांच्याकडे तर तोफा आणि बंदुका यांची कमतरता नव्हती. संभाजीच्या काळात पोर्तुगीजांकडून चांगल्या प्रतिच्या तोफा आणि बंदुका (Muskets) घेण्याचा मराठ्यांनी प्रयत्न केला. तरीपण मराठी सैन्यामध्ये तोफखान्याचा स्वतंत्र विभाग १७९२ पर्यंत झाला नाही. मराठी घोडदळ आणि पायदळ सैनिकांकडे ढाल, तलवार आणि भाला हीच प्रमुख शस्त्रास्त्रे होती. बंदुकीचा वापर १७२० पर्यंत मोठ्या प्रमाणावर मराठी सैन्यात झाला नव्हता.

नेतृत्वाचे गुण आणि सैन्याचे मनोधैर्य

कोणत्याही सेनेमध्ये सैनिकांचे मनोधैर्य आणि हौसला कायम ठेवण्या साठी कांही विशिष्ट गोष्टींची आवश्यकता लागते. सर्व प्रथम म्हणजे सेनेचा नेता हा आघाडीवर जातीने हजर असून त्याचे वैयक्तीक नेतृत्व आपणास लाभणार आहे ही भावना सैनिकांचे मनोधैर्य वाढविण्यास फार प्रबळ ठरते. जंजिऱ्याच्या किल्ल्यावर घनघोर लढाई सुरु असतांना संभाजी महाराज त्या ठिकाणी स्वतः हजर होते. अितकेच नव्हे तर किल्ला सर झाल्यास प्रत्येक सैनिकाला अर्धा शेर सोने आणि चांदीची कडी त्यांनी बक्षीस म्हणून देऊ केली आणि हल्ला करण्यासाठी अुदंड अिर्षा त्यांच्या मनात अुत्पन्न केली. याचप्रमाणे फोंड्याच्या किल्ल्याला पोर्तुगीजांनी चोहोकडून वेढले आहे याची जाणीव असूनही २००० स्वारांची अेक ताजी तुकडी घेऊन आजूबाजूला सज्ज असलेल्या पोर्तुगीज सेनेची पर्वा न करता संभाजीराजे आपल्या तुकडीच्या आघाडीवर स्वतः किल्ल्यात गेले आणि तेथून पोर्तुगीजांविरुध्द पुन्हा लढाई करुन त्यांनी पोर्तुगीज सेनेला माघार घेण्यास

माग पाडले.

१६८९ मध्ये झुल्फिकारखानाने रायगडची नाकेबंदी केलेली असतांना आणि बाहेर पडल्यास अनेक त-हेचे धोके आहेत याची पूर्ण कल्पना असतांना देखील छत्रपती राजाराम आणि त्यांचे अनेक विश्वासू सरदार किल्ल्याबाहेर पडले आणि मजल दरमजल करीत त्यांनी जिंजीत प्रवेश करुन तेथूनच मोगल विरोधी मोहीम चालू केली या हालचालीतही केवळ १९ वर्षाच्या राजारामाने युध्दनेतृत्वाला साजेशी अशी फार तेजस्वी झळक दाखविली असे म्हणावे लागेल. १७०७ नंतर मराठ्यांच्या यादवी युध्दात शाहू महाराजांनीही ताराबाई विरोधी मोहिमेचे जातीने नेतृत्व केले. परंतु त्यानंतर मात्र बाळाजी विश्वनाथाची कर्तबगारी लक्षात येऊन आणि त्याला सेनाकर्ते ही पदवी देऊन मराठी सैन्याच्या नेतृत्वाची जबाबदारी त्यांना बाळाजीवर टाकली.

व्यक्तिगत नेतृत्वाबरोबरच मोगल विरोधी संघर्षात मराठी सेनेचे मनोधैर्य वाढविण्यास सर्वात मोठी प्रेरणा (Motivation) कोणती असेल तर ती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याचे रक्षण करणे ही होय. आपले राज्य कोणत्याही परिस्थितीत टिकले पाहिजे आणि परकीय सत्तेसमोर आपण कधीही मान झुकवता कामा नये ही फुलून शिकवण आणि प्रेरणा मराठ्यांच्या सैन्यात सर्वकाळ नांदत असल्यामुळे एका जबरदस्त साम्राज्यशाही विरुध्द ते यशस्वीपणे टक्कर देऊ शकले.

पुरवठा व्यवस्था

मराठ्यांच्या सैन्यामध्ये मोगल सैन्याप्रमाणे गुंतागुंतीची पुरवठा यंत्रणा

नव्हती असे दिसते. मोगल सैन्याप्रमाणे अन्नधान्य, दारुगोळा; स्वारी बरोबरचे सामान आणि जनावरांना लागणारी वैरण ही वाहून नेण्यासाठी हत्ती , उंट आणि बैलगाडया यांचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येई, याच कारणामुळे मोगल सैन्याच्या हालचाली मंदगतीने होत असत या उलट मराठ्यांची पुरवठा व्यवस्था ही दोन तत्वांवर अवलंबून होती. पहिले तत्व असे की रणक्षेत्राच्या आसपासच्या प्रदेशातील गावात जे काही हाती लागेल त्यावर कब्जा करून लढाईच्या काळात त्याच्यावरच गुजराण करणे (Living off the Country) असा त्यांचा नेहमीचा शिरस्ता होता दुसरे तत्व म्हणजे शत्रूच्या स्थानकांवर अचानक हल्ला करून शत्रूच्या सामानाची लूटालूट करणे आणि तेथे मिळालेल्या साठ्यांवरच आपला दैनंदिन निर्वाह चालविणे यावरच त्यांचा भर असे. कदाचित याच कारणामुळे मराठी सेना म्हणजे लुटारू सेना असा तऱ्हेचा गैरसमज उत्पन्न झाला. युद्धशास्त्रीय दृष्ट्या या घटनेकडे पाहिले असे म्हणावे लागेल की खच्चीकरणाच्या युद्धपद्धतीत गतीमानता, अचानक, कारवाई आणि आक्रमक पवित्रा या तीन गोष्टींची नितांत आवश्यकता असल्यामुळे सेनेची पुरवठा व्यवस्था अत्यंत लवचिक (Flexible) अशा वरील दोन तत्वांवर करण्याशिवाय मराठी सेनेपुढे दुसरा पर्यायच नव्हता. याच कारणामुळे मराठ्यांच्या हालचाली अत्यंत जलद आणि अचानक होत असत आणि म्हणूनच मोगल सेनेला त्यांचा मुकाबला करणे अत्यंत कठीण होत असे. मंदगतीने हालचाल करणाऱ्या मोगल सैन्याला मराठ्यांच्या हालचाली विषयी अत्यंत आश्चर्य वाटे. इ.स.१७०० ते १७०७ पर्यंत मोगल छावणीत प्रत्यक्ष राहिलेल्या मानुचीने असे म्हटले आहे की मराठी सेना ही आज येथे तर उद्या तेथे, आज कर्नाटकात तर उद्या कोकणात अशा परस्परापासून दूर असलेल्या प्रदेशात कोठे आणि कधी अवतिर्ण होईल याची खबर धास्तीच मोगल सैन्याला वाटते आणि म्हणूनच त्यांचे मनोधैर्य खचावलेले असे.

संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांनी अत्यंत जलद हालचाली बरोबरच हल्ल्याची प्रखरता (Intensity of Attack) जबरदस्त वाढविल्यामुळे मोगल घोडेस्वाराचा घोडा पाणी पिईनासा झाला तर तुला पाण्यात संताजी धनाजी दिसतात की काय असे मोगल सैनिक विचारीत अशा प्रकारच्या दंतकथा प्रसारित झाल्या. रसदिक पुरवठा व्यवस्था आणि जलद हालचाली या दोन गोष्टी खुद्द शिवाजी महाराजांनीच मराठी सैन्यात रूढ केल्या मुळे पुढील १५० वर्षे हीच प्रथा चालू राहिली. मुंबई आणि सुरत येथील इंग्रज फॅक्टरींच्या अधिका-यांनीही मराठ्यांच्या जलद हालचालींचे वर्णन करताना शिवाजी महाराज ही एक अमानुष शक्ति असून दूरवरचे अंतर तोडण्यास कदाचित ते पंखांचाही वापर करीत असतील असे उल्लेख केले आहेत.

जमीनीवरील लढाईसाठी नौसेनेचे सहकार्य

मराठ्यांच्या मुख्य सेनेबरोबरच १६६० पासून पुढे मराठ्यांचे आरमारही तितकेच शक्तिमान बनल्यामुळे जमीनीवरील लढाया मोक्याच्या ठिकाणी विशेषतः अशा त-हेचे ठिकाण किनारपट्टीला लागून असेल तर जमीनीवरील कारवाई यशस्वी व्हावी म्हणून समुद्र मार्गाने स्वतःच्या सैन्याला रसद आणणे आणि शत्रू स्थानकांना तशा त-हेची रसद सागरी मार्गाने मिळत असेल तर आपल्या आरमाराकडून ती तोडून टाकणे आणि सागरी मार्गानेही शत्रूची संपूर्ण नाकेबंदी करणे या दोन्ही तंत्रांचा मराठ्यांनी वारंवार वापर केला. मराठ्यांनी अंजदीव बेटावर केलेला हल्ला आणि तेथे स्थापन केलेली मराठ्यांची चौकी ही गोव्यातील पोर्तुगीजांना कर्नाटकातून सागरी मार्गाने मिळणारी कुमक तोडून टाकण्यासाठी होती. कोथळागड, बाणे

तारापूर, वसई आणि माहिम या किनारपट्टीवरील प्रदेशात मोगलांविरुध्द हल्ले केले गेले आणि मोगल सैन्याच्या अन्नधान्य आणि दारुगोळ्याची मराठी सैन्याने लूटालूट केली, त्यावेळी मोगलांनी सुरतेहून सागरी मार्गाने रसद आणण्याचा प्रयत्न केला ही रसद तोडून टाकावी म्हणून मराठी सैन्याने या सर्व ठिकाणांवर हल्ले करुन ती आपल्या ताब्यात घेतली. मराठी आरमाराचे दस्ते दमण पासून साळी कारंजा खाडीपर्यंत सागरी गस्त घालण्यासाठी तैनात करुन मोगलांच्या जहाजांना किना-यावर कोठेही उतरणे अशक्य करुन टाकले. खि.स.१७१५ ते १८ या दरम्यान मराठी आरमाराचे प्रमुख कान्होजी आंग्रे यांनी मराठी आरमाराचे निर्विवाद वर्चस्व संपूर्ण पश्चिम किना-यावर प्रस्थापित केले होते. त्यामुळेच कोकण विभागात आणि मुंबई, कल्याण आणि ठाणे या परिसरात पोर्तुगीज, सिद्दी किंवा इंग्रज हे मराठ्यांच्या नाविकशक्तिला आव्हान देवू शकले नाहीत. इंग्रज आरमाराने स्वतःच्या बळावर दोन वेळा आणि पोर्तुगीज आरमाराच्या मदतीने तिस-यांदा असा तीन वेळा मराठ्यांच्या आरमाराविरुध्द संघर्ष करण्याचा प्रयत्न केला आणि तिन्ही वेळा भारी नुकसान सोसून इंग्रज आरमाराला मुंबईकडे माघार घ्यावी लागली.

आतापर्यंत आपण १६८० ते १७२० या ४० वर्षांच्या काळात मराठ्यांच्या युध्दशास्त्रात कोणती पध्दतशीर उत्क्रांति होत गेली याचा चिकित्सक आढावा घेतला आहे या उत्क्रांतित भौगोलिक परिस्थितीची लष्करी पार्श्वभूमी (Geopolitics) आणि आपल्या विरुध्द असलेल्या शत्रूचे सामर्थ्य या दोन मुख्य गोष्टी ध्यानात घेवून युध्द पध्दतीत अनुरुप बदल करण्यात आले. मोगल सत्तेविरुध्द १६८० ते १७०७ अशी २७ वर्षे मराठ्यांनी जी शौर्याची झुंज

दिली त्याचा गौरव करताना विख्यात अितिहासकार सेतू माधवराव पगडी यांनी या संघर्षाला मराठ्यांचे महाभारत असे नाव दिले आहे. मराठे शाहीच्या जवळजवळ २०० वर्षांच्या लष्करी अितिहासात १६८० ते १७२० ही ४० वर्षे हा अेक अत्यंत अुज्वल कालखंड होता अशीच नोंद अितिहासाला करावी लागेल.

प्रकरण अठरावे

संदर्भसूची

१ Strategy : The Indirect Approach - B.H.Liddell Hart - Ch. 19-20-21-22

२ On War - Gen Carl Von Clauswitz Vol.3

३ *The Face of Battle - John Keegan.*